
# पत्रकारांचा शिक्षण विचार

डॉ. न. म. जोशी



# पत्रकारांचा शिक्षण-विचार

(चिपणूकर, आगरकर, टिळक, परांजपे, केळकर, कोल्हटकर, जोशी)

डॉ. न. म. जोशी

सुविद्या प्रकाशन, पुणे - ३०.

# पत्रकारांचा शिक्षण विचार

डॉ. न. म. जोशी

•

प्रकाशन क्र. २७

•

ISBN 81-86152-26-1

•

**प्रकाशक**

अ. सि. पुराणिक

सुविद्या प्रकाशन

१४९ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

दूरध्वनी : २४४५४८९३

•

**सौ. आशा जोशी**

१०१३ सदाशिव पेठ,

गंधाली निवास, पुणे - ४११ ०३०.

दूरध्वनी : २४४७६८६८

•

**अक्षरजुळणी व मुद्रक**

अक्षरवेल

का. वि. शिगवण

सी १८, प्लॉट नं. ५७२,

श्री गणेश सोसायटी, दत्तवाडी, पुणे ३०.

•

प्रथमावृत्ती : डिसेंबर २००६

•

मूल्य २५०/- रुपये

# भूमिका

पुणे विद्यापीठाच्या पीएच. डी. पदवीसाठी शिक्षणशास्त्र शाखेत १९८८ साली मी एक प्रबंध सादर केला. प्रबंधाचा विषय होता.

' १९५० पूर्व मराठी वैचारिक-निबंध-वाङ्मयातील शिक्षण विचाराचा चिकित्सक अभ्यास.'

१८७४ साली निबंधमाला प्रसिद्ध झाली आणि मराठी निबंध वाङ्मयाच्या सकस आणि सरस अशा निबंधलेखनप्रकारात मोलाची भर पडली. निबंधमालेने वैचारिक साहित्याचे दालन सुरु केले. १९५० पर्यंत अनेक निबंधकारांनी निबंधलेखन करून हे दालन समृद्ध केले. पण संशोधनासाठी सर्व निबंधकारांच्या निबंध साहित्याचा विचार करणे योग्य नव्हते. प्रस्तुत संशोधन सामग्री मराठी निबंधवाङ्मय हीच असली तरी संशोधनक्षेत्र शिक्षणविचार हे होते. यादृष्टीने संशोधनाला विशिष्ट दिशा प्राप्त व्हावी म्हणून आणि संशोधन सखोल व्हावे म्हणून ज्या निबंधकारांचे निबंध निवडायचे त्यांच्यासंबंधी काही निकष निश्चित केले.

### शिक्षक : लोकशिक्षक : लेखक

ज्या लेखकांनी स्वत: शिक्षक, प्राध्यापक म्हणून निदान काही वर्षे प्रत्यक्ष कार्य केले, ज्या लेखकांचे निबंध मराठी वाङ्मयाच्या इतिहासलेखकांनी आवर्जून नोंदविले, जे शिक्षक–लेखक स्वत: संपादक–वृत्तपत्रकार होते, अशाच निबंधलेखकांचे निबंध विचारात घेण्याचे निश्चित केले. असे सात निबंधकार दृष्टिपथात आले.

चिपळूणकर, आगरकर, टिळक, परांजपे, कोल्हटकर, केळकर, आणि वा. म. जोशी हे ते निबंधकार होत.

या सातही निबंधकारांचे वैशिष्ट्य असे की हे सर्व निबंधकार स्वत: शिक्षक होते. त्यांनी शिक्षणसंस्थांमध्ये प्रत्यक्ष अध्यापनाचे कार्य केले होते.

दुसरे वैशिष्ट्य म्हणजे हे निबंधकार ख्यातनाम लेखक होते. अर्थातच शिक्षक, लोकशिक्षक व लेखक या त्रिगुणांसहित असलेले त्यांचे लेखन आपल्या वैचारिक वेगळेपणासह वैशिष्ट्यपूर्ण असले पाहिजे असे त्यांचे काही लेख वाचताना आढळून आले.

यातील बहुतांश लेखन वृत्तपत्रांतच अग्रलेखांच्या स्वरुपात प्रथम प्रसिद्ध झाले. लोकमान्य टिळ्कांचे केसरीतील अग्रलेख, आगरकरांचे सुधारकातील लेख, परांजपे यांचे काळातील निवडक निबंध, वा. म. जोशी यांचे विश्ववृत्तमधील लेख, अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे संदेश मधील लेख, अशा लेखांचे यथाकाल संग्रह प्रकाशित झाले. त्यामुळे त्यांचा एकत्रित अभ्यास करणे सहज शक्य झाले.

पीएच. डी. पदवीसाठी जे संशोधन केले त्यावर आधारित हा ग्रंथ असला तरी पीएच. डी. चा प्रबंध जसाच्या तसा मात्र या ग्रंथात उतरविलेला नाही. मूळ विषयातील चिंतनाची सामग्री वेगळ्या पद्धतीने मांडून हा ग्रंथ सिद्ध केला आहे.

## साहित्य आणि शिक्षण विचार

शिक्षक, पर्यवेक्षक, परीक्षक, प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक अशा विविध भूमिका वठवितांना व त्यासंबंधी वाचन करताना असे ध्यानात आले की शिक्षणाचा इतिहास, शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक मानसशास्त्र इ. विषयांची मांडणी करणाऱ्या ग्रंथांतूनच शिक्षणविचार असतो असे नाही तर ललित साहित्य अथवा ललितेतर वैचारिक साहित्य यांतूनही शिक्षणविचार प्रकर्षाने जाणवतो. फरक एवढाच की असे साहित्य शिक्षणविचार सांगण्यासाठी लिहिलेले नसते.

कै. ग. दि. माडगूळकर यांची एक कविता अशी आहे.

*बिनभिंतींची शाळा इथली*
*लाखो इथले गुरु*
*झाडेवेली पशुपाखरे*
*यांशी दोस्ती करू.*

ही कविता म्हणजे अनौपचारिक शिक्षणाचा अनौपचारिक पाठच होय. समर्थ रामदासांच्या दासबोधात लेखन, वाचन, अक्षर, ज्ञानमहती यासारखे कितीतरी शैक्षणिक घटक येतात. अशा असंख्य उदाहरणांवरून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती अशी की साहित्य, शिक्षण आणि जीवन यांचा अन्योन्यसंबंध आहे.

संस्कृतीची आठ प्रधान अंगे असतात. धर्म, राजकारण, अर्थकारण, समाजरचना, विज्ञान, कला, साहित्य व शिक्षण अशी अष्टांग संस्कृती हे त्या त्या राष्ट्राचे, समाजाचे त्याच्या महनीयतेचे व्यवच्छेदक लक्षण समजले जाते. यातील सर्व अंगांच्या विकासप्रक्रियेचे संतुलन असेल तर संस्कृतीचा विकास पूर्णत्त्वाप्रत जाऊ शकतो. अन्यथा सांस्कृतिक विकासात अडसर निर्माण होतात.

कालानुरुप या अष्टांगांपैकी एखाद्या किंवा एकाहून अधिक अंगावर विचारवंत भर देतात आणि पूर्वी संतुलन नसेल तर नंतर असे अंतर्गत संतुलन निर्माण होते व संस्कृतीच्या सहस्त्रधारा नव्या जोमाने स्रवू लागतात.

या अष्टांगांपैकी साहित्य व शिक्षण ही दोन अत्यंत महत्त्वाची अंगे मानली जातात. साहित्यात आपल्या संस्कृतीचे दर्शन घडते आणि ही संस्कृती निर्माण करण्याचे कार्य शिक्षणामुळे प्रभावीपणे होते.

## शिक्षणसंस्थेचे महत्त्व

मानवी संस्कृतीच्या इतिहासात शिक्षण या संस्थेला असाधारण महत्त्व आहे. मूल्यांची जपणूक, मूल्यसंवर्धन, मूल्यसंगोपन ही कार्ये शिक्षणसंस्थेद्वाराच आजवर घडत आली आहेत. ज्या मूल्यविचारासाठी वैचारिकांची धडपड असते तो मूल्यविचार जीवनदर्शनाच्या अंगाने साहित्यात सांगितलेला असतो. साहित्याचा जीवनमूल्यांशी व संस्कृतीशी निकटचा संबंध असतो. आणि जीवनमूल्यांची रुजवण हे तर शिक्षणसंस्थेचे उदात्त कार्य असते.

## वैचारिक पुनरुत्थान

प्रस्तुत ग्रंथात ज्या साहित्यिक-पत्रकार-शिक्षकांच्या लेखनाचा विचार केला आहे ते सर्व महाराष्ट्रातील वैचारिक पुनरुत्थानाच्या चळवळीचे संवर्धक होते. स्वातंत्र्यपूर्व काळात, भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार संपुष्टात येत असतानाच सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्याचे जहाल मार्ग काहींनी अवलंबिले. पण त्याच वेळी वैचारिक क्षेत्राला एक क्रांतिकारक वळण लाभले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी वैचारिक जागृती घडवून सनदशीर मार्गाने प्रयत्न करणारा नवा बुद्धिमंत वर्ग निर्माण झाला. बंगालचे राजा राममोहन रॉय आणि महाराष्ट्राचे महादेव गोविंद रानडे हे या वैचारिक पुनरुत्थानाचे अग्रदूत होते. या वैचारिक पुनरुत्थानाचा ठळक विशेष म्हणजे आधुनिक भारताच्या घडणीत शिक्षणाला किती महत्त्वाचे स्थान आहे याची विचारवंतांना झालेली जाणीव होय.

लोकांना कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे यावर ब्रिटिश अमदानीत खूप उलटसुलट चर्चा झाल्या. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात या चर्चा बऱ्याच होत. प्राचीन पौरस्त्य पद्धतीचे शिक्षण द्यावे की आधुनिक पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण द्यावे या चर्चेचा कौल पाश्चात्य शिक्षणाच्या बाजूने लागला. पण हा केवळ क्षेत्रबदलाचा विचार नव्हता. स्वत्वजागृतीचा विचार होता. विद्यादानाचे कार्य प्रामुख्याने ख्रिस्ती मिशनरी मंडळींच्या हाती एकवटू बघत होते.

शैक्षणिक क्षेत्रात एतद्देशीयांच्या हाती शिक्षणाची सूत्रे असली पाहिजेत असा विचार जोमाने पुढे आला. त्यातूनच राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ उदयाला आली.

म. ज्योतिबा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी एकीकडे वंचितांच्या शिक्षणासाठी कृतिशील वैचारिक परिवर्तनाची चळवळ सुरू केलीच होती. पण प्रस्थापित

शिक्षणपद्धतीतही नवा प्राण फुंकला पाहिजे याची जाणीव सर्वांनाच तीव्रतेने झाली. नव्या वैचारिक पुनरुत्थानाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेली राष्ट्रवादी शैक्षणिक जाणीव हे या पुनरुत्थानाचे यश होय.

## शैक्षणिक जागरण

या कालखंडातील मराठी निबंधकारांची वैचारिक भूमिका कोणती याचा विचार केला तर असे दिसते की पारतंत्र्याच्या जखडबंदीतून बाहेर येण्यासाठी नवशिक्षित लोक मार्ग शोधत होते. शिक्षणप्रसार हे या सर्व लोकांनी परिस्थितीवर उत्तर शोधून काढले. हा शिक्षणप्रसार केवळ माध्यमिक शाळा व कॉलेजे स्थापन करण्यापुरताच मर्यादित नव्हता. समाजमनाचे शिक्षण त्यात अभिप्रेत होते. सामुदायिक मनावर संस्कार करण्याचे व्यापक धोरण या संकल्पात अभिप्रेत होते. लोकांची मरगळलेली मने टवटवीत व्हावीत आणि त्यांना भोवतालच्या जगात चाललेले अन्याय तीव्रतेने जाणवावेत अशी एक नवी प्रेरणा उत्पन्न करावयास हवी होती. वृत्तपत्रे, नियतकालिके आणि व्यासपीठे यांचा आश्रय करून, शब्दाचे हत्यार अधिकाधिक धारदार बनवून, समाजाच्या सामुदायिक मनावर संस्कार करण्याचा घटनात्मक सनदशीर मार्ग आचरण्याशिवाय गत्यंतर नव्हते. (मराठी वाङ्मयाचा इतिहास रा. श्री. जोग १९७३)

शैक्षणिक नवजागरणामुळे राष्ट्रीय शिक्षणाचा जो नवा जोमदार स्रोत निर्माण झाला त्याचे प्रत्यक्ष कृतिशील अनुयायी म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगरकर आणि लोकमान्य टिळक; न्यू इंग्लिश स्कूल (डे. ए. सोसायटी) हे त्यांच्या वैचारिक भूमिकेचे प्रतीक होय.

प्रस्तुत ग्रंथात ज्या सात पत्रकार लेखकांचा विचार केला आहे. त्यात वरील तिघे आहेतच. उर्वरित चौघेही याच विचारधारेचा वसा घेतलेले असे होते.

लोकहितवादींनी आपल्या शतपत्रांतून ज्या प्रकारचे समाज प्रबोधन केले त्याच प्रकारचे प्रबोधन प्रस्तुत निबंधकारांनी केले आहे. हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणे कोणती याचे विवेचन करताना अज्ञान आणि विद्यासंपादनाविषयी उदासीनता ही प्रमुख कारणे लोकहितवादी यांनी सांगितली. आपण शहाणे झालो की स्वातंत्र्य आपोआप येईल असा विचार लोकहितवादींनी आपल्या शतपत्रांतून व्यक्त केला.

प्रस्तुत ग्रंथलेखनासाठी सामग्री म्हणून निबंधवाङ्मयच का निवडले असा प्रश्न उपस्थित होणे शक्य आहे. निबंध हा घाटाने ललित असला तरी त्याचा आत्मा विचार हाच असतो. निबंधामुळे मनोरंजन होत नाही असे नाही. किंवा ललित साहित्यातून प्रबोधन होत नाही असेही नाही. पण निबंधासारख्या वैचारिक वाङ्मयाची निर्मिती होते तीच मुळी प्रबोधनाच्या प्रेरणेतून. आपल्याला लोकांना काहीतरी सांगायचे आहे ही निबंधकाराची भूमिका असते. ते सांगितलेच पाहिजे असे त्याला वाटत असते.

ही प्रेरणा उद्बोधनाची प्रेरणा आहे. विचारप्रधानता, तर्कसंगती, खंडनमंडन ही निबंधाची वैशिष्ट्ये असतात. निबंधकार बहुश्रुत असतो. जे सांगावयाचे त्याची मांडणी तो साधार करतो आणि वाचकाला एखादी गोष्ट प्रभावीपणे पटवून देतो. शिक्षणाचेही कार्य हेच असते. मनपरिवर्तन, मतपरिवर्तन आणि पर्यायाने जीवनपरिवर्तन ही एक शैक्षणिक प्रक्रिया असते. स्वतंत्र विचारशक्तीचा विकास, सर्जनशक्तीचा विकास, जीवनात आवश्यक असणारे विविध प्रकारचे कौशल्य, शिस्त, शीलसंवर्धन, सामाजिक शक्तींचा विकास यांचा अंतर्भाव प्रामुख्याने शैक्षणिक तत्त्वज्ञानात म्हणजेच शिक्षण विचारात असतो. शिक्षणविचाराची व्याप्ती मोठी आहे. शिक्षण क्षेत्रातील आचार व विचार या संदर्भात भूत, वर्तमान, भविष्य या काळांचा विचार करून राष्ट्रीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक दृष्टिकोणातून केलेला विचार म्हणजे शिक्षण विचार. या विचाराचा शोध या ग्रंथात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## मनातले जनात

आता मनातले शब्द जनात ! या ग्रंथाच्या पूर्वतयारीसाठी मी खूप वाचन करीत होतो. पुस्तकांचा पसारा मोठा होता. माझ्याकडे पुरेशी जागा नव्हती. यथाकाल पत्रकार नगरमधील शरयूतीरी हा यज्ञ मी करू शकलो. त्याचं फलित पायसदान म्हणजे हा ग्रंथ. महाविद्यालयीन विद्यार्थीदशेत कै. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, डॉ. व. दि. कुलकर्णी, डॉ. सरोजिनी वैद्य यांनी जे वैचारिक वळण लावले त्यामुळे या विषयाचा मी शिस्तीने विचार करु शकलो. हा ग्रंथ ज्यावर आधारित त्या प्रबंधाचे माझे मार्गदर्शक डॉ. रा. सो. सराफ यांचे सौजन्यशील प्रोत्साहन नेहमीच मिळत राहिले. डॉ. मो. ह. पिंपळखरे, म. का. गोखले, माझे ग्रंथपाल मित्र श. द. भावे यांची नावे अपरिहार्य !

पुणे विद्यापीठ, टिळक शिक्षण महाविद्यालय, स. प. महाविद्यालय, शासकीय ग्रंथालय, म. रा. शैक्षणिक संशोधन संस्था, वक्तृत्वोत्तेजक सभा इत्यादी संस्थांचा मी ऋणी आहे. पुस्तके या संस्थांनीच उपलब्ध करून दिली.

'सकाळ पेपर्स ट्रस्ट'ने प्रकाशनाची वाट खुली करून दिली. सकाळ पेपर्स ट्रस्ट चे सर्व संचालक व विशेषत: चं. ह. जोशी, डॉ. शरदश्चंद्र गोखले यांचे आभार!

सुविद्या प्रकाशनाचे संचालक श्री. पुराणिक यांनी प्रकाशनाची जोखीम पत्करली म्हणून हे साहस मला करता आले. मुद्रण जुळणी करणारे अक्षरवेलचे श्री. शिगवण, चित्रकार भारताल यांचाही ग्रंथसिद्धीत मोलाचा वाटा आहे. मी वेचलेले शिक्षणविचार–मौक्तिक वाचकांसमोर मांडले आहेत. त्यांची किंमत त्यांनीच ठरवायची.

**— न. म. जोशी**

# अनुक्रमणिका


भूमिका ........................................ ३

१) विष्णुशास्त्री चिपळूणकर ........................ ९

२) गोपाळ गणेश आगरकर ........................ ४५

३) बाळ गंगाधर टिळक ............................ ७५

४) शिवराम महादेव परांजपे ...................... १२३

५) नरसिंह चिंतामण केळकर ...................... १४५

६) अच्युत बळवंत कोल्हटकर ...................... १९७

७) वामन मल्हार जोशी .......................... २०९

८) समालोचन .................................. २३१

९) संदर्भ साहित्य .............................. २५९



विष्णुशास्त्री कृष्णशास्त्री चिपळूणकर

१८५० – १८८२

## प्रकरण : १

# विष्णुशास्त्री चिपळूणकर

### चरित्ररेखा

निबंधमालेच्या रूपाने मराठीत खऱ्या अर्थाने वैचारिक ललित निबंधाचा पाया घालणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे अवघे बत्तीस वर्षांचे जीवन कर्तृत्वमय घटनांनी भरलेले असे आहे.

विष्णुशास्त्री यांचे वडील कृष्णशास्त्री हेही विद्वान पंडित होते. कृष्णशास्त्री संस्कृत व मराठी भाषा उत्तम जाणत होते. तरी इंग्रजी येत नाही ही खंत त्यांना होती. वयाच्या पंचवीसाव्या वर्षी इंग्रजी भाषा शिकण्यास सुरुवात करून कृष्णशास्त्र्यांनी त्या भाषेत पारंगतता मिळविली. एवढेच नव्हे तर पुढे त्यांनी 'रासेलस' या ग्रंथाचे मराठी भाषांतर केले. 'विचारलहरी' या पत्राचे ते संपादक होते. मेघदूताचाही मराठी अनुवाद त्यांनी केला. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांना अशा तऱ्हेने विद्वत्तेचा वारसा मिळाला होता.

२० मे १८५० रोजी पुणे येथे विष्णुशास्त्र्यांचा जन्म झाला. 'पूना हायस्कूल'मध्ये त्यांचे इंग्रजी शिक्षण झाले. १८६५ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्याच वर्षी त्यांचा विवाह झाला. त्यानंतर वानवडी येथे पूना कॉलेजमध्ये त्यांचे उच्च शिक्षण सुरू झाले. इंग्रजी, संस्कृत, इतिहास हे विषय त्यांनी उत्तम रीतीने तयार केले. त्यांना दोन शिष्यवृत्त्याही मिळाल्या. गणित हा विषय नावडता असल्याने त्यांना परीक्षेत एकदा अपयश आले. १८६८ पासून डेक्कन कॉलेज नव्या जागेत, येरवड्यास गेले. तेथे चिपळूणकर गेले. तेथेही त्यांनी खूप अध्ययन केले. 'प्राचीन हिंदू लोकांचे ज्ञान' या विषयावर त्यांनी निबंध लिहिला व तो कॉलेजच्या वादसभेत वाचला.

अवांतर वाचनात बराच वेळ घालविल्यामुळे प्रथम विष्णुशास्त्र्यांना बी. ए.च्या परीक्षेत अपयश आले. १८७१ मध्ये ते बी. ए. झाले.

पदवी परीक्षेचा अभ्यास सुरू असतानाच विष्णुशास्त्र्यांनी एका खासगी शाळेत शिक्षकाची नोकरी पत्करली होती. अधूनमधून ते लेखनही करीत होते. शालापत्रक मासिकातून त्यांचे 'संस्कृत कविपंचक' क्रमाक्रमाने येऊ लागले. १८७३ पासून ते पूना हायस्कूलमध्ये शिक्षकाचे काम करू लागले. ही सरकारी नोकरी होती. त्यांना सरकारी नोकरी उत्तरोत्तर तापदायक वाटत गेली.

यावेळेपर्यंत 'शालापत्रक' मासिक बंद पडले होते. १८७३ च्या नाताळच्या सुटीत विष्णुशास्त्री मित्रांबरोबर आळंदीस गेले होते. तेथे एखादे नवीन मासिक काढण्याविषयी चर्चा झाली आणि विष्णुशास्त्र्यांनी ही गोष्ट मनावर घेतली. १८७४ मध्ये त्यांनी निबंधमाला सुरू केली. निबंधमालेने मराठी निबंधाचा खऱ्या अर्थाने पाया घातला.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चौफेर कर्तबगारीचा व जीवनाचा आलेख थोडक्यात असा –

| | |
|---|---|
| १८७४ | निबंधमाला सुरू केली. सात वर्षात चौऱ्यांशी अंक. |
| १८७८ | काव्येतिहाससंग्रह नावाचे मासिक सुरू केले. |
| | चित्रशाळा छापखाना सुरू केला. देवदेवता, साधुसंत, ऐतिहासिक महत्त्वाच्या व्यक्ती यांची चित्रे छापली. रामपंचायतन चित्राच्या २००० प्रती एका महिन्यात खपल्या. |
| १८७९ | किताबखाना नावाचे पुस्तकाचे दुकान सुरू केले. |
| १८८० | १ जानेवारीस 'न्यू इंग्लिश स्कूल' शाळा सुरू केली. |
| १८८१ | जानेवारी महिन्यात केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरू केली. |
| १८८२ | १७ मार्च रोजी निधन. |

वरील स्थूल आलेखावरून शास्त्रीबुवांनी अत्यंत थोडक्या काळात विविध प्रकारच्या कार्यांची उभारणी कशी केली ते लक्षात येते. मधेच एक सरकारी संकट व एक कौटुंबिक संकट आले होते. निबंधमालेत विष्णुशास्त्री ज्या पद्धतीने लेखन करीत असत त्यामुळे रागावून, त्याबद्दल शिक्षा म्हणून विष्णुशास्त्र्यांची बदली रत्नागिरीस १८७७ च्या अखेरीस करण्यात आली. त्यांचे वर्गशिक्षक चिमणाजी महादेव यांनी सांगितले होते की जे विद्यार्थी मला 'डेझर्टेड व्हिलेज' सर्व बिनचूक म्हणून दाखवतील त्यांना मी हातरुमाल बक्षीस देईन. चिपळूणकरांनी गोल्डस्मिथचे ते काव्य धडाधडा म्हणून दाखविले आणि पारितोषिक मिळविले.

विष्णुशास्त्र्यांचे वडील कृष्णशास्त्री हे पंडित, अध्यापक व सार्वजनिक कार्यकर्ते

होते. चिपळूणकरांच्या घरी सतत विविध क्षेत्रातील लोकांचा राबता असे. १८५९ साली कृष्णशास्त्री दक्षिणा प्राइज कमिटीचे सेक्रेटरी झाले. अनेक नवीन ग्रंथ व त्यांचे ग्रंथकार चिपळूणकरांकडे येत. त्यासंबंधीच्या चर्चा विष्णुशास्त्र्यांना ऐकायला मिळत. १८६१ ते १८७५ पर्यंत चाललेल्या शालापत्रक या मासिकाचे कृष्णशास्त्री संपादक होते. शालापत्रक हे पूर्णपणे शिक्षणाच्या व्यवसायाला वाहिलेले मासिक होते. त्यामुळे शिक्षण, ग्रंथ, वाङ्मय, सार्वजनिक कार्य, संपादन याविषयीचे सर्व संस्कार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यावर लहानपणापासूनच झाले होते.

प्रिन्सिपॉल वर्डस्वर्थ, अनंत शास्त्री पेंढारकर, डॉ. कीलहॉर्न आणि केरुनाना छत्रे यांच्या सहवासात विष्णुशास्त्री शिक्षणाच्या निमित्ताने आले आणि या सर्वांचा त्यांच्यावर उत्तम संस्कार झाला. घर आणि घराबाहेर, दोन्ही ठिकाणी असलेल्या ऐतिहासिक वातावरणात चिपळूणकरांच्या अस्मितेचा विकास झाला. त्यांची प्रतिभा परिपुष्ट होत गेली. त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचा गाभा आणि घडण ही अस्सल स्वदेशी होती. त्यांचा देशाभिमान फुलत गेला. तो स्वयंभू व स्वयंदीप्त होता. भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठतेवर त्यांची अढळ श्रद्धा होती.

या स्वयंप्रज्ञ, स्वयंविकसित विचारवंताने दीर्घोद्योग व परिश्रम करून अनेक संस्था नावारूपाला आणल्या. डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही त्यातली एक. महाराष्ट्रातील राष्ट्रवादी शिक्षणाचा पाया घालण्याचे श्रेय डेक्कन एज्युकेशन सोसायटीने मिळविले. चिपळूणकर हे या श्रेयाचे मानकरी. अशा एका साहित्यसेवकाचा, संपादकाचा, शिक्षकाचा, शिक्षणविचार कोणता हे जाऊन घेणे महत्त्वाचे आहे.

## चिपळूणकरांचे लेखन

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपल्या लेखनास १८६८ पासून सुरुवात केली. शालापत्रक या प्रामुख्याने शिक्षणविषयाला वाहिलेल्या मासिकाची जबाबदारी १८७३ पासूनच त्यांच्यावर आली. १८७५ मध्ये शालापत्रक बंद पडले. कविता, प्रवास, समुद्र, कालीदास, भवभूती, दंडी इ. लेख शालापत्रकातच आले आहेत. शालापत्रकातील हे संस्कृत कविपंचकांवरील लेख खूप गाजले. १८७६ मध्ये संस्कृत कविपंचकाची स्वतंत्र आवृत्ती काढण्यात आली. तिला प्रस्तावनाही चिपळूणकरांचीच आहे.

यानंतर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे प्रामुख्याने लेखन म्हणजे निबंधमालेतील निबंधच. निबंधमाला हे निबंधांचे मासिक स्वरुपाचे पुस्तक चिपळूणकर काढत असत. २५ जानेवारी १८७४ रोजी निबंधमालेचा पहिला अंक बाहेर पडला. निबंधमालेचे एकंदर ८४ अंक निघाले. या ८४ अंकात सुमारे अडीच हजार पानांवर मजकूर देण्यात आला.

निबंधमालेच्या प्रत्येक अंकात निबंध, नंतर सुभाषिते, बिनोदमहदाख्यायिका व निबंधासंबंधीचा पत्रव्यवसहार अशी सदरे असत. सुभाषित-संग्रह आणि विनोदमहदाख्यायिका ही पुस्तके नंतर वेगळ्या स्वरूपात निघाली. 'आमच्या देशाची स्थिती' आणि 'इतिहास' या दोन निबंधांची पुस्तकेही स्वतंत्रपणे छापण्यात आली.

'आमच्या देशाची स्थिती' या निबंधावर सरकारने जप्ती आणून बंदी घातली होती. 'निबंधमाला' ग्रंथस्वरूपात प्रथम दोनदा व नंतर चित्रशाळेने एकदा छापली. १९१७ मध्ये चित्रशाळेने प्रसिद्ध केलीली निबंधमालेची ग्रंथरूप आवृत्ती ही व्यवस्थित संपादित केलेली आवृत्ती होती.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या नावावर भारंभार पुस्तकांची यादी नाही. पण एक निबंधमालाच त्यांच्या वैभवशाली लेखनसामर्थ्याची साक्ष आहे.

## शिक्षणविषयक लेख

प्रत्यक्ष शिक्षणावर विष्णुशास्त्र्यांनी लेखन केलेले नाही. पण त्यांच्या अन्य विषयांवरील काही लेखांतून त्यांची शिक्षणविषयक मते अजमावता येतात.

शालापत्रकात विष्णुशास्त्र्यांनी 'शिक्षकाचे काम' या विषयावर एक निबंध लिहिला होता. या निबंधात एकूण शिक्षणपद्धती व शिक्षणखात्यावर सडेतोड टीका होती. पण हा निबंध कोणत्याही ग्रंथात समाविष्ट केलेला नाही. या लेखामुळेच विष्णुशास्त्र्यांवर शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांची गैरमर्जी झाली होती. 'शालापत्रक' बंद होण्यास तेही एक कारण होते. प्रत्यक्ष शिक्षणक्षेत्रावर लिहिलेला एवढा एकच लेख सोडल्यास चिपळूणकरांनी निखळ शिक्षण विषयावर असा एकही लेख लिहिलेला नाही. मात्र निबंधमालेतील ज्या लेखांमध्ये शैक्षणिक मूल्यांची चर्चा पर्यायाने का होईना, पण केलेली आहे असे निबंध खालीलप्रमाणे –

**आमच्या देशाची स्थिती** – जप्ती आलेला निबंध, पाश्चात्य विद्या, प्राचीन भारतीय विद्या, पाश्चात्य विद्येचे परिणाम यासंबंधी विवेचन.

**मराठी भाषेची सांप्रतची स्थिती** – विद्वानांची मराठी भाषेविषयी मते, भाषाभिवृद्धीची दशा, भाषाउत्कर्षाचे खरे उपाय, यासंबंधी खुलासेवार चर्चा.

**निबंधमालेचा उद्देश** – मराठी भाषेच्याद्वारे सामान्य लोकांस ज्ञान देणे, ग्रंथाभिरुचीची वृद्धी करणे, इ.

**इतिहास (तीन लेख)** – इतिहासाचे उपयोग, जिज्ञासातृप्ती, सदुपदेश, मनाची प्रसन्नता व उन्नती, मनाचे पोषण यांविषयी चर्चा, नीतिज्ञान हा विशेष उपयोग.

**विद्वत्त्व आणि कवित्व** – विद्वत्व म्हणजे काय, कवित्व म्हणजे काय, कल्पनेचा विकास आणि बुद्धीचा विकास, तत्त्वज्ञ कोण, तर्कशास्त्र आणि कविता यांची चर्चा.

**भाषापद्धती** – याविषयी ४ लेख. इंग्रजी भाषा, तिचे परिणाम, वर्णशुद्धी, वाक्यशुद्धी, इंग्रजांच्या अनुकरणाने सुरू झालेली पद्धती याविषयी विवेचन.

**वाचन** – वाचनाचे लाभ, ज्ञान व मनोरंजन, मराठीतील ग्रंथसंग्रह, वाचनाचा प्रघात, वाचनाची खरी रीत याविषयी चर्चा.

**वक्तृत्व (६ लेख)** – वक्तृत्वकलेचा इतिहास, वक्तृत्वकलेत निष्णात असलेल्यांची उदाहरणे, दक्षिणा प्राइज कमिटी व शिक्षणक्रम (इंग्रजी) यांचे वैफल्य, वक्त्याचे गुण, मनाचा शुद्धपणा, वक्तृत्वापासून उपयोग याविषयी विवेचन.

**इंग्रजी भाषा (४ लेख)** – इंग्रजीची उत्पत्ती, तिचे घटकावयव, इंग्रजीतील ग्रंथसंग्रह इ. विषयावर सम्यक चर्चा.

याशिवाय डॉक्टर जॉन्सन यांच्या चरित्रकार्यावरील ८ लेख, मोरोपंतांच्या कवितेसंबंधी १३ लेख आणि लोकहितवादी यांच्यासंबंधी १२ लेख असे अन्य लेख निबंधमालेत आहेत. या सर्व लेखांतून अप्रत्यक्षपणे काही शैक्षणिक विचार व्यक्त होतात. चरित्रात्मक निबंधात चरित्रविषयाच्या अनुषंगाने हे शिक्षण विचार येतात. त्यांचा आता सामग्रयाने विचार करावयाचा आहे. लोकभ्रम, गर्व इ. विषयांसंबंधानेही शास्त्रीबुवांनी केलेल्या लेखनाचा विचार ओघाने येणारच आहे.

## आमच्या देशाची स्थिती

चिपळूणकरांचा अत्यंत गाजलेला, निबंधमालेत लिहिलेला, पण नंतर जप्त झालेला हा निबंध-निबंधमाला ग्रंथरुपात चित्रशाळेने प्रकाशित केली तेव्हा तिच्या आवृत्तीत येऊ शकला नाही. परंतु १९४८ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हा लेख पुस्तकरूपात चित्रशाळेने प्रकाशित केला. या निबंधात शास्त्रीबुवांनी हिंदुस्थानच्या स्थितीचे केलेले वर्णन एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या काळातले होते. पण ज्या तऱ्हेने वर्णन केले आहे ते पाहता हा निबंध सार्वकालिक महत्त्वाचा ठरेल. या निबंधात प्रामुख्याने तीन मुद्यांबाबत चर्चा आहे–

इंग्रजी राज्यापासून फायदे, इंग्रजी राज्यापासून तोटे आणि राज्यकर्त्यांची देशासंबंधीची कर्तव्ये.

या तीन मुद्यांची चर्चा करताना इंग्रजी विद्या, तिचा प्रभाव, तिच्यापासून फायदे तोटे यांचा स्वाभाविकपणेच विचार आला आहे. हे मुद्दे सारांश रूपाने असे –

**इंग्रजी राज्यापासून या देशास फायदे** – सोळाव्या शतकापर्यंत हिंदुस्थानचे व इंग्रजांचे कोणतेही नाते नव्हते. पण तदनंतर इंग्रज राज्यकर्ते बनले आणि त्यांचा हिंदुस्थानच्या प्रजेशी राजा व प्रजा या नात्याने संपर्क येऊ लागला. राज्यकर्ते या देशासंबंधी कोणती बुद्धी मनात बाळगतात ते महत्त्वाचे.

युरोपियन लोकांचे विद्येत पुढे पाऊल असल्याने त्यांची कल्पना झाली आहे

की सुधारणा काय ती आमच्या खंडात. अेशियातले लोक गैरसुधारलेले. हीच कल्पना इंग्रजी लोकांची एतद्देशियांविषयीची आहे. त्यांची ही समजूत अयोग्य असली तरी युरोपियन लोकांकडून आपल्याला पुष्कळ गोष्टी घेण्यासारख्या आहेत हे खरे आहे. विद्वान माणसाशी समागम घडला असता अविद्वान माणसाचा जसा फायदा होतो तसा युरोपियनांकडून-इंग्रजांकडून-आपणास होत आहे.

इंग्रजी विद्येपासून आपल्याला व्यावहारिक कलांचे ज्ञान मिळाले आहे. छापखाना, आगगाडी, आगबोट, तारायंत्र, गिरणी इ. साऱ्या सुधारणा या इंग्रजांमुळेच झाल्या आहेत. पाश्चात्यांची अपूर्ण विद्या आपल्या पायांनी आमच्या देशास चालून आल्यामुळे आमची मोठी सोय झाली आहे.

इंग्रजी विद्येपासून तिसरा लाभ म्हणजे मानसिक उन्नती. देशाभिमान जात्याभिमान, स्वाभिमान, स्वातंत्र्यभिलाष इ. गोष्टी इंग्रजी विद्येपासून मिळाल्या. विद्येचा संस्कार हा सामान्यपणे वरील उन्नतीस कारणीभूत होतो. युरोपखंड अनेक शतके गाढ अज्ञाननिद्रेत घोरत होते. त्याची जागृती ग्रीक व रोमन यांच्या प्राचीन विद्येमुळे झाली. इंग्रजी विद्येचा प्रसार होत जाईल तो तो सुधारणा, स्वातंत्र्य, सुख यांचा प्रसार अवश्यक होत जाणार.

मानसिक स्वातंत्र्य हा या कालात झालेला सर्वात मोठा लाभ. मानसिक स्वातंत्र्य म्हणजे हवा तसा विचार करण्याची व तो वाणी आणि लेखणी याद्वारा व्यक्त करण्याची मोकळीक.

**इंग्रजी राज्यापासून आमचे नुकसान** – इंग्रजी राज्य व इंग्रजी विद्या यांच्यापासून आमच्या देशाचे काही फायदे झाले तसेच आमचे काही नुकसानही झाले. ते कोणत्या प्रकारचे झाले ते सारांशरूपाने खालीलप्रमाणे –

स्वातंत्र्यनाश ही इंग्रजी राज्यापासून पहिली हानी. पारतंत्र्यात कितीही सुखे असली तरी स्वातंत्र्याचे दुःखसुद्धा त्या सुखांपेक्षा मोठे असते. या स्वातंत्र्यनाशाच्या पायी आमच्या देशाचे अस्तित्वच नाहीसे झाल्यासारखे आहे.

'इंग्रजी विद्येपासून आम्हास फायदे झाले असले, तरी त्या वाचून आम्हास गत्यंतर नव्हते असे नाही. या देशात असे अनेक प्रसंग आले की येथील समस्या येथल्याच लोकांनी स्वतःच्या अकलेने सोडविल्या. कारकुनी पेशाने वागणाऱ्या बाळाजीपंताने दिल्ली अटकेपर्यंत नजर पोचविली. हे करताना या पेशव्याने आपली बुद्धी एखाद्या आंग्लभूमी विद्यालयात पाजळून घेतलेली नव्हती.'

'राज्यकर्त्यांनी असा आव आणला आहे, की तुम्ही नेणती लेकरे आहात, आम्ही तुम्हाला सज्ञान करू. येथे येण्याच्या पूर्वीची स्थिती म्हणजे केवळ अज्ञानाची व रानटीपणाची होती. हा सर्व निखळ भ्रम आहे. इंग्रज इकडे आले नसते तर

त्यामुळे आमचे अहित न होता हितच झाले असते.'

पारतंत्र्यापासून होणारी मोठी हानी म्हणजे मानसिक उन्नती नष्ट होते व परवशता अंगवळणी पडते. मानधनता, लज्जा, धैर्य इ. सद्गुणास देश पारखा होतो. मूळ स्थितीपासून देश भ्रष्ट होत जातो.

देशात विद्येचा फैलाव झाला आहे. नाही असे नाही. पण विद्येच्या योगाने जे वास्तविक ज्ञान व्हावे व मनाची थोरवी वाढावी, त्यातले अजून काहीच दृष्टीस पडू लागले नाही. त्यातून इंग्रजी विद्या ही तर वस्तुत: पाहता वाघिणीच्या दुधासारखी आहे. वाघिणीच्या दुधावर जो पोसला तो लेचापेचा कधीच निपजू नये. उत्साह, धैर्य, अश्लाघ्य कर्माचा तिरस्कार, स्वावलंबन इ. उदात्त गुण वरील भाषेतील ग्रंथांच्या अध्ययनापासून उत्पन्न होणारे आहेत. पण आजपर्यंत असलेल्या तऱ्हेवाईक शिक्षणपद्धतीने म्हणा अगर तितका संस्कार अद्याप आमचे ठायी बिंबला नसल्यामुळे म्हणा, वरील गुणांचा उदय झालेलाच नाही.

**राज्यकर्त्यांची कर्तव्ये** – इंग्रज सरकारने देशासाठी काय केले याचा विचार तीन पातळ्यांवर होतो– १) सरकारची ख्रिस्ती धर्मविषयक भूमिका, २) नीती, ३) सामान्य व्यवहार.

इंग्रज सरकार स्वत:ला ख्रिस्ती धर्मानुयायी म्हणवते, पण येशू ख्रिस्त व त्याने स्थापलेला धर्म याविषयी वाचकांना फारच थोडी माहिती आहे. इंग्रजी शाळांतून व विद्यालयांतून याविषयी नावही काढीत नाहीत. एतद्देशीय भाषांतून वरील विषयावर म्हणण्यासारखा ग्रंथ झाला नाही. आमचे सरकार आपणास खिस्ती म्हणवते पण धर्माप्रमाणे सरकारचे आचरण नाही.

राज्यकर्त्यांची नीती म्हणजे त्यांचा न्यायीपणा, रास्तपणा. याबाबत विचार करायचा तर राज्यकर्त्यांचे आचरण प्रजाहितदक्ष आहे असे वाटत नाही.

या देशाच्या व्यवहाराकडे राज्यकर्ते केवळ व्यावहारिक दृष्टीने बघतात. या देशातून निघेल तितका पैसा काढून आपल्या देशात नेऊन ओततात.

वरील सर्व विवेचनात विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी इंग्रजी राज्यापासून होणारे फायदे, तोटे व राज्यकर्ते आपले कर्तव्य व्यवस्थित रीतीने बजावत आहेत काय याचा विचार केला आहे.

या सर्व विवेचनाच्या मुळाशी या देशातील लोकांचे अज्ञान व काही मूठभर आंग्लविद्याविभूषितांचा राज्यकर्त्यांच्या लांगूलचालनाचा हव्यास या गोष्टी आहेत यामुळे आम्हास वाघिणीच्या दुधाचा हवा तसा फायदा झाला नाही असे म्हणतात.

**राजेरजवाड्यांची स्थिती** – इंग्रजी राज्यात अनेक संस्थानिक व राजेरजवाडे सुखोपभोगात लीन होते. त्यांच्या बाबतीत इंग्रज सरकारने एक गोष्ट केली होती

की बहुतेकांना शिक्षण देण्यासाठी काही ना काही व्यवस्था केली होती.

'आमच्या देशात आमच्या दयाळू सरकारने इतर जशी शेकडो सोंगे उभी केली आहेत त्याप्रमाणे दरेक राजारजवाड्याच्या मागे विद्याभ्यासाचे एक शुक्लकाष्ट लावून दिलेले आहे. मोठमोठ्या संस्थानिकापासून तो छोटेखानी जहागीरदारापर्यंत एकेका ॲरिस्टॉटलची योजना करून दिलेली आढळते. पण इतक्यांच्या हातून अद्यापी एकही शिकंदर निपजला नाही.'

याची कारणमीमांसा चिपळूणकरांनी वेगळ्या पद्धतीने केली आहे. पाश्चात्य विद्येचा प्रचार व प्रसार या भूमीत अयोग्य वातावरणात झाला. पाश्चात्य विद्या ग्रहण करायला तशी सोपी नाही. शिवाय ती सहजोपलब्ध व सहजसाध्य नाही. आतापर्यंत राजेरजवाड्यांची मनस्थिती सुखोपभोगात लोळणारी. मग कितीही कर्तबगार ट्यूटर ठेवला त्यातून परिणाम फक्त दोनच –

यजमानास सरस्वतीचा लाभ जितक्यास तितका.

ट्यूटरसाहेबांना लक्ष्मीचा योग उत्तम.

पाश्चात्य शिक्षकांनी येथील संस्थानिकांना जे शिक्षण दिले ते अगदीच तुटपुंजे होते. शिवाय त्यात व्यावहारिक दृष्टिकोन नव्हता. संस्थानिकांना इतिहास, भूगोल, व्याकरण, पदार्थविज्ञान हे सर्व भारूड शिकवण्याचा उपयोग नाही असे चिपळूणकर सांगतात. उलट संस्थानिकांना कोणते शिक्षण द्यायला हवे याविषयी चिपळूणकरांची स्पष्ट मते आहेत. ते म्हणतात –

'घोड्यावर बसणे, भाला मारणे, निशाण रोवणे, लष्करी कवाइत या गोष्टी शिकवल्या तर अधिक उपयोग नाही का होणार ? किंवा न्यायमनसुबा कसा करावा, जमाबंदीची व्यवस्था कशी ठेवावी, या गोष्टींची माहिती आमच्या होतकरू राजबिंड्यांस जर करून दिली तर ती त्यांच्या फायद्याची नाही का होणार ? पण ते करणार नाहीत. आमचे सरकार सर्वांना नि:शस्त्र करून टाकून त्यांस पुरते मीठही खाऊ देत नाहीत.'

इंग्रजांनी अशा प्रकारचे शिक्षण देण्याचे हेतुत: टाळले हे विष्णुशास्त्र्यांना या देशातील संस्थानिकांच्या उदाहरणावरून सांगावयाचे आहे.

**विद्या व कला यासंबंधाने स्थिती** – या देशाची स्थिती विद्या व कला या संदर्भात शोचनीय आहे, असे विष्णुशास्त्री सांगतात. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर –

'विद्या, कला वगैरेंच्या संबंधाने भारतखंडवासी लोकांत व श्वेतदीपीय राष्ट्रांत कितीसे अंतर आहे हे पाहिले तर ते खूपच अंतर आहे हे स्पष्ट आहे.'

यापुढील विवेचनात चिपळूणकरांनी पाश्चात्यांनी केलेली प्रगती कोणत्या

प्रकारची आहे हे सोदाहरण स्पष्ट केले आहे. अमेरिकेत प्रतिवर्षी नवीन विद्या व कला उदयास येत आहेत असे ते सांगतात. आवाज धरून ठेवण्याची युक्ती अमेरिकेने शोधून काढल्याबद्दल ते लिहितात. पाश्चात्यांच्या बुद्धिसागराचे एकेक तरंग मेघमंडळावर जाऊन आदळताहेत. पण भारतात नव्या विद्या व कला राहोच, जुन्या विद्यांची स्थितीही समाधानकारक नाही. हजारो वर्षे ज्यांची वस्ती या देशात आहे. त्या विद्या विगलित अवस्थेत आहेत. 'मँचेस्टरच्या यंत्रात येथील वाणिज्याचा चुराडा झाला. एकंदर विद्या व कला लुप्त होऊन इंग्रजी बादशाहीची मगरमिठी आम्हास पक्की बसण्याचा समय दिसत आहे.'

'निव्वळ रानटी राष्ट्रांची स्थिती एका अंशाने चांगली असते तसे आमचे नाही. किंवा सुधारलेल्या राष्ट्रांत हल्ली जी प्रमुख होऊन बसली आहेत, त्यास ज्या सोयी असतात त्याही आम्हास नाहीत. आम्ही धड ना विद्वान ना अविद्वान. ना रानटी ना सुधारलेले, ना स्वतंत्र ना परतंत्र.'

अशा तऱ्हेने भारताची अवस्था त्रिशंकूसारखी आहे असे चिपळूणकरांचे प्रतिपादन आहे. ही दैन्यावस्थाच नाही तर निव्वळ संभ्रमावस्था आहे असे चिपळूणकरांना सुचवावयाचे आहे. चिपळूणकरांच्या याबाबतच्या विवेचनावरून त्यांना महत्त्वाचे दोन मुद्दे मांडावयाचे आहेत असे लक्षात येते –

- पाश्चात्य राष्ट्रे विद्या व कला या संबंधात खूपच प्रगत झाली. निरनिराळे वैज्ञानिक शोध लागून त्यांची सर्व क्षेत्रांत प्रगती झाली.
- भारतात इंग्रजी विद्या आली पण इंग्रजी विद्येच्या संपर्काने विचारापलीकडे कोणतीच कृती आली नाही. सुधारणा आल्या पण त्या अगदीच मंदगतीने. याशिवाय भारतातील एतद्देशीय विद्यांना काळ चांगला नव्हता. त्या लोप पावत चालल्या होत्या.

'विद्या व कला' हे शब्द वापरताना चिपळूणकरांना ज्ञान, ज्ञानार्जन, ज्ञानप्रसार, शिक्षण, शिक्षणाने होणारी प्रगती या सर्व गोष्टी अभिप्रेत असलेल्या दिसतात.

**देशाची दुरवस्था व तीतून सुटण्याचे मार्ग** – चिपळूणकरांच्या मते आमच्या देशाला काही एक झालेले नाही. देशाची नाडी ठणठणीत आहे. कालगतीमुळे आजची दुरवस्था आली आहे. सांप्रतच्या (त्यावेळच्या) दैन्याची कारणे चिपळूणकरांच्या मते अशी –

परकी अंमल – परकी अंमलामुळे कोणताही देश सुखी होत नाही. परकी अंमल नाहीसा करणे हा प्रमुख उपाय. पण हा अंमल लढून घालविणे तितके सोपे नाही. म्हणून सलोख्याने कार्य केले पाहिजे.

आत्मस्थितीचे अज्ञान – राष्ट्राच्या सुधारणेचा प्रमुख पाया म्हणजे

आत्मस्थितीचे पूर्ण ज्ञान होय. नवीन साधनांच्या द्वारा आपली जागृती करून घेतली पाहिजे.

विद्वानांची उदासीनता – सरकारी हुद्दे मिळवून पाश्चात्य भाषेतच आपले सर्व काम करावयाचे हे सोडून देशाची ओळख करून घेतली पाहिजे.

ज्ञानसंपन्नतेचा अभाव – देशस्थिती सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणे. ज्ञानसंपन्नता साधण्याची दोन साधने– पहिली रसना व दुसरी लेखणी. पहिल्या सदरात शाळा व व्याख्याने येतात. दुसऱ्याखाली वर्तमानपत्रे, मासिके, ग्रंथ येतात. आतापर्यंत सरकारने युनिव्हर्सिटी, विद्यालये, शाळा काढून या क्षेत्रात थोडेबहुत कार्य केले आहे. पण आम्ही त्यापासून घ्यावे तेवढे फायदे घेतलेले नाहीत.

हा देश संपन्न आहे. येथील लोकसंख्या खूप आहे, लोकांची बुद्धी प्रखर आहे. येथे अर्थसंचयही विपुल आहे. पण कल्पवृक्षाखाली उपवास या न्यायाने या देशास उन्नती नाही.

आमच्या देशाची स्थिती हा निबंध चिपळूणकरांनी वास्तव दर्शनासाठी लिहिला होता. पारतंत्र्याच्या काळात कितीही बाह्यसुखे मिळाली तरी स्वातंत्र्याशिवाय प्रगती नाही. आणि ज्ञानाशिवाय स्वातंत्र्य नाही. शिक्षणाशिवाय ज्ञान नाही, अशी ही साखळी आहे. चिपळूणकरांनी देशस्थितीच्या नाडीवर अचूक बोट ठेवून ज्ञानसंपादन व शिक्षण हे त्यावर ‘ उतारा ’ आहेत असे सुचविले आहे.

भारताच्या प्राचीन ज्ञानाचा चिपळूणकरांना सार्थ अभिमान आहे. पण त्याच वेळी ते नव्याचा स्वीकार करावयास सांगतात. आंग्लविद्येने दिलेल्या विज्ञानाचे वरदान डावलून चालणार नाही असे चिपळूणकर आग्रहाने सांगतात.

**मराठी भाषेची सांप्रतची स्थिती**

चिपळूणकरांचा हा निबंध मराठी भाषाविषयक असला तरी शिक्षण विचारात या लेखाचा समावेश करावयास हवा. कारण शिक्षण विचार वा शिक्षणशास्त्र याचे जे अनेक घटक आहेत त्यांमध्ये भाषाभ्यास, भाषाज्ञान, भाषेचे अध्यापन या घटकांचा समावेश असतो. मातृभाषा हे व्यक्तिमत्त्वविकासाचे सर्वोत्तम माध्यम मानले जाते. म्हणून या निबंधाचा विचार अभिप्रेत आहे. शैक्षणिक दृष्टिकोणातून या निबंधात चिपळूणकरांनी सांगितलेले मुद्दे सारांशरूपाने असे –

कित्येक शिक्षक इंग्रजीतील अर्थ मराठीत समजून देताना निरुपाय होऊन हात टेकतात. इंग्रजीचा वरचष्मा सर्वत्र आहे. अडाणी लोकांशी संबंध आला म्हणजे इंग्रजी शब्द वापरणाऱ्या लोकांची अडचण होते.

मराठी भाषेची बरीच हानी होत असल्याने तिच्या अभिवृद्ध्यर्थ अनेक उपाय

सुचविले जातात. ते उपाय असे...

युनिव्हर्सिटीच्या वरच्या परीक्षांत मराठीचा समावेश करावा.

मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस मराठी भाषा आवश्यक करावी. चिपळूणकरांच्या मते वरील सर्व उपाय वरवरचे आहेत. कारण मराठी भाषा विद्यापीठात होती. तेव्हाही तिच्या प्रगतीसाठी फार कोणी काही केले नाही.

फारशी व अरबी भाषांचा आणि मराठीचा पुष्कळ संबंध आहे. मग इंग्रजीचीच एवढी भीती का? त्याचे उत्तर असे की फारशी भाषा शिकण्याचा त्या वेळच्या लोकांचा उद्देश व रीत आणि इंग्रजी शिकण्याचा उद्देश व रीत यांत अंतर आहे. फारशी परभाषा शिकण्याचा उद्देश केवळ व्यावहारिक होता. पण इंग्रजीचे तसे नाही. इंग्रजीच्या सार्वत्रिक प्रसाराने मूळची भाषा लोप पावत आहे. कारण विचार, कल्पना यांची उत्पत्ती ज्या मनापासून तेच इंग्रजी बनल्यावर मूळच्या भाषेची प्रधानता कोठे राहिली? इंग्रजीच्या पगड्यामुळे मराठीचे वैभव, तिचा विकास थंडावला आहे.

इंग्रजीचा द्वेष नको. पण मराठीच्या विकासास ती पूरक झाली पाहिजे.

मराठी भाषेच्या उत्कर्षाला सरकारनेही हातभार लावला. दक्षिणा प्राइजच कमिटी सारख्या संस्था प्रोत्साहनपर काम करीत आहेत. पण लोकांमध्ये इंग्रजीचे आकर्षण खूप आहे.

इंग्रजी भाषेतील ग्रंथांची खूपच गोडी आपल्याकडील विद्वानांस लागली आणि इंग्रजी ग्रंथांची भाषांतरे मराठीत केली. पण यामुळे मूळ मराठीचे वैभव वाढले नाही.

वर्तमानपत्रे, मासिके, पुस्तके, इतर ग्रंथ पुष्कळ वाढल्याने व मुख्यत: इंग्रजी भाषेच्या अभ्यासाच्या योगाने साधारण गोष्टींचे ज्ञान पुष्कळ वाढून लोकांच्या समजुतीतही पुष्कळ फेर पडत चालला. पण इंग्रज लोकांच्या सहवासामुळे ज्ञानप्रसार करण्याची जी त्यांची उत्कृष्ट साधने आपणास अनुकूल झाली आहेत त्यांच्या मानाने पाहता वर झाले ते काहीच झाले नाही असे म्हटले पाहिजे.

'निबंधमाला सुरू करण्याच्या उद्देशासंबंधी चिपळूणकरांनी निबंधमालेच्या एका अंकात विस्तृतपणे सांगताना, मराठी भाषेची स्थिती कशी होती, आहे याचे विवेचन केले. याच निबंधात शास्त्रीबुवांनी ग्रंथवृद्धी आणि देशसुधारणा यांचा संबंध जवळचा असल्याचे सांगितले आहे.

**पुस्तकांची वृद्धी होणे देशसुधारणेस आवश्यक** – जनजागृतीचे व लोकशिक्षणाचे काम ज्या प्रमाणात वर्तमानपत्रांनी केले त्या प्रमाणात ग्रंथकर्त्यांनी केले नाही असे विष्णुशास्त्री नमूद करतात. मासिक पुस्तकांचा सारा इतिहास विशद करून मासिके वर्तमानपत्रे यांची वाढ देशसुधारणेस अत्यावश्यक असल्याचे ते सांगतात आणि या पार्श्वभूमीवर निबंधमाला लिहिण्याचा हेतू कोणता ते विष्णुशास्त्री अगदी

थोडक्यात पण स्पष्टपणे लिहितात –

'ज्यास विद्यालयातील शिक्षणाचा वगैरे लाभ न घडल्याने ज्ञानाचा मार्ग खुला नाही त्यांस अनेक गोष्टींचे ज्ञान व्हावे हा एक ते लिहिण्याचा उद्देश आहे. संस्कृत व इंग्रजी भाषेत जे अगाध ज्ञान भरले आहे. त्याचा पाट फोडून जर आपल्या भाषेकडे वळविता येईल तर केवढी मजा होईल. इंग्लंडात ज्ञानसंपादनाच्या सोयी उत्कृष्ट असल्यामुळे तेथील मजुरांस जे ज्ञान असेल ते या लोकांपैकी (आपल्या) मोठे शहाणे म्हणविणारास नाही.'

ग्रंथांपासून आणखी काही फायदे विष्णुशास्त्र्यांनी विशद केले आहेत –

सदभिरुचीचा प्रसार व ग्रंथ वाचण्याची गोडी लागते.

भाषेचे पुनरुज्जीवन होते. वैभव वाढीस लागते.

एकाद्या भाषेचे वैभव वाढणे, तिचा उत्कर्ष होणे, त्या भाषेच्या वाचकांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन त्याद्वारा सदभिरुचीचा प्रसार होणे या सर्व गोष्टी देशसुधारणेला अत्यंत सहाय्यक आहेत, असे विष्णुशास्त्री सांगतात. ग्रंथनिर्मिती हे देशाच्या ज्ञानसंपन्नतेचे आणि बौद्धिक प्रगतीचे लक्षण असते.

## वाचन-विचार

निबंधमालेतील अनेक विषयांवरील लेखात जी विविधता आढळते ती लक्षणीय आहे. उदा. वाचन हा निबंध.

या निबंधात त्यांनी प्रथमच मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. वाचन करण्याची कला याविषयी हा निबंध नाही. याचाच अर्थ उत्कृष्ट वाचनाचे नियम, त्यांचा उपयोग याविषयीची चर्चा या निबंधात नाही. या निबंधात ग्रंथ वाचणे हितावह कसे, आपल्याकडे त्यासंबंधी काय परिस्थिती आहे, वाचावयाचे ग्रंथ कसे असावेत, ते ग्रंथ कसे वाचावेत इ. संबंधी चर्चा आहे. या निबंधातील वाचनविषयक मुद्दे सारांशरूपाने असे –

- वाचन शब्दाची व्युत्पत्ती-संस्कृत वच् या धातूपासून... वाचन म्हणजे बोलावणे, पुस्तक वाच म्हणजे पुस्तकास बोलाव, छापण्याची कला ज्या काळात नव्हती त्या काळात वृक्षत्वचा (झाडांच्या साली) वापरून लेखन करीत व त्यावरून हा शब्द आला असला पाहिजे.
- वाचनापासून लाभ दोन : मनोरंजन व ज्ञान.
- लहान मुलांना अक्षरे माहीत झाली की वाचता येऊ लागते. आपल्याला काहीतरी नवे येते त्याचा उत्साह वाटतो. उमेद वाढते. ही उमेद पुढे ज्ञानसंपादनाला फारच उपयुक्त ठरते. बालवयास ज्ञान व मनोरंजन हातात हात घालून नांदतात. पुढे मोठेपणी विद्याप्रिय लोकांना सतत वाचनाची आवडच निर्माण होते. वाचनाचे

वेड याविषयी शास्त्रीबुवांनी पेट्रार्कची गोष्टच याठिकाणी सांगितली आहे.

- खरे विद्यासुख जुन्या पद्धतीच्या लोकांना मुळीच माहीत नाही. मराठीत वाचण्याचे ग्रंथ फार थोडे होते. शिवाय लोकशिक्षणाचा मुळीच प्रघात नसल्यामुळे लोकांत विद्याभिरुचीचा अभाव होता. धार्मिक ग्रंथ लोक परमार्थबुद्धीने वाचतात. अर्थज्ञान किंवा रसानुभव घेऊन वाचणारे लोक थोडेच. वाचनाने रंजन होतेच. पण त्याबरोबर इतर करमणुकीच्या साधनांची आवश्यकता राहात नाही.
- ग्रंथवाचन हे ज्ञानसंपादनाचे मोठे साधन आहे. सिसेरोने एके ठिकाणी म्हटले आहे की लेखकला नसती तर मूळारंभीची जी जगाची स्थिती होती तिजपेक्षा पुढे पाऊल पडतेच ना. पूर्वीच्या परंपरेत मूळ अभ्यासाचा जो विषय असेल त्यावर ग्रंथ, उपग्रंथ, टीका वाचून मुखोदगत करून मगच तो विषय पूर्ण होई.
- वाचनासाठी ग्रंथ हवेत. ग्रंथसंग्रहालये हवीत. मराठीत ग्रंथसंग्रह तुलनेने कमीच. संग्रहालयेही कमी. ही स्थिती कशामुळे? लोकांचे दुर्लक्ष म्हणून देशभाषेत चार शब्द लिहिण्यास वा बोलण्यास सुशिक्षितांना संकट वाटते.
- केवळ भाविकपणाने केलेले वाचन विद्येच्या दृष्टीने निरर्थक आहे. त्यातही मुख्य वाचन वर्तमानपत्रांचे होते. चांगली ग्रंथालये हवीत, चांगली पुस्तके हवीत.
- सुधारलेल्या शहरात जशी म्युनिसिपालिटी असते, सभागृह, नाटकगृह असते, तसेच तेथे पुस्तकालयही हवे. पुस्तकालयात उपयुक्त मनोरंजक पुस्तके ठेवून ती लोकांनी वाचावी. तेणेकरून ज्ञानप्राप्ती करून घेऊन देशभाषेत तसे ग्रंथ रचण्याची त्यांस उमेद यावी.
- त्याचप्रमाणे पुस्तकालयात केवळ वर्तमानपत्र वाचनाचा असलेला प्रघात मोडून ग्रंथवाचनाचाही प्रघात सुरू झाला पाहिजे.
- वाचलेल्या ग्रंथांचा आणि विद्वत्तेचा मेळ घालणे हे नेहमी बरोबरच असते असा नेम नाही. ज्याने दहाच ग्रंथ वाचले पण मननपूर्वक शोधक बुद्धीने वाचले त्याचे ज्ञान आणि ज्याने शेकडो भराभर वाचून फेकून दिले त्याचे ज्ञान या दोहोत काहीच साम्य धरता येणार नाही.

आपल्या या निबंधाच्या शेवटी आंग्ल कवी पोप आणि भर्तृहरी यांची वचने देऊन विष्णुशास्त्र्यांनी त्याचा शेवट केला आहे. या वचनांचा मथितार्थ असा की ज्ञान उथळ नसावे, चुटपुटते ज्ञान उपयोगाचे नाही. ज्ञानाचा अर्धामुर्धा संस्कार होऊ नये.

शैक्षणिक दृष्ट्या विष्णुशास्त्र्यांच्या या निबंधातील विचारांचे मोल मोठे आहे. 'दिसामाजी काहीतरी ते लिहावे, प्रसंगी अखंडीत वाचीत जावे' या रामदासांच्या उक्तीप्रमाणे वाचनाचा जीवनाच्या सार्थकतेला मोठाच उपयोग होतो. वाचनाचा खऱ्या

अर्थाने ज्ञानग्रहणासाठी उपयोग व्हावा, वाचलेल्या ज्ञानाचा व्यक्तित्वविकासासाठी उपयोग व्हावा असे वाटत असेल तर वाचन हे अर्थपूर्ण असावे असे विष्णुशास्त्री सांगतात. केवळ अक्षर-ओळख म्हणजे वाचन नव्हे. सुट्या अक्षरांना तसा काहीच अर्थ नसतो. अक्षरे एकत्र येऊन भाषेतील त्यांचा शब्द बनला की त्याला अर्थ येतो.

'वाचन म्हणजे चिन्हांना ध्वनिरूप देऊ अर्थबोध होणे, शब्दांना बोलावणे'. हीच गोष्ट चिपळूणकरांनी आपल्या विवेचनात सांगितली आहे. वाचनाच्या हेतूबाबत विचार करता चिपळूणकरांनी वाचनाचे जे हेतू सांगितले आहेत तेच हेतू शिक्षण-क्षेत्रानेही मानले आहेत.

'ग्रंथ म्हणजे ज्ञानभांडार. पिढ्यापिढ्यांचे अनुभव, विचार, ज्ञान, त्यात ग्रथित केलेले असतात. वाचनात कौशल्य प्राप्त झाले की या ज्ञानभांडाराची किल्लीच आपल्या हाती येते. वाचनाने प्राप्त करून घ्यायचे ज्ञान कोठेही, केव्हाही सवडीने व आपल्या गरजेप्रमाणे करून घेता येते.'

'वाचनाचा दुसरा हेतू आनंदप्राप्ती. नुकतीच अक्षरओळख झालेली, र, ट, फ, करायला लागलेली मुले पहा. आपण काय वाचतो याचे त्यांना ज्ञान झालेले नसते. पण ती वाचनात एवढी तल्लीन झालेली असतात की प्रसंगी तहानभूक विसरतात. मोठी माणसे आपल्या आवडीप्रमाणे काव्य, कथा, नाटक वाचतात. आनंद मिळवतात. वाचनाने माणूस सुसंस्कृत होतो कारण चांगल्या ग्रंथांच्या वाचनाने त्याला बरेवाईट कळण्याची पात्रता येते.'

हेच विचार चिपळूणकरांनीही आपल्या निबंधात मांडले आहेत. चिपळूणकरांनी 'सदभिरुचीचे वर्धन' असे म्हटले आहे, वरील उताऱ्यात सुसंस्कृतता असा शब्द वापरला आहे. वाचनाच्या परिणामाकडे पाहिल्यास दोहोंचा अर्थ एकच होय. आपल्या वाचनविषयक विचारांमध्ये चिपळूणकरांनी असे म्हटले आहे की केवळ भाविकपणे केलेले वाचन विद्येच्या दृष्टीने निरर्थक असते. अर्थ कळून शब्द वाचला पाहिजे. शब्दाच्या बरोबरीने अर्थ समजला पाहिजे.

शिक्षणशास्त्रातही निरर्थक वाचनाला, 'पोपटपंची'ला मुळीच स्थान नाही. म्हणून 'पाठांतर' या अभ्यासघटकाबाबत शिक्षणशास्त्रज्ञांनी फेर विचार केला आहे. जुन्या काळी शिक्षण पद्धतीत पाठांतराला खूपच महत्त्व होते. उतारे, कविता, अवतरणे विद्यार्थ्यांनी पाठ करावीत व धडाधड म्हणून दाखवावीत, असा विद्यार्थी हुशार समजला जात असे. नवी शिक्षणपद्धती पाठांतर वा घोकंपट्टी मानत नाही. आपल्या अध्यापनपद्धतीत प्रमुख दोष असेल तर तो हाच की स्वतंत्र विचारशक्तीची वाढ विद्यार्थ्यांत होत नाही. यामुळे पाठांतर वा घोकंपट्टी ही एका अर्थाने निरर्थक बडबडच.

त्याचप्रमाणे अर्थ न कळता वाचणे, किंवा केवळ भक्तिभावाने अक्षरे, वाक्ये, ओळी, ओव्या वाचणे ही शब्दांची निरर्थक झटापट असे विष्णुशास्त्र्यांचे मत आहे. ते शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत युक्त स्वरूपाचे आणि शिक्षणप्रक्रियेतील 'वाचन' या घटकाबाबत योग्य मार्गदर्शन करणारे असे असे.

### इंग्रजी भाषा-विचार

इंग्रजांच्या भारतातील सत्ताग्रहणानंतर स्वाभाविकपणेच इंग्रजी भाषेला महत्त्व येऊ लागले. सद्य:स्थितीचा विचार करता आपण शालेय अभ्यासक्रमात इंग्रजीचा दुसरी भाषा म्हणून समावेश केलेलाच आहे. शिवाय महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन स्तरावर इंग्रजीच्या अध्ययन-अध्यापनाची सोय आहे. गेल्या पंचवीस वर्षात इंग्रजी माध्यम असलेल्या कितीतरी शाळा 'विद्यानिकेतन' धर्तीवर महाराष्ट्रात उघडल्या गेल्या. इंग्रजीचे स्तोम माजवले नाही किंवा तिचे दास्य पत्करले नाही तरी आजही महाराष्ट्राच्या व भारताच्याही जीवनात इंग्रजी भाषेला पुरेसे महत्त्वाचे स्थान आहेत यात शंका नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही काळ शालेय अभ्यासक्रमात सात वर्षाच्या ऐवजी चार वर्षे इंग्रजी शिकविण्याचा प्रयोग झाला. आठवीपासून इंग्रजीचे अध्यापन होऊ लागले. पण अनेकांच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात मुंबई सरकारची घोडचूक झाली. आणि पुन्हा सात वर्षे इंग्रजी शिकवण्यास सुरुवात करून या चुकीची दुरुस्ती करण्यात आली.

अभ्यासक्रम, परीक्षा, दैनंदिन जीवन, लोकमानस या दृष्टीने विचार करता 'इंग्रजी'ला आपण स्वीकारलेले आहे. मानाने स्वीकारले आहे असे दिसते. या भाषेबाबत चिपळूणकरांचे काय विचार आहेत ते समजून घेणे इष्ट ठरेल व त्यातून काही शैक्षणिक मूल्ये हाती लागतील या उद्देशाने चिपळूणकरांच्या निबंधमालेतील 'इंग्रजी भाषा' या चार लेखांचा विचार करावयाचा आहे. चिपळूणकर हे स्वराष्ट्र, स्वभाषा याचे कठोर अभिमानी होते. या पार्श्वभूमीवर त्यांचे विचार महत्त्वाचे ठरतील.

'इंग्रजी भाषा उत्तरोत्तर कशी उत्कर्ष पावत गेली, तीत ग्रंथसंग्रह कोणत्या प्रकारचा आहे व तो कसकसा वाढत गेला, वगैरे गोष्टींचे ज्ञान एतद्देशीय लोकांस चांगले होणे आवश्यक आहे. ते असे की त्याच्या योगाने देशभाषा सुधारण्याचा जो थोडाबहुत यत्न चोहीकडे सुरू झाला आहे तो सफल होण्यास काय केले पाहिजे, भाषा सुधारत जाते ती कोणत्या क्रमाने सुधारत जाते, वगैरे गोष्टींचे ज्ञान या निरूपणाने त्यांस होईल. शिवाय हा माहितीचा व मनोरंजनाचा विषय असल्याने सामान्यत: सर्वांस इष्ट वाटण्यासारखा आहे.''

याप्रमाणे चिपळूणकरांनी हे चार लेखांक इंग्रजी भाषेविषयी लिहिण्यामागचा आपला हेतू स्पष्ट केला आहे. यातील 'मनोरंजनाचा' उद्देश सोडून दिला तरी

माहिती कोणत्या प्रकारची दिली आहे ते आता अभ्यासणे आवश्यक आहे.

**इंग्रजीची उत्पत्ती** – इंग्रजी ही अँग्लोसॅक्सन भाषा आहे. इंग्लंडमध्ये मूळचे राहणारे ब्रिटन लोक, त्यांची भाषा सेल्टिक ही होती. तिचा मागमूसही शिल्लक नाही. नंतर सॅक्स लोक देशात आले. सॅक्सन लोकांनंतर नॉर्मन आले. राज्यकर्ते नॉर्मन लोक आणि सॅक्सन प्रजा यांच्यात दुजाभाव होता. तिसऱ्या हेन्रीचे कारकिर्दीत दोन्ही भाषांची भेसळ होऊन इंग्रजी तयार झाली.

गेल्या सहाशे वर्षात इंग्रजीत खूपच फेरफार झाले. फ्रेंच व जर्मन या भाषांचा इंग्रजीशी संयोग झाला. व्यापाराच्या निमित्ताने आलेले अन्य भाषांचे शब्द इंग्रजीत मिसळले आणि इंग्रजी भाषा विकास पावली.

**इंग्रजीतील ग्रंथसंग्रह** – इंग्रजी भाषेतील वैभवशाली ग्रंथसंपदेचे थोडक्यात दिग्दर्शन विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केले आहे. सर्वात योग्यतेने व कालाने पहिला शेक्सपीयर हा ग्रंथकार आहे असे ते सांगतात. त्याच्या वेळेपासून इंग्लंडात कवितेचा सारखा उत्कर्षच होत राहिला. शेक्सपीयरच्या कालखंडाच्या शतकातच अनेक ग्रंथकार निपजले. या ठिकाणी विष्णुशास्त्री भाषाविकासक्रमाबाबत एक महत्त्वाचे तत्त्व सांगतात...

'भाषेत गद्यग्रंथांचा प्रचार सुरू होणे हे लोकसुधारणुकीचे एक मोठे चिन्ह आहे. कारण पद्यरचना सोडून देऊन गद्याकडे जेव्हा लोकांचा कल होतो तेव्हा केवळ मनोरंजन करणाऱ्या विषयांहून अधिक योग्यतेच्या विषयांकडे त्यांची मने प्रवृत्त झालेली असतात.

या ठिकाणी ड्रायडन, टेंपल, डॉ. जॉन्सन यांची उदाहरणे आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ विष्णुशास्त्र्यांनी दिली आहेत. बेकनचाही ते गौरव करतात. इंग्रजी भाषेत गद्याचा प्रसार जसजसा होत गेला तसतसा तो उत्तरोत्तर सर्वमान्य होऊन नाना प्रकारच्या विषयांच्या रूपाने इंग्रजी प्रकट झाली. निबंध, इतिहास, शास्त्रीय ग्रंथ अशी या ग्रंथांची विविध रूपे होती. मेकॉलेच्या ग्रंथांची महती सांगताना विष्णुशास्त्री म्हणतात. 'मेकॉलेची वाक्ये लहान, खुबीदार, शब्द सोपे व निवडक आणि त्याची विषय निरूपणाची शैली अत्यंत सुबोध व सरळ. **अशी शैली ग्रंथकारास तशीच उत्तम शिक्षकास आवश्यक असते.**' शिक्षकाची विषय-निरूपण-शैली उत्तम असणे अगत्याचे आहे.

**इंग्रजी भाषेतील ग्रंथांची वैशिष्ट्ये** – प्राचीन ग्रीक व रोमन विद्येचे युरोपात पुनरुज्जीवन झाले. इतिहास रचनेची सर्व राष्ट्रात माहिती झाली तशी ती इंग्लंडमधील विद्वानांनाही झाली. त्यामुळेच इंग्रजीतील इतिहासविषयक ग्रंथ बरेच झाले. त्याचप्रमाणे अन्य शास्त्रांवरील चांगले ग्रंथ इंग्रजी भाषेत प्रसिद्ध झाले. अर्वाचीन युरोपियन राष्ट्रांचा

इतिहास, ग्रीक व रोमन लोकांचा इतिहास इ. चांगले ग्रंथ इंग्रजीत झाले. अर्नोल्ड या प्रसिद्ध इतिहासकाराची माहिती 'तो शिक्षक होता' हे सांगितल्याशिवाय पूर्ण होणार नाही. अर्नोल्डने शाळा प्रगतावस्थेस नेली. त्याचे शिष्य त्याच्यावर प्रेम करीत. त्याने शालानियमनाविषयी कित्येक उत्कृष्ट लेख लिहिले आहेत.

अर्नोल्डने शालानियमनविषयक कोणते लेख लिहिले वा ते कोणत्या ठिकाणी आहेत याबद्दल मात्र विष्णुशास्त्री यांनी काहीच सांगितलेलं नाहीत.

यापुढे चिपळूणकरांनी पाश्चात्यांच्या इतिहास लेखनातील काही दोषस्थळे दाखविली आहेत. युरोपियन लोक भारताचा इतिहास लिहितात ते कितपत योग्य आहे ? या देशाशी युरोपीयनांचे काय नाते आहे ?

'कोणत्याही देशाचे ज्ञान होण्याची दोन मोठाली साधने असतात. एक म्हणजे भाषाज्ञान आणि दुसरे म्हणजे लोकपरिचय.'

पाश्चयात्यांची या राष्ट्राविषयी प्रतिकूल भावना लक्षात घेता वरील गोष्टींचा अभाव आढळतो. त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या इतिहास ग्रंथात त्यांची यथार्थ बुद्धी असतेच असे नाही, किंबहुना नसतेच.

**मेकॉले यांची कामगिरी –** मेकॉलेसाहेब १८३४ साली हिंदुस्थानात आले. त्यांनी या देशाच्या दोन मोठ्या कामगिऱ्या बजावल्या. आमच्या देशाकरता कायद्याचे नवे कोड (नियम) तयार केले आणि सध्या चोहोकडे चालू असलेली शिक्षणपद्धती सुरू करण्याची शिफारस केली. त्या वेळेस शिक्षण पद्धतीबाबत विशेष चर्चा होती ती अशी की, प्राचीन भाषांचे अध्ययन सुरू आहे ते तसे ठेवावे. इंग्रजीचे कारण नाही. काही लोकांचे म्हणणे असे की जुने भारूड आता नको. जिकडे तिकडे इंग्रजीच सुरू करावे. दोन्ही पक्षांकडे नामांकित विद्वान होते.

**विविध इतिहासकारांचे इंग्रजीतील ग्रंथ –** यानंतरच्या सर्व विवेचनात विष्णुशास्त्री यांनी विविध इतिहासकारांनी इंग्रजीत जे ग्रंथ लिहिले त्यांचा विस्तृत आढावा घेतला आहे. अरबस्थान, इराण, हिंदुस्थान याविषयी विख्यात इतिहासकारांनी लिहिलेले इतिहास हे इंग्रजी भाषेचे वैभव आहे. टॉड, डफ्, मालकम, मेकॉले, माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन, फिलिप मेडोज टेलर इ. इतिहासकारांनी लिहिलेल्या ग्रंथांचे समालोचन विष्णुशास्त्री यांनी केले आहे.

'इंग्रजी भाषा' अशा शीर्षकाचे चार निबंध लिहून विष्णुशास्त्री यांनी त्या भाषेच्या वैभवाचा परिचय करून दिला आहे. पण प्रामुख्याने सर्व भाग इतिहासकारांचा परिचय करून देण्यास खर्ची टाकला आहे. प्रारंभीच्या भागात भाषेच्या उत्पत्तीविषयी काही सिद्धांत मांडून त्याची चर्चा केली आहे. पण इंग्रजी भाषा, तिचे घटक, तिचे भारतातील स्थान, याविषयी चर्चा या निबंधात नाही. शिक्षण विचाराच्या

दृष्टिकोणातून विचार करता इंग्रजीचे अध्यापन, इंग्रजीचा भारतातील प्रसार याशिवाय कोणतीच चर्चा या निबंधातून नाही. भारतात जे इंग्रजी अधिकारी आले किंवा त्यांनी भारतात जे विशेष कार्य केले त्याचाही उल्लेख या निबंधात नाही. मेकॉलेच्या शिक्षणकार्याबाबत एक दोन ओळीच लिहून विष्णुशास्त्री थांबतात.

मात्र हे निबंध इतिहासाच्या अभ्यासकांना अधिक उपयुक्त वाटतील. कारण इतिहास विषयाचे परिचयात्मक दर्शन विष्णुशास्त्र्यांनी या निबंधांतून घडविले आहे. तळटीपांमध्ये प्रत्यक्ष काही हकीकती, घटना वा संपादकांचा अभिप्राय यांद्वारा वाचकाला इतिहास विषयाच्या आणखी काही पैलूंची माहिती होईल.

इंग्रजी भाषेविषयी विचार करायला सुरुवात करून शेवटी इंग्रजीतील इतिहासकारांनी लिहिलेल्या ग्रंथांचा परिचय असे या निबंधांचे स्वरूप बदलत गेलेले दिसते. प्रत्यक्ष शिक्षण विचार या निबंधांत अभावानेच आहे.

शेवटच्या दोन निबंधांना 'इंग्रजी भाषातील इतिहास ग्रंथ' असे नाव हवे होते.

### वक्तृत्व

वक्तृत्वकला ही शिक्षणक्षेत्रात शिक्षणविचाराच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. आपल्याला जे म्हणावयाचे ते परिणामकारक रीतीने मांडता येणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विविध शैक्षणिक उपक्रमांत 'वक्तृत्वा'चा समावेश केलेला असतो. अभ्यासेतर उपक्रमांत स्पर्धा, शिबिरे, विशेष उत्सव याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व-कलेला वाव मिळून तिची जोपासना होईल अशी योजना केली जाते. वक्तृत्वकलेची जोपासना म्हणजे भाषण-कौशल्याची जोपासना. विचार करणे व तो प्रभावीपणे मांडणे यासाठी वक्तृत्वकलेची आवश्यकता आहे. शिक्षकाला तर या कलेची नितांत आवश्यकता आहे. शिक्षणविचारात वक्तृत्वकलेला महत्त्वाचे स्थान असल्यामुळे विष्णुशास्त्र्यांनी निबंधमालेत जे वक्तृत्वावर लेख लिहिले त्यांचा आता विचार करू. निबंधमालेत 'वक्तृत्वावर' एकूण सहा लेख आहेत व सातवा लेख वक्तृत्व या निबंधावर आलेल्या पत्राला उत्तर म्हणून छापला आहे.

- **वक्तृत्व : व्याख्या** – वक्तृत्व शब्दाचा मूळ अर्थ बोलण्याची शक्ती असा आहे. केवळ वाचाशक्ती म्हणजेच वक्तृत्व नव्हे. विष्णुशास्त्रांनी वक्तृत्वाची व्याख्या केली ती अशी–

'जे भाषण ऐकताच श्रोत्यांची चित्तवृत्ती तटस्थ होऊन ती बोलणाराकडे अगदी लक्ष वेधून जावी त्याचे नाव वक्तृत्व.'

श्रोत्याची चित्तवृत्ती तटस्थ होते. मनात आधीच असलेले जे विचार ते नाहीसे होऊन वक्त्याचे भाषण ऐकण्यास अनुकूल पार्श्वभूमी तयार होते.

बोलणाराकडे ही चित्तवृत्ती वेधली जाते. चित्तवृत्ती नुसती तटस्थ होऊन भागणार नाही, तर ती तटस्थ झाल्यावर हेच ताटस्थ वेधकतेत रूपांतरित झाले पाहिजे. प्रथम ताटस्थ निर्मिती व नंतर वेधकता असेल तर ते वक्तृत्व हे खरे वक्तृत्त्व होय.

**वक्तृत्त्वगुणाची उत्पत्ती व त्याचा फैलाव –** जेथे जेथे लोकसत्तात्मक राज्ये होती तेथे तेथे वरील गुणांचे वास्तव्य होते. ग्रीस व अथेन्स येथे नामांकित वक्ते निपजले. स्पार्टा, थीब्ज, मॅसिडन या राज्यात लोकसत्ताक पद्धती नसल्याने तेथे नामांकित वक्ते झाले नाहीत. रोममध्ये अनेक वक्ते होऊन गेले. आशिया खंडात वक्ते अथवा वक्तृत्व यांची परंपरा दिसत नाही. अशी अनेक उदाहरणे देऊन चिपळूणकर शेवटी अशा निष्कर्षाप्रत येतात की ' वक्तृत्वशक्तीचा उदय होण्यास देशातील राज्यरीती एका विशेष प्रकारची असावयास हवी. हा विशेष प्रकार म्हणजे लोकसत्तात्मक राज्य होय.'

लोकशाही राज्यपद्धतीचा आणि वक्तृत्वगुणाचा संबंध इतिहासाधारे जो दर्शविण्यास आला आहे तो उचितच आहे.

ज्या देशात लोकशाही राज्यपद्धती होती त्याच देशात वक्तृत्वगुणाचा विकास का झाला असावा याची मीमांसा आवश्यक आहे.

लोकशाहीत जनता ही सत्तेचे केंद्र असते. जनताच सार्वभौम असते. व्यक्तिमात्राच्या प्रतिष्ठेवर लोकशाहीत श्रद्धा असते. व्यक्तीच्या सर्व सुप्त सामर्थ्यांचा विकास लोकशाहीत झाला पाहिजे असे लोकसत्ताक राज्यपद्धतीला वाटत असते. व्यक्ती अविकसित राहिली तर सर्वच समाजाचे अहित आहे अशी व्यापक विचारसरणी लोकशाहीत असते. संधीची समानता, व्यवसायाचे स्वातंत्र्य आणि जाति-वर्गभेदाच्या बंधनांचा अभाव लोकशाहीत असतो. म्हणून सामाजिक गतिमानता लोकशाहीत अधिक असते. व्यक्तीच्या कर्तृत्वावरून तिची प्रतिष्ठा निश्चित होत असते. व्यक्तिस्वातंत्र्य, समतेची जोपासना, विकासाला वाव आणि राज्यसत्तेची लोककल्याणकारी भूमिका ही लोकसत्ताक राज्यपद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

लोकशाही व्यक्तिविकासाला स्वातंत्र्य देते. वक्तृत्वकला म्हणजे स्वत:चे विचार परिणामकारक रीतीने वाणीद्वारा प्रकट करणारी कला. विचारस्वातंत्र्य हा लोकशाहीचा आत्मा असल्याने स्वाभाविकपणेच लोकसत्ताक राज्यपद्धतीत विचार व्यक्त करण्यावर, बोलण्यावर बंधन नसते. आपोआपच या संबंधीच्या कलेला वाव मिळून कलेची वृद्धी व कलावंतांची निपज होते. म्हणून कोणाही व्यक्तीच्या अंगी वक्तृत्वशक्ती कितीही उत्कृष्ट असली तरी तिच्या विकासास वाव मिळेल तरच ती वाढणार. लोकशाहीव्यतिरिक्त अन्य राज्यपद्धतीत हे शक्य नसते.

वक्तृत्वकलेला वाव मिळण्यासारखी परिस्थिती असली तरी स्वत:च्या प्रयत्नाने

त्या कलेची जोपासना करून आपले कौशल्य वाढवावे लागते हे डिमॉस्थेनिसच्या उदाहरणावरून विष्णुशास्त्र्यांनी पटवून दिले आहे. यासाठी डिमॉस्थेनिसची एक कथाच त्यांनी सांगितली आहे. (निबंधमाला पृ. २४७)

निबंधाच्या या पहिल्या भागात वक्तृत्वकलेच्या इतिहासातील युरोपीय देशांचे कर्तृत्व विष्णुशास्त्र्यांनी विस्ताराने सांगितले आहे.

**वक्तृत्वकलेच्या अभिवृद्धीचे आणखी एक कारण** – वक्तृत्वकलेचे वास्तव्य अगदी प्राचीन काळापासून या जगात अस्तित्वात असले पाहिजे असे म्हणण्याइतके पुरावे उपलब्ध आहेत असे विष्णुशास्त्री लिहितात. वक्तृत्वकलेच्या अभिवृद्धीचे आणखी एक महत्त्वाचे कारण असे की 'इतर कलांच्या तुलनेने वक्तृत्वकला ही सतत उजळ राहण्याची सोय असते.'

काव्यरचना, चित्रकला, मल्लविद्या, नाट्य, युद्धकौशल्य या सर्व कलांच्या तुलनेने वक्तृत्वकलेचा सराव करणे, तिचा परिपाठ ठेवणे हे फार सोपे असते, ते सहजसाध्य असते. इतर कलांचा अभ्यास श्रमदायक असतो. तसा या कलेचा नाही.

**वक्तृत्वकलेचा एक प्रकार : कीर्तन** – विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी बऱ्याच विस्ताराने वक्तृत्वकलेचा एक प्रकार म्हणून कीर्तनाची मीमांसा केली आहे. वक्त्याच्या व्याख्यानास आधारभूत असलेल्या अनेक विषयांपैकी धर्म हा एक विषय आहे. धर्माचे प्राधान्य जीवनात अनेक ठिकाणी असते. धर्माच्या अनुषंगाने श्रोत्यांसमोर विचार मांडण्याची पद्धती म्हणजे कथा किंवा कीर्तन होय. कीर्तन शब्दाचा धात्वर्थ 'यशाची वर्णना करणे' असा आहे. कथा हा शब्द केव्हा व कसा रूढ झाला हे सांगता येत नाही. पण कीर्तन हा प्रकार अगदी अलीकडे सुरू झाला असला पाहिजे यात शंका नाही.

**नाव घेण्यासारखे कीर्तनकार** – विष्णुशास्त्र्यांनी यापुढे महाराष्ट्रातील काही विख्यात कीर्तनकारांच्या कामगिरीचा परामर्श घेतला आहे. ज्या कीर्तनकारांची लोकशिक्षक म्हणून त्यांनी संभावना केली आहे. (लोकशिक्षक हा शब्द मात्र त्यांनी वापरलेला नाही) त्यांची नावे अशी –

तुकाराम – अमृतराय – रामजोशी – अनंतफंदी – माणकेश्वर.

**कीर्तनकारांचे कार्य** – मराठ्यांच्या शौर्याचे उद्दीपन करण्यास आणि हिंदू धर्माचे उज्जीवन करून त्याचा प्रसार करण्यास कीर्तनाचा उपयोग झाला. त्या काळात सध्याप्रमाणे सर्वत्र शाळा-शिक्षणाचा क्रम चालू नव्हता. किंवा ग्रंथ वाचनाच्या सोयी आताप्रमाणे नव्हत्या. त्यामुळे व्यवहारचातुर्य, रसिकता, बहुश्रुतपणा, संपादन करण्याच्या कोणत्याच सोयी उपलब्ध नव्हत्या. अशा वेळेस कीर्तनाचा उपयोग मोठा झाला.

मराठी भाषेस कथाप्रवृत्ती पासून खूपच फायदा झाला. मराठी भाषेतील कविता कीर्तनामुळे वाचली गेली. कीर्तन नसते तर कविता बुडाली असती. अशा तऱ्हेने कवींच्या वित्ताचे संरक्षक हे हरिदास झाले. हरिदासांनी संस्कृतचा अभ्यास केला व मराठीत संस्कृतातील पुष्कळ शब्द आणले. तेणेकरून मराठी प्रौढ झाली. विशिष्ट प्रसंगी कथा, विनोद यांचं साह्य कीर्तनात कीर्तनकार घेत असत. त्यामुळे भाषेची विनोदात्मक सरणी क्रमाक्रमाने तयार झाली व मराठी भाषा परिपुष्ट झाली.

'कीर्तनसंप्रदायापासून एकंदर राष्ट्रास व देशभाषेस पुष्कळ उपयोग झाला आहे यात संदेह नाही.' असे विष्णुशास्त्री म्हणतात.

विष्णुशास्त्री कीर्तन हा वक्तृत्वाचाच एक प्रकार मानतात म्हणून त्यांनी 'वक्तृत्व' या निबंधातच कीर्तनाविषयी चर्चा केली आहे. कीर्तनकारांचा व या संप्रदायाचा महाराष्ट्रावर किती प्रभाव होता व त्याने सर्वसामान्य लोकांना ज्ञान देण्याचे कार्य कसे केले याविषयी शास्त्रीबुवांनी विस्ताराने लिहिले आहे. हे सांगताना शिवाजीने आपल्या वाक्पटुत्वाच्या जोरावरच मावळ्यांना जवळ केले याची अनेक उदाहरणे विष्णुशास्त्री देतात. नेत्याच्या अंगी अनुयायांना स्फूर्ती देण्यासाठी वक्तृत्वकला असावी लागते हेच विष्णुशास्त्र्यांना यातून सूचित करावयाचे आहे. नेतृत्व आणि वक्तृत्व यांचा संबंध जवळचा आहे.

**निबंधमालाकालीन वक्तृत्व** – पाश्चात्यांच्या प्रभावामुळे निबंधमाला-काळी (१८७५ नंतर) वक्तृत्वकला व वक्ते यांच्या स्वरुपात बराच फरक पडला. देश परतंत्र होता. पण बऱ्याच लोकांना त्याची विशेष जाणीव नव्हती असे विष्णुशास्त्री सांगतात. याबाबत त्यांचे विचार असे –

राजदरबार किंवा देवालय हीच वक्तृत्वकलेचा प्रकाश होण्याची दोन मुख्य स्थाने होती. यांपैकी राजदरबार हा परकीय लोकांचा. मग वक्तृत्वाचा उदय वा विकास कसा व्हावा असा प्रश्न विष्णुशास्त्री विचारतात. इंग्रजी विद्येचा फैलाव होऊन नव्या ज्ञानाचा व कल्पनांचा प्रसार चोहोकडे होत गेल्याने ख्रिस्ती धर्माच्या निरनिराळ्या शाखा, शिवाय ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्यशोधक समाज, देवशोधक समाज (थीइस्ट) अशा शेकडो नव्या पंथांनी लोकांच्या मनाचे शतशः विदारण झाले. त्यामुळे वक्तृत्वाच्या अभिवृद्धीस धर्म वा देवालय ही जी साधने ती उपयोगास येईनात.

कोणतेही काम आपण हाती घेतले तरी त्यात दुफळी, वितंडवाद होता. या गोष्टी वक्तृत्वकलेस मारक होत्या. खासगी शाळा घातल्या तर त्यांत कमालीची अंदाधुंदी. वक्तृत्वोत्तेजक सभेचा समारंभ चार वर्षे सुरळीत चालतो पण पाचव्या वर्षी त्याला दृष्ट लागते. आपण फारच आरंभशूर आहोत. कोती बुद्धी, कमनिश्चयीपणा

यांमुळे आपल्या संस्थाजीवनात विघटन झाले. या सर्वांचा परिणाम म्हणजे वक्तृत्वकलेची देशात बाल्यावस्थाच राहिली. सुमारे चाळीस वर्षापूर्वी मेकॉलेने जी नवी पद्धत सुरू केली त्यामुळे या देशाचा काही फायदा झाला का याचें विवेचन विष्णुशास्त्री करतात ते असे –

'एतद्देशीय शाळांविषयी व विद्यालयांविषयी सरकारचा, इंग्रजी लोकांचा व आपला बोभाट वरचे वर ऐकू येतो तो हा की लोकशिक्षणाकडे देशाचें इतके उत्पन्न खर्च होत असतांना त्याचे म्हणण्यासारखे चीज काहीच होत नाही. शिक्षणाच्या सर्व सोयी करून ठेवून कुणाकडून सरकारने दहा-बारा वर्षे अभ्यास करविला त्यातून कित्येकांस पदरच्या कवड्याही खर्चावयास न लागता नेमणुका, पगारी जागा वगैरे करून देऊन विद्या संपादन करून देण्याची सवड दिली. पण पुढे हेच लोक सुखवस्तू झाले व सर्व विसरले.

यावरून चिपळूणकरांना असे सूचित करावयाचे आहे. की ज्या नवशिक्षितांसाठी एवढा पैसा घातला त्यांनी देशाला त्याचा काहीच फायदा करून दिला नाही.

मेकॉलेसाहेबांना खूप आशा होती की शिक्षणप्रसारामुळे व आपल्या नव्या पद्धतीमुळे जे लोक शिक्षित होतील ते सगळ्या देशभर ज्ञानप्रसार करण्याच्या कामी उपयोगी येतील. अनेकांना इंग्रजी भाषा येत नव्हती. इंग्रजी शिक्षक नव्हते. अशा हजारो देशबांधवांसाठी हे नवशिक्षित लोक दुभाष्ये (इंटप्रीटर) म्हणून काम करतील अशी आशा मेकॉले यांना होती. पण हा दुभाष्येपणा या लोकांनी फारच थोड्या प्रमाणात केला.

इंग्रजी विद्येचा फायदा आपल्या देशबांधवांस करून देण्याचा उद्देश नवशिक्षितांच्या उदासीन वृत्तीमुळे, स्वार्थामुळे साध्य झाला नाही असे चिपळूणकरांना सूचित करावयाचे आहे.

**वक्तृत्वाचा उत्कर्ष होण्याची साधने –** उत्तम भाषा हे वक्तृत्वाचा उत्कर्ष होण्याचे पहिले साधन आहे. वक्त्याने आपली भाषा सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या देशात चांगला वक्ता व्हायचा असेल तर त्याने जनभाषेचा अभ्यास चांगला केला पाहिजे. केवळ इंग्रजी भाषेचा अभ्यास पुरेसा नाही. एतद्देशीय भाषा अभ्यासलीच पाहिजे. तर लोकसंपर्क चांगला होईल. विद्वत्त्व आणि बहुश्रुतता हे वक्तृत्वाचे दुसरे महत्त्वाचे साधन आहे. वक्तृत्वकला ही अन्य अनेक कलांप्रमाणे जन्मजात असावी लागते असे काहींचे मत आहे. पण वक्तृत्वकलेला प्रयत्न हवेत. डिमॉस्थेनिस व सिसेरो या ख्यातनाम वक्त्यांनाही आपल्या भाषणाची पूर्वतयारी करून यावे लागत असे.

'मनुष्याच्या अंगी कसलाही गुण असला तरी परिश्रमाखेरीज व अभ्यासाखेरीज

त्याचे तेज कधीही पडावयाचे नाही.' असे विष्णुशास्त्री सांगतात. गुणीजनांच्या अंगी वसणारी कलाही शिक्षणाखेरीज पूर्णत्वाने कधी प्रकट होत नसते. जन्मसिद्ध वक्तृत्वही विद्वत्तेखेरीज पूर्ण शोभा कधीही द्यावयाचे नाही. ज्याला विद्वान व रसिक लोकांना आपल्या भाषणाने संतुष्ट करावयाचे आहे, त्याने भाषाशुद्धता, अर्थसंगती, सुंदर व प्रौढ विचार साध्य केले पाहिजेत. अर्थातच यासाठी व्याकरण, तर्क, अलंकार या शास्त्रांचा अभ्यास करून शिवाय मोठमोठ्या नामांकित काव्यांचे वाचन, नाटकांचे, इतिहासाचे ज्ञान करून घेतले पाहिजे. या खेरीज इतर अनेक विषय चांगल्या वक्त्याला माहीत असले पाहिजेत. 'वक्तृत्ववृद्धीच्छू लोकांनी **वक्त्यांचे वर्ग** वगैरे स्थापण्याच्या भरीस न पडता प्रत्यक्ष वक्तृत्वकलेला उपकारक गोष्टींचा अवलंब करावा. असे विष्णुशास्त्री सांगतात.

वक्तृत्वकला वाढीस लावण्याचे आणखी एक साधन त्यांनी सांगितले आहे. ते म्हणजे अनुकरण. कोणताही गुण साध्य करून घेण्यास अनुकरणासारखा उत्तम मार्ग नाही. अनुकरणाला एक मोठे शैक्षणिक मूल्य आहे. विद्यार्थी शिक्षकाच्या अनुकरणाने शिकतो. लहान मूल आईच्या अनुकरणाने शिकते. आचार्य विनोबा भावे यांनी 'मातृमुखेन शिक्षणम्' असे शिक्षणाचे वर्णन केले आहे. चांगला वक्ता अनुकरणाने तयार होऊ शकेल. या ठिकाणी चिपळूणकरांनी एक सूचना केली आहे ती अशी की– 'प्राचीन व अर्वाचीन काळी उदयास आलेल्या नामांकित वक्त्यांची भाषणे जर सर्वांस सुलभ होतील तर मोठाच उपयोग होईल.'

याशिवाय वक्तृत्वाला आवश्यक गुण म्हणजे अंगविक्षेप, स्वर इ. पण या गुणांना विष्णुशास्त्री गौण मानतात. वरील तीन गोष्टी महत्त्वाच्या. त्यांच्या जोडीला अंगविक्षेप, स्वर असतील तर सोन्याहून पिवळे असे ते म्हणतात.

**वक्त्याचे गुण** – मनाचा शुद्धपणा हा वक्त्याचा पहिला गुण आहे. जे बोलायचे ते मनापासून व मनाची पूर्ण खात्री होऊनच बोलले पाहिजे. कवी व वक्ता, दोघांचाही उद्देश हृदयवृत्तीस क्षोभ उत्पन्न करण्याचा असतो. त्यामुळे दोघांच्या अंगी सारखेच गुण हवे असतात. मोठा भेद एवढाच की वक्त्याला तर्कशास्त्र अधिक अभ्यासावे व साधावे लागते. वक्त्याचा दुसरा गुण विद्वत्त्व होय. ज्याविषयी बोलावयाचे त्या विषयाची सर्व साधकबाधक माहिती वक्त्याला आवश्यक असते. याशिवाय वक्त्याच्या अंगी सहृदयता, तार्किकता, विषय जुळवण्याची शैली, अर्थविशदत्व इ. गुण अवश्य असले पाहिजेत. हे सर्व गुण साध्य करण्याचे उपाय म्हणजे प्राचीन व अर्वाचीन महावक्त्यांची भाषणे लक्षपूर्वक वाचून त्यांचे मनन करावे.

**वक्तृत्वकलेचा उपयोग** – वक्तृत्वकलेचा उपयोग दोन दृष्टींनी आहे. एक व्यक्तीदृष्ट्या व दुसरा लोकदृष्ट्या.

वक्तृत्वकला ज्याच्यापाशी असते, त्याचा सहवास करण्यास लोक नेहमीच उत्सुक असतात. आपल्या भाषणांच्या मोहिनीने तो सर्वांना वश करून घेतो. वक्त्याला व्यक्तिदृष्ट्या हा अलंकार म्हणूनही उपयोगी पडतो. कोणत्याही श्रमाशिवाय व निर्भयपणे हा अलंकार धारण करता येतो. वक्तृत्वकला असेल तर प्रतिपक्षाचे लोक भिऊन वागतात. देशस्थितीला वक्तृत्वकलेचा उपयोग होतो. वक्तृत्वाचा खूप मोठा प्रभाव जाणवण्यास अजून खूप काळ जावा लागेल असे चिपळूणकर सांगतात. एक मात्र खरे की 'लोककल्याणाचे कित्येक उद्योग चहूंकडे सुरू झाले आहेत, त्यांची वृद्धी करण्यासाठी तिचा बराच उपयोग होईल.' असे ते लिहितात.

**वक्तृत्वाचे शैक्षणिक महत्त्व** – वक्तृत्व या निबंधाच्या सर्व लेखांकांच्या द्वारे विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी वक्तृत्वकलेचा इतिहास, वक्त्यांची चरित्रे, वक्तृत्व कलेचा उपयोग, वक्तृत्वसाधनेचे मार्ग इ. गोष्टींची विशेष चर्चा केली आहे.

शिक्षणक्षेत्रातील विशेष उपक्रमांत वक्तृत्वाचा नेहमीच अंतर्भाव केला जातो. विशेष प्रसंगी वक्तृत्वाचे शिक्षण देण्याची योजना केली जाते. महाराष्ट्रात 'रानडे महाविद्यालयीन व आंतरशालेय स्पर्धा' वाङ्‌मय चर्चा मंडळ स्पर्धा, बेळगाव, हिवाळे वक्तृत्व स्पर्धा नगर, फिरोदिया करंडक स्पर्धा, पुणे इ. ख्यातनाम वक्तृत्व स्पर्धांमधून उद्याचे वक्ते भाग घेत असतात.

अशा वक्त्यांसाठी मार्गदर्शक म्हणून हा निबंध व यातील आशय फारच उपयुक्त ठरेल. प्रत्यक्ष वक्तृत्व-स्पर्धात भाग घेण्याआधी या निबंधाचा अभ्यास केला तर पार्श्वभूमी चांगली तयार होईल. शिवाय प्रत्यक्ष वक्तृत्वाची माहिती म्हणूनही यातील अनेक उदाहरणे, दृष्टांत यांचा उपयोग अवश्य होईल. 'वक्तृत्व' या निबंधाचा अभ्यास शालेय व महाविद्यालयीन पातळीवर अवश्य व्हायला हवा, एवढे त्याचे शैक्षणिक महत्त्व आहे व त्याला उपयोजनात्मक मूल्य आहे.

### डॉक्टर जॉन्सन

डॉक्टर जॉन्सन या विख्यात इंग्रजी महापंडिताबद्दल विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी निबंधमालेत विस्तृत लेखांक लिहिले आहेत. 'डॉक्टर जॉन्सन' हा निबंध लिहिताना चिपळूणकरांच्या लेखणीचा आविष्कार विशेषत्वाने प्रकट होतो.

देशाभिमान आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य हे इंग्रजांचे दोन स्वभावविशेष चिपळूणकर यांनी आदर्श मानले होते. इंग्रजांच्या राष्ट्रीय गुणांचा केवळ प्रतिनिधीच असा डॉ. जॉन्सन हा त्यांनी आदर्श ग्रंथकार मानला होता.

डॉक्टर जॉन्सन हे निबंधकार, कोशकार व व्युत्पन्न महापंडित म्हणून इंग्रजी वाङ्‌मयाच्या इतिहासात प्रसिद्ध आहेत. त्यांचे जीवनही विलक्षण आहे. अशा एका पंडिताच्या जीवनचरित्रावर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यासारख्या विमर्शकाने जे

लेख लिहिले त्यात काही शिक्षण-विचार येणार हे स्वाभाविक होते. शिक्षण विचाराच्या दृष्टीनेही हा निबंध महत्त्वाचा आहे.

**जॉन्सन : इंग्लिश लोकांच्या स्वभावविशेषाचा प्रतिनिधी –** इंग्लिश लोकांच्या ठायी खालील गुण विशेषत्वाने दिसतात.

निश्चय : अभिमान : सदयत्व : धैर्य (मानसिक व शारीरिक : स्वकीय व स्वदेश यांविषयी प्रेम :

इंग्लिश लोकांच्या ठायी खालील दोष दिसून येतात –

तुसडेपणा व तुटकपणा : दुराग्रह

जॉन्सनच्या वेळी इंग्लडंमध्ये जी स्थिती होती तिचे साम्य या देशाच्या स्थितीशी बरेचसे जुळते आहे असे चिपळूणकर म्हणतात. विद्या आणि लोकस्थिती या संबंधाचे हे सादृश्य आहे. शंभर वर्षांपूर्वीच्या इंग्रजी भाषेत व हल्लीच्या मराठी भाषेत जे सादृश्य दाखविले त्यावरून एक गोष्ट ध्यानात येते ती अशी की ' इंग्रजी ग्रंथकारांच्या परिश्रमांनी ती भाषा इतक्या नावारूपाला आली तर आमच्या लोकांनी जर तसाच उद्योग केला तर निदान त्यांच्या खालोखाल तरी आमच्या श्रमांस यश का येणार नाही ' असा प्रश्न चिपळूणकर विचारतात.

**जॉन्सनच्या चरित्रावरून विशेष बोध (ग्रंथकर्त्यांसाठी) –** जॉन्सनने अत्यंत विपत्तीत दिवस काढले. पण एकदा धरलेला मार्ग सोडला नाही. आपल्या देशात ग्रंथरचनेपासून फलनिष्पत्ती कितपत होईल याचा विचार न करता देशहितबुद्धीने काम करावे.

जॉन्सनला लोकमान्यता व कीर्ती ही किती दीर्घकालाने प्राप्त झाली हे लक्षात घेऊन आपणही लोकमान्यता वा कीर्ती ही खडकाळ डोंगराची वाट आहे असे समजून काम करावे. जॉन्सनने ज्याप्रमाणे टीकाकारांची पर्वा केली नाही, दूषकांचे आक्षेप सहन केले त्याप्रमाणे आपल्या देशातील ग्रंथकर्त्यांनी दूषकांचे आक्षेप सहन करण्याची तयारी दाखविली पाहिजे. आपले काम आपण निष्ठापूर्वक सुरू ठेवावे.

जॉन्सनने मोठी ग्रंथरचना केली. इंग्रजी भाषेचा कोश, शेक्सपीयरची आवृत्ती, रँबलर, कविचरित्र इ. ग्रंथ लिहिले. पण एवढा प्रचंड लेखनसंभार त्याने केवळ लोकाश्रयावर उठविला. ' सरकारचा उदार आश्रय ' किंवा ' दक्षिण प्राइज कमिटीकडून बक्षिस ' असा प्रकार त्याच्याबाबत नजरेस पडत नाही. (ग्रंथकर्त्याने स्वावलंबी असले पाहिजे, कोणाच्या कृपेची वाट न पाहता त्याने आपले कार्य केले पाहिजे हेच याठिकाणी चिपळूणकरांना सूचित करावयाचे आहे.)

**आपल्या देशातील परिस्थितीचे सादृश्य –** जॉन्सनने इंग्लंडच्या राजघराण्याच्या तीन कारकिर्दी पाहिल्या. त्याच्या वेळची परिस्थिती व आपल्या

देशाची आताची (निबंधमालाकालीन) परिस्थिती जवळ जवळ सारखीच आहे.

'पाश्चात्य विद्येचा संस्कार इकडील लोकांस घडून तो नमुना जसा इकडे उतरत चालला आहे. त्याप्रमाणे त्याच्याबरोबर वर्तमानपत्रांचा फैलाव, लौकिक प्रकरणांची चर्चा सार्वजनिक सभा वगैरे प्रकारही सहजच सुरू झाले आहेत. वरील विद्येचे अध्ययन इकडे सर्वत्र चालू झाले आहे. व आज वीस वर्षे युनिव्हर्सिटीतल्या मोठमोठ्या परीक्षांतून पसार झालेली मंडळी चोहोंकडे पसरली आहे. तेव्हा या कारणापासून वरील कार्य उद्‌भवावे हे सहजच आहे.'

जॉन्सन हा स्वतंत्र बुद्धीचा विचारवंत असूनही त्याने राजपक्षाचे मंडन करण्याचा आणि प्रतिपक्षाचे खंडन करण्याचा प्रयत्न चालविला होता. जॉन्सनच्या स्वाभाविक सत्यनिष्ठेवर राजनिष्ठेचा व दुराग्रहाचा पगडा बसून तो कसा भरकटला हे लक्षात येते. हीच परिस्थिती आपल्याकडील पाश्चात्य विद्याविभूषितांची होती असे चिपळूणकर म्हणतात.

**जॉन्सनच्या चरित्राची शैक्षणिक महती** – जॉन्सनने ज्या परिस्थितीत शिक्षण घेतले त्यावरून एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात येते ती अशी की –

'मनुष्याने विद्येत किंवा कोणत्याही गुणात निपुणत्व पावणे हे त्याच्या स्वप्रयत्नाधीन जितके आहे तितके त्यांच्या शिक्षकांच्या ज्ञानावर किंवा श्रमावर नाही. आजपर्यंत मोठमोठे विद्वान ग्रंथकर्ते जे या पृथ्वीच्या पाठीवर होऊन गेले त्यांचा गुरुपासून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा अंश व पुढे त्यांच्या परिश्रमाने ते जितके वाढले तितका अंश यांची जर परस्पर तुलना केली तर पहिली दुसऱ्यापुढे काहीच नाही असे नेहमी दिसून येईल. यास्तव ज्यास ज्ञानप्राप्तीची इच्छा असेल त्याने स्वतः उद्योग केला पाहिजे. **शिक्षकाचे काम मुख्यतः दिग्दर्शनापेक्षा दुसरे नाही.**'

जॉन्सनने स्वतःच जास्त परिश्रम घेऊन ज्ञान मिळवले. यासंदर्भात विष्णुशास्त्र्यांनी शिक्षकाचे काम दिग्दर्शनाचे आहे असे म्हटले आहे. शिक्षण-विचारात हेच सांगितले आहे. शिक्षक हा केवळ मार्गदर्शक असतो. विद्यार्थी स्वतःच शिकत असतो शिकविण्यापेक्षा शिकण्याची प्रक्रिया अध्यापन प्रक्रियेत महत्त्वाची आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणे शिक्षकाला वेदामध्ये 'गातुवित्' म्हणजे मार्ग शोधून काढणारा असे म्हटले आहे. गातु म्हणजे गमनमार्ग आणि वित् म्हणजे शोधून काढणारा. शिक्षकाने मार्ग दाखवावा, विद्यार्थ्यांनी शिकावे. शिक्षणप्रक्रियेत याला अधिक महत्त्व आहे.

ज्ञानप्राप्तीसाठी ज्ञानेच्छू व्यक्तीने स्वतः परिश्रम करणे आवश्यक आहे असे जे याठिकाणी सूचित केले आहे तेही शिक्षणशास्त्रदृष्ट्या उचितच आहे. याच विषयाचे पुढे विवेचन करतांना विष्णुशास्त्री लिहितात –

'मुद्रणकलेच्या प्रसारामुळे पुस्तके अगदी अल्प किंमतीत मिळू लागल्यामुळे व ती सर्व विषयांवर व सर्वांस सहज समजतील अशा प्रकारची असल्यामुळे शिक्षकाचीही गरज बहुतेक अंशी नाहीशी झाली आहे. यामुळे शेकडो मोठमोठे ग्रंथकार असे निपजले की त्यांस शिकविण्यास कोणाचीच गरज लागली नाही. त्यांचे सर्व ज्ञान त्यांस स्वत:सिद्धच प्राप्त झाले.'

अशा तऱ्हेचे शिक्षणप्रक्रियेतील शिक्षकाचे स्थान, ज्ञानार्जनाची महती व ज्ञानार्जन प्रक्रियेत परिश्रमांचे महत्त्व ही त्रिसूत्री याठिकाणी चिपळूणकरांनी सांगितली आहे.

**जॉन्सनचे गुण : कल्पनाशक्ती व तर्कशक्ती** – डॉक्टर जॉन्सन या विख्यात पंडिताविषयी विवेचन करताना जॉन्सनच्या स्वभाव वैशिष्ट्यांचे दिग्दर्शन चिपळूणकरांनी केले आहे. त्याचे अंगी असलेल्या अनेक गुणांबरोबरच त्याच्या बुद्धिमत्तेचे विश्लेषण व वर्णन शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे.

'जॉन्सन जो एवढ्या विख्यातीस चढला तो कशामुळे, कोणत्या मानसिक शक्ती त्याचे ठायी प्रबळ होत्या याविषयी निरुपण करावयाचे.

मानसिक शक्तीत दोन गोष्टी प्रधानभूत आहेत. एक तर्क म्हणजे विवेचनशक्ती व दुसरी कल्पनाशक्ती. पहिलीच्या योगाने मनुष्यास सत्यासत्याचे विवेचन करता येते व वाद करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. दुसरीच्या योगाने अदृष्ट, किंबहुना अवास्तव पदार्थाचीही यथास्थित भावना मनोमय करता येते व त्यामुळे यथावत वर्णन करण्याची शक्ती प्राप्त होते. पहिल्या शक्तीचा उत्कर्ष तत्त्वज्ञान्याचे ठायी आढळतो.

दुसरीचा कवींचे ठायी दिसून येतो.'

जॉन्सनच्या गुणांबाबत विवेचन करताना विष्णुशास्त्र्यांनी ज्या दोन मानसिक शक्तींचा उल्लेख केला आहे त्या दोन्ही मानसिक शक्ती शिक्षणशास्त्रदृष्ट्या महत्त्वाच्या आहेत. शैक्षणिक मानसशास्त्राने या दोन्ही शक्तींचे महत्त्व मान्य केले आहे.

"पूर्वानुभवातील काही घटक एकत्र घेऊन त्यांची जुळवाजुळव वेगळ्या पद्धतीने केली तर ती कल्पना होते."

कल्पनाशक्तीमध्ये रचनात्मक कल्पना, अनुकरणात्मक कल्पना, सृजनात्मक कल्पना, व्यावहारिक कल्पना, सौंदर्यनिष्ठ कल्पना आणि स्वैर कल्पना इतके उपभेद येऊ शकतात. यापैकी साहित्याला सृजनात्मक कल्पनेची जास्त आवश्यकता असते. जॉन्सनने एक नाटक, एक कादंबरी आणि काही कविता रचल्या. त्यावरून त्याचे ठायी कल्पनाशक्ती होती हे दिसून येते.

शिक्षणात स्वैर कल्पनेला फार महत्त्व देऊ नये. मुले दिवास्वप्ने पाहणारी झाली तर ती कल्पनेच्या साम्राज्यातच रममाण होतील. म्हणून अन्य प्रकारच्या

कल्पनाशक्तींचा विकास त्यांचे ठिकाणी करावा. शिक्षणक्रमात अशा कल्पनाशक्तीचा विकास व्यक्तिविकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतो.

कल्पनाशक्तीला ज़ीवनात फार महत्त्वाचे स्थान आहे. 'कल्पना शक्तीचा उपयोग करूनच वैज्ञानिक, स्थापत्यशास्त्रज्ञ, कवी, लेखक यांनी नव्या विचारांना जन्म दिला.'

यामुळेच नानाविध ऐहिक साधने जन्माला आली. मानवी संस्कृतीचा विकास झाला. धरणे, पूल, आगगाड्या, विमाने, अवकाशयान ही सर्व कल्पनेचीच अपत्ये होत. जॉन्सच्या चरित्रवाचनाने या कल्पकतेचा प्रत्यय येईल.

जॉन्सनच्या ठिकाणी तर्कशक्ती किंवा विचारशक्ती प्रखर स्वरुपात होती. या शक्तीचेही शिक्षणात फार महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या एकंदर जीवनातच विचाराला वरचे स्थान आहे. कोणतीही गोष्ट आपण विचारपूर्वक केली तर ती यशस्वी होण्याची अधिक शक्यता असते. तर्क किंवा अनुमान हे वरच्या पातळीवरील विचारप्रक्रियेचे अंग असते. या मानसिक प्रक्रियेत दिलेल्या गोष्टीतील संबंध लक्षात घेऊन निष्कर्ष काढले जातात. विचारप्रक्रियेचे शैक्षणिक महत्त्व फार मोठे आहे. विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीचा व तर्कशक्तीचा विकास करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. समस्या निर्माण होताच विचारप्रक्रिया सुरू होते. विचारावर भावना व पूर्वग्रह यांचा मोठा पगडा असतो. तो विचारपूर्वक दूर करावा लागतो.

जॉन्सनच्या चरित्रात या तर्कशक्तीचे किंवा विचारशक्तीचे रूप अनुभवावयास मिळते. जॉन्सनची बुद्धी जात्याच परम सूक्ष्म होती. पहिल्यापासून सतत तत्त्वशोधाकडे त्याची प्रवृत्ती होती. सत्यासत्य विवेचनाविषयी त्याला पटुत्व प्राप्त झाले होते. बॉसवेलच्या ग्रंथात जॉन्सनची तर्कशक्ती प्रखर स्वरूपात प्रकट झाली आहे.

जॉन्सनच्या चरित्राभ्यासाने या दोन शक्तींचा विकास अभ्यासावयास मिळतो हे या चरित्राभ्यासाचे वैशिष्ट्य.

**जॉन्सनच्या चरित्रापासून बोध** – जॉन्सनच्या चरित्रापासून वाचक कोणत्या गोष्टींचा बोध प्राप्त करू शकतो याची चर्चा चिपळूणकरांनी केली आहे. यात काही शैक्षणिक महत्त्वाचे मुद्दे आले आहेत. जॉन्सन हा एका पुस्तकवाल्याचा मुलगा असूनही पुढे एवढ्या योग्यतेला चढला ते त्याच्या बुद्धीचे फळ तर आहेच, पण बुद्धीपेक्षा निश्चयाचे बळ त्याला उपयोगी पडले. जॉन्सननेच कोठेसे म्हटले आहे की, मोठमोठी कामे जी उठतात ती केवळ बुद्धिसामर्थ्यावर उठत नसून सततोद्योग व निर्धार यांच्या बळावर ती उठतात.

शिक्षणप्रक्रियेत व्यक्तिविकासाच्या दृष्टीने विचार करता बुद्धी आणि परिश्रम यांना खूपच महत्त्व दिले आहे. १० टक्के बुद्धी आणि ९० टक्के परिश्रम यांच्या

योगाने नवनिर्मिती होते असे शिक्षणशास्त्रज्ञ सांगतात. जॉन्सनच्या अंगी परिश्रमाचा खटाटोप व दृढनिश्चय खूप होता. जगातल्या अनेक मान्यवरांनी जॉन्सनला याबाबत आदर्श मानले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एके ठिकाणी म्हणतात –

'हिंदू धर्माच्या पवित्र ग्रंथाचे संशोधन करताना मला जेवढी ऐतिहासिक सत्ये दिसून येतील तेवढी मी जगाच्या चव्हाट्यावर मांडेन व हे कार्य करताना डॉ. जॉन्सन यांचा दृढनिश्चय मी डोळ्यापुढे आदर्श म्हणून ठेवीन.'

याशिवाय जॉन्सनच्या ज्ञाननिष्ठेविषयी विवेचन करताना चिपळूणकर लिहितात –

'पंख फुटलेल्या पक्षास आकाशक्रमण जसे पुढेच करावयाचे असते त्याप्रमाणेच विद्यालयाच्या बंधातून जो सुटला तो विद्यासमुद्रावर सफर करण्यास नुकताच तयार झालेला असतो. तर ही वास्तविक स्थिती मनात आणून आमच्या होतकरू लोकांनी अल्प विद्येत संतोष न मानता व वृथा गर्वाने फुगून न जाता जॉन्सनची ज्ञानप्राप्तीविषयी जशी पराकाष्ठेची उत्कंठा होती व तो स्वत: मोठमोठ्या ग्रंथकारांस वंद्य असताही शेवटपर्यंत त्याचे अध्ययन जसे सुटले नाही तसाच त्यांनी क्रम ठेवला पाहिजे.'

शालेय शिक्षण अथवा विद्यालयीन शिक्षण ही ज्ञानमार्गाची नुसती सुरुवात आहे. तो शेवट नव्हे असेच या ठिकाणी चिपळूणकर यांना सुचवावयाचे आहे. त्यासाठी त्यांनी जॉन्सनच्या चरित्राचा आधार घेतला आहे. चिपळूणकरांनी जी तीन महत्त्वाची तत्त्वे सांगितली आहेत ती अशी –

अल्प विद्येत संतोष मानू नये.

वृथा गर्वाने फुगून जाऊ नये.

ज्ञानप्राप्तीविषयी पराकाष्ठेची उत्कंठा असावी, सतत असावी.

शिक्षण संपल्यावर नोकरी करून चरितार्थ चालविणाऱ्या लोकांच्या विद्या-साधनेविषयीच्या कल्पनेवर टीका करताना चिपळूणकर म्हणतात –

'परीक्षांच्या तडाख्यातून सुटून आपला चरितार्थ व्हावयाला लागला म्हणजे आपण कृतकृत्य झालो व इत:पर कोणतीही कर्तव्ये उरली नाहीत ही कोती समजूत वरील मंडळीने सोडून दिली पाहिजे. विद्येच्या संबंधाने वर जसे सांगितले की जे तीर त्यांस पलीकडचे वाटले ते वस्तुत: पाहता अलीकडचे आहे. जेथे कर्तव्यतेची त्यांच्या बुद्धी समाप्ती झाली तेथेच खरोखरी पाहिले असता तिचा नुसता आरंभ आहे हे त्यांनी समजावे.'

**जॉन्सनच्या चारित्र्याचा परिणाम** – जॉन्सनच्या वाङ्मयापेक्षा त्याच्या चारित्र्याचाच परिणाम विष्णुशास्त्रांवर अधिक घडला आहे. त्याचा उत्कट देशाभिमान, नि:स्पृह स्वभाव, निष्कलंक शील, या त्याच्या गुणांनी व त्याने केलेल्या निस्सीम

भाषासेवेने चिपळूणकर भारले गेले. शास्त्रीय संशोधनात्मक व सुधारणेच्या युगातही अढळ राहिलेली जॉन्सनची धर्मनिष्ठा त्यांना आदर्शभूत वाटते. त्याच्या चरित्रापासून आपण कोणता बोध घ्यावा याचे विवरण त्यांनी केले आहे.

जॉन्सनच्या चरित्राचे शैक्षणिक महत्त्व यादृष्टीनेच आहे की जॉन्सन यांचे जे चरित्र चिपळूणकरांनी लिहिले त्याद्वारा नव्या पिढीला बौद्धिक परिश्रमांची ओळख करून देता देता खालील गोष्टी शिकविता येतील...

बुद्धी असली तरी परिश्रम करणे आवश्यक

परीक्षेनंतर ज्ञानग्रहण थांबवू नये.

विद्येचा उपयोग चरितार्थसाधनापलीकडेही बराच आहे.

विपत्तीतही ज्ञानसाधना थांबवू नये, थांबविण्याचे कारण नाही.

स्वदेशप्रेम व स्वभाषाप्रेम यांची ओळख, त्यांचा प्रभाव.

इंग्रजी संस्कृती व इंग्रजी वाङ्मय यांची ओळख.

जॉन्सनचे चरित्र हा चिपळूणकरांच्या विषय-निरुपणशैलीचा उत्तम परिपाक आहे. चिपळूणकरांच्या व्यक्तिमत्त्वाशी जॉन्सनचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक जुळते असल्याने त्यांनी ते मोठ्या साक्षेपाने लिहिले आहे. या निबंधाचा शेवट करताना त्यांनी लिहिले आहे...

'जॉन्सनचे चरित्र एतद्देशीय वाचकांस समग्र कथन केले असता पुष्कळ तऱ्हेचा फायदा होण्यासारखा आहे. आमचा मूळ संकल्प कितपत सिद्धीस गेला हे आमच्याने सांगवत नाही. हे चरित्र वाचून केवळ मराठी जाणणारास चरित्रनायकाचे व त्याच्या राष्ट्राचे बरेच स्वरूप ध्यानात येऊन महत्त्व प्राप्त होण्यास कोणकोणते अमोलिक गुण अंगी असावे लागतात हे जर स्पष्टपणी दिसून येईल तर येवढे सविस्तर चरित्र लिहिण्याच्या श्रमांचे पुष्कळ साफल्य झाले असे आम्ही समजू.'

### गर्व

चिपळूणकरांनी लिहिलेल्या अनेक निबंधांपैकी 'गर्व' या विषयावर त्यांनी लिहिलेला निबंध मानसशास्त्रीय बैठक असलेला असा आहे. शिक्षणविचारात मानसशास्त्राला महत्त्वाचे स्थान असल्याने, किंबहुना शिक्षण विचाराला मानसशास्त्राचीच बैठक असल्यामुळे, तीवर आधारित या विषयाचा विचार येथे केला आहे. या निबंधाच्या परिशीलनाने शैक्षणिक मानसशास्त्राचे काही पैलू ध्यानात येतात.

सुरुवातीलाच चिपळूणकर सांगतात की हा विषय मानसशास्त्राचा आहे. ते म्हणतात, "मानसशास्त्र म्हणजे मनुष्याच्या मनाच्या व हृदयाच्या ज्या नानाविध वृत्ती आहेत त्यांचे विवरण ज्यात केलेले असते ते होय."

जगातील विविध मानसशास्त्रज्ञांनी मानसशास्त्राची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. ॲरिस्टॉटलने 'ते आत्म्याचे शास्त्र आहे' असे म्हटले तर जर्मन शास्त्रज्ञ वुंड्टने मानसशास्त्र हे बोधावस्थेचे शास्त्र आहे असे म्हटले. मानसशास्त्राची आता सर्वमान्य व्याख्या अशी –

'विकसित प्राण्यांच्या आंतरिक तसेच बाह्य वर्तनाचे आणि त्या वर्तनामागील मानसिक प्रक्रियांचे अनुभवाश्रित पद्धतीने व वस्तुनिष्ठपणे अभ्यास करणारे नैसर्गिक, वर्णनात्मक व वास्तववादी शास्त्र म्हणजे मानसशास्त्र.'

चिपळूणकरांची मानसशास्त्राची व्याख्या इतकी व्याप्त व शास्त्रशुद्ध नसली तरी त्यांनी थोडक्यात व सोप्या शब्दात या मनोव्यापार-शास्त्राचे वर्णन केले आहे. यानंतर चिपळूणकरांनी सांगितले आहे की 'गर्व' या निबंधात मनोवृत्तींचे विवरण शास्त्ररीत्या नाही, तर फक्त व्यवहाररीत्याच करावयाचे आहे. तेव्हा व्यावहारिक दृष्ट्या, गर्व या विषयावर, मानसशास्त्राची बैठक असलेले कोणते विचार चिपळूणकरांनी व्यक्त केले आहेत ते अभ्यासणे आवश्यक आहे.

जुन्या तत्त्वज्ञांनी षड्विकार (षड्रिपु) सांगितले आहेत. त्यात 'गर्व' म्हणजे 'मद' याचा अंतर्भाव केला आहे.

चिपळूणकरांनी षड्रिपूंना मनुष्याचे शत्रू मानण्यासच विरोध दर्शविला आहे. हे म्हणणे एकदेशीय आहे असे त्यांना वाटते. सर्व विकार जगातून नष्ट झाले तर जगाची अवस्था काय होईल असा प्रश्न उपस्थित करून ते म्हणतात –

'षड्रिपू हे जगाचे केवळ शत्रूच आहेत असे नाही तर ते जगाचे हितकर्ते व मित्र आहेत असेही म्हणता येईल. त्यांचा बरेवाईटपणा मनुष्याच्या बरेवाईटपणावर अवलंबून असतो.' गर्वाचे तसेच आहे.

यानंतर चिपळूणकरांनी विद्येमुळे ज्यांना गर्व झाला आहे अशांचे विवेचन एका ठिकाणी केले आहे. रूप व संपत्ती याप्रमाणेच विद्येनेही माणसाला गर्व होतो.

'मनुष्याच्या मनात ज्ञानाचा प्रवेश होऊ लागला असता प्रथमतः गर्वादि दुर्विकार त्यास जडतात.' असे चिपळूणकर सांगतात.

यानंतर गर्वविवेचन करतांना चिपळूणकर म्हणतात, की मनुष्य जसजसा अधिकाधिक ज्ञानसंपादन करू लागतो तसतसा ज्ञानाचा प्रदेश अधिक विस्तृत होत जाईलसा त्याला दिसतो. त्याप्रमाणे होता होता ज्ञानाची सीमा आकाशाच्या सीमेप्रमाणे सरतेशेवटी अगदी अनंत होय अशी त्यांची खात्री होते. या संदर्भात तळटीपांमध्ये त्यांनी वामनपंडितांचा एक श्लोक उद्धृत केला आहे. श्लोक असा आहे –

'जधी काही काही हरि कवि असे शब्द शिकलो<br>
तधी मी सर्वज्ञ द्विपसममदे याच भरलो

जधी काही नेणे म्हणूनि वदले पंडित मला
तदा माझा गर्वज्वर सकळही हा उतरला.'

या संदर्भात चिपळूणकरांनी मांडलेले विचार संक्षेपाने असे –

मनुष्याचे ज्ञान सापेक्ष आहे, ज्ञान अनंत आहे, अज्ञानी लोकांनाच गर्व अधिक होतो, ज्ञानाने गर्व नाहीसा होतो. यथायोग्य गर्व हा भूषणावहच असतो. कुलाभिमान, जात्याभिमान, देशाभिमान इ. गर्वाचे अदोषरूप कित्येक प्रकार आहेत. यथायोग्य गर्वाचा माणसाला उपयोग आहे. नाहीतर मत्सरी व द्वेषी माणसांच्या निर्भत्सनेखाली माणूस केव्हाच खचून जाऊन त्याच्या अंगचे खरे गुणही कदाचित लोपून जातील.

'गर्व' या विषयाविषयी विष्णुशास्त्री यांचे विचार हे असे आहेत. त्यात वर उद्धृत केलेले दोन-तीन मुद्देच शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत. मात्र 'गर्व असला पाहिजे', 'अस्मिता असली पाहिजे' हा त्यांचा मुद्दा सदा स्वीकार्य आहे.

## लोकभ्रम

चिपळूणकरांच्या 'लोकभ्रम' या निबंधात त्यांनी आपल्या समाजातील वेडगळ समजुती, रुढी परंपरा यांच्याविषयी आपले विचार मांडले आहेत. या सर्व समजुतींना ते 'खुळे' म्हणतात. ही खुळे म्हणजे भुते-खेते, शकुन, मंत्र, ग्रहांचे शुभाशुभ योग, देव, नवस, किमया, रमल इत्यादी होत. यामुळे काळाचा, श्रमाचा, पैशाचा व्यय होतो. या निबंधातील विवेचनाचा सारांश असा.

लोकभ्रम अथवा अंधश्रद्धा ज्या ज्या बाबतीत असतात त्या बाबी अशा –

भुते-खेते, शकुन (शुभाशुभ गोष्टीचे सूचक), विधवा स्त्रिया, अपशकुनी मूल इ., ज्योतिष व ग्रहदशा.

भुते-खेते, शकुन अपशकुन यावर आपण विश्वास ठेवतो आणि आपल्याच जीवनात अडथळे निर्माण करतो. या सर्व गोष्टींच्या मुळाशी 'अज्ञान' हा महत्त्वाचा घटक असतो. कोणत्याही गोष्टीच्या खरेपणाविषयी खात्री होण्यास तीन घटक आवश्यक असतात. त्या गोष्टीची संभाव्यता, प्रत्यक्ष प्रमाण, विश्वासपात्र मनुष्याचे भाषण.

शकुन म्हणजे शुभ किंवा अशुभ याविषयी सूचना. पण हा शुद्ध भ्रांतीचा प्रकार आहे.

ज्योतिषशास्त्रही भ्रांतिमूलक घटनांवर आधारलेले आहे.

अशा तऱ्हेने विष्णुशास्त्र्यांनी 'लोकभ्रम' या विषयाची चिकित्सा केली आहे. ती करताना त्यांनी अनेक उदाहरणांद्वारा आपले म्हणणे स्पष्ट केले आहे.

लोकभ्रम हा विषय एका अर्थाने तत्त्वज्ञानाच्या व दुसऱ्या अर्थाने समाजशास्त्राच्या क्षेत्रातील आहे. पण शिक्षणशास्त्राचा आणि या विषयाचा संबंध मानसशास्त्र आणि लोकसंख्याशिक्षणशास्त्र या बाबतीत येतो. भ्रम, भ्रांत, श्रद्धा,

विश्वास हे सर्व मनाचे खेळ; मनाची स्थिती, मनात होणाऱ्या उलथापालथी, मनातील विचार, त्या विचारांमुळे आचारांवर होणारा परिणाम, हे सर्व मुद्दे मानसशास्त्राच्या क्षेत्रात येतात.

'**लोकसंख्याशिक्षण**' हा एक अगदी अत्याधुनिक घटक शैक्षणिक प्रक्रियेत महत्त्वाचा मानला गेला आहे.

लोकसंख्येच्या विस्फोटामुळेच जगभर प्रदूषण, आर्थिक असमतोल, दळणवळण, जंगलतोड, पर्यावरण, बेकारी, दारिद्र्य इ. अनेक समस्या निर्माण होत आहेत. हा धोका ओळखून लोकसंख्येची गुणवत्ता वाढविण्यासाठी लोकसंख्या-शिक्षण हा विषय सध्या प्रामुख्याने शिक्षकांच्या शिक्षणक्रमात अंतर्भूत केला आहे.

या विषयांतर्गत चर्चेत असे सांगितलेले आहे की लोकसंख्या वाढ अधिक होणे किंवा लोकसंख्येची रचना असंतुलित होणे यासाठी जे अनेक घटक कारणीभूत होतात त्यात एका महत्त्वाचा घटक म्हणजे अंधश्रद्धा व रूढी यांचे मानवी जीवनात असलले प्राबल्य.

विवाहाचे वय खूप कमी असणे, मुलगाच हवा, मुलगी नको, अशा प्रकारची विचारसरणी असणे, मूल जन्मल्यानंतर त्याच्या जन्मावेळी घडलेल्या घटनांवरून पायगुण ठरविणे इ. घातक समजुतींमुळे समाजाचे स्वाथ्य बिघडते. एवढेच नव्हे तर लोकसंख्यावाढ होणे किंवा लोकसंख्या दुर्बल होणे यासारखे परिणाम घडून येतात. 'लोकभ्रम' हेही याबाबतीत अशा दुष्परिणामांना कारणीभूत असतात.

विधवा ही अपशकुनी समजणे, मूल मुळावर आल्याबद्दल नापसंती व्यक्त करणे, मुलीचा जन्म झाला की नाराजी असणे, घराण्याला वंशाचा दिवा हवा यासाठी मुलगाच हवा असा समज असणे हे सारे लोकभ्रम आहेत.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी अशा लोकभ्रमांवर टीका केली आहे. समाजाच्या प्रगतीला खीळ घालणारे हे लोकभ्रम ताबडतोब दूर होऊन समाजाच्या प्रगतीचा वेग वाढला पाहिजे हे त्यांनी सूचित केले आहे.

### उपसंहार

येथवर चिपळूणकरांच्या लेखनातील शिक्षणविचाराचा परामर्श घेतला. सुरुवातीलाच चिपळूणकरांची चरित्ररेखा देण्यात आली आहे. चिपळूणकरांचे चरित्र आणि त्यांचे कार्य हे दोन्हीही एकमेकांस परस्पर-पूरक आहेत.

१८७४ मध्ये चिपळूणकरांनी निबंधमाला सुरू केली ती राष्ट्रीय अस्मिता जागृत करावी या उद्देशाने. चिपळूणकरांनी शाळा काढली, न्यू इंग्लिश स्कूल. तीही याच उद्देशाने. चिपळूणकरांचे शैक्षणिक कार्य आणखी एका स्वरुपाचे आहे. ते

म्हणजे लोकशिक्षणाचे. लोकशिक्षणासाठी त्यांनी ‘ केसरी ’ सुरू केला.

निबंधमाला सुरू करतानाही विष्णुशास्त्र्यांची भूमिका लोकशिक्षकाचीच होती. मालेच्या उपसंहारात ते म्हणतात –

‘ गेल्या आठ वर्षांत सदरील पुस्तकाचा जो आम्ही अव्याहत उद्योग केला त्याला आमच्याच देशात काय पण पाश्चात्य देशातही तोड सापडणार नाही असे म्हटले असता गर्वोक्ती केल्याचा दोष माथी येईल असे आम्हास वाटत नाही. मासिक किंवा त्रैमासिक पुस्तकाची स्थिती पाहिली तरी येवढा डोलारा कोणी एकट्यानेच शिरी वागवला आहे असे आम्हास तर अद्याप कोठे आढळले नाही. कोणापाशी एक छदाम किंवा एक ओळही न मागता हेह महासत्र संपवून आज अवभृथस्नानाला मोकळे होणार हीच विशेष गोष्ट.’

महाराष्ट्राचे सार्वजनिक जीवन आणि मराठी वाङ्मय यांचा विकास निबंधमालेच्या उदयापूर्वी होत आला होता याची चिपळूणकरांना जाणीव होती.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी साम्राज्य-सत्तेच्या शोषक नीतीची जाणीव झाल्यामुळे जागृत झालेल्या जनतेची जी क्षोभशक्ती जागृत झाली होती ती हळूहळू निरनिराळ्या निमित्ताने बळ घेऊन आकारास आली. त्या शक्तीचेच एक रूप निबंधमाला हे होय. पारतंत्र्याबरोबर पाश्चात्य संस्कृतीचा पहिला आघात झाला तो भारतीय संस्कृतीवर व धर्मावर. हे केवळ धर्मावरील आक्रमण नव्हते. ती जीवनप्रणालीवर चाल होती.

स्वजनांमध्ये जे दोष होते त्या दोषांचा उपयोग ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केला. इंग्रजी अध्यापकवर्गाचे त्याला सहाय्य झाले. अनेक नियतकालिके मिशनऱ्यांचा आणि सत्ताधाऱ्यांचा पाठपुरावा करण्यात धन्यता मानू लागली. अशा अवस्थेत स्वाभिमानाचे निशाण घेऊन निबंधमाला उभी राहिली.

‘ साहित्य ’ म्हणून विचार करता निबंधमालेचे कार्य मोठेच आहे. मराठी निबंधाचा पायाच निबंधमालेने घातला. मराठीला वैचारिक तेज प्राप्त करून दिले ते निबंधमालेने. निबंधमाला नंतर ग्रंथस्वरूपात प्रसिद्ध झाली. विष्णुशास्त्री यांनी आपल्या लेखनात जो वैचारिक कस आविष्कृत केला त्याने पुढे कितीतरी काळपर्यंत मराठी साहित्याला प्रेरणा मिळाली.

चिपळूणकरांनी मांडलेल्या वैचारिक आशयात शिक्षण-विचाराच्या दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टी अशा –

इंग्रजी भाषेबद्दल चिपळूणकरांचा दृष्टिकोण एका बाजूने आदराचा तर दुसऱ्या बाजूने आत्मपरीक्षणाचा होता. इंग्रजीला त्यांनी वाघिणीचे दूध म्हटले पण ते पचविण्याची ताकद आपल्या अंगी नाही असे आत्मपरीक्षण करून मराठीचे सामर्थ्य

वाढविण्याची निकड प्रस्थापित केली. इंग्रजी भाषेच्या बरोबरीने आमच्या सर्वच राष्ट्रीय जीवनाला जे परावलंबन आले होते, त्यातून परदास्याची भावना जोपासली जात होती. ही परपुष्टता केवळ भाषा वा साहित्य किंवा राजकीय क्षेत्र एवढ्यापुरतीच मर्यादित नव्हती, तर आत्मा हरवलेला समाज इंग्रजीच्या संस्काराने निर्माण होऊ पहात होता. आत्मा परत पुन्हा मिळविणे हे काम चिपळूणकरांनी केले. आत्मशोधाचे हे कार्य लक्षणीय आहे.

स्वातंत्र्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. त्याच्या अनुषंगाने स्वदेशाभिमान, स्वभाषाभिमान ही मूल्य जोपासणे आवश्यक आहे हे त्यांनी सांगितले.

'गर्व' यासारख्या विषयावर निबंध लिहून त्याचे मानसशास्त्रीय प्रयोजन थोडक्यात सांगितले. यथायोग्य गर्व मनुष्याच्या प्रगतीसाठी आवश्यकच आहे असे त्यांनी सांगितले. डॉ. जॉन्सन या प्रकांडपंडिताचे चरित्र निबंधमालेत विस्तृत रूपाने देऊन ज्ञानसाधनेचा परिश्रमशील मार्ग कसा असावा याचे उत्तम मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे जॉन्सनच्या व्यासंगाचे, विपत्तीचे व ज्ञानाचे यथार्थ वर्णन करून विद्वत्तेच्या क्षेत्रातील आपत्तीमय मार्गातूनही यश मिळविता येते याचे उत्तम उदाहरण लोकांसमोर ठेवले. 'वक्तृत्व' यासारखे निबंध-लेखांक लिहून व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने आवश्यक असणारे एक शैक्षणिक अंग किती प्रभावी असते, असावयास पाहिजे याचे दिग्दर्शन यांतून केले. इंग्रजीच्या भाषावैभवाचा परिचय मराठी लोकांना यथार्थ रीतीने करून दिला. इंग्रज लोकांचे गुण, राष्ट्रनिष्ठा, अस्मिता यांचीही ओळख या निमित्ताने मराठी वाचकांना होते. 'आमच्या देशाची स्थिती' यासारखे निबंध लिहून समाजस्थितीचे योग्य दर्शन घडविले. समाजातील उदासीनता, मरगळ, अज्ञान हे सर्व झटकून ब्रिटिशांप्रमाणे कंबर कसून कामाला लागले पाहिजे हे जाता जाता आग्रहाने सांगितले.

चिपळूणकरांनी आपल्या लेखनाच्या द्वारे लोकप्रभुत्वात परिणत होणाऱ्या पारतंत्र्यनिरपेक्ष विशुद्ध लोकशाही स्वातंत्र्याचा पुरस्कार केला व त्याची शिकवण निबंधांद्वारे दिली. शिक्षणविचारात लोकशाही व स्वातंत्र्य यांना मोलाचे, महत्त्वाचे स्थान असते. खऱ्या लोकशाहीशिवाय खरे शिक्षण नाही आणि त्याच्याशिवाय समाजविकास वा राष्ट्रविकास नाही. पाश्चात्य राष्ट्रांत, फार प्राचीन काळापासून विकास पावलेली लोकशाही राज्यपद्धतीची (डेमॉक्रसी) चिपळूणकरांनी भलावण केली आहे. त्यातूनच त्यांचा राष्ट्रवाद विकास पावतो व त्यातून त्यांच्या राष्ट्रीय शिक्षणविषयक संकल्पनेची निर्मिती होते. अशी संकल्पना नुसती करून चिपळूणकर थांबले नाहीत, तर ती प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी शाळा स्थापन केली. ज्ञानप्रसारार्थ किताबखाना सुरू केला – चित्रशाळा सुरू केली.

या सर्व गोष्टींवरून चिपळूणकर हे आचारमार्गी व आचारधर्मी तत्त्वज्ञ होते असे म्हणावे लागते. या आचार-धर्मामुळेच त्यांच्या शिक्षण विचारात एक प्रकारचा आग्रह, हट्ट व दृढता आली आहे. तत्त्वज्ञाची उंची गाठलेला विचार आणि कर्मयोग्याचे कर्म यांचा संयोग त्यांच्या शिक्षण विचारात दिसून येतो. पुस्तकी शिक्षणाबरोबरच व्यक्तिविकास-निदर्शक असलेले प्रभावशाली व्यक्तिमत्त्वाचे व्यवच्छेदक लक्षण असे वक्तृत्व... त्यावर विष्णुशास्त्र्यांनी वक्तृत्वपूर्ण विवेचन केले आहे. नव्या काळातही चिपळूणकरांचे विचार कोणत्या तऱ्हेने उपयुक्त ठरतील व त्यातील आधुनिकता आजही कशी स्वीकार्य आहे, याचा विचार समालोचनाच्या प्रकरणात येणारच आहे.

◆ ◆



गोपाळ गणेश आगरकर

१८५६ - १८९५

## प्रकरण : २

# गोपाळ गणेश आगरकर

### चरित्ररेखा

गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म १४ जुलै १८५६ रोजी कऱ्हाड येथे त्यांच्या आजोळी झाला. टेंभू हे आगरकरांचे मूळ गाव कऱ्हाडपासून जवळच आहे. आगरकरांचे शालेय शिक्षण कऱ्हाडलाच झाले. शालेय आयुष्यात आगरकरांच्या बुद्धिमत्तेची चमक अनेक वेळा दिसून आली. त्यांचे शिक्षक नारायण मनोहर रोंघे आणि त्यावेळी कऱ्हाडला मुन्सफ पदावर असलेले नागरपूरकर नावाचे विद्याप्रेमी अधिकारी यांनी आगरकरांचे बुद्धिवैभव ओळखले होते.

दर रविवारी मुलांना एकत्र बोलावून त्यांना निबंधाचे विषय द्यायचे व निबंध लिहून घेऊन गुणवत्तेनुसार त्याना प्रत्येकी दोन रुपये पारितोषिक देण्याचा प्रघात नागपूरकर मुन्सफांनी ठेवला होता. आगरकरांनी लहानपणी असे निबंध लिहून अनेकदा बक्षिसे मिळविली होती.

इंग्रजी तिसरीनंतर अत्यंत कष्टाने रत्नागिरी व अकोला येथे आगरकरांनी आपले शिक्षण घेतले. मध्यंतरीच्या काळात कऱ्हाडलाच कंपौंडरची नोकरी केली. अकोल्याच्या शाळेत वि. मो. महाजनी त्यांचे शिक्षक होते. त्यांचीच शिफारस व मदत घेऊन आगरकर पुण्याला डेक्कन कॉलेजमध्ये शिक्षणासाठी दाखल झाले. तिथेच टिळकांची भेट झाली व स्नेह वाढला.

शिष्यवृत्ती, फेलोशिप आणि वक्तृत्वात व लेखनात मिळणारी पारितोषिके यांच्या सहाय्याने आगरकर आपले शिक्षण पूर्ण करीत होते. पण सततची दगदग, प्रकृतीची आबाळ, यांमुळे बी. ए. च्या वर्गात असतानाच त्यांना दम्याची व्यथा जडली. तरीही त्यांनी आपला निर्धार कायम ठेवला. लठ्ठ पगाराची नोकरी मी

करणार नाही, हे त्याच वेळी त्यांनी आपल्या आईला कळवून टाकले होते. त्यांचे गुरु वि. मो. महाजनी लिहितात.

'विद्यार्थीदशेत सतत गरीबीशी झुंज देऊन अलौकिक यश संपादून, आमरण गरीबीत आयुष्य कंठण्याचे ठरवून अध्यापनवृत्तीचे पुराणऋषींचे अनुकरण करून तीस उज्ज्वल करण्याचे व्रतच गोपाळचे होत.' डेक्कन कॉलेजमध्ये असतानाच कमीत कमी खर्चात देशपोषक शिक्षण देणारी शाळा काढावी असे टिळक आगरकरांनी ठरविले होते. महादेव गोविंद रानडे यांना एक पत्र लिहून आपला हा विचार त्यांनी कळविला होता. रानडे यांना हा विचार पटला व त्यांनी प्रोत्साहन दिले. हिंदुस्थानच्या उद्धाराला राष्ट्रीय शिक्षण, राष्ट्रीय वृत्तपत्र व राष्ट्रीय धर्मप्रणाली (National Education, National Press, National Church) यांची आवश्यकता आहे असे न्या. रानडे यांनी स्पष्ट म्हटले. याचवेळी पुण्यात चिपळूणाकरांच्या मनातही शाळा काढावी असे होते. समविचारी तिघे भेटले आणि चिपळूणकर, आगरकर, टिळक यांनी १ जानेवारी १८८० रोजी न्यू इंग्लिश स्कूल या नावाने शाळा सुरू केली. आगरकरांना एम. ए. परीक्षेत याचवेळी अपयश आले होते. पण पुन्हा परीक्षेस बसून त्यांनी यश मिळवले.

शाळेची भरभराट चांगली झाली. आता याच लोकांच्या मनात वृत्तपत्र काढण्याचे आले. २ जानेवारी १८८१ रोजी मराठा आणि ४ जानेवारी १८८१ रोजी केसरी ही वृत्तपत्रे यांनी सुरू केली. प्रथम केसरीचे संपादक आगरकरच होते. टिळक आणि आगरकर या दोघांनाही चार महिने डोंगरीच्या तुरुंगात जावे लागले होते. या शिक्षेमुळे दोघांविषयी समाजात आदर वाढला होता.

याच्याही पुढे जाऊन याच मंडळींनी २ जानेवारी १८८५ रोजी फर्ग्युसन कॉलेज सुरू केले. या कॉलेजने चांगले नाव कमावले. कॉलेजची मातृसंस्था डेक्कन एज्युकेशन सोसायटी. या सोसायटीत मतभेद होऊन टिळकांनी राजीनामा दिला. याचवेळी आगकरांनी केसरी सोडला.

आगकरांना स्वत:ची मते ठामपणे मांडण्यासाठी एखादे मतपत्र हवे होते. १८८८ च्या दसऱ्यास आगरकरांनी 'सुधारक' सुरू केले. सुधारकात सुधारकी पद्धतीचे लेखन सडेतोडपणे सुरू केले. आगरकर फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले. जबाबदाऱ्या वाढल्या होत्या. सुधारकातील लेखन, फर्ग्युसन कॉलेजमधील अध्यापन आणि प्रशासन ही सर्व कामे सुरू होती. प्रकृती हवी तशी साथ देत नव्हती. त्यांचा मूळचा दम्याचा विकार अधिकच बळावत चालला. फर्ग्युसन कॉलेज आता स्वत:च्या इमारतीत भरत होते. खालावलेल्या प्रकृतीशी सामना देत आगरकर काम करीत होते.

१८९५ च्या उन्हाळ्यात आगरकरांची प्रकृती आणखी बिघडली. दमा जास्त झाला. सोमवार दिनांक सतरा जून १८९५ रोजी सकाळी उजाडताच आगरकरांचे निधन झाले. आगरकरांना अवघे एकोणचाळीस वर्षाचे आयुष्य लाभले. शिक्षक, प्राध्यापक व पत्रकार या नात्याने एवढ्या अल्प काळातही आगरकरांनी आपला ठसा उमटविला होता.

## आगरकरांचे लेखन

आगरकरांचे बहुसंख्य लेखन प्रथमत: केसरीत आणि नंतर सुधारक पत्रात झाले. आगरकरांच्या नावावर आतापर्यंत खालील ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

**विविध विषय संग्रह** – आगकरांनी स्वत:च्या लेखांचा संपादित केलेला संग्रह.

**विकारविलसित** – शेक्सपीयरच्या हॅम्लेटचा मराठी अनुवाद. (रूपांतर)

**आमचे डोंगरीतील १०१ दिवस** – डोंगरीच्या तुरुंगातील अनुभवांवर आधारित पुस्तक.

**वाक्यमीमांसा** – व्याकरणविषयक लहानसा निबंध.

याशिवाय माधव दामोदर आळतेकर यांनी संपूर्ण आगरकर असे ३ खंड संपादित करून आगरकरांचे लेखन एकत्र केले आहे.

विविध विषय संग्रहात केसरी-सुधारकातून आगरकरांनी वेळोवेळी लिहिलेल्या ललित निबंधांचे संकलन असून हेच निबंध नंतर आळतेकर संपादित खंडात समाविष्ट केले आहेत.

शेक्सपीयर या विख्यात नाटककारच्या हॅम्लेट या गाजलेल्या नाट्यकृतीचे रूपांतर आगरकरांनी विकारविलसित या नावाने केले आहे. विकारविलसिताचे प्रयोग त्या काळात चांगले गाजले.

कोल्हापूर प्रकरणात शिक्षा झाल्यावर टिळक आगरकर १०१ दिवस डोंगरीच्या तुरुंगात होते. तुरुंगवासाचे हे अनुभव आगरकारांनी 'आमचे डोंगरीतील १०१ दिवस' या पुस्तकात लिहिले आहेत. तुरुंगातील व्यवस्था, तुरुंगातील कैदी यांसंबंधी या पुस्तकात बरीच चर्चा आहे. तुरुंगात येणारे गुन्हेगार हे गुन्हेगार का होतात याची मीमांसा करून त्या सामाजिक प्रश्नाकडे आगकरांनी लोकांचे लक्ष वेधले.

वाक्यमीमांसा हा लहानसा व्याकणविषयक निबंध आहे.

आगरकरांच्या या साहित्यसंपदेवरून एक गोष्ट ध्यानात येते की त्यांच्या संपूर्ण आगरकर – संपादक मा. दा. आळतेकर या पुस्तकाचाच विचार विवेचनासाठी करणे युक्त आहे. केसरी-सुधारकातील या लेखांचा परामर्श येथून पुढे घेतला आहे.

## शिक्षणविषयक लेख

आळतेकर संपादित 'संपूर्ण आगरकर' खंड १ ते ३ या निबंधसंग्रहातील निबंधांचा परामर्श घेतल्यावर आगरकरांचे प्रत्यक्ष शिक्षण विषयक लेख खालीलप्रमाणे आढळतात –

**खंड १** – तरुण सुशिक्षितांस विज्ञापना, स्त्रियांना चरितार्थ संपादक शिक्षण देण्याची आवश्यकता, शिक्षणाबद्दल सक्ती करावी काय? प्राथमिक शिक्षण सरकारचे अवश्य कर्तव्य आहे, मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता, स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचे शिक्षण द्यावे किंवा नाही, स्त्री-पुरुषांना एकच शिक्षण द्यावे व तेही एकत्र द्यावे.

**खंड २** – लोकशिक्षणावर गदा.

**खंड ३** – अनाथाचा वाली कोण नाही.

आगरकरांच्या प्रत्यक्ष शिक्षणविषयक लेखांची यादी अगदीच त्रोटक दिसत असली तरी अन्य अनेक लेखांमध्ये पर्यायाने त्यांनी शिक्षणविचार तत्त्वज्ञानाच्या स्वरूपात मांडला आहे. ज्या लेखांमधून असा विचार आला आहे, त्यांची नावे अशी –

**खंड १** – आमचे काय होणार? सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काळ (लेखांक १ व २), आमचे दोष आम्हास कधी दिसू लागतील? आमचे ग्रहण अजून सुटले नाही. स्वातंत्र्याच्या वृथा वल्गना. गुलामांचे राष्ट्र.

**खंड २** – पुण्याचे लोकांनो सावध व्हा, सावध व्हा. आमची एक दुष्ट खोड, आळस, समजत नाही ते हे.

**खंड ३** – खुळे रे खुळे! अथवा बहिष्काराचे शुष्क अवडंबर. मराठीत चांगले ग्रंथ का होत नाहीत? सिव्हिल सर्व्हिसेससाठी समकालीन परीक्षा.

डोंगरीतील १०१ दिवस या पुस्तकात तुरुंगातील अवस्थेचे चित्रण आलेले आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीसंबंधी काही विचार त्यात मांडलेले असल्यामुळे शैक्षणिक मानसशास्त्राच्या काही तत्त्वांचा विचार त्यात येतो.

आता आगरकरांच्या लेखनाचे शिक्षणविचाराच्या दृष्टिकोणातून विवरण व विश्लेषण करावयाचे आहे.

## सुशिक्षितांची कर्तव्ये

आगरकर हे समाजमनस्क लेखक होते. समाज सुधारणा हा त्यांच्या वैचारिकतेचा पाया होता. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या तरुण सुशिक्षितांनी कोणती कर्तव्ये पार पाडली पाहिजेत याबाबत आगरकरांची काही विशेष मते त्यांच्या निबंधांतून

दिसतात. ‘ इंग्रजी शिक्षण ’ म्हणजे ‘ पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण ’ असे त्यांना अभिप्रेत होते.

स्वातंत्र्यपूर्व काळात जुने आणि नवे यांचा सतत झगडा होत राहिला होता. आगरकरांना स्वांतत्र्यप्राप्तीचा खरा मार्ग नव्या वाटेने येईल असे वाटत होते आणि त्यांची सारी भिस्त तरुण सुशिक्षित वर्गावर आहे. म्हणून ते ‘ तरुण सुशिक्षितांना विज्ञापना ’ या आपल्या निबंधात सुशिक्षितांस त्यांच्या खऱ्या कर्तव्याची जाणीव करून देत आहेत. ही कर्तव्ये सारांशरूपाने अशी –

स्वतंत्र व प्रजासत्ताक देशातील शिक्षक व शिष्य हे पूर्वसंप्रदायप्रिय असतात. त्यांना जुने तेच सोने असे वाटत असते. जे चालू आहे, त्याचे संरक्षण करावे अशी त्यांची स्थितीप्रिय वृत्ती बनते. त्यांना स्तिमितता येते. ज्या देशात राजकीय, धार्मिक, सामाजिक असमता असते, अज्ञान व अन्याय यांपासून ज्या देशांत पराकाष्ठेचा त्रास होतो, अशा देशातील विद्यापीठांत व विद्यापीठांतील शिक्षकांत इतर देशातील विद्यापीठे व शिक्षक याहून थोडी अधिक चळवळ असली तर ती स्वाभाविकच आहे. विचार करणे, सुखदु:खाचा अनुभव घेणे व क्रिया करणे या तीन गोष्टीपैकी कोणत्या तरी गोष्टीत माणूस चूर होऊन जातो.

विचार करणारे केवळ ग्रंथवाचन वा ग्रंथलेखन करून त्यात निमग्न असतात. बाह्य सुखांचा उपयोग यांना फार नको असतो. हा एक वर्ग. दुसरा वर्ग सुखाभिलाषी लोकांचा. यांना मानसिक सुखापेक्षा शारीरिक सुखाची अपेक्षा अधिक असते. अविद्या आणि वित्त यांचा संयोग अशा लोकांच्या ठिकाणी आढळतो. तिसरा वर्ग क्रियाप्रवृत्त लोकांचा. हे लोक कष्ट करतात, साधने निर्माण करता व वरील दोन वर्ग यांचा फायदा घेतात. एका दृष्टीने हे सामाजाचे आधारस्तंभ आहे.

हळूहळू सर्वच व्यक्तींनी विचार, उपभोग आणि काम समप्रमाणात करावे लागणार असून जो जो हे प्रमाणे समतेबाबत वाढत जाईल तो तो खरी उन्नती झाली असे म्हणता येईल. यासाठी सुशिक्षितांनी प्रथम हे केले पाहिजे की देशाच्या बुद्धीचा नीतीचा व शरीरसामार्थ्याचा जो ऱ्हास होत चालला आहे तो थांबवून त्यांबाबत आपली स्थिती कशी सुधारेल याचे प्रयत्न हवेत.

या सर्व गोष्टी आपोआप होणार नाहीत, तर त्या घडून येण्यासाठी बुद्धिपूर्वक प्रयत्न हवेत.

वृद्धांच्या हातून काही सुधारणा मुळीच होणार नाहीत. उदा. पुनर्विवाह, तरुण सुशिक्षितांनी याबाबत पुढाकार घेतला पाहिजे. तरुणांनी बालविवाहाची चाल बंद होण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. बालविवाहाची चाल बंद झाली, तर पुढील गोष्टी घडून येतील. तरुणांना ज्ञानार्जन व विद्यासंपादनाला अधिक काळ मिळेल.

त्यांची उद्योगप्रियता वाढीस लागेल. स्त्रियांनाही विद्यार्जनासाठी अधिक काळ विवाहापूर्वी मिळाल्याने त्यांचे संसार अधिक चांगले चालविण्यासाठी त्या सक्षम होतील.

आगरकरांनी काही संस्थांची नावे सुचविली आहेत, त्या अशा : डेक्कन कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज , सायन्स कॉलेज पुणे, एल्फिन्स्टन कॉलेज, फ्रीचर्च कॉलेज, मुंबई. या सर्व संस्थांमधील सुजाण, सुविचारी व प्रौढ विद्यार्थ्यांनी बालविवाह प्रतिबंधक अशा राष्ट्रहितकर कार्यात पुढारीपण घ्यावे म्हणजे अन्य लोक त्यांचे अनुकरण करून देशहिताच्या कार्याला वेग येईल.

वरील सर्व उदाहरणांवरून असे दिसून येईल की आगरकरांची 'सुशिक्षित' शब्दाची व्याख्या व्यापक होती. सुशिक्षित माणूस हा समाजाचा एक जबाबदार घटक असेल आणि समाजाचे सारथ्य त्याने करावे असे आगरकरांना वाटते. पढिक पांडित्यापेक्षा किंवा निष्क्रिय वैचारिकतेपेक्षा आगरकरांना सक्रिय वैचारिकता अधिक अपेक्षित आहे.

'य: क्रियावान स पंडित:' अशी आगरकरांची सुशिक्षितांबाबत विचारधारा आहे. सुशिक्षिताने केवळ विचार करणे, केवळ उपभोग घेणे किंवा केवळ काबाडकष्ट करीत राहणे आगरकरांना अभिप्रेत नाही. विचार आणि क्रिया एक झाल्या पाहिजेत. तरुण सुशिक्षितांकडून आगरकरांच्या अपेक्षा आहेत त्या अशा की त्यांनी घेतलेल्या शिक्षणामुळे समाजात खरेखुरे परिवर्तन घडून यावे.

'जुन्या मतांच्या लोकांची सुधारणा व्हावी, कालबाह्य झालेल्या अनिष्ट व तापदायक रूढींचा त्यांनी आपण होऊन त्याग करावा असे वाटत असेल तर ज्या शिक्षणामुळे व परिस्थितीमुळे आपले विचार परिवर्तन घडले ते शिक्षण व ती परिस्थिती त्यांना लाभेल असा नेटाचे प्रयत्न करायला हवा.'

तरुण सुशिक्षितांना आगरकर आवाहन करतात तेव्हा त्यांना, बालविवाहाला प्रतिबंध करून स्त्रियांनी व पुरुषांनीही खऱ्या अर्थाने विद्यार्जन करून आपल्या आयुष्याची घडी नीट बसविण्यास मदत करावी व समाजाचा रथ पुरोगामी पद्धतीनेच चालविण्यास सहाय्य करावे ही अपेक्षा आहे.

### स्त्रीशिक्षण

सुधारणावादी आणि सुधारकाग्रणी आगरकर हे स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते होते. स्त्रियांचे शिक्षण झाल्याशिवाय आपल्या समाजाची स्थिती सुधारणार नाही अशी त्यांची खात्री होती. आपल्या सामाजिक विचाराचा एक महत्त्वाचा पैलू म्हणून आगरकरांनी स्त्री शिक्षणाचा सतत पुरस्कार केला. त्यांच्या स्त्री शिक्षणविषयक निबंधामध्ये खालील विषयांची चर्चा आहे.

स्त्री शिक्षणाची आवश्यकता; स्त्रियांना उच्च शिक्षण द्यावे किंवा नाही; स्त्रियांना चरितार्थ संपादनासाठी शिक्षण द्यावे किंवा नाही; सहशिक्षण.

या सर्व विषयांच्या अनुषंगाने आगरकरांनी स्त्री शिक्षणविषयक काही मूलभूत विचार मांडले आहेत. आगरकरांचा पुरोगामी दृष्टिकोण हा केवळ स्त्रीशिक्षणापुरताच मर्यादित नव्हता, तर स्त्रीशिक्षण हे संपूर्ण समाजाच्या प्रगतीच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे व उपयुक्त साधन आहे इतक्या व्यापकतेने त्यांनी स्त्रीशिक्षणाचा विचार केला आहे.

**स्त्रियांच्या शिक्षणाची आवश्यकता** – सक्तीच्या शिक्षणासंबंधात आगरकरांनी लेख लिहिले, तेव्हा त्यानंतरच्या एका लेखात – मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता – आगरकर लिहितात –

'लहान मुलांच्या शिक्षणाबद्दल सरकारने जितकी सक्ती केली पाहिजे तितकी मुलींच्या शिकण्याबद्दलही केली पाहिजे. किंबहुना मुलींच्या शिकण्याबद्दल थोडीशी अधिक केली पाहिजे.' या लेखात आगकरांनी मांडलेले मुद्दे सारांशरूपाने असे –

मुलांपेक्षाही मुलींना शिक्षण विशेष आवश्यक आहे. ज्या स्त्रीवर अपत्यसंगोपनाचे जबाबदारीचे काम आपण सोपवितो, तिला अक्षरशत्रू असू देणे अत्यंत अहितकारक आहे. यासाठी आगरकर सोल्जरांच्या कवायतीचे उदाहरण देतात. प्राथमिक शिक्षण झालेले व प्राथमिक शिक्षण न झालेले या दोघांनाही कवायतीचे शिक्षण दिले तर ज्यांचे प्राथमिक शिक्षण झाले आहे, ते लोक अधिक चांगली कवायत करतात. व्यवस्थित रीतीने हातपाय हलविण्याच्या कामात प्राथमिक शिक्षण एवढे परिणामकारक ठरते, तर अपत्यसंगोपनाबाबत ते अधिक परिणामकारक व अधिक हितकारक होईल.

स्त्री शिक्षणाचे विरोधक प्रत्यक्ष परिणामांची खात्री करून घेऊन बोलत नाहीत. ते अनुमानांवर आधारित विरोध करतात. प्रत्येक मुलीस व मुलास चौदाव्या वर्षापर्यंत कोणाकडूनतरी अमुक ज्ञान प्राप्त झाले आहे, हे पाहण्याची जबाबदारी सरकारने व संस्थांनी उचलावी.

सार्वजनिक शिक्षणाची कल्पनाही अगदी अलीकडची असल्यामुळे कोणत्याही जुन्या राष्ट्रात स्त्रियांच्या शिक्षणाकडे लोकांचे मन गेले नाही. प्राचीन काळातील काही उल्लेखांवरून भरतखंडात स्त्री शिक्षणाचा परिपाठ होता असे म्हणणे म्हणजे झांशीच्या राणीच्या उदाहरणावरून हिंदुस्थानातल्या सर्व स्त्रिया लढाऊ होत्या असे म्हणणे आहे. सर्व देशांतील सामान्य लोकांच्या स्त्रिया अशिक्षित असत. अपवाद फक्त स्पार्टन लोकांचा. स्पार्टामध्ये हरेक प्रकारचे शिक्षण देण्याचा परिपाठ होता.

आपल्या हाती सत्ता असून अज्ञानी न राहणे आणि स्त्रियांस सज्ञान होऊ

देणे इतकी परोपकारबुद्धी पुरुषांच्या हृदयात नाही. पुरुषांप्रमाणे स्त्रियांना ज्ञानमंदिराची द्वारे आज ना उद्या खुली करून द्यावी लागणार.

याच निबंधाचा उपसंहार सयाजीराव महाराजांसंबंधी लिहून केलेला आहे. मुलांच्या शिक्षणाप्रमाणेच मुलींच्या शिक्षणाबाबतही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा बडोदा संस्थानात सयाजीराव महाराजांनी करावा असे आगरकर सुचवितात. त्याचप्रमाणे उच्च कुळातल्या मराठ्यांनी आजपर्यंत आपल्या स्त्रियांस गोषात कोंडून घातले आहे, ही वस्तुस्थिती आगरकर निदर्शनास आणतात.

या निबंधात आगरकरांनी स्त्री शिक्षणाची परंपरा, इतिहास व त्याची आधुनिक काळातील आवश्यकता यांचे विवेचन केले आहे. आगरकरांनी प्राचीन काळात स्त्रीला शिक्षणाची संधी फारच थोडी उपलब्ध होती असे म्हटले आहे. पण वैदिक वाङ्मयात अध्ययनाचे बाबतीत स्त्रिया व पुरुष असा भेदभाव केलेला आढळून येत नाही. अथर्ववेदात ब्रह्मचर्य व वेदाध्ययन यांच्या सहाय्याने मुलगी अनुरूप पती प्राप्त करून घेत असल्याचा महत्त्वपूर्ण उल्लेख आहे. अर्थातच आगरकरांच्या म्हणण्याप्रमाणे अशा स्त्रियांचे प्रमाण अत्यंत अल्प असेल तर त्याचा फारसा विचार करण्याचे कारण नाही. त्यानंतर स्त्री जीवनाच्या सामाजिक दर्जाला उतरती कळा लागली आणि मध्ययुगात तर स्त्री जीवन विलक्षण हलाखीचे बनले. एकोणीसाव्या शतकापर्यंत सतीची चाल, बालविवाह, जरठबाला विवाह, केशवपन इ. घातक रूढी चांगल्याच आकाराला आल्या होत्या. आणि त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाची दारे बंद केली होती. अलीकडच्या काळात स्त्री शिक्षणाचा सुरूवातीचा प्रयत्न अमेरिकन मिशनऱ्यांनी केला. मुलींसाठी पहिली भारतीय शाळा १८२४ मध्ये त्यांनी मुंबईत सुरु केली. इंडियन एज्युकेशन कमिशनने १८८२-८३ मधील समाज जीवनाचा आढावा घेऊन असे सांगितले की त्या काळातही स्त्री शिक्षणाची अवस्था फारच मागासलेली होती. स्त्री शिक्षण बाल्यावस्थेत होते. स्त्री शिक्षणाबाबत दुजाभाव दाखविला होता.

स्त्री शिक्षणाची वाटचाल अशी संथगती सुरू होती. या पार्श्वभूमीवर आगरकरांचे विचार हे प्रेरणादायी आहेत.

**स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण व एकत्र शिक्षण** – स्त्रियांना व पुरुषांना एकच शिक्षण द्यावे का आणि एकत्र शिक्षण (सहशिक्षण) द्यावे का ? अशा दोन प्रश्नांची चर्चा या निबंधात केली आहे.

स्त्री पुरुषांना एकत्र शिक्षण दिल्यामुळे कित्येक पुरुषांना घरी बसून स्त्रियांची म्हणून समजली जाणारी कामे.. धुणी भांडी घरकाम वगैरे करावी लागतील ही समजूत चुकीची आहे. अशा प्रकारची कामे स्त्रियांनीच करावीत हा ईश्वरी नियम

नाही. प्रत्येक स्त्रीला किती मुले व्हावीत यावर बंधन घातले पाहिजे. सध्या स्त्रियांना जी मुले होतात ती त्यांच्या संतोषाने होतात असे नाही. विवाहाच्या कामी स्त्री पुरुषांची संमती जितकी आवश्यक तितकीच ती विवाहाच्या अंमलातही दृष्टीस पडली पाहिजे. पण यासाठी... स्त्रियांवरील सांततिक विपत्ती टाळण्यासाठी ज्या प्रकारचे शिक्षण पुरुषांना मिळते त्याच प्रकारचे मुबलक शिक्षण स्त्रियांना मिळाले पाहिजे.

स्त्रियांना कोणते शिक्षण द्यावे याबाबत मतभेद पुष्कळ आहेत. लिहिणे, वाचणे व हिशेब करणे या तीन गोष्टी सामान्य मुलांप्रमाणे साऱ्याच मुलींना शिकविणे आवश्यक आहे. स्त्रियांना प्राथमिक शिक्षणापुढे शिक्षण न देता प्रपंचविज्ञानास उपयोगी पडेल असेच शिक्षण द्यावे अशा प्रकारचा ज्यांचा आग्रह असतो त्यांचे ते मत आगरकरांना मान्य नाही.

स्त्रियांची व पुरुषांची कामे वेगवेगळी आहेत म्हणून त्यांना वेगळे शिक्षण द्यावे, वेगळा अभ्यासक्रम असावा हे मत आगरकरांना मान्य नाही. मेंदू सर्वांनाच आहे. कौशल्ये स्त्रियांकडेच आहेत व पुरुषांकडे नाहीत असे होत नाही. मुलांना व मुलींना हव्या त्या शाळेत जाऊन हव्या त्या प्रकारचे शिक्षण घेऊ देणे अत्यंत आवश्यक आहे.

स्त्री पुरुषांच्या शिक्षणासंबंधी बरीच मतमतांतरे आहेत. आगरकरांच्या वेळेस, आगरकरांच्या समकालीनांनी अशी मते मांडली आहेतच. १९४६ साली भरलेल्या अखिल भारतीय महिला परिषदेने स्त्रियांच्या वेगळ्या शिक्षणाबाबत काही शिफारसी केल्या होत्या.

धोंडो केशव कर्वे यांनीही अशाच प्रकारचे विचार मांडले होते. आगरकर ज्यावेळी असे म्हणतात की स्त्री पुरुषांना एकत्रच शिक्षण द्यावे तेव्हा आगरकर या सर्वांच्याही पुढे गेले आहेत असे ध्यानात येते. अर्थात मुलींना वेगळ्या प्रकारचे शिक्षण देण्यास, त्यांच्यासाठी वेगळा अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यास आगरकरांचा विरोध नाही. आगरकरांची स्त्री-शिक्षण विषयक कल्पना थोडक्यात मांडावयाची झाल्यास अशी मांडता येईल –

स्त्रिया व पुरुष यांच्यासाठी एकच अभ्यासक्रम असावा. स्त्रियांसाठी वेगळा अभ्यासक्रम असायला हरकत नाही. पण त्याचवेळी खास स्त्रियांसाठी असलेला वेगळा अभ्यासक्रमच घेतला पाहिजे असे बंधन स्त्रियांवर नसावे. स्त्रियांना अभ्यासक्रम निवडण्याची मुभा असावी.

स्त्री पुरुष समानतेसंबंधी आगरकरांनी मांडलेली उपपत्ती अन्वर्थक आहे. ते म्हणतात–

"स्त्रियांच्या संबंधाने पुरुषांस पॅट्रिशियन्स आणि पुरुषांच्या संबंधाने स्त्रियांस

प्लिबियन्स म्हणण्यास काही हरकत नाही. पण ज्या प्रमाणे जुन्या रोमन लोकांतील हा विलक्षण स्वामी-सेवक संबंध हळूहळू लयास गेला त्याप्रमाणे स्त्री पुरुषांतील सेव्यसेवक संबंध कालांतराने नाहीसा होणार आहे. पुरुषांची कामे रोमन पॅट्रिशयन्स म्हणजे उच्च कुळातील लोक करीत असत. सध्या बायकांस जी कामे करावी लागतात ती तेथील दासवर्ग करीत असे.''

रोमन लोकांची प्राथमिक स्थिती सुधारली. ते जसजसे उन्नतावस्थेला जाऊ लागले तसतसा हा स्वामी सेवक संबंध कमी होत जाऊन अखेरीस बुध्दीने, अनुभवाने व कर्तबगारीने जे श्रेष्ठ ठरले त्यांना योग्यतेप्रमाणे अधिकार पुढे मिळू लागले. प्लिबियन्स व पॅट्रिशियन्स हा भेद पुढे नष्ट झाला. त्याच प्रमाणे स्त्री पुरुषांसही ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे अधिकार प्राप्त होऊ लागतील असे आगरकरांचे मत आहे. या सर्व विवेचनावरून असे ध्यानात येईल की 'शिक्षणाबाबत संधीची समानता' हा आगरकरांच्या विचाराचा पाया आहे.

**सहशिक्षण** – स्त्री पुरुषांना एकच शिक्षण द्यावे या मताबरोबरच सहशिक्षणाविषयी, एकत्र शिक्षणाविषयी आगरकर आपले विचार मांडतात.

स्त्री पुरुषांचा मिश्र समाज अनेक कारणांमुळे आपल्याला नापसंत वाटतो. पण हा केवळ दुराग्रह आहे. स्त्री पुरुषांचे पाऊल वाकडे न पडणे यात समाजाचे हित आहे. पण त्यासाठी बायकांना मागील दारी कोंडून घालण्याची आवश्यकता नाही. स्त्रियांचा सहवास जितका अधिक घडेल तितक्या असभ्यपणाच्या खोडी कमी होतील. आणि सभ्यता अधिक वाढीस लागेल. ज्या अर्थी स्त्री पुरुषांचा आयुष्यक्रम अगदी वेगळा आहे त्याअर्थी त्यांना भिन्न शिक्षण भिन्न स्थळी दिले गेले पाहिजे हा केवळ दुराग्रह आहे.

एकत्र शिक्षणाचे शत्रू पुढील तीन मुद्यांवर भांडतात–

स्त्री पुरुषांतील नैसर्गिक भेद, मुलांच्या दांडग्या वर्तनाचा मुलींच्या मर्यादशील वर्तनावर होणारा परिणाम, अल्पवयात मुले व मुली एकत्र आली तर त्यांची विषयवासना लौकर जागृत होईल.

एकत्र शिक्षणाचे, सहशिक्षणाचे भोक्ते म्हणतात–

मुलांना व मुलींना एकत्र शिकविल्याने मुलांना धाक लावणे फार सोपे जाते, मुलांचा हट्टीपणा, दांडगेपणा, उध्दटपणा मुलींच्या सान्निध्यामुळे कमी होतो, मुलगे व मुली एकत्र वागल्याने त्यांच्या विषयवासनेवर अपायकारक परिणाम न घडता उलट त्या शांत व गंभीर होतात.

आगरकरांनी आपल्या निबंधात सहशिक्षणाचा पुरस्कारच केला आहे. एकत्र शिक्षण देण्याने मुले व मुली यांच्या विकासात कोणताही अडथळा येणार नाही.

उलट एकत्र वागल्यामुळे व वाढल्यामुळे त्यांचा मानसिक विकास होईल असे आगरकरांचे मत आहे.

पाश्चात्य विचारवंतांमध्ये प्लेटो या विख्यात तत्त्ववेत्त्याने सहशिक्षणाचा व एकत्रित अभ्यासक्रमाचा पुरस्कार केला आहे ही प्रथमदर्शनी आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट असली तरी प्लेटोच्या जीवनविषयक आणि शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाशी ती सुसंगत आहे. शिक्षणाच्या बाबतीत प्लेटोने मुले व मुली असा भेद न करता सारखाच अभ्यासक्रम नेमून दिला होता. इ. स. पू. ५व्या शतकात प्लेटोने शैक्षणिक बाबतीत स्त्री पुरुषांत समानता मानली होती. आगरकर अशा समान शिक्षणपद्धतीचे पुरस्कर्ते आहेत.

आपल्या विवेचनात आगरकरांनी सहशिक्षणाचे विरोधक व सहशिक्षणाचे पुरस्कर्ते या दोघांचाही परामर्श घेतला आहे. सहशिक्षणाच्या विरोधकांचे म्हणणे आगरकरांना मान्य नाही. स्त्रियांना आणि पुरुषांना वेगवेगळे ठेवण्याने व वेगळे वावरू देण्यानेच अनपेक्षित अशा विकृती निर्माण होतील असे आगरकरांचे स्पष्ट मत आहे. यासाठी ते अमेरिकन लोकांचा हवाला देतात. एकत्र शिक्षण देण्याने चांगला परिणाम घडेल असा युरोपियन लोकांचा हवाला देतात. एकत्र शिक्षण देण्याने चांगला परिणाम घडेल अशी युरोपियन लोकांना खात्री नव्हती. अमेरिकन लोकांनाही ही शंका बरीच वर्षे होती. पण प्रत्यक्ष अनुभवावरून अमेरिकन लोकांच्या शंकेचा परिहार झाला असे आगरकर म्हणतात. आगरकरांच्या सहशिक्षणविषयक विचारांना मानसशास्त्रीय बैठक आहे व त्यांच्या समाजसुधारणाविषयक व स्त्रीशिक्षणविषयक अन्य मतांशी त्यांचे हे मत पूर्णपणे सुसंगत आहे.

**स्त्रिया आणि उच्च शिक्षण** – ज्या काळात एकूणच शिक्षणापासून स्त्रिया वंचित होत्या त्या काळात स्त्रियांच्या उच्च शिक्षणाचा प्रश्नही उद्‌भवत नव्हता. उच्च शिक्षणाची मिरासदारी केवळ पुरुषांचीच, अशी समजूत होती. ‘ स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचे शिक्षण द्यावे किंवा नाही ’ या प्रश्नाची आगरकांनी चर्चा केली आहे.

संपत्ती, अधिकार व विद्या ही ज्यांना प्राप्त होतात त्यांना ती आपणच बळकावून बसावे असे वाटू लागते. सुधारलेल्या राष्ट्रांना असे वाटू लागले आहे की झाडून साऱ्या स्त्री-पुरुष-मुलांना आणि मुलींनाही प्राथमिक शिक्षण मिळालेले असावे. आपल्या देशात मात्र अजून तसे वाटावयाचे आहे. ब्राह्मणेतर जातीच्या प्रत्येक माणसाला शिक्षण मिळणे आवश्यक आहे. ते होण्यास बराच काळ लोटेल. त्यानंतर स्त्रीशिक्षणाचा विचार अवश्य येतो. मुलींना शिक्षण दिले पाहिजे याबाबत हळूहळू लोकमत तयार झाले आहे. पण मध्यम प्रतीचे व वीरष्ठ शिक्षण (उच्च शिक्षण) स्त्रियांस द्यावे किंवा नाही याबाबत चर्चा निघाली की विरोध होतो. स्त्रियांनी व

पुरुषांनी पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणे करावा, पाहिजे तितकी विद्या संपादावी, पाहिजे त्या परीक्षा द्याव्या. पदव्या मिळवाव्या, पाहिजे तेव्हा लग्न करून हवा तसा संसार करावा याविषयी कालांतराने मोकळीक मिळणार आहे याविषयी शंका नाही.

वरिष्ठ प्रतीचे शिक्षण स्त्रियांना देण्यापूर्वी विवाहकालात व विवाह पध्दतीत बराच फरक होणे आवश्यक आहे. कारण स्त्रिया संसार, अपत्य-संगोपन या चक्रात बऱ्याच गुरफटलेल्या असतात.स्त्रियांचा सासुरवास बराच कमी झाल्याशिवाय त्यांना उच्च प्रतीचे शिक्षण सुलभतेने घेणे शक्य होणार नाही.

स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचे शिक्षण द्यावे किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी आपण त्यांचा विवाहकाल वाढविण्यास तयार होणार किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर देणे आवश्यक आहे.

आगरकरांनी स्त्रियांच्या उच्च शिक्षणाविषयी व्यक्त केलेल्या या विचारांत आपणाला आगरकरांची दूरदृष्टी व त्यांचा स्त्रीशिक्षणविषयक आशावाद अनुभवास येतो. याचवेळी स्त्रियांना उच्च शिक्षण देण्यात ज्या अडचणी उद्‌भवतात त्यांचा समाजशास्त्रीय विचार आगरकर करतात असे दिसून येते.

ऋतुप्राप्ती होण्यापूर्वीच स्त्रीचा विवाह झाला पाहिजे आणि ऋतुप्राप्ती होताच प्रजननाला सुरूवात झाली पाहिजे या परंपरागत रूढ समजुतीमुळे प्राथमिक शिक्षण घेता येत नाही. कारण ती संसार, बाळंतपणे, अपत्य-संगोपन, अन्य प्रापंचिक जबाबदाऱ्या या चक्रात इतकी गुंतून राहते की तिला यातून बाहेर पडण्यास क्वचितच वेळ मिळतो. या सर्व परिस्थितीवर आगरकर एकच तोडगा सुचवितात. तो म्हणजे स्त्रियांचा विवाहकाल लांबविणे.

हा विचार एका अर्थाने अत्यंत क्रांतिकारक विचार होता. रुढ समजुतींना धक्का देणारा होता. पण या ठोस उपायाशिवाय स्त्रियांना उच्च शिक्षणाला फुरसद मिळणार नव्हती म्हणून आगरकर हा उपाय सुचवितात.

स्त्रिया व पुरुष यांना उच्चशिक्षणाबाबत समान संधी मिळावी असे वाटत असेल तर स्त्रियांचा शिक्षणकाळ वाढविणे, म्हणजेच त्यांचा विवाहकाळही वाढविणे होय.

**स्त्रियांसाठी चरितार्थ-संपादक-शिक्षण** – मुंबईच्या काही वृत्तपत्रांत त्या काळी एक बातमी आली. बातमी अशी होती : मुंबईस कोणी एक माणूस मेला तेव्हा दुःख असह्य होऊन त्याच्या पत्नीने जीव दिला. या बातमीवर टीकाटिप्पणी करताना खरी साध्वी कोण, कमी पतिव्रता कोण असे प्रश्न काही पंडितांनी उभे केले. या चर्चेचा परामर्श घेतांना आगरकर म्हणतात की–

"आजच्या स्थितीत एकाने दुसऱ्याकरता मरण्यास तयार होणे किंवा मरणे

हे कितीही प्रशंसनीय असले तरी एकाला दुसऱ्याबद्दल कोणत्याही कारणाने मरावे लागणे किंवा मरावेसे वाटणे यात काहीतरी उणेपणा आहे असे विचारांती कबूल करणे आवश्यक आहे.''

ही स्थिती आदर्श नाही अशी टीका आगरकर करतात. एकाने दुसऱ्याकरिता सहज मरणे इष्ट असेल तर स्त्री मेल्यानंतर पुरुषानेही तिच्याबद्दल प्राण सोडावा हे इष्ट असे आगरकर सांगतात.

पुरुष निधनानंतर स्त्री सहगमन करते, पण स्त्री निधनानंतर पुरुष सहगमन करीत असल्याचे उदाहरण नाही अशी टीका आगरकर करतात तेव्हा स्त्रियांच्यासंबंधी समाजाचा एकांगी दृष्टिकोण त्यांना दाखवायाचा असतो. याचे कारण मुळाशी जाऊन शोधण्याचा आगरकर प्रयत्न करतात. ही रुढी कोणत्या कारणाने आली असावी, ती उत्पन्न होण्यास कोणते सामाजिक घटक कारणीभूत झाले असावेत याचा आगरकर शोध घेतात तेव्हा त्यांना दोन कारणे सापडतात–

स्त्रियांचे परावलंबित्व. स्वचरितार्थ हटकून चालविता येईल अशा प्रकारचा कोणताही प्रशस्त धंदा त्यांस न येणे.

हे दोन्हीही घटक परस्परपूरक आहेत. स्त्रिया स्वावलंबी झाल्या पाहिजेत. त्यांचे परावलंबित्व संपले पाहिजे. त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता आले पाहिजे. तसे व्हावे असे वाटत असेल तर स्वत:चा चरितार्थ चालविण्याचा एखादा धंदा त्यांना आला पाहिजे. शिवाय तो धंदा प्रशस्त हवा असे आगरकर सांगतात.

हे सुचविताना आगरकरांनी स्त्रियांची सामाजिक स्थिती, त्यांची प्रकृती, स्वभाव त्यांना ज्या समस्यांना सामोरे जावे लागेल त्यांचे स्वरूप या सर्व घटकांचा सर्वांगीण विचार केलेला आहे. म्हणूनच ते 'प्रशस्त' धंद्याची शिफारस करतात.

सहगमनाची दुष्ट चाल बंद व्हायची असेल तर 'स्त्रियांचे शिक्षण' हाच त्यावर मूलभूत उपाय आहे. चरितार्थ-संपादनाचे शिक्षण ही एक आवश्यक बाब आहे असे आगरकर सांगतात.

या निबंधात चरितार्थ संपादनाचे कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे असे मात्र आगरकरांनी सुचविलेले नाही. शिक्षिका, परिचारिका, सेविका, कारकून असा कोणताही प्रत्यक्ष व्यवसायाचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. त्यांनी सुचविलेल्या उपायांबाबत ही एकच त्रुटी वाटते. या उपायाचे अधिक स्पष्टीकरण त्यांनी केले असते तर ते समाजाला अधिक मार्गदर्शक झाले असते. केवळ 'प्रशस्त धंदा' हवा एवढेच म्हणून थांबतात. या 'प्रशस्त'पणाचे विश्लेषण करून अधिक खुलासा झाला असता तर आगरकरांच्या या विचाराला अधिक घाटदार स्वरूप प्राप्त झाले असते.

**शिक्षणाबद्दल सक्ती** – इंग्रजी राज्य या देशात सुस्थिर झाल्यानंतर विविध प्रकारच्या शैक्षणिक प्रश्नांना तोंड फुटू लागले. त्यातील एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे 'सक्तीचे शिक्षण' हा होय. समाजाची वा राष्ट्राची प्रगती व्यक्तीच्या व समाजाच्या शिक्षणावरच अवलंबून असते. या दृष्टीने कमीतकमी, किमान पातळीपर्यंत शिक्षण सक्तीचे करणे आवश्यक असते. "शिक्षणाबद्दल सक्ती करावी काय?" या आपल्या निबंधात जे विचार आगरकरांनी व्यक्त केले आहेत ते असे–

१८४७ साली हौस ऑफ कॉमन्स सभेत लॉर्ड मेकाले यांनी लोकशिक्षणावर जे भाषण केले त्यात त्यांनी अनेक लोकांचा हवाला देऊन लोकांना शिक्षण द्या असे सांगितले. याचवेळी इंग्लंडमध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे काय याबद्दल वाद सुरु होते. मेकॉले हे अस्तिपक्षाचे होते. लोकांना किमान शिक्षण सक्तीचे करणे हे सरकारचे कर्तव्यच आहे असे मेकॉले यांचे मत होते. युरोपातील बहुतेक देशांनी लोकशिक्षण हे सरकारचे कर्तव्य मानून ते अमलात आणण्यासाठी निरनिराळ्या प्रकारचे कायदे केले आहेत. रशियाचा अपवाद वगळता मुसलमानी तुर्कस्तानातसुद्धा यासंबंधीचा कायदा झाला.

आमच्या देशात साऱ्या विद्येचा मक्ता ब्राह्मण जात बळकावून बसल्यामुळे या प्रश्नाइतका दुसरा महत्त्वाचा प्रश्न नाही. लोकशिक्षणाशिवाय आमच्या देशाची स्थिती सुधारणार नाही.

लोकशिक्षण म्हणजे उच्च प्रतीचे किंवा धंदेशिक्षण नव्हे. लोकशिक्षण म्हणजे लहानापासून थोरांस व गरीबापासून श्रीमंतास नित्याच्या व्यवहाराला उपयोगी पडणारे शिक्षण. लोकशिक्षणाचा संबंध कोणत्याही धर्ममताशी नाही किंवा लोकशिक्षणापासून कोणत्याही धंद्याचे ज्ञान प्राप्त होत नाही. लोकशिक्षणाविषयी सक्ती करणे म्हणजे नेमके काय? अमुक एक शिक्षण अमुक एक वयाच्या आत प्रत्येक मुलीस व मुलास मिळण्याची खबरदारी त्याच्या आईबापांनी व पालकांनी घेतलीच पाहिजे, न घेतल्यास ते अमुक एक दंडास पात्र होतील असा कायदा करणे. स्पार्टन व अथीनियन लोकांस लोकशिक्षणाची थोरवी चांगली समजली होती. म्हणून त्यांनी सर्व प्रतीच्या लोकांस प्राथमिक शिक्षण मिळण्याबद्दल फार वाखाणण्यासारख्या सोयी केल्या होत्या. आमच्या पूर्वेस आणि पश्चिमेस ज्ञानरवी कमीअधिक तेजाने प्रकाशू लागला असून आम्ही मात्र अज्ञानाच्या गाढ तिमिरात चाचपडत आहोत. यासाठी शिक्षण सक्तीचे करणे आवश्यक आहे.

सक्तीच्या शिक्षणाबाबत आगरकरांनी ऐतिहासिक दाखले देऊन आपले विचार व्यक्त केले आहेत. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत व पातळीपर्यंत शिक्षण सक्तीचे करून इष्ट तो परिणाम साधणे हेच विकसनशील राष्ट्रांच्या दृष्टीने हितकर असते.

शिक्षणाबाबत सक्ती करणे हे खरे तर शैक्षणिक तत्त्वज्ञानाला मान्य नाही. बर्ट्रांड रसेल सक्तीच्या शिक्षणाबाबत विवेचन करताना म्हणतात–

"Another effect of compulsion in education is that it destroys originality and intellectual interest."

ज्याला शिक्षणाची इच्छा नाही त्याला शिकण्याची सक्ती करून त्याचे विपरीत परिणाम घडतील असे रसेल सांगतात. पण समाज सुशिक्षित व्हायला हवा असेल आणि त्यातील घटकांना नैसर्गिकरीत्या शिक्षण घेता येत नसेल तर सक्तीच्या शिक्षणपद्धतीनेच हवा तो परिणाम साधावा लागेल. वर्गातील उपस्थिती आवश्यक ठेवावी लागेल असे रसेल यांनीच सांगितले आहे.

आगरकरांचे मत रसेल यांच्या या मताशी जुळणारे आहे. सक्तीच्या शिक्षणाबाबत आगरकर आग्रह धरतात तेव्हा कोणतेही उच्च शिक्षण, कोणतेही व्यावसायिक शिक्षण त्यांना अभिप्रेत नाही. त्यांना अभिप्रेत आहे ते किमान शिक्षण.

वाचता येणे, लिहिता येणे, हिशेब करता येणे, हे किमान शिक्षणाचे तीन घटक आहेत.

व्यक्तीला त्याच्या भोवतालच्या परिस्थितीशी जुळते घेता यावे, त्याला किमान गोष्टींचे ज्ञान व्हावे, व्यवहारात त्याचे कुठे अडू नये यासाठी आवश्यक असलेले शिक्षण लोकशिक्षण; व तेवढेच शिक्षण सक्तीचे करावे असे आगरकर सांगतात. लोकशिक्षणाशिवाय सामाजिक व राष्ट्रीय प्रगती साधण्यास अन्य कोणताही पर्याय नाही असे आगरकरांचे मत होते.

लोकशिक्षण-प्राथमिक शिक्षण-सक्तीचे करावे असे नुसते सांगून आगरकर थांबलेले नाहीत. लोकशिक्षण ही सरकारचीच जबाबदारी आहे, किंबहुना सरकारचे ते कर्तव्य आहे असे आगरकर सांगतात.

आगरकरांनी ज्या काळात हा लेख लिहिला तो काळ पारतंत्र्यातला होता. सरकार कोणत्याही स्वरुपाचे असले आणि सत्ता कोणाचीही असली तरी किमान शिक्षणाबाबत त्या सरकारने जबाबदारी उचलायला हवी. कारण शाळा ही संस्था अन्य अनेक संस्थांवर परिणाम करणारी असते.

"Whatever the form of Government, its essential function of decision will bring formal education under its jurisdiction for the simple reason that education is itself a social institution affected by and affecting all other institutions."

शिक्षणतज्ज्ञ ब्राउडी यांच्या वरील वचनाप्रमाणे कोणत्याही शासनाची, सरकारची ही जबाबदारीच आहे. त्यांचा हेतू कोणताही असेल, पण शिक्षण स्वतःच्या

अधिकाराखाली आणि सक्तीचे करून इष्ट तो परिणाम साधणे आवश्यक आहे.

आगरकरांनी आपल्या लेखाच्या आरंभीच तीन ख्यातनाम व्यक्तींचे याबाबत विचार उदधृत केले आहेत–

पेनसिल्व्हानिया प्रांताचा प्रस्थापक क्वेकर विल्यम् पेन, अमेरिकेस स्वातंत्र्य देणारा जॉर्ज वॉशिंग्टन, आणि अमेरिकेत लोकसत्ताक राज्याचा मजबूत पाया घालणारा जेफरसन या तिघांनीही आपल्या कार्याचे मार्ग विशद करताना 'लोकशिक्षण' ही अत्यंत आवश्यक बाब असल्याचे म्हटले होते. तो संदर्भ देऊन आगरकर शिक्षणाबद्दल सक्ती असावी असे मत आग्रहाने मांडतात.

**प्राथमिक शिक्षण : सरकारचे कर्तव्य** – लोकशिक्षणाबाबत विवेचन करताना ते 'सरकारचे कर्तव्य' असे आगरकर सांगतात आणि त्यासाठी त्यांनी एक स्वतंत्र लेख लिहिला आहे. 'प्राथमिक शिक्षण सरकारचे अवश्य कर्तव्य आहे.' यासंबधी त्यांचे विवेचन असे–

सरकारने काय करावे आणि काय करू नये याविषयी युरोपात पुष्कळ मतभेद असले तरी 'राजा कालस्य कारणम्' या तत्त्वाचे आशिया खंडातील लोक परमभक्त आहेत. त्यामुळे राजाने लोकांस प्राथमिक शिक्षण अवश्य दिले पाहिजे असे प्रतिपादणे या कल्पनेला धरून योग्यच होईल. लोकांच्या मालमत्तेचे आणि जीविताचे संरक्षण करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य असेल तर ही गोष्ट घडवून आणण्यास लोकशिक्षणासारखे प्रशस्त साधन नाही.

पाश्चिमात्य अथवा पौर्वात्य, दोन्ही प्रकारच्या लोकांच्या समजुतीप्रमाणे लोकांस थोडेबहुत शिक्षण देण्याची जबाबदारी कोणत्याही शास्त्यास वाजवी रीतीने टाळता येणार नाही. निरनिराळ्या प्रकारच्या विपत्ती आणि अज्ञान यांचेमुळे लोकजीवन संकटग्रस्त झालेले असते तेव्हा अज्ञानाचा नाश करून लोकजागृती होणे हाच त्यावर उपाय. अशी लोकजागृती लोकशिक्षणानेच होते.

**आक्षेपकांचे आक्षेप** – शिक्षणापासून किंवा ज्ञानार्जनापासून हटकून चांगले परिणाम होतात असे म्हणता येणार नाही. असे परिणाम चांगले झाले तरी ते शिक्षण सरकारनेच सक्तीने दिले पाहिजे असे नाही. शिक्षण मुलांच्या आईबापांनी किंवा लोकांचे लोकांनी दिले तरी चालणार आहे. सरकारने सक्ती करण्याचे कारण नाही.

**आगरकरांचे आक्षेपकांना उत्तर** – शिक्षणाचे महत्त्व लोकांना पटले असेल, त्याचा परिणाम चांगला होतो हे ज्ञात असेल तर त्याचा आपोआप प्रसार व्हायला हवा होता. तसा तो झाला नाही. म्हणून सक्ती करावी लागणार आहे. सक्तीच्या शिक्षणाचा काळ सहा ते चौदा किंवा आठ ते चौदा वयाच्या दरम्यान असावा.

प्राथमिक शिक्षण लोकांनी दिले तर ठीकच. पण दिले नाही तर सरकारने ती जबाबदारी स्वीकारलीच पाहिजे.

जो शिक्षण संपादित नाही तो स्वत: अशिक्षित राहतो, एवढेच नव्हे तर त्याच्या अशिक्षणापासून इतरांना फार त्रास होतो. शिक्षणापासून नीती वाढत असेल किंवा नसेल. पण शिक्षणापासून जे दुसरे अनेक फायदे होतात ते मिळविण्यासाठी शिक्षण देणे आवश्यक आहे.

मानसशास्त्रविशारदांचा सिद्धांत असा आहे की ज्याची दुराचरणाकडे प्रवृत्ती आहे त्याला सुशिक्षण मिळाले तर त्याच्या हातून थोडा दुराचार घडेल. ज्याला सदाचरणाची नैसर्गिक आवड आहे त्याची ती आवड सुशिक्षणाने दुप्पट होईल. मानसिक व शारीरिक क्षीणता, दारिद्र्य, पारतंत्र्य, धर्मसंबंधाने वेड्या खुळ्या समजुती, जातिभेदासारखे हजारो पिढ्या चालत आलेले जबरदस्त निर्बंध इत्यादिकांनी गांजून, पिळून अथवा चिरडून जाऊन मरणोन्मुख झालेल्या देशास शिक्षणावाचून दुसरा तरणोपाय नाही. या निबंधात आगरकरांनी प्राथमिक शिक्षण हे सरकारचे कर्तव्य आहे या आपल्या मताचे मंडन करताना तीन पातळ्यांवर विचार केला आहे –

— प्राथमिक शिक्षण- सरकारचे कर्तव्य
— प्राथमिक शिक्षणाबाबत सक्ती
— शिक्षणाचे फायदे तोटे

यापैकी सक्तीच्या मुद्याबाबत या पूर्वीही एका निबंधात हे विचार प्रकट झाले आहेत. पण या निबंधात एक महत्त्वाचा मुद्दा आगरकर मांडतात. तो असा की न शिकणारा माणूस फक्त स्वत:च अशिक्षित राहतो असे नाही. त्याच्या अशिक्षितपणाचा त्याच्या भोवतालच्या समाजावर अनिष्ट परिणाम होतो. त्याच्या संबंधातील इतर व्यक्तींना त्याच्या अशिक्षितपणाचा त्रास होतो. शिक्षणाची जी अनेक ध्येये मानली आहेत त्यात नवसमाजनिर्मिती हे महत्त्वाचे ध्येय मानले गेले आहे. अशिक्षित माणूस हा या नवसमाजनिर्मितीच्या ध्येयमार्गावरील अडथळाच असतो.

शिक्षणाने नीती वाढते काय या प्रश्नाचाही आगरकरांनी शैक्षणिक मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून विचार केला आहे. शिक्षण आणि नीती यांचा संबंध निश्चितच आहे. शिक्षण घेतलेली काही माणसे चांगली दुराचारी आढळतील. पण शिक्षण न घेतलेल्या माणसांपेक्षा त्यांचे प्रमाण कमी असेल.

सुधारलेल्या राष्ट्रांची उदाहरणे देऊन आगरकर आपल्या राष्ट्राची स्थिती सुधारण्याचा एकमेव उपाय ' शिक्षण ' हेच सांगतात.

## शिक्षणावर करावयाचा खर्च

शिक्षण हा एका अर्थाने अनुत्पादक असा कार्यक्रम असतो तर दुसऱ्या अर्थाने तोच मोठा उत्पादक असतो. शिक्षणावर केलेला खर्च हा खर्च नसतो तर ते घातलेले भांडवल असते. याबाबत भिन्न भिन्न लोकांचे भिन्न दृष्टिकोन असू शकतात.

आगरकरांच्या काळी याबाबत सरकारी धोरणात काही बदल होताच 'लोकशिक्षणावर गदा' या लेखाच्या रूपाने आगरकरांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. "शाळांवर होणाऱ्या खर्चाचा दोन तृतीयांश भाग शाळांनी उचलावा अन्यथा शाळा बंद केली जाईल." अशा अर्थाची पत्रे तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांना पाठवली. ही एक प्रकारे लोकशिक्षणावर गदा होती. या संदर्भात आगरकरांनी विचार व्यक्त केले.

लोकशिक्षणाच्या खर्चाचा बोजा सरकार (ब्रिटिश) लोकांवरच, शिक्षणसंस्थांवरच लादत आहे ही गोष्ट उचित नाही. शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी विद्यालये, महाविद्यालये स्थापून सरकारने लोकांना गोडी लावली तोच सरकारने असे अंग काढून घेणे शिक्षणप्रसाराच्या दृष्टीने युक्त नाही.

ब्रह्मदेशात चालू असलेल्या लढाईमुळे सैन्यावरील खर्च वाढला. आणि त्या खर्चाची मिळवणी करण्यासाठी शिक्षणावरील बोजा वाढविला ही गोष्ट देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने अयोग्य आहे. काटकसर करावयाची असेल तर ती कोणत्याही खात्यात करावी. शाळा खात्यात करू नये. तसे केल्याने लोकांचे व सरकारचे पुढे बरेच नुकसान होणार आहे. सरकारी खर्चाचा विवक्षित भाग लोकशिक्षणाकडे अव्याहत लावला पाहिजे.

या निबंधात आगरकरांनी शिक्षणासंबंधी तीन महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत –

— शिक्षणावर केला जाणारा खर्च योग्य की अयोग्य ?

— शिक्षणाबाबत सरकारचे कर्तव्य

— शिक्षणावर केल्या जाणाऱ्या खर्चात कपात केल्यास होणारी हानी.

राज्य व राज्यशासन (state) ही समाजविकासासाठी अत्यंत आवश्यक असलेली बाब आहे. लोकसमुदाय किंवा लोकसंख्या हे कोणत्याही राज्याचे मुख्य घटक असतात व त्यांच्या कल्याणाची जबाबदारी राज्यावर असते. राज्य आपल्या संस्थेमार्फत, अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेमार्फत लोककल्याणासाठी, विकासाची कामे करते.

प्राचीन काळी भारतात राज्यसंस्था शिक्षणाला मदत करीत असत; पण शिक्षणाचा प्रमुख खर्च गुरूदक्षिणेच्या स्वरूपात जमा होणाऱ्या द्रव्यातून केला जात असे. धनिकवर्गाकडूनही शिक्षणासाठी अर्थव्यवस्था उपलब्ध करून दिली जात

असे. त्या काळात शिक्षण हे सार्वत्रिक स्वरूपाचे नव्हते. जीवनात गुंतागुंत नव्हती. जीवन सरळमार्गी साधे असे होते. शिक्षण अनिवार्य असल्यामुळे राज्यसंस्थेला शिक्षणात दखल घेण्याचीही आवश्यकता वाटली नसावी. ब्रिटीश राजवटीनंतर भारतात झपाट्याने औद्योगीकरण सुरू झाले. आणि उपजिविकेसाठी अन्यान्य व्यवसायांचे शिक्षण घेणे भाग पडू लागले.

अशा परिस्थितीत समाजाचा विकास, समाजाचे संवर्धन व्हावे असे वाटत असेल तर राज्यसंस्थेला शिक्षणविषयक जबाबदारी उचलावीच लागते. शैक्षणिक विकास हे लोककल्याणकारी राज्याचे अत्यंत महत्त्वाचे असे कर्तव्य मानण्यात येते. हाच विचार आगरकरांनी वरील निबंधात वेगळ्या स्वरूपात मांडला आहे. आर्थिक कर्तव्य आणि शैक्षणिक कर्तव्य अशी राज्याची शिक्षणविषयक कर्तव्ये दोन असतात. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण देऊन त्याला विकासाची संधी प्राप्त करून देणे हे राज्याचे-शासनाचे कर्तव्यच आहे. म्हणून शिक्षणावर होणारा खर्च करणे हेही राज्यशासनाचे कर्तव्य आहे. आगरकरही हाच विचार या निबंधात प्रामुख्याने मांडतात. शिक्षणसंस्थांनी स्वत:च स्वत:च्या खर्चाची जबाबदारी उचलावी अन्यथा शाळा बंद केल्या जातील अशाप्रकारे शिक्षण खात्याचा फतवा आल्यावर, हा फतवा म्हणजे लोकशिक्षणावर गदा आहे असे आगरकर लिहितात. आगरकर यासाठी अन्य देशांची उदाहरणे देतात. ज्या ज्या राष्ट्रांनी आपली प्रगती करून घेतली त्यांनी शिक्षणावर योग्य तो खर्च केलेला असल्यामुळे ती राष्ट्रे आपली प्रगती करू शकली.

हे सर्व सांगताना आगरकरांनी आपल्या देशाची परिस्थिती वर्णिली आहे. ती विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. वेड्याखुळ्या समजुती, अज्ञान, दारिद्र्य या घटकांमुळे समाज पिचून गेला आहे आणि राष्ट्र मरणोन्मुख झाले आहे असे ते म्हणतात. या मरणोन्मुख अवस्थेतून तारणारा एकच उपाय म्हणजे शिक्षण. शिक्षण हा तरणोपाय आहे. म्हणून लोकशिक्षणावर गदा आणू नये असे ते म्हणतात.

### मराठी भाषा आणि ग्रंथनिर्मिती

शिक्षणविषयक विचारांमध्ये भाषा आणि भाषांतील ग्रंथांची निर्मिती यांचा विचार अवश्य केला जातो. आगरकरांनी 'मराठीत चांगले ग्रंथ होत नाहीत' या शीर्षकाचा एक लेख लिहून आपली काही मते मांडली आहेत.

हा निबंध लिहिण्याला एक निमित्त घडले. "रिपोर्टर ऑफ दि नेटिव प्रेस" या प्रकारचे एक अधिकारी होते. त्यांचे नाव साठे. त्यांनी आपल्या अहवालात "मराठीत म्हणण्यासारखे ग्रंथ निर्माण झाले नाहीत" असे लिहून ठेवले होते. याशिवाय साठे यांनी असे मत व्यक्त केले की –

"धर्म, काम व कवन याहून नेटिव लोकांस तिसरा विषय हाती धरता

येत नाही. वरिष्ठ गणित, रसायन, यंत्रविद्या, व्यापार इ. उपयुक्त किंवा गहन विषयावर पुस्तके लिहिण्याची हौस अथवा आवश्यकता नेटिवांना वाटत नाही.''

(सरकारी अन्यान्य खात्यांचा बराच मोठा खर्च चालविण्यासाठी निरनिराळे खोटे अहवाल लिहिले जातात अशी आगरकरांची अहवाल लिहिण्याऱ्यांवर टिप्पणी आहे.)

या निबंधाची आगरकरांची लेखनशैली काहीशी उपहासात्मक आणि टोलाप्रतिटोला या स्वरुपाची आहे. त्यामुळे कोणताही मूलगामी विचार या निबंधात आलेला नाही. एकच मुद्दा आगरकरांनी सुचविलेला आहे तो असा–

युनिव्हर्सिटीत देशी भाषांचा पुन: प्रवेश झाल्याखेरीज मराठी ग्रंथ निर्मितीला सुदशा प्राप्त होणार नाही.

कोणत्याही भाषेला उन्नत अवस्था यावयाची असेल तर तिचा समावेश शिक्षणाच्या सर्व अभ्यासक्रमात सर्व पातळ्यांवर व्हायला हवा. पण आगरकरांनी ज्या काळात हा लेख लिहिला त्या काळात मुंबई विद्यापीठात मराठी भाषेला असे स्थान नव्हते. किंबहुना कोणतेच स्थान नव्हते. माध्यम इंग्रजी; मराठीचा म्हणजेच देशी भाषेचा अभ्यास नाही. अशा अवस्थेत देशी भाषेचा विकास व्हावा कसा? ग्रंथनिर्मितीसाठी आवश्यक असणारे वातावरण मुंबई विद्यापीठातील अभ्यासक्रमात वा अन्य पातळीवरही मराठीच्याबाबत मुळीच नव्हते. म्हणून आगरकरांनी हे मत प्रतिपादले की देशी भाषांचा प्रवेश युनिव्हर्सिटीत व्हावा.

या निबंधात आगरकरांनी मराठीत चांगली ग्रंथनिर्मिती का होत नाही असा प्रश्न उपस्थित केला आहे. पण त्याचे सर्वांगीण विचार करून उत्तर दिलेले नाही. श्री. साठे यांच्या अहवालातील मुद्द्यांचे खंडन एवढाच या निबंधलेखनाचा हेतू असावा. कारण शवटी या प्रश्नातूनच आणखी काही प्रश्न उपस्थित करून आगरकरांनी निबंधाचा शेवट केला आहे

''स्वतंत्र राष्ट्रांची चिन्हे काय? व महाराष्ट्रात, देशात ती आहेत की नाहीत? जो या प्रश्नाची उत्तरे बरोबर देऊ शकेल त्याला महाराष्ट्र देशात चांगले ग्रंथ का होऊ शकत नाहीत हे सहज समजणार आहे.''

शासकांनी मातृभाषांच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले पाहिजे हे त्यानंतरही, स्वतंत्र भारतातल्या अनेक विचारवंतांनी सांगितले.

"Each regional language has to be developed and its literature enriched so as it to become a fit vehicle and rich store–houses of knowledge of all Kinds. It is the duty of the government to help and encourage this development."

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी आपल्या एका भाषणात व्यक्त केलेले हे विचार

त्याकाळी आगरकरांनी आपल्या निबंधात व्यक्त केलेले आहेत.

भाषा-शिक्षण हे केवळ भाषाशिक्षणचं नसते. भाषेबरोबर संस्कृती जीवन, व्यवहार यांचेही शिक्षण आपोआपच येते. आणि ग्रंथनिर्मिती हा भाषाशिक्षणाचा अंतिम परिपाक आहे. अन्य देशांच्या इतिहासाचे दाखले देऊन आगरकर या निबंधात एवढा एकच मुद्दा व्यक्त करतात. मात्र या मुद्याचे सखोल स्पष्टीकरण त्यांनी केलेले नाही हेही ध्यानात येते.

**पाश्चिमात्य शिक्षण आणि धर्म** – निरनिराळ्या सामाजिक रुढींच्या प्रतिपालनासाठी व समाजसुधारणांस विरोध करण्यासाठी स्थितीवादी समाज निरनिराळी अस्त्रे वापरीत असतो. आगरकरांच्या काळी पुण्यात अशा अस्त्रांपैकी बहिष्काराचे अस्त्र मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येत होते. त्याला उत्तर म्हणून आगरकरांनी 'बहिष्काराचे शुष्क अवडंबर' या नावाचा एक निबंध लिहिला. वाळीत टाकणे अथवा बहिष्कार घालणे हे नापसंतीचे व ती दर्शविण्याचे एक साधन आहे यात शंका नाही. पण बहिष्कार हा समाजसुधारणांविरोधी असेल तर त्याचा विचार अन्य संदर्भात केला पाहिजे.

हिंदू धर्मास उतरती कळा लागण्याची जी अनेक कारणे आहेत त्यापैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे पाश्चिमात्य शिक्षण आहे असे आगरकर सांगतात. या शिक्षणाने जिकडे तिकडे अश्रद्धाच करून सोडली आहे हे आगरकरांना मान्य आहे.

इंग्रजांनी आपली काही विशिष्ट धोरणे ठरविली होती. त्यांत धार्मिक बाबतीत ढवळाढवळ न करण्याचे धोरण होते. पण ते जे व्यावहारिक शिक्षण देत होते त्यामुळे आपल्या धर्मश्रद्धांची राखरांगोळी होत होती. अर्थातच मग असे हे धर्म-विध्वंसक पाश्चिमात्य शिक्षण बंद व्हायला हवे. पण तसे तर शक्य नाही. मग धर्मश्रद्धाळू लोक बहिष्काराच्या मागे लागले आणि त्यांनी स्वत:च्याच पायावर धोंडा पाडून घेतला. या गोष्टीचा समाचार घेण्यासाठी आणि सुधारणेच्या स्वाभाविक ओघाला जे लोक विरोध करीत होते त्यांचाही समाचार घेण्यासाठी आगरकरांनी हा लेख लिहिला.

वास्तविक या लेखात आगरकरांना पाश्चिमात्य शिक्षणाचा व विशेषत: त्यातून जे व्यावहारिक शिक्षण मिळत होते त्याचा गौरवच करावयाचा आहे. कारण या शिक्षणाने समाजसुधारणाविषयक कार्याला मदतच झाली. आंग्लविद्येच्या परिचयाने नवे प्रबोधन झाले.

इंग्रजांनी या देशाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांचे जे अनेक अधिकारी येथे कारभार पाहू लागले त्यात एल्फिन्स्टनचे नाव अग्रभागी घ्यावे लागेल. एल्फिन्स्टनच्या

शैक्षणिक धोरणात त्याची दूरदृष्टी प्रत्ययाला येते. लोकांना शिक्षण देऊन आपल्या देशाच्या कारभारात भाग घ्यायला त्यांना हळूहळू पात्र करावे असे एल्फिन्स्टनचे प्रांजळ मत होते. तरी नवे पाश्चात्य शिक्षण देतांना जुन्या धार्मिक परंपरेचा धागा तुटता कामा नये असाही त्याचा आग्रह होता. एल्फिन्स्टनचे हे धोरण यथाकाल राबविले गेले. पण पाश्चिमात्य शिक्षणाचा व्हायचा तोच परिणाम झाला. बुद्धिवादाला, बुद्धिप्रामाण्यवादाला, नवमताला हळूहळू अवसर मिळू लागला. आणि त्यामुळे परंपरावाद्यांची कोंडी झाली.

आगरकर हे स्वातंत्र्यवादी, राष्ट्रवादी होते. पण समाजसुधारणेबाबत कोणत्याही इष्ट गोष्टीचा स्वीकार करायला ते तयार होते. पाश्चिमात्य शिक्षणाने निर्माण होणारा 'भ्रमनिरास' त्यांना मान्य होता. म्हणून धर्मश्रद्धेला... अंधश्रद्धेला तडा गेला तरी पाश्चिमात्य शिक्षण स्वीकारण्यास ते तयार होते.

नवे पाश्चिमात्य शिक्षण विज्ञानाची ओळख करून देत होते. त्यामुळे धर्मश्रद्धा डळमळीत झाल्या असे काही लोकांचे म्हणणे होते. आगरकरांनीही ते म्हणणे मान्य केले. पण ती धर्मश्रद्धा म्हणजे अंधश्रद्धा होय. मुळात धर्म आणि विज्ञान यांचे वाकडे नाही. पण दोहोंचे अंतिम उद्दिष्ट कोणते? धर्म आणि विज्ञान दोघांनाही अंतिम सत्याचा शोध घ्यायचा असतो. शिक्षणही माणसाला अंतिम सत्याचा शोध घ्यायलाच मदत करते. त्यामुळे विज्ञानावर आधारित पाश्चिमात्य शिक्षणाचा पुरस्कार आगरकर करतात तेव्हा तो त्यांच्या बुद्धिवादी विचारसरणीशी सुसंगत असाच असतो.

**शिक्षण आणि समाजसुधारणा** – आगरकरांनी प्रत्यक्षपणे शिक्षणाविषयी लिहिलेल्या लेखात त्यांनी कोणत्या प्रकारचा विचार मांडला हे आतापर्यंत आपण पाहिले. आता त्यांच्या उर्वरित लेखांचा विचार करु. आगरकरांच्या एकंदर विचारसरणीचा आढावा घेतला तर त्यांचे विचार तीन प्रकारचे आहेत असे प्रामुख्याने आढळते.

समाजसुधारणा : राष्ट्रवाद; आणि बुद्धिप्रामाण्यवाद. यापैकी समाजसुधारणावाद आणि बुद्धिप्रामाण्यवाद हे परस्परपूरक आहेत.

आगरकरांच्या शिक्षणेतर विषयांवरील निबंधातूनही त्यांनी शिक्षणाला महत्त्व दिल्याचे आढळते. विषय समाजसुधारणेचा असो, पेहरावाचा असो नाहीतर कलाविमर्श असो, आगरकर शिक्षणाला महत्त्वाचे स्थान देतात असे त्यांच्या समग्र भूमिकेवरून आढळते. यासाठी काही ठळक उदाहरणे खालीलप्रमाणे. ही उदाहरणे बहुश: आगरकरांच्या समाजसुधारणाविषयक लेखातील आहेत. आगरकर लिहितात–

"आमची शिलावस्था आम्हांस पाश्चिमात्य शिक्षण मिळू लागल्यापासून बदलू लागली आहे. आजमितीस या शिक्षणाच्या टाकीचे आघात फारच थोड्यांवर

घडत आहेत. पण दिवसेंदिवस ते अधिकाधिकांवर घडू लागतील असा अजमास दिसत आहे. येथे एवढेच सांगितले पाहिजे की मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडता या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याजबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीने अंगीकार करीत गेलो तरच आमचा निभाव लागणार आहे.'' (निबंधसंग्रह १ पृ. ५)

''ज्याप्रमाणे अंधारात सगळ्या रंगांचा लोप होतो त्याप्रमाणे फार दूरच्या भविष्यकालाविषयी विव्दान आणि अविव्दान यांचे सारखेच अज्ञान असते. तथापि ज्याप्रमाणे दुर्बिणीवाल्यास त्या यंत्राच्या सहाय्यामुळे दूरस्थ तारकासमूहाविषयी दुसरे काही समजले नाही तरी त्याच्या अनंतत्वाविषयी खात्री होते त्याप्रमाणे विद्यारूप दुर्बिण ज्या विद्वानास प्राप्त झाली आहे त्याच्या ज्ञानचक्षूंस फार दूरची मनुष्यावस्था नीट रीतीने न्याहळता आली नाही तरी तिच्या उन्नतीला सीमा नाही येवढे पक्के दिसून येते.'' (निबंधसंग्रह १, पृ. १२)

''शिक्षणासारखी गृहव्याधीवर दुसरी जालीम मात्रा नाही. तिच्या योगाने पाहिजे ती सुधारणा थोड्या विलंबाने का होईना पण कोणतेही नुकसान होऊ न देता करता येणार आहे तर शिक्षणाची जबर मात्रा तुम्ही गृहव्याधीसाठीच राखून का ठेवता? लोकांस ज्ञान प्राप्त झाले, चांगले वाईट कळू लागले म्हणजे त्यांच्या वर्तनात आपोआपच सुधारणा होत जाणार आहे. पण सध्या या देशात अक्कल व अंमल यांचा काडीमोड झाला आहे.'' (निबंधसंग्रह १, पृ.१०९)

''सांप्रतकाळी पाश्चिमात्य शिक्षणामुळे येथे नवीन धर्मकल्पनांचा, नवीन राज्यकल्पनांचा व नवीन सामाजिक कल्पनांचा प्रादुर्भाव झाला आहे. नवीन पिढ्यांपैकी काही लोक या कल्पनांचे कट्टे भोक्ते बनले आहेत. ज्यांना पाश्चिमात्य शिक्षणाचा संपर्क लागलेला नाही असे दोन तट झाले आहेत. ज्यांच्यापासून लोकांस हे पाश्चिमात्य शिक्षण मिळत आहे त्या राज्यकर्त्यांनी हिंदूंच्या धर्माचरणात व सामाजिक आचारात सहसा हात घालायचा नाही असा संकल्प केला आहे. हे सुधारक हे त्यांचेकडून मिळत असलेल्या शिक्षणाचेच फळ आहे.'' (निबंधसंग्रह भाग १, पृ. १४४)

''कोणताही नवीन प्रघात रुढ होण्यापूर्वी त्याला तीन पहाऱ्यांतून जावे लागते. पहिला पहारा मनाचा, दुसरा वाणीचा आणि तिसरा आचरणाचा. यापैकी प्रत्येक पहाऱ्यातून जात असता त्याला मज्जाव झाल्याखेरीज राहात नाही. शेकडा नव्वाण्णव लोकांस नवीन कल्पना सुचत नाही व सुचली तरी तिला डोक्यात थारा द्यावा असे त्यास वाटत नाही.'' (निबंधसंग्रह भाग १, पृ.१९१)

''मनुष्याची वन्यावस्था सुटत जाऊन त्यांची सुधारणा होऊ लागणे म्हणजे त्यांमध्ये धर्म आणि राज्य या संस्थांची स्थापना होणे होय.'' (निबंधसंग्रह

भाग.२, पृ. २०)

"आपल्या सुशिक्षित मंडळीस आपली सुधारणा व्हावी ही गोष्ट जर इष्ट असेल तर आमच्या मते त्यांनी कायद्याच्या आड येण्याचे कारण नाही." (निबंधसंग्रह भाग २, पृ. ८५)

"आजकाल सामाजिक गोष्टीत जी जागृती दृष्टीस पडू लागली आहे तीत सुशिक्षित लोकांचे अंग किती आहे? स्त्रीशिक्षणासाठी मुलींची हायस्कूले घालणे चांगले नसेल, पण या 'मित' सुधारकांनी आपल्याच पद्धतीने का होईना पण यासाठी काय केले आहे?" (निबंधसंह भाग २, पृ. ८८)

निरनिराळ्या लेखांत आगरकरांनी समाजसुधारणाविषयक मते वरीलप्रमाणे व्यक्त केली आहेत. आगरकरांचा समाजसुधारणावाद हा स्वयंप्रेरणेवर आधारलेला आहे. लोकांना ज्ञान झाले पाहिजे. नव्या काळाला अनुलक्षून त्यांनी नव्याचे स्वागत केले पाहिजे असे आगरकरांना वाटते. विज्ञानपरता आणि विचारस्वातंत्र्य यांची अधिक गरज नव्या काळाला आहे असे आगरकरांना वाटते. आणि हे सारे शिक्षणाच्या प्रसारामुळेच होईल, मनुष्य विचार करू लागेल व त्या विचारानुसार त्याचा आचार घडला तर हे सहज शक्य आहे असे आगरकरांचे ठाम मत आहे. यासाठी आपल्या लेखनातून त्यांनी शिक्षणाचे महत्त्व विशद केले आहे.

**उपसंहार** – आगरकरांच्या लेखनात प्रतिबिंबित होत असलेल्या शिक्षणविचाराचे स्वरूप समाजचिंतनात्मक आहे. आगरकर हे नवप्रबोधनवादी लेखक होते. आगरकरांच्या पूर्वी या समाजाची स्थिती कशी होती हे पाहणे आगरकरांच्या शिक्षणविचारांच्या संदर्भात महत्त्वाचे ठरेल.

आगरकरांना ज्या कालखंडाचा वारसा लाभला होता त्या कालखंडात...एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस... हिंदुस्थानातील स्थितीशील व निवृत्तिप्रधान विचारपरंपरेला धक्का देण्याच्या कामी इंग्रजी शिक्षण हे सर्वांत प्रभावी साधन ठरले. प्रथमत: ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना इंग्रजी शिक्षणावर विशेष भर देण्याची गरज भासली नाही. पण पुढे राज्यकारभार चालविण्यासाठी इंग्रजी भाषा जाणणारांची उणीव भासू लागली. मग सरकारने वरिष्ठ वर्गाच्या शिक्षणाची-विशेषत: इंग्रजी शिक्षणाची-तरतूद केली. हे धोरण ठरवितांना केवळ उपयुक्ततावादाचाच अवलंब राज्यकर्त्यांनी केला होता असे म्हणता येणार नाही. आपल्या शासनाचे शिक्षणविषयक धोरण काय असावे याची साधकबाधक चर्चा करूनच इंग्रजांनी आपले शिक्षणविषयक धोरण निश्चित केले होते.

इंग्रजी शिक्षणातून आलेला नवविचार आपल्याकडे प्रसृत झाला खरा, पण खऱ्या अर्थाने हा नवविचार समाजाच्या खालच्या थरापर्यंत जाऊन पोचला नव्हता.

राजकीय गुलामगिरीबरोबरच आधीच्या शेकडो वर्षांची बौद्धिक गुलामगिरी या समाजात होती. या सर्व पार्श्वभूमीवर आगरकरांची विचारसरणी घडली होती.

आगरकरांनी व्यक्त केलेल्या शिक्षणविचाराचा सामग्रयाने विचार करताना जे पैलू दृष्टीस पडतात ते असे-

**समाजसुधारक आगरकर** – रूढी, अज्ञान, परंपरा या सर्वांबद्दल आगरकरांना चीड होती. प्रत्यक्ष शिक्षणविचारावर नसलेले तरीही या रूढीविरूद्ध असलेले अनेक लेख आगरकरांनी लिहिले. विशेषत: संमतीवयाच्या कायद्याबाबत आगरकरांनी फार तळमळीने लिहिले आहे. जीर्ण मताला चिकटून राहतांना आपण आपल्या हाताने आपल्या पायावर दगड पाडून घेतो असे आगरकर सांगतात. 'आम्हा पुरुषांच्या पेहरावा'वर ते त्याच तळमळीने लिहितात. बालविवाहाचा विरोध सुधारकाच्या भूमिकेतून लिहितात.

महाराष्ट्रातील सुशिक्षित हा पदवीधारक, आंग्लविद्याविभूषित व आपल्याच शिक्षणाच्या बडिवारात रममाण होणारा नसावा, त्याचे समाजाशी नाते असावे, त्याची सामाजिक जाणीव सचेतन असावी, त्याची समाजाशी बांधिलकी असावी असे आगरकरांना वाटत होते. आणि म्हणूनच आपल्या लेखनाच्या व्दारे महाराष्ट्रातील सुशिक्षितांना आधुनिक काळाशी सुसंगत अशी नवी जीवनदृष्टी देण्याचा आगरकरांचा प्रयत्न होता. त्यांचे शिक्षणासंबंधी विचारही याच दृष्टीने मोलाचे आहेत.

शिक्षणाच्या अनेक ध्येयांपैकी एक असे सांगितले गेले आहे की शिक्षणाने सामाजिकता, नागरिकत्व व राष्ट्रीयत्व यांचा विकास झाला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असले तरी राष्ट्राचा व समाजाचा एक जबाबदार घटक या नात्यानेच व्यक्तीला आपल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. कोणतीही समाजव्यवस्था ही नेहमीच प्रगमनशील असली पाहिजे. स्थितिशील समाजाची प्रगती लवकर होऊ शकणार नाही. यासाठी समाज हा परिवर्तनशील असायला हवा. समाज परिवर्तनशील असावा असे वाटत असेल तर तो सुशिक्षित, सुसंस्कृत व नवविचारांचे स्वागत करणारा असायला हवा.

आगरकरांच्या शिक्षणविषयक विचारांचे मूळ त्यांच्या समाजसुधारणावादी विचारांमध्ये आहे. स्त्रियांचे शिक्षण, सुशिक्षितांची कर्तव्ये, सक्तीचे प्राथमिक शिक्षण इ. विषयांवर आगरकर लिहितात तेव्हा त्यांना निव्वळ शिक्षणावर लेखन करावयाचे नसून प्रगमनशील समाजासंबंधी लिहावयाचे असते. आगरकरांचा शिक्षणविचार हा विकासवादी शिक्षणविचार आहे.

आगरकरांनी पाश्चात्य तत्त्वज्ञ स्पेन्सर यांच्या उत्क्रांतीवादाचा स्वीकार केला

होता. ‘ सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काळ ’ या आपल्या लेखात ते लिहितात-

‘ गर्भस्थ पिंड पहिले काही महिने एकरूप असतो. त्यात अवयवभेद किंवा मज्जा, मांसपेशी, स्नायू, शिरा, नाड्या असा भेद नसतो. सारा पिंड एका द्रव्याचा गोळा असतो. पुढे त्यात आकार होत जाऊन मेंदू, काळीज, कोठा असे शरीराच्या आतल्या भागात असणारे अवयव अस्तित्त्वात येतात. एकरूपता आणि एकधर्मता यांचा क्रमाक्रमाने लोप होत जाऊन बहुरुपता आणि बहुधर्मता प्राप्त होत जाणे हा जसा वनस्पतींच्या व प्राण्यांच्या शरीराचा अनादि सिद्ध नियम आहे त्याप्रमाणेच समाजदेहसुद्धा याच नियमाने बांधलेला आहे.’

सृष्टीतील व मानवी जीवनातील कठोर वास्तवाकडे उघड्या डोळ्यांनी व स्थिरपणे पाहण्याची सवय आपण केली पाहिजे हे स्पेन्सर यांचे मत होते. आगरकरांचेही मत तसेच होते. ‘ जीवनार्थ कलह व सुधारणा ’ या आपल्या लेखात त्यांनी हे विचार व्यक्त केले आहेत. आपल्या अन्य लेखांतून उत्क्रांतीला कारणीभूत होणारा जीवनकलह, त्यातील निर्घृणता, सबळांची जीत नि निर्बळांची हार, याशिवाय या जीवनसंघर्षात जे टिकून राहतात त्यांची शारीरिक व मानसिक शक्ती आणि या शक्तींचा विकास या सर्वांचे सामग्र्याने विवेचन आगरकर करतात.

हे मौलिक विवेचन करतांना आगरकरांना समाजपरिवर्तन आणि समाज सुधारणा अभिप्रेत आहे. सामाजिक सुधारणेचे जे विविध मार्ग आहेत त्यात आगरकर लोकशिक्षणाला प्राधान्य देतात. समाजसुधारणेतील जे बदल स्वयंप्रेरणेने व विचारपूर्वक घडवून आणलेले असतात तेच चिरस्थायी स्वरूपात राहतात. त्यांनीच चिरस्थायी सुधारणा होऊ शकतात. म्हणून आगरकरांनी लोकशिक्षणाच्या मार्गावर अधिक भर दिला आहे. अन्य मार्ग जे असतील ते अनुसरण्यास हरकत नाही. पण हे सर्व मार्ग लोकशिक्षणाच्या कार्याला पूरक होऊन त्यामुळे समाजसुधारणा घडून यावी असे त्यांचे मत आहे.

**राष्ट्रनिष्ठ आगरकर** – आगरकरांनी समाजसुधारणेला आपल्या विचारसरणीत प्राधान्य दिले असले तरी ते राष्ट्रीय वृत्तीचे विचारवंत होते. पण राष्ट्रीय सुधारणेच्या वा स्वातंत्र्याच्या चळवळीत सामाजिक सुधारणेलाही स्थान असले पाहिजे असे त्यांचे मत होते.

आगरकरांचे बहुतेक लेखन केसरीत व सुधारकात झाले. आगरकर हे खरे स्वराज्यवादी होते असे त्यांच्या लेखांच्या परिशीलनावरून दिसून येते. महाराष्ट्रात त्या काळात राजकीय की सामाजिक स्वातंत्र्य, आधी राजकीय की आधी सामाजिक अशा प्रकारचे वाद सुरू होते. आगरकर सुधारणावादी असूनही राष्ट्रीय होते.

राष्ट्रवादाचा उगम हा पारतंत्र्याविषयी चीड निर्माण होते त्यातून होतो. पण अशा राष्ट्रवादातून एकांगी देशभक्त निर्माण होण्याची शक्यता असते. ' खरा देशभक्त आपल्या राष्ट्राचे सर्व दोष ओळखून असतो. तथापि त्याचे राष्ट्रावर प्रेम असते. त्याची देशभक्ती म्हणजे उन्नतिप्रवण आहे. राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरीही सामाजिक विषमता असेल तर सामाजिक गुलामगिरी देशात राहीलच. आणि खऱ्या अर्थाने देशाची प्रगती होणार नाही. आगरकरांचा राष्ट्रवाद हा खालील घटकांवर आधारित आहे.

पाश्चात्य शिक्षणाचा स्वीकार; कारण पाश्चात्य शिक्षणाने ज्ञानाची व्दारे खुली झाली. नवविचारांचा प्रादुर्भाव झाला.

पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव मान्य असला तरी त्या शिक्षणाची वा विचाराची गुलामगिरी आगरकरांना मान्य नाही.

स्वत्त्व टिकवून परक्यांचे इष्ट ते स्वीकार्य असावे असा आगरकरांचा विचारमार्ग होता.

समाजसुधारणेच्या रस्त्यावरून राष्ट्रस्वातंत्र्याकडे जाता येईल. आणि समाज सुधारणेचा मार्ग हा लोकशिक्षणाचा मार्ग होय.

आपल्या विचारांची मांडणी करताना आगरकरांनी काही नवीन शब्द रूढ केले. त्यावरून त्यांची स्वभाषाप्रीती, स्वाभिमान, त्यांची स्वत्त्व जोपासण्याची दृष्टी दिसून येते. असे काही शब्द : लोकशिक्षण(public educatin), मृताक्षर (Dead letter)क्षीरपथ (Milky way)क्रियाप्रवृत्ती (incentive)अमानुष (super human)उत्क्रांती (evolution)

एका बाजूने इंग्रजी शिक्षणाचा आपल्या देशावर होणारा सुपरिणाम व त्याच वेळी दुसऱ्या बाजूने उच्चभ्रू लोकांमध्ये येणारी स्वसंतुष्टतेची भावना यांमुळे देशाचे व समाजाचे नुकसान होत आहे याची सतत जाणीव आगरकर देतात. त्यामुळे आगरकरांच्या निबंधातून कधी उपहासात्मक पद्धतीने तर कधी प्रत्यक्ष, इंग्रजी राज्यकर्त्यांवर टीका आलेली आहे. पण इंग्रजी राज्यकर्त्यांपेक्षा आगरकरांचा खरा आक्षेप स्वकीयांवरच अधिक आहे.स्वकीयांनी डोळे उघडून अंतर्मुख होऊन पाहिले पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

**मोफत प्राथमिक शिक्षणाचे पहिले पुरस्कर्ते** – गोपाळ कृष्ण गोखले आणि गोपाळ गणेश आगरकर या दोघांनीही काही काळ सुधारक पत्र एकत्र चालविले. गोपाळ कृष्ण गोखले हे वरिष्ठ कायदे कौन्सिलाचे सभासद होते. त्यांनीच पुढे मोफत प्राथमिक शिक्षणाचे बिल मंडळापुढे मांडले. सरकारने या बिलाला विरोध केला.

गोखले यांनी हे बिल पुढे आणताना फारच मेहनत घेतली होती. या प्राथमिक शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांमध्ये पहिले नाव आगरकरांचे घेतले पाहिजे.

व्यक्तीला योग्य व्यक्तिमत्त्व येण्यासाठी शिक्षण मिळाले पाहिजे. किमान शिक्षण तरी मिळालेच पाहिजे. अशिक्षिताला अज्ञानात काळ कंठावा लागतो. समाजात गरीब लोकांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था सरकारने केलीच पाहिजे, असा आग्रही विचार आगरकरांनी मांडला.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे, सार्वत्रिक असावे आणि मोफत असावे या सूत्राचा उपदेश हिंदुस्थानात आगरकरांनी प्रथम केला. पाश्चात्य राष्ट्रांच्या शिंक्षणाचा इतिहास पाहिला तर त्यांनी प्राथमिक शिक्षण हे सरकारचे कर्तव्य मानून एकोणिसाव्या शतकातच वाटचाल सुरु केली होती.

शिक्षणाचा राष्ट्रीय सेवेसाठी उपयोग व्हावा. शिक्षणाने आपली खरी उद्दिष्टे गाठून समाजोन्नती व्हावी असे वाटत असेल तर शिक्षण हे आपले प्राथमिक कर्तव्य आहे असे सरकारने मानले पाहिजे असे पाश्चात्यांप्रमाणेच आगरकरांनाही वाटत होते. म्हणूनच त्यांनी आपल्या लेखनात सक्तीचे शिक्षण असावे असा आग्रह धरला.

**स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते** – स्त्रीसुधारणा, स्त्रियांचे समाजातील स्थान, स्त्रियांना मिळणारी वागणूक, त्यांची वैयक्तिक, सामाजिक प्रतिष्ठा हे आगरकरांच्या प्रेमाचे विषय होते. त्यांच्या सर्व लेखनातून त्यांनी स्त्री शिक्षणाचा हिरीरीने पुरस्कार केला.

स्त्री शिक्षणाबाबत हिंदुस्थानात व महाराष्ट्रात फारच शोचनीय स्थिती होती. १८५४ सालच्या सरकारी खलित्याला अनुलक्षून (डिस्पॅच) स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना सरकारने आखल्या. पण १८६४-६५ मध्ये सरकारी शाळातून फक्त ६३९ मुली (सर्व हिंदुस्थानात) शिक्षण घेत होत्या असे दिसले. हळूहळू स्त्री शिक्षणाला वाव मिळू लागला. इंग्लंडच्या प्रख्यात समाजसुधारक कार्यकर्त्या कु. मेरी कार्पेंटर या भारतात आल्या आणि त्यांनी स्त्रीशिक्षणाचा प्रश्न अग्रक्रमाने हाताळला. त्यामुळे १८७०मध्ये पुण्याला आणि १८७१ मध्ये अहमदाबादला स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेज सुरू झाले.

स्त्री शिक्षणाची अशी वाटचाल सुरू असली तरीही एकंदर लोकसंख्येच्या मानाने स्त्रियांच्या शिक्षणाची प्रगती अगदीच मंद होती. आगरकरांनी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला तो स्त्रियांच्या सामाजिक स्थितीच्या पार्श्वभूमीवर.

हिंदुस्थानात बालविवाहाची प्रथा रूढ होती. बालविवाहांनी स्त्री-पुरुषांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होत. हे टाळावयाचे असेल तर प्रौढविवाह सुरु केले पाहिजेत असे आगरकरांनी सांगितले. बालविवाहाच्या अनेक दुष्परिणामांपैकी स्त्रियांची

हलाखीची स्थिती हा महत्त्वाचा दुष्परिणाम होता. अकाली वैधव्य, हे वैधव्य जपण्यासाठी केशवपन इ. अनेक रूढींना बालविवाहच कारणीभूत होते. स्त्रियांना शिक्षण दिले तर त्यांचा विवाहकाल वाढेल व बालविवाहाला आपोआप पायबंद बसेल असे आगरकर सांगतात. सहशिक्षणात स्त्री-पुरुषांनी एकत्र येणे हितावह असते. त्या दृष्टीने आगरकर सहशिक्षणाला मान्यता देतात. मात्र सहशिक्षणच हवे असा आगरकरांचा आग्रह नाही. स्त्रियांसाठी शक्यता असल्यास स्त्रियांना वेगळ्या शाळेत घेण्यास वा त्यांची इच्छा असेल तर पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण घेण्यास मुभा असावी असे आगरकरांना वाटते. या ठिकाणी आगरकरांची पुरोगामी व व्यक्तिस्वातंत्र्यवादी भूमिका दृष्टीस येते.

**विवेकनिष्ठ आगरकर** – आगरकरांच्या तत्त्वविचारांचा व त्यांच्या शिक्षणविचाराचा मागोवा घेतला तर खालील गोष्टी ध्यानात येतात-

| | |
|---|---|
| विवेकनिष्ठा | स्त्रीस्वातंत्र्य |
| अंधश्रद्धा विरोध | स्वदेशप्रेम |
| प्रगमनशील विचारसरणी | बुद्धिवाद |

आगरकरांची धार्मिक वा नैतिक विचारसरणीही विवेकनिष्ठेवर आधारित आहे. म्हणूनच 'स्त्रियांना चरितार्थाचे शिक्षण द्यावे काय' या प्रश्नाचे महत्त्व त्यांना जास्त वाटते. आणि म्हणूनच 'राजसत्तेचा अंमल कमी... शक्य तितका कमी असावा व लोकांनी शक्य तितके स्वायत्त असावे.' असे प्रतिपादणारे आगरकर सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या कामी वा स्त्रीशिक्षणाच्या व लोकशिक्षणाच्या कामी सरकारची मदत - तीही परकी आणि परधर्मी सरकारची मदत - घ्यायला तयार होते. ही गोष्ट कदाचित त्यांच्या तत्त्वज्ञानास विरोधी वाटेल. पण आगरकरांचे हे धोरण त्यांच्या तात्त्विक विवेचनाला धरूनच आहे.

प्रभाकर पाध्ये व श्री. रा. टिकेकर यांनी वरील विधानात म्हटल्या प्रमाणे आगरकरांची राष्ट्रनिष्ठा ही विवेकनिष्ठेवरच आधारलेली होती. ती आंधळी देशभक्ती नव्हती. म्हणून ते परकी सरकारचा स्वीकार मर्यादित बाबतीत करणार होते.

अशा तऱ्हेने आगरकरांनी आपल्या विचारांच्या द्वारा डोळस व्हा, रूढी परंपरा सोडा, त्याज्य ते त्याज्यच, केवळ जुने ते सोने हे खरे नाही, असे सांगितले. पाश्चात्य ज्ञानरवी उगवला तरी अजून महाराष्ट्रीयांचे डोळे का उघडत नाहीत असा प्रश्न केला. प्रत्यक्ष सुधारणा होण्यासाठी उपाय सुचविले, डोंगरीच्या तुरूंगातील अनुभवांवर गुन्हेगारांसंबंधी मानसशास्त्रीय लेखन केले. आयुष्यभर ज्या तत्त्वाची कास धरली त्याच्यासाठी मित्रप्रेमाचाही त्याग केला.

लोकसंख्या शिक्षण ही सध्या काळाची गरज होऊन बसली आहे. लोकसंख्येला आळा घालण्यासाठी विवाहाचे वय वाढविणे हा एक उपाय महत्त्वाचा मानला जातो. आगरकर त्यांच्या काळात संमतिवयाचे बिल पास करून घेण्यासाठी पुढे झाले आणि त्यांनी पतिपत्नीसंबंधाचे वय वाढविण्याच्या बाजूने वैचारिक लढत दिली. समाजसुधारणा ही केवळ घोषणेपुरती न करता प्रत्यक्ष आचरणात आणली की तिचे अनेक फायदे होतात. लोकसंख्येची गुणवत्ता वाढते. हा विचार आगरकरांनी त्यांच्या काळात समाजाचा विरोध पत्करून मांडला.

◆ ◆



चित्र बसवंत, पुणे.

प्रकरण : ३

# बाळ गंगाधर टिळक

---

## चरित्ररेखा

रत्नागिरी जिल्ह्यातील, दापोली तालुक्यातील चिखलगाव या खेड्यात, बुधवार दि. २३ जुलै १८५६ रोजी टिळकांचा जन्म झाला. टिळकांचे वडील गंगाधरपंत हे शिक्षण खात्यातच शिक्षक म्हणून नोकरी करताकरता शेवटी ॲसिस्टंट डेप्युटी इन्स्पेक्टर झाले. गंगाधरपंत स्वत: विद्वान होते. त्यांनी इंग्लंडचा इतिहास, व्याकरण, अंकगणित इ. शालोपयोगी पुस्तके लिहिली होती. बाळ गंगाधर टिळक यांनाही त्यांनी बाळपणापासून विविध विषयांचे ज्ञान देण्यास सुरूवात केली होती. १८६४ सालापर्यंत, पूर्णांक-अपूर्णांकापर्यंतचे गणित, रूपावली, समासचक्र, निम्मा अमरकोश आणि ब्रह्मकर्माचा बहुतेक भाग टिळकांनी पाठ केला होता.

१८७३ साली टिळकांनी पुण्याला डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. १८७६ साली बी. ए. परिक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. पुढे १८७९ साली ते एलएल. बी. पास झाले.

१८७४ साली विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची 'निबंधमाला' सुरू झाली. निबंधमालेचे वाचन त्या पिढीतील सर्व सुशिक्षित आवर्जून करीत असत. टिळक-आगरकरही निबंधमालेने भारावून गेले होते. सरकारी नोकरीच्या मागे न लागता काहीतरी स्वतंत्रपणे केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. टिळकांच्या मनात शिक्षण-विषयक विचार अगदी तरूण वयापासून घर करून होते हे टिळक-आगरकर संवादातून दिसून येते. " आमचे शिक्षण आम्हीच संभाळले पाहिजे " अशा आशयाचा हा सविस्तर संवाद टिळक चरित्रात आला आहे. अशा विचारांच्या देवाणघेवाणीतून नवी शाळा काढण्याचा संकल्प पूर्ण झाला. १ जानेवारी १८८० रोजी 'न्यू इंग्लिश

स्कूल' ची स्थापना झाली. येथून पुढे एक दशक - १८८० ते १८९० - टिळकांनी न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेज या संस्थाना दिले. या संस्थांमध्ये त्यावेळी सुरूवातीपासून जी मंडळी काम करत होती त्यात चिपळूणकर, टिळक, नामजोशी, आगरकर व आपटे यांचा समावेश होता. या पाच जणांना त्यावेळी 'ग्राज्वेट पंचायतन' म्हणून ओळखले जायचे.

चिपळूणकरांनी १८८१ मध्ये केसरी पत्र सुरू केले. 'मराठा' हे इंग्रजी साप्ताहिकही सुरू केले. त्याचे संपादक टिळक होते. १८८८ साली आगरकरांनी 'सुधारक' नावाचे वेगळे साप्ताहिक काढले. त्यावेळी कर्जात आलेला केसरी टिळकांनी आपल्या हाती घेतला. केसरी पत्रातील लेखनाबद्दल १८९७ साली टिळकांना दीड वर्षाची शिक्षा झाली. पुन्हा १९०७ मध्ये तर सहा वर्षाची शिक्षा झाली. "सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?" किंवा "राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे" अशा प्रकारचे जळजळीत अग्रलेख लिहून टिळकांनी सरकारची नाराजी ओढवून घेतली होती.

तुरूंगवास संपल्यानंतर प्रकृती खालावली तरी, टिळकांनी 'पुनश्च हरिओम्' अशा अग्रलेखानेच आपल्या लेखनाला सुरूवात केली. यावेळी आपल्या चरितार्थासाठी टिळकांनी लॉ क्लास चालविला होता. तोही बंद केला. मग केसरी आणि समाजसेवा व राष्ट्रसेवा हेच टिळकांचे कार्यक्षेत्र राहिले.

टिळकांनी परदेशालाही भेट दिली आणि तेथील वास्तव्यात जनमत आपल्या बाजूला करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

एक ऑगस्ट १९२० रोजी मुंबईला टिळकांचे देहावसान झाले. चौसष्ट वर्षाच्या आयुष्यात बालपण, आजारपण व तुरूंगवास वगळल्यास टिळकांनी पन्नास वर्षे आपली कारकीर्द परिश्रमांनी भरून टाकली होती. स्वतंत्र विचारशक्ती आणि आत्मविश्वास ही टिळकांची वैशिष्ट्ये होती. आयुष्यभर ते ज्ञानोपासकच राहिले. त्यांना शिष्यवृत्ती का मिळाली नाही असे त्यांच्या चुलत्यांनी विचारले. तेव्हा टिळक म्हणाले, "स्कॉलरशिप मिळण्यास अवघ्या विद्वत्तेची गरज आहे ही जी लोकांची समजूत आहे ती पुष्कळ अंशी चुकीची आहे. स्कॉलरशिपसाठी विद्या नाही, विद्येसाठी स्कॉलरशिप आहे. असे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत मी घनपाठी आहे, जटापाठी आहे, असे घरोघर सांगत फिरून पैसे मागणाऱ्या भिक्षुकाप्रमाणे मी कधी करणार नाही."

टिळकांची स्वयंप्रज्ञ व तेजस्वी जीवनधारा वरील एकाच प्रसंगानेही समजून येते.

### टिळकांचे लेखन

टिळकांनी आयुष्यभर लेखन केले. तुरूंगातही त्यांनी ग्रंथनिर्मिती केली. टिळकांचे लेखन प्रामुख्याने केसरीमधूनच झाले. त्यांच्या केसरीतील लेखांचे संग्रह

नंतर दोन वेळा प्रसिद्ध झाले. टिळकांचे लेखन खालीलप्रमाणे –

- लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख – खंड १ ते ४
- वेद काल निर्णय – मूळ 'ओरायन' या इंग्रजी ग्रंथाचा ओगलेकृत संक्षेप
- आर्य लोकांचे मूलस्थान – मूळ "आर्क्टिक होम इन् द वेदाज" या इंग्रजी ग्रंथाचा ओगलेकृत अनुवाद
- गीतारहस्य

याशिवाय टिळकांच्या पांडित्याचे निदर्शक असे तीन किरकोळ निबंध आहेत. त्यांची नावे अशी –

- खाल्डियन व भारतीय वेद, सांडलेली सांख्यकारिका, वेदांगज्योतिष

प्रत्यक्ष लेखनाबरोबरच भविष्यात कोणकोणत्या विषयांवर लेखन करावयाचे त्यांची यादी टिळकांनी करून ठेवली होती.

टिळकांच्या लेखनापैकी त्यांचे केसरीतील लेखच प्रस्तुत संदर्भात अधिक विचारात घेण्यासारखे आहेत. 'वेदकालनिर्णय' व 'आर्य लोकांचे मूलस्थान' हे दोन्ही ग्रंथ मूलतः इंग्रजीत लिहिलेले आहेत.

## शिक्षणविषयक लेख

केसरी प्रकाशन संस्थेने १९७६ मध्ये 'समग्र लोकमान्य टिळक' हे टिळकांच्या लेखांचे नव्याने मुद्रित केलेले संग्रह प्रकाशित केले. याआधी १९२२ मध्ये प्रकाशित झालेल्या लेखसंग्रहांपेक्षा यांची रचना वेगळी आहे. केवळ कालानुक्रमे लेख मुद्रित न करता त्यांची विषयवार विभागणी करून लेख पुनर्मुद्रित केले आहेत. या खंडांपैकी 'राजकीय लेखसंग्रह' या तिसऱ्या खंडात शिक्षणविषयक लेख मुद्रित केले आहेत.

या खंडात क्रमांक २१ ते ५१ असे एकूण ३१ लेख शिक्षणविषयक लेख म्हणून मुद्रित केले आहेत. या लेखांची शीर्षके अशी –

लष्करी शिक्षणाची शाळा; नेटीव व्हाईस चान्सलरांचे पहिले भाषण; देशी भाषांस उत्तेजन देण्यास युनिव्हर्सिटीने काय केले पाहिजे?; देशी भाषांची दैना; खरे विद्यापीठ कोणते?; युनिव्हर्सिट्या उर्फ सरकारी हमालखाने; युनिव्हर्सिटी बिल; जुन्या विद्यापीठांची आरती; धूर्त कोण आणि फसला कोण?; खाजगी शिक्षणावरील सरकारची करडी नजर; नामदार जाइल्ससाहेब यांचे राजद्रोहाचे पिसे; नामदार जाइल्स यांची मुक्ताफळे; नामदार जाइल्ससाहेब यांची ओवाळणी; मि. मलबारी; ना. मि. जाइल्स व सरकार; हिंदुस्थानातील शिक्षणाची दशा; शिक्षणाची उद्दिष्टे; सुशिक्षितांची कर्तव्ये; ब्रिटिश सरकार व लोकशिक्षण; धंदेशिक्षण आणि सरकार; दहाच स्कॉलरशिपा; हिंदुस्थान सरकारचा शिक्षणावरील नवा ठराव; कृषिशिक्षण व धंदेशिक्षण; राष्ट्रीय नीतिमत्ता आणि बादशाही अरेरावी; हे आमचे गुरूच नव्हेत (तीन लेख); राष्ट्रीय

शिक्षण व खासगी शाळांची जबाबदारी (तीन लेख); दुमजली इमारतीचा पुंडावा; चतकोर भाकरीची गुलामगिरी. शिक्षणविषयक लेखांमध्ये ज्या लेखांचा समावेश केलेला नाही परंतु ज्या लेखांमध्ये शिक्षणविषयक विचार अन्य विचारांच्या बरोबरीने पण प्रभावीपणे आलेला आहे असे अनेक लेख आहेत. असे वर्गीकरण व त्यातील लेख खालीलप्रमाणे आहेत –

- समाज-परिवर्तन
  आमचे आधुनिक विद्वान अकाली का मरतात ? आमच्या बुद्धीस खरोखर उतरती कळा लागली आहे काय ?
- स्त्री वर्गाची सुधारणा
  फीमेल हायस्कूलातील शिक्षणक्रम – लेखांक १ ते ४; स्त्रीशिक्षणाची दशा.
- धर्मविचार
  इंग्रजी शिकलेल्यांचा एकांगीपणा, हिंदू कॉलेजातले नॅशनल साँग.
- भाषाशास्त्र
  शाळांसाठी पुस्तकमाला.
- वाङमयसमीक्षा
  ब्राह्मण आणि त्यांची विद्या लेखांक १ ते ७.
- व्यक्तिचित्रे (विविध व्यक्तींवरील लेख)

टिळकांच्या सर्व लेखांचे संकलन-संपादन करून संयोजक श्री. भा. कृ. केळकर यांनी विषयवार पद्धतीने त्यांची मांडणी केली व केसरी प्रकाशनाने ते लेख पुनर्मुद्रित केले. वरील यादी पाहिली तर असे आढळते की टिळक कोणत्याही विचारक्षेत्रातील विचार मांडत असोत, त्यांचा शिक्षणविचाराशी, शैक्षणिक मूल्यांशी कुठे ना कुठे संबंध येतोच. या दृष्टिकोनातून टिळकांचे लेख विचारात घेतले तर त्या लेखांत शिक्षणविचार कोणत्या स्वरूपात येतो याचे सूत्र सापडते.

## राष्ट्रीय शिक्षण

डेक्कन कॉलेजमध्ये असतानाच टिळकांनी निश्चितपणे असे ठरविले होते की शिक्षणप्रसाराचे कार्य करून देशबांधवात राष्ट्रीय जागृती निर्माण करावयाची. शिक्षणाच्या द्वारा देशसेवा करण्याचा त्यांचा निश्चय पक्का झाला होता.

"देशबांधवांच्या हीनदीन अवस्थेचे विचार मनात आले की त्याने आमचे मस्तक भणाणून जाई आणि प्रदीर्घ चिंतनानंतर आमचे असे ठाम मत बनले की देशबांधवांच्या उद्धाराचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षणप्रसार होय." हे टिळकांचे विचार त्यांची शिक्षणविषयक भूमिका स्पष्ट करणारे आहेत. इंग्रजी विद्येच्या प्रसाराने भारतात ज्ञानप्रसार होऊ लागला तरी त्याद्वारा राष्ट्रीयत्वाची जोपासना न होता उलट

राष्ट्रीयत्वास हानी पोचू लागली. एक नवाच कारकुनांचा वर्ग सुशिक्षितांत निर्माण झाला.

१९०६ साली कलकत्त्याला भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात राष्ट्रीय आंदोलनाचा चतु:सूत्री कार्यक्रम आखला गेला व तो स्वीकारण्यात आला. स्वदेशी, स्वराज्य, परदेशी मालावर बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण... ही ती चतु:सूत्री होय. अशा राष्ट्रीय शिक्षणाचे वारे वाहू लागले होते. टिळकांनी आपल्या लेखातून राष्ट्रीय शिक्षणासंबंधी आपले स्पष्ट विचार प्रकट केले.

**राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या** – १८५४ सालच्या खलित्याने हिंदुस्थानातील विद्या खात्याला नियमित रूप दिले. त्यानंतर लॉर्ड कर्झन यांनी 'युनिव्हर्सिटी बिल' पुढे आणले. तेथपासून राष्ट्रीय शिक्षणाबद्दल पुन्हा चळवळ सुरू झाली. टिळक स्वत: शिक्षक, संपादक, लेखक होते. राष्ट्रीय शिक्षणाबद्दल केसरीच्या माध्यमातून त्यांनी आपले विचार प्रकट करताना राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या करण्याची जरूरी नाही असे सांगितले. तरीही पुढे त्यांनी जे विवेचन केले ते व्याख्यास्वरूपच होते.

"प्रत्येक स्वतंत्र देशातील सरकार आपल्या प्रजेला जे शिक्षण देते किंवा देऊ इच्छिते ते राष्ट्रीयच असते. देशातील तरूण पिढी देशाचे राजकीय औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल अशा प्रकारे त्यास शिक्षण देणे हे देशातील विद्याखात्याचे कर्तव्य आहे. आणि त्यासच राष्ट्रीय शिक्षण असे म्हणतात."

टिळकांच्या या व्याख्यास्वरूप विधानांचे विश्लेषण केले तर असे ध्यानात येते की राष्ट्रीय शिक्षण म्हणजे कोणत्याही एका विशिष्ट प्रकारचे शिक्षण देणे एवढेच अभिप्रेत नसून राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना अधिक व्यापक आहे. 'स्वतंत्र देशातील सरकार' असे टिळक म्हणतात तेव्हा 'स्वातंत्र्य' त्यात अभिप्रेत असते. याचाच अर्थ असा की पारतंत्र्यात असलेला देश योग्य रीतीने शिक्षण देऊ शकणार नाही. त्याचप्रमाणे टिळकांचे लक्ष 'तरूण पिढीवर' अधिक केंद्रित झालेले आहे. तरुण पिढीच देशाचे भवितव्य घडविण्याच्या कामी प्रामुख्याने उपयोगास येते. देश वैभवशाली व्हावयाचा असेल तर राजकीय वैभव, औद्योगिक वैभव, सामाजिक वैभव अशा तीन प्रकारांनी हे वैभव राखणे व वाढविणे आवश्यक. हे तीनही वैभव-प्रकार परस्परावलंबी व परस्परपूरक आहेत. स्वातंत्र्याचे तसेच आहे. स्वातंत्र्याबद्दल विचार करताना टिळक म्हणतात..

"ह्या आपल्या संसारात पारतंत्र्य अनेक प्रकारचे आहे. राजकीय पारतंत्र्य, धार्मिक पारतंत्र्य, विचार पारतंत्र्य, औद्योगिक पारतंत्र्य आणि सामाजिक पारतंत्र्य असे स्थूलमानाने या पारतंत्र्याचे भेद करता येतील."

राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय या बाकीच्या स्वातंत्र्याबाबत योग्य दिशेने प्रगती होणार नाही. वैभव वाढणार नाही. यासाठी तरूण पिढीला आवश्यक ते शिक्षण देणे म्हणजे 'राष्ट्रीय शिक्षण' देणे अशी टिळकांची कल्पना आहे. असे शिक्षण घेऊन तरूण पिढी समर्थ बनली पाहिजे हा अर्थ त्यात अभिप्रेत आहे. या प्रक्रियेतूनच आवश्यक तो बदल घडवून आणणे शक्य आहे. दुर्बलतेचे रूपांतर सबलतेत, असमर्थतेचे रूपांतर सामर्थ्यात, दारिद्र्याचे रूपांतर सधनतेत करणे शक्य व्हावयाचे असेल तर स्वतंत्र राष्ट्राला राष्ट्रीय शिक्षणाशिवाय गत्यंतर नाही असे सांगतात.

**खाजगी शाळांची जबाबदारी** – टिळकांच्या राष्ट्रीय शिक्षणाबाबतच्या तीनही लेखांत व अन्य ठिकाणीही त्यांनी एक गोष्ट आवर्जून सांगितली आहे की राष्ट्रीय शिक्षणाबाबत खासगी शिक्षणसंस्थांनीच अधिकाधिक जबाबदारी उचलावयाची आहे. जो देश स्वतंत्र असतो त्या देशातील सरकारच अशा प्रकारची जबाबदारी घेते. पण हिंदुस्थान (त्या लेखांच्या काळात) परतंत्र असल्याने सरकारची भूमिकाच अशी आहे की शिक्षणाद्वारा दास, सेवक, कारकून निर्माण करावयाचे. आपल्या एकंदर ३ लेखांमध्ये टिळकांनी खासगी शाळांची जबाबदारी कोणती याबाबत जे विवेचन केले आहे त्याचा सारांश पुढीलप्रमाणे –

इंग्रजी सरकारच्या विद्याखात्याने जो अभ्यासक्रम पुरस्कृत केला तो या देशाच्या विकासासाठी उपयुक्त नाही. औद्योगिक व सांपत्तिक बाबतीत आपला देश मागे पडू नये म्हणून धंदेशिक्षण देण्यास सुरूवात केली पाहिजे. शिक्षण म्हणजे केवळ लिहीता वाचता येणे नव्हे. जर्मनी जपान ही दोन राष्ट्रे इंग्लंडच्या मानाने कमी प्रगत होती. त्यांची झपाट्याने प्रगती झाली. पण इंग्लंड सुधारलेले राष्ट्र असूनही त्याचा फायदा हिंदुस्थानला हवा तसा झालेला नाही. एका ठराविक इयत्तेपलीकडे हिंदुस्थानातल्या लोकांचे शिक्षण जावे असे इंग्रज सरकारला वाटत नाही. या देशात मोठे इंजिनियर, मोठे डॉक्टर, मोठे शास्त्रज्ञ निर्माण होऊच नयेत असे इंग्रज सरकारला वाटते. या प्रकारचे सर्व लोक विलायतेतून हिंदुस्थानात आणावयाचे. येथील सुशिक्षितांना मात्र निष्कृष्ट दर्जाचे... सेवक, दास, कारकून... काम द्यावयाचे असा दृष्टिकोन आहे. विलायतेतून मोठे कामगार येथे आले असता त्यांच्या हाताखाली काम करणारे नोकर हवे असतील तर तेवढ्यापुरते शिक्षण ज्या शाळांतून मिळेल अशा शाळा हिंदुस्थानात आहेत. ही परिस्थिती ओळखून खासगी शाळांनी आपल्या शिक्षणाचे स्वरूप पूर्णपणे बदलले पाहिजे. पूर्वबंगालमध्ये विद्वान लोकांनी स्वतंत्र खाजगी शाळा सुरू करून खऱ्या राष्ट्रीय शिक्षणास सुरुवात केली. तो प्रयोग सर्वत्र पोचला पाहिजे. शिक्षणक्रम, शिक्षण संस्था संचालन, शिक्षण प्रक्रिया याबाबत खासगी शिक्षण संस्थांनी स्वतंत्र वृत्तीनेच विचार करायला हवा.

**राष्ट्रीय शिक्षणाबाबत टिळकांचा व्यापक दृष्टिकोन –** राष्ट्रीय शिक्षणाबाबतचे आपले विचार मांडताना टिळकांचा दृष्टिकोन व्यापक आणि विशाल असाच होता. टिळक हे राजकीय विचारवंत असले तरी त्यांची शैक्षणिक दृष्टी स्वच्छ आणि विशाल होती. प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राने शेजारच्या राष्ट्रातील शैक्षणिक प्रगतीबद्दल सदैव जागरूक राहिले पाहिजे. कोणत्या क्षेत्रात शेजारची राष्ट्रे आपल्याला मागे टाकीत आहेत व आपले महत्त्व कमी करण्याचे कोणते प्रयत्न ते शिक्षणाच्या द्वारा करीत आहेत याचा शोध घेऊन आपल्या राष्ट्रीय शिक्षणात आवश्यक त्या सुधारणा करणे, त्यातील दोष काढून टाकणे व त्यात भर घालणे आवश्यक आहे असे टिळकांनी प्रतिपादले आहे.

जागतिक स्पर्धेत आपले राष्ट्र टिकून राहण्यासाठी इतर राष्ट्रांच्या बरोबरीने यावयाचे असल्यास शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे असे टिळकांचे आग्रहाचे सांगणे आहे.

सर्वच देशात शिक्षणातील 'राष्ट्रीयत्व' जोपासण्याची आवश्यकता प्रतिपादिलेली असते. पण हे 'राष्ट्रीयत्व' जतन करणे म्हणजे अन्य राष्ट्रांना कमी लेखून, त्यांचा इतिहास व त्यांच्या परंपरा यांचा अवमान करून, त्यांच्या श्रद्धास्थानांविषयी अनादर निर्माण करून आपले राष्ट्रीयत्व जतन करणे, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जोपासना करणे नव्हे. टिळकांनी इंग्रज सरकारच्या विद्याखात्यावर टीका केलेली असली तरी त्यांनी पाश्चिमात्य विद्यांवर किंवा ज्ञानखात्यावर टीका केलेली नाही.

यासंबंधी टिळकांच्या दृष्टिकोनाची चर्चा करताना प्रथम काही पाश्चात्यांचा 'राष्ट्रीयत्व' या कल्पनेबाबत कोणता विचार आहे हे पाहणे आवश्यक आहे.

**बर्ट्रांड रसेल यांचा राष्ट्रीयत्वाबाबत दृष्टिकोन –** बर्ट्रांड रसेल या पाश्चात्य विचारवंताचे शैक्षणिक विचार प्रसिद्ध आहेत. देशभक्ती आणि शिक्षण याविषयी विचार करताना रसेल यांनी राष्ट्रीयत्वाचा ऊहापोह केला आहे. आणि राष्ट्रीयत्वाबाबत कोणते आक्षेप येऊ शकतात याचा विचार करताना ते म्हणतात –

There is the objection that the teaching of hatred, which is a necessary part of a nationalistic education is in itself a badthing. But over and above all these, there is the purely intellectual objection that the teaching of nationalism involves the teaching of false propositions.

राष्ट्रीयत्वाचे शिक्षण, राष्ट्रीय शिक्षण हे स्वभावतःच इतरांचा मत्सर करण्यास शिकविते असा श्री. रसेल यांचा दृष्टिकोन आहे. अनेक उदाहरणांद्वारा त्यांनी हे

पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे की राष्ट्रीय अभिमान हा आणखी कोणाविषयीतरी द्वेष निर्माण करतो. आपला इतिहास चांगला तर दुसऱ्यांचा तुलनेने वाईट असलाच पाहिजे. आपली भाषा श्रेष्ठ तर इतरांची कनिष्ठ असलीच पाहिजे, असा दृष्टिकोन आपोआप तयार होतो असे रसेल यांचे म्हणणे आहे. एका मर्यादित अर्थाने व विशिष्ट परिस्थितीत रसेल यांचे म्हणणे योग्य वाटले तरी टिळकांना अभिप्रेत असलेले राष्ट्रीय शिक्षण हे अशा प्रकारच्या मत्सरयुक्त अभिमानावर आधारलेले मुळीच नव्हते. टिळकांचा दृष्टिकोन अधिक व्यापक आणि म्हणूनच अधिक व्यवहार्य, अधिक स्वीकार्य असा आहे. इंग्रजी विद्येमुळे जे सुपरिणाम घडून येतात त्यांचीही चर्चा टिळकांनी केली आहे...

"इंग्रजी इतिहास, इंग्रजी वाङमय, इंग्रजी शास्त्रे, इंग्रजी हुन्नर वगैरे विद्या कोणाही विद्यार्थ्याचे मन विकसित करून त्याच्या अंगात व मनात हुरूप, देशाभिमान वगैरे सद्‌गुण उत्पन्न करण्यास लायक आहेत या बद्दल वाद नाही. बुद्धीची कुशाग्रता वाढविण्यास, हिंदुस्थानातील न्याय व्याकरणादि प्राचीन शास्त्रे किती जरी उपयोगी असली तरी देशाभिमान राज्य व्यवस्था, राजनीती, देशाची नैतिक आणि सांपत्तिक अभिवृद्धी, राष्ट्राराष्ट्रांचा परस्परसंबंध वगैरे देशाचा उत्कर्ष होण्यास ज्या विषयांचे ज्ञान लागते त्या विषयांचे शिक्षण या आमच्या जुन्या शाब्दिक शास्त्रांपासून होत नाही."

परकीय देश, परकीय वाङ्मय, परकीय इतिहास यांबद्दल टिळकांना योग्य तो आदरच होता. एवढेच नव्हे तर या अभ्यासाने मन विशाल बनेल असेच त्यांना वाटते. रसेल यांनी उपस्थित केलेला मुद्दा टिळकांच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाबाबत विचारातच घेण्याचे कारण नाही. कारण टिळकांना अभिप्रेत असलेले राष्ट्रीय शिक्षण हे द्वेषमूलक नसून स्वाभिमानवर्धक आहे. परक्यांची विद्या श्रेष्ठ खरी पण ती पचवून मगच तिचा स्वीकार केला पाहिजे असे टिळकांचे सांगणे आहे.

देशभक्ती आणि राष्ट्रीयत्व यांसंबंधी विचार करताना बर्ट्रांड रसेल यांनी आर्थिक मुद्याचा विचार केला आहे. सामान्यपणे अविकसित देशात भांडवलाचे देश दोन प्रकारे येऊ इच्छित असतात; त्या देशांकडे बघण्याची वृत्ती बाजारपेठ म्हणून आणि कच्च्या मालाचा पुरवठा करणारा देश म्हणून अशीच असते. यापासून अविकसित देशांचा राष्ट्रवाद निर्माण होतो.

"The nationalism of the weaker nations is a defence against that of the predatory nations."

असे बर्ट्रांड म्हणतात. लूट करणाऱ्या देशांच्या विरूद्ध संरक्षक कवच म्हणून राष्ट्रीयत्व निर्माण होते, असे रसेल यांचे मत आहे. टिळकांचा राष्ट्रवाद व राष्ट्रीय शिक्षणाबाबतची त्यांची संकल्पना या मुद्द्याशी मिळतीजुळती आहे. लॉर्ड कर्झन

यांनी शिक्षण खात्याला वेठीस धरून शिक्षणातील स्वातंत्र्याचा संकोच करण्याचा घाट घातला होता. इंग्रजी शिक्षणाची सुरुवात या देशात झाली. लोकांचे डोळे उघडू लागले. इंग्रजी राज्यव्यवस्थेची वाढ झाली. पण या देशातील सर्व व्यापार, संपत्ती, आणि कर्तृत्व यांचा एक वेगळाच परिणाम घडून आला. "ज्या पाश्चिमात्य विद्येच्या योगाने ह्या गोष्टी आम्हास थोड्याबहुत कळू लागल्या तिची पूर्वसंकल्पाप्रमाणे वाढ करण्याचे सोडून देऊन हे वाघिणीचे दूध पानचट बनवता येईल या उद्योगास लॉर्ड कर्झनसारखे पुढारी लागलेले आहेत." असे स्पष्टपणे टिळकांनी सांगितले आहे.

रसेल यांच्या विचारांप्रमाणे टिळकांनी इंग्लंडला लूट करणारा देश ठरविले आहे. आणि स्वभाविकपणेच ही लूट थांबावी म्हणून आपले वैभव आपणच वाढविले पाहिजे, आपली संपत्ती आपण राखली पाहिजे आणि हे सर्व करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे असे टिळकांचे प्रतिपादन आहे. राष्ट्रीय शिक्षणच भारतासारख्या परतंत्र देशाला या औद्योगिक व आर्थिक घसरणीपासून वाचवू शकेल असा टिळकांचा विश्वास आहे.

हा मुद्दा मांडताना टिळकांना "राष्ट्रीय शिक्षणाद्वारा राष्ट्रीयत्व निर्मिती" हीच गोष्ट अभिप्रेत आहे असे त्यांच्या सर्व विचारांवरून दिसते.

राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेमुळे राष्ट्राला एक चेहरामोहरा मिळतो. कामाला दिशा मिळते. समूहजीवनासाठी, सहजीवनासाठी एक धागा तयार होतो. हा धागा जात, धर्म, भाषा, प्रांत, राजसत्ता किंवा भौगोलिक निकटता यांवरच अवलंबून असे नाही तर 'राष्ट्रीयत्व' हे या सर्वापलीकडे पोचलेले आहे.

टिळकांची राष्ट्रीयत्वाची, आणि तदनुषंगाने राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना व्यापक आहे. त्याचे क्षेत्र विशाल आहे.

टिळकांची राष्ट्रीय शिक्षणाबाबतची व्यापक कल्पना सूत्रबद्ध स्वरूपात खालीलप्रमाणे मांडता येईल...

केवळ भारतीय विद्यांच्या शब्दज्ञानाने तरूण पिढी राष्ट्रोद्धाराच्या कार्यास समर्थ होऊ शकणार नाही. नवे पाश्चात्य शोध, नवी शास्त्रे यांचा स्वीकार राष्ट्रीय शिक्षणात केलाच पाहिजे. तरच दृष्टी उंचावेल व सामर्थ्य वाढेल. मात्र या पाश्चात्य विद्या पूर्णपणे पचविल्या पाहिजेत. वाघिणीचे दूध पचवून आपले सामर्थ्य वाढविले पाहिजे. सरकारी विद्याखाते व त्यांनी दिलेली अनुदाने यांवर अवलंबून न राहता खासगी शिक्षणसंस्थांनी उद्याच्या भारतासाठी आज स्वतःच नवे शिक्षणक्रम सुरू करावेत. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे कोणत्याही प्रकारचे संकुचित शिक्षण नसून व्यक्तीच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या विकासासाठी उपयुक्त असलेले शिक्षण होय. राष्ट्रीय शिक्षण

अस्मितेवर आधारलेले आहे. पण इतरांच्या अनादराला राष्ट्रीय शिक्षणप्रणालीत स्थान नाही.

पारतंत्र्याच्या काळात स्वातंत्र्याची आकांक्षा करताना स्वत्व फुलविण्यासाठी टिळकांनी जे राष्ट्रीय शिक्षणाबाबत विचार मांडले ते कोणत्याही काळासाठी उपयुक्तच आहेत. त्यांची व्यापक प्रयोजकता कालातीत आहे

'शिक्षण' कोणाच्या हातात असले पाहिजे या मुद्याचा सविस्तर विचार टिळकांनी केला आहे. "शिक्षण राष्ट्रीय होण्यास ते राष्ट्रीतील लोकांच्याच हातात असले पाहिजे." याचा पुनरूच्चार टिळकांनी केला आहे.

लॉर्ड रे किंवा सर जेम्स फर्ग्युसन यांच्यासारख्या तत्कालीन बड्या अधिकाऱ्यांनाही हे तत्त्व मंजूर होते. १८८१-८२ च्या एज्युकेशन कमिशननेही आपल्या अहवालात असे लिहिले आहे की स्वार्थत्याग करून काही सुशिक्षित लोक पुढे आले तर शिक्षणाचे काम सर्वस्वी त्यांच्या हाती देण्यास सरकार तयार होईल. पण त्या काळच्या बऱ्याच एतद्देशिय पुढाऱ्यांनी खासगी शाळांच्या ताब्यात सर्व शिक्षण देण्यास नाखुषी दर्शविली.

याबाबतचा टिळकांचा हा अग्रलेख ४ डिसेंबर १९०६ चा आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना होऊनही पंचवीस वर्षाचा कालावधी लोटला होता. तरीही महाराष्ट्रात व पर्यायाने देशात खासगी शिक्षण संस्थांबाबत स्थिती फारशी समाधानकारक नव्हती असे यावरून दिसते. बहुसंख्य शिक्षणसंस्था सरकारी अनुदान घेऊन सरकारी विद्याखात्याने आखून दिलेला शिक्षणक्रम राबविण्यात गुंतल्या होत्या. स्वत:च्या पायावर उभे राहून स्वत्वाचे शिक्षण देण्याची त्यांच्यात कुवत नव्हती, त्यांची तशी इच्छाही नव्हती असे टिळकांच्या लेखनावरून दिसून येते. त्यामुळे टिळकांच्या राष्ट्रीय शिक्षणाबाबतच्या विचारांचा पाठपुरावा करून त्याप्रमाणे कार्यवाही करतील अशा शिक्षणसंस्था महाराष्ट्रात तरी फारच थोड्या होत्या. राष्ट्रीय शिक्षणाची टिळकांची कल्पना मोठ्या प्रमाणावर या भूमीत रूजली नाही त्याचे कारण मूळ या अनास्थेमध्ये व अनिच्छेमध्ये आहे.

### स्त्री-शिक्षण

स्त्रियांचे शिक्षण हा हिंदुस्थानात मध्ययुगापासून एक 'प्रश्न'च होऊन बसलेला होता. पारतंत्र्याच्या काळातही, इंग्रजी विद्येचा प्रसार होऊन नवे जागरण झाले तरी स्त्रीशिक्षणाबाबत फारशी आस्था दिसून येत नव्हती. एका बाजूने स्त्रीचे कार्यक्षेत्र "चूल व मूल' हेच आहे असे आग्रहाने सांगणारे कर्मठ सनातनी तर दुसऱ्या बाजूने पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे असे सांगणारे सुधारक यांच्या मिश्रप्रवाहात स्त्रीशिक्षण सापडले होते.

प्राचीन काळात तर स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने नुसते शिक्षण मिळत नव्हते तर स्त्रियांचेही व्रतबंध संस्कार होऊन त्यांना ज्ञानाजर्नाची द्वारे खुली केली जात असत. किशोरावस्थेपर्यंत ज्यांना शिक्षण घेता येई त्या स्त्रियांना 'सद्योद्वाहा' असे म्हणत. आणि आयुष्यभर विद्यासंपादनाचे कार्य करणारी स्त्री ही 'ब्रह्मवादिनी' असे.

मध्ययुगात ही परंपरा मोडली; आणि स्त्रीचे क्षेत्र मर्यादित झाले. मराठी राज्यात, राजघराण्यातल्या काही स्त्रियांचे अपवाद सोडल्यास स्त्रीशिक्षणाबाबत फारशी प्रगती झाली नाही. इंग्रजांनी मुलींच्यासाठी काही खास शाळा उघडल्या. तरी सामाजिक दृष्ट्या स्त्रीशिक्षणाबाबत लोक जागृत झाले नव्हते. म. फुले यांनी पुण्यात पहिली शाळा खास मुलींच्यासाठी सुरू केली. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी स्वत: प्रथम शिकून मग शाळेत शिकवण्याचे कार्य केले.

ब्रिटीशांच्या काळात स्त्रीशिक्षणाबाबत खालील मुद्दे नेहमी चर्चिले जात –

स्त्रियांना शिक्षण द्यावे किंवा देऊ नये? स्त्रियांना शिक्षण द्यावयाचे झाल्यास कोणत्या प्रकारचे द्यावे? स्त्रियांच्या शिक्षणाची उद्दिष्टे कोणती असावीत? स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा असाव्यात की त्यांना पुरुषांच्या बरोबरीने सहशिक्षण द्यावे?

या सर्व मुद्द्यांची चर्चा तत्कालीन विचारवंतांनी केली आहेच. टिळकांनीही आपल्या अग्रलेखस्वरूप निबंधाच्या माध्यमातून बरोबर याच मुद्यांची चर्चा केली आहे.

**स्त्रीशिक्षणाबाबत दोन पक्ष व टिळकांची मते** – स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा- फीमेल हायस्कूल स्थापन झाल्यानंतर त्या शाळांचे अभ्यासक्रम, संचालन, व्यवस्थापन यांविषयी समाजात चर्चा सुरू झाली. त्यासंबंधात टिळकांनी आपले विचार मांडताना लिहिले –

"स्त्रीशिक्षण ज्यांस खरोखरीच अवश्य वाटते आहे असे आज पुष्कळ लोक आहेत. परंतु ते शिक्षण आपल्या समाजाची सद्य:स्थिती मनात आणता कोणत्या तऱ्हेचे असावे याविषयी मात्र बराच मतभेद आहे."

टिळक स्वत:ही स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे अशा विचारांचे होते. परंतु त्याचबरोबर स्त्रियांना पुरुषांसारखेच, पुरुषांइतकेच शिक्षण दिले पाहिजे असे मात्र त्यांना वाटत नव्हते.

"फीमेल हायस्कूलातील शिक्षणक्रम" या आपल्या चार लेखांकांत टिळकांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते सूत्रबद्धपणे खालीलप्रमाणे –

स्त्रियांना शिक्षण द्यावे असे पुष्कळांना वाटत असले तरी आमच्या समाजाची स्थिती मनात आणून ते कोणत्या प्रकारचे दिले असता लोकमान्य होईल याचा विचार त्या कामात पडणाऱ्यांनी प्रथम केला पाहिजे. स्त्री व पुरुष यांची आमच्या समाजातील कर्तव्ये मनात आणली तर असल्या शिक्षणापासून स्त्रियांस फायदा न

होता, त्यांस तसे शिक्षण जुलुमाने दिल्यास समाजाचे अहित मात्र होणार आहे. स्त्रियांस शिक्षण दिले असता त्या आपली कर्तव्ये करण्यास अधिक योग्य होतील यात शंका नाही. परंतु आपल्या समाजात ती कर्तव्ये कोणती व आपल्यां समाजाची बंधने मनात आणता ती कर्तव्ये करण्यास कोणत्या प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता आहे व ते कोणत्या प्रकारे देता येईल याचा विचार व्हावा. आपल्या समाजस्थितीस अनुसरून स्त्रियांस जे शिक्षण द्यावयाचे ते स्वतंत्र धंदा करता यावा म्हणून नव्हे, तर संसारात जी त्यांची कर्तव्ये आहेत तीच त्यांस चांगली करता यावी यासाठी द्यावयाचे. ज्यांस आपल्या धर्माचा व गृहकृत्यांचा कंटाळा आलेला नाही, अशाच पण थोडेसे लिहितावाचता येणाऱ्या स्त्रिया आजमितीस पाहिजे आहेत. स्त्रियांस पुरुषांप्रमाणे कारकुनीचा किंवा ग्रंथकारांचा धंदा कर्तव्य असेल तर सध्या ( त्या काळी ) असलेला शिक्षणक्रम योग्य आहे. कारागीरांस ज्याप्रमाणे धंदा मुख्य व शिक्षण हे उपांग असते त्याचप्रमाणे बायकांसही साधारणत: गृहकृत्य मुख्य व शिक्षण आनुषंगिक आहे.

टिळकांची ही मते नव्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी युगात फारशी पचणारी नाहीत. आधुनिक काळात स्त्रियांना वेगळा शिक्षणक्रम हवा असेल तर तो मिळू शकतो. पण पुरुषांच्या शिक्षण पद्धतीत त्यांना प्रवेशच नाही असे होत नाही.

इ.स. १८१४ मध्ये अमेरिकेहून आलेल्या मिशनऱ्यांनी मुलींसाठी वेगळ्या शाळा काढल्या. पण त्यांना त्यासाठी बराच त्रास सोसावा लागला. राजा राममोहनरॉय, नाना शंकरशेठ, लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर इ. विचारवंत स्त्रीशिक्षणाच्या बाजूने उभे राहिले होते. इ.स. १८५१ मध्ये ज्योतिबा फुले यांनी मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा सुरू केली. स्त्री शिक्षणाला उपकारक असे वातावरण महाराष्ट्रात व देशात निर्माण होते. टिळकही शिक्षणाच्या बाबतीत स्त्रीविरोधी होते असे दिसत नाही. पण ‘ हुजुरपागा ’ हायस्कूलच्या निमित्ताने त्यांनी जे विचार केले त्यांचा सारांश असा की या शाळेत ज्या प्रकारचे शिक्षण दिले जात आहे ते समाजाला हितकारक ठरणार नाही. ४ ऑक्टोबर १८८७ रोजी “ स्त्री शिक्षणावर शेवटचे दोन शब्द ” या नावाने लिहिलेल्या अग्रलेखात ते म्हणतात –

“ आपले विवाह प्रौढपणी होऊ लागले. आपली अविभक्त कुटुंब संस्था मोडून गेली. आपली धर्म व नीती यांची बंधने शिथिल झाली व आपल्याकडील मध्यम स्थितीतील गृहस्थ लोक दोन पैसे संग्रही राखून राहू लागले, म्हणजे तुमच्या इंग्रजी शिकलेल्या, पियानोवर सुस्वर गाणाऱ्या व किंडर गार्टन डान्स नाचणाऱ्या व सीता, अहिल्याबाई यांच्याऐवजी ग्रेस डार्लिंग व एलिझाबेथ यांच्या गोष्टी सांगणाऱ्या, स्त्री हायस्कूलातून निघालेल्या मुलीस किंमत येईल.”

टिळकांचे स्त्री शिक्षणाबाबतचे हे विचार बरेचसे एकांगी, परंपराप्रिय व अभिनिवेशपूर्ण वाटतात. आगरकरादी विचारवंतांनी टिळकांच्या विचारांचे खंडन केले आहेच. पण आधुनिक काळातील विचारवंतांनीही टिळकांबद्दल पूर्ण आदर राखून या विचारांचा विरोधच केला आहे.

**सहशिक्षण आणि वेगळे शिक्षण** – स्त्रीपुरुषांच्या शिक्षणाबाबत टिळक सहशिक्षणाच्या बाजूने उभे राहात नाहीत. सहशिक्षणामुळे मुले अधिक सभ्य आणि सुसंस्कृत होतात व मुली अधिक धीट आणि खंबीर मनाच्या होतात असे त्या काळातही अनेकांचे मत होते. टिळकांना सहशिक्षण तर मान्य नव्हतेच पण केवळ वेगळ्या ठिकाणी शिक्षण देऊन पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षण देणे टिळकांना मान्य नव्हते. पुरुषांप्रमाणे स्त्रियांना शिक्षण देण्याची प्रथा युरोपीय देशांतून आली. पण भारतीय समाजरचना, परंपरा, संस्कृती व त्या नव्या सुधारणा पचविण्याची त्या समाजाची ताकद या सर्वांचा विचार करता मुलींना वेगळे शिक्षण--- नुसते वेगळ्या ठिकाणी शिक्षण नव्हे- देणे आवश्यक आहे असे टिळकांनी प्रतिपादले.

स्त्री शिक्षणाचा प्रश्न अनेकांनी स्त्री-पुरुष समानता आणि स्त्री स्वातंत्र्य व पुरुषदास्यमुक्ती या दोन गोष्टींशी निगडीत केला होता. याबाबत टिळकांनी स्पष्ट लिहिले आहे –

"स्त्रियांनी पुरुषांप्रमाणे स्वतंत्र धंदे करून त्यांनी पुरुषांच्या दास्यातून मुक्त होऊ नये असे आम्ही बिलकुल म्हणत नाही. तथापी हा वर्षशतकांचा किंवा सहस्त्रांचा प्रश्न आहे. स्त्रियांना प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे.

त्या सुशिक्षित झाल्या पाहिजेत, त्या निरक्षर राहता कामा नयेत याबाबत टिळकांचे दुमत नव्हते. टिळकांचे म्हणणे असे की हायस्कूलचे शिक्षण हा केवळ प्रायमरी शिक्षणाचा उत्तर भाग असता कामा नये. प्राथमिक शिक्षणाबाबत स्त्री आणि पुरुष असा भेद केला नाही तरी चालण्यासारखे आहे. पण उच्चशिक्षण-हायस्कूलचे-मात्र स्त्रियांसाठी तरी वेगळ्याच पद्धतीने दिले पाहिजे, पाश्चात्य देशांची समाजरचना व समाजस्थिती स्त्रीपुरुष सहशिक्षणाला किंवा समान अभ्यासक्रमाला अनुकूल वाटत असली तरी भारतीय वातावरणात स्त्रीला आपले अस्तित्व वेगळ्याच स्वरूपात प्रकट करावे लागते. अगदीच 'चूल व मूल' या स्वरूपात नसतील, पण स्त्रीला कौटुंबिक कर्तव्येच प्रामुख्याने पार पाडावी लागतात. ती पार पाडण्यास स्त्री समर्थ होईल अशा तऱ्हेचेच शिक्षण स्त्रीला देणे आवश्यक आहे असे टिळकांचे ठाम प्रतिपादन आहे.

स्त्रीशिक्षणाचे हेतू केवळ पुरुषदास्यमुक्ती व स्वातंत्र्यप्राप्ती हे असता कामा नयेत असा टिळकांच्या विवेचनाचा निष्कर्ष आहे.

रविंद्रनाथ टागोर यांनी शुद्ध ज्ञान आणि उपयुक्त ज्ञान असे दोन ज्ञानविभाग कल्पिले आहेत. आपले जीवन सुसंपन्न आणि संपूर्ण करण्यासाठी स्त्रियांनी शुद्ध ज्ञान जरूर मिळवावे पण व्यावहारिक ज्ञानाच्या दृष्टीने स्त्रियांना पुरुषांपेक्षा वेगळे शिक्षण काही अंशी मिळणे अगत्याचे आहे असे टागोरांचे मत आहे.

विवेकानंदांच्या मते धर्म, कला, शास्त्र, गृहरचना, स्वयंपाक, शिवण, आरोग्यशास्त्र, इ. बद्दलचे महत्त्वाचे तेवढे व जरूरीपुरते शिक्षण स्त्रियांना दिले जावे. त्यांनी ललितसाहित्यास अगर कादंबऱ्यांस स्पर्शही करणे बरे नव्हे.

टिळकांची मते विवेकानंद, टागोर यांच्या मतांशी बरीचशी जुळणारी आहेत. टागोरांची भूमिका अधिक व्यापक आहे. पण स्त्रीशिक्षणविषयक मतांबाबत टागोर आणि विवेकानंद यांच्यामध्ये टिळक आहेत असे दिसते. टिळकांच्या स्त्री शिक्षण विषयक भूमिकेचे दोन पदर आहेत.

❖ स्त्रियांना लिहितावाचता आले पाहिजे.
❖ शिक्षणामुळे स्त्रियांना गृहकृत्ये व सांसारिक कर्तव्ये उत्तम रीतीने पार पाडता आली पाहिजेत.

हा दृष्टिकोन व्यक्त करताना टिळकांसमोर सामान्यपणे मध्यम वर्गातील स्त्री आहे. उच्च धनवान कुळातील अथवा तळागाळातल्या वर्गातील स्त्रियांच्या शिक्षणाबाबत टिळकांनी फारसा विचार केलेला नाही. थोडक्यात सम्यक्पणे सर्व स्त्रीसमाज डोळ्यापुढे ठेवून स्त्रीशिक्षणाचा विचार करण्यापेक्षा तत्कालीन मध्यमवर्गीय समाजातील स्त्रियांचे प्रश्न डोळ्यापुढे ठेवून टिळकांनी आपले विचार मांडले आहेत. एवढ्या समाजापुरते ते विचार सुसंगत वाटले तरी स्त्री शिक्षणाचा प्रश्न त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सुटेल असे त्या विवेचनावरून वाटत नाही.

आपल्या विचारांच्या पुष्ट्यर्थ टिळकांनी एडिंबर्ग रिव्ह्यू या प्रसिद्ध त्रैमासिकातील विचारांचा हवाला दिला आहे. त्याचप्रमाणे 'नाइंटिंथ सेंच्युरी' या नावाच्या नियतकालिकात मिस सिव्हले या नावाच्या बाईंचा एक निबंध आला होता त्याचाही हवाला टिळक देतात.

सिव्हले यांच्या मते लहानपणी मुलामुलीत काही भेद नजरेस येत नाहीत. पण मुले जरा मोठी झाली की अंतर दृष्टीस पडते. मुलगा धीट, वांड व गडबड्या होतो. त्याला घराबाहेर पडायचे असते. मुलगी स्वभावत:च गरीब असते. तिचे मन हळूहळू भातुकल्या वगैरे खेळाकडे जाऊ लागते. पुढे जसजशी जास्त वर्षे होतात त्या मानाने हा भेद बळावत जातो. दिशा भिन्न होतात. दिशा भिन्न झाल्या की कार्याचाही भेद होतो.

सिव्हले बाईंनी हा निबंध इंग्लंडमधील वस्तुस्थितीला धरून लिहिला होता.

इंग्लंडमध्ये भारताच्या मानाने त्या काळी प्रौढ विवाह अधिक होत. बहुतेक स्त्रिया २०-२१ व्या वर्षी विवाहित होत. ( हा लेख ६ मार्च १८८८ चा आहे ) हिंदुस्थानात त्या काळी ऋतुप्राप्तीपूर्वीच मुलींची लग्ने होत. ही गोष्ट टिळकांनी लक्षात घेतली व सिव्हले यांच्या निबंधाचा आधार घेतला व स्त्री शिक्षणाबाबत सूचना केली ती अशी –

"मुलींच्या आहेत त्या शाळा सुधारून व्यवस्था नीट केल्यास १०-११ वर्षापर्यंत, म्हणजे साधारणरीत्या विवाहापूर्वी मुलीस लेखन-वाचनं साधारण नीट शिकविता येईल. आता पुढील शिक्षणाची तजवीज करावयाची ती मुलगी सासरी गेल्यावर, घरचे थोडेबहुत काम संभाळून, राहिल्या वेळात तिला उपयुक्त विषयांची माहिती मिळेल अशा रीतीने केली पाहिजे. मुलांप्रमाणे सात किंवा आठ यात्रा करून अकरा वाजल्यापासून पाच वाजेपर्यंत त्यांच्याकडून घोकंपट्टी करवून शिवाय राहिल्या वेळात त्यांनी शाळेतील धडे करावे हे त्यांच्या पुढील कर्तव्यास अगदी विरूद्ध आहे."

हिंदुस्थानातील स्त्री शिक्षण हे सरसकट शिक्षणाच्या प्रक्रियेप्रमाणे न देता देशकालपरिस्थिती पाहूनच दिले पाहिजे, त्याबाबत कोणताही हट्टाग्रह असता कामा नये या टिळकांच्या विचारांशी कोणीही सहमत होईल.

**स्त्री शिक्षण आणि सामाजिक सुधारणा** – टिळक आगरकरांच्या काळी 'सामाजिक की राजकीय' हा वाद खूपच रंगला होता. केसरी राजकीय सुधारणांचा पुरस्कर्ता तर सुधारक सामाजिक सुधारणांचा पुरस्कर्ता. टिळकांना सामाजिक सुधारणा नको होत्या असे नव्हते. तर त्या वरून लादलेल्या नसाव्यात असे त्यांचे मत होते. सामाजिक सुधारणा या समाजाने हळुहळू पचविल्या पाहिजेत. त्यांचे अभिनिवेशाने अवडंबर माजविता कामा नये असे टिळकांना वाटत आले होते. व याच मताचा त्यांनी सातत्याने पुरस्कार केला.

स्त्री शिक्षण आणि सामाजिक सुधारणा यांचा विचार टिळक समांतर रीतीनेच करतात. ही दोन क्षेत्रे वेगळी आहेत, त्यांच्या वेगळ्या वाटा आहेत असे त्यांना वाटत नव्हते. 'सुधारक' पत्र सुरू झाले आणि केसरीत काही आठवड्यांनी संपादकीय लेख आले. त्यांत टिळक म्हणतात –

"विद्या पसरल्याशिवाय सुधारणेच्या संस्था एकदम शिव्यांचा वर्षाव करून अगर राजाश्रय मागून होणार नाहीत. विद्यादान म्हणजे सोपपत्तिक विचार करण्याची शक्ती देशकालवर्तमान पाहूनच लोकांस दिली पाहिजे."

विद्याप्रसार आणि सामाजिक सुधारणा या परस्परावलंबी आहेत असे टिळकांचे मत आहे. पण एक गोष्ट मात्र या सर्व विवेचनावरून ध्यानात येते ती अशी की

सामाजिक सुधारणांतर्गत ज्या अनेक बाबी येतात त्यातील मद्यपानबंदी एवढ्या एकाच सामाजिक सुधारणेचा टिळक मोकळेपणाने पुरस्कार करतात. केशवपनबंदी, बालविवाहबंदी, विधवाविवाह, स्त्री शिक्षण वगैरे सुधारणा केल्या जाऊ नयेत असे त्यांनी म्हटलेले नाही. पण या सुधारणांबाबत ते नेहमीच ' सशर्त ' होते. या सुधारणा कराव्यात असे म्हणताना ते अनेक शर्ती घालत.

स्त्री शिक्षण विषयक सुधारणांबाबत टिळकांनी कोणकोणत्या शर्ती घातल्या याची कल्पना पूर्वीच्या विवेचनात दिलेली आहेच. टिळक हे स्त्री शिक्षणाचा मुक्तपणे पुरस्कार करू इच्छित नव्हते. स्त्री शिक्षण हे संसार स्वास्थ्यास अनुकूल ठरेल एवढ्याच मर्यादेपर्यंत द्यावे असे त्यांचे मत होते. सामाजिक सुधारणांच्या संदर्भात स्त्री शिक्षणाचा विचार बेतानेच करावा असे त्यांना वाटते.

## शिक्षक

शिक्षण प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक. शिक्षक चांगला तर शिक्षण चांगले. जसा शिक्षक तसे शिक्षण. प्राचीन भारतीय संस्कृतीने गुरू हाच ब्रह्मा, गुरू हाच विष्णु, गुरू म्हणजे साक्षात् परब्रह्म अशी गुरूपदाची संभावना केली आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञांनीही जीवनाच्या घडणीत शिक्षकाचे फार मोठे स्थान असल्याचे मान्य केले आहे.

शिक्षक हे विद्यार्थ्यांपेक्षा अधिक अनुभवी असतात. भविष्यकाळात ते अधिक सूक्ष्मपणे पाहू शकतात. मात्र सर्वच व्यक्तींना शिक्षकाची भूमिका पार पाडता येणार नाही. अभिरूची व प्रशिक्षण या दोन गोष्टींवर शिक्षकाची यशस्विता अवलंबून आहे. शिक्षकांच्या प्रशिक्षणास व त्याला शास्त्रीय बैठक प्राप्त करून देण्यास खरी सुरूवात पाश्चात्य शिक्षणशास्त्रज्ञ हर्बर्ट याने केली.

टिळकांनी आपल्या काही निबंधात शिक्षकांविषयी आपले विचार व्यक्त केले आहेत. १७ व २४ ऑक्टोबर आणि ७ नोव्हेंबर १९०५ या दिवशी टिळकांनी केसरीत लिहिलेल्या अग्रलेखांचे शीर्षक आहे...

"हे आमचे गुरूच नव्हेत"

हे अग्रलेख लिहिण्यास एक निमित्त घडले. डेक्कन कॉलेजचे तत्कालीन प्राचार्य श्री. सेल्बी यांनी त्यांच्या एका जुन्या विद्यार्थ्याला पाठवलेले एक पत्र तेव्हाच्या इंदुप्रकाश या पत्रात प्रसिद्ध झाले. सेल्बी यांनी लिहिलेल्या पत्रात जे विचार होते, त्यांवरून टिळकांना या पत्राचा दोन मुद्यांबाबत समाचार घ्यायचा होता.

- स्वदेशी चळवळीत पडणारे विद्यार्थी
- खासगी व सरकारी शाळांतील अशा विद्यार्थ्यांचा गुरूशिष्यसंबंध.

त्या काळात स्वदेशी चळवळीत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना समज, दंड, निलंबित करणे अथवा संस्थेतून हाकलून देणे, अशा प्रकारच्या शिक्षांना तोंड द्यावे लागत असे. शिक्षण संस्थांनी स्वदेशी चळवळीत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अशी भूमिका घ्यावी हे टिळकांना पसंत नव्हते. टिळकांनी जेथे शिक्षक म्हणून काम केले त्या फर्ग्युसन कॉलेजमध्येही असा प्रकार झाला तेव्हा त्याची जाहीर चर्चा करणे टिळकांना आवश्यक वाटले. 'शिक्षक' या भूमिकेविषयी टिळकांच्या कल्पना स्वतंत्र होत्या. त्यांचे वडिल शिक्षक होते. ते स्वत: तर शिक्षक होतेच. त्यामुळे 'गुरू' या पदाविषयी टिळकांनी विषेश आस्थेने पण चिकित्सक बुद्धीने आपले विचार मांडले आहेत.

**प्राचीन काळातील गुरू –** शिक्षकांविषयी चर्चा करताना टिळकांनी काळातील गुरूपरंपरेचा इतिहास कथन केला आहे. आश्रमीय पद्धतीत 'गुरू' अत्यंत नि:स्वार्थी, ज्ञानपिपासू, सततोद्योगी, नि:स्पृह आणि चिंतनशील असत. त्यांचा निवास प्रामुख्याने निसर्गाच्या सान्निध्यात असे. प्राचीन भारतीय 'गुरू'ची ही वैभवशाली परंपरा मुद्दाम सांगण्याचा टिळकांचा उद्देश असा होता की विद्यमान शिक्षकाची प्रतिमा त्या पार्श्वभूमीवर कशी दिसते याचे चित्र आपोआप स्पष्ट व्हावे.

आश्रमीय शिक्षक एकनिष्ठेने काम करणारे असत. स्वाध्याय व निरपेक्ष अध्यापन यात त्यांची निष्ठा केंद्रित झालेली असे. गुरू कडक, शिस्तप्रिय, मेहनती पण प्रेमळ असत. आश्रमात गुरू आणि शिष्य यांचे सान्निध्य निकटचे असे. अत्यंत कर्तव्यतत्पर अशा गुरूबद्दल स्वाभाविकपणे पूज्यबुद्धी उत्पन्न होत असे. गुरूंच्या आश्रमात शांतपणे, स्वतंत्र वृत्तीने, समबुद्धीने, निर्लोभीपणाने खालील गोष्टींचा विचार होई –

स्वधर्माची शक्ती कशात आहे. निरनिराळ्या वर्णातील लोकांनी कोणती कामे करून सामाजिक व्यवस्था दृढ ठेवावी. धर्म-अधर्म व नीती-अनीती विचार, राजाचे धर्म, प्रजेचे धर्म; राजा उच्छृंखल झाला तर प्रजेने काय करावे, प्रजा कर्तव्यपराङ्मुख झाली तर राजाने काय करावे.

टिळकांनी प्राचीन काळातील गुरूची कर्तव्ये व त्याचे स्थान याबाबत तपशीलवार विवेचन करून आधुनिक काळात गुरूची स्थिती कशी आहे याचे साधार विवेचन केले आहे.

आधुनिक काळात ( ब्रिटीश काळात ) गुरूचे स्थान कोणत्या स्वरूपाचे आहे, ते कसे असले पाहिजे, विद्यागुरूचे महत्त्व कोणते याबाबत टिळकांनी केलेल्या चर्चेचा गोषवारा असा –

❖ धर्मशास्त्रात पित्यापेक्षा अधिक मान गुरूस द्यावा असे सांगितले आहे. ते अशांच्या बाबतीत की जे गुरू ज्ञानसंपन्न, नि:स्पृह व निर्मळ असतात.

- देशात कोणतीही सार्वजनिक चळवळ जेव्हा उत्पन्न होते तेव्हा स्वतंत्र देशातील विद्यापीठात असलेले विद्यागुरू प्रचलित विषयांवर आपली मते उघडपणे प्रसिद्ध करतात आणि त्यांना जी गोष्ट राष्ट्रहिताची वाटेल तीच विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवितात. असे गुरू हेच खरे गुरू.
- राजाचा नोकर म्हणून - सत्तेचा अंकित म्हणून - लोभाने बांधला गेलेला अथवा त्या लोभाचा अनेक वर्षे मनावर परिणाम होऊन विचार व मन संकुचित झालेला गुरू हा खरा शिक्षक नव्हे.
- पाश्चात्य देशांतील विद्यापीठांतून राष्ट्रहिताच्या चर्चा करण्याची मुभा शिक्षकांना आहे. हिंदुस्थानातही तसे व्हायला हवे.
- सरकारी शिक्षण संस्थांतील शिक्षकांकडून - ते सत्तेचे अंकित असल्यामुळे - राष्ट्रीय विचारांचे वळण विद्यार्थ्यांना लागू शकणार नाही.
- विद्यार्थ्यांनी चळवळीत पडू नये अशा प्रकारचा आदेश शिक्षण खात्याने काढला. चेंबर्लेनच्या चळवळीत इंग्लंडमधील ऑक्सफर्ड-केंब्रिजचे विद्यार्थी बाहेर पडलेच.
- खासगी शिक्षण संस्थामध्येही अशा प्रकारचे सरकारधार्जिणे धोरण राबविण्यात येत असेल तर त्या संस्थांचा मूळ उद्देश नष्ट होतो. विद्यार्थ्यांनी सार्वजनिक चळवळीत पडू नये अशा सबबीवर स्वदेशी मालाच्या चळवळीपासूनही त्यांना अलिप्त राखण्याचा जे प्रयत्न करतात त्यांस ' गुरू ' म्हणण्यापेक्षा पोटभरू म्हणावे.
- सत्ताधीशांच्या आज्ञा राबविण्याने गुरू हे खरे शिक्षक किंवा मास्तर नसून निव्वळ ' टास्क-मास्तर ' आहेत.
- सरकारी व खासगी शाळातील शिक्षक हे शेक्सपियर, मिल्टन, बेकन इ. शिकविण्याइतके पंडित आहेत. तसे ते शिकवितात याबद्दल त्यांना मान दिला पाहिजे. पण सामाजिक व धार्मिक बाबतीत विद्यार्थ्यांना जागरूक करण्याच्या कामी ते उपयोगी पडत नाहीत.
- काम, क्रोध, भय, लोभ, मोह किंवा बुद्धिभ्रंश यांच्या तडाख्यात सापडून गुरू राजकीय बाबतीत सरकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नोकर झाल्याने विद्यार्थ्यांस सार्वजनिक चळवळीपासून पराङ्मुख करण्यास प्रवृत्त होतात तेव्हा ते खरा गुरूशिष्य धर्म पाळत नाहीत.

**शिक्षक : तत्वज्ञ, मार्गदर्शक व मित्र** – भारतीय व पाश्चात्य शैक्षणिक तत्त्वज्ञानानुसार शिक्षक हा निव्वळ धडे शिकविणारा, शब्द शिकविणारा अथवा ज्ञानघटक देणारा नसतो तर तो विद्यार्थ्यांचा मित्र, मार्गदर्शक असतो. हे मार्गदर्शन शिक्षक एका विशिष्ट तत्त्वज्ञानानुसार करतो. म्हणून तो तत्त्वज्ञ. तत्त्वाला जाणतो तो ' तत्त्व-ज्ञ '. विद्यार्थ्यांचे, समाजाचे, राष्ट्राचे हित कशात आहे ते तत्त्व खरा

शिक्षक जाणतो.

या दृष्टीकोनातून टिळकांनी ज्या काळात हे लेख लिहिले त्या काळातील गुरूंची तपासणी केली असता टिळकांना जे आढळले त्यावरून त्यांनी आपले विचार "हे आमचे गुरूच नव्हेत" या तीन लेखांकांत मांडले.

**गुरू कोणाला म्हणावे ?** – हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासात एकदा काळ असा होता की चातुर्वर्ण्यातील तरूण पिढीला नीती, ज्ञान, विनय, शौर्य वगैरे गुणांनी संपन्न करून राष्ट्राचे काम अव्याहत जारीने सुरू ठेवण्याची ज्या लोकांवर जबाबदारी होती ते व्यावहारिक लोभापासून अलिप्त, शांत, ज्ञानसंपन्न, जितेंद्रिय, नि:स्पृह आणि सत्त्वशील असत. असे जे असतील त्यांना गुरू म्हणावे.

**शिक्षकाचे स्वातंत्र्य** – शिक्षक हा स्वतंत्र बुद्धीचा, स्वयंप्रज्ञेने आचरण करणारा असला पाहिजे. त्याने राजसत्तेचा अंकित म्हणून वावरता कामा नये. प्रसंगी राजालाही खडसावणारा, आणि स्वत:च्या मताशी एकनिष्ठ असणारा असेल तोच खरा शिक्षक होय.

**शिक्षकाचे कर्तव्य** – तरूण पिढीस राष्ट्रहिताच्या गोष्टी सांगणे आणि तरूणपणापासूनच तदनुकूल आचरण करण्याची तरुणांच्या मनाची प्रवृत्ती करणे हेच खऱ्या विद्यागुरूचे कर्तव्य होय. शिक्षक हा केवळ शेक्सपियर, स्पेन्सर शिकवणारा, शब्दार्थ सांगणारा असा नाही तर त्याने विद्यार्थ्यांच्या संपूर्ण घडणीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**गुरू-शिष्य संबंध** – गुरू-शिष्याचे संबंध उदात्त स्वरूपाचे असतात. सरकारी धोरणे राबविणारे निव्वळ 'टास्क-मास्तर' म्हणून शिक्षकाची भूमिका असेल तर तो केवळ एक भाडोत्री अंमलदार म्हणावा लागेल.

**परकी गुरू आणि स्वतंत्र गुरू** – परकीय अमलाखालील, परकीय राज्यकर्त्यांनी जिंकलेल्या लोकांस मेहरबानीने शिक्षण देण्याकरिता नेमलेले परकी गुरू आणि स्वतंत्र देशातील स्वतंत्र गुरू यात जमीन अस्मानाची तफावत आहे. परकी गुरू कितीही विद्वान अथवा संभावित असले तरी विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रीय तत्त्वांची अभिवृद्धी करून विद्यार्थ्यांचे शील राष्ट्रीय बनविण्यास परकी गुरू निरूपयोगी होत. या मुद्याच्या पुष्ट्यर्थ टिळक जपानचे उदाहरण देतात. जपानच्या लोकांनी विद्या शिकविण्याकरिता परदेशातले गुरू आणले. पण विद्या शिकल्यावर त्या गुरूंना स्वदेशी रवाना केले. टोगो, इटो इ. शूर पुरुषांनी जपान हे राष्ट्र वर आणले. विद्या शिकविण्यासाठी ते परदेशी गेले होते. पण त्यांची जपानबद्दलची निष्ठा यत्किंचितही कमी झालेली नव्हती.

आपल्या या मुद्याचे स्पष्टीकरण करण्यासाठी टिळक कच आणि शुक्राचार्य

यांचे उदाहरण देतात. दैत्यगुरू शुक्राचार्य आणि देवकुळीतला कच हे दोन वेगळ्याच मार्गातले. पण विशिष्ट विद्या शिकण्या-शिकवण्यापुरते ते एकत्र झाले. कचास विशिष्ट विद्या शिकवण्यापुरतेच शुक्राचार्य गुरू झाले. त्याप्रमाणेच परकी गुरू हे विशिष्ट विद्या शिकवण्यापुरतेच - बेकन, शेक्सपीयर आदि शिकवण्यापुरतेच - या देशात गुरू आहेत. याशिवाय टिळकांनी आणखी एक समर्पक उदाहरण दिले आहे. हिरण्यकश्यपूचा मुलगा प्रल्हाद ! प्रल्हादाला आपल्या मताप्रमाणे शिक्षण देण्यासाठी हिरण्यकश्यपूने अनेक गुरू नेमले होते. पण प्रल्हादाची खरी भक्ती एका विष्णूवर असल्यामुळे या गुरूचा काहीही उपयोग झाला नाही. प्रल्हादाला कृष्णभक्ती शिकविण्याच्या कामी हिरण्यकश्यपूने नेमलेले गुरू जितके निरूपयोगी ठरले तितकेच नवीन पिढीला राष्ट्रभक्ती शिकविण्याच्या कामी सरकारी कॉलेजात सरकारने नेमलेले गुरू निरूपयोगी ठरत आहेत असे टिळकांनी सांगितले आहे. या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की टिळकांचा आक्षेप केवळ ते परकीय गुरू आहेत यावर नाही. हे परकीय गुरू इतरांचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन, विद्यार्थ्यांच्या मनात दास्यवृत्तीचीच जोपासना कशी होईल याची काळजी घेतात, राष्ट्रीय वृत्तीचा अंकुर वाढत असेल तर तो लगेच छाटून टाकतात. परकी गुरूच्या या गुरूपदाला न शोभणाऱ्या वृत्तीला टिळकांचा आक्षेप आहे.

**शिक्षकांसंबंधी टिळकांच्या विचारांची चिकित्सा –** शिक्षणशास्त्रदृष्ट्या पाश्चात्य वा भारतीय विचारवंतांनी ‘शिक्षक’ या संकल्पनेविषयी जे विचार मांडले आहेत त्यांच्याशी टिळकांच्या विचारांची तुलना करता असे दिसते की टिळकांनी शिक्षकाच्या कर्तव्यासंबंधी आपली भूमिका व्यापक असल्याचे मांडले आहे. पण एका विशिष्ट निमित्ताने त्यांनी आपले विचार स्पष्ट केलेले असल्यामुळे या व्यापक भूमिकेचा तपशील मात्र त्यांनी दिलेला नाही.

रविंद्रनाथ टागोर यांच्या मते शिक्षकाने स्वत: विद्यार्थी असले पाहिजे. त्याचे मन अत्यंत संस्कारक्षम व नवनवीन अनुभव व ज्ञान ग्रहण करण्यास तत्पर असले पाहिजे. अशा प्रकारच्या तपशीलाचा विचार टिळकांनी केलेला दिसत नाही.

विवेकानंदांनी शिक्षकाच्या भूमिकेविषयी विचार करताना म्हटले आहे... “विद्यार्थ्याच्या ज्ञानाची पातळी ओळखून त्याला उच्च प्रतीचे ज्ञान व उपयुक्त शैक्षणिक अनुभव अत्यंत सुलभ पद्धतीने देण्याची कला त्याला अवगत असली पाहिजे. विद्यार्थ्यांची जी श्रद्धास्थाने आहेत त्यांना विचलित करण्याचा प्रयत्न शिक्षकांनी कधीही करू नये. यातील उत्तरार्धाबाबत टिळकांची भूमिका सुसंगत वाटते. मात्र पूर्वार्धातील विधानांइतका सूक्ष्म विचार टिळक करत नाहीत. याला एक कारण असावे की टिळकांचे हे लेखन प्रासंगिक आहे.

पाश्चात्य शिक्षणशास्त्रज्ञ रूसो याने शिक्षकाच्या भूमिकेचे विशदीकरण करताना म्हटले आहे... "शिक्षकाला मुलांच्या सहजप्रवृत्तींचे व विकासाच्या निरनिराळ्या अवस्थांच्या वैशिष्ट्यांचे संपूर्ण ज्ञान हवे. शिक्षकाची खरी भूमिका मार्गदर्शकाची आहे. त्याने आपले ज्ञान व अनुभव विद्यार्थ्यांवर लादण्याचा प्रयत्न करू नये.

रूसो काय किंवा हर्बार्ट काय, पाश्चात्य विचारवंतांचा शिक्षकाचा, विद्यार्थ्याचा, मानसशास्त्रीय विचार टिळकांच्या 'शिक्षक-विचारा'त येत नाही. टिळकांची शिक्षणाकडे पाहण्याची दृष्टी, एकूणच शिक्षण-व्यवहाराकडे पाहण्याची दृष्टी, प्रामुख्याने राजकीय स्वरूपाची व आनुषंगिक सामाजिक स्वरूपाची होती. अर्थातच प्राचीन परंपरेचे दाखले देऊन आपली भूमिका विशद करण्याइतके टिळकांचे 'शिक्षक' या संबंधात विवेचन मर्यादित स्वरूपाचे आहे. फ्रॉबेलने शिक्षकाला माळ्याची भूमिका देऊ केली आहे तर रविंद्रनाथांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे शिक्षकाला केवळ पित्याचीच नव्हे तर मातेचीही भूमिका करावी लागते. टिळकांच्या विवेचनात शिक्षकाला पित्यापेक्षा महत्त्वाचे स्थान आहे असे उल्लेख आहेत. पण टिळक शिक्षकाच्या मातृत्वपूर्ण भूमिकेपर्यंत पोचत नाहीत. टिळकांची भूमिका व्यापक असूनही तिचा मानसशास्त्रीय तपशील त्यांनी कोणत्याच स्वरूपात दिलेला नाही.

## विद्यापीठ

प्राचीन भारतात नालंदा व तक्षशिला ही वैभवशाली विद्यापीठे अस्तित्वात होती असे इतिहास सांगतो. या विद्यापीठांतून बहुसंख्य विद्यार्थी आश्रमीय पद्धतीने गुरूसन्निध राहून विद्यार्जन करीत असत. वाङ्मय, तत्त्वज्ञान, इ. बरोबरच वैद्यकशास्त्र, युद्धशास्त्र, न्याय, इ. अनेक विद्याशास्त्राचे प्रगत अभ्यासक्रम या विद्यापीठांतून चालविले जात असत. कालगतीनुसार ही विद्यापीठे संपली. मध्ययुगात धर्मसंस्थांच्या आश्रयाने वाढणारी शिक्षणपद्धती अस्तित्वात आली. आणि नंतर ब्रिटीश अमदानीत १८५७ साली मुंबई, कलकत्ता व मद्रास या विद्यापीठांची स्थापना झाली. ही विद्यापीठे प्रथमत: स्वायत्त दर्जाच्या स्वरूपातच चालविली जात असत. पण हळुहळू विद्यापीठांवर या ना त्या प्रकारे सरकारचे नियंत्रण येऊ लागले. आणि विद्यापीठ ही सरकारच्या मर्जीनुसार चालविलेली शिक्षणसंस्था असे तिचे अप्रत्यक्षरीत्या रूपांतर होऊ लागले.

लॉर्ड कर्झन यांनी त्यांच्या कारकीर्दीत एक युनिव्हर्सिटी बिल नावाचे विधेयक आणले. या विधेयकाचा वरवरचा हेतू विद्यापीठांची सुधारणा करण्याचा असला तरी प्रमुख हेतू - अंतस्थपणे - दोन होते...

- ❖ युनिव्हर्सिटीच्या सेनेटची व सिंडीकेटची व्यवस्था प्रामुख्याने सरकारी अधिकाऱ्यांच्या ताब्यात यावी.
- ❖ सरकारी कॉलेजांवर व विशेषत: खाजगी कॉलेजांवर सेनेटने अधिक नजर ठेवावी.

या युनिव्हर्सिटी बिलाच्या द्वारे अशा रीतीने विद्यापीठांवर अप्रत्यक्ष सरकारी नियंत्रण ठेवण्याचा घाट कर्झन यांनी घातला होता. त्यासंबंधात टिळकांनी आपले विचार काही लेखांमधून मांडले आहेत. टिळकांनी मांडलेले मुद्दे खालीलप्रमाणे –

शास्त्रांचा अभ्यास सतत करून मनन करणारे पुष्कळ विद्वान ज्या ठिकाणी एकत्र राहतात व त्यांची कीर्ती ऐकून दूरदूरचे शेकडो विद्यार्थी विद्याजर्नाकरता जेव्हा त्यांजपाशी येतात तेव्हा एखाद्या स्थळास विद्यापीठ, विद्यामंदिर अथवा विद्याश्रम ही संज्ञा प्राप्त होते. लोकांनी तयार केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन आपले काम भागेल असे सुधारलेल्या राष्ट्रातील युनिव्हर्सिट्यांस वाटत नाही. शास्त्रांचा अभ्यास उत्तरोत्तर वाढत जावा व प्रत्येक शास्त्रात काहीतरी नवीन शोध व्हावा या हेतूने त्या स्थापन झालेल्या असतात. अशा प्रकारची विश्वविद्यालये अमेरिका, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशात आहेत व त्यांचेच अनुकरण करून सरकारने या देशात युनिव्हर्सिट्या स्थापन केल्या आहेत. युनिव्हर्सिटी बिल आणण्याचा इरादा उदात्त असला तरी त्यामुळे युनिव्हर्सिटी ही सरकारी हमालखान्यासारखी होईल. ज्या युनिव्हर्सिट्यांचा गळा सरकारी गवसणीत गेला त्यातील विद्यार्थी स्वतंत्र मताचे, सत्यप्रिय आणि करारी होणार नाहीत. खऱ्या विद्यापीठात राजकीय, सामाजिक, शास्त्रीय, औद्योगिक किंवा व्यावहारिक विषयासंबंधाने निर्भीडपणे विचारपूर्वक मते देणारे विद्वान निपजले पाहिजेत.

युनिव्हर्सिटीच्या द्वारे उच्च प्रतीचे जे शिक्षण हिंदुस्थानातील लोकांना द्यावयाचे ते त्यांना विद्वत्तेच्या शिखरावर पोचविण्याकरता दिले जात नसून सरकारला खालच्या प्रतीच्या जागा भरण्याकरता जशा प्रकारचे नोकर लागतात तशा प्रकारचे नोकर तयार करण्याकरता ते दिले जाते हे बरोबर नाही. हिंदुस्थानात तरूण व सुबुद्ध विद्यार्थीवर्ग असूनही त्याला योग्य ते वळण देण्याच्या कामी युनिव्हर्सिटी कार्य करू शकत नाही.

**टिळकांच्या विद्यापीठ विषयक विचारांची चिकित्सा** – टिळकांनी विद्यापीठासंबंधी जे लेखांक लिहिले त्यात प्रामुख्याने खालील विषयांची चर्चा केली आहे...

लॉर्ड कर्झन यांनी मांडलेले युनिव्हर्सिटी बिल; युनिव्हर्सिटी सेनेट व कारभारी मंडळ; युनिव्हर्सिटीची स्वायत्तता; सरकार आणि युनिव्हर्सिटी यांचा संबंध; युनिव्हर्सिटीचे कार्य व हेतू; युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी, शिक्षक; राष्ट्रीय संदर्भात युनिव्हर्सिटीचे प्रयोजन.

पाश्चात्य वा भारतीय विचारवंतांनी विद्यापीठांचे कार्य, प्रयोजन, यांविषयी विचार करताना विद्यापीठांचे व्यापक, स्वायत्त स्वरूप मान्य केले आहे.

"The University would be primarily a professional school with both a research and teaching function." (H. S. Broudy)

या विधानात वर्णिल्याप्रमाणे विद्यापीठात अध्यापन व संशोधनाचे कार्य होणे आवश्यक आहे. विद्यापीठे ही शिक्षणाच्या विकसित संस्थांच्या स्वरूपात प्रथम युरोपात अस्तित्वात आली. युनिव्हर्सिटी ही प्राथमिक स्वरूपात शिक्षक व विद्यार्थी यांची एक आदानप्रदान करणारी संघटनाच होती.

"The 'universities' in the original meaning of the word were simply societies (or gilds) of masters and students formed for the purpose of mutual help and protection." (William Boyd)

काळ कोणताही असो, विद्यापीठांचा हेतू शिक्षक व विद्यार्थ्यांनी एकत्र येणे हाच प्रामुख्याने होता व आहे. काळानुरूप विद्यापीठांच्या या स्वरूपाला अधिक बंदिस्तपणा, अधिक शिस्त येऊन त्यात विशिष्ट प्रकारचे प्रशासन आले. सेनेट आणि कार्यकारी मंडळ आले. विद्यापीठे चालविण्यासाठी लागणारा पैसा सरकार तर्फे व अन्य धनिकांकडून पुरवला जाऊ लागला. स्वाभाविकपणेच त्यांचे अप्रत्यक्ष नियंत्रण विद्यापीठांवर आले.

विद्यापीठांच्या या स्वरूपावर टिळकांचा मुख्य आक्षेप आहे. विद्यापीठाने परीक्षा घेऊन पदव्या वाटण्याचेच काम केवळ केले तर तरी विद्यापीठे कसली? याबाबत टिळक म्हणतात –

"युनिव्हर्सिटीत परिक्षा घेऊन बी. ए., एम. ए., चे शिक्के ठोकण्यापलीकडे दुसरे काही काम चालत नाही. चान्सेलरपासून सिंडिकेट पर्यंत जो तो आपल्या धंद्यात गुंतलेला. असल्या युनिव्हर्सिटीस विद्यामंदिर म्हणण्यापेक्षा परीक्षा घेण्याकरिता रजिस्टर झालेली कंपनी म्हटले तरी चालेल."

परीक्षा घेऊन पदव्या वाटण्याच्या ठेकेदारी स्वरूपाच्या कार्यावर हा आक्षेप आहे. १८५७ साली हिंदुस्थानात पहिली तीन विद्यापीठे (मुंबई, कलकत्ता, मद्रास) स्थापन झाली तेव्हा त्यांचे हेतू फारच मर्यादित स्वरूपाचे ठेवण्यात आले होते. विद्यापीठे अध्यापनसुद्धा करीत नव्हती, मग संशोधनाचे नावही नको.

विद्यापीठ कायद्याचा हेतु त्याच्या प्रस्तावनेत सांगितलेला होता तो असा –

"वाङ्मय, विज्ञान आणि कला या क्षेत्रात ज्यांनी पारंगतता मिळवली असेल अशा व्यक्तींच्या परीक्षा विद्यापीठाने घ्याव्या व पारंगततेला अनुरूप अशा निरनिराळ्या दर्जाच्या पदव्या देऊन यशस्वी व्यक्तींना गौरवावे."

अर्थातच विद्यापीठे ही विद्वानांची मंडळे नसून ती कारभाऱ्यांची मंडळे होती. विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या कार्याशी त्यांचा काही संबंध नव्हता. विद्यार्थ्यांना

शिकविण्याच्या कामापेक्षा उमेदवारांची परीक्षा घेण्याचेच त्यांचे काम होते. विद्याभ्यासाची कसोटी परीक्षांच्या द्वारा लावावयाची एवढाच त्यांचा विद्याभ्यासाशी व विद्येशी संबंध होता. १९१७ साली सॅडलर कमिशनने आपल्या अहवालात याच गोष्टींचा विचार करून विद्यापीठाच्या स्वरूपात बदल करण्याची आवश्यकता प्रतिपादली.

टिळकांनी सॅडलरच्या आधीच, १८९६ च्या आपल्या लेखांकात ही गोष्ट केव्हाच सांगून टाकली होती. पाश्चात्यांनी विद्यापीठांसंबंधीने जे अभिप्राय व्यक्त केले (संशोधन व अध्यापन) त्यांच्याशी टिळकांचे विचार नेमके जुळतात. १९०४ सालच्या विद्यापीठ कायद्यान्वये विद्यापीठांच्या उद्दिष्टांत बराच बदल घडून आला. विद्यापीठांना स्वत:च्या व्यवस्थेखाली अध्यापन व संशोधन करण्याचा अधिकार मिळाला. टिळकांनी ही गोष्ट आधीच सुचविली होती. विद्यापीठ विषयक प्रश्नांचा सखोल अभ्यास, ऐतिहासिक तपशीलांची पार्श्वभूमी, तार्किक नव्हे पण तर्कसंगत विवेचन, भारतीय परिस्थितीचे अचूक ज्ञान यांच्या द्वारा टिळकांनी पटवून दिले आहे की विद्यापीठे ही सरकारी हमालखाने किंवा पदव्या वाटणारे ठेके न होता राष्ट्रोद्धारासाठी भरीव कार्य करणारी अध्ययन-अध्यापन-संशोधन मंदिरे झाली पाहिजेत.

**शिक्षणाची उद्दिष्टे** – श्री. मलबारी यांनी 'ईस्ट अँड वेस्ट' या नावाचे एक नियतकालिक मासिक स्वरूपात चालविले होते. या नियतकालिकात हिंदुस्थानातील मागासलेल्या जातींचे शिक्षण या नावाचा एक लेख बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज यांनी लिहिला होता. या लेखात सयाजीरावांनी मागासलेल्या जातींच्या शिक्षणाबाबत अडचणी, कर्तव्ये, मार्ग यांसंबंधी विवेचन केले होते. या लेखाची चिकित्सा करण्यासाठी टिळकांनी २३ सप्टेंबर १९०२ रोजी केसरीतून एक स्फुट लिहिले.

सयाजीरावांनी आपल्या लेखात या प्रश्नासंबंधी फक्त तात्विक विवेचन केले आहे असे टिळक म्हणतात. आपल्या मूळ मुद्याचे विवेचन करताना टिळकांनी हिंदुस्थानातील शैक्षणिक परंपरेचा आधार घेतला आहे.

हिंदुस्थानात शिक्षणाची आवश्यकता मानण्यात येत असे ती केवळ आध्यात्मिक उन्नतीसाठीच. प्राचीन काळापासून अशा शिक्षणाचा ओघ अव्याहतपणे सुरू असला तरी सर्वांच्या वाट्याला हे शिक्षण येत नसे. पुढे आधिभौतिक उन्नतीच्या कामी शिक्षणाची आवश्यकता भासू लागली. हा धागा घेऊन टिळकांनी शिक्षणाच्या उद्दिष्टांविषयी विवेचन केले आहे. टिळकांच्या विवेचनाचा सारांश असा –

आध्यात्मिक उन्नतीच्याबरोबर आधिभौतिक उन्नतीच्या कामीही शिक्षणाचा

उपयोग झाला पाहिजे. देशाला सुस्थिती देण्यासाठी सर्व लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. म्हणून भौतिक उन्नतीस कारणीभूत होणाऱ्या शिक्षणाकडे कोणीही पारमार्थिक दृष्टीने पाहण्याचे कारण नाही.

सयाजीराव गायकवाड यांच्या मते शिक्षणाकडे लोक स्वार्थाच्या दृष्टीने पाहतात हे खरे असले तरी हिंदुस्थानातील लोकांचे शिक्षणावर केवळ धार्मिक कर्तव्याप्रमाणे अहेतुक प्रेम आहे यात शंका नाही. टिळकांनी सयाजीराव गायकवाड यांचा हा मुद्दा मान्य केला आहे.

सयाजीराव महाराजांनी आपल्या लेखात असे लिहिले होते की, "कित्येक सुशिक्षित लोक असंतोषामुळे किंवा त्यांना मिळणाऱ्या शिक्षणामुळे अंगवळणी पडलेल्या भाषण पद्धतीमुळे रॅडिकल अथवा स्वातंत्र्यवादी म्हणून पुढे येतात. हे लोक आपली तत्त्वे प्रथम सामाजिक बाबींस लावू लागले तर त्यांच्या राजकीय बाबीतील भाषणप्रवाहात स्वार्थाचे अथवा पंडितवादाचे स्वरूप कधीही येणार नाही.

सयाजीराव महाराजांनी केलेले हे विधान मागासवर्गीय जमातीच्या प्रबोधनाच्या संदर्भात केलेले आहे. स्वातंत्र्यवादी म्हणविणाऱ्या लोकांनी आधी सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला पाहिजे असे त्यांचे मत आहे. त्या मताच्या पुष्ट्यर्थ त्यांनी राजकीय कार्य करणाऱ्यांना चार शब्द सुनावले आहेत. महाराजांचे हे मत टिळकांनी खोडून काढले आहे.

राजकीय क्षेत्रातल्या लोकांनी मागासवर्गीयांस शिक्षण देऊ नका असे कधीही सांगितले नाही. राजकीय क्षेत्रातल्या बहुसंख्य लोकांनी शिक्षण प्रसाराच्या आवश्यकतेवर भर दिलेलाच आहे. ज्या काळात टिळकांनी हा लेख लिहिला त्या काळात वेदपठणाचा अधिकार केवळ ब्राह्मणाचाच आहे काय याविषयी अजून वाद सुरू होता. पण भौतिक शिक्षण सर्वांनाच देण्याविषयी कुणाचेच भांडण नाही असे टिळक सांगतात.

राजकीय क्षेत्रातील लोक शिक्षणाबाबत जे विचार व्यक्त करीत आहेत ते केवळ एखाद्या वर्गाला किंवा गटाला शिक्षण मिळावे म्हणून नव्हे, याबाबत टिळकांनी एक चांगले उदाहरण दिले आहे –

"मिठावरचा कर कमी करण्यासाठी सुशिक्षित लोक जी ओरड करतात ती त्यांना पुरेसे मीठ मिळत नाही म्हणून नव्हे तर पुढे गेलेल्या व मागासलेल्या सर्व जातींकरताच होय."

टिळकांना याठिकाणी हेच सुचवायचे आहे की सामाजिकरीत्या भिन्न आचारविचारांनी भरलेल्या या देशात राजकीयदृष्ट्या ऐक्य होणे आवश्यक आहे व या ऐक्यासाठी शिक्षण आवश्यक आहे.

अशा तऱ्हेने या निमित्ताने देशाचे सामाजिक व राजकीय ऐक्य हे शिक्षणाचे उद्दिष्ट असल्याचे टिळकांनी सांगितले आहे. यावरून टिळकांची शिक्षणाच्या उद्दिष्टांबाबत किती व्यापक भूमिका होती हे दिसून येईल.

शिक्षणाच्या उद्दिष्टांबाबत विचार करताना टिळकांनी त्याचा निखळ शिक्षणशास्त्रदृष्ट्या विचार केलेला नसला तरी शिक्षणाने काय करावे, शिक्षणाने काय घडावे याबाबत टिळकांची भूमिका स्पष्ट दिसते. निरनिराळ्या भारतीय व पाश्चात्य शिक्षणशास्त्रज्ञांनी शिक्षणाची अनेक उद्दिष्टे सांगितलेली असली तरी –

"The good life is the main aim of education."

या शिक्षणाच्या उद्दिष्टाप्रमाणे टिळकांनी शिक्षणाचे व्यापक उद्दिष्ट सांगितलेले आहे, की शिक्षणामुळे आध्यात्मिक व आधिभौतिक उन्नती व्हावी. या उद्दिष्टाचे स्पष्टीकरण टिळकांनी आपल्या अन्य लेखांकांमध्ये पण वेगळ्या संदर्भात दिले आहे. व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्या उन्नतीसाठी शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे.

निरनिराळ्या निबंधातील खालील उद्दिष्टविषयक उल्लेखांवरून टिळकांनी शिक्षणाच्या उद्दिष्टांचा विचार कोणत्या स्वरूपात केला होता ते दिसते...

❖ देशातील शाळांतून जे शिक्षण द्यावयाचे ते काही मोक्षप्राप्तीकरता देत नाहीत. मोक्षप्राप्तीचा मार्ग ज्यांत स्वीकारावयाचा असेल त्यांच्या शाळा दुसऱ्याच ठिकाणी ठेवल्या पाहिजेत. देशातील शिक्षण वास्तविक म्हटले म्हणजे देशातील लोकांची उन्नती होण्यासाठीच आहे.

❖ जेणेकरून देशातील लोकांचे उद्योगधंद्याचे ज्ञान वाढून त्यांच्या निर्वाहाची सोय होईल, त्यांची नीती व देशाभिमान वाढेल, स्वतंत्र रीतीने व इभ्रतीने दिवस काढता येतील आणि राजकीय व सामाजिक बाबतीत हितकारक कल्पनांचा प्रसार होऊन लोकांस आपली स्थिती सुधारण्यास किंवा जास्त सुखकारक करण्यास सापडेल अशा प्रकारचे शिक्षण देशातील सर्व लोकांस मिळणे जरूरीचे आहे.

❖ स्वधर्म व स्वदेश यांच्या शिक्षणाने एक प्रकारची आस्था व कळकळ लोकांच्या मनात उत्पन्न झाली पाहिजे.

❖ जेणेकरून राष्ट्रातील पुरुष व स्त्रिया व मुले अधिकाधिक ज्ञानसंपन्न होऊन राजकीय, सामाजिक, धार्मिक व औद्योगिकदृष्ट्या राष्ट्राची एकजुटीने उन्नती करण्यास प्रवृत्त होतील ते खरे शिक्षण होय. (समग्र लोकमान्य टिळक खंड ३ : केसरी प्रकाशन पुणे ३० : १९७६ : पृ. १८८-१८९)

टिळकांनी मांडलेल्या शिक्षणविषयक उद्दिष्टांमध्ये प्राचीन भारतीय शिक्षणाची उद्दिष्टे व ध्येये आणि आधुनिक काळातील शिक्षणाची उद्दिष्टे व ध्येये यांचा समन्वय दिसून येतो.

प्राचीन भारतीय शिक्षणाचा अध्यात्मविद्येवर विशेष भर असल्याने त्यावेळी मोक्षसाधन व धर्मपालन ही शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे मानली जाऊन शीलसंवर्धनाचे उद्दिष्ट त्यातच सामावलेले असे.

टिळकांनीही शिक्षणाच्या उद्दिष्टांत आध्यात्मिक उन्नतीचा अंतर्भाव केला आहेच. पण टिळकांची अध्यात्मिक उन्नतीची कल्पना मोक्षसाधनेपर्यंत जात नाही. राष्ट्रहित हाच टिळकांच्या दृष्टीने मोक्ष आहे. म्हणून टिळक पुन्हा आधिभौतिक उन्नतीकडेही वळतात.

शिक्षणाच्या अनेक उद्दिष्टांपैकी 'भाकरीसाठी शिक्षण' हे एक उद्दिष्ट सांगितले जाते. टिळकांनी याही उद्दिष्टाचा अंतर्भाव आपल्या विवेचनात केला आहे. शिक्षणाने व्यक्तीला भाकरी मिळवून द्यावी यात काहीच शंका नाही. पण भाकरीपेक्षा अधिक अनेक गोष्टी शिक्षणाने साध्य करावयाच्या असतात याचे भान ठेवून टिळकांनी आपले विचार मांडले आहेत.

व्यक्तिमत्त्वविकास हे एक शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट मांडले जाते. टिळक व्यक्तीचा विचार व्यक्तिनिष्ठ संदर्भात करीत नाहीत. टिळकांच्या मते व्यक्तीचा विकास हा समाजाच्या व राष्ट्राच्या संदर्भातच झाला पाहिजे. व्यक्तीने स्वत:पुरतेच विकसित होऊन चालणार नाही. व्यक्तीच्या विकासाचा समाजाच्या विकासाला आणि राष्ट्रविकासालाही उपयोग झाला पाहिजे असे टिळकांचे मत आहे. याबाबतीत टिळकांचे मत इतर अनेक समाजनिष्ठ शिक्षणतज्ज्ञांच्या भूमिकेप्रमाणेच म. गांधी यांच्या भूमिकेशी मिळतेजुळते आहे. म. गांधी व्यक्तिमत्त्वाला महत्त्व देत आणि शिक्षणाने व्यक्तिविकास झाला पाहिजे हे तत्त्व त्यांना मान्य होते. पण त्यांच्या मते व्यक्तिमत्त्व समाजनिष्ठ असते. विकासाला पोषक अशा बाबींचा पुरवठा समाजातूनच होत असतो आणि समाजात राहिल्यानेच व्यक्तीला प्रतिष्ठा येते. म्हणून शिक्षणाने समाजाविषयी आत्मीयता आणि सामाजिक विवेक निर्माण होणे आवश्यक आहे. आदर्श व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा गुण म्हणजे समाजोन्मुखता. टिळकांना शिक्षित मनुष्य हा समाजोन्मुख असला पाहिजे असे म. गांधीप्रमाणेच वाटते.

## कृषिशिक्षण व धंदेशिक्षण

आध्यात्मिक उन्नतीबरोबरच व्यक्तीची, समाजाची व राष्ट्राची आधिभौतिक उन्नती झाली पाहिजे हे टिळकांनी सांगितलेलेच आहे. आधिभौतिक उन्नती ही कारखाने, व्यवसाय, विविध प्रकारचे धंदे, कृषिउत्पादन, गिरण्या, इ. गोष्टींवर अवलंबून असते. ही प्रगती व्हावयाची असेल तर व्यक्तीला व्यवसायाचे शिक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. नुसत्या पुस्तकी शिक्षणाने, वाङ्मयीन शिक्षणाने किंवा सांस्कृतिक शिक्षणाने व्यक्तीच्या मनाचा विकास होण्यास मदत होईल. परंतु आर्थिक समृद्धी येण्यासाठी,

औद्योगिक भरभराट होण्यासाठी विविध धंदेविषयक कौशल्यांचे शिक्षण आवश्यक असते.

लॉर्ड कर्झन यांनी धंदेशिक्षणविषयक काही नवे धोरण आखून नव्या योजना कार्यान्वित करण्याचा घाट घातला होता. त्यास अनुलक्षून आपले विचार व्यक्त करताना टिळकांनी धंदेशिक्षण, व्यवसायशिक्षण, कृषिशिक्षण इ. क्षेत्रात कोणती धोरणे असावीत, त्यांची कार्यवाही कशी करावी, फलनिष्पत्ती कोणती इ. मुद्दे उपस्थित केले आहेत. धंदेशिक्षण आणि सरकार (२६ जानेवारी १९०४), कृषिशिक्षण व धंदेशिक्षण (७ जून १९०४) हे दोन लेख तर त्यांनी प्रत्यक्ष या विषयाचे विवेचन करण्यासाठीच लिहिले. याशिवाय '१०च स्कॉलरशिपा' या नावाचा लेख लिहिला. या लेखात सरकारने धंदेशिक्षणाविषयी ज्या स्कॉलरशिप्स देऊ केल्या होत्या त्यांची योजना, विद्यार्थ्यांची निवड, पात्रता, परिणाम इ. बाबींचा विचार टिळकांनी केला आहे. याशिवाय अन्य विषयांवरील लेखांकांतूनच हिंदुस्थानातील विद्यार्थ्यांना धंदेशिक्षण देण्याची नितांत आवश्यकता आहे हे टिळकांनी आवर्जून सांगितले आहे.

लॉर्ड कर्झन यांच्या कारकिर्दीत हिंदुस्थान सरकारने धंदेशिक्षणावर एक ठराव प्रसिद्ध केला होता. हिंदुस्थानात त्या काळात धंदेशिक्षणाकरिता ज्या शाळा अस्तित्वात होत्या त्या तशा असाव्यात किंवा त्यात आमूलाग्र सुधारणा व्हाव्यात यांबाबत विचार करण्यासाठी कर्नल क्लिबर्न यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. कर्नल क्लिबर्न यांच्या समितीने खालील प्रश्नांचा विचार केला...

- धंदेशिक्षणाच्या सरकारी शाळांतून कोणत्या प्रकारचे शिक्षण मिळते ?
- मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग विशिष्ट धंद्याची उभारणी करण्यास होता का ?
- या शिक्षणात उणीवा असतील तर त्या कोणत्या ?
- या उणीवा दूर करून विद्यार्थ्यांना विशिष्ट धंदेशिक्षणाच्या क्षेत्रात अधिक वाकबगार कसे बनविता येईल ?
- सामान्य धंदेशिक्षण व विशिष्ट धंदेशिक्षण याबाबत कोणत्या सुधारणा कराव्या ?

या समितीच्या अहवालासंदर्भात टिळकांनी केसरीतून लेख लिहिले व त्यांद्वारा धंदेशिक्षणाबाबत आपली मते व्यक्त केली.

सामान्य कारागिरांनाही उदार शिक्षणाच्या क्षेत्रातील लिहिता वाचता येण्याएवढे शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे असे टिळक म्हणतात. सुतार-लोहारकीचे सामान्य ज्ञानही कारागीरांना असले पाहिजे. पण एवढ्या दोन गोष्टींनीच औद्योगिक विकास व धंद्याची वाढ होईल असे नाही. कर्नल क्लिबर्न यांनी केलेल्या ठरावाला पुष्टी देताना टिळकांनी असे सांगितले की –

मोठे भांडवल व यंत्रसामुग्री लागणारे कारखाने आणि छोटे उद्योगधंदे यांचा

धंदेशिक्षणाच्या संदर्भात विचार केला पाहिजे.

धंदेशिक्षणाच्या शाळांतून मोठमोठ्या कारखान्यांसाठी वरच्या प्रतीचे कारागीर, मुकादम व कारागीरांवर देखरेख करणारे, धंद्याची तत्त्वे समजणारे सुपरिंटेंडेंट यांचा पुरवठा होईल. पण याबाबतही चांगले नियोजन केले पाहिजे असे टिळक सांगतात. उदा. मुंबईस कापडाच्या गिरण्या आहेत. मुंबईच्या धंदेशिक्षण-शाळांतून काप्रड उद्योगातील कारागीर तयार झाले पाहिजेत. कानपूरला लोकरीचे कापड तयार होते. तेथील धंदेशिक्षण-शाळांनी त्याच प्रकारचे शिक्षण द्यावे.

थोड्या भांडवलात निरनिराळ्या ठिकाणी चालू शकतील अशा प्रकारचे जे धंदे आहेत त्यांचे शिक्षण अनेक ठिकाणी देण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे असे टिळक सांगतात. कुलपे, आगकाड्या, बटणे, छत्र्या, चष्मे, चाकू, साबण, व्हॉरनिसे, तेले, चामडे कमविणे, रंग देणे इ. लहानसहान धंद्याचे शिक्षण देण्याच्या सोयी वाढविणे आवश्यक आहे.

म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्ड यांनी काही ठिकाणी टेक्निकल स्कूल्स काढून असे शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. पण शाळांत थोडेसे ड्रॉइंग व थोडेसे सुतारकाम एवढेच शिकविले जाते. हे खरे धंदेशिक्षण नव्हे अशी टीकाटिप्पणी टिळक करतात. अशा प्रकारच्या टेक्निकल शाळा कितीही काढल्या तरी खरे धंदेशिक्षण मिळणार नाही असे ते सांगतात.

कोणता धंदा शिकविणारी शाळा कोठे काढावी याबाबत पूर्व अभ्यास झाला पाहिजे. देशातील कच्चा माल बाहेर किती व कोणत्या प्रकारचा जातो आणि तिकडे त्याचे कोणत्या प्रकारचे रूपांतर होऊन तो आपल्या देशात परत येतो याचा अभ्यास झाला पाहिजे. चौकशी झाली पाहिजे.

औद्योगिक पाहणीनंतरच धंदेशिक्षण देणाऱ्या शाळा सुरू करण्यात याव्यात असे टिळक सुचवितात.

"लहानलहान धंदे शिकविण्याकरिता ज्या शाळा काढावयाच्या त्यात धंद्यासंबंधाने नुसते शिक्षण देऊन उपयोगी नाही तर तो धंदा फायदेशीर रीतीने कसा चालवावा हे व्यापारी शिक्षणही मिळाले पाहिजे." ही क्लिबर्न कमिटीची सूचना नुसती स्वीकारून टिळक थांबलेले नाहीत तर ते यापुढे भर घालून म्हणतात की नवे धंदे लोकांना शिकवल्यानंतर त्यांच्यापैकी जे लोक कारखाने काढतील त्यांचे ते कारखाने आणि धंदेशिक्षणाच्या शाळा यांची परस्पर जोड होणे इष्ट आहे. हिंदुस्थान सरकारने त्यावेळी धंदेशिक्षण विषयक जो ठराव केला त्यात अशा प्रकारचे संबंध ठेवण्याचे वा सुधारण्याचे कलम कोणतेच नव्हते. या लेखांकात टिळकांनी सरकारच्या धंदेशिक्षण धोरणाचे स्वरूप सांगितले आहे की यात शब्दपांडित्याची बरीच रेलचेल आहे, कृतीसंबंधाने फार थोडे.

धंदेशिक्षणासाठी हिंदुस्थान सरकारने दहा स्कॉलरशिपा प्रत्येक वर्षी देऊन परदेशात विद्यार्थ्यांना पाठविण्याचे ठरविले. त्या संदर्भात 'दहाच स्कॉलरशिपा' या नावाचा एक लेख लिहून हिंदुस्थानातील धंदे-शिक्षण व औद्योगिक स्थिती सुधारण्यासाठी या दहाच स्कॉलरशिपा कशा अपुऱ्या आहेत हे टिळकांनी दाखवून दिले आहे. प्रतिवर्षी दीडशे पौंडांची एक शिष्यवृत्ती अशा दहा शिष्यवृत्त्या देण्याची शिफारस होती. या दहांमध्ये वाटणी होती ती अशी –

दोन मद्रास इलाख्याकरता, दोन बंगालकरता, दोन मुंबईकरता, चार अन्य प्रांतांसाठी. या स्कॉलरशिपांबाबत टिळकांनी व्यक्त केलेल्या मतांचा सारांश असा –

सर्व हिंदुस्थानकरता फक्त दहा शिष्यवृत्त्या दिल्या आहेत ही चूक आहे. निदान तीनचारशे शिष्यवृत्त्या देणे आवश्यक होते. देशातील उद्योगधंद्यांची अभिवृद्धी करणे हे मोठे काम आहे. त्यासाठी पैसा नसेल तर पोलिसांची सुधारणा करण्यासाठी जो पैसा खर्च करावयाचा तोच पैसा उद्योगधंद्यांच्या उत्तेजनासाठी लावावा.

या शिष्यवृत्त्या देऊन जे विद्यार्थी परदेशी पाठवावयाचे त्यांची पात्रता तपासून घेतली पाहिजे. केवळ दोन वर्षांची ही शिष्यवृत्ती आहे. शिष्यवृत्ती देताना वय किती असावे हे ठरलेले नव्हते, परीक्षा घेऊन शिष्यवृत्ती दिली जावी हेही ठरविले नव्हते. अट एवढीच होती की विद्यार्थ्याला इंग्रजी येत असावे; ज्या देशात पाठवावयाचे तेथील भाषा येत असावी व धंद्याचे सामान्य शिक्षण व माहिती मिळालेली असणे आवश्यक आहे. जो विद्यार्थी परदेशी पाठवावयाचा त्याने तिकडून आल्यानंतर या देशात तशा प्रकारचा धंदा काढून इतरांनाही तो धंदा शिकवावा अशी अट हवी. पाठविलेले सर्वच विद्यार्थी त्या त्या धंद्यात वाकबगार होतील असे समजण्याचे कारण नाही. ज्या धंद्याकरता सरकार शिष्यवृत्ती देणार ते धंदे परदेशात आमच्या विद्यार्थ्यांना चांगले शिकविले जातील याची व्यवस्था सरकारातून केली जाणे आवश्यक आहे. आमच्या तरूणांमध्ये बुद्धीचे व शरीराचे सामर्थ्य आहे. त्याचा योग्य उपयोग करून घेतला, योग्य निवड केली व योग्य नियोजन केले तरच वरील शिष्यवृत्त्या देण्याचा उपयोग होईल.

**धंदेशिक्षण हा सार्वत्रिक चर्चेचा विषय** – ७ जून १९०४ रोजी लिहिलेल्या अग्रलेखात टिळक म्हणतात की ज्याला ज्याला म्हणून देशहिताची चर्चा करण्याची संधी मिळते त्या सर्वांच्या डोक्यात व भाषणात धंदेशिक्षण हाच विषय असतो.

हा लेख लिहिण्यास निमित्त असे घडले की अर्काट जिल्ह्यात राणीपेठ या शहरी मद्रास इलाख्याची प्रांतिक सभा आणि चिंगलपट्ट जिल्ह्यातील कांजीवरम् या शहरी जिल्ह्याची सभा भरली होती. या दोन्ही सभांमधून धंदेशिक्षणाचा विषय चर्चिला गेला.

राष्ट्रीय सभा, प्रांतिक सभा, जिल्हा सभा या सर्व पातळ्यांवर देशहिताच्या दृष्टीने धंदेशिक्षणाचे महत्त्व पटले आहे याबद्दल टिळकांनी समाधान व्यक्त केले.

राष्ट्रीय चळवळीत राजकीय हक्कांचे घोडे पुढे ढकलले जाऊन धंदेशिक्षण व कृषिशिक्षण हे विषय मागे पडले अशी टीका टिळकांनी केली आहे.

राजकीय हक्कांची मागणी कोणत्याही चळवळीत आधी पुढे येते हे स्वाभाविक आहे. पण तुलनेने राजकीय हक्क हे सहज प्राप्त होण्यासारखे नसतात. त्यामानाने अन्य लाभांची मागणी केली तर त्यांचा विचार सत्ताधाऱ्यांकडून केला जातो. हे राजकीय पुढाऱ्यांनी ओळखून धंदेशिक्षण, कृषिशिक्षण, औद्योगिक प्रगती याबाबत त्याकाळी सर्वत्र चर्चा सुरू ठेवली होती. याशिवाय राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला जोडून औद्योगिक प्रदर्शने भरविली जात ही गोष्ट स्तुत्य आहे असे टिळक सांगतात.

**कृषिशिक्षण व धंदेशिक्षण : निकटचा संबंध** – हिंदुस्थानात ऐंशी टक्के लोक शेतीच्या उद्योगावर जगतात. टिळकांनी याठिकाणी शेतीचा अर्थव्यवहार, शेतकऱ्यांची स्थिती, याबाबतही मूलगामी विचार केला आहे. सरकारच्या गंगाजळीचा मुख्य घटक म्हणजे शेतकऱ्यांचा पैसा. मग शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यास शेतकऱ्यांचाच पैसा कारणी लावला गेला पाहिजे असे टिळक सांगतात.

कृषिशिक्षणाचा हेतू हाती असेल तेवढ्या जमिनीत चांगले व पुष्कळ धान्य कसे पिकवावे हा आहे तर धंदेशिक्षणाचा हेतू देशातील उद्योगधंदे वाढवून शेतकीच्या ओघात सापडून दुर्दशेकडे वाहात जाणाऱ्या लोकांस वाचविणे हा आहे. शेती व अन्य धंदे हे परस्परावलंबी आहेत, परस्परपूरक आहेत हे तत्त्व या ठिकाणी टिळकांनी सांगितले आहे. त्यामुळेच कृषिशिक्षण व धंदेशिक्षण या बाबतचा आग्रह टिळक व्यक्त करतात.

**अमेरिकेचे उदाहरण** – कृषिशिक्षणाबाबत खासगी शिक्षणसंस्थांना जबाबदारी पेलणे शक्य नाही. म्हणून सरकारी पातळीवरच यासंबंधी जोरदार प्रयत्न व्हायला हवेत. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रातही कृषिशिक्षणाबाबत मोठा वाटा उचलावा लागला आहे. आपल्या मुद्याच्या पृष्टयर्थ टिळकांनी अमेरिकेत केले जाणारे कृषिशिक्षणाचे कार्य कोणत्या स्वरूपाचे आहे हे विस्ताराने सांगितले आहे. अमेरिकेतील लोक मुख्यत: धंदेवाईक असून, हिंदुस्थानातील लोकांइतके ते शेतीवर अवलंबून नाहीत. हिंदुस्थानात शेतकऱ्याजवळ खूप जमीन नसते. अमेरिकेत ती असते. म्हणून टिळकांचा मुख्य मुद्दा असा की थोडी जमीन, नापीक जमीन यांच्या आधारावरच हिंदुस्थानातल्या शेतकऱ्याला आपला चरितार्थ चालवावयाचा असल्याने अशाच परिस्थितीत जास्तीत जास्त उत्पन्न कसे काढता येईल याचे शिक्षण येथील शेतकऱ्याला देणे जरूरीचे आहे.

हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची स्थिती का सुधारत नाही याची जी काही कारणे दिली जातात त्यात प्रामुख्याने शेतकऱ्यांचा भांडकुदळ, व्यसनी, खर्चिक स्वभाव हे कारण दिले जाते. हा स्वभाव सुधारला तर शेती सुधारेल. टिळकांच्या मते शेतकरीवर्गाचा स्वभाव सुधारण्यापेक्षा, शेतकरी वर्गाच्या धंद्यास उपयोगी असे शिक्षण त्यास देणे सहज शक्य व सुलभ आहे.

शेतकऱ्यांचा स्वभाव सुधारण्यासाठी शाळा काढून फारसे काही हाती लागेल असे टिळकांना वाटत नाही. याउलट शेतकऱ्याला शेतीसंबंधी गोष्टींचे ज्ञान द्यावे असे ते सांगतात. हाती असलेले लहानसे क्षेत्र कोणते, खत किती घालावे, मशागत कशी करावी, पिकाची निगा कशी करावी, हाती असलेली जमीन विपुल फलदायी कशी होईल, हे ज्ञान देणे आवश्यक आहे.

**टिळक मताची चिकित्सा** – टिळक हे उदार शिक्षणाचे पुरस्कर्ते असूनही त्यांनी कृषिशिक्षण व धंदे शिक्षण यांचा पुरस्कार त्यांच्या राष्ट्रीय दृष्टीमुळेच केला आहे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवायचे व टिकवावयाचे असेल तर पूर्वी शिक्षणासंबंधी जी मूल्ये आपण मानत आलो त्यात काही बदल करून नवी औद्योगिक मूल्ये आपण स्वीकारली पाहिजेत याची टिळकांना पुरेशी जाण दिसते. पाश्चात्य देशांत पाश्चात्य विचारवंतांनीही हीच गोष्ट ओळखून व्यवसाय शिक्षणाला केव्हाच प्राधान्य द्यायला सुरुवात केली होती.

जॉन डयुई यांनी हाताच्या कामापेक्षा आपण मनाच्या कामासाठीच शिक्षणाचा जास्त उपयोग करतो असे सांगितले आहे. पण त्याचवेळी जी नवी संस्कृती उदयाला येत आहे तिचा स्वीकार करावाच लागेल असे ते सांगतात. नव्या औद्योगिकयुगात कामगार जगताचा प्रभाव अधिक पडतो आहे. आपल्या अर्थशास्त्रीय आणि शिक्षणविषयक मूल्यकल्पनांमध्ये बदल करावाच लागेल असे ते सांगतात.

टिळकांनीही हाच धागा घेऊन आपले विचार व्यक्त केले आहेत. शेतकऱ्याचा स्वभाव सुधारण्यापेक्षा त्यांचे व्यावसायिक कौशल्य वाढीस लावले पाहिजे असे टिळकांचे मत आहे.

म. गांधी यांनी प्रवर्तित केलेल्या वर्धा शिक्षण योजनेत हातांनी काम करून शिक्षण घेण्याचा आग्रह आहे. महात्माजींना आर्थिक क्षेत्रामध्ये उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण हवे होते. यासाठी कुटीरोद्योग आपल्या देशात वाढले पाहिजेत असे त्यांनी सांगितले आणि वाढण्यासाठी शेतकरी व कारागीर यांना व्यवसायांचे प्रशिक्षण आवश्यक आहे. याबाबतीतही टिळकांचे विचार गांधीजींच्या विचारांशी जुळतात.

वर्धा शिक्षण योजनेच्या चार मूलतत्त्वांपैकी शिक्षण हे उत्पादक उद्योगांद्वारा द्यावयाचे हे एक महत्त्वाचे तत्त्व आहे. टिळकांनीही या तत्त्वाशी बरेच मिळतेजुळते

असे विचार व्यक्त केले आहेत. प्रत्यक्ष उद्योगांद्वारा शिक्षण द्यावें असे टिळकांनी म्हटलेले नाही. पण प्रत्यक्ष धंद्याच्या जागी अनुभव घेतला पाहिजे हे सांगितले आहे.

१८५३ साली मुंबईत कापडाची गिरणी निघाली. त्यानंतर महाराष्ट्रात कापड गिरण्या हा सर्वात मोठा उद्योग भरभराटीस आला. याशिवाय छोटे मोठे महाराष्ट्रीय कारखानदार उदयाला आले. पण शेतकऱ्याची स्थिती तशीच राहिली. सामान्य माणूस औद्योगिक क्रांतीनेही सामान्यच राहिला. कारण ब्रिटिशांना हिंदुस्थान ही बाजारपेठ बनवावयाची होती.

ब्रिटिशांनी हिंदुस्थान जिंकला तो त्यांच्या व्यापाराची आणि उद्योगाची भरभराट व्हावी म्हणून, हिंदुस्थानची भरभराट व्हावी म्हणून नव्हे; हे टिळकांनी ओळखले होते म्हणूनच शेतकऱ्याला ज्ञानी करणे त्यांना आवश्यक वाटू लागले, शेतीशिक्षण व धंदेशिक्षण यांच्यामुळे शेतकरी स्वावलंबी झाला, सामान्य कारागीराचे पोट उत्तम रीतीने भरू लागले. म्हणजे राजकीय हक्क मागण्यासाठीही अधिक बळ येईल हे टिळकांनी सांगितले.

"इंग्रजी व्यापाराची जोपर्यंत हिंदुस्थानात एकसारखी अभिवृद्धी होत चालली आहे तोपर्यंत हिंदुस्थानात कितीही दुष्काळ पडले तरी हल्लीच्या शिक्षण पद्धतीत काही सुधारणा होणार नाही. शिक्षणाची कोणतीही शाखा घ्या, तिच्यात नवखेपणा किंवा विशिष्टत्व कोठेच आढळत नाही. शिंपी, माळी, सोनार, ब्राह्मण या सर्वांसच सारखी ए. बी. सी. घोकावी लागते."

वरील विधानात टिळकांना हेच सुचवायचे आहे की सरधोपट अभ्यासक्रम ठेवल्याने त्याचा परिणाम आर्थिक व औद्यागिक गती कुंठित होण्यात होतो. तत्कालीन सरकारला तेच अपेक्षित होते म्हणून सर्वांनाच त्यांनी ए. बी. सी.ची घोकंपट्टी करायला लावली. शिंपी शिंपीकाम शिकेना, माळ्याला माळ्याचे काम येईना. शिक्षण हे व्यवसायाभिमुख असले पाहिजे तरच ते खऱ्या अर्थाने जीवनाभिमुख होईल असा टिळकांच्या याबाबतीतील विचारांचा निष्कर्ष आहे.

## सुशिक्षितांची कर्तव्ये

माणूस सुशिक्षित झाला असे आपण म्हणतो तेव्हा त्याला लिहिता वाचता येऊ लागले, त्याने चार चांगल्या ग्रंथांचे अध्ययन केले आहे, त्याची विचारशक्ती उत्तमपैकी जागृत झाली आहे इ. अर्थ अभिप्रेत असतात. पण इंग्रजी राज्यात इंग्रजी विद्येमुळे जे लोक सुशिक्षित बनत होते ते आपली कर्तव्ये कोणती याबाबत खऱ्या अर्थाने जागरूक नव्हते. यासंदर्भात टिळकांनी काही विचार मांडले आहेत. ते असे –

इंग्रज सरकारने जे शिक्षण आम्हास दिले व देत आहे, इंग्रजी भाषेच्या द्वारे युरोपीयन राष्ट्रांचा जो इतिहास एतद्देशियांच्या अवलोकनात येत आहे त्यामुळे हिंदुस्थात

निष्कृष्ट दशेस का आला इ. गोष्टी, त्यांस राष्ट्रीयत्त्वाची व पुढाऱ्यांची उणीव का भासली या गोष्टी एतद्देशियांस कळू लागल्या. पाश्चिमात्य शिक्षणाने स्वत्त्वाबाबत जागृतीच निर्माण केली आहे. आपल्या बुद्धिमत्तेस व कर्तबगारीस इंग्रजी राज्यात जो आळा पडला आहे तो अन्यायाचा आहे व सरकारने आपणास योग्य सवलत दिली तर आपण इंग्रज लोकांप्रमाणेच स्वदेशहिताच्या कामी अत्यंत उपयोगी पडू शकू अशा प्रकारची बुद्धी सुशिक्षित वर्गात उत्पन्न झाली आहे. मात्र करारी व बाणेदार स्वभाव बनण्यास जसे शिक्षण पाहिजे तसे हल्लीच्या शाळांतून मिळत नाही. इंग्रजी शिक्षणाने मन सुसंस्कृत होत असेल पण ते करारी व बाणेदार, निश्चयी होत नाही. सुशिक्षितांचे खरे कर्तव्य हेच की जे शिक्षण मिळत आहे त्याचा योग्य उपयोग करून आपले खरे कर्तव्य कोणते याचे ज्ञान करून घेणे. आपला हक्क आपण संपादन करून घेणे, तो हक्क संपादन करून घेण्यासाठी लागणारा निश्चय व स्वार्थत्याग अंगी पूर्णपणे बाणवणे हे सुशिक्षितांचे खरे कर्तव्य होय.

इंग्रजी शिक्षणामुळे होणारे फायदे टिळक नाकारत नाहीत. पाश्चात्य विद्येमध्ये जे सामर्थ्य आहे त्याचा स्वीकार त्यांनी मोकळेपणाने केला आहे. पण मिळालेल्या सामर्थ्याचा उपयोग सुशिक्षितांनी केवळ स्वार्थासाठी करावयाचा किंवा स्वाभिमान जागवण्यासाठी करावयाचा हा पर्याय त्यांनी सुशिक्षितांपुढे ठेवला आहे. हे समजावून सांगण्यासाठी टिळक एक चांगला दृष्टांत देतात...

"आमच्या घरात घुसून आमची सर्व मिष्टान्ने खाणाऱ्या मंडळींचे उच्छिष्ट खाणे किंवा त्यांची उष्टी काढणे हे आपले काम नव्हे तर त्यांच्या बरोबरच व त्यांनी घेतलेल्या ताटांपैकीच एक ताट आपण ओढून घेऊन यथेच्छ भोजन करण्याचा आपला हक्क आहे हे सुशिक्षितांनी ओळखले पाहिजे."

स्वत्त्व जागरण, हक्क संपादन ही खऱ्या सुशिक्षितांची कर्तव्य आहेत असे टिळक सांगतात. दुसऱ्याच्या ताटाखालचे मांजर होऊन राहणे हीच स्थिती सुशिक्षित होऊनही कायम असेल तर सुशिक्षित या शब्दाला अर्थ नाही. शिक्षणाने मनुष्य स्वतंत्र झाला पाहिजे.

'सा विद्या या विमुक्तये' या वचनाप्रमाणे 'मुक्त करते ती विद्या' हे याठिकाणी टिळकांना अभिप्रेत आहे.

आतापर्यंत टिळकांच्या प्रमुख शैक्षणिक विचारांचे आलोडन केले. आता टिळकांच्या काही स्फुट विचारांचा आढावा घेतला आहे.

**लष्करी शिक्षण**

ड्यूक ऑफ कॅनॉट यांनी १८९० साली पुण्याहून गेलेल्या शिष्टमंडळाला भेट देऊन लष्करी शिक्षणाची शाळा काढण्याबाबत, त्या शाळेला नाव देण्याबाबत

- संमती दिली. या निमित्ताने टिळकांनी लिहिलेल्या लेखांकात (१८ मार्च १८९०) लष्करी शिक्षणाबाबत आपले विचार प्रकट केले आहेत.

"परकीय सत्तेने आपल्या प्रजेस लष्करी शिक्षण देणे म्हणजे आपल्या हाताने आपल्या अपकर्षाचा पाया घालणे ही समजूत चुकीची आहे. हिंदुस्थानच्या एकंदर सैन्यापैकी दोन तृतीयांश लोक या देशातलेच आहेत. एकतृतीयांश युरोपियन आहेत. पण लष्करी शिक्षण मिळण्याची चांगली सोय कुठेच नाही. ती असली पाहिजे. जुन्या कसास उतरलेल्या घराण्यांवर विश्वास टाकून, त्यांच्या करामतीचा उपयोग सरकारने करून घेतला पाहिंजे. ज्या लोकांनी पूर्वीच्या अंमलातून मोठमोठी कामे करून आपल्या तरवारीच्या जोरावर स्वराज्यनिष्ठा गाजविली त्यांच्या वंशजांस असंतुष्ट ठेवून त्यांच्या वंशपरंपरागत आलेल्या दर्जाचा, अधिकाराचा, इतमामाचा, शौर्याचा व हुकुमतीचा देशहिताच्या कामी उपयोग करून घेतला पाहिजे."

लष्करी शिक्षणाच्या शाळेसंबंधी असलेला हा लेख प्रासंगिक स्वरूपाचा होता. अर्थातच त्यातील विचारही प्रासंगिक आहेत. लष्करी शिक्षण-शाळेच्या निमित्ताने अभ्यासक्रम, लष्करी शिक्षणाची आवश्यकता, इ. कोणत्याच मुद्यांचा विचार न करता लष्करातील नेमणुका या विषयावरच टिळकांनी आपले लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे या लेखातील विचार हे शैक्षणिक विचार म्हणून ध्यानात घेण्यासारखे नाहीत.

### देशी भाषांचे प्रश्न

१८५७ साली हिंदुस्थानात विद्यापीठांची स्थापना होऊन उच्च शिक्षणाच्या कार्याला सुरूवात झाली. पण अध्ययन अध्यापनाचे माध्यम पुढे कित्येक वर्षे इंग्रजीच राहिले. इंग्रजी भाषेच्या या अतिरिक्त प्रभावामुळे हिंदुस्थानातील देशी भाषांची दैना झाली. खरे तर शिक्षण हे मातृभाषेच्या माध्यमातून दिल्यास अधिक प्रभावी होते असे शिक्षणतज्ञ सांगतात. पण विद्यापीठ पातळीवरील शिक्षणक्रम इंग्रजीच्या प्रभावाखालून सुटत नव्हता. परिणामी देशी भाषांचा उत्कर्ष होत नव्हता. याबाबत टिळकांचे विचार असे –

विद्यापीठात देशी भाषांचा प्रवेश होऊन इंग्रजी, संस्कृत वगैरे प्रगल्भ भाषांच्या बरोबरीने त्यांचा उत्कर्ष होऊन एक प्रकारे भाषोत्कर्षाबरोबर देशोन्नती होणार आहे. पाश्चिमात्य ज्ञान इकडील ज्ञानापेक्षा सर्वांशाने श्रेष्ठ आहे असे मानले तरी ते ज्ञान देशी भाषांच्या द्वारे देण्यास हरकत नाही. इंग्रजीच्या प्रभावामुळे देशी भाषा मागे पडत चालल्या आहेत. देशी भाषांत कोणी उत्तम ग्रंथ लिहीत नाही. व्याख्याने देत नाही. कोणतीही भाषा प्रगल्भ दशेस पोचण्यास तिचा बाजारात, न्यायसभेत, दरबारात, वगैरे सर्व ठिकाणी अप्रतिहतपणे संचार असला पाहिजे. इंग्रजी माध्यमात

शिकून पदवी घेणाऱ्यापेक्षा देशी भाषेत शिकून पदवी घेणाऱ्याला कमी लेखतात ते चूक आहे. इंग्रजी भाषेचे ज्ञान ज्या कारणाने अपरिहार्य वाटते त्याच कारणाने संस्कृतादि जुन्या भाषांचे ज्ञानही आवश्यक आहे. मराठीतील जुने वाङ्मय अभ्यासून उत्कर्ष होणार नाही, निरनिराळ्या शास्त्रीय विषयांचा अभ्यास मराठी माध्यमातून झाला पाहिजे. यासाठी आधुनिक विद्वानांनी देशी भाषेत ग्रंथ लिहिणे आवश्यक आहे. आणि विद्यापीठात निदान काही विषयांचे अध्यापन देशी भाषांतून व्हावे. देशी भाषांचा विकास आपोआप होईल, त्यासाठी मुद्दाम खटपट करण्याचे कारण नाही असे म्हणणाऱ्या प्रारब्धवादी लोकांचे मत लक्षात घेऊ नये. देशी भाषांचा प्रश्न केवळ तात्विक आणि ग्रांथिक नाही. देशी भाषांच्या दुर्दशेमुळे येथील लोकव्यवहारावर परिणाम घडू लागला आहे. देशी भाषांना उत्तेजन देणे म्हणजे केवळ देशी भाषेतील पुस्तकांनी ग्रंथालयाची कपाटे भरणे नव्हे. देशी भाषेच्या दुर्दशेमुळे तरूण पिढीच्या शिक्षणाला भलतेच वळण लागून कोवळ्या मनावर दुष्ट परिणाम होत आहे. अलीकडे शिक्षणाचे ओझे असह्य वाटू लागले आहे. त्याला कारण विषय दुर्बोध आहेत किंवा खूप आहेत हे नसून इंग्रजीसारख्या परकी भाषेत ते विषय शिकविण्याची पद्धती मुख्य कारण आहे. देशी भाषेचा विद्यापीठात शिरकाव होण्यास या तीन प्रकारच्या लोकांकडून अडथळा येतो.

इंग्रजी भक्त युरोपियन लोक, देशस्वभाषाविगलित पारशी, अभ्यासाचे ओझे वाढवू नयें असे म्हणणारा स्वतंत्र पक्ष.

**टिळकांच्या विचारांतील मौलिकता** – देशी भाषांबाबत टिळकांनी जे विचार व्यक्त केले आहेत त्यातील शैक्षणिक महत्त्व व त्यांची मौलिकता मोठी आहे.

देशी भाषा असा शब्दप्रयोग टिळक ज्या ज्या वेळी करतात तेव्हा तेव्हा भारतातील देशी भाषा - प्रांतीय भाषा... तामीळ, तेलगू, कन्नड, मल्याळम्, पंजाबी, सिंधी, मराठी... अशाच भाषा अभिप्रेत आहेत.

भारतातील त्या त्या प्रांतातील लोकांची ती मातृभाषा आहे. तेव्हा टिळकांच्या देशी भाषा या शब्दप्रयोगाचा अर्थ मातृभाषा असाच अभिप्रेत आहे.

कोणत्याही परकी भाषेच्या माध्यमातून ज्ञानग्रहण करणे हे केव्हाही मातृभाषेद्वारा ज्ञानग्रहण करण्यापेक्षा अवघडच असते. मातृभाषेच्या द्वारा ही प्रक्रिया स्वाभाविक होऊ शकते. अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया नैसर्गिक स्वरूपात व्हावयाची असेल तर मातृभाषेचाच आधार हवा. शिक्षणशास्त्रदृष्ट्याही मातृभाषा हेच शिक्षणाचे प्रभावी माध्यम ठरते.

मातृभाषेतून शिक्षण मिळणे हा बालकाचा नैसर्गिक हक्क आहे. आणि उच्च

शिक्षणातही मातृभाषा हेच माध्यम असावे याबाबत शिक्षण शास्त्रज्ञांचे दुमत नाही. टिळकांनी १८९४ सालीच हे विचार मांडले यावरून टिळकांची मातृभाषाविषयक दृष्टी दूरची होती हे दिसून येते. याशिवाय टिळकांनी मातृभाषा माध्यमाचा जो पुरस्कार केला आहे तो निव्वळ शैक्षणिक दृष्टीतून नाही. त्याला एक व्यापक राष्ट्रीय अर्थ आहे. स्वभाषेच्या अनुषंगाने स्वत्व, स्वाभिमान, स्वराष्ट्रप्रेम इ. साऱ्या 'स्व'ची जोपासना होते. अस्मितेचे पोषण होते आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय दृष्टी वाढीस लावण्यास स्वभाषेचा अभ्यास, स्वभाषेच्या माध्यमाचा वापर उपयुक्त ठरतो.

परभाषेबद्दल प्रेम असणे निराळे, परभाषेचा भाषा म्हणून अभ्यास करणे निराळे आणि परभाषेचे दास्य स्वीकारणे निराळे. टिळकांना ही दास्यकल्पना मंजूर नाही. म्हणून ते देशी भाषांच्या विकासाचा पाठपुरावा करतात. या राष्ट्रीय दृष्टीमध्ये एक निखळ व्यवहार दृष्टी आहे. भाषेचा विकास हा केवळ त्या भाषेतील पुस्तकांनी कपाटे भरून होत नाही तर रोजेच्या रोज दैनंदिन-व्यवहारात ती भाषा वापरली जाते तेव्हा होतो.

समाजात लोकशाही वळण वाढू लागले म्हणजे भाषेचे महत्त्व आपोआपच वाढते असे अनेक विचारवंतांनी सांगितले आहे. पारतंत्र्याच्या काळात यामुळेच देशी भाषांची वृद्धी होण्यास बंधन पडते.

पोतदार विविधदर्शन (१९३९) या ग्रंथात असे प्रतिपादन केले आहे की जन्मभाषा असेल तीतूनच लोकांचे मत वळविणे सोपे जाते. आणि जन्मभाषा ही बोलून बोलून व लिहून लिहून वाढते, बलिष्ठ होते. या ग्रंथात असे सांगितले आहे की बलिष्ठ इंग्रजीने मराठीला मागे सारले आहे. यासाठीच भाषावार प्रांतरचना व भाषावार विद्यापीठे असावीत अशी सूचना केली आहे. टिळकांनी अप्रत्यक्षरीत्या याच गोष्टीचा पुरस्कार केलेला दिसतो. देशी भाषांच्या वृद्धीसाठी, राष्ट्रीयत्वाच्या जोपासनेसाठी टिळकांचे हे विचार मौलिक आहेत.

'महाराष्ट्र भाषेची वाढ लेखांक १ ते ३' (खंड ३) यांमध्ये टिळकांनी मराठी भाषेच्या विकासासंबंधी अधिक मूलगामी विवेचन केले आहे. मराठी भाषेचा विकास हा मराठीच्या व्यवहारानेच अधिक होणार आहे असे ते सांगतात. "समाजाचा व्यवहार, समाजाचा विचार, समाजाचा व्याप आणि समाजाची भाषा यांच्यामधील संबंध इतका निकट आणि नित्य आहे की एकाचे प्रतिबिंब दुसऱ्यात उमटल्याखेरीज राहात नाही. एकाची वृद्धी तर दुसऱ्याची वृद्धी आणि एकाचा क्षय तर दुसऱ्याचा क्षय." असे टिळकांनी लिहिले तेव्हा भाषा आणि समाजव्यवहार यांचे परस्परसंबंध व त्यांचे परस्परावलंबित्व किती निकटचे आहे हे ध्यानात येते. "कोणत्याही राष्ट्रातला विद्वत्समूह देशभाषांखेरीज इतर भाषेत बाळपणापासून दीर्घकाळ वाढलेला असेल

व त्याद्वाराच त्याने ज्ञान संपादन केलेले असेल तर देशभाषेच्या दृष्टीने त्या राष्ट्राचे ते दुर्दैव आहे. राष्ट्रविकासातील तो अडथळा आहे.''

कोणतीही भाषा हे प्राथमिक स्तरावर एक कौशल्य असते. भाषेविषयी माहिती मिळवून हे कौशल्य संपादन करता येत नाही. त्याकरिता ती भाषा वापरूनच तिचे कौशल्य आत्मसात करता येते. या कौशल्यानंतरच भाषेच्या अभिवृद्धीची सुरूवात होते. कारण भाषा बोलणाऱ्यांची संख्या वाढते. शिवाजी महाराजांचा अभ्युदय म्हणजे मराठी भाषेचा अभ्युदय असे टिळक म्हणतात. कारण कोणतीही भाषा बोलणारे लोक राज्यकर्ते झाले म्हणजे त्यांच्याबरोबर त्यांच्या भाषेचा गौरवही अधिक होत असतो. या दिशेने काही विशेष प्रयत्न करावयाचे झाल्यास ते असे...

सुशिक्षित वर्गातील लोकांनी औदासिन्य टाकून मिळालेले ज्ञान सामान्य जनांस स्वभाषेच्या द्वारे शिकविणे, केवळ एखाद्या ग्रंथाचा (मराठी) अभ्यास करण्यापेक्षा सर्व अभ्यासक्रम मराठीतून शिकविणे, मराठी भाषा बोलणारांचा व्याप व व्यवहार वाढविणे, कृत्रिम उपायांनी अंगातील उष्णता टिकविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा नैसर्गिक उपायांनी तिची शक्ती वाढवणे.

मराठी भाषेच्या विकासासाठी टिळकांचे हे विचार शैक्षणिक दृष्ट्या मोलाचे आहेत.

**ब्राह्मण आणि त्यांची विद्या**

महादेव शिवराम गोळे यांच्या 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या ग्रंथांच्या परीक्षणार्थ टिळकांनी केसरीतून सात लेखांक लिहिले. या मध्ये टिळकांचे काही शिक्षणविषयक विचार व्यक्त झाले आहेत, त्यांचा सारांश खालीलप्रमाणे –

पाश्चात्य ज्ञान पाश्चात्य भाषेद्वारा द्यायचे आहे ही गोष्ट इकडील शिक्षणक्रम ठरविताना घेतली नाही. जर्मनी इंग्लंड अमेरिका वगैरे देशांतून ज्या नव्या शिक्षणपद्धती निघत आहेत त्यांचे काही अंशी अनुकरण केल्याने आमचा शिक्षणक्रम सुगम होईल. केवळ शिक्षणक्रमामुळे ब्राह्मणांचा ऱ्हास झाला असे नसून परवशतेच्या वरवंट्यामुळे जी एक सार्वत्रिक उत्साहशून्यता आली आहे तीमुळे झाला. प्रि. गोळे यांच्या कल्पनेतील एखादीच आदर्श शाळा निघाली व तीत पाचदहा विद्यार्थी तयार झाले तर किंवा शिक्षणक्रम बदलला तर हे औदासिन्य कमी होईल असे नाही. ब्राह्मणांनी केवळ सरकारी नोकरी किंवा सार्वजनिक चळवळ यांत न पडता इतर व्यवसायात पडावे म्हणजे त्यांची उन्नती अधिक होईल.

गोळे यांचा मूळ प्रबंध केवळ ब्राह्मणांच्या संदर्भात असल्याने टिळकांनी त्याच संदर्भात आपले विचार मांडले आहेत.

ब्राह्मणांच्या ऱ्हासाच्या कारणांची जी मीमांसा गोळे यांनी केली आहे त्यापैकी अभ्यासक्रम बदलाचा मुद्दा टिळकांना मान्य नाही. कारण केवळ शिक्षणक्रम वा अभ्यासक्रम बदलून मूळ वृत्तीतील बदल घडणे शक्य नाही असे टिळकांनी साधार पटवून दिले आहे. परवशवृत्ती व एका विशिष्ट पद्धतीनेच जीवन जगण्याची वृत्ती ही ब्राह्मणांच्या ऱ्हासाची खरी कारणे आहेत हे टिळकांनी दाखवून दिले आहे.

शिक्षणक्रमात आवश्यक त्या सुधारणा करणे टिळक स्वीकार्य मानतात पण मूळ वृत्तीच बदलली पाहिजे व तशा प्रकारचे शिक्षण मिळाले पाहिजे असे सांगतात. सारांश ब्राह्मणांनी आतापर्यंत फक्त उदार शिक्षणाचा अवलंब केला व ते नोकरपेशात राहिले. आता यापुढे त्यांनी व्यवसायशिक्षण व धंदेशिक्षण घेऊन स्वतंत्रपणे उभे राहिले पाहिजे असे या परीक्षणाच्या निमित्ताने टिळक सांगतात.

## खासगी शिक्षणसंस्था आणि सरकार

खासगी शिक्षणसंस्था या स्वतंत्र असतात व सरकार त्यांना ग्रँट-इन-एड या स्वरूपात मदत देते. पण या मदतीचे वर्चस्व कोणत्या मर्यादेपर्यंत असावे याबाबत टिळकांनी १४ नोव्हेंबर १८९९ रोजी केसरीत लिहिलेल्या अग्रलेखात प्रतिपादन केले आहे.

मद्रास इलाख्यात त्यावेळी याबाबत बरीच चळवळ झाली होती. खासगी शाळांतील शिक्षकांस राजकारणाची मोकळीक असावी किंवा नाही अशा प्रकारे वाद होत होता. मद्रास सरकारने असा फतवा काढला होती की "कोणाही सरकारी मदत मिळणाऱ्या शाळेतील मास्तराने डायरेक्टरच्या परवानाखेरीज प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने राजकीय चळवळीत सामील होऊ नये."

महाराष्ट्रात टिळकांनीच स्थापन केलेली डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही खासगी प्रयत्नाने भरभराटीस आलेली संस्था होती.

शिक्षण संस्थांवर मदतीच्या रूपाने जे सरकारी वर्चस्व येत होते व ते वर्चस्व मान्य करण्यात शिक्षणसंस्था जो पुढाकार घेत होत्या त्यावर टिळकांनी टीका केली आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटीने सरकारी वर्चस्वापुढे मान तुकवू नये असे टिळकांचे आग्रही मत होते. याबाबत टिळक म्हणतात –

"खासगी शाळांस सरकारची मदत मिळते एवढ्याकरता त्यातील शिक्षकांनी आपले स्वातंत्र्य सरकारास विकावयाचे असेल तर खासगी शाळेत नोकरी न करता सरकारी शाळेतच केलेली काय वाईट ?"

हा प्रश्न उपस्थित झाला तो विद्यार्थी व शिक्षकांनी राजकीय चळवळीत भाग घेण्याच्या संदर्भात. तरूण पिढीचे शिक्षण आणि राजकीय चळवळ यांचा संबंध असणे इष्ट नाही असा एक तत्त्वजा निष्कर्ष काढून न्यू इंग्लिश स्कूलमधील

दोन आजीव सेवकांना एकदोन वर्षे एकांतवासाची सजा देण्यात आली होती. त्यांच्याकडून काही शर्ती कबूल करून घेण्यात आल्या होत्या. या घटनेवरून सोसायटीचे आजीव सेवक हे सरकारचे दास नव्हे तर दासानुदास झाले आहेत अशी टीका टिळकांनी केली आहे. या निमित्ताने सरकार व शिक्षणसंस्था यांचे संबंध कसे असले पाहिजेत, सरकारची मदत, संस्थांचे स्वातंत्र्य याबाबत टिळकांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत.

सध्या सुरू असलेली शिक्षण पद्धती अस्तित्वात आली तेव्हा नोकरशाहीचा कारभार सुरू होता. शिक्षणाचा कारभारही ब्रिटिश नोकरशाहीच्या प्रभावाखाली चाले. शाळा तपासणी करणारे अधिकारी हिंदी असत. पण शिक्षण संचालक मात्र बहुतेक युरोपियन असत. अधिकाऱ्यांनी सत्ता गाजवावी आणि शिक्षण संस्थांनी निमूटपणे ती मान्य करावी अशी स्थिती होती. या स्थितीला टिळकांनी आक्षेप घेतला आणि शिक्षण संस्थांनी आपले स्वातंत्र्य अबाधित राखले पाहिजे असे सांगितले. सरकारचा अंकुश शिक्षणसंस्थांवर असता कामा नये आणि केलेल्या मदतीच्या मोबदल्यात हा अंकुश सतत टोचणारा असेल तर ग्रँट इन एड (मदत) सुद्धा न घेता स्वतंत्रपणे शिक्षण संस्थांनी काम करावे असे सूचित केले आहे.

पाश्चात्य देशात इ. स. पू. ५००-६०० वर्षांपूर्वीपासून राज्यसंस्थेच्या ताब्यातच शिक्षण होते. आधुनिक काळात लोकशाहीचा स्वीकार बऱ्याचशा देशांतून झाल्यावर शिक्षणाचेही लोकशाहीकरण झाले.

टिळकांच्या काळात पारतंत्र्यामुळे ब्रिटिशांच्या हातात शिक्षण व्यवस्था गेली होती तरी टिळक स्वराज्य पक्षाचे असल्याने त्यांनी शैक्षणिक स्वातंत्र्याची मागणी केली आणि शिक्षणसंस्था व त्यातील लोक स्वत:चं स्वातंत्र्य गमावून बसणार असतील तर त्यांची त्यांनी कानउघाडणी केली.

शासनाच्या शिक्षणाबाबत काही जबाबदाऱ्या असतात. त्या शासनाने योग्य तऱ्हेने पार पाडाव्यात हे खरे. पण शासन आवश्यक त्या बाबतीत उदासीनता धारण करते तर कधी अनाठायी हस्तक्षेप करते. शिक्षणाचे क्षेत्र हे स्वतंत्र आहे. राष्ट्रउभारणीच्या विकासाच्या कामात शिक्षणाने योग्य तो वाटा उचलावयाचा असेल तर शिक्षण क्षेत्राला स्वतंत्र काम करू द्यायला हवे. लोकशाही समाजजीवनाची ती मूलभूत गरज आहे. सार्वजनिक चळवळीत भाग घेतला म्हणून एखाद्या शिक्षकाला वा विद्यार्थ्याला शासन होणार असेल तर ते समाजाभिमुख शिक्षण पद्धतीच्या विरूद्ध आहे. अशा शिक्षणक्रमाचा, संस्थेचा वा झापड लावलेल्या शिक्षणाचा समाजाला काहीही उपयोग होणार नाही. टिळकांचे हे विचार आजच्याही काळात उपयुक्त आहेत. आजच्या शासन-शिक्षणसंस्था संबंधाला ते लागू आहेत.

## आधुनिक विद्वान अकाली का मरतात

प्रत्यक्ष शैक्षणिक विषयांवर नसले तरी टिळकांचे काही निबंध शिक्षण-विषयक काही घटकांचा परामर्श घेणारे पण समाजशास्त्रीय विवेचनाच्या अंगाने असे लिहिलेले आहेत. त्यांपैकी 'आधुनिक विद्वान अकाली का मरतात' अशा शीर्षकाचा एक अग्रलेख २१ जानेवारी १८९६ रोजी टिळकांनी लिहिला. भांडारकर आणि म. गो. रानडे यांनी या संदर्भात जे विवेचन केले होते त्यासंबंधी टिळक आपले विचार व्यक्त करतात.

ग्रॅज्युएट लोक अकाली मरण पावण्याची विविध कारणे आहेत. त्यापैकी दारिद्रय, दारिद्रयाच्या तुलनेने अधिक कष्ट, कुपोषण आणि प्रतिकूल वातावरण या गोष्टी महत्त्वाच्या. अकाली घडणाऱ्या मृत्यूची जी कारणे असतील ती जेणे करून कमी होतील असे उपाय केले पाहिजेत असे टिळक सुचवितात. टिळकांनी काही उपायही सुचविले आहेत. हे उपाय असे...

गरीब विद्यार्थ्यास पगारी व नादारी विद्यार्थ्यांच्या जागा होईल तितक्या कमी देण्याचा ठराव केला होता तो बदलून जागा वाढविणे; युनिव्हर्सिटीचा शिक्षणक्रम हल्लीपेक्षा अधिक सोपा करणे.

हे उपाय सुचविताना विशेषत: दुसऱ्या प्रकारच्या उपायांची चर्चा करताना टिळकांनी परीक्षा पद्धतीच्या संदर्भात काही टीका-टिप्पणी केली आहे. **परीक्षा पद्धतीसंबंधी** टिळकांचे महत्त्वाचे मुद्दे असे...

सर्व विषय परीक्षा पास होतेवेळीच विद्यार्थ्यांना अवगत असले पाहिजेत अशा समजुतीने परीक्षा कठीण करण्यात येऊ नयेत. उदा. परीक्षेस दहा विषय असतील आणि त्यांपैकी विद्यार्थ्याला पाच चांगले, चार मध्यम, आणि एक बेताचा येत असेल तर त्या एका विषयाकरता त्याला अनुत्तीर्ण करून वारकरी बनवू नये. पदवी परीक्षा ही विद्वत्तेची सीमा नव्हे. कोणत्याही एका विशिष्ट विषयाचा अभ्यास करून त्यात लौकिक मिळविणे पुढील काम आहे. पण या पुढील सखोल अभ्यासाचा सामान्य परीक्षेशी काही संबंध असू नये. शिक्षणक्रम सुधारला तरी त्याबरोबरच अकालमृत्युहरणाचे अन्य उपाय विद्यार्थ्यांनी अवलंबले पाहिजेत असे टिळकांनी सांगितले आहे.

आधुनिक कालखंडात परीक्षेची जी सेमिस्टर पद्धती निघाली, किंवा विद्यार्थ्यांना ए.टी.के.टी. देण्याचे धोरण विद्यापीठांनी अवलंबिले त्याबाबत टिळकांनी हे विचार पूर्वी सांगितले आहेत.

त्याचप्रमाणे विशिष्ट विषयाचा अभ्यास आणि सामान्य ज्ञानाचा अभ्यास यात तफावत असली पाहिजे. पदवी परीक्षा ही विद्वत्तेची सीमा नव्हे हे टिळकांचे

विचार लक्षणीय आहेत. पदवी हे विशिष्ट ज्ञान संपादन केल्याचे निदर्शक लक्षण म्हणून होऊ शकेल. पण ज्ञान ही सतत चालणारी प्रक्रिया असल्यामुळे आणि परीक्षा पद्धतीतील दोषांमुळे 'पदवी' हे ज्ञान लक्षण ठरू नये असे टिळकांनी सुचविलेले आहे. अभ्यासक्रमातला पुस्तकीपणा, पढिक पांडित्य आणि पदवीच्या हेतूने मिळविलेले ज्ञान याबाबत फेरविचार करून परीक्षा पद्धती ठरविली पाहिजे असे याबाबत टिळकांना सूचित करावयाचे आहे. विद्वानांच्या अकाली मृत्यूची चिकित्सा करताना टिळकांनी अगदी सहजपणे अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती यांची उचित चिकित्सा केली आहे.

### पाठ्यपुस्तके

पाठ्यपुस्तक हे शिक्षणक्रमातील एक महत्त्वाचे साधन मानण्यात येते. विद्यार्थी व शिक्षकांसमोर अभ्यासक्रमाचे मूर्त स्वरूप पाठ्यपुस्तकाद्वारे येत असते. पाठ्यपुस्तकात - विशेषत: भाषेच्या - त्या त्या देशाच्या, समाजाच्या, अंतरंगाचे, भावभावनांचे व आकांक्षांचे प्रतिबिंब असते. स्वाभाविकपणेच विद्यार्थ्यांच्या घडणीत पाठ्यपुस्तकाचा भाग महत्त्वाचा असतो. त्यातही भाषा विषयांची पाठ्यपुस्तके हा संस्कार अधिक करू शकतात. मातृभाषेचे पाठ्यपुस्तक तर संस्कारांबाबत अग्रक्रमाने महत्त्वाचे.

विसाव्या शतकाच्या सुरूवातीलाच महाराष्ट्रातील प्राथमिक शाळांतून मराठी, गुजराथी, कानडी, व सिंधी भाषेची असलेली पाठ्यपुस्तके बदलून, त्यात नवी भर टाकून ती उपयुक्त, बोधप्रद व मनोरंजक बनविण्याचे सरकारने ठरविले. पण त्याचवेळी ही पाठ्यपुस्तके छापण्याचे काम इंग्लंडमधील मॅकमिलन कंपनीकडे दिले. भाषा विषयाच्या वाचन-पुस्तकांप्रमाणेच अन्य विषयांवरही नवीन वाचन पुस्तके तयार केली गेली. यासंबंधी टिळकांनी केसरीत ६ जून १९०५ रोजी एक स्फुट लिहून काही मुद्दे उपस्थित केले आहेत.

"परदेशात छापून आलेल्या पुस्तकांमुळे विद्यार्थ्यांची मने तयार होण्याच्या प्रक्रियेत ही पुस्तके कितपत उपयोगी पडतील याबाबत शंका आहे. जपानचे एक उदाहरण टिळक देतात. जपानच्या शाळेत सुरू असलेल्या पुस्तकात नागरिकांच्या अंगी आवश्यक असणाऱ्या गुणांची यादी असे. त्यात राजनिष्ठा हा गुण पहिला होता. पण जपानच्या बादशहाच्याच हुकुमावरून या गुणाचा पहिला नंबर काढून तो स्वदेशाभिमान या गुणास देण्यात आला. हिंदुस्थानातील प्रजाजनांच्या हातातले हत्यार इंग्रज सरकारने काढून घेतले. मनातले हत्यारही काढून घेण्याचा विद्याखात्याचा प्रयत्न आहे."

वरील विवेचनात टिळकांनी पाठ्यपुस्तके व त्यांची रचना पद्धती याबाबत

मोठे तपशीलवार विवेचन केले नसले तरी एक महत्त्वाचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला आहे. तो असा की पाठ्यपुस्तकांमुळे आवश्यक त्या संस्कारांचे कार्य व्हावे. ते होत नसेल तर ती पाठ्यपुस्तके निरूपयोगी आहेत. पाठ्यपुस्तकांच्याद्वारा स्वाभिमान, स्वत्व, राष्ट्रीय दृष्टी, इ. मूल्यांचा परिचय होऊन ती मूल्ये अंगी बाणली पाहिजेत. नाहीतर परभृत वृत्तीचीच अधिक जोपासना होईल.

मराठी भाषेची लेखन पद्धती सुधारण्याबाबतच्या काही सूचना मराठी क्रमिक पुस्तके सुधारण्याबाबत नेमलेल्या बुक कमिटीने त्या काळी केल्या होत्या. त्या सुधारणांच्या संदर्भात विवेचन करताना टिळक लिहितात –

"मराठी क्रमिक पुस्तकांत मराठी लेखन पद्धती सुधारण्याबाबतचा निर्णय ही गोष्ट विद्याखात्याने बहुमताने ठरविण्यासारखी नाही. भाषेची लेखन पद्धती कशी असावी ही गोष्ट वैय्याकरणांनी व लोकांनी ठरवावयाची आहे."

पाठ्यपुस्तकांची रचना ही तज्ञांनी करावी व ती करताना लोकभावनेचा आदर करावा ही दोन सूत्रे टिळकांनी याठिकाणी सांगितली आहेत. केवळ बहुमत वा केवळ सत्ता या जोरावर पाठ्यपुस्तकांची रचना झाली तर ती पुस्तके शैक्षणिक दृष्ट्या योग्य ठरणार नाहीत असे टिळकांना यातून सुचवावयाचे आहे.

आधुनिक शिक्षण शास्त्रात पाठ्यपुस्तके हे शिक्षण प्रक्रियेत महत्त्वाचे साधन (दृकसाधन) म्हणून मानले जाते. यासंदर्भात टिळकांचे हे विचार त्रोटक असले तरी महत्त्वाचे आहेत.

## बुद्धीचा ऱ्हास

'हल्लीचा शिक्षणक्रम' या विषयावर मुंबई येथील ग्रॅज्युएट असोसिएशन पुढे एक निबंध वाचला गेला. त्यामध्ये असा एक मुद्दा मांडण्यात आला होता की हल्लीच्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा ऱ्हास होत आहे. या विषयाचा समाचार घेण्यासाठी टिळकांनी २१ एप्रिल १८९६ रोजी केसरीत अग्रलेख लिहिला.

तरूण, कॉलेजमधील विद्यार्थीवर्ग यांच्या बुद्धीस आपली उतरती कळा लागली आहे हे विधान सिद्ध करण्यासाठी निबंधकर्त्याने असा प्रश्न केला की...

"मंडलीक, कुंटे, परमानंद, तेलंग, रानडे, भांडारकर, मेथा यांच्या सारखे पुरुष अलीकडच्या विद्यार्थी मंडळात का दृष्टीस पडत नाहीत ?"

या पद्धतीला टिळकांनी आक्षेप घेतला आहे. निबंधकर्त्यांच्या या प्रश्नावर टिळकच प्रश्न करतात –

"एकदोन ठळक पुरुष दिसले म्हणजे पूर्वीच्या लोकांची बुद्धिमत्ता मोठी होती असे म्हणणे हे न्यायास अनुसरून नाही. कारण सर्व पिढीत एखादा बुद्धिमान पुरुष निघत असतो. परंतु त्याचबरोबर लक्षावधी शंखशिरोमणी असतात. त्याचा

विचार कोणी करत नाही."

जुने व नवे विद्यार्थी यांच्यात तुलना करताना किंवा त्यांच्या बुद्धिमत्तेचा निकष ठरविताना बदलत्या परिस्थितीचा विचार अवश्य करायला हवा असे टिळक सांगतात. जुन्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम वेगळा होता, त्यांना आलेले प्रसंग निराळे होते. त्यांची राहणीही वेगळी होती. हा विचार करूनच हल्लीच्या विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता पूर्वीच्या लोकांहून कमी आहे किंवा कसे यांचे मूल्यमापन करायला हवे असे टिळक सांगतात.

अलीकडील विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा ऱ्हास होतच असेल तर त्याची कारणे टिळकांच्या मते अशी...

विद्यार्थ्यांस अपुरे अन्न, नि:सत्व अन्न; शरीराची वाढ योग्य तऱ्हेने होत नाही; संसाराची सुरूवात, बिकट अभ्यास आणि परीक्षांची काळजी; साधारण बुद्धीच्या विद्यार्थ्यांस न पेलेल असा अभ्यासक्रम.

न पेलणाऱ्या अभ्यासक्रमाचे उदाहरण म्हणून बी.ए. च्या परीक्षेला ५००० पानांची पुस्तके नेमलेली आहेत असे प्रत्यक्ष प्रमाण टिळकांनी दिले आहे.

याठिकाणी बुद्धी म्हणजे नेमके काय याचा विचार केला पाहिजे. बुद्धी म्हणजे पुस्तकी विद्या ग्रहण करण्याची पात्रता असे समजले जात असे. पण थॉर्नडाईक या शास्त्रज्ञाने बुद्धीचे तीन प्रकार मानले आहेत.

अमूर्त पातळीवर विचार करण्याची पात्रता किंवा पुस्तकी शिक्षण-ग्रहण-पात्रता. प्रत्यक्ष वस्तू हाताळून नवनिर्मिती करण्याची पात्रता. माणसांशी वागण्याची, यशस्वी समाजजीवन जगण्याची पात्रता.

या वर्गीकरणाच्या पार्श्वभूमीवर पाहिले तर टिळकांनी अथवा निबंधकर्त्या गोखल्यांनी अलीकडील विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा ऱ्हास होण्याची कारणे शोधताना फक्त पहिल्या प्रकाराचाच विचार केलेला दिसतो. पुस्तकी शिक्षणाच्या ग्रहणाची पात्रता विद्यार्थ्यांमध्ये कमी झाल्यासारखी वाटली तरी अन्य बाबतीत ती पात्रता वाढली आहे किंवा कमी झाली आहे याबाबत कोणतेच दिग्दर्शन या विवेचनात मिळत नाही. बुद्धी ही अनेक क्षेत्रात आपला प्रभाव दाखवू शकते. एखाद्या क्षेत्रात तिने आपला प्रभाव नाही दाखवला तरी दुसऱ्या एखाद्या क्षेत्रात निश्चितच दाखवणे शक्य आहे.

यावरून असे अनुमान काढता येईल की पारतंत्र्याच्या काळात अनेक विद्यार्थ्यांना विद्याभ्यासासाठी अनेक प्रकारचे कष्ट घ्यावे लागून त्यामानाने त्यांना सकस आहार मिळत नव्हता. त्यांचे कुपोषण होत होते. शरीरसंपदा चांगली नव्हती. 'सुदृढ शरीरात सुदृढ बुद्धी' या न्यायाने त्यांच्या निर्बल शरीरात निर्बल बुद्धीच

राहिली. तिच्या विकासाला संधी प्राप्त झाली नाही. पुस्तकी विद्या ग्रहण करण्याच्या क्षमतेबाबत ही स्थिती होती. यशस्वी समाजजीवन जगणे हे जर बुद्धिमत्तेचे लक्षण मानले तर त्याही काळी अनेक लोक बुद्धिमान होते असा निष्कर्ष काढता येईल.

## कीर्तनसंस्था

भारतात व विशेषत: महाराष्ट्रात कीर्तनाची परंपरा जुनी आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कीर्तनाशिवाय आजही दुसरी मोठी करमणूक म्हणजे तमाशा. कीर्तनकारांनी महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनात फार मोठा वाटा उचलला आहे. अध्यात्माची शिकवण कीर्तनाच्या माध्यमातून देता देता, गोष्टी, गाणी, अभंग, भजन यांद्वारा कीर्तनकार समाजाला हळुहळू प्रबोधित करीत असतो. रंजनातून अंजन हे कीर्तनकाराचे वैशिष्ट्य.

समाज जीवनात खोलवर रूजलेल्या अशा या कीर्तन संस्थेविषयी टिळकांनी एका नियतकालासाठी 'द्वादश सूक्ती' या नावाचा लेख लिहिला. हा लेख निबंध या स्वरूपात नसून केवळ मुद्दे या स्वरूपात टिळकांनी लिहिला आहे. पण या टिपणवजा मुद्यांमधून टिळकांनी कीर्तन-संस्थेच्या नाडीवर अचूकपणे हात ठेवलेला आहे.

भारतात कीर्तन संस्था फार पुराण काळापासून नावारूपाला आहे. नारद हे या संस्थेचे आद्यप्रवर्तक असे पुराणे सांगतात. महाराष्ट्रीय संतांपैकी नामदेवांची कीर्तने प्रख्यात आहेत. नामदेवांनी तर 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' अशा प्रकारचे आपले जीवितकार्य मानले होते. याचाच अर्थ कीर्तनाच्या रंगाने ज्ञानदीप लावता येतो. कीर्तनाच्या माध्यमातून ज्ञानप्रसार करता येतो. ज्ञानप्रसाराचे उत्कृष्ट माध्यम - विशेषत: ग्रामीण व अविकसित भागाच्या दृष्टीने कीर्तन हेच होते व आहे. टिळकांनी अत्यंत सूत्रबद्ध रीतीने कीर्तन संस्थेचे शैक्षणिक महत्त्व सांगितले आहे. ते विचार सांगताना टिळकांची सर्वांगीण शैक्षणिक दृष्टी दिसून येते.

'पिनल कोड' हे गुन्हेगाराला शासन करते. काय करू नये व काय केले असता कोणती शिक्षा होईल हे पिनल कोडमध्ये सांगितलेले असते. त्यामुळे पिनल कोड हे मारक्या मास्तराप्रमाणे शिक्षा करणारे, भीती दाखवणारे असते तर कीर्तनकार हा सामोपचाराने शिकविणारा गुरू असे टिळक सांगतात. शिक्षणाच्या प्रक्रियेत सामोपचाराला महत्त्वाचे स्थान आहे. गुरू शिष्याला समजावून देतो ते सामोपचाराने. साम, दाम, दंड, भेद या नीतीमध्ये साम नीतीला अग्रक्रम आहे तो यामुळेच. कीर्तनकार हा सामनीती अवलंबणारा गुरू असे टिळक सांगतात ते त्यामुळेच.

शाळेतील शिक्षक किंवा वृत्तपत्रकार यांच्यापेक्षा कीर्तनकाराचे शैक्षणिक महत्त्व

टिळकांना अधिक वाटते. शाळेतील शिक्षकाचे शैक्षणिक कार्य आपल्या समोर विद्यार्थ्यापुरतेच मर्यादित असते. शाळेची चौकट हे त्याचे कार्यक्षेत्र आणि समोरचे विद्यार्थी हेच त्याचे शिष्य. पण कीर्तनकार हा साऱ्या समाजाचा शिक्षक आहे. शाळेतील शिक्षकाकडे शाळेत येणारे विद्यार्थी येतात. पण कीर्तनकार हा आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत जातो. वस्ती, झोपडी, गाव, पेठ, रस्ता, वाडी, या सर्व ठिकाणी कीर्तनकार जाऊ शकतो. या अर्थाने कीर्तनकार ही एक शिक्षणसंस्थाच आहे. वृत्तपत्रकार हा आपल्या वृत्तपत्रातून समाजशिक्षणाचे काम करील. पण त्याच्या क्षमतेलाही मर्यादा आहे. वृत्तपत्रे लोक वाचतील तेव्हाच त्यांचे शिक्षण होणार. पण कीर्तनकार हा स्वत: जाऊन समक्ष प्रबोधन करतो.

शिक्षणप्रक्रियेत समक्षतेला महत्त्वाचे स्थान असते. प्राचीन काळी सर्व शिक्षण गुरूमुखातून व्हायचे. गुरूमुख हे शिक्षणाचे महत्त्वाचे माध्यम. गुरूशिष्यांनी समोरासमोर बसून केलेली संवादक्रिया म्हणजे महत्त्वाची शिक्षण-प्रक्रियाच होती. कीर्तनकार हा समोरच्या श्रोत्यांशी असा संवाद साधून त्यांचे प्रबोधन करीत असतो.

टिळकांनी 'कीर्तनाद्वारा शिक्षण' या मुद्याबाबत सांगतलेली महत्त्वाची बाब म्हणजे कीर्तनकारांनी आपद्धर्म म्हणून तरी इंग्रजी भाषेचे अध्ययन करावे, व त्यातील ज्ञानभांडार श्रोतृवर्गासमोर खुले करावे. हे सांगताना टिळकांची ज्ञानदृष्टी किती विशाल होती याचा प्रत्यय येतो.

कीर्तनकाराचे मुख्य कर्तव्य समाजशिक्षण हे आहे असे टिळकांनी लिहिले आहे. सामान्यपणे कीर्तनकार केवळ आध्यात्म समजावून देणारा एक कलाकार एवढ्याच अपेक्षेने बहुसंख्य समाज त्याच्याकडे पाहतो. पण कीर्तनकाराने समाजाला शिक्षण द्यावे असे टिळक म्हणतात तेव्हा त्यांना समाजजीवनाची विविध अंगे अभिप्रेत असतात. राहणी, विचार, आचार, स्वभाव, वेषभूषा, इतिहास, पुराण, जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे शिक्षण कीर्तनकाराने द्यावे. म्हणूनच समाज जेथे पालटला तेथे किंवा समाजाला प्रस्तुत काळी ज्याप्रमाणे शिक्षण मिळत आहे त्याला धरून कीर्तनकाराने आपल्या कीर्तनाचा रंग उठवला पाहिजे असे टिळक म्हणतात तेव्हा 'समाजपरिवर्तन' त्यांना अपेक्षित असते. या समाजपरिवर्तनासाठी कीर्तनाच्या शैलीतही परिवर्तन अपेक्षित आहे.

सर्वात शेवटचा आणि महत्त्वाचा मुद्दा टिळकांनी सांगितला आहे, तो म्हणजे पदवीधरांचे कीर्तनसंस्थेकडे लक्ष गेले तर इष्ट त्या सुधारणा लवकर घडून येतील. हे सांगताना टिळकांचे दोन विचार दिसतात –

पदवीधरांचा समाजपरिवर्तनाच्या व प्रबोधनाच्या कामात भाग; कीर्तन संस्थेकडे पारंपरिक दृष्ट्या बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता.

पदवीधराने केवळ शाळेत शिक्षकी पेशा किंवा कार्यालयात कारकुनी, किंवा त्याहून अधिक तर एखादी अधिकाराची जागा भूषविण्यापेक्षा पदवीधरांनी समाजपरिवर्तनाच्या कामात कीर्तनसंस्थेच्या माध्यमातून आपला वाटा उचलावा असे टिळकांना सूचित करावयाचे आहे. याशिवाय एक महत्त्वाची गोष्ट अशी की कीर्तनकार कुणी व्हावे ? आपल्या समाजात अशी एक समजूत होती की ज्याने आधुनिक शिक्षण घेतलेले नाही, ज्याने फक्त पारंपारिक शिक्षण घेतलेले आहे त्याने कीर्तनकार व्हावे. पण टिळक पदवीधारांनाही कीर्तनसंस्थेकडे लक्ष द्यायला सांगतात तेव्हा आधुनिक सुशिक्षितांनी पारंपारिक दृष्टिकोन सोडून कीर्तनकार व्हावे असे त्यांना सुचवायचे असते.

आपल्या कीर्तनपरंपरेत हरिदासी कीर्तनकार आणि नंतर उदयास आलेले राष्ट्रीय कीर्तनकार असा जो उचित बदल झाला त्याचे सूत्र टिळकांच्या या विचारात सापडते. कीर्तनासारख्या माध्यमाने ही राष्ट्रीय व सामाजिक दृष्टी जोपासली पाहिजे हाच यामागचा प्रमुख विचार होता. टिळकांच्या एकंदर वैचारिक भूमिकेशी सुसंगत असेच हे विचार आहेत.

## लोकसंख्या शिक्षण

लोकसंख्याशिक्षणशास्त्राचा समावेश गेल्या काही वर्षात शैक्षणिक अभ्यासक्रमात केला गेला आहे. लोकसंख्येच्या विस्फोटामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, त्यांवरील उपाय, समाजाचा सांस्कृतिक स्तर, निसर्ग संतुलन, पर्यावरण इ. विषयांचा अभ्यास लोकसंख्याशिक्षणशास्त्रात अभिप्रेत असतो.

टिळकांच्या काळी हा स्तर विषय म्हणून पुढे आलेला नव्हता. टिळकांचे याविषयीचे विचार स्थूल व त्रोटक स्वरूपात दिसून येतात. विशेषत: संमती वयाचा कायदा पास करावा याविषयी जी वैचारिक चळवळ महाराष्ट्रात झाली त्यासंबंधी टिळकांची भूमिका समन्वयाची होती.

## उपसंहार

टिळकांच्या लेखसंग्रहापैकी ज्या लेखांतून शैक्षणिक विचार प्रकट झाले आहेत त्यांचे आलोडन करून त्यांच्या शिक्षण विचारांचे पृथ:करणात्मक विवेचन आतापर्यंत दिले आहे. टिळकांच्या निबंधांचे विषय, त्यांची मांडणी, त्यातील मुद्दे, उपमुद्दे या सर्वांचा परामर्श घेताना असे दिसते की, कोणत्याही विषयावरचे लेखन असो, ते लेखन करताना पत्रकार टिळक व शिक्षक टिळक सतत जागरूक असतात.

कोणताही मुद्दा मांडताना त्याचे सप्रमाण विवेचन केल्याशिवाय टिळक पुढे जात नाहीत. अनेक निबंधांतून त्यांनी प्रत्यक्ष आकडेवारीचा उपयोग करून आपले

विवेचन केले आहे. उदा. बी.ए. च्या परीक्षेला जास्त अभ्यास आहे हे सांगताना एकूण पाच हजार पृष्ठांचा अभ्यास आहे असे टिळक सांगतात तेव्हा त्यांच्या विवेचनातील अचूकता व नेमकेपणा प्रत्ययास येतो.

टिळकांचे वडील शिक्षक होते. टिळक स्वत: शिक्षक होते, पत्रकाराच्या भूमिकेतून त्यांनी समाजशिक्षकाचे कार्यही अविरत केले. एक ख्यातनाम शिक्षणसंस्था उभारण्यात त्यांचा वाटा मोठा होता. स्वाभिकपणेच त्यांचे शिक्षणविषयावरील प्रेम, त्यांचे शिक्षणविषयक चिंतन आणि त्यांची शिक्षणविषयक दृष्टी त्यांच्या अनुभवातून मुरून आलेली वाटते.

स्वत: संस्कृतचे अभ्यासक व गणिताचे पंडित असल्यामुळे कोणत्याही विषयाची मांडणी करताना टिळक शुद्ध तार्किक पद्धतीनेच करतात. खंडनमंडन, विषयप्रवेश, विषयविवेचन आदी सर्व वैशिष्ट्यांसह त्यांचा निबंध मग तो निव्वळ लेख स्वरूपात असला तरी आकारास येतो. आणि टिळकांच्या प्रतिपादनासमवेत वाचकाचे प्रबोधन होत जाते. ही प्रक्रिया शैक्षणिक विषयांवरील निबंधांबाबत जास्त जाणवते.

■



चित्र बसवंत, पुणे.

## प्रकरण : ४

# शिवराम महादेव परांजपे

---

### चरित्ररेखा

शिवराम महादेव परांजपे यांचा जन्म कोकणात महाड येथे २७ जून १८६४ रोजी झाला. शिवरामपंत यांच्या वडिलांना त्या काळात तीन रुपये पगार होता. त्यांनी उत्तर आयुष्यात वकिलीचा अभ्यास केला होता. चित्रकला व मूर्तिकला यांचीही आवड परांजपे यांच्या वडिलांना होती. बालपण अत्यंत बिकट अवस्थेत गेले असले तरी उत्तर आयुष्य संपन्न होते. शिवरामपंत परांजपे यांना बालपणी बाहेरच्या शाळेइतकीच घरच्या शाळेची मदत झाली. उत्तम संस्कार झाले.

प्राथमिक शाळेचा अभ्यास महाडला झाला. इंग्रजी शिक्षणाची सोय नव्हती. परांजपे शाळेत हूड होते. त्यांना नाटकाचा नाद होता. परांजपे यांचे पुढील शिक्षण रत्नागिरीस झाले. तेथे विष्णुशास्त्री चिपळूणकर त्यांचे शिक्षक होते. त्यांचा प्रभाव शिवरामपंतांवर पडला आणि त्यांच्या मनात क्रांती झाली. चिपळूणकरांनी १८७९ च्या मे महिन्यात रत्नागिरी सोडली. त्यांनी पुण्याला शाळा काढली. आणि रत्नागिरीच्या बऱ्याच विद्यार्थ्यांनी पुण्याला येण्याचा निश्चय केला. १८८२ मध्ये परांजपे पुण्याला आले. १८८३ मध्ये ते मॅट्रिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाले. १८८४ मध्ये उत्तीर्ण झाले. आणि संस्कृतची पहिली जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती त्यांना मिळाली.

प्रथम फर्ग्युसन कॉलेजमध्ये व नंतर डेक्कन कॉलेजमध्ये शिक्षक होऊन त्यांनी एम.ए. चा अभ्यास पूर्ण केला. त्याच काळात त्यांनी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी केली. १८९५ साली ते एम.ए. झाले. त्यांना 'झाला वेदान्त' पारितोषिक मिळाले.

१८९६ साली ते महाराष्ट्र कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करू लागले.

टिळकांनी सुरू केलेले गणेशोत्सव आणि रायगडावरील शिवाजी उत्सव यात परांजपे भाग घेऊ लागले. सार्वजनिक सभेतर्फे दुष्काळी जनतेला मदत करण्यासाठीही ते हिंडू लागले. त्यांच्या वक्तृत्वाने लोक भारावून गेले.

२५ मार्च १८९८ रोजी पाडव्याच्या मुहूर्तावर 'काळ' पत्राचा पहिला अंक निघाला. प्रारंभी 'काळ' चे वर्गणीदार ६०० होते. ते सहा वर्षात १२,००० झाले आणि १९०८ साली हा आकडा २२ हजारांवर गेला.

१९१० साली काळ पत्र सरकारने बंद पाडले.

१९०८ साली शिवरामपंतांना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक झाली. त्यांना १९ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. १९०९ साली ते तुरुंगातून सुटले.

परांजपे यांचे वक्तृत्व आणि लेखन या दोहोंमुळे महाराष्ट्रभर त्यांची ख्याती झाली होती. नाट्य संमेलन, शारदोपासक संमेलन, इ. सभा, अन्यान्य अनेक परिषदा यांचे ते अध्यक्ष झाले. १९२९ साली बेळगाव येथे भरलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना मिळाला. १९२० साली परांजपे यांनी 'स्वराज्य' नावाचे साप्ताहिक सुरू केले. १९२२ साली मुळशी सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे त्यांना पुन्हा सहा महिने कारावासाची शिक्षा झाली.

१९१० ते १९२० या दहा वर्षांच्या काळात परांजपे यांनी खूप पुस्तके लिहिली. प्रथम टिळकांचे अनुयायी असलेले परांजपे नंतर गांधी तत्त्वज्ञानाचा प्रसार करू लागले. 'स्वराज्य' साप्ताहिक तर त्यांनी त्यासाठीच काढले होते.

मराठीप्रमाणे परांजपे इंग्रजीही उत्तम बोलत असत. पण मराठीवर त्यांचे विशेष प्रेम होते. बेळगावच्या साहित्य संमेलनात कानडी-मराठी वाद चांगलाच गाजला. यासंबंधीचा जो ठराव होता, त्याबाबत बेळगावचे नेते गंगाधरराव देशपांडे यांनी केळकरांसारख्या माणसाला अनुकूल करून घेतले. पण परांजपे बधले नाहीत. परांजपे यांनी तो ठराव मराठीला योग्य अशा प्रकारेच करवून मगच पार करून घेतला.

साहित्यसंमेलनप्रसंगीही परांजपे यांची प्रकृती फारशी चांगली नव्हती. तरी त्यांचा उत्साह चांगला होता. त्यांना त्यापूर्वी अनेक दिवस मधुमेहाची व्यथा जडली होती. त्यांना एक नवेच दुखणे त्रास देऊ लागले होते. कानदुखीने ते हैराण झाले होते. सप्टेंबर १९२९ अखेरपर्यंत त्यांची प्रकृती अस्वस्थ असूनही फार बिघडलेली नव्हती. त्यांनी पुन्हा आपल्या लेखनाला प्रारंभही केला होता.

बुधवार दि. २५-९-२९ रोजी सकाळपासूनच परांजपे यांना अस्वस्थ वाटू लागले. तीन दिवस ते बेशुद्ध होते. शुक्रवार दि. २७-९-२९ रोजी सकाळी सातचे सुमारास परांजपे यांचे देहावसान झाले.

चारच दिवस आधी, 'मिराबाई' नाटकाचा, पहिल्या अंकाचा दुसरा प्रवेश त्यांनी लिहून काढला होता. उत्तम वक्ते, लेखक, समाज कार्यकर्ते, विद्योपासक, प्राध्यापक, संपादक अशा अनेक भूमिकांमुळे परांजपे महाराष्ट्राला सुपरिचित आहेत.

## परांजपे यांचे साहित्य

शिवराम महादेव परांजपे यांनी निंबध, कादंबरी, काव्य, इतिहास, स्फुट इ. विविध प्रकारचे लेखन केले आहे. त्यांचे बहुतेक सर्व गद्य लेखन 'काळ' व 'स्वराज्य' या पत्रांमधून झाले. त्यांचे ग्रंथरूप साहित्य खालीलप्रमाणे –

**निबंध** – काळातील निवडक निबंध : भाग १ ते १०

साहित्यसंग्रह – १ ते ३, स्वराज्यातील निवडक निबंध.

**नाटके** – संगीत कादंबरी, मानाजीराव, रामदेवराव, भीमराव, पहिला पांडव, मीराबाई. (अपूर्ण)

**कांदबरी** – गोविंदाची गोष्ट, विंध्याचल.

**संकीर्ण** – तर्कभाषा, तर्कसंग्रह अर्थसंग्रह. (मराठी रूपांतर.)

**काव्य** – अहल्याजार.

**स्फुट इतिहास** – मराठ्यांच्या लढ्यांचा इतिहास : रामायण, कालिदास, शाकुंतल. (स्फुट)

परांजपे यांच्या साहित्य-संपदेवरून एक गोष्ट ध्यानात येते ती अशी की, परांजपे यांचे लेखन चौफेर आहे. कथा, कांदबरी, काव्य, नाटक, निबंध इ. साहित्याच्या सर्व प्रांतात त्यांचा संचार आहे. पण परांजपे खरे रमतात ते निबंधातच.

परांजपे हे उत्तम वक्ते म्हणून ख्याती पावले होते. भाषणाप्रमाणेच लेखनातही त्यांनी वक्रोक्तीचा खूपच उपयोग करून घेतला. त्यांच्या वक्रोक्ती-कौशल्यामुळे तत्कालीन वृत्तपत्रीय लेखनाला एक वेगळाच रंग आला होता. स्वधर्म, स्वदेश आणि स्वेतिहास यांना शिरोधार्य मानून परांजपे यांनी लेखन केले.

निबंध लेखनाचे स्वरूप त्यांनी पालटले. उपदेशकाची, भाष्यकाराची भूमिका बदलून नर्म सचिवाची किंवा मर्मभेदकुशल वकिलाची भूमिका त्यांनी रूढ केली.

## परांजपे यांचे शिक्षण विषयक लेखन

परांजपे यांनी एकही निबंध वा एकही लेख स्वतंत्रपणे शिक्षण या विषयावर लिहिलेला नाही. मात्र चौफेर लेखन करणारे परांजपे जाता जाता काही शैक्षणिक घटकांवर लेखन करतात. त्यांच्या ज्या लेखांमध्ये शिक्षणाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असलेले विषय आलेले आहेत ते लेख असे –

**साहित्य संग्रह** –

मनाची मीमांसा – मानसशास्त्र (१), श्रद्धा – मानसशास्त्र (२), शब्दांच्या

वाढीचा इतिहास – भाषाविचार, साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण – शिक्षण प्रसार व वाङ्मय यांची चर्चा.

**काळातील निवडक निबंध** – (कंसातील आकडे खंडाचे आहे)

हिंदुस्थानचे दारिद्र्य आणि त्याची करणे – धंदेशिक्षण व त्यांची वाढ (४), स्थानिक स्वराज्य – स्थानिक स्वराज्याचे शिक्षण (४), गरिबांची उपासमार – उपाशीपोटी शिक्षण (१), राज्य कशाने मोडकळीस येते (१ ते ४) – अज्ञान (१), वर्तमानपत्रांचा प्रसार – लोकशिक्षण (१), नीतिशिक्षणाची शाळा – नीतिशिक्षण (२), विद्येचा उपयोग – हिंदुस्थानातील लोकांना द्यावयाचे शिक्षण (२), डेक्कन कॉलेजला पाहून केशवरावांच्या मनात आलेले विचार – शिक्षणाची फलश्रुती (३), हिंदुस्थानातील प्रतिनिधींच्या महत्त्वाकांक्षा – शाळांना सुटी (५), शिपाई हा नागरिक आहे – शिपाई सज्ञान असावा (५), उपसंहार – शिक्षण आणि स्वतंत्रता, शिक्षण आणि शास्त्र (५), आपले सुख काय झाले – धंदेशिक्षणाचे तोटे, शिक्षणाचे तोटे (६), सगळेच नरसू – सुशिक्षित सुधारकांची स्थिती (६), आमच्या जुन्या मशीनगन्स – नवे यंत्रशास्त्र व जुने यंत्रशास्त्र (७), जसे लोक तसे त्यांचे देव – विचारांच्या सूक्ष्मतेवरून देवांचे रूप (८), आपण काय पेरावे – देशाच्या उद्धारासाठी कोणत्या गोष्टी पेराव्या (८), दासबोध – रामदासांचे प्रबोधनकार्य (८).

वरील सर्व लेखांतील शिक्षण विचार कोणाता, त्या लेखांत कोणकोणती शैक्षणिक मूल्ये आहेत, कोणत्या शैक्षणिक घटकांची चर्चा केलेली आहे याचा सविस्तर विचार यापुढे करावयाचा आहे.

### मनाची मीमांसा

मनाची स्थिती, मनोव्यापार, मनाची शक्ती यासंबंधी विवेचन करणाऱ्या या लेखात परांजपे यांनी साहित्यिक शैलीने केलेले विवेचन हे नुसतेच वाचनीय नाही तर मननीय आहे. मानसशास्त्राने मनोव्यापारासंबंधी ज्या गोष्टींची चर्चा केली आहे त्यातील काहीचा विचार या लेखात झालेला दिसतो.

पंचज्ञानेंद्रियांव्यतिरिक्त मन हे सहावे ज्ञानेंद्रिय आहे. विश्वाच्या रचनेत व कार्यपद्धतीत ज्याप्रमाणे बदल होत असतात तसेच मनाच्या कार्यपद्धतीत बदल झाले असावेत. पूर्वी मन हे मनन करीत असलेले, विचार करीत आलेले किंवा विकल्प करीत असलेले प्रत्यक्ष पहावयास सापडत असे. पण कालांतराने मन पुष्कळ आवरणांच्या खाली खूप दडपून गेले. 'मनस्येकं वचस्येकं' या वचनात सूचित केल्याप्रमाणे पूर्वी मन आणि वाणी यांच्यात भेद नव्हता.

अलीकडे 'उथळ मन' व 'खोलमन' हे शब्दप्रयोग रूढ झाले आहेत. वरील महत्त्वाच्या मुद्याचा आधार घेऊन परांजपे यांनी जे विवेचन केले आहे ते मात्र सत्य-असत्य, पाप-पुण्य, चांगले वाईट यासंबंधी आहे. म्हणजेच त्यात बराचसा नीतिविचार आहे. तरीपण वरील मुद्दे विचारात घेता असे दिसते की शैक्षणिक मानसशास्त्रात ज्या गोष्टींची चर्चा केली जाते त्यातील काही घटकांचा समावेश वरील मुद्यांत आहे.

मन हे एक इंद्रिय आहे असे परांजपे म्हणतात तेव्हा भारतीय मानसशास्त्रज्ञांनी मनाविषयी कोणती उपपत्ती मांडली आहे, याचा विचार करावा लागेल.

"मन ही अतिसूक्ष्म बाब आहे असे वर्णन उपनिषदात आहे. मन केवळ शरीर-इंद्रिय नसून पाच ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांवर नियंत्रण ठेवणारे व त्यांना मार्गदर्शन करणारे मध्यवर्ती व अंतर्गत इंद्रिय आहे. ज्ञानेद्रियांचे कार्य मनावर अवलंबून असते."

यातील ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये याबाबतचा विचार परांजपे यांनी सांगितलाच आहे. ते म्हणतात –

"हल्लीच्या मनुष्याच्या शरीराचे शास्त्रीय विभाग सांगण्याचे प्रकरण चालले असता त्यात मनुष्याला दहा इंद्रिये आहेत म्हणून सांगण्यात येते. त्या दहांपैकी हस्तपादादिक पाच कर्मेंद्रिये होत व घ्राण, चक्षु, श्रोत्र, जिव्हा आणि त्वक् ही पाच ज्ञानेद्रिये होत."

'उथळ मन' आणि 'खोल मन' असे मनाचे दोन प्रकार परांजपे यांनी सांगितले आहेत. त्यालाही मानसशास्त्रीय आधार आहे. मन पुष्कळ आवरणांच्या खाली दडपून गेलेले असते आणि त्यामुळे त्या मनातील विचार कधी कधी वेगळ्याच स्वरूपात बाहेर येतात.

सिग्मंड फ्रॉइड हा मानसशास्त्रज्ञ मनोविश्लेषणशास्त्राचा जनक होय. त्याने मनाच्या अबोधावस्थेची उपपत्ती मांडली आहे. हेतुपूर्वक केलेल्या क्रिया आपल्याला माहीत असतात. पण काही क्रियांचे हेतू आपल्याला माहीत नसतात. घडलेली क्रिया ही निर्हेतुक होती व ती सहज घडली असे आपण म्हणतो. पण सिग्मंड फ्रॉइड यांच्या मते सहज घडणाऱ्या क्रियांच्या पाठीमागे अबोधावस्थेतील प्रेरक असतो.

फ्रॉइडने सबोध व अबोध मनाचे दोन प्रमुख भाग मानले आहेत. सबोध मनाचा परिस्थितीशी व परिस्थितीच्या वास्तवतेशी संबंध असतो. अबोध मनाचा बाह्य परिस्थितीशी संबंध नसतो. परांजपे यांनी हाच विचार त्यांच्या ललित भाषेत मांडला आहे. खोल मनात अनेक विचार दडलेले असतात व माणसाची कृती त्याप्रमाणे होऊ शकते. पण हा माणूस असा का वागला याचे उत्तर वरच्या वागण्यावरून देता येणार नाही.

परांजपे यांच्या विचारसरणीत शास्त्रीयदृष्ट्या एकच गोष्ट चिकित्सा करण्यासारखी आहे. ती म्हणजे त्यांनी 'मनात उत्क्रांती झाली आहे' असे म्हटले आहे. पूर्वी मन हे उघडे होते, आता तसे नाही. मनाच्या अवस्थेत हा जो बदल झाला तो केवल कालबदल नाही. लोकांची मने पूर्वीही उथळ व खोल असली पाहिजेत. पण अशा प्रकारे मानसशास्त्राचा अभ्यास पूर्वी केला गेला नव्हता. नव्या काळात मानसशास्त्राचा अभ्यास खूपच प्रगत झाला. फ्रॉइड, युंग यासारखे पाश्चात्य मानसशास्त्रज्ञ प्रयोग करू लागले. त्यातून मानसशास्त्राविषयी 'जेस्टाल्ट' सारखे काही नवे सिद्धांत निर्माण झाले. परांजपे म्हणतात त्याप्रमाणे मन बदललेले नाही, तर मानसशास्त्राचा अभ्यास प्रगत झाला. म्हणून मनात उत्क्रांती झाली असे न म्हणता मानसशास्त्राच्या अभ्यासात उत्क्रांती झाली असे म्हणावे लागेल.

### श्रद्धा

'श्रद्धा' हा विषय प्रामुख्याने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील आहे. पण मानसिक प्रक्रियेशीच या विषयाचा संबंध असल्यामुळे श्रद्धेचा अंतर्भाव मानसशास्त्राच्या क्षेत्रात आणि पर्यायाने शिक्षणाच्या क्षेत्रात होऊ शकतो.

परांजपे यांच्या लेखात भौतिक व व्यावहारिक जगात आणि अध्यात्मशास्त्रात श्रद्धेचे स्थान कोणते याविषयीच प्रामुख्याने त्यांनी विवेचन केले असले तरी श्रद्धेमुळे जो 'मनोव्यापार' घडतो त्याचे शैक्षणिक दृष्ट्या उपयुक्त असे विवेचन काही प्रमाणात तेथे आपोआपच केले गेले आहे.

"श्रद्धा हा शब्द व्यापक अर्थाने मानसिक स्वीकृती, विश्वास, अशा अर्थी वापरला जातो. अधिक निश्चितपणे म्हणावयाचे झाल्यास श्रद्धा म्हणजे ज्याबद्दलचे वैचारिक प्रमाण किंवा बौद्धिक प्रमाण आणि आवश्यकता निश्चित स्वरूपात समजलेली नाही अशा एका विधानाला किंवा विधानसमूहाला बौद्धिक संमती देणे."

परांजपे यांनी 'श्रद्धा' या निबंधात व्यक्त केलेल्या मतांचा सारांश –

मनुष्याच्या मनाचे जे अनेक धर्म आहेत त्यांपैकी श्रद्धा हा एक महत्त्वाचा धर्म आहे. श्रद्धेच्या उलट मनाचा धर्म म्हणजे संशय, श्रद्धा आणि संशय ही महान वैऱ्यांची जोडी आहे. संशय इहलोकीच्या प्रपंचाला फायदेशीर असून संशय हा मनाचा पहिला धर्म आहे आणि श्रद्धा हा दुसरा धर्म आहे. संशयाचे खरे मारक म्हणजे प्रत्यक्ष ज्ञान. पण अध्यात्मशास्त्रात प्रत्यक्ष प्रमाणाला अवकाश नाही. मानवी देहाची अल्पज्ञानग्रहणशक्ती पाहून तिला जोड देण्याकरिता श्रद्धेची योजना करण्यात आली आहे. मनुष्याची पाच ज्ञानेंद्रिये आहेत. पण अतींद्रिय ज्ञानार्जनाला साधनीभूत सहावे इंद्रिय म्हणजे श्रद्धा. आधी पुष्प आणि मग फल हा जसा वृक्षांचा क्रम आहे, त्याप्रमाणे आधी संशय आणि मग श्रद्धा हा मनाच्या धर्माचा क्रम होय.

पूर्वेकडील शास्त्रे आणि पश्चिमेकडील शास्त्रे यांमध्ये जमीन व अस्मान इतका फरक आहे. रासायनिक मिश्रणे व पृथक्करणे, विद्युच्छक्तीचे धर्म, उष्णतेचे परिणाम, लोहचुंबकाचे नियम, परमाणूंच्या क्रिया इ. अनेक जड साधनांच्या दिव्याच्या प्रकाशाने जेवढे दिसेल तेवढे पाहण्याचा पश्चिमेकडे प्रयत्न असतो. पण भौतिक गोष्टीपलीकडे अतींद्रिय गोष्टींविषयी ज्ञान करून देणारा योगमार्ग, त्याची तिकडील लोकांना कल्पनाही नाही. मन हे उत्क्रांतीच्या तत्त्वावर नेहमी चाललेले असते. ते मूळचे संशयी वृत्तीचे असले तरी जगातील सत्य सिद्धान्तांविषयी त्या मनामध्ये जेव्हा जेव्हा संशय उत्पन्न होईल तेव्हा ते सत्य पडताळून पाहण्याविषयी प्रयत्न करते.

परांजपे यांचे हे विचार अध्यात्मिक क्षेत्रासंबंधी प्रामुख्याने असले तरी यातील मुद्यांची मांडणी मानसशास्त्राच्या अंगाने केली आहे.

ज्ञानप्राप्तीसाठी संशय केव्हाही उपयुक्त होतो. 'संशय' या शब्दाचा अर्थ 'जिज्ञासा' असा करून घेतल्यास अधिक उपयुक्त होईल. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात संशयाची व्याख्या अशी केली आहे –

"जेव्हा एखाद्या ज्ञेयासंबंधी हे की ते असे निश्चित करता येत नाही, तेव्हा त्या अनिश्चित ज्ञानावस्थेस संशय असे म्हणतात."

संशयवादाला इंग्रजीत 'स्केप्टिसिझम' म्हणतात. स्केप्टिकॉस या ग्रीक शब्दापासून हा व्युत्पन्न झाला. त्याचा मूळ अर्थ शोधक किंवा चिकित्सक असा आहे. शैक्षणिक प्रक्रियेत शोधन बुद्धी किंवा चिकित्साबुद्धी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्याशिवाय अध्ययन प्रक्रियेला गती येणार नाही. विद्यार्थ्याला, लहान मुलाला सतत हे काय, ते काय असे विचारावेसे वाटते. त्याची ही चौकसबुद्धी, त्याची जिज्ञासा यांचा उपयोग शिक्षणप्रक्रियेत महत्त्वाचा ठरतो.

दुसरा महत्त्वाचा भाग... संशयानंतर श्रद्धा शिक्षण-प्रक्रियेत ज्ञानसाधनेसाठी, अध्ययनासाठी 'आप्तवाक्य (टेस्टिमनी) म्हणून उपयोगी ठरते. सर्वच गोष्टी स्वत: पारखून घेता येणार नाहीत. पाठ्यपुस्तके, शिक्षक, आईवडील यांनी सांगितलेले विचार गृहित धरले तरच शिक्षण सुलभ होईल. प्रत्यक्ष प्रमाणाने सर्वच गोष्टी पारखून घेता येणे अशक्य आहे. 'आप्तवाक्य' प्रमाण मानणे हा श्रद्धेचाच एक भाग आहे. अशा तऱ्हेने संशयनिवृत्ती, श्रद्धा या सर्व घटकांचा उपयोग शिक्षण प्रक्रियेत महत्त्वाचा ठरतो.

### शब्दांच्या वाढीचा इतिहास

या निबंधात परांजपे यांनी शब्दांची उत्पत्ती कशी झाली त्यांची वाढ कशी झाली, यांसंबंधी विवेचन केले. हा भाषाशास्त्रविषयक निबंध असल्याने भाषा शिक्षकांना त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. त्याचा थोडक्यात सारांश असा –

असंख्य जड वस्तूंना व्यवहारासाठी निरनिराळी नावे देण्याची आवश्यकता माणसाला भासू लागली आणि आपल्या बुद्धीच्या मगदुराप्रमाणे तो नवीन शब्द निर्माण करू लागला. बुद्धिमत्ता व गरजा यांनुसार शब्दसंख्या वाढत चालली. रानटी लोकांची शब्दंसख्या कमी, कारण गरजा कमी. शब्दांचे उत्पत्तिस्थान जिव्हा. शब्द नसतील तर माणूस जिव्हेऐवजी हातांनी व पायांनी बोलू लागतो. (खुणा)

रानटी अवस्थेतील माणूस पदार्थवाचक शब्द प्रथम निर्माण करील मग धातुवाचक. प्रथम काही खुणा, मग सांकेतिक ध्वनी व मग शब्द हा त्याचा क्रम असतो. संकेताने शब्दाचा सांकेतिक अर्थ ठरला तरी तो शब्द उच्चारण्याच्या क्रियेत अनेक नैसर्गिक व स्थानिक कारणांमुळे फारक पडतो.

परकीय लोकांपासून घेतलेले शब्द आणि शब्दांची अपभ्रष्ट रुपे यांमुळे माणसाचा शब्दकोश वाढत जातो. शब्दांच्या नैसर्गिक वाढीबरोबरच कृत्रिम उपायांनीही शब्दांची वाढ होते. मनुष्याचा साधित शब्दसंग्रह फार मोठा आहे. त्याचप्रमाणे सामासिक शब्दही खूप आहेत.

संस्कृत भाषेत एकेका शब्दाला अनेक प्रतिशब्द आहेत. उदा. – स्वर्ग-९, देव-२६, इंद्र-२५, सूर्य-३७, अग्नी-३३, जल-२७. इंग्रजी भाषेत संस्कृतच्या मानाने शब्दांना कमी प्रतिशब्द आहेत. तुलनेने प्रतिशब्दांचे प्रमाण, शब्दभांडार संस्कृत भाषेत जास्त आहे.

शब्दांच्या वाढीचा इतिहास हा असा आहे. यात शब्दांच्या अभावापासून तो शब्दांच्या उधळपट्टीपर्यंत शब्दांची वाढ मनुष्याने कल्पकतेने कशी केली आहे, याचा आढावा आला आहे.

या निबंधातले हे विचार भाषेचे अध्ययन व अध्यापन करताना उपयुक्त ठरणारे असेच आहेत. विशेषत: मातृभाषेचे अध्यापन व परभाषेचे अध्यापन करताना या निबंधातील शब्दांचा इतिहास व त्यातील घटक-विषय यासंबंधी व्यक्त केलेले विचार मननीय आहेत.

अध्यापन शास्त्रात 'भाषण कौशल्याचा' विकास महत्त्वाचा मानण्यात येतो. भाषण कौशल्यासाठी शब्दवैभव वाढविणे हेही भाषेच्या अध्यापनात महत्त्वाचे उद्दिष्ट मानण्यात येते. त्यासंबंधी परांजपे यांनी जे विचार मांडले आहेत तसेच विचार भाषेच्या अध्यापनाबाबत मांडण्यात येतात –

"शब्दसंपत्ती वाढणे हा भाषिक विकासातील एक महत्त्वाचा भाग आहे. आपण जे नवीन शब्द शिकतो ते कोणत्या ना कोणत्या जाणवणाऱ्या गरजेच्या पूर्तीसाठी असतात आणि प्रत्यक्ष वा निर्मित अनुभवाशी ते शब्द निगडित असतात. आई, बाबा, दूध इ. शब्द लहान मुले लवकर का शिकतात? त्यांच्या अत्यंत

निकडीच्या गरजांशी ते शब्द निगडित असतात. प्रत्यक्ष अनुभव घेत असताना मुलाला शब्द समजतात. वैज्ञानिक युगात वावरणारी मुले जे शब्द वापरतात ते साठ-सत्तर वर्षांपूर्वीच्या त्याच वयाच्या मुलांना माहीत असण्याची शक्यता कमी.''

शब्दांच्या द्वारे होणाऱ्या अर्थच्छटांचा मागोवा घेण्याचा व आपल्या मनातील आशयाच्या अभिव्यक्तीसाठी अधिकाधिक योग्य शब्द निवडण्याचा छंद विद्यार्थ्यांना लागला पाहिजे. याबाबतीत 'शब्दांच्या वाढीचा इतिहास' यातील विचार भाषेच्या शिक्षकांना अधिक उपयुक्त ठरतील.

त्याचप्रमाणे संस्कृत भाषेच्या वैभवाचा परिचय या लेखातील विचारांद्वारे उत्तम होतो. संस्कृतातील शब्दवैभवाची जी उदाहरणे दिली आहेत ती लक्षणीय आहेत. इंग्रजी भाषा हा आपल्या शालेय अभ्यासक्रमातील एक महत्त्वाचा विषय. या भाषेतील शब्दवैभवासंबंधी परांजपे यांनी व्यक्त केलेले विचारही लक्षात घेण्यासारखे आहेत. संस्कृत व इंग्रजी यांची तुलना त्यांनी व्यापक प्रमाणावर केलेली नाही. तरीही मोजक्या उदाहरणांद्वारा भाषाशिक्षणात संस्कृतचे वैभव कसे उपयोगी पडेल हे त्यांनी सूचित केले आहे.

### भाषाभिवृद्धीचे साधन : शिक्षणप्रसार

१९२९ साली बेळगाव येथे चौदाव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषाणात परांजपे यांनी काही विचार मांडले. अशा प्रकारच्या संमेलनाचा मुख्य हेतू आपल्या भाषेची अभिवृद्धी करणे हाच असतो असे सांगून परांजपे यांनी भाषाभिवृद्धीच्या साधनांबाबत चर्चा केली आहे.

वाढती लोकसंख्या हे भाषाभिवृद्धीचे एक साधन असते असे सांगतात. एखादी विशिष्ट भाषा बोलणारांची संख्या किती यावर त्या भाषेची प्रगती काही प्रमाणात अवलंबून असते. राज्याभिवृद्धीनेही भाषाभिवृद्धी होते असे परांजपे सांगतात. जेत्यांची भाषा जित लोक आत्मसात करतात. यासाठी मराठी इतिहासाचाच आधार घेऊन परांजपे यांनी विवेचन केले आहे. फक्त महाराष्ट्रीय असलेली ही भाषा मराठे जेथे जेथे गेले तेथंपर्यंत पसरली. तंजावरपर्यंत मराठीचा प्रसार झाला.

मराठी भाषाभिवृद्धीसाठी ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता असते त्या अशा –

भाषा बोलणाऱ्यांची लोकसंख्या, राजसत्ता, शिक्षणप्रसार, वाङ्मयनिर्मिती, (नागरी) लिपीचा प्रचार.

१९२९ सालच्या या भाषणात तत्कालीन परिस्थितीला अनुसरून परांजपे यांनी भाषा आणि शिक्षण प्रसार यांबाबत विवेचन केले आहे.

त्या वेळी मुंबई इलाख्यात एकंदर पावणेतीन कोटी लोकसंख्येपैकी एक कोटी मराठी भाषिक होते. त्यातले सुशिक्षित किंवा साक्षर शे. आठच लोक होते. हे

प्रमाण वाढविण्यासाठी सक्तीच्या शिक्षणाची आवश्यकता आहे असे परांजपे यांनी सांगितले. त्याबद्दलचे सर्व अधिकार म्युनिसिपालिटी व लोकलबोर्ड यांना देण्यात येत होते ते योग्यच होते. या कामाला वेग प्राप्त होण्यासाठी स्त्री शिक्षणाचा प्रश्नही वेगाने हाती घेणे आवश्यक असल्याचे ते सांगतात. स्त्री शिक्षणाची होत असलेली प्रगती मराठी भाषेच्या उत्कर्षाला उपकारक ठरेल असे त्यांनी लिहिले आहे. मराठी भाषेचा विकास, सक्तीचे शिक्षण आणि स्त्रियांचे शिक्षण यांचा जो परस्पर संबंध परांजपे यांनी दाखविला आहे, तोच या लेखातील महत्त्वाचा शिक्षणविचार होय.

## गरिबांचे शिक्षण

गरीब जनतेचे शिक्षण हा जगात सर्वत्र सतावणारा, भेडसावणारा प्रश्न आहे. त्याबाबत हिंदुस्थानच्या पार्श्वभूमीवर परांजपे यांनी चर्चा केली आहे. गरीब लोकांची उपासमार आणि त्या पार्श्वभूमीवर जगात श्रीमंती वाढण्याची आकडेवारी या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत. पण असे घडते. याचसंबंधी परांजपे यानी उपरोक्त लेख लिहिला. या लेखात उपासमारीसंबंधी विवेचन करताना शिक्षण विषयक काही मुद्दे आले आहेत. त्यांचा सारांश असा –

जगातील राष्ट्रांतून धर्मशिक्षणासंबंधी विशेष लक्ष दिले जाते. त्यामुळे लोकांची धर्मश्रद्धा वाढली आहे असे प्रतिपादन करण्यात येते. पण भोवती हजारो लोक उपाशी मरत असता ते राष्ट्र धार्मिक आहे असे म्हणता येणार नाही.

मानसिक शिक्षण न मिळाल्याने गरीब लोकांच्या हातून अन्याय घडतो. दुर्वर्तन होते. शिक्षणाच्या अभावामुळे, अन्यायाचा परिणाम वाईट असतो, हे त्यांच्या मनावर बिंबलेले नसते आणि मग भुकेच्या वेळी पोट शांत करण्यासाठी ते कोणत्याही मार्गाचा अवलंब करतात. गुन्हा करायला लावून शिक्षा देण्यापेक्षा गुन्हा न होऊ देणे अधिक चांगले.

काही देशांतून सरकारमार्फत गरिबांसाठी शाळा घालण्यात आल्या आहेत हे खरे, पण नुसत्या शाळा घालूनही उपयोग नाही. शरीराचे पोषण करणारे अन्न त्यांना मिळाल्याशिवाय मनाचे पोषण करणारी विद्या त्यांना कशी गोड लागेल ? बराच पैसा खर्च करून शाळेच्या इमारती बांधल्या तरी लोक उपाशी असतील तर कसे शिकतील ? तेव्हा खेड्याखेड्यातून शाळा बांधण्यापूर्वी तिथले लोक उपाशी मरत नाहीत ना हे बघणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक परिस्थितीवर नेमके बोट ठेवून परांजपे यांनी विवेचन केले आहे. ग्रामीण भागात शिक्षणाचा सर्व स्तरावरील प्रसार झपाट्याने झाला पाहिजे हे खरे आहे. पण त्याचवेळी तेथील आर्थिक व भौगोलिक परिस्थिती ध्यानात घेणे आवश्यक आहे.

या निबंधांचे लेखन स्वातंत्र्यपूर्व काळात केले आहे. त्या काळात भारतातील ग्रामीण विभाग फार मोठ्या प्रमाणावर दुर्लक्षित होता. खेड्यातील सामाजिक व आर्थिक, सांस्कृतिक घडी विस्कळित होऊन ही अवनती उत्तरोत्तर वाढत होती व दैन्य व दारिद्र्य यांचे विदारक दृश्य खेड्यात दिसू लागले होते. शिक्षणाची फार मोठी आबाळ होती.

या पार्श्वभूमीवर परांजपे यांचे हे विचार मोलाचे आहेत. श्रीमंतांनी गरिबांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली पाहिजे व त्या खर्चातील वाटा उचलला पाहिजे हा परांजपे यांचा विचार मोलाचा आहे. त्याचप्रमाणे नुसत्या इमारती बांधून काम होणार नाही, शिक्षणप्रसार होणार नाही हे योग्यच आहे. खेड्यांचा विकास घडवावयाचा असेल तर एकाचवेळी आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक आघाड्यांवर जारीने प्रयत्न व्हायला हवेत.

## अज्ञानाने राज्य मोडकळीस येते

राज्य कशाने मोडकळीस येते यासंबंधी परांजपे यांनी ४ लेखांक लिहिले. त्यात राज्य मोडकळीस येण्याची जी विविध कारणे सांगितली आहेत त्यापैकी ‘अज्ञान’ हे एक महत्त्वाचे कारण आहे. यासंबंधी परांजपे यांनी मांडलेल्या विचारांचा सारांश असा –

मृत्युलोकी कोणतीच गोष्ट शाश्वत नाही. मग राज्ये तरी शाश्वत कशी असणार ? राज्य मोडकळीस येण्याच्या अनेक कारणांपैकी विशेष कारण असे की ज्ञानाचा प्रभाव आणि अर्थातच अज्ञानाचा अभाव होय. लाखो लोकांना आवश्यक ज्ञान असते तर त्यांनी आपल्या मुंड्या एखाद्या विवक्षित व्यक्तीच्या हाती खास कधीही दिल्या नसत्या.

लोकांचे अज्ञान व राजाचे ज्ञान हाच हा खेळ आहे. राजे लोक लोकांना विद्या देण्यासाठी लाखो रुपये खर्च करतात, विद्यालये व पाठशाळा बांधतात. ज्ञानप्राप्तीची साधने लोकांच्या आटोक्यात आणून ठेवतात. असे असूनही राजाला ज्ञानदानाच्या बाबतीत नावे ठेवणे बरोबर नाही असे वाटत असेल तर ते चूक आहे. कारण धूर्त राजे ज्ञानदानाचा आव अधिक आणतात.

बेकनने असे म्हटले आहे की अडाणी लोकांपेक्षा सज्ञान लोकांवर राज्य करणे सोपे. बेकनचे हे म्हणणे तात्त्विक दृष्ट्या खरे असले तरी व्यवहार्य नाही. लोकांचे अज्ञान हे जर राज्याच्या उत्कर्षाला कारणीभूत होते तर लोकांचे ज्ञान हे राज्य मोडकळीस आणण्यास जबरदस्त कारण असले पाहिजे. ज्ञानाचा प्रसार हे राज्याच्या नाशाचे जबरदस्त कारण, हे ठीक आहे. पण ज्ञानाचा प्रसार अधिक झाला म्हणजे ज्ञानी लोकांचे ज्ञान विविध रूपाने कार्य करू लागते. तेही घातकच

होय. ज्ञानामुळे निरनिराळे विकल्प निर्माण होतात. सदसद्विवेकबुद्धी हा विचार ज्ञानामुळेच प्रसार पावतो व केलेले कायदे सद्सद्विवेकबुद्धीच्या कसोटीवर घासून पाहून ते कायदे न पाळण्याची प्रवृत्ती ज्ञानामुळे होते.

या निबंधात ज्ञानप्रसारामुळे निर्माण होणाऱ्या इष्ट व अनिष्ट प्रवृत्तींचा परामर्श परांजपे यांनी घेतला आहे.

शैक्षणिक दृष्ट्या राजसत्ता व शिक्षण यांचा परस्परसंबंध जवळचा असतो. परांजपे यांनी ' राजा ' हा शब्द वापरताना त्यांच्या डोळ्यासमोर जुनी राजसत्ता असावी. एकतंत्री राजसत्ता डोळ्यासमोर ठेवून त्यांनी हे विवेचन केले आहे. त्यांचे मुद्दे खरे आहेत. पण आपण लोकशाही राज्यपद्धती स्वीकारलेली आहे. लोकशाही राज्यपद्धतीत ' शिक्षणाने व्यक्ती स्वतंत्र व्हावी, त्यातच तिचा नैतिक विकास आहे ' असे मानले जाते.

लोकशाही राज्यपद्धती ही लोककल्याणकारी राज्यपद्धती असते. त्या पद्धतीत लोकांना शिक्षण देऊन ज्ञानी बनविणे हे त्या पद्धतीचे कर्तव्यच आहे. अर्थातच लोक मिळालेल्या ज्ञानाचा व स्वातंत्र्याचा दुरुपयोग करूनही व्यवस्था खिळखिळी करू शकतात. पण त्यावरही उपाय ज्ञान वा शिक्षण हाच आहे. ज्ञानाचा सदुपयोग वा दुरूपयोग हा अखेर त्या व्यक्तीला वा समूहाला ज्या प्रभावीपणे व ज्या पद्धतीने शिक्षण मिळाले असेल त्यावर अवलंबून आहे. परांजपे यांचे विचार या दृष्टीने तपासून घेणे आवश्यक आहे.

### वर्तमानपत्रांचा प्रसार : लोकशिक्षण

नव्या काळात वर्तमानपत्रांच्या प्रसाराने लोकशिक्षणाचे काम अधिक सुकर झाले आहे. याबाबत विवेचन करताना परांजपे यांनी शिक्षणाची तत्कालीन स्थिती, शिक्षणाची परिणामकारक साधने, लोकशिक्षण इ. विषयांची चर्चा केली आहे.

**सरकारला आलेले अपयश** – इंग्रजांनी या देशात आपल्या राज्याची घडी व्यवस्थित बसविली आणि नंतर हिंदुस्थानातील लोकांना शिक्षण देण्याचा कारखाना काढला. याबाबत परांजपे म्हणतात –

" वळिवाच्या पावसाप्रमाणे ह्या विद्यादानाने वरवरची जमीन कोठे कोठे भिजली आहे. बाकी आता सर्व कोरडे आहे."

सरकारने प्राथमिक शिक्षण देण्याचे ठरविले. इमारती उभ्या राहिल्या. मास्तर नेमले, रिपोर्ट तयार झाले. पण सरकारची दिशा चुकली. इंग्रजी येथे येण्यापूर्वी तात्या पंतोजी मुलांना शिक्षण देत. तरी त्यावेळी स्थिती फारशी वाईट नव्हती.

**शास्त्री व हरिदास यांचे लोकशिक्षणाचे कार्य** – प्रत्यक्ष शाळा वा तात्या पंतोजी प्रकारचे शिक्षण यांच्या व्यतिरिक्त शास्त्री, कीर्तनकार, पुराणीक यांनी या

समाजात लोकशिक्षणाचे कार्य केले आहे. लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, सर्व प्रकारचे लोक या लोकशिक्षणाच्या शाळेत येत असत.

या प्रकारचे शिक्षक हे नावाच्या भपक्यावाचून शिक्षणाचे कार्य करीत होते. पण नवी शिक्षण पद्धती आली आणि हळूहळू ही लोकशिक्षणाची साधनेही अस्तंगत होत चालली.

**शाळेबाहेरचे शिक्षण** – "ज्या लोकांना शाळेत बसून पाच पाच तासपर्यंत वेळ दवडण्याला सवड नसेल त्यांना चावडीवर, चवाठ्यावर किंवा देवळात शिक्षण मिळाले पाहिजे. केवळ पुस्तके वाचून शिक्षण मिळेल असे नाही तर ज्ञान मनुष्याच्या मनात अनेक मार्गांनी प्रवेश करते." डोळ्याप्रमाणे कानही ज्ञानाचे ओघ हृदयात साठवून ठेवतात. ज्ञानसंपादनाच्या कामात डोळे आणि कान ही दोन्ही इंद्रिये मनुष्याला पुष्कळ मदत करतात. लोकशिक्षणाच्या कामी पूर्वीचे हरिदास, पुराणीक, पोवाडे गाणारे, तमासगीर, भजनी, उपदेश करणारे गुरू या साऱ्यांचा उपयोग आपण करून घेतला पाहिजे.

**वर्तमानपत्रे** – शिक्षणाच्या अनेक जुन्या साधनात नव्या साधनांची भर पडली आहे. वर्तमानपत्रे आणि व्याख्याने ही ती नवी साधने होत. पण लिहितावाचता आल्याशिवाय आणि वर्तमानपत्रातील मजकुराचे आकलन झाल्याशिवाय वर्तमानपत्रांचे लोकशिक्षणाचे कार्य यशस्वी होणार नाही. यासाठी ज्यांना वर्तमानपत्रे वाचता येत नाहीत त्यांना ती वाचून दाखविणारे कोणीतरी असले पाहिजेत.

शाळेतील शिक्षकांनीही लोकांना वर्तमानपत्रे वाचून दाखवून लोकशिक्षण कार्यात सहभागी व्हायला हवे, देवळे, पाणवठे, नदीकाठ, अशा गर्दीच्या ठिकाणी वर्तमानपत्रांच्या वाचनाचा अड्डा झाला पाहिजे.

वर्तमानपत्रांप्रमाणेच अन्य प्रकारे लोकशिक्षणाचे काम करणारे शिक्षक, हरिदास, पुराणिक, उपदेशक, बाळसंतोष, बहुरुपी, तमासगीर, गारुडी, गाणी म्हणणारे भिक्षेकरी, कानफाटे गोसावी, मनाचे श्लोक म्हणणारे वारकरी रामदासी, अभंग म्हणणारे वारकरी हे लोक हेच कार्य चांगले करू शकतील.

या निबंधाचे शीर्षक 'वर्तमानपत्रांचा प्रसार' असे असले तरी परांजपे यांनी लोकशिक्षणाच्या कार्यात ज्या ज्या घटकांचा उपयोग होऊ शकेल त्या सर्वांचा विचार या निबंधात केला आहे.

त्याचप्रमाणे ज्ञानेंद्रियांबाबतचे त्यांचे विवेचन शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. डोळ्यांपेक्षा कानांनी ज्ञानग्रहण अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकते हा परांजपे यांचा मुद्दा विचारात घेण्यासारखा आहे.

या निबंधात एक महत्त्वाचा भाग आहे तो म्हणजे 'अनौपचारिक शिक्षण'.

शाळेतील शिक्षणापेक्षा शाळेबाहेरचे शिक्षण अधिक प्रभावी आहे असे परांजपे सांगतात. यासाठी त्यांनी सरकारला प्राथमिक शिक्षणाबाबत जे अपयश आले त्याचा आधार घेऊन ग्रामीण भागात हरिदास प्रवचनकार-कीर्तनकार जे प्रबोधन करतात त्याबाबत चांगले विवेचन केले आहे.

अनौपचारिक शिक्षण व लोकशिक्षण याबाबत वर्तमानपत्रेही चांगले काम कसे करून शकतील याचे विवेचन या निबंधात आहे.

## नीतिशिक्षण

शिक्षण प्रक्रियेत नैतिक शिक्षण ही एक आवश्यक बाब समजली जाते. अर्थातच असे शिक्षण प्रत्यक्ष न देता अन्य विषयांच्या अनुषंगाने आपोआपच दिले जावे अशी अपेक्षा असते.

परांजपे यांनी 'नीतिशिक्षणाची शाळा' या नावाचा एक निबंध लिहिला आहे. या निबंधात त्यांच्या नेहमीच्या उपहासात्मक व काव्यात्मक शैलीतून त्यांनी 'नीती' या विषयासंबंधी व तत्संबंधीच्या शिक्षणाविषयी विचार मांडले आहेत. त्यांचा सारांश असा –

नीतिशिक्षणाची शाळा स्थापन करावयाचीच असेल तर ती शाळा स्थापन करणाराच पहिला विद्यार्थी होईल. दुसऱ्यांना शिकविण्यासाठी पुष्कळ शाळा काढल्या जातात. पण स्वत:ला शिकविण्यासाठी अशी शाळा काढणे हे विशेष. अशा शाळेत वयस्कर लोकांनाच शिकविले पाहिजे. कारण अल्पवयी मुलांची साधारणपणे सद्‌गुणांकडेच प्रवृत्ती असते. जगातील आवश्यकता व वाईट उदाहरणांचे अनुकरण यांमुळे माणसे बिघडतात, अनीतिमान होतात. मोठ्या माणसांना आपण नीतीनेच वागतो असे वाटते. आपल्या हातून काही चूक घडत आहे असे त्यांना वाटत नाही. अशा शाळेत येण्याला कितीतरी लोक पात्र आहेत. पण अशा शाळेत लोक येणार मात्र नाहीत. गरीब लोकांपेक्षा श्रीमंतांनाच (पैसेवाल्यांना) अशा शाळेत घालणे आवश्यक आहे. नीती आणि न्याय यांचा संबंध फार जवळचा आहे. म्हणून न्यायखात्यातल्या सर्व लहान-मोठ्या अधिकाऱ्यांनी या शाळेत यावे. नीतिशिक्षणाच्या शाळेत शिकविणारा शिक्षक नुसताच बुद्धिवान असून चालणार नाही. तो चारित्र्यवान हवा. (पण असा शिक्षक मिळणे अवघड आहे) नीतिशिक्षणाच्या शाळेत कोणीही मोठी माणसे येण्यास तयार नाहीत, लहान मुले मात्र तयार आहेत.

या लेखात परांजपे यांनी व्यक्त केलेले विचार शैक्षणिक दृष्ट्याही मोलाचे आहेत. शिक्षणाच्या अनेक उद्दिष्टांपैकी नैतिकता निर्माण करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट मानण्यात येते. इतर सर्व बाजूंनी विद्यार्थ्यांचा विकास झाला तरी नीतिमत्ता हिणकस असेल तर व्यक्तिमत्त्वाचा सारा डोलाराच कोसळून पडेल.

‘विद्यार्थ्यांत सद्‌विचार, सदाचार, सत्प्रवृत्ती निर्माण करणे, या भावनांचे प्रवर्तन करणे, नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करणे, त्यांचे चारित्र्य घडविणे हे शिक्षणाचे सर्वश्रेष्ठ ध्येय ठरते.’’

कोठारी आयोगाने नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करणे, त्यांचे चारित्र्य घडविणे हे शिक्षणाचे सर्वश्रेष्ठ ध्येय मानले आहे.

परांजपे यांनी त्यापुढेही जाऊन प्रत्यक्ष नीतिशिक्षणाची शाळाच काढावी असे सूचित करून अशी शाळा काढल्यास तिची आवश्यकता कोणाला, तीबाबत प्रतिक्रिया कोणत्या, याची चर्चा केली आहे.

## विद्येचा उपयोग

स्वातंत्र्यपूर्व काळात, ब्रिटिश अमदानीत, विशेषत: एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, हिंदुस्थानातील लोकांना कोणते शिक्षण द्यावे, शिक्षण द्यावे किंवा नाही, याविषयी बरीच चर्चा होत असे. यासंबंधी परांजपे यांनी ‘विद्येचे उपयोग’ या नावाचा एक लेख लिहिला. या लेखाचा सारांश असा –

इ.स. १८३८ साली सर चार्लस ट्रॅव्हेलियन यांनी असे लिहिले आहे की हिंदुस्थानातील लोकांना शिक्षण देणे हे आपले कर्तव्य आहे. हिंदुस्थानील लोक सुशिक्षित झाले म्हणजे त्यांना आपली (इंग्रजांची) गरज उरणार नाही व तेणेकरून राज्यालाच धोका निर्माण होईल असे काहींचे म्हणणे आहे. पण आपल्याला राज्य करावयाचेच असेल तर ते हिंदुस्थानातील लोकांच्या कल्याणासाठी केले पाहिजे. हिंदु लोकांना इंग्रजीचे शिक्षण दिले पाहिजे तरच त्यांचे व इंग्रजांचे संबंध दृढ होतील. इंग्रज लोक परकीय आहेत असे त्यांना वाटणार नाही. नेटिवांच्या विचाराला नवी दिशा प्राप्त करून द्यायची असेल तर युरोपीय शिक्षणच द्यायला हवे. त्यांना ज्ञान मिळाले की इंग्रजांविषयी दुरावा त्यांच्या मनात उरणार नाही. इंग्रजांनी राज्यकारभाराचे धोरण कसेही ठेवले तरी केव्हातरी नेटिव लोक आपले स्वातंत्र्य परत मिळवणार. स्वातंत्र्य मिळवण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला राज्यक्रांतीचा आणि दुसरा सुधारणेचा. राज्यक्रांतीचा मार्ग अघोर आहे. सुधारणेच्या मार्गाने दोघांमधील सख्य वाढेल. नेटिवांना शिक्षण दिले की आकस्मिक राज्यक्रांतीची भीती उरणार नाही. शांतपणे व क्रमाक्रमाने त्यांच्या विचारांची दिशा बदलली की इंग्रज व नेटिव यांच्यात तंटा उत्पन्न होणार नाही. सुख आणि स्वातंत्र्य यांचे शिक्षण नेटिवांना दिले, विद्या आणि राजकीय संस्था यांचे शिक्षण दिले तर स्वातंत्र्य ही इंग्रजांच्या परोपकारबुद्धीची साक्ष होऊन राहील. या पद्धतीत दोन फायदे आहेत. या देशावर इंग्रजांचे राज्य पुष्कळ वर्षे टिकेल. आणि जेव्हा अपरिहार्यपणे स्वातंत्र्य द्यावेच लागेल तेव्हा या देशातले लोक स्वातंत्र्य संपादनास पात्र झालेले असतील.

या निबंधात परांजपे यांनी आपले विचार स्वतंत्रपणे मांडलेले नाहीत. तर ट्रॅव्हेलियन यांनी मांडलेल्या विचारांचा आढावा त्यात घेतला आहे.

विद्या संपादनामुळेही सत्तांतर घडू शकते, स्वातंत्र्याची आकांक्षा पूर्ण होऊ शकते आणि राज्यकर्त्यांनीही कर्तव्यबुद्धीने आपल्या प्रजेला शिक्षण द्यावे हे महत्त्वाचे मुद्दे ट्रॅव्हेलियन यांनी मांडले होते. त्यांचाच पुनरूच्चार परांजपे यांनी केला आहे.

**शिक्षणाची फलश्रुती**

'डेक्कन कॉलेजला पाहून केशवरावांच्या मनात आलेले विचार' या नावाचा एक लेख परांजपे यांनी लिहिला आहे.

डेक्कन कॉलेमध्ये शिकलेले केशवराव नावाचे गृहस्थ. वीस-पंचवीस वर्षाचा अवधी मध्ये गेला. केशवराव एकदा फिरायला म्हणून त्या बाजूला गेले. एका स्वच्छ कातळावर विसावा घेण्यासाठी बसले. दूरवरून डेक्कन कॉलेजची शिखरे दिसत होती. मधे एक लहानसा ओढा वाहात होता. पलीकडे एक गुराखी बासरी वाजवत होता. हा गुराखी किती आनंदी आहे असे विचार केशवरावांच्या मनात आले. आपण शिक्षण घेतले नसते तर या गुराख्यासारखे अज्ञानाचा आनंद वागवीत आपणही हिंडलो असतो असे केशवरावांना वाटले.

आपल्या देशातल्या लोकांच्या दु:स्थितीबद्दल केशवराव कष्टी होते. पण तो गुराखी, त्याला काहीच ज्ञान नसल्यामुळे, सुखी होता. डेक्कन कॉलेजने जे ज्ञान दिले त्यामुळे केशवरावांना वास्तवाचे ज्ञान झाले. इतिहासातल्या लढाया, फंदफितुरी, यशापयश यांचे ज्ञान झाले. पण या ज्ञानामुळेच केशवराव कष्टी झाले. कारण हे ज्ञान पंगु आहे. केशवराव म्हणतात –

"डेक्कन कॉलेजने मला धड या तीरावर या गुराख्यासारखे अलगुज वाजवत आणि गाई चारीत बसू दिले नाही, आणि धड पलीकडच्या तीरावरही ह्या जगातील स्पृहणीय व उन्नत स्थितीचा अनुभव घेण्यास मला नेले नाही."

केशवरावांची खंत आहे ती याची की ज्ञान मिळाले पण आपल्या अज्ञानाची, दारिद्र्याची, परिस्थितीची जाणीव होण्यापुरतीच. त्यातून प्रत्यक्ष निर्मिती नाही.

हे विचार परांजपे यांनी 'केशवराव' या पात्राच्या तोंडून वदविले असले तरी तत्कालीन सर्वसामान्य सुशिक्षिताला – जो स्वातंत्र्यप्रेमी आहे, स्वत्वप्रेमी आहे त्याला - असेच वाटत असावे अशी परिस्थिती होती.

या लेखातच त्यांनी टँटॅलस राजाचे उदाहरण दिले आहे. टँटॅलसला अपराधाबद्दल काही शिक्षा देण्यात आली होती. ती शिक्षा अशी होती की त्याला हनुवटीपर्यंत पाण्यात बुडवून ठेवण्यात आले होते. पण तहान लागली तरी त्याला पाणी मात्र पिता येत नव्हते. पाण्यात बुडलेला असून त्याची तहान भागत नव्हती.

अशीच स्थिती त्या काळात आपल्या देशातल्या सुशिक्षितांची होती. इंग्रजी विद्येमुळे तरूणांना ज्ञान मिळाले. पण ते 'बोळ्याने दूध' असेच त्याचे स्वरूप होते. देश परतंत्र होता. सत्ता इंग्रजांची होती. इंग्रजी विद्येचे वैभव मोठे होते. त्या वैभवाचा परिचय झाला. आणि सुशिक्षितांचे डोळे दिसले. पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाखाली ते दडपले गेले. पण ती संस्कृती, ते वैभव, आत्मसात करून त्याचा फैलाव करण्याचा मार्ग म्हणजे स्वातंत्र्य. ते तर नव्हतेच. त्यामुळे दुसऱ्याचे वैभव नुसते बघत बसणे एवढेच त्यावेळच्या सुशिक्षितांना करता येत होते.

या निबंधात वर्णिलेला अलगुज वाजवणारा गुराखी हा अल्पज्ञानात व अज्ञानात आनंद मानणाऱ्यांचा प्रतिनिधी आहे तर केशवराव हे हाती सत्ता नसलेले ज्ञानवंत आहेत.

### धंदेशिक्षण व शिक्षण

ब्रिटिश अमदानीत औद्योगिक क्रांतीची बीजे भारतात रोवली गेली आणि व्यवसाय शिक्षण वा धंदेशिक्षण यांची अधिक गरज भासू लागली. नवी सुखसाधने, यंत्रे यांनी माणसाच्या जीवनात क्रांती केली. पण या गोष्टीचा दोन्ही अंगांनी विचार करणे आवश्यक झाले. सुखाची साधने ही खरोखर सुखाची की दुःखाची असा प्रश्न पडण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे असे परांजपे यांचे मत आहे.

आपल्या उपहासगर्भ शैलीत लिहिलेल्या निबंधात त्यांनी धंदेशिक्षण, शिक्षण यांची भुते निर्माण झाली आहेत असे कल्पून पुढे विवेचन केले आहे. यासाठी काऊंट टॉलस्टॉय यांच्या एका कथेचा आधार त्यांनी घेतला आहे.

जगात सुख शांतता नांदत असताना सैतानाला काहीच काम नव्हते. पण सैतान निराश झाला नव्हता. एक दिवस सैतानाला सुवार्ता समजली. जगातील सुखशांतीचा उच्छेद करणाऱ्या युक्त्या सैतानाच्या भुतांनी शोधून काढल्या होत्या.

धंदेशिक्षणाचे भूत – थोड्या वेळात ताबडतोब निरूपयोगी होणाऱ्या वस्तू शोधून काढल्या.

श्रमविभागणीचे भूत – मनुष्यांना केवळ यंत्राप्रमाणे करून ठेवले.

आगगाडीचे भूत – आपण जेथे आहोत तेथेच सुधारणा करावी हे तत्त्व लोक विसरले व प्रवासातच भूषण मानू लागले.

मुद्रणकलेचे भूत – जगातील मूर्खपणाच्या, वेडगळपणाच्या गोष्टी लोकांना कळतील अशी व्यवस्था केली.

औषधाचे भूत – शरीराबद्दल खूप कळकळ निर्माण केली व आत्म्याकडे दुर्लक्ष करविले.

सुधारणेचे भूत – "मी सर्वश्रेष्ठ भूत आहे. आधुनिकतेचे सर्व विचार मी

लोकांच्या मनात भरवून दिले आहेत."

शिक्षणाचे भूत – "स्वत: वाईट असूनही दुसऱ्यांना सुशिक्षण देण्यांची कला मी जगात प्रचलित केली.

कायदा व राज्यव्यवस्था यांचे भूत – दरोडे व खून यांचे राज्य मी बदलले आहे.

ही सर्व भुते आपल्या कर्तबगारीबद्दल जे सांगतात ती आधुनिक सुधारणांवर टीका आहे. शिक्षणाने व धंदेशिक्षणाने माणूस सुखी होण्याऐवजी दु:खीच जास्त झाला आहे हे परांजपे यांना सांगावयाचे आहे.

अर्वाचीन काळात पदार्थविज्ञानशास्त्र व यंत्रशास्त्र यात जी प्रगती झाली आहे ती लक्षणीय आहे हे मान्य करूनही पूर्वी याच प्रकारचे शास्त्र प्रगत होते याबद्दल अथर्ववेदातील उल्लेखांचा आधार घेऊन परांजपे यांनी विवेचन केले आहे.

आमच्या जुन्या मशीनगन्स (का. नि. नि. भाग७) या निबंधात त्यांनी योगशास्त्राच्या अभ्यासाचे वर्णन केले आहे.

योगशास्त्राला आधुनिक शिक्षण पद्धतीत मान्यता मिळाली आहे. यावरून योगाचे महत्त्व किती आहे हे स्पष्ट होते. मनुष्याची शारीरिक व मानसिक उन्नती योगामुळे होऊ शकते हे आता सिद्ध झाले आहे.

परांजपे यांनी आपल्या निबंधात धंदेशिक्षणाचे फायदे-तोटे यांचा विचार केला आहे. पदार्थविज्ञान-शास्त्राच्या प्रगतीमुळे झालेले वैज्ञानिक बदल नोंदवले आहेत. पण प्राचीन योगशास्त्राचा नव्या संदर्भात विचार केला पाहिजे असे ते केवळ सूचित करतात.

## देशोद्धार आणि प्रबोध

'ग्रीस देश स्वतंत्र कसा झाला.' या आपल्या एका निबंधात परांजपे यांनी ग्रीसच्या स्वातंत्र्यसंपादनाचे प्रयत्न कसे झाले याचे वर्णन केले आहे. त्यात ते म्हणतात –

"ग्रीसच्या स्वतंत्रतेचे पहिले शिपाई म्हटले म्हणजे ग्रीसमधील शिक्षक होत. ग्रीसमधील कित्येक लोक विद्या संपादनासाठी प्रथम व्हेनिसमध्ये गेले. पण ते दुसऱ्या देशात गेले. म्हणून आपल्या देशाला विसरले नाहीत. तेथून परत येऊन त्यांनी अथेन्समध्ये शाळा काढल्या. या शिक्षकांच्या शाळा होत्या. इकडील ट्रेनिंग कॉलेज वगैरे संस्थांप्रमाणे या शाळांतून शिक्षक तयार होऊन सर्व देशभर पसरले व त्यांनी आपल्या देशबांधवांना स्वतंत्रतेचा उपदेश करण्यात सुरुवात केली."

देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या कामी ग्रीसमध्ये शिक्षकांनी जे प्रबोधनाचे कार्य केले त्याबद्दलचे परांजपे यांचे हे विवेचन शैक्षणिक दृष्ट्या मोलाचे आहे.

'आपण काय पेरावे' या एका निबंधात पेरणीचा हंगाम जवळ आला,

आता आपण काय पेरलं पाहिजे. यावषयी रूपकात्मक विवेचन करून परांजपे यांनी या देशात सुखसमृद्धीसाठी ज्या गोष्टींची आवश्यकता आहे अशाच गोष्टी पेरल्या पाहिजेत असे सूचित केले आहे.

पाश्चिमात्य लोकांनी या देशात कलहाचे बी पेरले आणि आपली स्वतंत्रता आपण घालवून बसलो. शिक्षणाबाबत ते म्हणतात –

"शिक्षणाचे बी येथे पेरले जात आहे व त्याच्या वेली जोराने जमिनीतून वर येत आहेत. पण त्या वेलींना वर चढण्याला काही आश्रय नसल्यामुळे त्या खाली पडून त्यांच्या माना मोडून जात आहेत."

परांजपे यांना याठिकाणी असे सूचित करावयाचे आहे की इंग्रजांनी या देशात नव्या शिक्षणाचे बी रुजवले. पण या मातीत त्याला आधार नसल्यामुळे हे बी रूजूनही त्या वेली वाढणार नाहीत. त्यांना भक्कम आधार दिला पाहिजे. हा आधार अर्थातच आर्थिक व मानसिक स्वरूपाचा असतो.

या निबंधाचा उपसंहार परांजपे यांनी सर्वसामान्य निष्कर्षात्मक विधान करून केला आहे. ते म्हणतात –

"आपण आपल्या देशाच्या शेतामध्ये असे बी पेरावे की ज्याच्यापासून त्याच्यामध्ये आपल्या देशाचे खरे सुख उगवेल."

'दासबोध' या नावाचा एक लेख परांजपे यांनी लिहिला. या लेखात रामदासांनी जे प्रबोधनकार्य केले, दास्यमुक्तीसाठी महाराष्ट्राला जी उभारी प्राप्त करून दिली त्या संबंधी त्यांनी विवेचन केले आहे.

"दासबोधाचा अर्थ आपण असा घेतला पाहिजे की दास म्हणजे गुलाम झालेले जे लोक आहेत त्यांना केलेला बोध."

ज्या काळात परांजपे यांनी हा निबंध लिहिला त्या काळाला अनुलक्षून त्यांनी 'दासबोध' या सामासिक शब्दाचा जो विग्रह केला आहे तो योग्य वाटतो.

रामदासांनी लिहिलेल्या सामान्य दासबोधाच्या अंतर्गत एक विशेष असा दासबोध आहे असे परांजपे लिहितात –

"प्रत्येक राष्ट्रातील लोकांच्या मनावर कालगतीने एकप्रकारचे अज्ञानपटल येत असते. ते दूर करण्याला ज्ञानवंत साधू लागत असतात. त्यांनी ते दूर केले म्हणजे राष्ट्रातील लोक पाहिजे ते करण्याला तयार होतात. राख फुंकून टाकली म्हणजे त्याला भाजून काढण्याकरता तयार असतोच. रामदास स्वामींनी ही राख फुंकून टाकली."

रामदासांनी शिवकालात महाराष्ट्रात जे प्रबोधन केले त्याचेच हे वर्णन आहे. रामदासांनी लोकशिक्षणातून लोकजागृती घडविली. राख फुंकून टाकली म्हणजे

अज्ञानाचे पटल दूर केले.

"महंते महंत करावे। युक्तिबुद्धीने भरावे। जाणते करून विखरावे। नाना देशी ॥"

हा रामदासांच्या प्रबोधनकार्याचा मंत्र होता.

परांजपे यांनी रामदासांच्या या प्रबोधन कार्याचे महत्त्व ओळखून धुळ्याचे श्री. देव यांनी प्रसिद्ध केलेल्या 'दासबोध' आवृत्तीच्या निमित्ताने हा लेख लिहिला.

## लोकसंख्या शिक्षण-विचार

लोकसंख्या शिक्षण अगदी अलीकडे प्रचलित झालेला नवा विषय आहे. जगातील लोकसंख्येच्या विस्फोटामुळे निर्माण झालेले विविध प्रश्न विचारात घेऊन लोकसंख्या शिक्षणाची योजना शैक्षणिक अभ्यासक्रमात केली आहे.

परांजपे यांच्या लेखात या संदर्भात कोणकोणते विचार येतात हे अभ्यासणे आवश्यक आहे.

"दुष्काळाला कारण कोण?" (का. नि. नि. भाग ३) या निबंधात साधनसामुग्रीची विभागणी अधिक लोकसंख्येत झाली की स्वाभाविकपणे साधनांची कमतरता भासते हे तत्त्व त्यांनी विशद केले आहे.

'दगडी कोळसा' (का. नि. नि. भाग ७) या विषयावर त्यांनी लिहिलेला निबंध भौतिक साधन संपत्तीचे उपयोग, वितरण, यांविषयी विवेचन करणारा आहे. कोळाशाचा वापर, त्याला असलेली मागणी आणि त्याचे उत्पादन यांचा विचार करता कोळसा लवकर संपेल अशी भूगर्भशास्त्रवेत्त्यांना भीती वाटते असे सांगून नवी नवी ऊर्जासाधने निर्माण होत आहेत. तेव्हा ही भीती निराधार ठरू शकेल या मताशी परांजपे सहमत आहेत.

'पावसाने अतिशय घाण केली' (का. नि. नि. भाग ८) या निबंधात परांजपे यांनी हिंदुस्थानच्या लोकसंख्येचा विचार केला आहे.

"प्लेगने व दुष्काळाने हिंदुस्थानची लोकसंख्या कमी होत आहे हे सर्वांना माहीतच आहे. अशा वेळी ती लोकसंख्या वाढविण्याचे राजरोस असे जे एकच साधन लग्न... त्याचे मुहूर्त जास्त निघतील तर लग्नाचा कारखाना बाराही महिने सुरू राहिल."

असे परांजपे यांनी उपहासाने म्हटले आहे.

## शक्ती आणि शिक्षण

बेळगाव येथे भरलेल्या साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात, सरकारने जप्त केलेल्या पुस्तकांसंबंधी परामर्श घेताना परांजपे म्हणतात की, "सरकारने काही

पुस्तके जप्त केली म्हणून आपल्या ओजस्वी वाङ्मयाचे काही वाकडे झाले नाही. आपण चांगले वाङ्मय सतत निर्माण कसे करू शकू याकडे लक्ष दिले पाहिजे. चांगले वाङ्मय निर्माण करण्यासाठी शक्ती आणि शिक्षण यांची नितांत आवश्यकता आहे. याबाबत काव्यप्रकाशातील एक श्लोक परांजपे यांनी उद्धृत केला आहे –

शक्तिर्निपुणता लोकशास्त्रकाव्याद्यवेक्षणात्
काव्यज्ञशिक्षयाभ्यास इति हेतुस्तदुद्भवे।

याबाबत पुढे केलेल्या विवेचनाचा सारांश असा...

प्रतिभारूपी शक्ती व व्यापक स्वरूपाचे शिक्षण या दोन्ही गोष्टी उत्कृष्ट ग्रंथरचनेला आवश्यक आहेत.

प्रतिभा ईश्वरदत्त असते व शिक्षण मनुष्याला प्रयत्नाने संपादिता येते. नुसत्या प्रतिभेने चांगली ग्रंथरचना होईल. पण शिक्षणाच्या जोराने प्रतिभेवर बलात्कार करण्यात अर्थ नाही. शक्ती (प्रतिभा) आणि शिक्षण यांचा समागम हाच स्पृहणीय होय. शिक्षणाची जोड मिळाली म्हणजे प्रतिभा उतावीळपणे धावत नाही. चांगल्या ग्रंथरचनेला शिक्षण हे सर्व प्रकारांनी चांगलेच असले पाहिजे. त्यातल्या त्यात व्याकरण, न्याय, अलंकार यांची जोड असली पाहिजे. साहित्य संमेलनातून, चांगल्या ग्रंथनिर्मितीसाठी, शक्ती आणि शिक्षण या दोहोंचेही महत्त्व लोकांच्या मनावर ठसविले जावे.

साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून चांगल्या ग्रंथनिर्मितीच्या संदर्भात शिक्षणाचे महत्त्व विशद करणारे परांजपे यांचे हे विचार शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत. प्रतिभा या शब्दासाठी त्यांनी काव्यप्रकाशकारांच्या आधाराने 'शक्ती' हा शब्द वापरला आहे. परांजपे हे स्वदेशाभिमानी होते. सरकारने काही पुस्तके जप्त केली तरी आपण भरपूर प्रमाणावर उत्तम ग्रंथनिर्मिती करून सरकारच्या या कृतीला शह दिला पाहिजे असे ते सांगतात. यासाठी मात्र शिक्षणाची जोड अत्यावश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे आणि शिक्षणातही मोठी शक्ती असल्याचे सूचित केले आहे.

## उपसंहार

परांजपे यांच्या निबंधसाहित्याचे समालोचन करताना असे ध्यानात येते की परांजपे हे आगरकर, टिळक, केळकर या निबंधकारांपेक्षा अधिक काव्यात्मक वृत्तीचे निबंधकार आहेत.

विद्वत्ता, कवित्व व राष्ट्रप्रेम या गुणांचा त्रिवेणीसंगम परांजपे यांच्या साहित्यात झाला आहे.

स्वातंत्र्याची आंतरिक तळमळ, देशभक्ती, स्वदेशाभिमान यांमुळे त्यांचे लेखन तेजस्वी बनले. राजकीय व सामाजिक परिस्थितीवर उपरोधात्मक भाष्य करताना

परांजपे यांचे शब्द अडखळत नाहीत. हिंदुस्थानच्या एकंदर दुरवस्थेबद्दल त्यांनी विविध निबंधांतून आपले विचार व्यक्त केले आहेत. या दुरवस्थेला शिक्षणच कारणीभूत आहे असे त्यांना वाटत होते. आपल्या देशाचे गमावलेले स्वातंत्र्य पुन्हा परत आणण्यासाठी जे सामर्थ्य आवश्यक आहे ते सामर्थ्य त्याकाळची प्रचलित शिक्षणपद्धती विद्यार्थ्यांना देत नसल्याबद्दल त्यांना खंत होती. कॉलजात मिळणाऱ्या ज्ञानाला त्यामुळेच त्यांनी पंगु म्हटले आहे.

या देशात दिले जाणारे नामधारी परंतु उच्च असे शिक्षण तरुणांना पंगू बनवते. एवढेच नव्हे तर या शिक्षणाने लोकांना नास्तिक आणि धर्मभ्रष्ट केले आहे असे परांजपे यांना वाटत होते.

पंगू आणि कर्तृत्वशून्य शिक्षितांच्या चळवळीची मर्यादा, परकी सत्तेचा लष्करी सोटा बाहेर निघाला नाही तोपर्यंत असते. पण स्वत:ची लायकी आणि मर्यादा न ओळखणारे हे नामधारी सुशिक्षित स्वधर्माची, सामाजिक स्वकीय संस्थांची निंदा करताना पाहिजे की परांजपे यांना चीड येत असे.

वाचकाला एका विशिष्ट मन:प्रवृत्तीच्या वेष्टनाने भारून टाकावयाचे हे उद्दिष्ट परांजपे यांनी कधीही दृष्टीआड केले नाही. इंग्रज राज्यकर्त्यांबद्दल तीव्र निषेधबुद्धी या देशात काठोकाठ भरून राहिली पाहिजे हे त्यांच्या निबंध-लेखनातील प्रचारामागचे महत्त्वाचे सूत्र होते. इंग्रजी राज्यामुळे आलेल्या भौतिक सुधारणा व त्यामुळे मिळणारी सुखे राजकीय स्वातंत्र्य-सुखापुढे परांजपे यांना तुच्छ वाटत होती.

वाङ्मयीन, धर्मविषयक, निर्सगवर्णनपर, ऐतिहासिक, राजकीय व सामाजिक असे स्थूलमानाने विषय परांजपे यांनी निवडलेले असले तरी स्वातंत्र्यप्रीतीचा उद्घोष हेच प्रत्येक लेखामागचे परांजपे यांचे उद्दिष्ट आहे.

परांजपे यांनी प्रत्यक्षपणे शिक्षणविचार असा कोणताही मांडला नाही. पण स्वत: शिक्षक, लेखक, संपादक असल्यामुळे व जाज्वल्य स्वातंत्र्याभिमानी असल्यामुळे या देशाचे खरे दुखणे कोणते याची त्यांना जाण होती. परपुष्टता, दास्य यांची त्यांना चीड होती. म्हणूनच ते इंग्रजी शिक्षण पद्धतीच्या विरुद्ध होते. इंग्रजी भाषा, विज्ञान, इंग्रजी साहित्य, भौतिक सुधारणा यांना योग्य ते स्थान जीवनात दिलेच पाहिजे अशा मताचे परांजपे इंग्रजांच्या गुलामगिरीचा प्रश्न जेथे येईल तेथे इंग्रजांचा संपर्क मुळापासून नाकारतात. परांजपे यांच्या वाङ्मयात दिसून आलेला शिक्षणविचार हा वरील स्वरुपाचा आहे.

■ ■


चित्र बसवंत पुणे.

प्रकरण : ५

# नरसिंह चिंतामण केळकर

---

## चरित्ररेखा

मराठीतील मान्यवर निबंधकार, साहित्यसम्राट, नरसिंह चिंतामण केळकर यांच्या साहित्यातील शिक्षणविचाराचा परामर्श घेण्याआधी त्यांचे चरित्र थोडक्यात समजून घेणे आवश्यक ठरेल.

केळकर यांचा जन्म २४ ऑगस्ट १८७२ रोजी मिरज संस्थानातील मोडलिंब या गावी झाला. सातव्या वर्षापासून ते मिरजेच्या सरकारी शाळेत शिकू लागले. तरतरीत बुद्धीच्या केळकरांचा वर्गात सतत पहिला-दुसरा क्रमांक असे. वासुदेवशास्त्री खरे हे नाटककार व इतिहास संशोधक त्यांचे शिक्षक होते. फर्ग्युसन कॉलेज, राजाराम कॉलेज व डेक्कन कॉलेज येथे केळकरांचे उच्च शिक्षण झाले. १८९१ साली ते बी. ए.ची परीक्षा पहिल्या वर्गात पास झाले. पुढे एलएल. बी.ही प्रथम वर्गात पास झाले. महाविद्यालयीन अभ्यासक्रमात त्यांनी (अभ्यासेत्तर उपक्रमातही – खेळ, नाटक) नैपुण्य मिळविले.

साताऱ्यास त्यांनी वकिली सुरू केली. पण टिळकांच्या आकर्षणामुळे मराठा पत्रात काम करू लागले. टिळकांच्या कारावास समयी ते केसरीचे संपादक झाले. त्यानंतर १९३२ पर्यंत ते केसरीचे संपादक होते.

१९१४ ते १९१८ या काळात संपादकत्वाबरोबर टिळकांचे खाजगी सचिव, प्रांतिक पुढारी या नात्यानेही केळकर प्रसिद्धीस आले.

केळकरांचा अनेक सार्वजनिक संस्थांशी निकटचा संबंध होता. त्यांच्या काळात तर ते सर्वमान्य अध्यक्ष म्हणून प्रसिद्धीस आले होते. कोणत्याही सभेचे अध्यक्षपद केळकरांकडेच असावे असे लोकांना वाटे.

केसरी मराठा संस्थेतून ते निवृत्त झाले. त्यानंतर हळूहळू आपल्या अनेक सार्वजनिक संस्थांशी त्यांनी संबंध सोडला. कुठे संस्थापक, कुठे आजीव सदस्य, कुठे अध्यक्ष इ. अनेक पदे त्यांनी भूषविली. केळकर हे एक कार्यप्रवृत्त साहित्यिक होते. केळकरांचा ज्या ज्या संस्थांशी संबंध होता त्यांची यादी किती विस्तृत आहे हे पाहिले म्हणजे त्यांच्या चौफेर व्यक्तिमत्त्वाची कल्पना येईल. ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ, भोसला मिलिटरी स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, देवगड एज्युकेशन बोर्ड, महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ... यासारख्या शिक्षणसंस्थांशी त्यांचा जवळचा संबंध होता. याशिवाय साहित्य संस्था, नाट्यसंस्था, विविध प्रकारचे ट्रस्ट, राजकीय पक्ष यांच्याशीही त्यांचा निकटचा संबंध होता. अशा सुमारे ५० ते ६० संस्थांची यादी आहे. यावरून केळकरांचा दीर्घोद्योग, सार्वजनिक कार्याची जिवंत हौस, अष्टावधानी बुद्धी आणि कार्यक्षमता हे केळकरांचे गुण ध्यानात येतात. त्यांची लोकप्रियता किती मोठी होती हेही लक्षात येते. नगरपालिकेसारख्या संस्थेत केळकरांनी आपला ठसा उमटविला होता. केळकरांनी स्वातंत्र्य पाहिले... आणि त्यांचे देहावसान झाले.

केळकरांना परदेश प्रवासही घडला होता. काँग्रेसच्या व होमरुल लीगच्या शिष्टमंडळाचे सदस्य व टिळकांचे मदतनीस म्हणून केळकरांचा मुक्काम विलायतेस जवळ जवळ सहा महिने होता. लंडनमधील मुक्कामात केळकरांकडे 'इंडिया' पत्राचे जोड संपादक ही कामगिरी देण्यात आली होती. तथापी जवळच्या अनेक शहरी केळकरांनी होमरूलविषयी व्याख्याने दिली. माँटेग्यूबरोबर चर्चा करण्यासाठी अनेक वेळा ते व पटेल गेले होते. केसरीसाठी लंडनची बातमीपत्रेही ते नियमितपणे लिहीत असत.

गांधीजी, केळकरांच्या कामगिरीची प्रशंसा करताना म्हणतात –

"केळकरांनी टिळकांची गादी संभाळली हे अगदी खरे आहे. त्यांनी केसरी चालविला, वाढविला आणि तो इतक्या मर्यादेपर्यंत की मंडाले तुरुंगातून टिळक परत आले ते पुन्हा त्या गादीवर बसले आणि जणू आपण देशाबाहेर गेलोच नव्हतो अशा रीतीने त्यांनी ती गादी चालाविण्यास सुरुवात केली. टिळकांनी लगेच काँग्रेसचा कब्जा घेतला आणि होमरुलची चळवळ सुरू केली. या सगळ्याचे श्रेय केळकरांना आहे."

अफाट कामाच्या पसाऱ्यातही केळकर आपली प्रसन्नता टिकवून होते आणि उत्साहाने प्रत्येक गोष्टीत भाग घेत होते. १९२८ साली प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे त्यांना सिमल्याला जाता आले नाही. पण लाला लजपतराय यांची तार आल्याबरोबर ते सिमल्याला गेले आणि पब्लिक सेफ्टी बिलावर भाषण करून तेथे त्यांनी आपले

विरोधी मत नोंदविले. त्यानंतर एकदा कानाचा आजार उद्‌भवला असता असेच घडले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खेर मंत्रीमंडळ अधिकारावर आले तेव्हा केळकरांना अत्यंत आनंद झाला होता. बाळसाहेब खेर यांना त्यांनी थोर मनाने आशीर्वाद दिला.

आयुष्यभर केलेला अफाट व अचाट उद्योग, प्रवास, भाषण, समाजकार्य, राजकारण, लेखन, संपादन, शिवाय त्याचबरोबर कौटुंबिक कर्तव्ये, इतक्या कार्यबाहुल्याच्या मानाने केळकरांना त्यांच्या प्रकृतीने साथ दिली असेच म्हटले पाहिजे. हजारो पृष्ठांचे लेखन, हजारो मैलाचा प्रवास, हजारो व्याख्याने... सारेच काही हजारांच्या संख्येने मोजावे. शेवटी मात्र प्रकृतीने तक्रार सुरू केली. 'दिसो लागे मृत्यू' अशी अवस्था झाली आणि १९४७ मध्ये नरसिंह चिंतामण केळकर कैलासवासी झाले.

### केळकरांचे साहित्य

नरसिंह चिंतामण केळकर यांना 'साहित्यसम्राट' अशी पदवी देण्यात येऊन ते त्याच पदवीने अधिक ओळखले जातात. राजकारण, समाजकारण, पत्रकारिता, साहित्य या अनेक अंगांपैकी त्यांचे साहित्यक्षेत्रातील कार्य तुलनेने मोठे आहे. साहित्याची एकही शाखा अशी नाही की जेथे केळकरांचा संचार नाही. केळकरांनी विपुल लेखन केले. कवी, नाटककार, लघुकथा लेखक, टीकाकार, कादंबरीकार, संपादक, चरित्रकार, निबंधकार या सर्वच नात्यांनी केळकर साहित्य क्षेत्रात सुपरिचित आहेत. त्यांच्या साहित्य सेवेचे स्वरूप खालीलप्रमाणे...

नाटके – तोतयाचे बंड, चंद्रगुप्त, कृष्णार्जुनयुद्ध, अमात्यमाधव, वीर विडंबन, संत भानुदास, सरोजिनी, नवरदेवाची जोडगोळी. (एकूण आठ)

चरित्रे – इटालियन देशभक्त गॅरिबाल्डी, आयर्लंडच्या इतिहासातील चरित्रमाला, लो. टिळकांचे चरित्र, फ्रान्सची झांशीवाली.

कांदबरी – नवलपूरचा संस्थानिक, बलिदान, कोकणचा पोर (अपूर्ण).

लघुकथा – सुमारे पंचवीस लघुकथा.

काव्य – २००० ओळीपर्यंतच्या कविता.

आत्मचरित्र – गतगोष्टी अर्थात माझी जीवनयात्रा.

वैचारिक – राज्यशास्त्र, भारतीय तत्त्वज्ञान, हास्यविनोद मीमांसा.

निबंध – केसरी मराठा सहयाद्री यांतून वेळोवेळी, सातत्याने लेखन, शेकडो विषयांवर शैलीदार निबंध.

१९३८ मध्ये म. म. केळकर यांनी केळकरांच्या समग्र वाङ्मयाचे १२ खंड प्रसिद्ध केले. सुमारे एक हजार पृष्ठांचा एक (काही त्याहूनही अधिक) असे बारा

खंड, म्हणजे बारा हजार पृष्ठांचे हे लेखन मुद्रित स्वरूपात उपलब्ध आहे. या खंडांत केळकरांचे सर्व प्रकाशित व अप्रकाशित साहित्य संकलित केलेले आहे. एवढेच नव्हे तर केळकरांची काही व्याख्यानेही लिखित स्वरूपात तयार करून या ग्रंथात समाविष्ट करण्यात आली आहेत.

वकील होण्यासाठी त्या व्यवसायाकडे वळलेले केळकर मूळची हौस साहित्याची असल्यामुळे टिळकांकडे आले आणि आपली हौस हा आपला व्यवसाय त्यांनी केला. तरीही त्याला धंदेवाईक रूप न दिल्यामुळे त्यांच्या हातून ही प्रचंड साहित्यसेवा घडू शकली. केळकरांच्या लेखनसंभारात त्यांनी अनेक पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावनांचाही विचार करावा लागेल. अशा ४१ पुस्तकांची यादी त्यांना जो षष्ठ्यब्दिपूर्तिनिमित्त ग्रंथ समर्पण करण्यात आला होता त्यात दिली आहे.

## केळकरांचे शिक्षणविषक लेखन

केळकर यांनी लिहिलेल्या शेकडो निबंधातून त्यांचे शिक्षणविषयक लेख निवडून त्यांचा परामर्श पुढे घ्यावयाचा आहे. अन्य लेखनातही... निबंध... शिक्षणविचार आला असेल तर त्याचा विचार करावयाचा आहे. समग्र केळकर वाङ्मयाचे १२ खंड प्रकाशित करण्यात आले. अकरावा खंड हा ‘संस्कृति खंड’ म्हणून प्रकाशित करण्यात आला. या खंडात केळकरांचे ‘शिक्षण समाज व संस्कृति’ विषयक लेख एकत्रित करण्यात आले आहेत. त्यापैकी सुमारे पंचाहत्तर लेख शिक्षणविषयक आहेत.

त्यापैकी संस्कृत विद्येच्या पुनरुज्जीवनासंबंधी सुमारे ६० पृष्ठांचे (एकूण) बारा लेखांक आहेत.

अन्य लेखांमध्ये खालील लेख शैक्षणिकदृष्ट्या विशेष महत्त्वाचे आहेत.

**विद्यापीठ** – हिंदू विश्वविद्यालय, हिंदू युनिव्हर्सिटी, बनारस कॉलेजातील फूट, काशी येथील नवीन विद्यापीठ, स्त्रियांची युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिट्या व देशी भाषा, महाराष्ट्र विद्यापीठाचे स्वरुप (४ लेख)

**राष्ट्रीय शिक्षण** – समर्थ विद्यालयावर गदा, राष्ट्रीय शिक्षण, शिक्षणाचे पुढे काय ? प्रो. कर्वे व राष्ट्रीय स्त्रीशिक्षण, राष्ट्र व शिक्षण, राष्ट्रीय शिक्षण व केळकर, प्रो. घारपुरे व राष्ट्रीय शिक्षण, राष्ट्रीय शिक्षण, राष्ट्रीय शिक्षणाची योजना, राष्ट्रीय शिक्षण व पालकांचे कर्तव्य.

**स्त्रीशिक्षण** – पुणे फीमेल ट्रेनिंग कॉलेज, नाथीबाई कन्याशाळेचे संमेलन, महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षण, महिला विद्यापीठांवरील संकट.

**विद्यार्थी** – विद्यार्थी व असहकारिता, पुण्यातील विद्यार्थ्यांची सभा, विद्यार्थी व सभा, विद्यार्थ्यांना उपदेश.

**शिक्षक** – गरीब शाळामास्तरांची कैफियत.

**शिक्षणशाखा** – शास्त्रीय शिक्षणाचा उत्कर्ष, शेतकी शिक्षण व सुधारणा, पुण्याचे शेतकी कॉलेज, हातकामाचे शिक्षण.

**ग्रंथालये** – ज्ञानाची सदावर्ते.

याशिवाय देशी भाषांचा विकास, इंग्रजी भाषा, राजकारण व शिक्षण, ग्रामशिक्षण व अस्पृश्यवर्ग, वैश्य विद्याश्रम सासवने, 'मुलांच्या शिक्षणातील षड्रिपु', शील सुधारणारे शिक्षण, सरकार व शिक्षण, हीन जाती व शिक्षण इ. अनेक लेख यात आहेत. या सर्व लेखांचा विश्लेषणात्मक विचार आता करावयाचा आहे.

## राष्ट्रीय शिक्षण

राष्ट्रीय शिक्षणाबाबत केळकरांनी वेळोवेळी व्यक्त केलेले विचार महत्त्वाचे आहेत. राष्ट्रीय शिक्षणाचे एक विद्यालय म्हणजे तळेगावचे समर्थ विद्यालय. हे विद्यालय सरकारने बेकायदा ठरविले, त्याची मान्यता काढून घेतली आणि त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांचे फार नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली. सरकारचा रोष ओढवला नसता तर देणग्यांचा पुरेसा ओघ या शाळेकडे वळला असता. याबाबत 'राष्ट्रीय शिक्षणाचे पुढे काय?' असा एक लेख केळकरांनी लिहिला. त्यातील सारांशरूप विचार असे.

महाराष्ट्रात स्वार्थत्यागाचे बी रुजले आहे, तरीही महाराष्ट्रीयांची स्वाभाविक गरीबी म्हणजे द्रव्याची कमतरता व देण्याची इच्छा असताही सरकारच्या प्रतिकूलतेमुळे दात्यांस वाटणारी भीती यांमुळे राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यास मिळू शकणाऱ्या द्रव्याला संकुचित मर्यादा पडते. सरकार व राष्ट्रीय शिक्षणासंबंधी निघणारी कोणतीही संस्था यांच्या दरम्यानचे संबंध लक्षात घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. बेकायदा ठरण्याच्या गंडांतरातून राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्था वाचविल्या पाहिजेत. राष्ट्रीय शिक्षणात प्रश्न खुद्द राष्ट्राच्या इतिहासाशीच गुंतलेला असल्यामुळे विवक्षित प्रश्नाच्या यशापयशावर राष्ट्रीय शिक्षणाच्या भावी आशा अवलंबून राहणे शक्य नाही. राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न दुसऱ्यांदा हाती घ्यावा लागणार आहे.

राष्ट्रीय शिक्षणाची एक नवी संस्था १९२० च्या सुमारास निघावयाची होती. या काळात म. गांधी यांची असहकाराची चळवळ खूपच आकारास आली होती. या चळवळीने शिक्षणालाही नवी दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला. पूर्वीच्या राष्ट्रीय-शिक्षण संकल्पनेपेक्षा असहकार चळवळीतून निर्माण पावणारीही संकल्पना थोडी वेगळी होती. या संदर्भात **राष्ट्रीय शिक्षणाची योजना** असा एक लेख केळकरांनी लिहिला. त्याचा सारांश असा –

राष्ट्रीय शिक्षणाला शिक्षण सुधारणेचे स्वरूप मुख्यत: होते. आज त्याचे हे

पूर्वीचे स्वरूप कायम असूनही शिवाय असहकारितेच्या चळवळीने त्याला एक नवीन स्वरूप प्राप्त झाले आहे. पूर्वी सुधारलेल्या शिक्षणाची व्यवस्थित रीतीने सर्व तजवीज झाली म्हणजे मग हा प्रश्न कोठे कोणी हाती घेतला तरी चालण्यासारखे होते. असहकारितेच्या चळवळीने ही कल्पना बदलली. सरकारशी संबंध नको अशी मुख्य भूमिका आता आहे.

राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीत पूर्वी बौद्धिक तेज अधिक होते. हल्लीच्या त्याच चळवळीत बौद्धिक तेज असूनही त्यातच प्रबळ भावनेच्या तेजाची भर पडली आहे.

मुलांच्या शिक्षणाची सोय स्वतंत्रपणे झाल्यास शाळा सोडणाऱ्या मुलांची संख्या सहजच वाढेल. असहकारितेमुळे राष्ट्रीय शिक्षणाला व शिक्षणाच्या सोयीमुळे असहकारितेला परस्पर बळ येऊ लागेल. असहकारितेची चळवळ प्रत्येक ठिकाणचे लोक आपापल्या सामर्थ्यावर करतात. त्याप्रमाणे नवीन शिक्षणाचा प्रश्नही ज्या त्या ठिकाणच्या लोकांनी आपल्याच सामर्थ्यावर सोडवला पाहिजे. नवीन शिक्षणाच्या गोष्टी करतांना कित्येक लोकांच्या मनात जगडव्याळ कल्पना येतात. पण मोठ्या गोष्टी बोलण्यापेक्षा हाताने होईल तेवढी लहानशी पण स्वावलंबी कृती प्रत्येकाने केली तर त्यातच अधिक श्रेय आहे.

तरुण पिढीला राष्ट्राची भावी आशा किंवा आधारस्तंभ हे नाव देण्यात येते. ते यथार्थ आहे. तरीपण या नावाने त्यांना भुलवून लोकोत्तर स्वार्थत्यागाच्या भरीस घालणे हे दुसऱ्याने करता कामा नये. (पृ. ३५७ : केळकर खंड ११). असहकारिता कमिटीने राष्ट्रीय शिक्षणाची योजना करताना खालील प्रकारची दृष्टी ठेवली आहे. छोटी शिक्षणसंस्था, कॉलेजच्या दर्जाच्या मुलांची सोय आधी, पुस्तकी ज्ञानाबरोबर व्यावहारिक शिक्षण आवश्यक, शिवाय एखाद्या स्वतंत्र धंद्याचे शिक्षण, पुस्तकी ज्ञानालाही योग्य ते स्थान, पाच विषयांपैकी तीन विषय पुस्तकी ज्ञानाचे व उच्च दर्जाचे. इंग्रजी भाषेचे व्यावहारिक शिक्षण, आर्य संस्कृती या विषयात संस्कृत व मराठी या दोन्ही भाषांतील धार्मिक व विदग्ध वाङ्मयाचे ज्ञान, कायदा, अर्थशास्त्र, राजधर्म यांचे ज्ञान, शिक्षणक्रम दोन वर्षांचा, पाच विषयांचे प्रत्येकी रोज एक तास शिक्षण दिले जाईल. मैदाने, टोलेजंग इमारती, याकडे लक्ष न देता विद्यार्थ्याला शिक्षण मिळेल ते कशा दर्जाचे मिळेल, त्यात खरी राष्ट्रीय दृष्टी कितपत आहे एवढाच विचार करावा.

या लेखामध्ये राष्ट्रीय शिक्षण व असहकारिता चळवळ यावर भाष्य करताना केळकर यांनी दोन महत्त्वाचे मुद्दे सांगितले आहेत. 'तरुणांना अकारण खर्ची टाकू नका' हा एक आणि शिक्षणात शिक्षणालाच महत्त्व हा दुसरा. इमारतीच्या वैभवापेक्षा

शिक्षणाच्या वैभवाला महत्त्व अधिक द्यावे हा मुद्दा केळकरांनी आग्रहाने सांगितला आहे. देशातील अनेक थोर विचारवंतांनी याबाबत आपले विचार मांडले अहेत.

रविंद्रनाथ टागोर यांच्या 'शांतिनिकेतन' कल्पनेत हीच गोष्ट आहे.

साधी राहणी आणि उच्च विचारसरणी या तत्त्वाला धरून शांतिनिकेतनमधील शिक्षण चालू होते. यात देश धर्म आणि संस्कृती यांच्या अभिमानाचे पोषण होत होते.

आचार्य विनोबा भावे यांनीही निसर्गशाळेचा पुरस्कार केला आहे. केळकरांचे हे विचार त्याच्याशी जुळतात.

**राष्ट्रीय शिक्षण आणि पालकांचे कर्तव्य** – याबाबत लेखन करताना पालकांसाठी काही विशेष सूचना केळकरांनी केल्या आहेत. या लेखात केळकरांनी पालकांची कर्तव्ये, अधिकार, जबाबदारी, याबद्दल विवेचन केले आहे. त्याचा सारांश असा –

आपल्या मुलांना शिक्षण कोणते द्यावे हे ठरविण्याची जबाबदारी व त्याबाबतचा अधिकार पालकांचाच आहे. मुलाची बुद्धी, त्याचे गुण, शिक्षणाची उपलब्ध साधने यांचा योग्य मेळ पालकच घालू शकतात. तरुणांनी पालकांच्या सल्ल्याप्रमाणेच वागावे. कुटुंबातील शिस्त हाच राष्ट्रीय शिस्तीचा पाया आहे. तिचा उच्छेद करणे हा राष्ट्रद्रोह होय. पालकांनी मुलांना उपजीविकेचे शिक्षण मिळावे म्हणून जागरूक राहणे आवश्यक आहे. पण त्यांनी खऱ्या कर्तव्याविषयीही जागरूक राहिले पाहिजे. पालकांनी मनावर घेतल्यास राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न हटकून सुटून असहकारितेचा उद्देश सफल होईल. सरकारी ग्रँट घेणे ही गोष्ट ती ग्रँट घेणारालाही मनापासून आवडत असेल असे वाटत नाही. पण ज्यांनी ती घेण्याचा आणि तिजमुळे येणाऱ्या स्वास्थ्याचा प्रघात पाडला त्यांना ती सोडून देण्याचे वैराग्य एकदम स्फुरणार नाही.

**प्रो. घारपुरे व राष्ट्रीय शिक्षण** – हा खरे तर एका भाषणाचा उतारा आहे. प्रा. द. रा. घारपुरे यांनी केळकरांना 'राष्ट्रीय शिक्षणाचे वैरी' म्हटले. केळकरांनी त्यांचा यथास्थित समाचार घेतला. पण याच भाषणात असहकार आणि शिक्षण याबाबत त्यांनी महत्त्वाची मते मांडली. ग्रँटबाबत टिळकांचा हवाला देऊन मते मांडली. ती मते अशी...

"टिळक राष्ट्रीय शिक्षणाचे अभिमानी होते, पण ग्रँट घेण्याच्या विरुद्ध ते नव्हते. कारण शाळा चालविण्यास पैसा पाहिजे. शिवाय ग्रँटचा पैसा हा मुळात लोकांनी दिलेलाच पैसा असतो. ग्रँटबरोबर जो सरकारी नियंत्रणाचा लगाम येतो तो मात्र त्यांना नको होता."

याच भाषणात असहकार, बहिष्कार, विद्यार्थ्यांचा सहभाग याबाबत त्यांनी

एक सूत्रबद्ध विचार सांगितला आहे...

**बहिष्कार हा नैमित्तिक आहे पण शिक्षण हे नित्याचे आहे.** शिक्षणाच्या नित्य स्वरुपाबद्दल, त्याच्या चिरंतन फलाबद्दल, जीवनातील त्याचे स्थान अपरिहार्य असण्याबद्दल केळकरांनी मांडलेला हा विचार तत्कालीन प्रवाहाविरुद्ध वाटला तरी त्याला भक्कम वैचारिक बैठक आहे. नैमित्तिक कार्यापेक्षा नित्य कार्याला महत्त्व अधिक हा एक भाग आणि बहिष्कार हा अकरणात्मक उपाय तर शिक्षण हा करणात्मक उपाय आहे. अकरणात्मक उपायाचे फलित साधण्यासाठी करणात्मक उपायाचे फलित दुर्लक्षू नव्हे, हा दुसरा भाग.

'राष्ट्र व शिक्षण' या आपल्या एका निबंधात केळकरांनी राष्ट्रीय शिक्षणाचे स्वरूप या प्रश्नाची चर्चा केली आहे. ते म्हणतात –

"युरोपात राष्ट्रीय शिक्षण या शब्दाचा अर्थ निरनिराळ्या राष्ट्रात निरनिराळा करतात. याचे कारण प्रत्येक राष्ट्राचे उद्दिष्ट एकच असले तरी त्यांची मनोरचना भिन्न असते. उदा. इंग्लंड व अमेरिका यांची शिक्षण पद्धती फ्रान्स व जर्मनी यांच्या शिक्षणपद्धतीहून भिन्न आहे. पहिल्या जोडीतील राष्ट्रांत व्यक्तिगुणावर फार भिस्त आहे. तेथे व्यक्तिस्वातंत्र्याचा परिपोष होईल असे शिक्षण दिले जाते. उलट फ्रान्स व जर्मनी यांत समष्टिरूप समाजाच्या गुणांवर भिस्त असल्यामुळे समजाहितास व्यक्ती मदत कशी करू शकेल असे शिक्षण दिले जाते. प्रसंगी व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोचही केला जातो."

पाश्चात्य राष्ट्रांत या दोन पद्धती भिन्न असल्या तरी **राजसत्ता व समाज** यांचे पूर्ण तादात्म्य असल्याने सरकारच्या शिक्षणविषयक धोरणाबद्दल व कृत्याबद्दल समाजाला आपलेपणा वाटतो असे केळकर म्हणतात. शास्त्रशोध व अनुभव यांच्या योगाने जे बदल राष्ट्रीय शिक्षणपद्धतीत करणे इष्ट आहे असे वाटते ते सरकारच्या द्वारा समाजाला घडवून आणता येतात. हे सामानाधिकरण्य व तादात्म्यच शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

हिंदुस्थानची स्थिती यापेक्षा वेगळी आहे. हिंदी समाजाची मनोरचना पाश्चात्य समाजाच्या मनोरचनेहून काहीशी भिन्न आहे. याशिवाय समाज व सरकार यांमध्ये वर दर्शविलेले सामानाधिकरण्य व तादात्म्य नाही. त्यामुळे भावी पिढीस कोणत्या प्रकारचे शिक्षण देणे जरूर व इष्ट आहे. याविषयी सरकार व समाज यांची सर्वांशी एकवाक्यता होण्याची फारशी आशा नाही असे केळकर म्हणतात.

राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचा खरा अर्थ हा की 'शिक्षणाच्या प्रश्नाकडे हिंदी समाजाच्या दृष्टीने सरकारास पाहण्यास भाग पाडावे अशा प्रकारची चळवळ.'

सरकारच्या शिक्षणविषयक धोरणावर टीका करताना केळकर म्हणतात की

कालच्यापेक्षा आज शिक्षणावर खर्च जास्त होत आहे ही वस्तुस्थिती असली तरी शिक्षणाच्या कामास सुरुवात होऊन पन्नास वर्षे झाल्याच्या मानाने सरकारकडून व्हावा तितका खर्च शिक्षणावर होत नाही.

या ठिकाणी केळकरांनी आकडेवारीने सिद्ध केले आहे की इंग्लंडमध्ये हिंदुस्थानच्या तुलनेने खर्च जास्त होतो. हिंदुस्थानची लोकसंख्या ३० कोटी आणि दरडोई खर्च अडीच आणे वर्षाला, तर इंग्लंडची लोकसंख्या ३ कोटी आणि दरडोई खर्च सव्वासहा रुपये वर्षाला, असे व्यस्त प्रमाण होते.

सर्व हिंदुस्थानात व्यापारी शिक्षणाची व धंदेशिक्षणाची शाळा सरकारने काढलेली नाही हे केळकरांनी निदर्शनास आणले आहे. जपानच्या शिक्षणविषयक धोरणाचा गौरव करून जपानप्रमाणे हिंदुस्थानात शिक्षण फैलावण्यासंबंधाने व ते राष्ट्रोपयोगी असे करण्यासंबंधाने सरकारची दृष्टी पूर्ण राष्ट्रीय नाही असे केळकर म्हणतात. पुन्हा आपल्या शिक्षणाच्या स्वरुपाच्या प्रश्नाकडे वळून केळकर म्हणतात –

"शिक्षणावर एखाद्या राष्ट्रात किती खर्च होतो हा महत्त्वाचा मुद्दा असला तरी त्याहूनही महत्त्वाचा मुद्दा शिक्षणाच्या स्वरुपाचा आहे.

शिक्षण उत्कृष्ट कोणते? राष्ट्राच्या गरजा भागविण्यास सर्वांत अधिक उपयोगी पडले ते ठरविण्यासाठी शिक्षणावर ज्यांची सत्ता आहे, त्यांच्या मनात राष्ट्रीय गरजा व आकांक्षा काय आहेत यांचे उत्तम प्रतिबिंब पडले पाहिजे. वरिष्ठ शिक्षणाचा भाग विश्वविद्यालयाच्या ताब्यात आहे. पण तेथे लोकमत प्रबळ नाही. शिक्षण खात्याच्या ताब्यात असलेले प्राथमिक व दुय्यम शिक्षण... याठिकाणी लोकमताचा नुसता प्रवेशही नाही. केळकरांनी आपल्या लेखाचा उपसंहार शिक्षणाचा राष्ट्रभर प्रसार व राष्ट्रास अत्यंत उपयुक्त असे शिक्षण हे मुख्य दोन मुद्दे मांडून केला आहे.

राष्ट्रीय शिक्षणाबाबत केळकरांची भूमिका कालसुसंगत आहे. त्यांच्या या लेखनाच्या काळात म. गांधींची असहकाराची चळवळ खूपच मोठ्या प्रमाणावर देशात रुजली होती. या काळातील राष्ट्रीय शाळा... राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या... या केवळ सरकार विरोधी असलेल्या शाळा नव्हत्या तर त्या नवनिर्माण करू इच्छिणाऱ्या शाळा होत्या. 'असहकार युगातील राष्ट्रीय शाळा स्वभाषेचे, स्वसंस्कृतीचे आणि ग्रामोद्योगाचे शिक्षण देत होत्या तरी त्या आपले मुख्य काम स्वराज्याच्या तयारीसाठी करावयाच्या मोठ्या युद्धाची तयारी करणे हेच समजत होत्या.' असहकाराचे प्रवर्तक महात्मा गांधी यांनाही शिक्षणाद्वारा हेच अभिप्रेत होते. 'शिक्षणाने जर स्वावलंबन व स्वयंपूर्णता शिकविली नाही तर ते खऱ्या अर्थाने शिक्षणच नव्हे' असे म. गांधी यांचे मत होते.

स्वावलंबन व स्वयंपूर्णता आली की स्वातंत्र्य दूर नव्हते. राजकीय स्वातंत्र्य

हे त्यापाठोपाठ येतेच. केळकरांनी मांडलेल्या विचारांमध्ये हेच सूत्र दिसते. म्हणून केवळ बहिष्कारावर, शिक्षणप्रक्रिया थांबवण्यावर त्यांचा विश्वास नाही. शिक्षणाची प्रक्रिया सतत सुरूच असली पाहिजे. शिक्षणाच्या स्वरूपात इष्ट तो बदल घडवावा असे केळकर आग्रहाने सांगतात.

## सरकार व शिक्षण

शिक्षणव्यवहार हा बहुश: ज्या त्या ठिकाणच्या शासनयंत्रणेवर अवलंबून असतो. शिक्षण व सरकार (राज्य) यांचे संबंध कशा स्वरुपाचे असले पाहिजेत यावर अनेकांनी आतापर्यंत आपली मते व्यक्त केली आहेत. केळकरांनी एका लेखात आपली मते व्यक्त करतांना शिक्षणाची आवश्यकता, शासनाचे कर्तव्य इ. मुद्यांबाबत चर्चा केली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात नवीन कायदे कौन्सिल अस्तित्वात आल्यानंतर शिक्षणासंबंधाने देशात खूपच वादविवाद झाला. कोणत्याही प्रगमनशील राष्ट्राच्या प्रगतीचा मूळ पाया शिक्षण हाच असतो हे सांगून केळकर शिक्षणाच्या महत्त्वाविषयी चर्चा करतात. त्यांचे मुद्दे खालीलप्रमाणे –

शिक्षण हा चैनीचा पदार्थ नव्हे, विद्यारूप साध्य आणि शिक्षणरूप साधन या दोहोंना व्यक्तीपेक्षाही राष्ट्रे मान देतात. मागासलेल्या राष्ट्रांस शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे तर खरेच. पण भरभराटीस आलेल्या राष्ट्रांसही शिक्षणाची किंमत अत्यंत वाटते हे सत्य आहे. संपन्न राष्ट्रे कालांतराने नामशेष होतात याचे कारण त्यांच्यात शिक्षण थांबते म्हणून नव्हे तर शिक्षणाने अंगी येणाऱ्या गुणांपेक्षा बलवत्तर असे दुर्गुण राष्ट्रांस जडतात. एखाद्या राष्ट्राचा आत्मा परिणत दशेस येत असतो, वृद्ध राष्ट्रास मागे सारून पुढे जाणे हे त्या तरुण राष्ट्राच्या परिणतीस आवश्यक असते.

परक्या इंग्रज सरकारला हिंदुस्थानासंबंधी राष्ट्रीयत्वाची भावना असावी तितकी नाही; हिंदी लोकांच्या हितापेक्षा साम्राज्याच्या हिताकडेच त्यांचे लक्ष. रशियासारख्या देशात शे. सव्वीस लोकांना लिहिता-वाचता येते. हिंदुस्थानात मात्र ही मर्यादा शे. सहाच्या पुढे गेली नाही. (हा लेख १९११ सालचा आहे.) शिक्षणाबाबत सरकारने सक्तीच केली पाहिजे. सक्तीचे परिणाम वाईट होतील असे मानण्याचे मुळीच कारण नाही. सक्तीचे शिक्षण फुकट असावे.

केळकरांचा हा लेख प्रामुख्याने ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी मांडलेल्या प्राथमिक शिक्षणाच्या बिलाला अनुलक्षून आहे. ब्रिटिश सरकार आपले कर्तव्य योग्य तऱ्हेने पार पाडीत नसल्याबद्दल केळकरांनी सप्रमाण मत व्यक्त केले आहे.

याच विचारासारखा विषय हाताळणारा एक लेख म्हणजे **'शिक्षण व राजकारण'** (केसरी, ५ ऑगस्ट १९१३)

कलकत्ता युनिव्हर्सिटीत बिनबोभाटपणे आपले काम करणाऱ्या तीन व्याख्यात्यांना सरकारने राजकारणात भाग घेतल्याच्या आरोपावरून कामावरून दूर करण्याचा आग्रह धरला. या संदर्भात केळकरांची भूमिका अशी –

"विद्यार्थ्यांनी राजकीय कामकाजात पडू नये हे तत्त्व व शिक्षकांनी राजकीय कामकाजात पडू नये हे तत्त्व या दोहोत जमीन अस्मानाची तफावत आहे."

विद्याभ्यास करणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य असले तरी ते समाजाचे घटक आहेत. कर्तव्य नीट केल्यावर त्या कर्तव्यास बाधा न येईल अशा तऱ्हेने त्यांनी सार्वजनिक कामात लक्ष घातल्यास वावगे नाही असे मत केळकरांनी व्यक्त केले आहे. आचार्य विनोबा भावे एके ठिकाणी म्हणतात –

"विद्यार्थ्यांनी नेहमी सावधान असले पाहिजे. दुनियेत ज्या काही हालचाली होतात त्यांचे त्यांनी अध्ययन केले पाहिजे. जे निरनिराळे वाद निर्माण होतात त्यांचा तटस्थ बुद्धीने अभ्यास केला पाहिजे."

यावरून विद्यार्थ्यांनी सामाजिक जीवनाचा चौकसपणे अभ्यास केला पाहिजे, जागरूक राहिले पाहिजे आणि विद्याभ्यासही डोळसपणे केला पाहिजे, हे स्पष्ट होते. प्रत्यक्ष राजकारणात भाग घेणे, विद्याभ्यास सोडून राजकारण करणे हेही केळकरांना अभिप्रेत नाही. विद्यार्थी म्हणून डोळे उघडून जगाकडे बघण्याचा त्यांचा हक्क नष्ट होत नाही असे केळकरांचे प्रतिपादन आहे. पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या डोळ्यांना झापडे लावलेली असणे योग्य नाही असे त्यांचे प्रतिपादन आहे.

शाळेतील शिक्षणाचे प्रत्यक्ष काम सरकारकडे असले किंवा त्यांची त्यावर देखरेख असली म्हणून विद्यार्थी हे कैदी या नात्याने सरकारच्या स्वाधीन करण्याचा आईबापांचा केव्हाही इरादा नसतो. शाळेपुरती सर्वस्वी व शाळेबाहेर थोडीशी विद्यार्थ्यांना शिस्त म्हणून राहिली पाहिजे ही सामान्य गोष्ट आहे. पण शाळेत केवळ पुस्तकी ज्ञानाखेरीज विशेष काही देता येत नाही. धार्मिक, नैतिक, सामाजिक वगैरे विषयांचे ज्ञान देण्याचे काम सरकारास विद्यार्थ्यांचे आई-बाप व त्यांचा समाज यांवरच सोपविले पाहिजे.

सरकारचे राजकारणविषयक धोरण हे जाहीर झाले, त्यावर टीका करून केळकर म्हणतात – "इंग्लंडात राजकारणाच्या स्पर्शामुळे शिक्षणाला जी अपवित्रता येत नाही ती हिंदुस्थानातच का यावी ?"

इंग्लंडमध्ये विद्येच्या क्षेत्रात राजकारणाला इतका मज्जाव नाही. तेथील युनिव्हर्सिट्यांच्या रेक्टरांच्या जागा प्राय: विद्यमान किंवा पूर्वकालीन प्रधान मंडळातील लोकांकरिताच राखून ठेवलेल्या असतात. अशी अनेक उदाहरणे आहेत. मग हिंदुस्थानातील विद्वानांनाच एवढा जाच का ? शिवाय, हिंदी व इंग्रजी, राजकारणात

कसाही फरक असो, विद्यार्थ्यांचे मन कोठेही झाले तरी तेच, असे सांगून केळकरांनी आपल्या या निबंधाचा शेवट केला आहे.

आधुनिक परिस्थितीत शैक्षणिक दृष्ट्या विचार केला तर विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घ्यावा काय हा चर्चेचा विषय होऊ शकेल. पण विद्यार्थ्यांमध्ये राजकारण शिरू लागले तर मात्र परिणाम चांगले होत नाहीत. केळकरांनी ज्या कालखंडात हा निबंध लिहिला त्या कालखंडात राजकारणाचे प्रयोजन, राजकारणाचे स्वरूप, विद्यार्थी आणि एकंदरच समाजजीवन वेगळे होते. आजच्या परिस्थितीत असे म्हणावे लागेल की विद्यार्थ्यांचा संबंध राजकारणाशी न येईल तितका चांगला. विद्यार्थी राजकारणाचे व त्यातील घटकांचे ताटस्थ्याने अवलोकन करतील इतपत विद्यार्थ्यांचा व राजकारणाचा संबंध असावयास हरकत नाही.

## शिक्षणासाठी परदेशी जाणारे विद्यार्थी

उच्च शिक्षणासाठी परदेशगमन ही बाब आता नवीन राहिलेली नसली तरी केळकरांच्या काळात ही बाब विशेष होती. आंग्लविद्याविभूषित अशा उच्चभ्रू समाजात तर परदेशी जाऊन येणे महत्त्वाचे समजले जायचे. परदेशात गेलेले विद्यार्थी एकत्र येऊन ते आपापले संघ, मंडळे स्थापन करीत. अशाच एका संघाच्या निमित्ताने – अमेरिकेतील हिंदी विद्यार्थी संघ – केळकरांनी परदेशी शिक्षण घेणारे विद्यार्थी, त्यांचा देश, शिक्षणपद्धती, यांविषयी चर्चा केली आहे. त्यातील सारांशरूप मुद्दे असे.

परदेशी विद्या संपादन करणारा माणूस स्वदेशात न मिळणारी विद्या स्वत:पुरती तर मिळवतोच पण दुसऱ्यांनाही तो मार्गदर्शक ठरतो. प्रत्येक देशाच्या शिक्षण पद्धतीचे काही वैशिष्ट्य आहे. हिंदुस्थानात उत्तम सरकारी नोकर निपजतो. इंग्लंडात शास्त्रीय शिक्षणापेक्षा भाषा-विषय अधिक चांगले शिकविले जातात. उत्तम शास्त्रीय शिक्षण देणे हा जर्मनीचा हातखंडा, व्यावहारिक धंदे शिक्षण अमेरिकेतच चांगले मिळते. हिंदुस्थानातील विद्यार्थ्यांना परदेशी जाऊन शिक्षणाबरोबरच स्वावलंबन, व्यावहारिक चातुर्य, राष्ट्रीयत्व या गोष्टी अवश्य शिकावयाच्या आहेत.

हिंदुस्थान असोसिएशनचे सेक्रेटरी सुरेंद्र मोहन बोस माहितीपत्रकात लिहितात...

“आम्ही अमेरिकेत आहोत तोपर्यंत आमचा उद्योग, आमची विद्यार्जन पात्रता, आमचे आचरण व आमची नियत या सर्व बाजूंनी आमच्या मातृभूमीस शोभेल असेच आम्हाला वागले पाहिजे व पुढे आम्ही हिंदुस्थानास परत जाऊ तेव्हा अमेरिकेसारख्या नामांकित देशात मिळविलेल्या शिक्षणाचे आम्हीही चीज करून दाखविले पाहिजे. अमेरिकेसारख्या देशात येऊन स्वावलंबनाचे शिक्षण मिळविणे ही फार अवघड गोष्ट आहे. पण ती आम्ही करीत आहोत. इकडे येणारे सर्वच विद्यार्थी चांगले असतील असे नाही. काहींच्या अपयशामुळे कित्येक वेळा मान

खाली घालावी लागली आहे. त्याचप्रमाणे हीनवृत्तीच्या गोष्टी करणारेही काही विद्यार्थी आहेत. त्यांच्या या वृत्तीला आळा घालण्याचा आमच्या असोसिएशनचा हेतू आहे.''

अमेरिकेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची स्वावलंबनाची व कष्टाच्या कामाची अनेक उदाहरणे केळकरांनी दिली आहेत. हिंदी विद्यार्थी तेथे ज्या स्वरूपाची कामे करून पैसे मिळवितात व शिकतात त्या कामांचे स्वरूप असे –

— खानावळीत तीन तास काम करून तीन वेळचे जेवण फुकट मिळवणे, एखाद्या घरी शेकशेगडीची व्यवस्था पाहून तेथे फुकट राहावयाचे.

— एका विद्यार्थ्याने धर्मोपदेशक, लायब्ररियन, कारकून, स्टेज मास्तर, कोचमन, खिडक्या रंगविणे अशी निरनिराळी कामे केली, एकाने तर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी एका प्रेताची सोबत करून आपला प्रवास फुकट पाडला.

अमेरिकेतील हिंदी असोसिएशनला राजमान्यतेचे अधिष्ठान आहे. ते विद्यार्थी मातृभूमीला स्मरतात. पण हिंदुस्थानातील लोक या मुलांना किती स्मरतात? हिंदुस्थानातील लोकांनी या असोसिएशनला मदत केली पाहिजे.

या निबंधातील सुरेंद्र मोहन बोस यांच्या पत्रातील विचार आधुनिक काळाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. सध्याच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीनुसार बुद्धिमंतांना या देशात वाव नाही असा काहीसा सूर असतो. अनेक बुद्धिमंत परदेशी जातात ते तेथेच राहतात. तेथील वातावरणात त्यांना स्वास्थ्य, संशोधनानुकूल परिस्थिती, वेतन, या सर्व गोष्टी अधिक मिळतात. त्याचा योग्य परिणाम होतो आणि म्हणून भारतात सध्या 'ब्रेन-ड्रेन' फार आहे असे म्हटले जाते. यातील सत्याच्या तपास केला तर या लेखाच्या आधारे दोन मुद्दे महत्त्वाचे मांडता येतील.

परदेशी जाणाऱ्यांनी मातृभूमीचे प्रेम कायम ठेवावे, हा पहिला मुद्दा. पण असे प्रेम हे कधीच एकांगी असत नाही. मुलाचे आईवर प्रेम असावे तसे आईचेही मुलावर असले पाहिजे अशी टीप लेखाच्या शेवटी केळकरांनी मारली आहे. ते म्हणतात –

''आईवरील मुलांच्या प्रेमापेक्षा, मुलांवरील, विशेषत: परदेशी गेलेल्या मुलांवरील आईचे प्रेम अधिक असावे.''

आणि म्हणून केळकर सुचवितात की हिंदुस्थानातल्या लोकांनी परदेशी गेलेल्या विद्यार्थ्यांना मदत करावी. याठिकाणी परस्परसामंजस्य आणि ममत्व वाढविण्याची प्रक्रिया सुरू होणे महत्त्वाचे आहे. भारत हा विकसनशील देश आहे. या देशात बुद्धिमंतांवर अन्याय होत असेल तर तो न होऊ देण्याची जबाबदारी शासन व समाजातील विचारवंत यांची आहे आणि उलटपक्षी परदेशात पगार अधिक मिळतो म्हणून कोणी स्वदेशाला कमी किंमत देत असेल तर त्याने सुरेंद्र मोहन बोस यांचे

हे पत्र वाचावे. शैक्षणिक दृष्ट्या, राष्ट्रीय दृष्ट्या या पत्रातील आशयाला महत्त्व आहे. (सुरेंद्र मोहन बोस यांचे पत्र : परिशिष्ट : केळकर समग्र वाङ्मय खंड ११ पृ. २१८)

## देशी भाषेतून शिक्षण

शिक्षणप्रक्रियेत ज्ञानाचे माध्यम म्हणून मातभाषेला फार महत्त्वाचे स्थान आहे. व्यक्तिविकासाच्या ज्या ज्या माध्यमातून होत असतो त्यापैकी त्या सर्व माध्यमांच्या केंद्रस्थानी असलेले असे हे देशी भाषेचे माध्यम आहे. या संदर्भात केळकरांनी काही लेख लिहून आपले विचार व्यक्त केले आहेत.

तत्कालीन वरिष्ठ कायदे कौन्सिलात देशी भाषेतून शिक्षण देण्याबद्दलचा ठराव आला होता. त्याला अनुलक्षून केळकरांनी लेख लिहिला. (केसरी, १३ एप्रिल १९१५) देशी भाषेतून शिक्षण देण्याच्या विरुद्ध थोडे तरी लोक निघाले याबद्दल केळकरांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. या लेखातील शैक्षणिक स्वरूपाचे मुद्दे असे –

देशी भाषेत शिक्षण देणे याचा अर्थ शिक्षणाचा विषय बदलणे असा होत नाही. देशी भाषेत शिक्षण म्हणजे इंग्रजीची हकालपट्टी नाही. दळणवळणाचे वा कारभाराचे माध्यम म्हणून इंग्रजीचा वापर करावा लागत असला तरी देशातील सर्वसामान्य जनता सुशिक्षित व्हावयाची असेल तर देशी भाषांचा वापर व प्रसार आवश्यक ठरतो. हिंदुस्थानात देशी भाषांची संख्या तीनशेहून अधिक आहे. यादृष्टीने देशी भाषांचा विचार करताना एकाच वेळी एका भाषेच्या पोटभेदांचाही विचार करावयाचा आहे. उदा. मराठीचा विचार करते वेळी कोकणी, वऱ्हाडी, मोगलाई या मराठीच्या भेदांचा विचार करण्याचे कारण नाही. भाषाभेदाची दृष्टी व्यापक करून हिंदुस्थानचे विभाग पाडले तर आठ-दहापेक्षा ते जास्त होणार नाहीत. देशातील कोट्यवधी लोकांस इंग्रजी भाषा अंगवळणी पडेल ही गोष्ट सर्वथा असंभवनीय आहे.

प्राथमिक शाळांतून तर आवश्यकच, पण माध्यमिक शाळांतूनही देशी भाषांचे माध्यम वापरणे हिताचे होईल. साधारण इंग्रजी लिहिण्याबोलण्यासाठी विद्यार्थ्यांच्या आयुष्याची महत्त्वाची पाच-सात वर्षे खर्ची पडावीत ही व्यक्तीच्या दृष्टीने व राष्ट्रीय दृष्टीनेही मोठी हानीच आहे.

देशी भाषेत शिक्षण दिल्याने होणारे फायदे – विषय सुगम होतील, थोड्या परिश्रमाने जास्त शिकविता येईल. ज्ञानाचा प्रसार अधिक होईल. ज्ञान या देशात स्थिरावेल, देशी भाषांचाही उत्कर्ष होईल.

पाश्चिमात्य विद्यांचे शिक्षणही देशी भाषांतून द्यावे, असे केळकर सुचवितात.

**मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया**

मातृभाषा (देशी भाषा) हाच ज्ञानसाधनेचा, व्यक्तिविकासाचा आणि अंतिमत: स्वराज्याचा पाया आहे हे अनेक विचारवंतांनी मान्य केलेले तत्त्व आहे.

१९१७ मध्ये जुलै महिन्यात मुंबईला सर नारायण चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रांतिक शिक्षण परिषद झाली. त्या परिषिदेत अनेक महत्त्वाची कामे झाली. त्यांपैकी देशी भाषांसंबंधीचे ठराव हे त्या परिषदेचे महत्त्वाचे फलित. या संदर्भात केळकरांनी एक लेख लिहिला. लेखाच्या आरंभीच त्यांनी म. गांधी यांचे मातृभाषेविषयी एक वचन उद्धृत केले आहे.

"कोणी कितीही परोपकार बुद्धीने किंवा औदार्यबुद्धीने कशाही उत्तम घटनेचे स्वराज्य आम्हास दिले तरी आमच्या माता जी भाषा बोलतात तिजविषयी आमच्या मनात आदरबुद्धी नसल्यास आम्ही खरे स्वराज्यभोगी होणार नाही." यानंतर केळकरांनी केलेल्या विवेचनातील महत्त्वाचे मुद्दे असे –

- शिक्षण परिषदेने महत्त्वाचे दोन ठराव मंजूर केले. पैकी पहिला ठराव असा की मॅट्रिक्युलेशन परीक्षेत प्रश्नांची उत्तरे आपल्या देशी भाषेत देण्यास विद्यार्थ्यांना मुभा असावी. दुसरा ठराव असा की भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापाव्यात.
- इंग्रजी ही राज्यकर्त्यांची भाषा असली तरी शिक्षणात तिला किती महत्त्व द्यावयाचे याचा विचार करणे आवश्यक आहे. अत्युच्च शिक्षणही देशी भाषेतून दिले जावे असा आग्रह असला पाहिजे. आज देशी भाषांतील ग्रंथाभावामुळे ते शक्य होत नाही. पण अत्युच्च शिक्षणास उपयुक्त असे ग्रंथ देशी भाषांतच निर्माण झाले पाहिजेत असे प्रयत्न हवेत.
- रंगून येथील बॅ. पी. जे. मेहता यांनी 'व्हर्नॅक्युलर्स अॅज मिडिया ऑफ इन्स्ट्रक्शन्स इन इंडियन स्कूल्स अँड कॉलेजेस' या नावाने लिहिलेल्या पुस्तकाला म. गांधी यांनी प्रस्तावना लिहिली. तीत त्यांनी दोन चांगली उदाहरणे दिली. ज्यू लोकांना स्वत:चा देश नाही. जगाच्या सर्व भागात ते पसरले आहेत. तरीही आपली वेगळी मातृभाषा ते मानतात व तिच्यातूनच ते मुलांना शिक्षण देतात. ज्या देशात ते राहतात, त्या देशाची भाषा त्यांना येत नाही असे नाही. जगभर विखुरलेले ज्यू आपल्या मातृभाषेविषयी हा दृष्टिकोन ठेवू शकतात तर हजारो वर्षे एकत्र राहिलेले बंगाली, मराठी, गुजराथी यांनी हे स्वीकारावयास काय हरकत आहे? दक्षिण आफ्रिकेत डच लोकांची 'टाल' नामक भाषा व इंग्रजांची इंग्रजी यांचे द्वंद्व आज कित्येक वर्षे सुरू आहे. तेथे इंग्रजीला माघार घ्यावी लागली. ही उदाहरणे देऊन गांधीजी म्हणतात –

  "देशी भाषांवरून ज्यांचा विश्वास उडाला, त्यांचा स्वत: आपल्यावरून

विश्वास उडाला असे म्हटले पाहिजे. देशी भाषेवरील अप्रीती हे अधोगतीचेच लक्षण."

देशी भाषेत युनिव्हर्सिट्यांची स्थापना हा ठराव पास झाल्यावर टाइम्स पत्राने त्यावर टीका करताना हा ठराव बहुमताने व मराठ्यांच्या हुल्लडबाजीने पास झाला आहे अशी टीका केली. मराठी भाषिक लोक अन्य भाषांवर आक्रमण करतील असे त्यांना सूचित करावयाचे होते. ही शंका केळकरांनी खोडून काढली आहे.

एका देशी भाषेने दुसरीवर स्वारी करण्याचा हा प्रश्न नसून सर्व देशी भाषांनी मिळून एका परकीय भाषेविरूद्ध संघ करून आपापले अंत:स्वातंत्र्य मिळविण्याचा हा प्रयत्न आहे.

ज्यांना मराठी भाषिक लोक आपल्यावर आक्रमण करतील अशी शंका येते त्यांच्यासाठी केळकर आश्वासन देतात की ज्यांची मातृभाषा मराठी नाही अशा एकाही माणसावर मराठी शिकण्याची अप्रत्यक्ष का होईना, सक्ती केली जाणार नाही. मुंबई इलाख्यात मराठी भाषा हीच मुख्य भाषा असल्याने भाषाविषयक चळवळीचे नेतृत्व स्वाभाविकपणेच तिच्याकडे आहे. पण मराठी भाषिकांकडे या चळवळीचे धुरिणत्व येणे म्हणजे इतर सर्व देशी भाषांचा आपल्याबरोबरीने हक्क सांगणे असेच आहे. ही चळवळ यशस्वी झाली तर इतर भाषांनाही त्या चळवळीचा फायदा मिळेल.

"मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया आहे." असे केळकर आग्रहाने सांगतात. पण देशी भाषांच्या वादात एक दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की सरकार दरबारी किंवा युनिव्हर्सिटीत, ज्यांना कोणत्याही देशी भाषेचा अभिमान नाही अशाच लोकांचे वर्चस्व आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे.

**मुंबई शहराचा भाषाविषयक प्रश्न** – मुंबई हे आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे शहर आहे. आजही मुंबईचा प्रश्न महत्त्वाचा मानला जातो. मुंबईत सत्ता कोणत्या भाषिकांची? केळकरांच्या या लेखनकाली (१७ जुलै १९१७) मुंबईतील शेकडा सत्तर लोकवस्ती मराठी भाषिकांची होती. त्या खालोखाल हिंदुस्थानी व गुजराथी भाषिक लोक मुंबईत होते. ज्यांची मातृभाषा इंग्रजी आहे अशांचा क्रमांक अगदी शेवटचा. पण असे असूनही मुंबई शहरात सर्व अभिमान इंग्रजी भाषेविषयीचा. केळकर असे म्हणतात – "दु:खाची गोष्ट ही की आपल्या धंद्याच्या निमित्ताने मुंबई शहरी वास्तव्य घडलेल्या मराठी, गुजराथी, कानडी वगैरे लोकांनाही इंग्रजी भाषेचा अंमल कोणत्या बाबतीत किती चालावा याचा विवेक राहिलेला नाही."

मुंबई शहरी मातृभाषांच्या स्वराज्याचे निशाण रोवण्याचे काम अत्यंत अवघड असले तरी त्या कामास खरा प्रारंभ तेथेच झाला पाहिजे व तसा प्रारंभ शिक्षण

परिषदेत झाला याबद्दल समाधान वाटते असे केळकर या शिक्षण परिषदेच्या निमित्ताने लिहितात. सर्व इलाखा म्हणजे मुंबई शहर नव्हे, विद्येचे आदिपीठ संस्थान युनिव्हर्सिटी ही मुंबईत असली तरी तिचा कारभार मुंबई शहराच्या तंत्राने न चालता सर्व इलाख्याच्या तंत्राने चालला पाहिजे असा केळकरांचा आग्रह आहे.

त्याचप्रमाणे सर्व देशात एकच भाषा चालावी असा ज्यांचा आग्रह त्यांच्याविषयी केळकर नापसंती व्यक्त करतात. हिंदुस्थानातील एकेक पोटप्रांत एवढा मोठा आहे की तो युरोपातील दोन दोन तीन तीन स्वतंत्र देशांहूनही मोठा असू शकेल ही वस्तुस्थिती केळाकर निदर्शनास आणतात. मुंबई शहरातल्या बकाली वस्तीच्या आग्रहामुळे मातृभाषा दडपून टाकून परकी भाषेतून शिक्षण व्यवहार करावयास लावणेही राष्ट्रीय दृष्ट्या जुलुमाची परमावधी आहे असे केळकर लिहितात.

देशी भाषांच्या प्रश्नावरील केळकरांचे हे विवेचन नुसते साधक-बाधक स्वरूपाचे नाही तर त्यात सप्रमाण विधाने आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात भाषावार प्रांतरचना झाल्या. त्यातून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उदयाला आली. महाराष्ट्रात मराठी भाषिकांच्या अस्मितेचा व तदनुषंगाने विकासाचा प्रश्न उभा राहिला. भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाचे विविध पैलू असू शकतात. पण भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व भारतीय संविधानाने स्वीकारले होते आणि अन्य भाषांवर आक्रमण न करता आपापल्या भाषांचा विकास करण्याची संधी भाषा व भाषिक यांना देण्यात आली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही 'मुंबई कुणाची' हाच प्रश्न महत्त्वाचा मानून प्रथम द्विभाषिकाची निर्मिती केल्यामुळे असंतोष निर्माण झाला होता. याचा अर्थ हाच की मुंबईच्या बहुभाषी रूपाबद्दलचा वाद जुना आहे. केळकरांच्या काळीही तो होताच. पण आज ज्याप्रमाणे मुंबई ही राजकीय दृष्ट्या महाराष्ट्राचीच मानण्यात येते... म्हणजे मराठी भाषिकांची मानण्यात येते त्याप्रमाणे केळकरांच्या काळी तसे मानण्यास विरोध झाला. केळकरांनी 'मुंबई ही मराठी भाषिकांची' असे ठामपणे सांगितले.

## देशी भाषांतून परीक्षा : घोकंपट्टी

मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान प्रसंगी तेव्हाचे व्हाइस-चॅन्सेलर डॉ. मॅकिनन यांनी घोकंपट्टीचा महत्त्वाचा मुद्दा मांडला होता. शाळातून होणारी घोकंपट्टी टाळण्याला उपाय काय असा प्रश्न पुढे आला.

"घोकंपट्टी टाळावयाची असेल तर विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावयाचे ते मातृभाषेतून दिले पाहिजे." असे त्यांनी सांगितले.

कोणत्याही विषयातील मूळ कल्पना व सिद्धांत नीट समजण्यास मातृभाषेइतके उत्तम साधन दुसरे कोणतेही नाही असेही डॉ. मॅकिनन यांनी सांगितले. शिक्षणाच्या व परीक्षा घेण्याच्या कामी मातृभाषांचा उपयोग करण्याला सरकारने उत्तेजन दिले

आहे असे मॅकिनन साहेबांनी सांगितले तरी युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षांचे माध्यम देशी भाषा मराठी असावे, याला मात्र मॅकिनन साहेबांचा विरोध होता. या त्याच्या दुहेरी भूमिकेची चर्चा करण्यासाठी केळकरांनी लेख लिहिला. त्याचा सारांश असा –

युनिव्हर्सिटीत व खाली हायस्कूलात निरनिराळ्या प्रकाराने मातृभाषेची चळवळ यशस्वी होऊन लोकमताचा आदर झाला. युनिव्हर्सिटीत देशी भाषा एम. ए. परीक्षेस ऐच्छिक म्हणून तरी येऊ लागली. परंतु मॅट्रिकची परीक्षा जोपर्यंत इंग्रजी भाषेतून द्यावी लागते तोपर्यंत खाली मराठीचा कितीही वापर केला किंवा वर तिला कितीही वाव दिला तरी त्याचा काहीही उपयोग नाही. काही संस्थांनी पूर्णपणे मातृभाषेच्या वापराची परवानगी काढली व सर्रास उपयोग सुरू केला. विद्यार्थ्यांना विषय चांगले समजू लागले. पण अनुभव असा की लोकांचा ओढा इंग्रजी माध्यमाकडेच अधिक होता. त्याचे एक कारण म्हणजे त्यांची सारी भिस्त मॅट्रिक्युलेशन परीक्षेवर होती. तेथे इंग्रजी माध्यमच होते. मॅट्रिक्युलेशन परीक्षा देशी भाषेतून घेतली तर गोंधळ व घोटाळा होईल असे मॅकिनन साहेब म्हणतात. पण तसे केळकरांना वाटत नाही. महाराष्ट्रात देशी भाषा म्हणजे मराठी, गुजराथी व कानडी. या भाषांचे परीक्षक त्यांना मिळणार नाहीत असे होणार नाही.

या संदर्भात, मॅकिनन साहेबांच्या भाषणावर टीका टिप्पणी करण्यासाठी केळकरांनी 'युनिव्हर्सिट्या व देशी भाषा' या नावाचा लेख लिहिला. या लेखात वरीलप्रमाणेच मुद्दे आहेत. पण जे नवीन मुद्दे आहेत त्यांचा सारांश असा –

देशी भाषांतून शिक्षण देण्याबाबत एक आक्षेप असा घेण्यात येतो की देशी भाषांतून शिक्षण देणे आज सोयीचे नाही. कारण त्या भाषा जितक्या ग्रंथसमृद्ध असाव्या तितक्या अद्याप झाल्या नाहीत. दुसरा आक्षेप असा की शिक्षणाच्या कामी देशी भाषांचा विशेष उपयोग होऊ लागल्यावर विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषेशी परिचय त्याप्रमाणाने कमी होत जाऊन त्यांचे इंग्रजी भाषेचे ज्ञान जे आधीच कमकुवत असते ते आणखी कमकुवत होईल. कलकत्ता युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सेलर डॉ. सर्वाधिकारी यांनी या आक्षेपांना उत्तरे दिली. बंगाली भाषा कोणत्याही प्रकारच्या संशोधनास युक्त भाषा आहे. बंगाली ही समृद्ध भाषा आहे. इंग्रजीचा आधार घ्यावा लागत नाही असे सर्वाधिकारी यांनी सांगितले. मुंबई विद्याखात्याचे मि. शार्प यांनीही सांगितले की जपानमध्ये देशी भाषेतून शिक्षण दिल्यामुळे शिक्षणाचा प्रसार खालच्या थरापर्यंत झिरपत गेला. जपानमध्ये परदेशी मिशनऱ्यांनाही स्वभाषा वर्ज करून जपानीतूनच शिक्षण द्यावे लागले. भाषा हा केवळ विचारांचा पोशाख आहे. पोषाख किती प्रमाणात परकी स्वीकारावा याचा ज्या त्या देशाने विचार

करावा. स्वभाषा टाकून परभाषेचा सर्वस्वी अंगीकार केला तर राष्ट्राच्या सर्व संस्कृतीच्या परंपरेचा समूळ उच्छेद होतो ही गोष्ट इंग्रजी भाषेच्या फाजील पक्षपात करणाऱ्या लोकांनी विसरू नये. प्राथमिक शिक्षण देशी भाषेत दिले जाते, माध्यमिकही दिले जावे, युनिव्हर्सिटीत देशी भाषा यावी मग सबंध युनिव्हर्सिटीच देशी भाषामय झाली तरी चालण्यासारखे आहे. हे केव्हा ना केव्हा होणार आहे अशी भविष्यवाणी केळकर करतात. हिंदुस्थानात भाषावार युनिव्हर्सिट्या स्थापल्या जातील या भावी गोष्टीचा उजेड लोकांच्या डोक्यात अद्याप पडत नाही.

या लेखाद्वारे केळकरांनी केलेली भविष्यवाणी आज विसाव्या शतकाच्या शेवटापर्यंत खरी झालेली आहे. पुणे, शिवाजी, नागपूर इ. विद्यापीठांत मराठी भाषेत परीक्षा देण्यास सवलत आहे. अशा तऱ्हेने महाराष्ट्रातली सर्व विद्यापीठे मराठीचा पुरस्कार करीत आहेत, मराठीला उत्तेजन देत आहेत.

अन्य प्रांतांत तीच स्थिती आहे. अन्यान्य भाषांची विद्यापीठे आपापल्या प्रांतीय भाषेला उत्तेजन देत आहेत. हळूहळू त्या त्या देशी भाषा विद्यापीठाच्या सर्व पातळीवरील शिक्षणापर्यंत नेण्याची विद्यापीठांची इच्छा आहे. देशी भाषांना प्राधान्य देणे, मातृभाषेचा वापर करणे म्हणज स्वराज्याचा पाया घालणे हे केळकरांनी पारतंत्र्याच्या काळात सांगितले.

### स्त्रीशिक्षण

अनेक अन्य विचारवंतांप्रमाणेच केळकरांनीही स्त्री शिक्षणाची चर्चा आपल्या निबंधांतून केली आहे. म. फुले यांच्या काळापासूनच स्त्री शिक्षण विषयक चर्चा महाराष्ट्रात होत आली होती. महिलांची विद्यापीठे, धोंडो केशव कर्वे यांचे कार्य, हुजूरपागा हायस्कूलच्या सुवर्ण महात्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील स्त्री शिक्षण इ. महत्त्वाचे लेख केळकरांनी लिहिले. या सर्व लेखांचे वाचन केल्यानंतर केळकरांचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टिकोण कोणत्या स्वरूपाचा होता याची कल्पना येते. एकेका लेखातील विचारांचा आता परामर्श घ्यावयाचा आहे.

"हा सुवर्ण महोत्सव केवळ या शाळेचाच सुवर्ण महोत्सव नसून महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचा सुवर्णमहोत्सव आहे." असे केळकर लेखात लिहितात.

पुण्यात ज्या वर्षी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली त्याच वर्षी महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. ३० नोव्हेंबर १९३४ रोजी शाळेच्या (हुगुरपागा) सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने केळकरांनी महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाच्या इतिहासाचा आढावा घेतला आहे. विशेष मुद्दे असे –

स्त्री शिक्षणाकडे पाहण्याची दृष्टी महाराष्ट्रात तरी कृपण किंवा स्तिमित होती. सरकारने काही अंशी अधिकार-विभागणीच्या तत्त्वावर, काही अंशी दिवाळखोरीमुळे

व काही अंशी कृपण बुद्धीमुळे स्त्री शिक्षणाकडील खर्चाचा हात आखडता घेतला तरी पुण्यातच नव्हे तर महाराष्ट्रात बऱ्याच अंशी स्त्री शिक्षणासाठी शाळा निघतील यात शंका नाही. स्त्रियांचे समाजातील स्थान व त्याला आनुषंगिक म्हणून स्त्रियांना शिक्षण देण्याची आवश्यकता या गोष्टी लोकसमाजाला पूर्णपणे पटल्या आहेत. नवीन राजकीय सुधारणांमध्ये स्त्रियांना संघटित स्वराज्य संस्थांतून स्वत: सभासद होण्याचा व इतरांना सभासद निवडून देण्याचा मतदारीचा हक्क दिला आहे. पुरुष मतदारांच्या संख्येशी स्त्री मतदारांच्या संख्येचे प्रमाण निदान एक पंचमांश पडावे अशी व्यवस्था सुचविली आहे. ही सुधारणा घडून येण्यास इंग्रजांचे उदारमतवादित्व हे एकपट कारणीभूत,असेल तर खुद्द स्त्री समाजाची आग्रहाची मागणी व तिला पुरुष वर्गाची मन:पूर्वक संमतीही दसपटीने कारणीभूत आहे असे म्हणतात येईल. पुढील वर्षी (१९३५ साली) साठ लक्ष स्त्रिया मतदार होतील आणि स्वराज्यसंस्थांच्या घटनांवर त्याचा परिणाम होईल. ही क्रांतीच आहे. अशी परिवर्तने जगाच्या इतिहासात प्रत्येक युगात झालेली दिसतात. ऐहिक संसार व अभ्युदय यांच्या कल्पना दिवसेंदिवस बदलत जात असल्यामुळे नव्या युगातील स्त्रियांचे समाधान केवळ विद्वत्तेबरोबर प्रस्थापित करण्याने न होऊन कर्तृत्त्वातही ती बरोबरी करावी असे त्यांना वाटण्याचा संभव आहे. स्त्रियांना अशिक्षित किंवा अर्धशिक्षित ठेवल्या तर वाढत्या सार्वजनिक संसारातील हिताहित पाहण्याची जबाबदारी सर्वांशी पुरुषवर्गाच्या माथी पडणार, पण ते न्यायाचे नाही. स्त्रियांचे शिक्षण थेट पुरुषांच्या शिक्षणासारखेच असावे की नाही हा वादग्रस्त प्रश्न सुशिक्षित स्त्रियांनीच पुढाकार घेऊन आपल्यातील लोकमताने सोडविला पाहिजे. स्त्रियांना शिक्षण हवे पण ते केवळ पुरुषी शिक्षणाच्या नमुन्याचे नको, तर त्याचा खास नमुना वेगळा हवा यात तत्त्वत: वावगे काही नाही.

या लेखात केळकरांनी महाराष्ट्रातील व भारतातील स्त्रियांच्या स्थितिसंबंधाने शिक्षणाच्या संदर्भात विवेचन केले आहे. प्राचीन इतिहासाचे अवलोकन करता वेदकालीन ग्रंथांवरून असे ध्यानात येते की तत्कालीन स्त्रियांस समाजात व गृहात विशेष मान होता. ज्ञानाच्या क्षेत्रातही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान होते. उपनिषदांमध्ये गार्गी, मैत्रेयी, सुलभा, अरुंधती, वगैरे विद्वान स्त्रियांची नावे आढळतात. सामवेद गाण्यात स्त्रिया अनेक वेळ ऋषींची साथ करीत असत. महाभारतकाळीही स्त्रियांना शिक्षण देत असत आणि लेखन वाचन धर्म याशिवाय ललितकलांचे शिक्षण क्षत्रिय स्त्रियांना देत ही गोष्ट विराट पर्वातील उत्तरेच्या उदाहरणावरून लक्षात येते. बृहन्नडा या नृत्यशिक्षिकेची योजना, स्वतंत्र नृत्यशाळा अशा सर्व सुविधा होत्या. ' स्मृती ' काळात मात्र स्त्रियांचे स्थान कमी झाले आणि हळूहळू मध्ययुगीन काळापर्यंत तुरळक अपवाद सोडता ' चूल आणि मूल ' हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र झाले.

इंग्रजीच्या आगमनानंतर धार्मिक समजुती, सामाजिक चालीरीती, वाङ्मय यांमध्ये क्रांती झाली.

इ. स. १८१८ साली शिक्षणासंबंधी अहवाल तयार करण्यात आला तेव्हा हिंदुस्थानात स्त्रियांना शिक्षण देणारी एकही संस्था नसल्याचे आढळून आले व एका लाखात लिहिता वाचता येणारी एकच स्त्री आढळली. त्यानंतर मिशनऱ्यांनी कलकत्ता, मुंबई येथे मुलामुलींसाठी शाळा सुरू केल्या. यानंतर स्त्री शिक्षणाबाबत महाराष्ट्रात विचार तरी होऊ लागला. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर ज्योतिराव फुले यांनी पुण्यात मुलींसाठी शाळा सुरू केली. महाराष्ट्रात व पुण्यात तरी हा पहिलाच विशेष असा प्रयत्न होता. केळकरांनी याच इतिहासाच्या पार्श्वभूमीवर मांडलेले आपले विचार स्त्री शिक्षणाची दिशा दाखवितात.

मुंबईत भरलेल्या एका सामाजिक परिषदेचे अध्यक्ष या नात्याने धोंडो केशव कर्वे यांनी केलेल्या भाषणाला अनुलक्षून 'स्त्रियांची युनिव्हर्सिटी' या नावाचा एक लेख केळाकरांनी लिहिला आहे. यावेळी स्त्रियांचे विद्यापीठ अजून निघायचे होते. पण महिला विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत धोंडो केशव कर्वे विचार करीत होते. या संदर्भात केळकरांनी मांडलेले विचार असे –

'जे शिक्षण पुढील आयुष्यक्रमात विद्यार्थ्याला नालायक बनवील त्याला शिक्षण हे नाव देणे चूक आहे. हिंदुस्थानातील शिक्षण पद्धतीत मोठा दोष आहे तो हा की सर्व विद्यार्थ्यांस त्यांच्या त्यांच्या लायकीप्रमाणे किंवा आवडीप्रमाणे जो आयुष्यक्रम किंवा धंदा स्वीकारावयाचा असेल त्याला अनुकूल असे शिक्षण आमच्या शाळांतून मिळत नाही. हल्लीचे स्त्री शिक्षण असेच आहे. (१९१६)

स्त्री शिक्षणाची दुसरी उणीव म्हणजे ते सर्व सरकारच्याच ताब्यात असल्यामुळे त्यात इंग्रजी भाषेला विशेष महत्त्व देण्यात येते. धर्म शिक्षणाच्या नावाने येथे भोपळ्याएवढे पूज्य असते. स्त्री शिक्षणाची दिशा कोणती असावी याबाबत विचार करताना केळकरांनी 'मनू'चे वचन उद्धृत केले आहे –

"उत्पादनमपत्यस्य जातस्यपरिपालनम्
प्रत्यहं लोकयात्रायां एतत्स्यत् स्त्रीनिर्बंधनम्"

स्त्री शिक्षणाची स्थिती कोणती राहणार याविषयीचे दिग्दर्शन या वचनातून होते.

पुरुषवर्गात शिक्षणाचा प्रसार ज्या मानाने होईल त्या मानाने त्यांच्या सहधर्मचारिणीही अधिक सुशिक्षित असाव्यात. पण सुशिक्षित स्त्रिया म्हणजे काय ? तर त्यांस मिळणारे शिक्षण अनादिकालापासून चालत आलेल्या त्यांच्या गार्हस्थ्य आयुष्यक्रमास लायक असेच असले पाहिजे. याबाबत तीन तत्त्वे केळकरांनी सांगितली

आहेत.

१) स्त्रियांचे शिक्षण देशी भाषेत व्हावे, २) त्यात योग्य प्रतीच्या धर्मशिक्षणाचा समावेश झालेला असावा, ३) आमच्याकडील कुटुंबव्यवस्थेला ते अनुसरून असावे.

धोंडो केशव कर्वे यांनी सामाजिक परिषदेपुढे भाषण करताता 'स्त्रियांची युनिव्हर्सिटी' या संबंधात भाषण केले. 'हिंदी स्त्रियांची युनिव्हर्सिटी' हे त्यांनी सुचविलेले नाव केळकरांना अमान्य आहे. कारण देशी भाषेतून स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे हे तत्त्व कर्वे यांना मान्य असेल तर महाराष्ट्रात निघणाऱ्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीत स्त्रियांना मराठी भाषेच्या द्वारेच शिक्षण मिळाले पाहिजे हे उघड आहे. त्याचप्रमाणे प्रो. कर्वे यांच्या भाषणात धार्मिक शिक्षणाचा कोठे उल्लेख नाही ही मोठीच उणीव केळकरांना वाटते. स्त्रियांच्याच नव्हे तर पुरुषांच्याही शिक्षणक्रमात धार्मिक शिक्षण असावे असे केळकरांना वाटू लागले होते. धर्मशिक्षणाबद्दल अशी टाळाटाळ करणे योग्य होणार नाही असे ते आग्रहाने सांगतात.

'धर्मशिक्षणा'चा समावेश हेतूमध्ये केला की धर्म कोणता असा साहजिकच प्रश्न निघतो. पण केळकर त्याचे उत्तर देऊन टाकतात. हिंदू धर्म. स्त्रियांच्या या विद्यापीठात इतर धर्माच्या स्त्रिया आल्या तर त्यांना घेऊ नये असे नाही. पण महाराष्ट्रातील या युनिव्हर्सिटीचा उद्देश हिंदू धर्मातील स्त्रियांस महाराष्ट्र भाषेच्या द्वारा धार्मिक आणि इतर शिक्षण देण्याचा असला पाहिजे असे केळकरांना वाटते. किंबहुना हिंदू युनिव्हर्सिटीचेच (बनारस) याबाबतीत स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीने अनुकरण केले पाहिजे असे केळकर म्हणतात.

स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीच्या नियमाक मंडळाच्या रचनेसंबंधी केळकरांनी आपली मते व्यक्त केली आहेत.

"युनिव्हर्सिटी ही संस्था व्यापक असून तिच्यात स्त्री शिक्षण पाहिजे म्हणणाऱ्या सर्व प्रकारच्या मतांच्या व आचाराच्या लोकांचा समावेश असला पाहिजे." असे केळकर सुचवितात. स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीस सार्वजनिक स्वरूप न येता संकुचित व एकदेशीय व वैयक्तिक स्वरूप येऊ नये. प्रो. कर्वे यांची अनाथ बालिकाश्रम ही संस्था मूळ असली तरी ही संस्था या नव्या युनिव्हर्सिटीची एक शाळा असावी. यासाठी युनिव्हर्सिटीच्या नियमक मंडळाचे नियम व्यापक करणे आवश्यक आहे. प्रो. कर्वे यांनी अनाथ बालिकाश्रमावरचे ममत्त्व काहीसे बाजूला ठेवून स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीसाठी व्यापक दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत असे केळकर प्रो. कर्वे यांनाही सुचवितात.

नाथीबाई कन्याशाळेच्या स्नेहसंमेलनानिमित्त केळकरांनी केलेले एक भाषण लेख स्वरूपात याठिकाणी आहे. धोंडो केशव कर्वे यांनी अल्पावधीतच शिक्षणविषयक

जी कामगिरी केली तिचे कौतुक करून या भाषणात केळकर म्हणतात –

"इमारती मोठ्या, शिक्षक मोठ्या पगाराचे हा थाट असला की शिक्षण शंभर नंबरी झाले असा रूढ समज असतो."

या समजावर केळकरांनी टीका केली आहे. शिक्षणशास्त्राची मूलतत्त्वेही इमारतींना वा शिक्षकांच्या पगाराला महत्त्व देत नाहीत. इमारती उत्तम नसूनही, केवळ निसर्गसान्निध्य असल्यामुळे शिक्षणाची प्रकिया उत्तम होऊ शकते याचे उदाहरण म्हणजे रविंद्रनाथांचे शांतिनिकेतन. शांतिनिकेतन हे निसर्गनिकेतन होते. रविंद्रनाथांना असे वाटते की, "बाह्य उपचारातील साधेपणा व शाश्वत मूल्यांबद्दलची प्रथम आंतरिक निष्ठा या दोन गोष्टी भारतीयांनी केवळ पाश्चिमात्यांनाच नव्हे तर सबंध जगाला शिकवाव्यात." केळकरांच्या या निबंधात हेच सूत्र एका ठिकाणी आहे.

"स्त्रियांच्या शिक्षणाच्याबाबतीत इंग्रजीचे फाजील स्तोम माजविणे केव्हाही रास्त होणार नाही." असे केळकरांनी याच लेखात सांगितले आहे.

इंग्रजी विषयात प्राविण्य मिळवायचेच झाले तर ज्या स्त्रियांना तशी इच्छा आहे त्यांना ते स्वत:च्या प्रयत्नाने मिळविता येईल. त्यासाठी सर्व स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच इंग्रजीचे अथवा इंग्रजीतून शिक्षण देण्याची आवश्यकता नाही.

त्या काळात पुण्यामध्ये सरकारी शाळेतच मुलींनीही जाण्याची प्रथा होती. स्वतंत्र कन्याशाळा काढली तरी मुली तेथे फारच कमी जात. मुलींना अशा कन्याशाळेत घातले पाहिजे असे केळकर सांगतात. ते म्हणतात –

"स्त्री शिक्षणास जुन्या लोकमताचा विरोध दूर करण्यात मागील दोन तपे गेली. ह्याच्यापुढील कार्य म्हणजे देशकालवर्तमान याचा विचार करून स्त्रियांच्या प्रचलित शिक्षण पद्धतीत फरक करणे व त्यावर लोकमताचे नियंत्रण ठेवणे."

केळकरांनी आपल्या पुढील एका लेखात (खोडसाळ टीकेस उत्तर) ज्ञानप्रकाशकारांनी त्यांच्या कन्या शाळेतील भाषणावर टीका केली होती तिला उत्तर दिले आहे. आपल्या भाषणात कन्याशाळेच्या संमेलनप्रसंगी केळकरांनी हुजूरपागा या शाळेच्या व्यवस्थापनासंबंधी काही मते व्यक्त केली होती. हुजूरपागा या शाळेच्या नियामक मंडळात अमहाराष्ट्रीय व अन्यधर्मीय लोक बरेच होते. अशा प्रकारच्या व्यवस्थेमुळे शिक्षण विषयक धोरणात एकजिनसीपणा येणे शक्य नसते असे केळकरांचे मत होते. ते म्हणतात –

"हुजूरपागेतील शिक्षण असावे तितके लोकसंमत नाही व त्याला कॉस्मॉपॉलिटन म्हणजे बकाली स्वरूप आहे."

केळकरांच्या विधानात दोन महत्त्वाचे मुद्दे अंतर्भूत आहेत.

शिक्षण हे लोकसंमत असले पाहिजे. शिक्षण हे बकाली स्वरूपाचे

(कॉस्मॉपॉलिटन) नसावे.

केळकर पुढे मुख्याध्यापक आणि शिक्षण-संस्था यांच्या संबंधाबाबत लिहितात की कोणीही मुख्याध्यापक झाला तरी आपल्याला प्रिय अशा संस्कृतीचेच घोडे पुढे तो दामटणार, उलट लोकांचेही पाहणे असेच असणार की स्त्री-शिक्षणाला झाले तरी राष्ट्रीय म्हणून काही दिशा आहे व या दिशेने आखले गेलेले शिक्षण इतर शिक्षणापेक्षा अधिक चांगले.

या संदर्भात टीका करताना केळकरांनी मुंबई युनिव्हर्सिटीचे उदाहरण दिले आहे. मुंबई युनिव्हर्सिटीत केळकरांच्या मते दोन गोष्टी दोषास्पद होत्या –

परकी भाषेला फाजिल महत्त्व आणि विदेशी संस्कृतीच्या ध्येयाचा जुलूम, यामुळे मुंबई युनिव्हर्सिटीच्या शिक्षणात राष्ट्रीयत्व दिसत नाही, शिक्षण दूषित होते असे केळकर मांडतात.

यानंतर स्त्री शिक्षणाकरिता काही वेगळी ध्येयधोरणे असावीत, स्त्रियांचे शिक्षण वेगळेच असावे या आपल्या मताच्या पुष्टचर्थ केळकर लिहितात–

"खुद्द विलायतेत स्त्री शिक्षणाचा इतका प्रसार असता तेथेदेखील शाळांतून स्त्रिया व पुरुष यांचे शिक्षण एकत्र होऊ नये व उभयतांचा अभ्यासक्रम वेगवेगळा असावा ही गोष्ट मान्य होऊन चुकलेली आहे."

या संदर्भात पूर्वीच्या लेखातही केळकरांनी आपली हीच मते मांडली होती. पुनरुच्चार येथे नको.

केळकरांच्या स्त्री शिक्षण विषयक विचारातील एक त्रुटी ध्यानात येते ती अशी की स्त्रियांच्या शिक्षणात धर्मशिक्षणाचा समावेश असावा असे केळकर आग्रहाने मांडतात. त्याचप्रमाणे धर्मशिक्षण म्हणजे हिंदू धर्माचे शिक्षण असेही सांगतात. पण हिंदू धर्माचे शिक्षण द्यायचे म्हणजे नेमके काय करावयाचे, या शिक्षणक्रमाचे घटक कोणते, पाठ कोणते, त्याची अंमलबजावणी कशी करावी याबाबत केळकर काहीही सांगत नाहीत. धर्मशिक्षण द्यावे असे नुसते म्हणून भागणार नाही. कारण धर्मशिक्षण याचा अर्थ हिंदू धर्मातील कर्मकांडाचे शिक्षण असा कोणीही घेऊ शकेल. त्यामध्ये जपजाप्य, स्नानसंध्या, धार्मिक ग्रंथांचे पठण, पूजापाठ अशा गोष्टींचा समावेश झाला तर शैक्षणिक दृष्ट्या ते योग्य ठरणार नाही. ही त्रुटी केळकरांनी ठेवली नसती तर बरे झाले असते. त्यांच्या स्त्री शिक्षणविषयक विचारांचा सर्वांगाने अभ्यास करणे त्यामुळे शक्य झाले असते.

### विद्यापीठ

केळकरांच्या शिक्षण विषयक निबंधांपैकी विद्यापीठ (युनिव्हर्सिटी) या विषयावर लिहिलेले अनेक लेख आहेत. सामान्यपणे हे लेख तीन विभागात मोडतात.

हिंदू युनिव्हर्सिटी, स्त्रियांची युनिव्हर्सिटी (महिला विद्यापीठ), महाराष्ट्र विद्यापीठ (स्वरूप).

यांपैकी स्त्री शिक्षण विचारात महिला विद्यापीठावरील लेखात आलेल्या शिक्षण विचाराचा मागोवा यापूर्वीच घेतला आहे.

उरलेल्या दोन विषयांवरील लेखात जो शिक्षण विचार आहे तो खालीलप्रमाणे –

**हिंदू युनिव्हर्सिटी (१९११ साली लिहिलेला लेख)** – १९०५ मध्ये बनारस येथे राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनप्रसंगी मदनमोहन मालवीय यांच्या खटपटीमुळे हिंदू विश्वविद्यालयाची योजना तेथे जमलेल्या सर्व मंडळींपुढे मांडण्यात आली होती.

हा लेख १९११ साली लिहिला आहे. हिंदू विश्वविद्यालयाच्या योजनेला बराच काळपर्यंत परिणत रूप आले नव्हते. या संदर्भात केळकरांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. हिंदी युनिव्हर्सिटीची कल्पना मागे पडण्यास १९०८ सालापासून झालेले अत्याचार आणि अत्याचारापाठोपाठ येणारी दडपशाही कारणीभूत असल्याचे केळकरांनी सांगितले आहे.

यासंबंधी विवेचन करताना 'संस्था मेल्या तरी कल्पना मरत नाहीत' असे सांगून केळकरांनी तळेगावच्या राष्ट्रीय शाळेवर जो प्रसंग ओढवला त्याचे कथन केले आहे. या लेखात पुन्हा एकदा राष्ट्रीय शिक्षणासंबंधी आपले विचार केळकरांनी मांडले आहेत. "राष्ट्रीय शिक्षणाचे काही पुरस्कर्ते व सरकार या दोघांच्याही चुकीमुळे त्या शिक्षणाला नसते राजकीय महत्त्व देण्यात आले होते. ते बाजूस ठेवून निर्विकार मनाने विचार करणारास असे दिसून येईल की शिक्षणविषयक सुधारणेचा असा बराच भाग राष्ट्रीय शिक्षणाच्या मुळाशी आहे व राष्ट्रीय शिक्षणाच्या काही शाळा जरी सरकारने बुडविल्या तरी निवळ शिक्षणविषयक अशी जी सुधारणा ती या ना त्या रीतीने घडून आल्यावाचून राहणार नाही."

या उद्‌गारात केळकरांना हेच सूचित करावयाचे आहे की शिक्षणात राजकारण आणू नये. शिक्षणाचा व राजकारणाचा संबंध असू नये. राजकारणाचा शिक्षणाशी किती संबंध असावा याबाबत शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींनी विचार करायला हवा.

हिंदू विश्वविद्यालय ही राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेतून प्रगत झालेली कल्पना आहे. राष्ट्रीय शिक्षण व हिंदू राष्ट्राची प्रगती या दोन्ही गोष्टी परस्पर पोषक व एकीचा दुसरीस दुजोरा मिळण्यासारख्या आहेत असे केळकर सांगतात. अशा प्रकारचे हिंदू विश्वविद्यालय सुरू करण्यासाठी आवश्यक असणारी अर्थव्यवस्था उपलब्ध होणे सहजपणे शक्य नाही. केळकर यासाठी केळकर एक उपपाय सुचवितात. यंत्रशास्त्रातील दात्यांच्या चाकासारखा उपयोग करून एक संघ बनविणे व एकच मोठी संस्था निर्माण करणे हा त्यावर उपाय होय. प्रत्येक धर्मपंथाला आपले मत बिंबवणारे

शिक्षण द्यावे व त्यासाठी विश्वविद्यालय हवे असे वाटत राहणार. सर्वांनी मिळून एकत्र यावे व विश्वविद्यालय स्थापन करावे. थिऑसॉफिस्ट, सनातनवादी लोक हे वेगवेगळे होऊन काम करीत आहेत. त्यापेक्षा कलकत्त्याच्या कौन्सिल ऑफ एज्युकेशनने दोघांना जवळ आणावे व हिंदू युनिव्हर्सिटीची कल्पना सिद्ध करावी असे केळकर सुचवितात.

या ठिकाणचा हा तपशील कालबाह्य आहे म्हणून सोडून दिला तरी नव्या काळाच्या दृष्टीने शिक्षण क्षेत्रातील अर्थव्यवस्था पेलण्यासाठी संघटना व सहकार ही दोन तत्त्वे अंमलात आणून आर्थिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न शिक्षण संस्थांनी करावा हे तत्त्व आजही अनुकरणीय आहे. विशेषत: शिक्षण पतसंस्थांची ज्याठिकाणी अधिक आवश्यक आहे त्या ठिकाणी हा विचार महत्त्वाचा. शैक्षणिक परिसर (एज्युकेशन कॉम्प्लेक्स) निर्माण करून हे प्रश्न सोडविता येतील.

हिंदू युनिव्हर्सिटीच्या स्थापनेचे जे प्रयत्न त्या काळी चालले होते. त्यात मदनमोहन मालवीय यांचा सिंहाचा वाटा होता. तीन कोटी रुपये जमविण्याचा संकल्प त्यांनी केला होता. या प्रयत्नाचे कौतुक करताना केळकरांनी शैक्षणिक इतिहासातील काही तपशील दिले आहेत ते महत्त्वाचे आहे. उदा. –

❖ अमेरिकेत १८७१ ते १९०१ या तीस वर्षात मिळून खासगी लोकांनी साठ कोटी रुपये युनिव्हर्सिटी काढण्याकरता खर्च केले.

❖ इंग्लंडमध्ये याच काळात युनिव्हर्सिट्यांच्या खर्चासाठी लोकांनी खासगी वर्गणी म्हणून साडेसात कोटी रुपये दिले.

या पार्श्वभूमीवर हिंदुस्थानात हिंदू युनिव्हर्सिटी स्थापन करण्यासाठी लागणारे दोन किंवा तीन कोटी रुपये देणे अवघड नाही असे केळकर सांगतात.

**विद्यादानाची प्राचीन व अर्वाचीन परंपरा (१९१३ सालचा लेख)** – या देशातील विद्यादानाची फार मोठी परंपरा लक्षात घेण्यासारखी आहे. तक्षशिला, नालंदा या ठिकाणी प्रचंड प्राचीन विद्यापीठे होती, दहा दहा हजार विद्यार्थी होते. त्यांना अन्न वस्त्र निवारा फुकट होता. वशिष्ठ, शौनक यांसारखे प्राचीन कुलपती होते.

या स्मृती नष्ट होण्यापूर्वीच हिंदू विश्वविद्यालयाची स्थापन झाली पाहिजे असे केळकर सांगतात. देशात अर्वाचीन काळातही (हा लेख १९१३ मधील आहे) चांगल्या शिक्षण संस्था खासगी स्वरुपात चालविल्या जातात. त्यांची यादीच केळकरांनी दिली आहे. त्या संस्था अशा –

मद्रासचे पाछापाचे कॉलेज व शाळा, पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज व शाळा, तळेगावचे समर्थ विद्यालय (बंद पडले), मुंबईची गोकुळदास

तेजपाल संस्था, अहमदाबादची रणछोडलाल छोटालाल टेक्निकल इन्स्टिट्यूट, चिनुभाई माधवलाल यांची शास्त्रीय शिक्षणाची शाळा, सिंधमधील दयाराम जेठमल कॉलेज (सिंध त्यावेळी मंबई इलाख्यातच होता), लाहोरचे आर्यसमाजाचे अँग्लोवैदिक कॉलेज, हरिद्वारचे गुरुकुल, तेथीलच शीखांचे सरदार दयाळसिंग मिजिथा कॉलेज, अमृतसर येथील खालसा कॉलेज, मीरत येथील नानकचंद ट्रस्टच्या शाळा, दिल्ली येथील हिंदू कॉलेज, अलाहाबाद येथील कायस्थ पाठशाळा, बनारस येथील सेंट्रल हिंदू कॉलेज... ही यादी बरीच मोठी आहे.

अशी यादी देतांना केळकरांना एक गोष्ट महत्त्वाची सांगावयाची होती ती अशी की अनेक खासगी शिक्षणसंस्था हिंदू लोकांच्या शिक्षणविषयक धर्मबुद्धीची साक्ष आज देत आहेत. असे असल्यामुळे या सर्वांहून श्रेष्ठ व सर्व हिंदूंना साधारण असे हिंदू लोकांचे एखादे खास विद्यापीठ असावे असे वाटणे साहजिकच आहे.

हिंदू युनिव्हर्सिटीची कल्पना केळकरांनीही उचलून धरली आहे. मात्र हिंदू युनिव्हर्सिटीत जे शिक्षण दिले जायचे ते एकदम देशी भाषेतून दिले जाणार नाही असे जे धोरण चालकांनी जाहीर केले ते केळकरांना पसंत नव्हते. हिंदी भाषा हिंदुस्थानातील सर्व लोकांना समजते. या भाषेच्या द्वारेच युनिव्हर्सिटीचे काम व्हावे असे केळकर सुचवितात. यात दोन फायदे...

इंग्रजीचा आधार घेण्याची आवश्यकता उरणार नाही आणि देशी भाषेचा बस बसल्यास खचित मदत होईल.

'बनारस हिंदू कॉलेजातील फूट' या आपल्या एका लेखात थिऑसॉफिस्ट ॲनी बेझंट आणि बनारस हिंदू युनिव्हर्सिटीतील सनातनी विचारांचे लोक यांच्यातील मतभेदांबाबत विवेचन केले आहे. बनारस हिंदू कॉलेजच्या सूत्रधारांमध्ये बेझंट यांचे थिऑसॉफिस्ट अनुयायी बरेच होते. बनारस कॉलेजला थिऑसॉफिकल कॉलेज नाव न देता हिंदू कॉलेज असे व्यापक नाव दिले आहे असे केळकर सांगतात. थिऑसॉफिस्ट लोकांनी काही मतभेदांमुळे राजीनामे दिले. ॲनी बेझंट यांचे मत असे की शिक्षणात सजकारण कधीच नसावे. हे बरोबरच आहे. पण त्याच वेळी थिऑसॉफीचे शिक्षण देणे हे शिक्षणबाह्य नाही असे त्या मानत. या ठिकाणी केळकरांना असे सुचवावयाचे आहे की, "थिऑसॉफीच्या अंतरंगात व्यक्तिविषयक सजीव मूर्तिपूजा आहे." ही गोष्ट शिक्षणबाह्य आहे. हिंदू धर्मातही मूर्तिपूजा, अवतार, गुरूभक्ती या सर्व गोष्टी आहेतच. पण थिऑसॉफीच्या शिष्यांची मजल यापुढे फार जाते असे केळकर सांगतात. या सर्व विवेचनाचा मथितार्थ एवढाच...

शिक्षणात राजकारण नसावे आणि शिक्षणात धर्माचे स्थान अतिरिक्त स्वरूपात नसावे.

या पद्धतीचे विचार केळकरांनी पूर्वीच्या निबंधांतूनही लिहिले आहेत.

**महाराष्ट्र विद्यापीठ** – १८५७ साली मुंबई विद्यापीठ स्थापन झाले. त्यानंतर महाराष्ट्राची शैक्षणिक गरज इतकी वाढली की खास महाराष्ट्रासाठी मराठी भाषेला प्राधान्य असलेले एखादे वेगळे विद्यापीठ असणे आवश्यक होते. याबाबत १९२४ पासून १९२८ पर्यंत नव्या विद्यापीठांच्या कल्पनेची परंपरा अखंड चालू राहिली. या संदर्भात केळकरांनी 'महाराष्ट्र-विद्यापीठ परिषद' हा लेख लिहिला. मूलत: हे त्यांचे भाषण आहे. विशाल मुंबई इलाख्यात एकट्या महाराष्ट्रालाच नवे विद्यापीठ द्यावे म्हणून चळवळ झालेली नव्हती. गुजराथ, कर्नाटक व सिंध यांनाही विद्यापीठ मिळणे आवश्यक आहे. यासाठी ती चळवळ होती.

## वेगळे विद्यापीठ का ?

प्रादेशिक विद्यापीठे सुरू झाली तर अशा विद्यापीठांमुळे फाटाफूट होते, दुही माजते असे आक्षेप त्यावेळी घेण्यात येत होते. या आक्षेपाला केळकरांचे उत्तर असे –

वेगळी व्यवस्था करणे यात फुटून निघण्याची वृत्ती असतेच असे नाही. वेगळ्या व्यवस्थेत अधिक सोय व अधिक कार्यक्षमता असते. ब्रिटिश मुलुखात वा एवढ्याश्या इंग्लंडमध्येही कारभाराच्या सोयीसाठी वेगवेगळे विभाग आहेत. त्यात दहावीस विद्यापीठे आहेत. ती काय फाटाफूट व दुही म्हणून आहेत? महाराष्ट्र विद्यापीठ हवे ते सवता सुभा म्हणून नव्हे तर मुंबई विद्यापीठाच्या कामात विभागणी करण्याची वेळ आता आली आहे म्हणून. प्रादेशिक विद्यापीठे तयार झाली तर या सर्व विद्यापीठातून अभ्यासक्रम, संशोधन, गुणप्रमाण, परीक्षण यांबाबत परस्पर सहकार्य होणे सहज शक्य आहे व तसे व्हावे हेच शैक्षणिक दृष्ट्या योग्य आहे. अधिकार विभागणीची आवश्यकता, परकीय भाषेचा (इंग्रजीचा) अवघडपणा, बोधभाषा म्हणून मातृभाषेचा वापर, आणि एका विशिष्ट प्रदेशात विशिष्ट भाषा बोलणारांची बहुसंख्या या गोष्टी ध्यानात घेऊन नव्या विद्यापीठांची लवकरात लवकर रचना करावी. मुंबई विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून मुंबई इलाख्यात ज्ञानाची प्रगती किती झाली याचे उदाहरण केळकर देतात. १८६२ साली मुंबई विद्यापीठातून ८ पदवीधर निर्माण झाले. १९३० साली ४७०० पदवीधर झाले. सहाशे पटींनी शिक्षणाचा फैलाव झाला.

## बौद्धिक तालिमखाना

पदवीधर होण्याची प्रवृत्ती हिंदुस्थानाइतकी पाश्चात्य देशात क्वचितच आढळते. पण पाश्चात्य देशात पदवीधरांनी लावलेले शोध, लिहिलेले ग्रंथ, व स्वभाषेची

वाढवलेली योग्यता यांचा विचार करता हिंदुस्थानातल्या पदवीधरांनी काहीच कार्य केलेले नाही असे दिसते.

पदवीधरांनी कोणती कामगिरी बजावली ? या प्रश्नाचे एक महत्त्वाचे उत्तर आहे. ते असे की हिंदुस्थानातल्या पदवीधरांनी देशात राजकीय व सामाजिक क्रांती करून सोडली. याचे श्रेय इंग्रजी विद्येलाच दिले पाहिजे असे केळकर म्हणतात.

विद्यापीठ म्हणजे काय ? याचेही उत्तर केळकर देतात.

" विद्यापीठ हा राष्ट्रोपयोगी अनेक विद्वान तरूण निर्माण करण्याचा तालिमखाना आहे. त्यातून अनेक विद्या, कला, कौशल्ये, कारखाने, उद्योगधंदे व संशोधन यात पारंगत अशी माणसे तयार होऊन त्यांनी आपला देश संस्कृतीचे व ऐश्वर्याचे माहेरघर करून सोडावयास पाहिजे."

केळकरांची ही विद्यापीठांसंबंधी व्याख्या व्यापक आणि तत्कालीन सामाजिक व राजकीय प्रश्नांना उत्तर म्हणून चांगली आहे.

१९३० मध्ये भरलेल्या राष्ट्रीय शिक्षण परिषदेने विद्यापीठ कसे असावे यासंबंधीच्या आराखड्याची चर्चा केली होती. त्यात म्हटले आहे –

" विद्यापीठाचे मुख्य काम स्वराज्यप्राप्तीसाठी चालणाऱ्या प्रवृत्तींना बळ देतील असे चारित्र्यवान, शक्तिसंपन्न, संस्कारी व कर्तव्यनिष्ठ कार्यकर्ते तयार करणे हे आहे. विद्यापीठात औद्योगिक शिक्षणाला बौद्धिक शिक्षणाइतकेच महत्त्व देण्यात येईल. राष्ट्राला पोषक असे जे जे उद्योग असतील त्या सर्वांना स्थान देण्यात येईल."

विद्यापीठ हे राष्ट्राचे बौद्धिक उत्कर्षाचे, औद्योगिक व व्यावसायिक कौशल्य सरावाचे ठिकाण असावे ही केळकरांची अपेक्षा वरील शिक्षण परिषदेच्या आराखड्यातही व्यक्त झालेली दिसते.

### चतुर्मुख विद्यापीठ

तत्कालीन मुंबई इलाख्यात सिंध, गुजराथ, महाराष्ट्र व कर्नाटक या चार प्रांतांचा समावेश होता. चार प्रादेशिक भाषांना एकाच विद्यापीठात न्याय मिळणे शक्य नव्हते. चार प्रांतांची एकमेकास ओळख करून घेण्यास विद्यापीठास इंग्रजी भाषेचाच आश्रय घ्यावा लागतो हे केळकरांनी निदर्शनास आणून दिले आहे. विद्यापीठाची स्थापना होऊन साठसत्तर वर्षे झाली तरी विद्यापीठाला देशी भाषेतून शिक्षण देता येत नाही ही समाधानाची बाब नाही. म्हणूनच केळकर अशा या विद्यापीठाला ' चतुर्मुख विद्यापीठ ' म्हणतात.

### महाराष्ट्र विद्यापीठाचे स्वरूप

महाराष्ट्र विद्यापीठाचे स्वरूप कसे असावे यासंबंधी २२ मे १९३३ च्या

प्रतिभा पाक्षिकाच्या अंकातील केळकरांची मुलाखत नंतर त्यांच्या लेख संग्रहात समाविष्ट करण्यात आली. या मुलाखतीचा सारांश असा –

महाराष्ट्राकरिता महाराष्ट्र विद्यापीठ हे प्रादेशिकच असावे. मराठी हीच भाषा या विद्यापीठात प्रबळ व प्रचलित असावी. इंग्रजीचे महत्त्व कमी न होता या विद्यापीठात इंग्रजीचे योग्य ते स्थान राहील. अन्य भाषांचे लोक या विद्यापीठात शिक्षण घ्यावयास आले तर उर्दू, पर्शियन, अरेबिक, इ. भाषांचे शिक्षण मराठी विद्यापीठात संस्कृतीच्या दृष्टीने देणे नुसते शक्य नव्हे तर इष्टही आहे. पण हा सर्व पैशांचा खेळ आहे. ध्येयाचा दोष नाही. महाराष्ट्र विद्यापीठामुळे मध्यप्रांत, गोमंतक, मराठवाडा, विदर्भ यांच्या वाङ्मयीन एकीकरणाला मदत होईल.

महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापनेला जो विरोध आहे तो मुख्यत: आर्थिक प्रश्नामुळे आहे. पण तो प्रश्न सुटू शकेल. महत्त्वाचा तात्विक विरोध असा की प्रादेशिक वा भाषावार विद्यापीठे स्थापन झाली तर राष्ट्रीयत्वाच्या बुद्धीची हानी होईल. पण हा आक्षेप खरा नाही. यापूर्वी जी प्रादेशिक विद्यापीठे स्थापन झाली...म्हैसूर, हैद्राबाद इ... त्यांमुळे असे घडलेले नाही. पिंडापासून ब्रह्मांडापर्यंत लहान व मोठे, सामान्य व विशेष यांचा मेळ घालण्यावरच जग अधिष्ठित आहे व चालले आहे. तसा मेळ नव्या विद्यापीठाबाबत घालता येईल. महाराष्ट्र विद्यापीठ हे पुण्यात स्थापन व्हावे या कल्पनेला ज्यांचा विरोध आहे (होता) त्यांच्यासाठी केळकर एवढेच सांगतात की पुण्यात असणाऱ्या शिक्षणसंस्था इतक्या महत्त्वाच्या आहेत की त्यातूनच विद्यापीठाचे केंद्र निर्माण होऊ शकते. पुण्याला पुणे म्हणूनच विरोध केला जाऊ नये.

### फ्रेंच ॲकॅडमीचे उदाहरण

महाराष्ट्र विद्यापीठात देशी भाषेला - मराठीला प्राधान्य मिळावे हे युक्तच आहे. कारण मुंबई विद्यापीठाच्या सबगोलंकारी स्वरूपामुळे मुंबई विद्यापीठात ही गोष्ट शक्य नाही. राजाश्रय नसल्यामुळे महाराष्ट्र विद्यापीठाचे काम लंगडे पडते असे केळकर सांगतात. केळकर 'फ्रेंच ॲकॅडमी' या संस्थेचे उदाहरण मुद्दाम देतात. ते महत्त्वाचे आहे.

१८ व्या शतकात एका क्लबच्या रूपाने ही संस्था काही थोड्या विद्वान लोकांनी काढली. त्यावेळचा मुख्य धर्माधिकारी व प्रधान रिचलिओ हा स्वदेशाविषयी अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. त्यानेच राजाकडून सनद घेऊन या क्लबची ॲकॅडमी बनविली आणि नंतर तिला पार्लमेंटनेही विद्यापीठाचे अधिकार दिले. रिचलिओ याचा मुख्य उद्देश असा होता की लॅटिन भाषेचे विद्येच्या प्रांतात माजलेले प्रस्थ कमी करून देशी भाषेला महत्त्व आणून देणे. कला, शास्त्रे यांना देशी भाषेचा

व देशी संस्कृतीचा आधार मिळून त्यांना तेज चढावे, विद्या कार्यक्षम व्हावी, ते एक अधिकारस्थान व्हावे असा रिचलिओ यांचा हेतू होता. तो सफलही झाला.

हे उदाहरण देऊन केळकर या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाच्या कार्यपद्धतीचे विवेचन करतात. मुंबई विद्यापीठाची कार्यपद्धती विश्वधर्माच्या दृष्टीने ठीक असली तरी राष्ट्रधर्माचा, राष्ट्रीय बुद्धीचा त्यामुळे घातच होतो असे केळकर सांगतात. या ठिकाणी केळकरांना विश्वधर्माला कमी लेखायचे नसून राष्ट्रधर्माला प्राधान्य देण्याचा हेतू आहे. विशिष्ट परिस्थितीत अतिव्यापकतेचा त्याग करून उद्दिष्टपूर्ण कार्य करणे हेच योग्य असते. फ्रेंच ॲकॅडमीचे उदाहरण यासाठीच केळकरांनी दिले आहे. रिचलिओ या फ्रेंच प्रधानाला लॅटिन भाषेचा द्वेष होता असा अर्थ नसून फ्रेंच या स्वभाषेला प्राधान्य देण्याचा, प्रोत्साहन देण्याचा त्याचा हेतू होता. केळकरांनी याच गोष्टीवर भर दिला आहे.

युनिव्हर्सिटी कमिशनने भाषावार प्रांतरचना मनात आणून सर्व महाराष्ट्राकरिता म्हणून विद्यापीठ असावे अशी शिफारस केली होती. याचा उल्लेख करून केळकर सांगतात की जोपर्यंत भाषावार प्रांतरचना होत नाही तोवर एक भाषा चालणाऱ्या प्रदेशाचे एक विद्यापीठ असावे ही गोष्ट ताबडतोब अंमलात येण्यास काहीच हरकत नाही.

केळकरांच्या विद्यापीठ विषयक विचारांचे स्वरूप असे आहे. राष्ट्रीय दृष्टी, देशी भाषांना प्राधान्य, औद्योगिक व व्यावहारिक शिक्षण यांची योजना ही त्यांच्या विचारांची महत्त्वाची अंगे आहेत.

### ग्रंथालये – ज्ञानाची सदावर्ते

शिक्षण क्षेत्रात काय किंवा एरवीच्या जीवनात काय, ग्रंथालयांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक शिक्षण संस्थेचे एखादे ग्रंथालय असावे अशी आदर्श अपेक्षा करण्यात येते. ग्रंथालयाशिवाय शाळा किंवा महाविद्यालय किंवा एखादी शिक्षण संस्था अशी कल्पनाही आपण करू शकत नाही. ‘ग्रंथालय’ हा शिक्षण प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक समजला जातो.

अभ्यासेतर उपक्रमांमध्ये ग्रंथालयात बसून वाचन, अवांतर वाचन या उपक्रमांचा आवर्जून समावेश करण्यात येतो. ग्रंथालयाबाबत केळकरांनी कोणते विचार व्यक्त केले आहेत ते अभ्यासणे महत्त्वाचे ठरेल.

केळकरांनी ग्रंथालयांना ‘ज्ञानाची सदावर्ते’ असे म्हटले आहे. जेथे जी गोष्ट सतत मुक्तपणे मिळते ते सदावर्त. ग्रंथालयात ज्ञान सतत मिळते, मुक्तपणे मिळते. म्हणून केळकर त्यांना सदावर्त म्हणतात. शैक्षणिक दृष्ट्या या ज्ञान-सदावर्तांचा उपयोग खूपच असतो. केळकरांनी केलेल्या विवेचनाचा सारांश असा –

मोफत वाचनालये व ग्रंथसंग्रहालये ही उच्च दर्जाच्या ज्ञानाची सदावर्ते आहेत. ज्या काळात मुद्रणकला नव्हती त्या काळातही हजारो ग्रंथ निर्माण झाले, त्यांचा प्रसार झाला यावरून कोणत्याही स्थितीत व युगात मनुष्यमात्राने दाखविलेल्या ज्ञानप्रियतेचे, विद्याव्यासंगाचे कौतुक करावे तितके थोडेच. मुद्रणकला ही अलीकडची असली तरी ग्रंथलेखन व ग्रंथसंग्रह या अनादिसिद्ध गोष्टी आहेत. ज्ञान हा मुख्यत: मनाचा व अंत:करणाचा विषय असला तरी त्याला मूर्त स्वरूप मिळण्याची शक्यता ग्रंथामुळेच निर्माण होते.

ग्रंथसंग्रहालयांचा इतिहास असे सांगतो की प्राचीन काळी हिंदुस्थानाप्रमाणेच असीरिया, इजिप्त, ग्रीस, रोम वगैरे राष्ट्रांतही मोठमोठी ग्रंथसंग्रहालये होती. असुरबनिपाल राजाच्या ग्रंथसंग्रहालयात एक चौरस फुटापासून एक चौरस इंचापर्यंत मृत्तिकापत्रावर लिहिलेले हजारो ग्रंथ आहेत. खिस्तपूर्व चौदाव्या शतकात इजिप्तमधील एका देवालयात एक प्रचंड ग्रंथसंग्रहालय होते. त्याला 'आत्मरुग्णालय' असे मार्मिक नाव देण्यात आले होते. अशा प्रकारे केळकरांनी थेट आधुनिक काळापर्यंत ग्रंथसंग्रहालयांचा इतिहास कथन केला आहे. लंडनचे ब्रिटीश म्यूझियम, बर्लिन, म्यूनिच, शिकागो येथील ग्रंथसंग्रहालयांचा संदर्भ ते देतात.

पुस्तकसंग्रह आणि त्यावरून ओळखली जाणारी समाजाची विद्याप्रियता यांचे प्रमाण नेहमीच सम राहील असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे पुस्तकांचा नाद असणारे सर्वच लोक विद्याव्यसनी असतात असे नाही. पुस्तके विकत घेणार केवळ हौसेखातर, कलाकुसरीची गोष्ट म्हणूनही विकत घेतात. त्या पुस्तकांचा प्रसंगोपात्त दुसऱ्यांना उपयोग होतो.

इतर गोष्टींप्रमाणे ग्रंथांतही उत्तम, मध्यम, अधम ही वर्गवारी लागतेच. अधम ग्रंथांच्या महापुरातून उत्तम ग्रंथांचे रक्षण कसे होईल याची चिंता लागते. मनुष्याच्या वाढीलाही दुष्काळ, रोगराई, क्षय, लढाया या गोष्टी रोखतात. हे काम ग्रंथांच्या बाबतीत उंदीर, झुरळे, कसर हे करतात.

ग्रंथांसंबंधी मनोरंजक माहिती अशी की मुसलमान सरदार उमरा याने अलेक्झांड्रिया शहरी चारशे सार्वजनिक स्नानगृहांमध्ये टॉलमी राजांची ग्रंथसंग्रहालये जळणासारखी वापरून सहा महिने आपल्या सैन्याला नित्य आंघोळीला गरम पाणी पुरविले; एका मोगल वीराने एका प्रसिद्ध ग्रंथालयातील पुस्तके आपल्या तबेल्यात पसरून लढाऊ घोड्यांना सुखशय्या करविली.

ग्रंथ परिशीलनाचा हटकून परिणाम होतोच असे नाही. कारण पुस्तकी ज्ञान म्हणजे खरे ज्ञान नव्हे व व्यवहार-चातुर्य तर नव्हेच. केवळ पुस्तकी ज्ञान मिळविणारे हे पढतमूर्ख असतात. नुसत्या पढिकपणाने, खऱ्या विद्वत्तेच्या अभावी, विद्वत्तेचा

अहंकार मात्र उत्पन्न होतो. बुद्धी फाटते, संभ्रम निर्माण होतो. अनिश्चितपणा वाढतो.

फाजील ग्रंथाभ्यासाने मनाला दुबळेपणा येतो. विद्वत्ता आणि पारतंत्र्य यांचे विलक्षण साहचर्य आहे. ग्रीक लोकांनी पुस्तके वाचून आपले स्वातंत्र्य गमावले. ''पुस्तके वाचाल तोपर्यंत असेच पारतंत्र्य भोगाल' असे भाकित त्यांच्या बाबतीत अनेकांनी केले होते. अथेन्समधील ग्रंथसंग्रहालये जाळण्याची उर्मी गॉथ्स सरदारांच्या मनात प्रथम आली तेव्हा एक गॉथ्स सरदार म्हणाला, ''कशाला जाळता ग्रंथालये ? त्यांच्या हातची पुस्तके गेली म्हणजे त्यांचे रिकामे हात तलवारीकडे धावतील. त्यांच्या क्षात्रतेजावरची राख विनाकारण का फुंकता ?''

ग्रंथवाचनावर जे वरील आक्षेप घेतले गेले त्यांचा विचार करूनही ग्रंथवाचनापासून मनाला जो आल्हाद होतो त्याला बाधा येत नाही. जगाच्या उत्पत्ती-पासून आजवर असे दिसते की मनुष्यास खरे व निर्मळ सुख ग्रंथ वाचनानेच मिळते. विद्याव्यासंगाच्या सुखावर विद्याप्रिय अशा बंदिवानांनी वर्षानुवर्षांचा बंदिवास सुखाने नसला तरी समाधानाने घालविला. याबाबत एका खलिफाची गोष्ट केळकर सांगतात.

जगाच्या सुखाला वैराग्याचे विरजण घालणारे आणि दु:ख रोगाला बरे करणारे औषध म्हणजे ग्रंथवाचन होय. ईश्वराच्या सर्वगुणसंपन्नेचा खरा प्रतिनिधी ग्रंथसंग्रहच होऊ शकेल. एखाद्या लहानशा ग्रंथसंग्रहालयातही बसून वर्तमान व भूत यांमधील अंतर तोडून टाकता येते. गतकाळात होऊन गेलेल्या कोणत्याही महानुभावाशी संवाद करता येतो.

जशी भावना तसे फल देणारे ग्रंथाशिवाय कोणीही नाही. तुम्ही त्यांना जसे वागवाल तसे वागवून घेण्याची लीनता ग्रंथामध्ये आहे. स्नेही, गुरू, प्रतिपक्षी, अशा सर्व नात्यांनी ग्रंथ उपयुक्त ठरतात. सल्ला देतात, मार्गदर्शन करतात, वाद करतात. जगाच्या इतिहासात धर्म, नीती व राजकारण या तिहींच्याही कल्पनांत मतभेद माजलेला आढळून येतो. पण ग्रंथ, त्यांचे महत्त्व व त्यांचा उपयोग याबाबत सर्व जगाचे मतैक्य आहे. ग्रंथसंग्रहाचा फायदा सर्वसाधारण जनतेला जितक्या सुलभ व बिनखर्ची रीतीने देता येईल तितका देण्याची तजवीज केली पाहिजे. इंग्लंडमध्ये ग्रंथसंग्रहालये व वाचनालये यांद्वारे ज्ञान प्रसार करणे हे विश्वविद्यालयाचे एक अंग असे मानण्यात येते. हिंदुस्थानातही तसे मानणे आवश्यक आहे. पण विश्वविद्यालये हे काम करीत नसतील तर खाजगी रीतीने ही गोष्ट घडवून आणावयास पाहिजे.

केळकरांनी व्यक्त केलेले ग्रंथालयविषयक विचार हे असे आहेत. प्राचीन काळापासून ग्रंथांना आपण महत्त्व देत आलो आहोत. 'ग्रंथ हेच गुरू' असेही आपण मानतो. केळकरांनी ग्रंथांवरील आक्षेपांचा विचार करतानाच ग्रंथांचे सामर्थ्य

दाखवून दिले आहे. ग्रंथ व ग्रंथालये यांचे शैक्षणिक महत्त्व विचारात घेण्यासारखे आहे. 'व्यक्तीचा सर्वांगीण विकास' हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट मानले तर या विकासासाठी ग्रंथवाचनाची खूपच मदत होते.

ग्रंथ हे साहित्यरूप असतात. कोणत्याही भाषेचे उच्च रूप म्हणजे तिच्यातील साहित्य; भावनाविकास व कल्पनाविकास यांनी ते नटलेले असते. भोवतालच्या रुक्ष, नीरस व कंटाळवाण्या जगातून वाचकाला दुसऱ्या जगात नेऊन जीवनाचे विविध स्वरूप त्याला दाखविणे, विविध भावनांचा विकास करून अंत:करणाची विशालता वाढविणे व शुद्ध, सात्विक आनंदाचा प्रत्यय घडवून आत्म्याच्या सत्-चित्-आनंदात्मक वृत्तीचे स्फुरण, साक्षात्कार घडविणे हे भाषा-योगाने घडून येणारे अमोल कार्य आहे. या अंगाचा परिचय झाला तर जीवन अपुरेच राहील. ग्रंथ हेच कार्य करतात. म्हणून ग्रंथालयाचे जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

प्रा. स्टॅन्ले निस्बेट यांनी शिक्षणाची काही उद्दिष्टे सांगितली आहेत. ती अशी –

सुधारलेल्या समाजात वावरण्यासाठी उपयुक्त कौशल्यांची प्राप्ती; आपल्या समाजाच्या संस्कृतीशी एकरूपता; कुटुंब हे समाजाचा घटक, या दृष्टीने कौटुंबिक जबाबदाऱ्या पेलता येतील अशा कार्यक्षम घटकांची निर्मिती; समाजोपकारक व व्यक्तिगत जीवनास पोषक व लाभदायक अशा एखाद्या व्यवसायाची तयारी; रिकाम्या वेळेचा सदुपयोग करता येण्याचे सामर्थ्य.

यातील काही उद्दिष्टे पूर्णपणे व काही उद्दिष्टे पर्यायाने ग्रंथालयांद्वारे साध्य करता येतात. उदा. रिकाम्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी ग्रंथवाचन हे एक उत्तम साधन आहे. हे उद्दिष्ट ग्रंथालयांद्वारा पूर्णपणे साध्य होऊ शकते.

ग्रंथालयातील ग्रंथांत विविध ज्ञानभांडार साठविलेले असल्यामुळे अन्य उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी ग्रंथांचा व ग्रंथालयांचा उपयोग होतो. आपल्या समाजाच्या संस्कृतीशी एकरूपता येण्यासाठी वाचनाचा उपयोग होतोच, पण विविध ज्ञानघटकांद्वारा उपयुक्त कौशल्यांची प्राप्ती करून घेण्यासही मदत होते. ग्रंथामधील ज्ञान हे सहज हाताशी असल्यामुळे ते केव्हाही व कोठेही उपलब्ध होऊ शकते. ग्रंथ ज्ञान देण्याबाबत कधीही तक्रार करीत नाहीत. ग्रंथांच्या ज्ञानदानाची वेळ ठरलेली नाही. त्यामुळे व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार, हवे तेव्हा, हवे तसे ज्ञानप्राप्तीसाठी प्रयत्न करण्याचे साधन म्हणजे ग्रंथ. मनाची व्यापकता, विशालता, सहृदयता, वाढविण्याचे सामर्थ्य ग्रंथांमध्ये असते. केळकरांनी या ग्रंथसामर्थ्याचा सर्वांगाने विचार केला आहे. ग्रंथालयांचे व्यापक शैक्षणिक महत्त्व त्यांच्या विचारांद्वारा समजून येते.

### तीन शतकांतील शिक्षण

१९२९ साली केळकरांनी 'तीन शतकांतील शिक्षण' या नावाचा एक लेख पुणे

जिल्ह्यातील तळेगाव ढमढेरे येथील शाळेच्या शतसांवत्सरिक समारंभानिमित्त लिहिला.

या लेखात शिक्षणाचा इतिहास, शिक्षणाचे वर्तमानकालीन स्वरूप (१९२९ मधील) व शिक्षणाचे भवितव्य (२०२९ पर्यंत) याचे थोडक्यात व धावते चित्र केळकरांनी रंगवले आहे.

## इतिहास

१८२६ साली महाराष्ट्रात इंग्रजी अमदानीत नव्या पद्धतीच्या शिक्षणाला प्रारंभ झाला तो सामान्य साक्षरतेच्या शिक्षणापासून. त्यावेळचे वरिष्ठ शिक्षण म्हणजे संस्कृत विद्येतील शास्त्रज्ञान. पण महाराष्ट्रभर सार्वजनिक शिक्षण म्हणून देण्याचे जे योजले ते मराठीतूनच. महाराष्ट्रातील जुन्या शिक्षण पद्धतीत 'तात्यापंतोजी' प्रकारच्या सरकारी आश्रय नसलेल्या शाळा असत. विद्यार्थी सण, सुगी, समारंभ या निमित्ताने गुरूला द्रव्य देत. सरकारी शाळा आल्यावर ही पद्धत बदलली.

नव्या अमदानीत शिक्षणाचे सामान्यत: तीन हेतू होते –

कारभाराच्या उपयोगासाठी शिक्षित कारकून निर्माण करणे; महाराष्ट्रातील जुनी संस्कृती नष्ट होऊन इंग्रजी संस्कृतीने तिची जागा घेणे; स्वराज्य मिळविण्याची बुद्धी उत्पन्न होणे. यापैकी पहिला हेतू सफल झाला. कारभारासाठी अनेक सुशिक्षित लोक तयार झाले. दुसरा हेतू तितका साध्य झाला नाही. कारण जुन्या संस्कृतीचा नाश व नव्या संस्कृतीचा उदय याचा अर्थ धर्मांतर असा होता. हिंदु धर्माचा नाश व ख्रिस्ती धर्माचा प्रसार असे या परिणामाचे स्वरूप होते. पण महाराष्ट्रातील सुशिक्षितांनी वेळीच हे ओळखले होते व ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराला त्यांनी विरोध केला. शिक्षणाचा हेतू सर्वस्वी फसला. तिसरा हेतू मात्र थोडासा साध्य झाला. हा हेतू साध्य होऊ नये असेच इंग्रज राज्यकर्त्यांना वाटत होते. लोक शिकले की ते ज्ञानी होणार. ज्ञान मिळाले की त्यांना पारतंत्र्य म्हणजे काय, स्वातंत्र्य म्हणजे काय हे कळू लागणार आणि त्यांची स्वातंत्र्य मिळविण्याची आकांक्षा वाढणार हे इंग्रज राज्यकर्त्यांना माहीत होते. एल्फिन्स्टन साहेबांना हे चांगले माहित होते. एकदा ब्रिग्ज हे एल्फिन्स्टनच्या भेटीला गेले तेव्हा त्यांच्या भोवती शिक्षणोपयोगी अशा पुस्तकांचा भारा पडला होता. ब्रिग्जने विचारले– "या पुस्तकांचा उपयोग काय?" एल्फिन्स्टनने सांगितले– "लोकांना शिकविण्याकरता ही पुस्तके आहेत. आम्ही या लोकांना हे शिक्षण देत आहोत. पण ते शिक्षण देणे म्हणजे आम्हाला परत विलायतेस चंबूगबाळे घेऊन जाण्याकरता रस्ता बांधण्यासारखेच आहे." संस्कृत विद्येऐवजी इंग्रजी विद्या एतद्देशीय लोकांना शिकवावी हे लॉर्ड मेकॉले याने प्रतिपादिलेले धोरण प्रभावी ठरले. पण त्या शिक्षणाचा परिणामही असाच झाला. मराठीतून बायबल वाचले म्हणून लोक धर्मांतराला प्रवृत्त होत नाहीत हे अनुभवास आले. तसेच इंग्रजी शिक्षणातून

राष्ट्रोद्धारक बुद्धी व राजकीय स्वातंत्र्याची आकांक्षा उत्पन्न होऊन अखेर राष्ट्रीय चळवळीकडे लोकांची प्रवृत्ती झाली. नवीन शिक्षणाच्या या कल्पनेला शंभर वर्षे झाली तर या शिक्षणामुळे परदास्य बुद्धीचीही शंभर वर्षे भरली असे म्हणता येईल.

## भविष्यकाळातील शिक्षण

१८२९ साली तळेगावची राष्ट्रीय शाळा उघडण्यात आली. या शाळेत कै. विष्णु गणेश पिंगळे याच्यासारखा राष्ट्रीय बुद्धीचा क्रांतिकारक निर्माण झाला. शंभर वर्षातील ही प्रगती आहे. १९२९ साली या शाळेचा वाचलेला वृत्तांत ५० पानांचा होता. २०२९ साली तो ५०० पानांचा सहज होऊ शकेल. पुढील शंभर वर्षात स्वराज्य मिळाले तरी विद्यार्थी, त्यांची कर्तबगारी, शिक्षणाधिकारी, या सर्व गोष्टी राहणारच. पण परकी राज्यात असणाऱ्या याच गोष्टी आणि स्वराज्यात होणाऱ्या या गोष्टी यांच्या स्वरूपात खूपच अंतर असणार आहे.

अशा तऱ्हेने केळकरांनी शिक्षणविषयक आशावाद व्यक्त करून लेख संपविला आहे. पुढील शंभर वर्षातील शिक्षणाचे स्वरूप नेमके कसे असेल याचा तपशील त्यांनी दिलेला नसला तरी पारतंत्र्यापेक्षा स्वातंत्र्यातील शिक्षण खूपच वेगळे असेल असे त्यांनी सूचित केले आहे. या लेखात शिक्षणाचा इतिहास आणि भविष्यकाळातील शिक्षण विषयक आशावाद यांचे योग्य दर्शन घडते. या दृष्टीने हा लेख शैक्षणिक महत्त्वाचा आहे.

## सक्तीचे शिक्षण व त्याचा अर्थ

केळकरांनी शिक्षण विषयावर जे अनेक लेख लिहिले त्यात सक्तीचे शिक्षण व त्याचा खर्च यावरील लेखांक विचारात घेण्यासारखे आहेत.

११ व १८ जुलै १९९१ रोजी लिहिलेल्या दोन लेखांकांतून शिक्षणाच्या अर्थव्यवस्थेविषयी केळकरांनी लेखन केले. गोपाळ कृष्ण गोखले यांनी वरिष्ठ कायदे कौन्सिलपुढे सक्तीच्या शिक्षणासंबंधाने बिल आणले होते. या बिलास अनेकांचे अनुकूल अभिप्राय मिळाले.

या बिलाचा मूळ हेतू असा की ज्यांचे शाळेत जाण्याचे वय आहे अशा खेड्यापाड्यातल्या मुलांनी शाळेत जावे, घरी राहून उनाडू नये याविषयी आईबाप व इतर पालनकर्ते यांच्यावर सक्ती करता यावी.

या प्रश्नाचा केळकरांनी सखोल विचार केला आहे. त्यांच्या विचारांचा सारांश असा –

मुले शाळेत न जाण्याची दोन कारणे असू शकतात – मुले स्वतःच उनाड असतात किंवा त्यांच्या पालनकर्त्यांची त्यांना शाळेत पाठविण्याबाबत हयगय हे

एक कारण असू शकते. दुसरे कारण म्हणजे शाळेची फी पालकांना न परवडणारी असते. शेतकरी व कामगारवर्गाच्या मुलांना काहीतरी पोटाला मिळवावेच लागते. काम करून कमाई करणे आणि शिवाय वर शाळेत जाऊन शाळेची फी भरणे हे या वर्गातील लोकांच्या मुलांना जमण्यासारखे नाही. शिक्षणाची सक्ती करणे हे पाप नसून पुण्य आहे असे मानले तरी ज्यांच्यावर सक्ती करावयाची त्यांच्या दारिद्र्याचा प्रश्न विचारात घेणेच आवश्यक आहे. म्हणून शिक्षणाची सक्ती करताना ज्यांची ऐपत नाही अशांच्या मुलांना अगदी मोफत शिक्षण मिळणे आवश्यक आहे. शिक्षणाची सक्ती करताना शिक्षणावरील खर्चही खूपच वाढणार. कारण शिक्षण घेणाऱ्यांची संख्या खूप वाढणार हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा सर्वच खर्च सरकारने सोसावा असे म्हणणे बरोबर नाही. त्याचप्रमाणे सर्व खर्च लोकांचा लोकांनीच सोसावा हे म्हणणे बरोबर नाही. सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था (लोकल बोर्ड) व जनता या तिघांनीही याबाबत आपापला हिस्सा ठरवून घ्यावा. फ्रान्सचे सरकार शिक्षणावर शेकडा सत्तर तर आयर्लंडमध्ये खुद्द ब्रिटीश सरकार शेकडा साडेएक्याण्णव खर्च सोसते; हिंदुस्थान सरकारनेच असा खर्च करण्याबाबत हात आखडता का घ्यावा? सरकारने दोन तृतीयांश एवढा खर्च सोसावा. बाकीचा खर्च लोक सोसतील. हिंदुस्थानचा विस्तार, लोकसंख्या, वार्षिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांच्या रूपाने होणारे उत्पन्न या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर सरकारकडून प्राथमिक शिक्षणावर जेवढा खर्च सालोसाल व्हावा तितका होत नाही. १८८२ सालच्या एज्युकेशन कमिशनपुढे अशी एक योग्य तक्रार माडण्यात आली होती की स्थानिक स्वराज्य संस्था प्राथमिक शिक्षणावर करावा तितका खर्च करीत नाहीत. याबाबतीत केळकरांनी पुणे म्युनिसिपालिटीचेच उदाहरण दिले आहे. पुण्याचा शिक्षण खर्च ज्या प्रमाणात वाढला आहे त्या प्रमाणात सरकारने ग्रँट वाढविली नाही. सर्वत्र आदर्श शाळा हव्या आहेत. नमुनेदार शाळा आवश्यक आहेत असे म्हणत बसले तर प्राथमिक शिक्षण फैलावण्याचे कार्यच होणार नाही.

प्राथमिक शिक्षण फैलावण्याचे दोन मार्ग – खासगी शाळांना मदत देऊन अशा शाळांची संख्या वाढविणे आणि प्राथमिक शिक्षणाचा भार पूर्णपणे सरकारने उचलणे.

केळकरांचे सक्तीच्या शिक्षणाबाबतचे विचार हे असे आहेत. सक्तीच्या व मोफत शिक्षणावरील सर्व आक्षेप केळकरांनी खोडून काढले आहेत. मोफत व सक्तीचे शिक्षण ही सरकारचीच जबाबदारी आहे असे केळकर म्हणतात. शिक्षणाच्या कार्यासाठी कर वाढविणे यात चूक नाही असेही ते सांगतात. शिक्षणासाठी फी देण्याची ज्यांची ऐपत आहे अशा ऐपतदारांकडून फी वसूल करण्यासही त्यांचा विरोध

नाही. सरकार व लोक या दोघांनी एकमेकांवर ही जबाबदारी ढकलूनही भागण्यासारखे नाही.

केळकरांच्या विवेचनातील महत्त्वाचे सूत्र असे की, लोकलबोर्ड किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांनी याबाबत मध्यस्थासारखी दुवा म्हणून कामगिरी केली पाहिजे. सरकार व लोक यांच्यामधील हा महत्त्वाचा दुवा प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने जितका कार्यक्षम होईल तितका प्राथमिक शिक्षणाचा प्रसार अधिक होत जाईल. या दृष्टीने पाहता स्वातंत्र्योत्तर काळात याबाबत खूपच प्रगती झालेली आढळते. त्याचप्रमाणे खासगी शिक्षण संस्थांना मदत करावी अशी जी केळकरांची सूचना होती तिच्या उपयोगितेचे प्रत्यंतर आता येत आहे. महाराष्ट्रात अनेक नामवंत संस्थांनी माध्यमिक शिक्षणाबरोबरच प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रातही चांगले कार्य चालविले आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी या महाराष्ट्रातील जुन्या शिक्षण संस्थांपासून तो स्वातंत्र्योत्तर काळात विशेषत्वाने कार्य करू लागलेल्या रयत शिक्षण संस्था, विवेकानंद शिक्षण संस्था या ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या संस्थांनीही प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात सर्वत्र जाळे पसरले आहे

## शिक्षक व शिक्षकांचे वेतन

प्राचीन शिक्षण पद्धतीत विद्यार्थी प्रत्यक्ष फी देत नसत व आश्रम चालावा अशी व्यवस्था केली जात असे. नव्या शिक्षण पद्धतीत शिक्षकांना वेतन मिळते. शिक्षकाने पगारासाठी काम करू नये ही स्थिती आदर्श असली तरी त्याहून आदर्श स्थिती म्हणजे शिक्षकांना समाधानकारक वेतन मिळाले पाहिजे.

प्राथमिक शिक्षकांचे पगार तर एके काळी खूपच कमी होते. केळकरांच्या काळी ही स्थिती आणखी विचार करण्यासारखी होती. या संदर्भात केळकरांनी २८ सप्टेंबर १९२० रोजी केसरीत एक लेख लिहिला. "गरीब शाळा मास्तरांची कैफियत" या लेखात शिक्षकांची स्थिती, त्यांचे वेतन, त्यांची गुणवत्ता या संदर्भात केळकरांनी मांडलेले विचार असे आहेत –

शिक्षण व ज्ञान यांच्या नद्या पुढे मोठ्या फुगून समुद्राला मिळाल्या तरी मूळ झरे ज्या क्षेत्रात उत्पन्न होतात त्यांची बांधबंदिस्ती व रखवाली करणे आणि त्या झऱ्यांचे पाणी शुद्ध व पवित्र राखणे हे जोखमीचे काम प्राथमिक शिक्षक करीत असतात. शाळा मास्तरांना अन्य खात्यातल्याप्रमाणे वरकमाई कोणतीही होत नाही. त्यामुळे त्यांना पुरेसे पगार मिळण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे. खेडेगावातून शहरगावाप्रमाणे खासगी शिकवण्याही मिळत नाहीत. पूर्वी खेडेगावात बलुतेदारांच्या यादीत शाळा मास्तरांचे नाव घालून त्याला धान्य भाजी पोचवत असत. पण नव्या काळात तेही होत नाही.

शिक्षकांच्या वेतनाच्या स्थितीचा इतिहास सांगताना केळकर लिहितात– १८९० च्या सुमारास शिक्षकांना पाच रुपये पगार होता. १८९२-९३ चे सुमारास सात रुपये करण्याची शिफारस करण्यात आली. १९१२ च्या सुमारास सरसकट पगारवाढ झाली. १९२८ पासून पगार १० पासून ६० पर्यंत (स्केल) करण्यात आला. तेच पगार १९३० पर्यंत कायम होते असे केळकर लिहितात. १९३० मध्ये ३० ते ८० असे पगार स्केल देण्यात आले. अन्य क्षेत्रातील लोकांचे पगार ज्या प्रमाणात वाढले त्या प्रमाणात शिक्षकांचे पगार वाढले नाहीत असे केळकरांनी दाखवून दिले आहे.

शाळा मास्तरांना न्याय देण्याचे काम विद्याधिकाऱ्यांनीच केले पाहिजे. पण ते तसे करीत नाहीत. चाकरी मिळेना तर माग भीक, व कोणी वाढेना तर पंतोजीपणा शीक, या म्हणीचा हवाला देऊन केळकरांनी शिक्षकांच्या हलाखीचे वर्णन केले आहे. धर्मोपदेशक, मिशनरी, भिक्षुक यांप्रमाणे शिक्षकही त्यांच्या धंद्याच्या सालसपणामुळे व निरूपद्रवीपणामुळे विनोदाचा विषय झालेले आहेत. शिक्षकांना केवळ पगार वाढीसाठी संप करावा लागू नये. शिक्षकांनी संप केला तरी सरकारचे प्रत्यक्षात कोणतेच काम अडणार नाही. पण ही गोष्ट योग्य नव्हे.

शिक्षकांच्या आर्थिक प्रश्नांबद्दल इतक्या तळमळीने फारच थोड्या लोकांनी त्यावेळी लिहिले आहे. शिक्षकांबाबत, त्यांच्या गुणवत्तेबाबत, त्यांच्या कर्तव्याबाबत नेहमीच एकांगी अपेक्षा व्यक्त केल्या जातात. शिक्षकाला चांगल्या तऱ्हेने त्याचा चरितार्थ चालविता यावा अशी व्यवस्था समाजानेही केली पाहिजे. समाजाचीच ती जबाबदारी आहे. या मताचा विचार करता केळकरांनी गरीब शिक्षकाची जी कैफियत येथे मांडली आहे ती महत्त्वाची आहे.

महाराष्ट्रात अनेक शिक्षण संस्थांनी आणि शिक्षकांनी कमी वेतनात काम करून शिक्षणाच्या कार्याला वाहून घेण्याचा पायंडा फार पूर्वीपासून पाडला होता. १८८४ च्या टाईम्स ऑफ इंडियाच्या अंकात न्यू इंग्लिश स्कूल या शाळेविषयी लिहिले होते…

"ही शाळा म्हणजे नव्या इंग्रजी शिक्षणाचे फळ आहे. सर्वस्वी एतद्देशीय पदवीधर ही शाळा चालवितात. जेजुइटांप्रमाणे शाळेचे सुपरिंडेंट व इतर शिक्षक आवडीने विद्यादान करतात आणि शाळेच्या एकंदर मिळकतीतून फक्त स्वत:चे भागण्याइतके वेतन घेतात."

असे असले तरी समाजाने अशा शिक्षकांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. केळकरांनी सुरुवातीच्या वाक्यातच म्हटल्याप्रमाणे शिक्षणाचा हा 'मूळ झरा' म्हणजे शिक्षक होत. त्यांची बांधबंदिस्ती करणे, रखवाली करणे हे समाजाचे व सरकारचे कर्तव्य आहे. शिक्षकांनी त्याग करावा हे बरोबर आहे. पण समाजाने त्यांना मुद्दाम

त्याग करायला लावू नये. असे झाले तर गुणवान माणसे या क्षेत्रात येणार नाहीत. आणि मग कुठेच काम मिळत नसणारे पंतोजी होतील, शेवटी यात साऱ्या समाजाचेच अहित आहे. म्हणून शिक्षकांना पगार व वेतन योग्य द्यावे असे केळकर सांगतात.

## टिळक चरित्र आणि विद्यार्थी

१७ ऑगस्ट १९४० रोजी फर्ग्युसन कॉलेजमध्ये टिळक चरित्रासंबंधी केळकरांचे व्याख्यान झाले. ते लेखस्वरूपात त्यांच्या लेख संग्रहात समाविष्ट केले आहे. या व्याख्यानात केळकरांनी टिळक चरित्र आणि विद्यार्थी या विषयावर आपले विचार मांडले. ते असे –

टिळक चरित्रापासून जो बोध घ्यायचा तो केवळ त्यांचे गुणवर्णन करून घेता येणार नाही. विष्णुसहस्त्रनामाप्रमाणे त्यांचे गुण उच्चारले तरी उपयोग नाही. टिळकांच्या अंगी असलेल्या परस्परावलंबी गुणांची साखळी अशी – टिळक सद्‌वर्तनी होते म्हणून त्यांच्या विद्वत्तेचे चीज झाले. ते विद्वान होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला. स्वार्थत्यागी होते म्हणून त्यांच्या देशभक्तीचे चीज झाले. देशभक्त होते म्हणून त्यांच्या उद्योगाचे चीज झाले. उद्योगी होते म्हणून पराक्रमाचे चीज झाले. पराक्रमामुळे धैर्याचे चीज झाले. टिळक धैर्यवान होते म्हणून लोकांना उपदेश करण्याची पात्रता त्यांना आली.

टिळक विद्वान होतेच पण सद्‌वर्तनी असल्यामुळे न्यू इंग्लिश स्कूल काढले तेव्हा त्यांच्या लायकीविषयी कोणाला शंका आली नाही. अशातऱ्हेने टिळकांच्या एका गुणातून दुसरा गुण प्रवर्तित होतो. या गुणांची एक साखळी तयार होते. या सर्व गुणांमध्ये टिळकांच्या अंगचे प्रमुख गुण म्हणजे –नि:स्वार्थीपणा, पराक्रम, धैर्य व उद्योगीपणा.

वरील गुणांव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना टिळकांचे घेण्यासारखे गुण – विद्यार्थी दशेत टिळक हे पुढे पुढे येणारे किंवा काहीतरी उद्योग बगलेत मारणारे विद्यार्थी नव्हते. याशिवाय विद्यार्थी दशेत त्यांची देशभक्ती वाखाणण्यासारखी होती. याशिवाय त्यांचा घेण्यासारखा एक गुण म्हणजे आत्मविश्वास; महत्त्वाकांक्षा हा आणखी एक विद्यार्थ्यांना घेण्यासारखा गुण. याठिकाणी केळकरांनी लॉंगफेलो या कवीची 'रूथ' ही कविता उदाहरणादाखल दिली आहे. अडचणींचे डोंगर ओलांडून आत्मविश्वासाने महत्वाकांक्षा पूर्ण करते ते तारूण्य !

टिळकांची तरूण मुलांवर भक्ती होती. कारण त्यांच्यातूनच कर्ती माणसे निघण्याची आशा होती. कोणाही तरूण माणसाकडे टिळक अशा नजरेने बघत की त्याचा राष्ट्राकार्याला कसा उपयोग होईल. टिळक चरित्राच्या आधारे विद्यार्थ्यांनी घ्यावयाचा संकलित बोध असा की उत्तम तऱ्हेची विद्या संपादन करणे, ती सामग्री बरोबर घेऊन देशकार्य करणे, निश्चित ध्येय डोळ्यासमोर ठेवणे आणि राजकारण

केले नाही तरी राजकारणाचा अभ्यास करणे या गोष्टी विद्यार्थ्यांनी कराव्यात. शिक्षणाची अनेक उद्दिष्टे व ध्येये निरनिराळ्या शिक्षण-शास्त्रज्ञांनी सांगितली आहेत. व्यक्तिविकास, सामाजिकता, राष्ट्रीय दृष्टी, निरनिराळ्या कौशल्यांचे संपादन ही शिक्षणाची उद्दिष्टे मानली गेली आहेत. "विद्यार्थ्यांच्या समग्र विकासाची सामुग्री शिक्षणापासून विद्यार्थ्याला उपलब्ध व्हावी." असे विनोबा भावे म्हणतात. टिळक चरित्रापासून विद्यार्थ्यांना जो बोध घ्यावयाचा त्यातून याच गोष्टी सूचित केल्या गेल्या आहेत. लॉंगफेलो यांची कविता उद्धृत करून केळकरांनी तरूण मनाच्या आशाआकांक्षा काय असाव्यात, तरूण मनाची उभारी कशी असावी याचे काव्यात्मक उदाहरण तरूण विद्यार्थ्यांसमोर ठेवले. विद्यार्थ्यांनी अंगी धडाडी व जोम बाणवणे आवश्यक आहे हे टिळकांच्या उदाहरणावरून केळकरांनी सांगितले.

महत्त्वाकांक्षा असणे आवश्यक हे सांगताना महत्त्वाकांक्षा सफल होतेच असे नाही याबाबतची उदाहरणे केळकर देतात. उदा. –

अरविंद घोष यांना घोड्यावर बसता आले नाही एवढ्या एकाच कारणामुळे ते सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा नापास झाले, पण पुढे सर्व आयुष्याची दिशा बदलली. गोखले हेही इंजिनियरिंगची परीक्षा उत्तीर्ण झाले असते तर बडे ऑफिसर झाले असते. ही अपयशे या लोकांनी पचवली. पण त्यांच्या डोळ्यासमोर निश्चित असे ध्येय होते. त्यांची चिकाटी मोठी होती. ते दिशाहीन नव्हते. त्यामुळे एखाद्या क्षेत्रात अपयश आले तरी खचून न जाता त्यांनी मार्ग काढला. तरूण विद्यार्थ्यांकडून केळकरांची हीच अपेक्षा होती. म्हणून टिळक चरित्राचा आधार घेऊन त्यांनी विद्यार्थ्यांना दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

टिळक चरित्रात टिळकांच्या अंगच्या गुणांची जी परस्परावलंबी मालिका केळकरांनी दाखविली ती तर शिक्षण-विचाराच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. पराक्रम, विद्वत्ता आणि सद्वर्तन यांचा संयोग पुढील कार्याच्या दृष्टीने आवश्यक आहे हे केळकरांनी दाखवून दिले आहे. हे गुण वेगवेगळे नाहीत. ते परस्पर पोषक, परस्पर पूरक आहेत. मूल्यवर्धन-विचारांच्या दृष्टीने यांचा अभ्यास आवश्यक आहे.

### हातकामाचे शिक्षण

'लोकशिक्षण' मध्ये केळकरांनी १९१५ मध्ये 'हातकामाचे शिक्षण' हा लेख लिहिला. आधुनिक शिक्षण पद्धतीत 'हस्तकला' हा शब्द यासाठी वापरला जातो. शिक्षण प्रक्रियेत बौद्धिक वा पुस्तकी शिक्षणाबरोबरच हस्तकला शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले जाते.

विनोबा भावे प्रणित- 'नई तालीम' शिक्षण प्रयोगात असे मानले जाते की ज्ञान आणि कर्म ही एकाच वस्तूची दोन स्वरूपे आहेत. "ज्ञान आणि कर्म यांचा योग पाहिजे म्हणून तकली चालवतात व त्याचबरोबर तकलीची गाणी गातात."

शिवाय विविध कला व कौशल्ये आत्मसात करण्याच्या दृष्टीने हस्तकला शिक्षण महत्त्वाचे आहे. याबाबत केळकरांनी मांडलेली मते सारांशरूपाने अशी –

हायस्कूलच्या शिक्षणाचा हेतू निरनिराळ्या विषयाच्या मूलतत्वाची व त्याच्या सामान्य स्वरूपाची नुसती ओळख करून देण्याचा असतो. ड्रॉईंग शिकल्याने एखाद्या वस्तूचे प्रत्यक्ष पाहून किंवा स्मरणाने रेखाचित्र काढता येते. पण वस्तूचे असे चित्र रेखाटता येणे व ती वस्तूच हाताने बनविता येणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. म्हणून शिक्षणक्रमात ज्या कारणाकरिता ड्रॉईंगचा समावेश करण्यात येतो त्याच कारणाकरिता हातकामाच्या शिक्षणाचाही समावेश करणे योग्य होईल.

शिक्षण म्हणजे मनुष्याच्या अंगी असलेल्या गुणांचा व शक्तीचा विकास होण्यास लागणारी पूर्वतयारी. असे असेल तर ज्या शिक्षणक्रमात हाताकडून शिक्षणात्मक असे काहीच काम करवून घेतले जात नाही तो सदोष ठरलाच पाहिजे. हातकाम म्हणजे जीवनोपयोगी कलासंबंधी काम. पंचेंद्रियांनी ज्ञान मिळवणे ही जशी एक शक्ती आहे त्याचप्रमाणे मिळालेले ज्ञान व्यक्त करणे ही ही एक शक्ती आहे. शब्द व लेख यांनी न समजणारी गोष्ट रेखाचित्राने अधिक समजते आणि चित्रानेही जी गोष्ट समजत नाही ती वस्तूच्या मूर्तस्वरूप नमुन्यामुळे पटते. म्हणूनच वस्तूचे ज्ञान, म्हणजे त्या वस्तूची मनातील कल्पना व्यक्त करण्याची शक्ती वाढविण्याच्या हेतूने सर्वसाधारण शिक्षणाच्या शाळांतून हातकामाचे शिक्षण देणे आवश्यक आहे. जीभ ही अर्थ व्यक्त करण्याचे एक साधन म्हणून मानली जाते. तसाच हात का मानला जाऊ नये? शिक्षणाचा खरा, शास्त्रोक्त, उपपत्तीसिद्ध मार्ग म्हणजे मनाची प्रत्यक्ष वस्तूशी गाठ घालून देणे. पण केवळ गूढ विषय अधिक सुलभ रीतीने शिकण्याकरताच विद्यार्थ्यांकडून हाताचा उपयोग करविला पाहिजे असे नाही तर शक्य तेथे जीवनोपयोगी कलांचे ज्ञान मुलांस त्यांच्या अल्प वयात मिळणे इष्ट आहे. म्हणून शास्त्रीय व तात्विक शिक्षणाच्या जोडीला कलांच्या शिक्षणाचा समावेश शिक्षणक्रमात झाला तर ते शिक्षण अविकलांग, सर्वांगसुंदर, व यशस्वी होईल. हस्तक्रियेची जोड मिळाल्याशिवाय रानटी वनचर यांची व आर्किमिडीजसारखे तात्विक शास्त्रज्ञ यांची योग्यता सारखीच भासेल.

जगातील सुधारणेचा इतिहास हा निव्वळ तात्विक ज्ञानाचा इतिहास नसून सक्रिय ज्ञानाचा आहे किंवा कलाकौशल्याच्या व कारागिरीच्या हत्यारांचा इतिहास आहे. पण हातकामाच्या शिक्षणाची उणीव हिंदुस्थानातच नव्हे तर सुधारलेल्या पाश्चात्य देशांतही होती. किंबहुना १८८० पावेतो हातकामाचे शिक्षण सर्वसाधारण शिक्षणाच्या शाळांतून द्यावे ही गोष्ट तिकडील शिक्षणशास्त्रप्रवीणांसही सुचली नव्हती. १८६८ साली रशियात व १८७६ साली अमेरिकेत हातकामाच्या शिक्षणाच्या प्रयोगाला सुरुवात झाली. इंग्लंडमध्ये १८९९ मध्ये टेक्निकल इन्स्ट्रक्शन ॲक्ट झाला आणि

पुढील अवघ्या ६ वर्षात या शाळांची संख्या हजार बाराशे पर्यंत गेली. हातकामाचे शिक्षण देण्याबाबत अशी शंका येईल की आधीच अभ्यासाचा इतका बोजा असताना आणखी भर टाकणे योग्य होईल का? काहींच्या मते यासाठी खर्च केलेला वेळ हा व्यर्थ आहे. पण अशा लोकांना शिक्षणाची खरी उपपत्ती माहीत नसल्याने असे घडते.

काही लोकांना असे वाटते की शालेय आयुष्यात केवळ मूलतत्वे शिकवून विद्यार्थ्यांना व्यवसायात कौशल्य कसे प्राप्त करून घेता येईल ? अर्थशास्त्राची मूलतत्वे शिकवून एखाद्याने बँक काढली पाहिजे असे नाही. श्रमविभागाचे ढोबळ तत्त्व मान्य केले तरी प्रत्येकास प्रत्येक उपयुक्त गोष्टीचे थोडेफार ज्ञान असले तर स्वावलंबन वाढते. हातकामाचे शिक्षण मुलांना दिले असता श्रमाचे किंवा हलके सलके काम हातानी करण्यात काही कमीपणा आहे ही समजूत नाहीशी होईल. आधुनिक शिक्षणात श्रमप्रतिष्ठेला महत्त्व आहे. हीच गोष्ट केळकरांनी या मुद्याच्या अनुरोधाने सांगितली आहे.

हातकामाच्या शिक्षणामुळे गुलामगिरी व ईश्वरनिर्मित श्रमविभागाच्या कल्पनेने कोणी कोणते काम करावे याविषयी पडलेली कृत्रिम बंधने नाहीशी होतील व हुन्नर, कला, श्रमप्रतिष्ठा वाढीस लागेल.

हस्तकला शिक्षणाच्या संदर्भात केळकरांनी व्यक्त केलेले विचार अनेक पाश्चात्य व एतद्देशीय विचारवंतांनी व्यक्त केलेल्या विचारांशी जुळणारे आहेत.

फ्रोबेल या पाश्चात्य शिक्षणतज्ञाने विद्यार्थ्यांच्या आंतरिक स्वयंकृतीला प्रेरणा मिळण्यासाठी काही व्यवसाय सुचविले आहेत. या व्यवसायांतून ज्ञानेंद्रियांचा विकास होऊ शकेल अशी त्याची खात्री आहे.

या व्यवसायांच्या द्वारा वस्तूंचा आकार, रचना, पृष्ठभाग, संख्या, अभिरूची यांचा विकास होऊ शकेल. यांच्या मदतीने भूमिती, बीजगणित, चित्रकला यांचे अध्ययन सुकर होऊ शकेल. या व्यवसायासाठी त्याने काही साहित्य सुचविले आहे. त्यात कागद, माती, लाकूड, पुठ्ठा इ. वस्तूंचा समावेश आहे.. फ्रोबेलने जी तत्त्वे सांगितली तीच काही अंशी केळकरांनी सांगितलेली दिसतात. महात्मा गांधी, विनोबा भावे या विचारवंतांचाही हातांनी काम करण्यावर भर होता. गांधीजींच्या मते– "हस्तव्यवसायाचे शिक्षण द्यावयाचे ते केवळ उत्पादन कार्यासाठी नसून बालकांच्या बौद्धिक विकासासाठीही असले पाहिजे."

हातांनी काम करणे याचा अर्थ फक्त उत्पादन करणे असा नसून उत्पादनाबरोबर बालकाचा, काम करणाऱ्याचा, बौद्धिक विकास होत असतो. काम करता करता सर्व ज्ञानेंद्रिये ताजीतवानी होतात. त्यांचा समवाय होतो आणि काम करणाऱ्याला खऱ्याखुऱ्या निर्मितीचा आनंद मिळत असतो. गांधी प्रणित व विनोबा पुरस्कृत वर्धा शिक्षण योजनेत हस्तकला विषयाला अधिक प्राधान्य आहे. केळकरांनी यासाठी वापरलेला शब्द... हातकाम - अधिक अन्वर्थक वाटतो. या शब्दात हातांनी प्रत्यक्ष

काम करणे अभिप्रेत आहे. हातकाम शिक्षणामुळे ज्या ज्या गोष्टी साध्य होतील असे केळकरांना वाटते त्या गोष्टी म्हणजे उत्पादन, व्यावसायिक कौशल्य, निर्मितीचा आनंद, बौद्धिक विकास. या सर्वच गोष्टी व्यक्तीचा व समाजाचा विकास होण्यास आवश्यक असल्याने हातकाम शिक्षणाचा अंतर्भाव शिक्षणपद्धतीत असलाच पाहिजे असा केळकरांचा आग्रह आहे.

## शेती-शिक्षण

हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश आहे. अर्थातच या व्यवसायाबाबत अधिकाधिक विचार होऊन तीत सुधारणा होणे क्रमप्राप्त आहे. ४ ऑक्टोबर १९१० रोजी केळकरांनी 'शेतकी शिक्षण व सुधारणा' या नावाचा एक लेख लिहून आपले काही विचार प्रकट केले. पुण्याच्या शेतकी कॉलेजसंबंधीही एक लेख लिहिला. या लेखांचा सारांश असा –

शेतकी शिक्षण व शेतकी सुधारणा याकडे सरकारचे लक्ष लागले असले तरी त्या विषयाच्या महत्त्वाच्या मानाने लक्ष कमीच आहे. शेतसाऱ्याचे सहा कोट रूपये उत्पन्न लक्षात घेता शेतीसंबंधाने व शेतीशिक्षणासंबंधी होणारा खर्च शेकडा एक रुपयासुद्धा होत नाही. हा खर्च अधिक वाढला पाहिजे. शेतीकडे सरकारचे लक्ष आहे हे दिसते. शेतकीचे पद्धतशीर शिक्षण देण्यास सुरुवात झाली आहे. पुसा शेतकी संस्थांसारख्या निव्वळ शास्त्रीय संस्था शोधाकरिता स्थापन करण्यात आल्या आहेत. शेतीची उपकरणे, बी बियाणे यासंबंधी प्रदर्शने भरविण्यात येतात यावरून शेतीकडे सरकारचे लक्ष आहे हे दिसते.

शेतीला भौतिक शास्त्राची जोड मिळणे आवश्यक आहे. शेतीची सुधारणा व शेतीचे शिक्षण यासंबंधाने बरेच काही केले पाहिजे व ते स्वतंत्रपणे केले पाहिजे. शेतीशिक्षणाच्या शाखेचा जन्म इतक्या उशीरा व्हावा हे हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीचे निदर्शक आहे. सरकारी शेतकी खात्यावर मुख्य अधिकारी नेमावयाचा तो शक्यतो शेती शिक्षण झालेलाच असावा. धान्याचा तुटवडा हे प्रजेच्या दारिद्र्याचे लक्षण नाही. केवळ नियोजनाचा अभाव आणि योग्य अंमलबजावणी नसणे यामुळे हे घडते. शेती शिक्षण घेणाऱ्या लोकांची संख्या कमी व त्या मानाने त्या शिक्षणावर होणारा खर्च जास्त, हे प्रमाण आता बदलले पाहिजे.

तत्कालीन सरकारने शेतीविषयक व शेती शिक्षण विषयक धोरण समाधानकारक ठेवल्यामुळे केळकरांनी सरकारचे अभिनंदन करण्यासाठी हा लेख लिहिला आहे. शिक्षण घेण्याबाबत व शास्त्रशुद्धरीत्या शेती करण्याबाबत लोकांमध्ये जेवढे प्रेम दिसून येणे आवश्यक आहे तेवढे दिसत नसल्याबद्दल केळकर खंत व्यक्त करतात. या ठिकाणी केळकरांनी एक महत्त्वाची सूचना केली आहे की शेतीला कारागिरीची जोड हवी. ही जोड असल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राचा निभाव लागत नाही.

हिंदुस्थानात कारागिरीची वाढ झाल्याशिवाय निव्वळ शेतीवर भिस्त टाकून राहणे धोक्याचे आहे.

केळकरांनी हा जो इशारा दिला होता तो महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने युक्तच होता. स्वातंत्र्योत्तर काळात कृषी उत्पन्नावर आधारित असे व्यवसाय सहकारी क्षेत्रात निघाले.

शेती शिक्षणाबाबत एकंदर शिक्षणविचारातच तुलनेने औदासिन्य दिसून येते. पण भारतीय समाज जीवनाच्या दृष्टीने पाहिले तर याच विचाराला प्राधान्य देणे आवश्यक आहे. प्राचीन काळापासून आपली संस्कृती ही शेतीनिष्ठ संस्कृती आहे असे म्हणावे लागेल. 'कृष्ण' हे भारतीयांचे दैवत. "भगवान कृष्णाचा वर्ण शाम होता. कृष्ण म्हणजे शेतात काम करणारा; शेती करण्याने त्याचा वर्ण शाम झाला आहे." असे विनोबा भावे म्हणतात.

शेती म्हणजे उद्योग, उद्योग म्हणजे उत्पादन, उत्पादन म्हणजे आर्थिक प्रगती, आर्थिक प्रगती म्हणजे विकास अशी ही साखळी आहे. म्हणून शेतीचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेले जितके लोक या देशात वाढतील तितका आपला विकास अधिक होईल हेच केळकरांना या लेखाद्वारा सूचित करावयाचे आहे. शेती शिक्षणाचा विचार हा शिक्षण विचाराचा एक महत्त्वाचा घटक ठरतो तो त्यामुळेच!

### शास्त्रीय शिक्षण

जगात घडून आलेल्या औद्योगिक परिवर्तनानंतर ते ज्यावर आधारित असते त्या शास्त्र शिक्षणाला चांगले दिवस आले आणि शास्त्र शिक्षणाचा अंतर्भाव अन्य मानव्य विद्यांच्या बरोबरीने किंबहुना अधिक महत्त्व देऊन शिक्षणात केला गेला.

११ एप्रिल १९१४ रोजी केळकरांनी केसरीत "शास्त्रीय शिक्षणाचा उत्कर्ष" या नावाचा एक लेख लिहून हिंदुस्थानात लॉर्ड रे व सर जॉर्ज क्लार्क यांच्यामुळे जे शास्त्रीय शिक्षणाबाबत आशादायक परिवर्तन घडून येत होते त्याची चर्चा केली.

विश्वविद्यालयात नव्या सेनेटच्या द्वारे गव्हर्नर साहेबांनी वरिष्ठ शिक्षणक्रम दुरुस्त केला आणि पुस्तकी विद्येच्या मानाने मागासलेल्या शिक्षणावर असला तरी हिंदुस्थानात धंदे शिक्षणाचा पाया त्यांनीच घातला. सर जॉर्ज क्लार्क हे हुशार इंजिनियर व शास्त्रज्ञ होते. ते स्वत: प्रोफेसर होते. विलायतेत झालेल्या शिक्षणक्रमविषयक सुधारणा त्यांच्या डोळ्यापुढे होत्या. त्यांनी इकडे येतानाच हिंदुस्थानात कोणकोणत्या शिक्षणविषयक सुधारणा करावयाच्या ते ठरविले होते.

पाश्चात्य देशातील आधुनिक पद्धतीप्रमाणे इकडेही शास्त्रीय शिक्षण फैलावणे जरूर आहे असे क्लार्क यांना वाटले व त्यांनी त्याबाबत थोडेफार प्रयत्न केले. शास्त्रशिक्षणाचे फायदे अनेक असताना या शिक्षणाची बाजू मागासलेपणाची का राहावी ? याबाबत केळकर खालील कारणे देतात.

हिंदुस्थानात भौतिक शास्त्रांकडे पूर्वीपासूनच लक्ष कमी होते. पौर्वात्यांची दृष्टी अध्यात्मविद्येकडे तुलनेने अधिक आहे. शिवाय शास्त्रीय शिक्षण पाठशाळांतून देण्याची परंपरा नाही. पूर्वी धंदेशिक्षण वा कलाशिक्षण आनुवंशिक पद्धतीने किंवा हल्लीच्या अप्रेंटिस पद्धतीने मिळत असे. प्रत्यक्ष शास्त्रशिक्षण शाळेत नव्हते. नव्या काळात वर्णाश्रमधर्म व्यवस्थेची घडी गेली आणि व्यावहारिक शिक्षणाची पाश्चात्य पद्धती स्वीकारावीच लागली. केळकर शास्त्रीय शिक्षणविषयक खोलवर विचार मांडत नसले तरी क्लार्क यांचे अभिनंदन करण्याच्या निमित्ताने शास्त्रीय शिक्षणाची आवश्यकता व नव्या काळातील उपयुक्तता यासंबंधी त्यांनी थोडक्यात दिग्दर्शन केले आहे.

### संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन

केळकरांच्या शिक्षण विषयक लेखांमध्ये सर्वात प्रदीर्घ असलेला हा लेख आहे. संस्कृत विद्या म्हणजे संस्कृत भाषेची विद्या एवढाच संकुचित अर्थ केळकरांना अभिप्रेत नाही. संस्कृत विद्या म्हणजे आर्य संस्कृती असा व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. या प्रदीर्घ लेखात, भारतात इंग्रजांच्या राजकीय आक्रमणानंतर आपोआपच शैक्षणिक व सांस्कृतिक आक्रमण झाले. त्या आक्रमणाचा आढावा आहे. सर्वत्र या लेखात संस्कृत भाषेचा विचार केला आहेच. नाही असे नाही, पण एकंदर जे शैक्षणिक परिवर्तन घडले त्याकडेच केळकरांचे लक्ष विशेषत्वाने केंद्रित झाले आहे.

### लॉर्ड मेकॉले यांचे कार्य

इंग्रजांच्या भारतातील आगमनानंतर भारतात कशा प्रकारची शिक्षण पद्धती रूळवावी याबाबत खूप खल झाला. आर्य संस्कृतीसंबंधी इंग्रजांना फारसा आदर नव्हताच. त्याकाळच्या इंग्रज पंडितांची अशी समजूत होती की संस्कृतात व्यवहारोपयोगी ज्ञान नाही. शास्त्रीय ज्ञान नाही. ब्रिटिश राज्य सुरू होण्यापूर्वी संस्कृत हीच विद्या निर्विवादपणे सिंहासनारूढ होती. पण या समजुतीमुळे आणि १८३५ साली मेकॉले यांच्या मिनिटांमुळे संस्कृतचे स्थान आंग्लविद्येला मिळाले. विद्यमान पौर्वात्य शिक्षण संस्थांचे स्वरूप कायम ठेवावे असे ठरले असले तरी इंग्रजी शिक्षणाला प्राधान्य मिळेल अशा तऱ्हेने मेकॉले यांनी शिक्षणाची रचना करण्याची शिफारस केली.

मेकॉले यांनी आपल्या मिनिटांत संस्कृत भाषेतील ग्रंथ, इंग्रजी भाषेतील ग्रंथ यांचे विवेचन करून इंग्रजी भाषा व साहित्य यांचे महत्त्व अधिक आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला. मेकॉलेच नव्हे तर राजा राममोहनरॉय यांच्यासारख्या आर्यविद्येच्या अभिमान्यालाही इंग्रजी भाषेच्या द्वारेच युरोपिअन विद्या घेतली पाहिजे असे वाटत होते.

## आर्य विद्येला चांगले दिवस

काही काळ निराशेचे वातावरण गेले तरी मनु पालटला आणि आर्य विद्येला उत्तेजन मिळू लागले. मद्रास व लाहोर विद्यापीठात आर्य विद्येची शाखा निघाली. सिमला येथे आर्य विद्येच्या सरकारी व खाजगी पुरस्कर्त्यांची एक सभा घेण्यात आली. पौर्वात्य भाषा - संस्कृत, फारसी, आरबी या समृद्ध असून त्यातून मिळणारे शिक्षण हेही उपयुक्त आहे. या भाषांना उत्तेजन द्यावे असा सूर या सिमला सभेत निघाला. ही गोष्ट आर्य विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या दृष्टीने चांगली होती. पण खरा प्रश्न होता तो हे पुनरूज्जीवन कसे घडवावे याबाबत. सिमला सभेत अशा सूचना देण्यात आल्या की नव्या पाठशाळा काढणे, जुन्या पाठशाळांना मदत करणे, विद्यापीठे व शाळा यांतील शिक्षणक्रमात संस्कृतला महत्त्व देणे, आर्यविद्याविषयक संस्था (संग्रहालये, ग्रंथालये) उर्जितावस्थेत आणणे, संशोधनासाठी फेलोशिप व शिष्यवृत्त्या देणे, या गोष्टी अवश्य कराव्यात.'

## जुने व नवे पंडित

सिमला परिषदेच्या अहवालावरून असे दिसून येते की आमच्या समाजातील विद्वानांना नव्या पाश्चात्य पंडितगिरीचे वळण लागले असले तरी त्यांनाही जुन्या पंडितांची किंमत चांगली कळली आहे.

एकांगी शिक्षणापेक्षा अनेकांगी शिक्षण चांगले हे खरेच. पण एकांगी शिक्षणही काही फायदा देते. जुन्या शिक्षण पद्धतीतील एकाग्रता, त्या पाठोपाठ येणारी सखोलता, या गोष्टी घेण्यासारख्या आहेत. नव्या अनेकांगी शिक्षण पद्धतीत या गोष्टी फारशा दिसतच नाहीत.

नव्या शिक्षण पद्धतीत पाठांतराला महत्त्व नाही. त्यामुळे स्मरणशक्ती कमकुवत राहते. जुन्या पंडितांचा स्मरणशक्तीचा भाता अक्षय भरलेला असे. नव्या पंडितांचे पुस्तकाशिवाय पान हलणार नाही.

जुन्या काळीही एकांगी व अनेकांगी शिक्षण झालेले पंडित नसत असे नाही. अनेकांगी शिक्षणामुळे मुख्य तोटा म्हणजे ज्ञानाचा उथळपणा. म्हणून लोकांना एकांगी शिक्षण हवे असे वाटू लागले.

## जुन्या व नव्या पद्धतीचे साहचर्य

जुन्या व नव्या, एकांगी व अनेकांगी शिक्षण पद्धतीचा मिलाफ करता येईल किंवा नाही हा खरा प्रश्न आहे. गुण व अवगुण दोन्ही पद्धतीमध्ये आहेतच. जुनी शिक्षण पद्धती म्हणजे स्मरणशक्तीची मेहनत व करामत, शब्द प्रामाण्यावर जास्त भिस्त आणि गहनावगाहनशीलता. नव्या शिक्षण पद्धतीत चौकसपणा अधिक, आत्मप्रत्यय व विचारस्वातंत्र्य यावर भर जास्त, बुद्धीचा व्यापकपणा व विस्तार

हे वैशिष्ट्य आहे. या दोन्ही शिक्षण पद्धती अस्तित्वात ठेवणे व दोन्ही पद्धतींनी शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्याला देणे हेच आजच्या परिस्थितीत योग्य आहे असे केळकर म्हणतात. दोन्ही पद्धतींचा ओढून ताणून संकर केला तर त्यापासून फलनिष्पत्ती काहीच होणार नाही. व्हायचाच असेल तर तो स्वाभाविक संकर व्हावा.

जुन्या व नव्या पद्धतींचे साहचर्य आधुनिक काळातही असावे असे सांगून केळकरांनी संस्कृत विद्येसंबंधी प्राचीन काळातील स्थितीचे विवेचन केले आहे. उत्तरेतील पंडित, दक्षिणेतील पंडित, आणि महाराष्ट्रातील काही पंडित घराणी यांचा इतिहास कथन करून केळकरांनी संस्कृत विद्या व राजाश्रय यासंबंधी विवेचन केले आहे. केळकरांच्या एकंदर विचारांचा निष्कर्ष असा की संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन केल्याने जुन्या विद्येचे जतन तर होईलच पण त्या योगाने मराठी भाषेची वाढ व उन्नती होण्यास मदत होईल.

केळकरांच्या या विचारांचे शैक्षणिक दृष्ट्या महत्त्व मोठेच आहे. शिक्षण प्रक्रियेत माध्यम म्हणून मराठी भाषेला महाराष्ट्रात तरी अनन्य साधारण महत्त्व आहे. ही माध्यमभाषा पक्की व्हावी, उन्नत व्हावी, तिचा विकास व्हावा हा हेतू संस्कृतच्या पुनरूज्जीवनाने साधणार आहे. त्याचप्रमाणे पारंपारिक शिक्षण पद्धतीतील काही गुण (पाठांतर, स्मरण) आत्मसात करता येणे शक्य आहे.

### शिक्षण आणि शील

शिक्षणाच्या निरनिराळ्या उद्दिष्टांपैकी चारित्र्यनिर्मिती हे महत्त्वाचे उद्दिष्ट नेहमीच मानले जाते. चारित्र्याचा शीलाशी संबंध जवळचा. विवेकानंदांनी शिक्षण म्हणजेच चारित्र्यनिर्मिती असे सांगितले.

१९१० मध्ये मुंबईत भरलेल्या शिक्षकांच्या एका परिषदेत 'नीती' या विषयावर प्रबंध वाचण्यात आले. या प्रसंगास अनुलक्षून केळकरांनी वरील लेख लिहिला. याबाबत केळकरांचे विचार असे –

शील बनविण्याच्या दृष्टीने धार्मिक शिक्षणाचा विचार आवश्यक आहे. धर्मशिक्षण व नीतीशिक्षण यामध्ये विरोध नाही. अलौकिक माणसांना धर्माव्यतिरिक्त नीतितत्त्वे मानवतील. पण सामान्य माणसांना धर्माच्या अंगानेच नीतीचे शिक्षण दिले पाहिजे. नीतीस विशिष्ट धर्मविचाराचे अनुपान आवश्यक आहे. धर्मशिक्षण द्यायचे तर ते कसे द्यावे असा प्रश्न उपस्थित होतो. धर्मशिक्षण देताना मुख्य धर्म व धर्मातील पंथोपपंथाचे शिक्षण द्यावे. ज्ञानाला धर्मशिक्षणाची जोड हवी, तरूण विद्यार्थ्यांच्या मनाला समतोलपणा यावा. शाळा व कॉलेजातून ही व्यवस्था करणे अवघड वाटल्यास पुण्यासारख्या शहरात एखादे स्वतंत्र धर्मपीठ स्थापन करावे. इतिहासशिक्षणाने समता व दूरदृष्टी येईल, अर्थशास्त्रशिक्षणाने धनोत्पादकता व व्यावहारिक शहाणपण येईल, धर्मशिक्षण दिल्याने परमार्थाची चाड उत्पन्न होईल.

अशा तऱ्हेने परमार्थ बुद्धीची वाढ झाल्याने शीलसंवर्धन व चारित्र्यविकास होईल. केळकरांचे हे विचार प्राचीन भारतातील शिक्षण विचारांशी मिळते-जुळते आहेत.

भारतीय संस्कृतीत तत्त्वज्ञान व धर्म यात अभेद होता. तसेच धर्म व शिक्षण यातही प्राचीन काळात द्वैत नव्हते. धर्म व शिक्षण हे दोन्हीही उपासनेचे व साधनेचे मार्ग समजले जात. धर्म व शिक्षण दोन्हीही क्रियाशील जीवनाची अंगे होती. शिक्षक व शिक्षणशास्त्रज्ञ म्हणजेच गुरू वा तत्त्वज्ञ असे त्या काळी समीकरण होते.

केळकरांचे धर्मशिक्षणविषयक विचार नव्या काळाला अनुसरून असले तरी या प्राचीन परंपरेचा धागा त्यांच्या विचारांत दिसून येतो. धर्मशिक्षणाने मन उन्नत व विशाल होते म्हणजेच परमार्थाची चाड उत्पन्न होणे होय.

## मागासवर्गीयांचे शिक्षण

मागासवर्गीयांची उन्नती आणि त्यांचे शिक्षण हा आधुनिक काळातील ज्वलंत प्रश्न आहे. या प्रश्नासंबंधी 'हीनजाती व शिक्षण' असा एक लेख १९१० सालीच केसरीत केळकरांनी लिहिला. या लेखात त्यांनी मांडलेल्या विचारांचा सारांश असा –

अस्पृश्य मानलेल्या जातीस स्पृश करण्यात त्या दोहोंमधील व्यवहार वाढला पाहिजे. परस्परांमधील आकर्षणशक्ती वाढली पाहिजे. सौंदर्य, स्वच्छता, बुद्धिमत्ता, सत्ता, संपत्ती, सच्छील, धार्मिकता, मान्यता व व्यावहारिक उपयुक्तता ही या आकर्षण कारणांची उपलक्षणात्मक उदाहरणे म्हणून देता येतील. राजसत्तेच्या अंगी स्पृश्यास्पृश्यभेद समूळ नष्ट करण्याचे नसले तरी शिथिल करण्याचे सामर्थ्य असते. सुशिक्षणाच्या प्रभावाने उच्चनीच व लहानथोर हे सर्व कृत्रिम भेद लोपून जातात. सुशिक्षित सहसा अस्वच्छ नसतो, त्याच्या ठायी बुद्धीचे तेज असते. त्याची उपयुक्तता वाढलेली असते. स्पृश्यास्पृश्य भेद नाहीसा करावयाचा असेल तर अंत्यज जातींचे सुशिक्षण वाढविणे हाच उपाय आहे. अस्पृश्यता जाऊन स्पृश्यता येण्यासच नव्हे तर अस्पृश्यांची सामाजिक व सांपत्तिक स्थिती सुधारण्यास विद्या हीच उपयुक्त आहे.

केवळ दांडगाईने स्पृश्यास्पृश्य भेद मोडून दाखविणे हे समाजातील फक्त दहापाच तत्त्वज्ञानी लोकांस शक्य आहे. पण समाजातील कोणतीही सुधारणा जोपर्यंत बहुमताने स्वीकारली जात नाही तो पर्यंत ती रूढ होत नाही. त्यासाठी, म्हणजेच बहुमत तयार होण्यासाठी शिक्षण हवे. बहुजन समाजाने स्पृश्यास्पृश्य भेद नाहीसा करता यावा अशी इच्छा असेल तर अस्पृश्य मानलेल्या जातींमध्ये वर वर्णन केलेले गुण आले पाहिजेत. हे गुण शिक्षणाने, विद्येने येतील. वरिष्ठ वर्गाने अंत्यजांबद्दल सहानुभूती व प्रेम बाळगले पाहिजे यात शंका नाही. पण अंत्यजांनीही वरिष्ठांनाच आपल्या पदवीला ओढू असे म्हणण्याऐवजी आपण त्यांच्या बरोबरीचे होऊ अशी महत्वाकांक्षा बाळगावी. काळ हा सर्व जातींना व वर्गांना समान पदवीस आणून

पोचविण्यास समर्थ आहे. पण काळालाही खेचून आणले पाहिजे. वरिष्ठ वर्गाला स्पृश्यास्पृश्य भेदाच्या कामी कर्तव्याची आठवण करून देताना अंत्यज जातींनाही उन्नतिमार्गाची खरी दिशा, शिक्षणाची, दाखविली पाहिजे.

केळकरांच्या या लेखाव्यतिरिक्त १९२१ साली त्यांनी "खेड्यातील शिक्षण व अस्पृश्यवर्ग" या नावाचा एक लेख केसरीत लिहिला. याही लेखात अस्पृश्यता व शिक्षण संबंध कसा आहे याचा विचार केळकरांनी केला आहे. उपरोक्त लेखातील विचारांचा सारांश असा –

अस्पृश्यता ही केवळ स्पर्श केल्याने जाणार नाही. स्पृश्यास्पृश्य घटक केवळ शिक्षणामुळेच जाऊ शकेल. स्वच्छ कसे राहावे व मन उदार कसे ठेवावे हे फक्त शिक्षणामुळेच समजेल. ब्राह्मण व मराठे या दोघांनी मिळून ही अस्पृश्यता घालविली पाहिजे. खेड्यापाड्यात अस्पृश्यवर्ग जास्त आहे. प्रत्येक पदवीधराने मनावर घेऊन या अस्पृश्यांना शिकविले पाहिजे. सक्तीचे शिक्षण हाच अस्पृश्यता जाण्यासाठी उपाय आहे. शिक्षणामुळे ही जागृती होईल. तीच अस्पृश्यता घालविण्यास उपयोगी ठरेल.

अस्पृश्यतेचा प्रश्न हा केवळ सामाजिक प्रश्न नाही तर तो राष्ट्रीय स्वरूपाचा प्रश्न आहे. त्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे. अस्पृश्यता घालविण्यासाठी सामाजिक क्रांतीचीच आवश्यकता आहे.

अशी सामाजिक क्रांती द्रुत गतीने शाळांमार्फत होऊ शकेल. शाळेमध्ये भिन्न जातीचे, पंथाचे, धर्माचे विद्यार्थी येतात. त्यांच्यात सहजीवनाची भावना वाढीस लागते. भिन्न जातीच्या मुलांत सलोखा निर्माण होतो. गावात इतरत्र आढळणारे स्पृश्यास्पृश्य भेद मुलांमध्ये दिसून येत नाहीत.

असे असले तरी मागासवर्गीय व अस्पृश्य यांच्या शिक्षणाचा इतिहास अभ्यासला तर असे दिसते की महाराष्ट्रात १८५५ सालानंतरच या उपेक्षित वर्गाकडे शिक्षणाच्या दृष्टीने लक्ष देण्यास सुरुवात झाली. १८५८ साली सरकारने अनुसूचित जातींच्या शिक्षणाबाबत खंबीर धोरण स्वीकारले.

पण मागासवर्गीयांच्या शिक्षणाची खरी प्रगती १९२१ ते १९३७ या काळात झाली. या कालखंडात मागासवर्गीयांच्या शैक्षणिक पाहणीसाठी स्टार्ट कमिशन नेमले गेले. त्या कमिशनच्या सूचना केळकरांनी केलेल्या सूचनांसारख्याच आहेत.

मागासवर्गांच्या मुलांच्या शिक्षणात रस घेणाऱ्या शिक्षकांना खास बढत्या द्याव्यात, यांसारख्या वैशिष्ट्यापूर्ण शिफारशीही त्यात होत्या.

"मागासवर्गीयांची उन्नती होण्यासाठी एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण" असे जेव्हा केळकर म्हणतात तेव्हा त्यांना व्यक्तित्वविकास, मनाचा विकास व विशालता, उदारता इ. गुणांचे विकसन अभिप्रेत असते.

म. गांधी, डॉ. आंबेडकर, म. फुले या सर्वांनी मागासवर्गाच्या

शिक्षणाबाबत विशेष प्रयत्न केले. मागासवर्ग हा आर्थिकदृष्ट्या सुधारला तर त्याबरोबरीने त्याची शैक्षणिक प्रगती होईल आणि शैक्षणिक प्रगती झाली की त्यांची आर्थिक उन्नती होईल असे केळकर सांगतात. शिक्षण हा उपचार केला असता मागासलेपणा नष्ट होऊन मागासवर्गीय हे आपोआपच वरिष्ठ वर्गाच्या दर्जाप्रत येतील, हे केळकरांच्या विचारांचे सूत्र आहे.

**उपसंहार**

केळकर हे संपादक, वक्ते, निबंधकार, समाजकार्यकर्ते, विचारवंत या सर्व नात्यांनी प्रसिद्ध होते. कोणत्याही विषयाची तर्कशुद्ध व खेळकरपणे मांडणी करणे हा त्यांचा विशेष दिसतो. रसिकता, मार्मिक विनोद यांच्या जोडीला प्रदीर्घ व्यासंग असल्याने केळकरांच्या निबंधांत या सर्व वैशिष्ट्यांचा परिपाक दिसून येतो. त्यांनी लिहिलेल्या शिक्षण विषयक निबंधात खालील शैक्षणिक विषयांची चर्चा त्यांनी केली आहे.

स्त्री शिक्षण, शेती शिक्षण, देशी भाषेतून शिक्षण, विद्यापीठे, राष्ट्रीय शिक्षण, शिक्षक व त्यांचे वेतन, जुनी विद्या व नवी विद्या, हस्तकला शिक्षण, मागासवर्गीयांचे शिक्षण, विद्यार्थी आणि राजकारण, पालकांची कर्तव्ये, मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया, परीक्षा, घोकंपट्टी व पाठांतर, स्मरणशक्ती, ग्रंथ व ग्रंथालये, सक्तीचे शिक्षण, शिक्षणाची अर्थव्यवस्था, शिक्षण व चारित्र्य संवर्धन, परदेशी जाणारे विद्यार्थी, शिक्षक व राजकारण.

अशा प्रत्यक्ष शैक्षणिक विषयांशिवाय केळकरांनी आपल्या अनेक निबंधांतून पर्यायाने शिक्षण विचारांची मांडणी केली आहे. उदा. –

धर्म, नीती, कला व अश्लीलता, जुने व नवे, समाज आणि राजकारण. ' केळकर ज्ञानयोगी, भक्तियोगी व कर्मयोगी होते. ' त्यामुळे त्यांच्या निबंधात अभ्यास, भक्ती व प्रत्यक्ष कार्यामागे येणारे विचार यांचा सुंदर आविष्कार झालेला दिसतो. केळकर हे स्वत: अनेक संस्थांमध्ये काम करीत असत. अनेक ठिकाणी त्यांची व्याख्याने होत. या व्याख्यानांचेच लेखरूप या संग्रहात आहे.

वैश्य-विद्याश्रम सासवने यासारख्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन केळकरांनी माहिती मिळवली व मगच त्यांनी लेखन केले.

केळकरांच्या शिक्षण विचारात एकांगीपणा कधीही दिसून येत नाही. शिवाय ज्याची मांडणी करावयाची त्या विषयाची भरपूर माहिती व युक्त उदाहरणे त्यांच्याजवळ असल्यामुळे त्यांच्या विचारांत प्रौढपणा व लालित्य यांचा एकजिनसी आविष्कार दिसून येतो. कोणत्याही प्रश्नाला चपखल उत्तर द्यावे हे केळकरांनीच असे वाटायला लावण्याइतका नेमकेपणा केळकरांच्या मांडणीत असतो.

उदा. ' मागासवर्गीयांचे शिक्षण ' याबाबत चर्चा करताना केळकरांनी सांगितले आहे की कोणत्याही गुणाचा उच्च कोटीतील आविष्कार हा सर्व भेद संपवून टाकतो.

सौंदर्य या गुणाचे उदाहरण देताना त्यांनी मत्स्यगंधेची आठवण करून दिली आहे. मत्स्यगंधा हीन कुळातील. पण तिचे सौंदर्य उच्च कोटीतले. ती आपोआप सर्व रस्ते ओलांडून वरिष्ठ वर्गात जाऊन बसली. तीच गोष्ट सत्ता वा संपत्ती व शिक्षण यांची आहे असे केळकर सांगतात.

टिळक विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात (४ सप्टेंबर १९२३) बोलताना केळकर उदार शिक्षणाविषयी व राष्ट्रीय शिक्षणाविषयी सांगतात,

"सुशिक्षण हे पोलादासारखे असून ते भट्टीत कमावताना किंवा यंत्रात घालून त्याचे निरनिराळे पदार्थ बनविताना योजकाच्या निरनिराळ्या हेतूंप्रमाणे त्याचा आकार बनविला जातो. उदार या नावाच्या शिक्षणाचीही तीच गोष्ट आहे. राष्ट्रीय शिक्षण हा शिक्षणापेक्षाही अधिकाराचाच प्रश्न अधिक आहे. व हा अधिकारही निव्वळ पोकळ स्वातंत्र्याच्या इच्छेचा नसून आपणाकडून शिक्षण व पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा व क्रियेचा ओघ ताबडतोब कोणीकडे वळवावा या दृष्टीने महत्त्वाचा आहे."

## लोकसंख्या शिक्षण

लोकसंख्याशिक्षणशास्त्राचा अभ्यास ही नव्या काळाची गरज आहे. कुटुंब नियोजन, पोषण, निसर्ग, परिसर, सामाजिक व सांस्कृतिक स्तर इ. अनेक विषयांचा अभ्यास लोकसंख्या शिक्षणाच्या संकल्पनेत अंतर्भूत आहे.


केळकरांनी कुटुंब व्यवस्थेवर १० लेखांक लिहिले. या लेखात लोकसंख्याशिक्षणशास्त्रातील काही घटकांचा समावेश आहे.

"कुटुंब ही अशी एक राष्ट्रीय घटना आहे की तेथे सर्व राष्ट्रीय जीवनाचा उगम होतो." असे थोडक्यात सूत्रबद्ध रीतीने कुटुंबाचे महत्त्व केळकरांनी सांगितले आहे.

मुलगा का मुलगी याबद्दलच्या समजुती, कुटुंबाची आर्थिक व्यवस्था, शैक्षणिक व सांस्कृतिक दर्जा याबाबत केळकरांनी सामाजिक दृष्टीकोनातून विवेचन केले असले तरी ते आधुनिक अशा लोकसंख्याशिक्षणशास्त्राच्या अभ्यासाला उपयुक्त आहे.

केळकरांच्या शिक्षणविषयक विचाराच्या लेखांचे आणखी एक वैशिष्ट्य ध्यानात येते ते असे की केळकर निव्वळ चर्चा करीत नाहीत. खूप माहिती व खूप मोठी आकडेवारी ते सादर करतात. त्यामुळे त्या विवेचनात पोकळपणा नसतो. तर्कसंगत विवेचन असल्यामुळे केळकरांचा शिक्षण विचार मतभेद असूनही ग्राह्य मानावा लागेल. धर्मशिक्षणाचे विचार यांसारखे केळकरांचे काही विचार नव्या काळात जसेच्या तसे स्वीकारता येणार नसले तरी त्यातील काही भाग व अंश आजही उपयुक्त वाटेल. विशेषत: धर्म आणि नीती. याविषयी त्यांचे विचार. शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट शीलसंवर्धन... या दृष्टीने कालोचित वाटतात. टिळकांच्या नंतर शिक्षण विषयक व्यापक प्रश्नांवर इतकी सखोल चर्चा केळकरांनीच केली आहे.

■ ■



## प्रकरण : ६

# अच्युत बळवंत कोल्हटकर

### चरित्ररेखा

१ ऑगस्ट १८७९ रोजी वाई येथे अच्युतराव कोल्हटकर यांचा जन्म झाला. त्यांचे वडील वामनराव कोल्हटकर हे न्यायाधीश होते. ते मवाळ पक्षाकडे झुकणारे होते, आणि टिळक पक्षाचा मनातून ते तिरस्कार करीत. अच्युतरावांना मोठेपणी हे पसंत पडले नाही. त्यांनी पित्याच्या नावाच्या जागी टिळकांचे 'बळवंत' हे नाव लावून टाकले.

बालपणीच समर्थांचा दासबोध, करुणाष्टके यांचे पाठांतर अच्युतराव यांनी केले होते. बखरीतील अनेक उतारे ते पाठ म्हणून दाखवीत असत. १८९४ साली. वयाच्या पंधराव्या वर्षी अच्युतराव मॅट्रिकची परीक्षा पास झाले. १९०४ साली ते एलएल.बी. झाले.

सातारा येथे दोन वर्षे त्यांनी शिक्षकाचे काम केले. नंतर नागपूर येथे तीन वर्षे ते वकिलीचा व्यवसाय करीत होते. याच काळात नागपूरच्या 'देशसेवक' पत्रात ते लिहू लागले. आणि १९०६ साली ते देशसेवकचे संपादक झाले.

अच्युतराव आता टिळक पक्षाच्या राजकारणाचे प्रचारक बनले. १९०८ साली टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली. कोल्हटकरांनाही पावणेदोन वर्षांची शिक्षा झाली. तुरूंगात त्यांना अतोनात कष्ट भोगावे लागले.

पुढे काही काळ मद्रासमध्ये ते अज्ञातवासात राहिले. टोपण-नाव घेऊन एका व्यापारी पेढीवर ते काम करू लागले. पैसे चांगले मिळत होते. तरी जे करावयाचे होते ते करता येत नव्हते, म्हणून ते बेचैन होते.

मग महाराष्ट्रात परत येऊन १९१५ साली कोल्हटकरांनी 'संदेश' नावाचे

दैनिक काढले. तसेच ' मेसेज ' नावाचे इंग्रजी दैनिक सुरू केले.

आर्थिक अडचणीमुळे संदेश चे प्रकाशन चारपाच वेळा थांबवावे लागले होते. तरीही कोल्हटकरांनी ' संदेश ' सुरू ठेवला. शिवाजी, रामदास, टिळक ही कोल्हटकरांची तीन दैवते होती. शिवाजी-जन्मदिन महाराष्ट्रात रूढ करण्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले. १९३० साली कोल्हटकरांनी गांधीजींच्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. तेव्हाही त्यांना तुरूंगवास भोगावा लागला. तुरूंगातून मुक्तता झाली आणि पाचच महिन्यांनी १५ जून १९३१ रोजी अच्युतरावांचे देहावसान झाले.

## कोल्हटकरांचे साहित्य

कोल्हटकरांचे प्रकाशित ग्रंथरूप साहित्य फार थोडे आहे. "चहा, चिवडा, चिरूट", "बेटा गुलाबाच्या कानगोष्टी", "वत्सलावहिनींची पत्रे" अशा शीर्षकाखाली कोल्हटकर रोज नवानवा मजकूर लिहित असत. ' संदेश 'मधील अग्रलेख हे लोकांचे त्यावेळी मोठेच आकर्षण होते. इंदुप्रकाश, वंदे मातरम्, स्वातंत्र्य, राष्ट्रमत, दैनिकवृत्त, डेली न्यूज, प्रभात या दैनिकातून त्यांनी प्रमुख अग्रलेखक म्हणून काम करताना विविध प्रकारचे लेखन केले. सुदर्शन, युगांतर, चाबूक, रणसंग्राम, विदूषक, चाबूकस्वार, या साप्ताहिकांचे त्यांनी संपादन केले. या साप्ताहिकात ते स्वत: लेखनही करीत. परंतु कोल्हटकरांचे ग्रंथरूप साहित्य उपलब्ध नाही. अनंतराव गद्रे यांनी कोल्हटकरांच्या मृत्यूनंतर तीन वर्षात, दर पुण्यतिथीला एक याप्रमाणे १९३३ ते १९३५ या काळात त्यांच्या लेखांचे साडेसातशे पृष्ठांचे तीन भाग प्रकाशित केले.

पहिल्या भागात त्रेपन्न लेख व मधून मधून दिलेले छोटे उतारे आहेत. दुसऱ्या भागात एकंदर ३० लेख आहेत. तिसऱ्या भागात अडतीस लेख आहेत. या सर्व लेखांत राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा स्वरूपाचे लेख आहेत. ' वत्सलावहिनी ' या नावाने लिहिलेल्या काही लेखांचा समावेश या खंडात केला आहे. याशिवाय ११ नाटके, ५ कादंबऱ्या, ६ कथासंग्रह कोल्टकरांच्या नावावर आहेत.

देशभक्ती, पूर्वजप्रीती, इतिहासाचा अभिमान, स्वातंत्र्याची चाड, जीर्णमतवादाचा निषेध, नवमताचे स्वागत, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार, इ. विषय अन्य अनेक निबंधकारांनी आपल्या निबंधात हाताळले आहेत. पण कोल्हटकरांची हे विषय हाताळण्याची पद्धती इतरांपेक्षा वेगळी होती. मुंबईतील संमिश्र समाज डोळ्यापुढे ठेवून कोल्हटकरांनी लेखन केले. कोल्हटकरांचे लेखन आवश्यक तितके विद्वत्ताप्रचुर होते. पण त्याला कल्पकतेची जोडही होती.

## कोल्हटकरांच्या लेखांतील शैक्षणिक विषय

अन्य अनेक निबंधकारांप्रमाणेच कोल्हटकारांचे निबंधही खास शिक्षण विषयावर असे नाहीत. पण त्यांच्या लेखनात पर्यायाने काही शिक्षणविचार आला आहे, असे लेख खालीलप्रमाणे –

खंड १ – ज्योतिषविद्या आणि भविष्यकथन, सोमवारची कहाणी, स्वराज्याची साधने. खंड २ – अच्युतराव कोल्हटकर यांचे एक पत्र, तमीळ भाषा, ब्राह्मण-अब्राह्मण, वंदे मातरम्, सोमा परटीण. खंड ३ – नमस्ते गणपतये, पूर्वेकडील तारा, हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य, ब्रह्मा विष्णु महेश, ब्राह्मण-अब्राह्मण

याशिवाय वरील तीन खंडात ठिकठिकाणी कोल्हटकरांचे विचार थोडक्यात मुद्रित केले आहेत. त्यातही कोल्हटकरांचा शिक्षणविचार सूक्ष्म स्वरूपात दिसून येतो.

"हजामती का करता ?" जेधे जवळकर, बंगालचा गुलाब, मराठी काव्याची प्रभात, यासारख्या लेखांतून समाजविचार, साहित्यविचार, इतिहास यासंबंधी कोल्हटकरांची मते वाचावयास मिळतात. ही चर्चा प्रत्यक्ष शैक्षणिक घटकांसंबंधी नसली तरी शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जे अनेक विचार येतात त्यांच्याशी संबंधित आहे.

कोल्हटकरांचा पिंड काव्यात्म, प्रचारकी स्वरूपाचा असल्यामुळे त्यांची लेखनशैलीही तशीच आवेशपूर्ण आहे.

## स्वराज्याची साधने

कोल्हटकरांनी ज्या काळात्र हे लेख लिहिले त्या काळात 'स्वातंत्र्य संपादन' हा प्रमुख हेतू सर्वच देशातील लोकांसमोर होता. स्वातंत्र्याची चळवळ चांगलीच आकारत आली होती.

कोल्हटकर हे 'रामदास' तत्त्वज्ञानाचे अभ्यासक होते. त्या विचारधारेस अनुलक्षून कोल्हटकर यांनी स्वराज्यप्राप्तीची साधने कोणती हे सांगितले आहे. जनतेविषयी प्रेम किंवा जनकल्याणाची चळवळ, स्वमतविस्तार किंवा प्रॉपगॅण्डा, संपूर्ण सामुग्री, धैर्य अथवा दृढनिश्चय, चाणाक्षपणा, गुप्त मसलत ही सर्व स्वराज्याची साधने आहेत असे कोल्हटकर सांगतात. यांपैकी गुप्त मसलत एवढे साधन वगळता बाकीच्या सर्व साधनांचा विचार शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे क्षेत्रात येतो.

व्यक्तिमत्त्व विकासाचे ध्येय शिक्षणाने साध्य व्हावे असे वाटत असेल तर व्यक्तीच्या ठिकाणी जनतेविषयी प्रेम निर्माण करणे, जनकल्याणाची इच्छा व आवड निर्माण करणे, ही महत्त्वाची बाब ठरते.

व्यक्तीला समाजाभिमुख बनविणे, समाजाची एक घटक म्हणून तिचा विकास घडविणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट मानले जाते.

व्यक्तीच्या ठिकाणी सामाजिकतेचा विकास करून सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हे शिक्षणाचे एक आवश्यक कर्तव्य ठरते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक दृष्टिकोन, नागरिकत्वाची जाणीव, कर्तव्यनिष्ठा व लोकहितदक्षता निर्माण करण्याची जबाबदारी येऊन पडते.

अशा तऱ्हेचा उत्तम नागरिक निर्माण झाला की तो स्वराज्य संपादन करून घेण्यास पात्र झाला. स्वराज्य आधी मिळालेलेच असेल ते टिकवावयाचे कसे किंवा त्याचा विकास कसा करावयाचा हेही या सुजाण नागरिकावरच अवलंबून आहे.

'स्वमतविस्तार किंवा प्रॉपगॅण्डा' हे स्वराज्यप्राप्तीचे दुसरे साधन कोल्हटकर यांनी सांगितले आहे. व्यक्ती आणि समूह यांच्या आंतरक्रिया प्रक्रियांमध्ये समूह संपर्क साधनांचा शैक्षणिकदृष्ट्या मोठा वाटा असतो असे शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र सांगते. एकाच वेळी अनेक व्यक्तींशी संपर्क साधण्याचे सामर्थ्य या साधनांमध्ये असते. समाजपरिवर्तनासाठी ही साधने परिणामकारक कार्य करू शकतात.

ब्राउनच्या मते समूहसंपर्क साधनांचे कार्य विविध असते. करमणूक करणे, विविध विषयांवर अचूक माहिती देणे, विविध दृष्टीकोन व्यक्त करणे.

ज्ञानसमृद्धी, अभिरूची व जीवनविषयक दृष्टिकोन निर्माण करणारी ही कार्ये शैक्षणिक संस्कारांना पूरक ठरतात.

चांगल्या विचारांचा प्रसार हा सतत झालाच पाहिजे असे कोल्हटकर म्हणतात. प्रचाराच्या व्यापाला कंटाळू नका असाही ते उपदेश करतात व त्यासाठी रामदासांचे एक वचन उद्धृत करतात –

उपाधीस कंटाळला। विचारांचा आळस आला
म्हणजे जाणावा चेवला। बुद्धीपासुनी।।

स्वराज्याचे तिसरे साधन 'संपूर्ण सामुग्री'. यामध्ये स्वराज्य कमावण्यासाठी शास्त्रीय शोध व भौतिक ज्ञान आपल्या जवळ हवे असे कोल्हटकर सांगतात. भौतिक ज्ञानाशिवाय आधुनिक काळात कोणतीही चळवळ यशस्वी होणार नाही.

दृढनिश्चय आणि चाणाक्षपणा या व्यक्तिमत्त्वाच्या क्षेत्रातील बाबी आहेत. या मानसिक शक्ती आहेत. शिक्षणाने या सर्व मानसिक शक्तींचा विकास घडविता येतो. दृढनिश्चयाविना व्यक्ती कोणतेही कार्य यशस्वीपणे करू शकणार नाही. चंचलतेने कार्यनाश होतो. "हाती घ्याल ते तडीस न्या" अशा प्रकारची वृत्ती झाली तरच अवघड कार्ये हातून पार पडू शकतात.

तीच गोष्ट चाणाक्षपणाची आहे. चाणाक्षपणात बुद्धिमत्ता हा घटक अंतर्भूत आहेच. सदैव जागरूक असणे, परिस्थितीचे ज्ञान करून घेणे, त्यानुसार निर्णय घेणे, अंदाज बांधणे यासाठी चाणाक्षपणा उपयोगी असतो. शिक्षण-प्रक्रियेने ही मानसिक शक्ती विकसित करता येते.

कोल्हटकरांनी स्वराज्यप्राप्तीची साधने म्हणून जी सांगितली आहेत ती शैक्षणिक दृष्ट्याही उपयुक्त आहेत हेच यावरून दिसून येते.

## सोमवारची कहाणी

'आत्मविश्वास' गुणाचे महत्त्व सांगणारी ही कहाणी म्हणजे कहाणीचे रूप घेतलेला एक वैचारिक निबंध आहे. बरीच वर्षे तप करूनही एका शिष्याला परमेश्वरप्राप्ती झाली नाही. तेव्हा त्याने आपली शंका गुरूंना विचारली. तेव्हा गुरू त्याला सांगतात –

"शिष्या, देवाची सेवा नुसत्या भक्तीने होत नाही. देवाचा प्रसाद व्हायला भक्ती, सेवा, प्रदक्षिणा, बेलाची पाने, अभिषेक तर हवाच, पण अंगात सेल्फ-कॉन्फिडन्सही पाहिजे."

कहाणीसदृश असलेल्या या शिष्यकथेत कोल्हटकर शेवटी सांगतात – "राष्ट्राला सुखी करायला आत्मविश्वास लागतो."

शिक्षणाच्या अनेक उद्दिष्टांपैकी विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट मानले जाते. विद्यार्थ्यांची मानसिक व वैचारिक बैठक पक्की करणे हे शिक्षणाचे काम आहे.

सोमवारच्या कहाणीतील गुरूही शिष्याला हेच शिकवतात. परमेश्वर प्राप्तीसाठी अन्य अनेक साधने आहेत. त्यांचा अवलंब करावाच लागतो,. पण या साधनांचा वापर करूनही वापर करणाऱ्याच्या अंगी, अध्ययन करणाऱ्याच्या मनात आत्मविश्वास नसेल तर यश मिळणार नाही, साध्य व्हायचे ते होणार नाही. आत्मविश्वास ही एक मानसिक शक्ती आहे.

असलेली परिस्थिती बदलणे, प्रतिकूलतेवर मात करणे यासाठी आत्मविश्वासाची अत्यंत आवश्यकता असते. सोमवारच्या कहाणीतील गुरूशिष्य संवादातून आत्मविश्वासमहती कळते.

## ज्योतिषविद्या आणि भविष्यकथन

ज्ञानाच्या व विद्येच्या अनेक शाखांपैकी ज्योतिषविद्या हीही एक शाखा आहे. भविष्यकथन सामान्य माणासापासून असामान्यांपर्यंत कोणालाही आवडते असा सर्वसामान्य समज आहे. ज्योतिषशास्त्राकडे शास्त्र म्हणून पाहिले असता कोणत्या गोष्टींचा विचार करावा लागेल याची चर्चा कोल्हटकर यांनी या निबंधात केली

आहे. ही चर्चा करताना शिक्षण क्षेत्रातील व शिक्षण प्रक्रियेतील काही गोष्टी आपोआपच कोल्हटकरांच्या या चर्चेत येऊन गेल्या. त्यातील महत्त्वाच्या गोष्टी अशा –

**कार्यकारण भाव** – हे जग म्हणजे कार्यकारणाची एक विलक्षण साखळी आहे. जिथे कारण तिथे त्याचे कार्य. अग्नी असला की उष्णता असणार, उष्णता असली की अग्नी असणार. सर्व गोष्टींना कारणे आहेत व एकही कारण असे नाही की ज्याचे कार्य घडत नाही.

**प्रश्नमहती** – मनुष्याचे मन एकसारखे प्रश्न विचारीत सुटते. ज्यावेळी असे प्रश्न त्याच्या मनात उद्‌भवले त्यावेळी तो पशु-अवस्थेतून सुटला व जो जो हे प्रश्न जास्त होत गेले तो तो त्याची सुधारणा जास्त होत चालली. काही एक न करता सृष्टीकडे बघत राहणे म्हणजे पशुअवस्था. आणि प्रश्न विचारून मन दमवायला लागले म्हणजे उन्नतीची शुभलक्षणे. प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देता येऊ लागले म्हणजे ती ज्ञानाची प्रभा.

लहान मुले असे प्रश्न खूप विचारतात. त्यांना जिज्ञासातृप्ती करून घ्यायची असते. जिज्ञासा-तृप्तीने ज्ञानात वाढ होते. बौद्धिक विकास होतो. एरवी अध्यापनातही प्रश्नक्रियेचा उपयोग करून विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देण्यात येते. त्यांना विचार करावयास लावण्यात येतो.

**दैव व प्रयत्न** – दैव व प्रयत्न ही मनुष्याच्या जीवनाची दोन निदाने आहेत. त्यांचे प्रमाण कोणते? मनुष्याचे जीवन जर १०० अंशाचे मानले तर त्यात दैव किती अंश व प्रयत्न किती अंश आहे? मनुष्याची जो जो प्रगती होत जाईल तो तो दैवाचा अंश कमी कमी होत जाऊन प्रयत्नांचा विषय वाढत जाईल. पण ही परिपक्व अवस्था आहे.

**ज्योतिष शास्त्राची उत्पत्ती** – ज्योतिषशास्त्राची उत्पत्ती जिज्ञासेमुळे झालेली आहे. निसर्गाच्या व्यापक अवलोकनामुळे त्याची वाढ झालेली आहे. प्रयत्नवादाशी ज्योतिषशास्त्राचा विरोध नाही. प्रयत्नवादास ते सहाय्यभूतच आहे. निसर्गाच्या अफाट विस्तारामध्ये निर्भयतेने प्रवेश करून भवितव्यतेची आज्ञापत्रे वाचण्याचा हा अत्यंत छातीठोकपणाचा प्रयत्न आहे. हाही एक प्रयत्नच आहे.

शिक्षणप्रक्रियेत प्रयत्नवादाला मोठे स्थान दिले आहे. कोल्हटकरांनी ज्योतिषशास्त्रालाही शास्त्र मानून प्रयत्नवादाचाच पुरस्कार केला आहे. मानवी विकास जसजसा होत जाईल तसतसा दैववादाचा अंश कमी होत जाईल व प्रयत्नवादाला प्राधान्य मिळेल असे कोल्हटकर सांगतात.

शैक्षणिक तत्त्वज्ञानात 'कार्यवाद' महत्त्वाचा मानण्यात येतो. कार्यवादी तत्त्वज्ञानात प्रयत्नशीलता, आत्मविश्वास, स्वावलंबन, धडाडी, क्रियाशीलता,

प्रायोगिक वृत्ती या गुणांना विशेष महत्त्व प्राप्त होते. विसाव्या शतकात कार्यवादाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे श्रेय जॉन डयुई यांच्याकडे जाते.

कोल्हटकरांनी ज्योतिषशास्त्रावरील लेख लिहितानाही या कार्यवादाचाच पुरस्कार केलेला आहे. कार्यकारणभाव, प्रश्न जिज्ञासा, निसर्गाचे व्यापक अवलोकन, इ. मुद्यांचा यथायोग्य परामर्श घेऊन त्यांनी दैवापेक्षा प्रयत्न कसे अधिक उपयुक्त आहेत याचे विवेचन केले आहे.

**तमिळ भाषा**

पंधरा राष्ट्रीय भाषा असलेला भारत हा देश हिंदीला राष्ट्रभाषा मानतो. पण प्रत्येक प्रांतीय भाषेचे स्वरूप कायम ठेवून त्या त्या भाषेची व संस्कृतीची वैशिष्ट्ये टिकविणे हे भारतीय घटनेने मान्य केलेले तत्त्व आहे. ''विविधतेतही एकात्मता' हे भारताचे वैशिष्ट्य ! तरीही प्रांतभेद, भाषाभेद यांमुळे एकात्मतेला तडा जातो. यासाठी एक उपाय म्हणजे भाषाभगिनींचा संपर्क. भारत शासनाने अशा संपर्काच्या काही योजना हाती घेतल्या आहेत. तमीळ ही एक महत्त्वाची भारतीय भाषा आहे. तिचा परिचय कोल्हटकरांनी एका लेखात विस्तृतपणे करून दिला आहे. मद्रास येथे रहात असताना त्यांनी टोपणनावाने हा लेख लिहिला आहे. या लेखाचा सारांश –

ज्याने स्वत:च्या प्रेरणेने आपल्या जन्मभाषेशिवाय दहापाच दुसऱ्या भाषांचे अध्ययन केले असेल त्याला दुसऱ्या कोणत्याही भाषेची अवहेलना करावी असे कधीही वाटणार नाही.

'तमीळ' म्हणजे 'गोड' भाषा. तमीळ भाषेचे महत्त्व, तिचा विस्तार आणि तिचे ग्रंथवैभव मोठे आहे. मराठी, गुजराथी, हिंदी, बंगाली, या भाषांची व्याकरणे दासवृत्ती दर्शवणारी आहेत. तमिळ भाषेचे स्वतंत्र व्याकरण आहे. तमिळ भाषेत ख्रिस्ती शकाच्या पूर्वीपासूनचे ग्रंथ आहेत. तमिळ भाषेचा आरंभ कधीपासून झाला याबाबत विद्वानांत एकमत नाही.

या निबंधात सुरूवातीला जो मुद्दा येथे लिहिला आहे तो शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे. आपल्या मातृभाषेव्यतिरिक्त स्वयंप्रेरणेने एखादी देशी भाषा आपण शिकावी. राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागेल व भाषांची देवाणघेवाण होऊन भाषाभिवृद्धीस मदत होईल.

**वंदे मातरम्**

कोल्हटकरांनी 'वंदे मातरम्' या विषयावर लेख लिहून आपल्या राष्ट्राच्या थोरवीचे समुचित शब्दात वर्णन केले आहे. वर्ण्य विषयाचे विवेचन करता करता त्यांनी मानसशास्त्रातील सहजप्रवृत्ती, त्यांचे उदात्तीकरण या विषयांचाही ओघाने

परामर्श घेतला आहे. या निबंधाचा सारांश असा –

सर्व चराचर वस्तूंमध्ये मानव हाच श्रेष्ठ गणला आहे. मानवाची बुद्धिमत्ता इतर चराचर वस्तूंपेक्षा फारच उच्च आहे, व महत्त्वाची गोष्ट अशी की मानवास बोलावयास तोंड आहे. मानवाप्रमाणेच पशुपक्षांनाही तोंडे आहेत. पण खाण्यापलीकडे त्यांचा त्यांना उपयोग नाही. क्षुधा शमविणे हा मानवाच्या तोंडाचा खरा उपयोग नाही. पवित्र शब्दांचा उच्चार सतत निघाला पाहिजे हा त्याचा खरा उपयोग. 'वंदे मातरम्' या शब्दाची थोरवी किती आहे याबद्दलचे पूर्ण ज्ञान होण्यास भरपूर अशी बुद्धी परमेश्वराने मानवास दिली आहे. राष्ट्रीय व नेमस्त अशा दोन्ही पक्षांच्या माणसांच्या तोंडून वंदे मातरम् हाच उच्चार बाहेर पडणार. वंदे मातरम् या पवित्र शब्दाची थोरवी एवढी मोठी आहे की त्याच्या प्रभावाने सर्वजण पुलकित होतात. 'क्षुधा शमविणे' ही माणसाची सहजप्रवृत्ती आहे. शिक्षणाच्या अनेक उद्दिष्टांपैकी भाकरी मिळवणे हे एक उद्दिष्ट आहे. पण या पलीकडे शिक्षणाची अनेक थोर ध्येये आहेत. राष्ट्रीय भावनेचा परिपोष हे शिक्षणाचे उदात्त ध्येय असते. वंदे मातरम् या निबंधातील विचारांनी राष्ट्रीय भावनेचा परिपोष उत्तमरीत्या होऊ शकेल. म्हणून हा निबंध शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

### जातिभेदनिर्मूलन आणि ब्राह्मण-अब्राह्मण

कोल्हटकरांनी ब्राह्मण आणि अब्राह्मण या नावाचे लेखांक लिहून समाजात जातिभेद किती आहे, समाज व्यवस्था कशी असावी याबद्दलचे विवेचन केले आहे. सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने या लेखातील विचार महत्त्वाचे असल्याने त्यांचा परामर्श घेणे शैक्षणिक दृष्टीनेही युक्त आहे. या लेखाचा सारांश –

ब्राह्मण-अब्राह्मण चळवळ म्हणजे स्वत:चे हक्क व आकांक्षा यांच्या पूर्तीची चळवळ. हिंदुस्थानच्या विपन्नावस्थेचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे सहनशीलता. वाटेल ते सोसा पण जिवंत रहा असे शिक्षण हिंदुस्थानातील जनतेला देण्यात आले आहे. स्त्रिया, अस्पृश्य, ब्राह्मणेतर, कॉंग्रेस, होमरूल या स्वराज्याच्या शिड्या आहेत. ब्राह्मण कधीही भित्रा असता कामा नये. ज्ञान निर्भय असले पाहिजे. मनुष्य समाजशास्त्र, राजनीतीशास्त्र, राष्ट्रव्यवहारशास्त्र, वाटेल तितके पढो. पण या शास्त्रांना जर त्याला विश्वशास्त्राकडे सन्मुख करून घेता आले नाही तर त्याची विचारमर्यादा आकुंचितच राहील. विश्वाच्या मांडणीच्या भव्य पसाऱ्यामागील तत्त्वाची आनंददायक ओळख जनतेला करून देण्याचे काम ब्राह्मणांचेच आहे. ब्राह्मण हाही सबल असावा. सामर्थ्यावाचून तत्त्वज्ञान लंगडे असते. ब्राह्मणांनी जी दारिद्र्याची शपथ घेतली होती. तीमुळे ब्राह्मणांचा एक प्रकारचा नैतिक व सात्विक प्रभाव उत्पन्न होत असे. ब्राह्मणाने आधुनिक ज्ञान सतत आत्मसात केले पाहिजे. हे ज्ञान व्यवहारात आणले पाहिजे.

ज्ञान व्यवहारात आणण्याचे तीन मार्ग –ग्रंथलेखन, ज्ञानाप्रमाणे वर्तन, नवे शोध. पूर्वीच्या काळीही जुन्या विद्यांतच ब्राह्मण रममाण झाले असते तर त्यांना समाजात उच्च पद कधीही प्राप्त झाले नसते. ब्राह्मणांचे ज्ञान केवळ वाङ्मयात्मक किंवा नीतिवर्धक न राहून त्या ज्ञानाने विश्वातील आजपर्यंत अज्ञात राहिलेल्या भागात मोठ्या उत्साहाने प्रवेश केला पाहिजे. ब्राह्मणाची बुद्धी जगाच्या हिताचीच असली पाहिजे. ब्राह्मणाचे सर्व अध्ययन अध्यापन आणि सृष्टीशोधन याच भावनेने चालले पाहिजे. **केवळ कीर्ती होईल म्हणून अध्ययन करणे, पगार मिळेल म्हणून अध्यापन करणे** किंवा पेटंट मिळविता येईल म्हणून सृष्टीशोधन करणे हे ब्राह्मणत्वाला विघातक आहे. ब्राह्मण निर्भय असला पाहिजे. बिकट परिस्थिती, जुलुमी राजा अथवा मृत्यू यांचेही भय ब्राह्मणाला वाटता कामा नये.

ब्राह्मण-अब्राह्मण या चार लेखांकात कोल्हटकरांनी चारही वर्णाची कर्तव्यकर्मे कोणती याचे प्रथम विवेचन करून नंतर 'ब्राह्मण' म्हणजे कोण? त्याची खरी कर्तव्यकर्मे कोणती याचे विवेचन केले आहे. ब्राह्मण हा शब्द कोल्हटकरांनी जातिवाचक अर्थाने वापरला नाही. ब्राह्मण हा शब्द कर्मवाचक अर्थाने वापरला आहे.

ब्राह्मण हा ज्ञानी. ज्ञान निर्भय असावे, ज्ञानाने कर्मवादी असावे, हे कर्म सत्कर्मच असावे, ज्ञानाला व्यावहारिक उपयोजन असावे असा या विवेचनाचा एकंदर आशय आहे.

आधुनिक काळात 'शिक्षण कशासाठी' असा प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्याची जी अनेक उत्तरे येतात त्यात शिक्षणाने समाजोपयोगी उत्पादक कार्यास चालना द्यावी अशी अपेक्षा असते (एस.यू.पी.डब्ल्यू.). कोल्हटकरांनी हाच विचार वेगळ्या भाषेत मांडला आहे. कोल्हटकरांना वर्णाश्रमव्यवस्था ही गुणवत्तेच्या निकषावरच मान्य आहे असे त्यांच्या विवेचनावरून दिसते. कोल्हटकरांना 'ब्राह्मण्य' अवश्य हवे आहे. हे 'ब्राह्मण्य' कसे हे समजावून देताना त्यांनी व्यक्त केलेले विचार हे शैक्षणिक दृष्ट्या विचार करण्यासारखे आहेत हे वरील विवेचनावरून दिसते.

### गणेशोत्सव आणि लोकशिक्षण

१२ सप्टेंबर १९१५ च्या 'संदेश' मध्ये 'नमस्ते गणपतये' या शीर्षकाचा एक लेख कोल्हटकरांनी लिहिला. या लेखात गणपतीचे पारंपारिक महत्त्व, गणपतीची मूर्ती, श्रद्धा यांबरोबरच आधुनिक काळात गणेशोत्सवाचे जे रूप प्रकट झाले त्याचे महत्त्व त्यांनी विशद केले आहे.

महाराष्ट्रात गणपतीचे उत्सव सार्वजनिक प्रकारे साजरा करण्याचा प्रघात पडल्यास जवळजवळ वीस वर्षे होत आली आहेत. हा काळ व महाराष्ट्राच्या कर्तव्य

जागृतीचा काळ जवळपास एकच आहे असे म्हणावयास हरकत नाही. गणपती उत्सव म्हणजे एक उच्च प्रकारचे ज्ञानसत्र करण्याचे स्थान आलेले आहे. त्या ठिकाणी व्याख्यानांच्या द्वारे ज्ञानामृत पाजण्यात येत आहे. कीर्तनाच्या द्वारे भक्तीच्या स्वर्गीय अमृताचे सेवन करण्यात येत आहे. ऐक्य भावनेचे पोषण होत आहे. ह्या सर्व गोष्टींचा समुदित परिणाम म्हटला म्हणजे भावी उन्नतीविषयीच्या आशा दृढ होत चालल्या आहेत.

टिळकांनी पुरस्कारलेल्या व वाढविलेल्या गणेशोत्सवात त्याकाळी विविध व्याख्याने, चर्चा यांद्वारा लोकजागृतीचे, प्रबोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणावर घडून येत असे. या संदर्भात कोल्हटकरांनी गणेशोत्सवाच्या लोकशिक्षण विषयक कार्याचा परामर्श घेतला आहे. यापुढे गणपतीच्या रूपाबद्दल विवेचन करताना कोल्हटकर म्हणतात "मनुष्याच्या मुखावर हत्तीची सोंड पाहून ज्यांस विलक्षण निसर्गविरूद्धता दिसते, पण तो गणपती निसर्गाचाही प्रेरक व स्वामी आहे अशी उदात्त भावना ज्यांस होत नाही त्यांना आमच्या गत इतिहासाचे ज्ञान नाही व आमच्या समाजाच्या संस्कृतीची किल्ली सापडली नाही असे म्हणावे लागेल."

याबाबत कोल्हटकर असे सुचवितात की आम्ही परकीय विचारांचा त्याग करून समाजाची 'नस' ओळखण्यास शिकले पाहिजे. निसर्गाचा स्वामी, निसर्गाचा प्रेरक गणपती हेच त्याचे रूप आहे. म्हणूनच आपण गणपतीला विद्येची देवता मानतो. ज्ञानाची देवता मानतो. गणपतीच्या पारंपरिक भक्तिभावनेचा कोल्हटकरांनी लावलेला हा अन्वयार्थ शैक्षणिक दृष्ट्या विचार करण्यासारखा आहे.

## टिळकांची विद्वत्ता

टिळक सहा वर्षांचा तुरूंगवास भोगून आल्यावर टिळकांच्या स्वागतार्थ 'उषा' मासिकात जुलै १९१४ च्या अंकात कोल्हटकरांनी लेख लिहिला. या लेखात टिळकांच्या थोरवीचे वर्णन व त्यांच्या चरित्राचे पूजन आहे. त्यामुळे हा एक चरित्रलेख झाला हे खरेच. पण या लेखाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. टिळकांची थोरवी वर्णिताना टिळकांची विद्वत्ता आणि इतरांची विद्वत्ता यांची तुलना कोल्हटकरांनी केली आहे. ती करताना त्यांनी दिलेली उदाहरणे व योजलेले शब्द यांमुळे खरी विद्वत्ता म्हणजे काय, खरे ज्ञान कोणते याविषयी काही विचार व्यक्त झाले आहेत.

टिळकांची विद्वत्ता देशाची कीर्ती वाढवणारी, ज्ञानाचा अमूल्य खजिना असलेली दुसऱ्यांना उपयोगी पडेल अशी ज्ञानज्योती, दुसऱ्यांना हातात धरून नेणारी मार्गदर्शिका, धारिष्ट्यवान व कष्टावमानी आहे

इतरांची विद्वत्ता स्वत:ची कीर्ती वाढवणारी विद्वत्ता, ज्ञानाचा मोठा थोरला संचय असणारी, दुसऱ्यापासून घेतलेल्या ज्ञानाचे प्रदर्शन करणारी, दुसऱ्यांचा हात

धरून चालणारी पांगळी स्त्री, भीरू व अंगचोर अशा स्वरूपाची आहे.

उपरिनिर्दिष्ट आशयावरून कोल्हटकरांना ज्या प्रकारची विद्वत्ता अभिप्रेत होती ती टिळकांच्या ठायी होती असे दिसून येते.

शिक्षित मनुष्याचे 'शिक्षण' हे स्वतःच्या कीर्तीबरोबरच देशाची कीर्ती वाढवणारे असावे; शिक्षणाचा उपयोग स्वतःबरोबरच इतरांनाही होणे आवश्यक आहे. शिक्षणाने इतरांना मार्गदर्शन करावे. केवळ 'ज्ञानसंचय' म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षणाने निर्भयता प्राप्त झाली पाहिजे. हे सर्व मुद्दे कोल्हटकरांनी टिळकांची विद्वत्ता वर्णिली त्यात अंतर्भूत आहेत.

शिक्षण म्हणजे ज्ञानाचे केवळ प्रदर्शन नाही तर ज्ञानाचा प्रत्यक्ष व्यावहारिक उपयोग आहे. शिक्षण हे समाजसुधारणेचे प्रभावी साधन आहे असे अनेक शिक्षणतज्ज्ञांनी मान्य केले आहे. या पार्श्वभूमीवर 'टिळकांची विद्वत्ता' यातील मुद्दे महत्त्वाचे आहेत. शिक्षणाला, ज्ञानाला कृतीचा आधार अवश्य हवा. शिक्षणाने जो व्यक्तिविकास साधावयाचा त्यासंबंधीची तत्त्वे टिळकांच्या विद्वत्तेच्या अनुषंगाने कोल्हटकरांनी विशद केली आहेत.

## स्फुट विचार

अ. ब. कोल्हटकर स्मारक ग्रंथात ठिकठिकाणी काही स्फुट विचार आले आहेत. ते खालीलप्रमाणे

अस्पृश्यता हा राष्ट्रीय रोग आहे. ते राष्ट्रीय पातक आहे. (भाग १. पृ. ४३) शारीरिक शक्ती व लष्करी विद्या या गोष्टी लोकांनी शिकाव्यात. टिळक, गांधीचे अनुयायी सबल हवेत. त्यांनी लष्करी विद्या घ्यावी. (भाग १ पृ. ४७) आर्यमातेची थोरवी तिच्या शूर पुत्रांनी केलेल्या कर्मामुळेच तिला प्राप्त झाली आहे. भौतिक शास्त्रांचा उगम कर्मविमुखतेतून होणे शक्य नाही. (भाग १, पृ. ५३) ज्यास हे जग पराक्रमाचे स्थळ वाटते व संकटे ह्या पौरूषाची परीक्षा द्यायच्या शाळा वाटतात तोच मनुष्य धन्य. (भाग १, पृ. ३०७) ब्राह्मणांनो, वर्णाचे गुरूत्व मिळवायचे असेल तर विद्येत श्रेष्ठ व्हा, सद्‌गुणात श्रेष्ठ व्हा, पवित्रपणात श्रेष्ठ व्हा, परोपकारात श्रेष्ठ व्हा. (भाग ३, पान ८९)

## उपसंहार


कोल्हटकर लेखसंग्रहाच्या तीन भागातून जेवढे शिक्षणविचाराचे कण हाती लागले तेवढे या ठिकाणी ग्रथित केले आहेत. कोल्हटकरांनी स्वतः शिक्षकाचे काम दोन वर्षे केले होते. वृत्तपत्रकार या नात्याने त्यांची कामगिरी तर सर्वमान्य आहेच.

कोल्हटकरांचा 'संदेश' गिरगावातील सामान्यजनांपर्यंत पोचला होता.

तिळाएवढा बारीक विचार कल्पकतेने सजवून त्याला मोठे रूप देऊन आकर्षकपणे वाचकांसमोर ठेवण्याचे कार्य कोल्हटकरांनी केले. कोल्हटकर विद्वान होते हे त्यांच्या निबंधातील आशयावरून दिसते. ते बहुश्रुत होते. पण त्यांनी पांडित्याचे प्रदर्शन फार केले नाही. उलट त्यांचा एक विशेष ध्यानात येतो तो असा की ते **बहुजन समाजाचे रसिक शिक्षक** होते.

आपल्या निबंधांद्वारे बहुजन समाजाच्या शिक्षकाची भूमिका कोल्हटकरांनी बजावली. अन्य निबंधकारांपेक्षा - टिळक, आगरकर, चिपळूणकर - त्यांची शैली काव्यात्म आहे, तिला उपहास प्रिय आहे. तिची जवळीक परांजपे यांच्या शैलीशी अधिक आहे. पण त्यांच्या निबंधाला वैचारिक बैठक जरूर आहे. ती असल्यामुळेच त्यांच्या निबंधात मर्यादित स्वरूपात का होईना, शिक्षणविचार आढळतो.

■ ■



चित्र बसवंत, पुणे.

प्रकरण : ७

# वामन मल्हार जोशी

---

## चरित्ररेखा

मराठीतील तात्त्विक कादंबरीचे जनक म्हणून ओळखले जाणारे वामन मल्हार जोशी हे चांगले निबंधकार म्हणूनही मराठी वाङ्मयाच्या इतिहासात प्रसिद्ध आहेत.

कोकणात, माणगाव तालुक्यातील तळे गावी १८८२ च्या जानेवारी महिन्यात वामनरावांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण गोरेगावला झाले. त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षीच त्यांचे वडील वारले. वडील बंधूंनी पुढील शिक्षणास मदत केली. मराठी पाच इयत्ता पूर्ण झाल्यावर वामनराव पुण्याला आले. १९०० मध्ये ते मॅट्रिक उत्तीर्ण झाले.

नंतर पुण्यातील डेक्कन कॉलेजमध्ये त्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केले. कॉलेजमध्ये असतानाच त्यांनी मराठी व इंग्रजी लेखनास सुरूवात केली होती. १९०४ साली ते बी.ए. झाले आणि १९०६ साली कलकत्त्यास राष्ट्रीय सभा भरली होती. त्या सभेत वामनराव जोशी गेले होते. तेथेच त्यांची प्रो. अण्णासाहेब विजापूरकर यांच्याशी गाठ पडली. राष्ट्रीय शाळेत 'शिक्षक' म्हणून येण्याचे आमंत्रण विजापूरकरांनी दिले. जोशी यांनी ते स्वीकारले. १९०७ पासून तळेगावी राष्ट्रीय शाळा हलविण्यात आली. विजापूरकरांच्या 'विश्ववृत्त' नावाच्या मासिकाचे संपादक १९०८ सालापासून वामनरावच होते. त्यांचे नाव मात्र सहसंपादक म्हणून छापले जाई.

याच मासिकातील एका लेखाच्या संदर्भात वामनरावांवर राजद्रोही लेखन केल्याचा आरोप ठेवण्यात आला. ३ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली.

कोल्हापूरच्या तुरूंगात काही दिवस काढल्यावर वामनरावांना सिंध प्रांतातील हैद्राबादच्या तुरूंगात डांबण्यात आले. सक्त मजुरीची शिक्षा संपल्यानंतर वामनराव

जोशी केसरी संस्थेत गेले व तेथे 'मराठा' या इंग्रजी पत्राचे सहसंपादक म्हणून काम करू लागले. मुंबईला 'मेसेज' या इंग्रजी दैनिकातही त्यांनी काम केले.

१९१८ साली ते कर्वे यांच्या अनाथ बालिकाश्रम संस्थेत गेले. आजीव सभासद झाले. त्याच संस्थेच्या महिला विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम करू लागले. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, इंग्रजी, मराठी हे विषय ते शिकवीत असत. महिला विद्यापीठाचे प्राचार्य आणि अनाथ बालिकाश्रमाचे सुपरिंटेंडेंट या नात्यानेही त्यांनी चांगली कामगिरी केली.

१९३० साली गोव्यात मडगाव येथे जे साहित्य संमेलन झाले त्याचे अध्यक्ष म्हणून वामनरावांची निवड झाली. १९४३ साली त्यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त पुणे, मुंबई, कोल्हापूर, नगर या शहरी त्यांचा सत्कार झाला. २० जुलै १९४३ रोजी वामन मल्हार जोशी याचे निधन झाले.

## वामन मल्हार जोशी यांचे साहित्य

कादंबरी लेखक, तत्त्वचिंतक, निबंधकार अशा अनेक भूमिका उत्तमपणे वठविणारे साहित्यिक असाच वामन मल्हार यांचा लौकिक आहे. काही कथाही त्यांनी लिहिल्या. त्यांचे साहित्य खालीलप्रमाणे –

कादंबरी –रागिणी, नलिनी, आश्रमहरिणी, सुशिलेचा देव, इंदू काळे व सरला भोळे.

नाटक – विस्तवाशी खेळ

कथा – नवपुष्पकरंडक

नीती-शास्त्र – नीतिशास्त्रप्रवेश.

साहित्यचर्चा – साहित्यातील विवेक, निबंध (विविध), विचार-विलास, विचार-लहरी, विचार-विहार, विचार-सौंदर्य.

याप्रमाणे वामन मल्हार जोशी यांची साहित्यसंपदा आहे. मराठी साहित्यात ते प्रामुख्याने कादंबरीकार या नात्याने ओळखले जात असले तरी निबंधक्षेत्रातील त्यांची कामगिरीही लक्षणीय आहे. १९२० नंतरच्या निबंध वाङ्मयाच्या विचार विकासाच्या आघाडीवरील संस्मरणीय कर्तृत्त्व वामन मल्हार जोशी यांचेच आहे.

## वा.म. जोशी यांचे शैक्षणिक लेख

वामन मल्हार जोशी हे स्वत: शिक्षक व प्राध्यापक होते. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, मराठी हे त्यांचे अध्यापनाचे विषय होते. त्यांनी प्रत्यक्ष शिक्षणशास्त्र विषयक असा ग्रंथ किंवा लेख लिहिला नसला तरी त्यांच्या निबंधातून शिक्षण-विचार अवश्य व्यक्त झाला आहे. ज्या निबंधात शैक्षणिक मूल्ये वा शिक्षणविचार आहे असे

निबंध खालीलप्रमाणे –

विचार-विलास (१९२७) –ज्ञान हे विष की अमृत ?, ज्ञानवृद्धी ही जीवितातील काव्याची हानी करते काय ?, ज्ञान धर्माला वं नीतीला पोषक नाही काय ?, ज्ञानवृद्धीबरोबर येणारा अज्ञेयवाद, पक्षभेद आणि पक्षद्वेष, भुतांचा कारखाना (मानसशास्त्र), गांधींचा सत्याग्रहाश्रम.

विचार लहरी (१९४२) –प्रो. विजापूरकर, विवाहित स्त्रियांची काही कर्तव्ये. विद्यार्थी व राजकारण, स्वत:चा स्वयंवर (श्रवण, मनन, निदिध्यास)

विचार-विहार (१९४४) –नीतिशास्त्राविषयी काही विचार, ध्येय हाच देश, अल्फ्रेड ॲडलर, नीति आणि राजनीति, फ्रायड आणि कामवासना, मुलांची हसरी सृष्टी – दुय्यम शाळांतील नीतिशिक्षण व धर्मशिक्षण.

यातील काही लेख सरळ सरळ मानसशास्त्राच्या क्षेत्रातील आहेत. ‘ज्ञान’ या विषयासंबंधी विचार करणारे चार लेख आहेत. तर विद्यार्थी व राजकारण यासारखा केव्हाही बहुचर्चित असलेला विषय जोशी यांनी त्यावेळी हाताळला आहे. या सर्व लेखातील शिक्षण विचार कोणता, शैक्षणिक मूल्ये कोणती यासंबंधी पुढे चिकित्सा करावयाची आहे.

## विद्यार्थी व राजकारण

स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यासाठी झालेल्या विविध प्रकारच्या आंदोलनात विद्यार्थीही सहभागी होत असत. त्यावेळी विद्यार्थ्यांनी राजकारणात पडावे किंवा नाही याविषयी विविध अंगांनी चर्चा घडून येत. वामन मल्हार जोशी यांचेबरोबर चर्चा करण्यासाठी काही विद्यार्थी व विद्यार्थिनी आल्या होत्या. चर्चेच्या ओघात प्रश्नपद्धतीने वा.म. जोशी यांनी त्यांच्याच प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडून काढून घेतली. या चर्चेचा सारांश खालीलप्रमाणे –

विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय लढ्यात सामील होण्यापूर्वी राष्ट्र म्हणजे काय, लढा कशासाठी आहे, लढ्याला अनुकूल प्रतिकूल कोणकोण लोक आहेत, आपल्या शत्रूचे व आपले बलाबल काय आहे, लढा अयशस्वी झाला तर लढ्यात पडणाऱ्या व्यक्तीचे व राष्ट्राचे नुकसान किती होईल याची नीट माहिती करून घेणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी असहकार आंदोलनात भाग घेताना सर्वांगाने विचार केला पाहिजे. उदा. त्यावेळच्या या आंदोलनाला जवाहरलाल-गांधी यांचा पाठिंबा असला तरी राजगोपालचारी, सावरकर, काही कम्युनिस्ट यांचा पाठिंबा नव्हता.

विद्यार्थी हा अजून अपक्व अवस्थेत असतो. त्याने वडील, गुरू, अन्य मार्गदर्शक यांची समंती घेणे, त्यांच्याशी चर्चा करणे आवश्यक. जुन्या पिढीतील सर्व माणसे

या आंदोलनाच्या विरूद्ध आहेत अशी समजूत करून घेणे किंवा ती अनुकूल नाहीत म्हणजे त्यांचे चुकत आहे असे समजणे बरोबर नाही. राजकीय नेत्यांचे निर्णय चूक किंवा बरोबर ठरविण्यासाठी व त्यानुसार आपले वर्तन करण्याची पात्रता विद्यार्थी दशेत आलेली नसते. वृत्तपत्रे, पक्षांनी प्रसिद्ध केलेली बुलेटिन्स यांमध्ये ज्या वार्ता येतात त्यांवर काहीही विचार न करता निर्णय घेतला तर तो एकांगी होत असतो. आवश्यक तो राजकीय पोक्तपणा विद्यार्थीदशेत आलेला नसतो. वरील सर्व मुद्यांचा विचार करूनच विद्यार्थ्यांनी राजकीय चळवळीत सक्रिय भाग घ्यावयाचा किंवा नाही ते ठरवावे.

वा.म.जोशी यांची विद्यार्थ्यांशी जी चर्चा झाली व त्यांनी जे मत व्यक्त केले त्याचा निष्कर्ष असाच निघतो की विद्यार्थ्यांनी सक्रिय राजकारणात भाग घेऊ नये. त्यासाठी आधी भरपूर अभ्यास करावा. चिंतन करावे. राजकारणात भाग घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या कल्पना स्पष्ट असल्या पाहिजेत. एखाद्या विशिष्ट लढ्यात भाग घेण्यापूर्वी तो लढा कशासाठी आहे याचे स्वरूप स्पष्ट झाले पाहिजे. वरवर येणाऱ्या वार्ता, प्रसिद्धीपत्रके यांमुळे विद्यार्थ्यांनी भावनावश न होता प्रत्येक कृती विचारपूर्वक करावी असे जोशी सुचवितात.

**प्रो. विजापूरकर यांचे शैक्षणिक कार्य**

महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणाचा प्रयोग यशस्वीपणे कार्यान्वित करणारे अण्णासाहेब विजापूरकर यांच्याविषयी एक लेख वा.म.जोशी यांनी लिहिला आहे. हा लेख आठवणी व विचार या स्वरूपाचा आहे. त्यात विजापूरकरांच्या शैक्षणिक कार्याविषयी ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्यांचा सारांश असा –

ऑगस्ट १८६३ मध्ये जन्म, राजाराम कॉलेज व डेक्कन कॉलेजमध्ये शिक्षण, नंतर राजाराम कॉलेजमध्ये संस्कृतचे प्रोफेसर. 'ग्रंथमाला' सुरू केली. समर्थ छापखाना सुरू केला. १९०६ च्या जूनमध्ये कोल्हापूरला समर्थ विद्यालय व विश्ववृत्त मासिक सुरू केले. १९०८ मध्ये समर्थ विद्यालय तळेगावास आले. विजापूरकरांना अटक झाली. तीन वर्षे साधी कैद झाली. १९२६ मध्ये त्यांचे निधन झाले.

राष्ट्रीय शिक्षणाची शाळा - समर्थ विद्यालय - सरकारने बंद पाडली. दहा वर्षांनंतर तिचे पुनरूज्जीवन केले. स्वधर्म, स्वदेश व स्वभाषा यांचा अभिमान हे विजापूरकरांचे वैशिष्ट्य. स्वदेशाचे रम्य चित्र सत्यसृष्टीत जिवंत स्वरूपात पहावयास मिळावे यासाठी स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य या साधनांची आवश्यकता त्यांना भासू लागली.

**राष्ट्रीय शिक्षण** म्हणजे "राष्ट्रातील लोकांच्या ताब्यात असलेले व राष्ट्राला उपकारक असे शिक्षण" अशी विजापूरकर यांची व्याख्या होती. राष्ट्रोन्नतीसाठी

व्यापारी व औद्योगिक शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे असे त्यांचे मत होते. बौद्धिक वा वाङ्मयीन शिक्षणाला त्यांचा विरोध नव्हता. पण सर्वांनाच ते शिक्षण आवश्यक आहे असे त्यांना वाटत नव्हते.

समर्थ विद्यालयात दिले जाणारे शिक्षण स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म यांना अनुलक्षून होते यात शंका नाही. पण त्यात बराच अतिरेक होता अशी टीकाटिप्पणी वा.म.जोशी. यांनी केली आहे. उदा. 'केस ठेवणे' हे सुधारकी प्रकार मानले जाऊन समर्थ विद्यालयात बंदी होती. ते ठीकच होते. पण केस ठेवणाऱ्या मुलाला बळजबरीने केस काढायला लावणे योग्य नव्हते. विदेशी माल वापरावयाचा नाही हे ठीक, पण औषधासाठी वापरल्या जाणाऱ्या कॉडलिव्हर ऑइलला बंदी करणे युक्त नव्हते. समर्थ विद्यालयात आगपेट्यांचा कारखाना व काच कारखाना चालविला जात असे. त्याच्या सद्हेतूबद्दलच सरकारने शंका घेतली व जणू काही आगकाड्या या पेटण्यासाठीच उपयोगात आणावयाच्या आहेत असे समजून समर्थ विद्यालयच नंतर बंद पाडले.

विजापूरकरांच्या शैक्षणिक कार्याची ओळख वा. म. जोशी यांनी थोडक्यात अशी करून दिली आहे –

"विजापूरकर हे एक विशिष्ट ध्येयाने पछाडलेले गृहस्थ होते. त्यांना महाराष्ट्राची भावी पिढी देशाभिमानी बनवावयाची होती. त्यांच्या कार्यात त्यांना जहाल व नेमस्त अशा दोन्ही पक्षांतील नेत्यांनी व मान्यवरांनी मदत केली. पण बंगालप्रमाणे महाराष्ट्र शिक्षण देणाऱ्या शाळांनी फुलला नाही. आणि बंगालप्रमाणे येथे या कामासाठी द्रव्यसाहाय्याचा लाखो रूपयांचा वर्षाव झाला नाही ही स्थिती पाहून विजापूरकरांचे मन फार विषण्ण होई."

वा.म.जोशी आणि विजापूरकर यांचा निकटचा सहवास होता. त्यांनी एकत्र काम केले होते. त्यादृष्टीने विजापूरकरांच्या शैक्षणिक कार्याचे त्यांनी केलेले समालोचन विशेष महत्त्वाचे आहे. विजापूरकरांसारख्या कृतिशील विचारवंतांच्या शैक्षणिक कार्याची ही ओळख व त्या कार्याचे थोडक्यात यथोचित मूल्यमापन हे या लेखाचे वैशिष्ट्य आहे. राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रयोगातील महाराष्ट्राचे आघाडीचे कार्यकर्ते या नात्याने शैक्षणिक इतिहासात विजापूरकरांचे स्थान महत्त्वाचे ठरेल.

### विवाहित स्त्रियांची कर्तव्ये

स्त्रीची भूमिका संसारात नेमकी कोणती, समाजात तिचे स्थान कोणते याविषयी सतत चर्चा आणि विचारमंथन सुरू असते. वा.म.जोशी यांनी पण आपले काही विचार या संदर्भात व्यक्त केले आहेत. विवाहित स्त्री ही एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून आणि त्याचवेळी कुटुंबाची घटक म्हणून, तिचा विचार होणे आवश्यक आहे.

विवाहित स्त्रियांनीही आपल्या कर्तव्याबाबत स्वत:च विचार केला पाहिजे. अग्रक्रम कोणत्या कर्तव्याला द्यावा, जबाबदारी कशी सांभाळावी याबाबत स्त्रियांनी विचारपूर्वक निर्णय घेतले पाहिजेत असे वा.म.जोशी सुचवितात. त्यांच्या विचारांचा सारांश असा –

कर्तव्य, जबाबदाऱ्या, हक्क, हे शब्द भाषेच्या कोशातून नष्ट होतील तेव्हाच समाज खरोखर सुसंस्कृत झाला असे म्हणता येईल. विवाहित स्त्रियांनी आधी घर आणि मग समाज ही वृत्ती सामान्यत: स्वीकारावी. स्त्री शिक्षणाचे कार्य आतापर्यंत बरेचसे पुरुषांनी केले आहे. ते अंगावर घेण्यास सुशिक्षित स्त्रियांनी पुढे आले पाहिजे. कायद्याच्या दृष्टीने स्त्रियांची स्थिती सुधारण्याची चळवळही सुक्षिक्षित स्त्रियांनी जोराने चालविली पाहिजे. उत्तम नवी पिढी निर्माण करणे हे कार्य सुशिक्षित स्त्रियांना उत्तम रीतीने करता येईल. त्यासाठी नवऱ्याच्या परवानगीची आवश्यकता नाही. मुले निरोगी, धाडसी, पराक्रमी, सात्त्विक वृत्तीची, सद्‌गुणांची चाहती झाली पाहिजेत. त्यांच्यात धमक उत्पन्न झाली पाहिजे. देशाबद्दलची जाणीव निर्माण झाली पाहिजे.

नव्या पिढीत क्षुद्र जात्याभिमान, देशाभिमान किंवा धर्माभिमान नको आहे. तो दूर करण्याचे कार्य विवाहित स्त्रियांनाच प्रभावीपणे करता येईल. स्त्री जातीतील वैमनस्ये, धर्माधर्मातील मारामाऱ्या, देशादेशांमधीले युद्धे व महायुद्धे यांमुळे जे नुकसान होते ते पुढे कमी कमी होत जाईल अशा प्रकारचे शिक्षण सुशिक्षित स्त्रियांनी आपल्या मुलांना दिले पाहिजे. स्त्रियांनी मुलांना शिक्षण देताना ज्ञाती, देश, धर्म, इ. बद्दलचे निराधार पूर्वग्रह, दुरभिमान यांना थारा द्यायचा नाही असे ठरवावे. सुशिक्षित विवाहित स्त्रियांनी " **आंतरराष्ट्रीय मानवाभिमान** "अशी एक जाणीव मनात ठेवून मुलांना शिक्षण द्यावे. प्रत्यक्ष समाजकार्य स्त्रियांना करता आले नाही तरी पतीला समाजकार्य करणे शक्य करून देणे हे सुद्धा कमी महत्त्वाचे नाही. पतीच्या खुषीत खुषी मानून अनुकूल वातावरण निर्माण करणे हे सुद्धा मोठे कार्य आहे. पतीची अनुकूलता नसतानाही स्त्रियांनी समाजकार्य करण्यास हरकत नाही. पण तेवढी प्रबळ अंत:प्रेरणा हवी. त्यासाठी स्त्रीला कदाचित खूप मोठी किंमत द्यावी लागेल.

सुशिक्षित स्त्रियांच्या कर्तव्यांसंबंधी वा.म.जोशी यांनी या लेखात सर्वांगाने विचार केलेला दिसतो. स्त्रीला ज्या अनेक भूमिका वठवाव्या लागतात त्या लक्षात घेता सुशिक्षित स्त्रीची मानसिक ओढाताण होते. याबाबत स्त्रियांनीच निर्णय घ्यायचा असतो. "प्रबळ अंत:प्रेरणा असेल तर प्रतिकूल वातावरणातही सुशिक्षित स्त्रीने समाजकार्य करावे " हे वा.म.जोशी यांचे विचार पुरोगामी स्वरूपाचे आहेत

आधुनिक काळातही स्त्री सुधारणा, स्त्रियांचे प्रश्न या संदर्भात वेळोवेळी विचार झाला आहे. भारतीय स्त्रीला घटनेने समान दर्जा प्राप्त करून दिला आहे.

असे असले तरी १९७१ पर्यंत तिच्या दर्जात काही फरक पडला का याबाबत मूल्यमापन करण्यासाठी केंद्र शासनाने **डॉ. श्रीमती फुलराणी गुहा** यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीचे निष्कर्ष असे –

माता या दृष्टीने स्त्रियांबाबत समाजाची काही विशेष जबाबदारी आहे. मुलांचे उत्तम संवर्धन व त्यांची सुरक्षितता हा प्रश्न माता पिता व समाज या तिघांचाही आहे. विवाह व मातृत्व हे स्त्रीच्या इतर भूमिकांच्या आड येता कामा नये. या दृष्टीने स्त्रियांनीही आपली राष्ट्रीय व सामाजिक जबाबदारी टाळता कामा नये.

याचा अर्थ या समितीनेही स्त्रीच्या दुहेरी भूमिकेचा विचार केला आहे व तिची संसारातील जबाबदारी आणि तिची सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारी यांचा समन्वय साधून तिचे समाजातील स्थान अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. वा.म.जोशी यांनाही हीच गोष्ट अभिप्रेत होती असे वरील विवेचनातून ध्यानात येते.

### आत्मज्ञान व विद्या

आत्मज्ञान हा विषय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील असला तरी विद्या, बुद्धी आणि आत्मज्ञान यांचा संबंध कोणत्या प्रकारचा आहे याची चिकित्सा करणारा ' स्वत:चा स्वयंवर ' हा निबंध वा.म.जोशी यांनी लिहीला. त्याचा सारांश असा –

माणूस एकाच वेळी अनेक भूमिका वठवतो. यातील भूमिका खरी कोणती ? असा प्रश्न पडतो. आपण जे जे करतो ते ते आपल्या उच्चतम आत्म्याला पूर्णपणे संमत किंवा प्रिय नाही याची जाणीव आपल्या मनाच्या एका कोपऱ्यात दडून बसलेली असते. (मानसशास्त्रीय भाग) पुष्कळ विद्या मिळविली म्हणजे आत्मा सापडेल, खूप बुद्धिमत्ता असली म्हणजे आत्मसमाधान होईल असा काहींचा समज आहे. आत्मलाभाचा आणि विद्वत्तेचा, वक्तृत्वाचा, बुद्धिमत्तेचा विशेष निकटचा संबंध नाही. आत्मलाभाकरिता श्रवण, मनन, निदिध्यास या पायऱ्या सांगितल्या आहेत. त्या पायऱ्या ओलांडल्या की आत्म्याच्या महालात प्रवेश होतो. ग्रीक तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस याने गुरूपदेश केला - तू स्वत:ला ओळख. (नो दायसेल्फ) आपल्या दुरात्म्याला आपला सदात्मा शापदग्ध करीत नाही. तो बहुधा सुप्त राहतो व त्यामुळे आपल्या हृदयात दुरात्म्याचा बराच सावळा गोंधळ चालतो.

शैक्षणिक दृष्ट्या या लेखाचे महत्त्व कोणते याचा विचार केला तर असे दिसते की शिक्षणाचे उद्दिष्टही व्यक्तीला स्वत:ची पूर्णपणे जाण यावी हेच असते. व्यक्तिमनात सदाचार आणि दुराचार यांचा सतत झगडा सुरू असेल तर सदाचाराचा विनाश झाला पाहिजे या दृष्टीने शिक्षणाने नैतिक मूल्यांची जोपासना व त्यांचे संवर्धन करावे अशी अपेक्षा असते.

शिक्षणाने मनुष्य ज्ञानी होतो म्हणजे काय ? ज्ञान पुस्तकात नसते. पुस्तकातील

ज्ञानाच्या सहाय्याने मन सुसंस्कृत होते, उदात्त विचारांची आवड निर्माण होते हे कार्य शिक्षणाला करावयाचे असते.

" शरीर व आत्मा यांना त्यांच्या जन्मजात योग्यतेनुसार पूर्णत्वाप्रत नेणे म्हणजे शिक्षण." अशी प्लेटोची शिक्षणाची व्याख्या आहे. विवेकानंदांनी जो शिक्षणविचार मांडला आहे त्यातही त्यांनी ज्ञानप्राप्ती आणि आत्मानुभूती यांच्या संबंधांचे विवरण केले आहे.

" ज्ञानप्राप्ती म्हणजे स्वत:जवळच असलेल्या ज्ञानाची ओळख होणे, जाणीव होणे, त्याचा प्रत्यक्ष अनुभव येणे. हीच आत्मानुभूती, हेच आत्मज्ञान, हाच आत्मसाक्षात्कार."

वा.म.जोशी यांनी आत्मलाभ असा शब्द योजिला आहे. प्लेटो काय, किंवा विवेकानंद काय, दोघांनाही शिक्षण म्हणजे ज्ञान व ज्ञान म्हणजे आत्मज्ञान, आत्मविकास असाच अर्थ अभिप्रेत आहे. वा.म.जोशी हेही याच दृष्टिकोनातून शिक्षणाकडे बघतात.

ज्ञानग्रहणाच्या ज्या विविध पायऱ्या अध्यापन पद्धतीत सांगितल्या जातात त्याच आत्मलाभाच्याही आहेत. श्रवण, मनन, आणि निदिध्यास या मार्गाने आत्मलाभापर्यंत जाता येते असे वा.म.जोशी म्हणतात. आत्मलाभासाठी अशा अभ्यासाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादली आहे. औपचारिक शिक्षण पुष्कळ घेतले. अनेक पाठ्यपुस्तके वाचली. ग्रंथांचे अध्ययन केले तरी मनुष्य आत्मज्ञानाच्या पायरीपर्यंत जाईलच असे नाही. अज्ञानाचे पटल दूर होणे आणि स्वत:ला ओळखून पूर्णत्वाप्रत जाणे यातच ज्ञानाची फलश्रुती आहे. वा.म.जोशी यांनी याच दृष्टिकोनातून हा लेख लिहिला आहे. 'आत्म्याला वरणे' म्हणजे स्वत:चा स्वयंवर घडवून आणणे. पण ही प्रक्रिया सोपी नाही. स्वयंवराप्रमाणे ज्याला वरायचे त्याची पूर्ण ओळख झाली पाहिजे. ही ओळख कशी होईल याचे मार्गदर्शन वा.म.जोशी यांनी चर्चेच्या ओघात केले आहे. मनुष्याच्या अंत:करणातील सद्भाव सतत जागृत राहणे आणि त्याचेच प्राबल्य असणे हे यासाठी आवश्यक आहे.

## नीतिशिक्षण व धर्मशिक्षण

वा.म.जोशी हे स्वत: शिक्षक व प्राध्यापक होते. तत्त्वज्ञान व मानसशास्त्र हे त्यांचे अध्यापनाचे विषय होते. स्वाभाविकपणेच त्यांच्या लेखनात त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवातील विषय आले आहेत. " मुलांना नीतिशिक्षण व धर्मशिक्षण दिले पाहिजे " या मताची चर्चा करताना वा.म.जोशी यांनी मुलांच्या मानसशास्त्राविषयी काही विचार व्यक्त केले आहेत. आपल्या लेखाच्या सुरूवातीलाच वा.म.जोशी म्हणतात –" मुलांना खेळू द्या म्हणजे ती अभ्यास करतील, त्यांच्या आवडीनिवडी

पुरवा म्हणजे त्यांच्या नीति-अनीतीकडे दुर्लक्ष केले तरी चालेल. त्यांचे शरीर निकोप असू द्या म्हणजे त्यांचे मन निकोप राहिल. मुलांना अभ्यासाशिवाय इतर नाद पुष्कळ असू द्या म्हणजे त्यांचा अभ्यास उत्तम होईल.''

वरील विधानात पूर्ण सत्य नसले तरी सत्यार्थ निश्चितच आहे असे सांगून जोशी म्हणतात –

''प्रत्यक्ष नीतिशिक्षण किंवा धर्मशिक्षण देण्यासंबंधी माझे मत अनुकूल आहे. पण ते कोणी कसे द्यावयाचे याविषयी सांगणे आवश्यक आहे.''

## मुलांचे मानसशास्त्र

मुलांमध्ये काही उणीवा असल्यास त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होतो. त्या उणीवा लपविण्यासाठी मुले अनिष्ट मार्गाचा अवलंब करतात. मुले खोड्या व उनाडक्या करतात कारण त्यांच्या आवडीनिवडीकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. अभ्यासात काही मुले चांगली नसतील. पण अभिनय, खेळ यात ती निपुण असतील. त्यांच्या या नैपुण्याचे कौतुक करावे. त्यांना वाव द्यावा. म्हणजे ती अनिष्ट मार्गाचा अवलंब करणार नाहीत.

## शिक्षक व मुख्याध्यापक यांची कर्तव्ये

शिक्षक व मुख्याध्यापक यांचेविषयी आदरभाव असेल तर त्यांच्या शीलाचा मुलांच्या मनावर सुपरिणाम होऊ शकतो. मुलांना आपल्या विषयी नुसता आदरच नव्हे तर विश्वास आणि आपलेपणा वाटेल असे शिक्षक व मुख्याध्यापक यांचे वागणे हवे. शिक्षक तामसी व रूक्ष व तापट असतील तर असे शिक्षक अप्रत्यक्षरीत्या मुलांना अनीतीमान करतात. शिकताना मुलांना आनंद वाटला पाहिजे. शिक्षकांनी मुलांशी मोकळेपणाने वागावे.

## धर्मशिक्षणाचा प्रश्न गुंतागुंतीचा

शाळेत धर्मशिक्षण द्यायचे म्हटले तर अनेक समस्या निर्माण होतील. एकाच शाळेत निरनिराळ्या धर्माची मुले असतील तर त्यांच्याकरता स्वतंत्र व्यवस्था करणे खर्चाचे होईल. याकरता सर्वसाधारण धर्माचेच शिक्षण द्यावे. 'सर्वसाधारण धर्म आणि नीति' यात फारसा फरक नाही.

## नीती-शिक्षण

मोकळेपणा म्हणजे बेशिस्त नव्हे. मुलांना मनसोक्त वागू द्यावे असा मोकळेपणाचा अर्थ नाही. मात्र कृत्रिम बंधने व लादलेली शिस्त असू नये. नीतिशिक्षणासाठी शाळेत विविध मार्ग अवलंबिता येतील. सन्मार्गाकडे मुलांची

प्रवृत्ती रहावी यासाठी दुसऱ्या दिशांनी प्रयत्न करण्याची जरूरी आहेच.

### वा. म. जोशी यांचा आक्षेप

सांघिक खेळाद्वारे खिलाडूपणाचें शिक्षण मिळते. म्हणजे ते व्यवहारात उपयोगी पडते असे नाही. हा कार्यकारणभाव सिद्ध नाही असे जोशी यांचे मत आहे.

एका क्षेत्रातले गुण पाण्यात पडलेल्या तेलबिंदूप्रमाणे जीवनाच्या सगळ्या क्षेत्रात पसरतात असे मानसशास्त्र सांगत नाही.

यासाठी जोशी यांनी निरनिराळी उदाहरणे दिली आहेत. ती अशी...

गायनातला ताल उत्तम समजणारा माणूस जीवनात "बेताल"वागू शकतो. गणितातले हिशेब चांगले असले तरी वागणे हिशेबी असेलच असे नाही. पोषाख नीटनेटका करणारा गृहस्थ संसार नीटनेटका करेलच असे नाही.

### व्यवस्थितपणाच्या सवयी

शाळेत लावण्यात येणाऱ्या व्यवस्थितपणाच्या सवयी, स्वच्छतेची आवड या गोष्टी मात्र पुढे जन्मभर टिकतात असे वा. म. जोशी यांचे मत आहे. मुलांनी ज्या गोष्टी पटवून घेतल्या, अंगी बाणवल्या आणि त्याप्रमाणे वर्तन केले त्याच गोष्टीबाबत त्यांचे नीतिशिक्षण झाले असे समजावे.

### प्रत्यक्ष नीतीचा उपदेश

आईवडील, गुरू, ज्येष्ठ नातेवाईक यांच्या आदर्श वर्तनाचा नैतिकदृष्ट्या मुलांच्या मनावर परिणाम होतो. अशा वेळी मुलांना चांगले-वाईट. सत्-असत्, योग्य-अयोग्य यांचा भेद कळलाच पाहिजे. यासाठी अधिकारवाणीने कुणीतरी सदुपदेश करावा. पण ज्याचे वर्तन या उपदेशास अनुसरून असेल अशांनीच हा उपदेश करावा. सामान्य दर्जाच्या शिक्षकांना या नैतिक प्रवचनांच्या फंदात सहसा पडू देऊ नये.

### अनीती म्हणजे काय ?

नैतिक सदुपदेशाबरोबरच अनीती म्हणजे काय हे कळण्यासाठी शिक्षकांनी तसे प्रकार उदाहरणे देऊन मुलांना पटवून द्यावेत. हे चांगले का व हे वाईट का याचा विवेक मुलांना करता यायला हवा. मुलांनी अशा घटनांबाबत प्रश्न विचारले तर त्यांना गप्प बसा असे म्हणू नये.

### नैतिक मूल्ये आत्मसात् करणे महत्त्वाचे

मुलांसमोर एकादे ध्येय ठेवून त्यानुसार त्यांना वर्तन करायला लावणे हे

नीतिशिक्षणाच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. शिक्षक व पालक यांनी प्रथम असे ध्येय मुलांच्या मनावर बिंबवावे. ते मुलांच्या फार आवाक्याबाहेरचे व न झेपणारे असू नये. आपणास हे ध्येय झेपत आहे असा आत्मप्रत्यय मुलांमध्ये निर्माण करणे महत्त्वाचे असते. मुलांच्या स्वभावात सुसंबद्धता, एक धोरणीपणा उत्पन्न होण्यासाठी एखादा उत्तम नाद लागणे, एखाद्या गोष्टीबद्दल विशेष आस्था असणे, हे उपयुक्त. स्वदेशीसारख्या विषयाबद्दल श्रद्धा आणि विश्वास, उत्साह उत्पन्न करता आला तर मुलांच्या वर्तनात इतरही स्पृहणीय सदगुण दिसू लागतात. वा. म. जोशी यांचा नैतिक शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन असा आहे. या प्रश्नाचा विचार मुलांचे मानसशास्त्र सोडून ते करत नाहीत. उलट मानसशास्त्राशिवाय नैतिक शिक्षणाचा विचार करणे युक्त नाही असे त्यांना वाटते.

### ध्येय हाच देव

या निबंधात ध्येय आणि देव या भिन्न संकल्पनांसंबधी समज, रूढी, मते यांचा विचार करून यांनी ध्येय हाच देव असा स्वत:चा निष्कर्ष काढला आहे. प्रत्येक व्यक्तीला जीवनात काही ना काही ध्येय असले पाहिजे. या ध्येयाच्या मार्गाने जाण्यात निश्चित आंनद मिळतो. देवभक्तीने मिळणारा आनंद आणि ध्येयभक्तीने मिळणारा आनंद यात मूलभूत फरक आहे हे वा. म. जोशी यांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या विचारांचा सारांश खालीलप्रमाणे—

जगात सुव्यवस्था आहे तशी कुव्यवस्थाही आहे. सुव्यवस्थेचा निर्माता ईश्वर असेल तर कुव्यवस्थेचा निर्माता सैतान मानावयाचा का ?

ईश्वर नसला तरी मानावा असे म्हणणारे जे लोक आहेत त्यांना असा प्रश्न विचारावासा वाटतो की एखादा मुद्दा न समजता तो समजला आहे असे एखाद्या विद्यार्थ्याने सांगितले तर सामान्य शिक्षकालाही आनंद होत नाही.

देव नसेल तर नीतीला काय आधार आहे असे म्हणणाऱ्यांना हे सांगणे आवश्यक आहे की २+ २ = ४ हे ईश्वर असला तरी किंवा नसला तरी आपण खरे मानतो. मग नीतिनियमांना ईश्वराचा आधार कशाला ?

देवाबद्दल नवी पिढी ध्येय हा शब्द वापरू लागली आहे. प्रत्येकाचे ध्येय निराळे असणे शक्य आहे.

आस्तिक कोण ? आपापले जे ध्येय असेल त्याची काया-वाचा-मनेकरून पूजा करणारे ते आस्तिक, मग ते देवाला मानोत अगर न मानोत.

आपापल्या कल्पनेप्रमाणे आपापल्या ध्येयाचे रम्य मानसिक ध्यान कल्पून आपल्या मानसपूजेने, वाचिक पूजेने, व कायिक पूजेने त्याला मूर्त, सत्य, सजीव, आंनददायक स्वरूप देणारे सच्चिदानंदाचीच भक्ती करतात.

ध्येयावर भक्ती करणाऱ्यांना उच्चतर असा आनंद मिळतो. जगाच्या सुव्यवस्थेत वा कुव्यवस्थेत काही फरक करावयाचा असेल तर तो आपणच केला पाहिजे, देवावर भार टाकून चालणार नाही. आपला उद्योग आपणच केला पाहिजे असे "निश्चयाचे बळ" ध्येय पूजकाला लाभते. ते लाभण्याचे समाधान उच्चतर असते.

देवसृष्टीची कल्पना रम्य आहे. पण ध्येयसृष्टीची कल्पना त्याहून रम्यतर अशी आहे. प्रत्येक मनुष्याला चांगले शिक्षण मिळाले आहे, हरतऱ्हेच्या काव्यनृत्यगायनादि कलांचे सात्विक विलास उपभोगण्याची संधी मिळत आहे, कोणी तत्त्वचिंतनात गुंतलेले आहेत, कोणी विद्यार्थी विद्यार्थिनींना शिकविताहेत, कोणी शेतकी सुधारण्याचे प्रयत्न करीत आहेत, जातिभेद नाही, स्त्री-पुरूष भेद आवश्यक व इष्ट तेवढाच आहे. ... अशा प्रकारचे ध्येय देवापेक्षाही रम्य आहे.

वरील प्रकारचे ध्येय अशक्य कोटीतील आहे असे वाटणे संभव आहे. पण तसे वाटण्याचे कारण नाही. आपण संपत्ती, हक्क, शक्ती, चढाओढ यांची भाषा नेहमी बोलतो. ही माणसाच्या खऱ्या आत्म्याची भाषा नाही. जन्मभाषा जाऊन अपरिचित भाषा आपण जवळ केली. विकृत समाजरचनेमुळे भलत्याच गोष्टींची माणसांवर दडपणे आली.

राष्ट्राराष्ट्रातला संशय नुसता दूर झाला तरी कोट्यवधी रुपये वाचतील. लाखो लोक विनाशक कार्याची व साधनांची पूर्वतयारी करण्यात गुंतले आहेत. हेच लोक उत्पादक व उपयुक्त कार्ये करू शकतील.

ध्येय व्यापक असो वा छोटे असो, एखाद्या लहानशा खेडेगावाची, संस्थेची, कुटुंबाची किंवा स्वत:ची उन्नती करावयाची अशा प्रकारचे आकुंचित ध्येय असले तरी चालेल. पण त्यावर गाढ श्रद्धा हवी.

वयोमान, अनुभव वा विचार यानुसार ध्येयात बदल होईल. तो तसा झाला तरी चालेल. पण ध्येय आवश्यक आहे.

ध्येय हाच देव या निबंधात व्यक्त झालेला विचारांचा शैक्षणिक सारांश असा—

कोणतही कार्य उद्दिष्टहीन असता कामा नये.

श्रमाला प्रतिष्ठा असावी.

मन विशाल व व्यापक व्हावे व त्यास अनुसरून व्यक्तीचा विकास व्हावा.

माणसाने उत्पादक व उपयुक्त कार्य करावे. त्याची दृष्टी समाजाभिमुख व विधायक असावी.

कोणत्याही निर्णयाला विवेकाचा आधार असावा. आणि त्या निर्णयाच्या अंमलबजावणीत निश्चयाचे बळ असावे.

या तत्त्वांना अनुलक्षून शिक्षणक्रमात ध्येयवृत्तीचा अतंर्भाव असेल तर शिक्षणाचे कार्य अधिकाधिक फलदायी होईल.

**नैतिक आचरणाला ज्ञानाचे साहाय्य**

"नीतिशास्त्राविषयी काही विचार" या निबंधात नीतिशास्त्र शिकून उपयोग काय या प्रश्नाची चर्चा वा. म. जोशी यांनी केली आहे. शिक्षणात नीतिविचारास महत्त्वाचे स्थान असल्याने या निबंधाचा विचार येथे केला आहे. सारांश असा—

नीतिमत्ता ही प्रकृतिस्वभाव, सवयी, शिक्षण, श्रेष्ठजनांची उदाहरणे, तात्त्विक मते इत्यादिकांवर अवलंबून असते. यातील प्रकृतिस्वभाव नीतिशास्त्राच्या अध्ययनाने बदलणार नाही. पण चांगले व वाईट काय याचे ज्ञान मुनष्याला झाले तर इंद्रियांचे नियमन करण्याकडे त्याची प्रवृत्ती होऊ लागते. सवयीसुद्धा विवेकाने बदलता येतात. जीविताचे ध्येय किंवा नैतिक तत्त्वे निश्चित ठरलेली नसली तर जीवनात सर्वच बाबतीत बरीच अनिश्चितता येते. नीतिविषयक भलत्या कल्पनांमुळे नौकेला भलती दिशा लागण्याचा संभव असतो. तरीही नीतीचे ज्ञान हवेच. नीतिशास्त्र शिकल्याने माणूस साधुसंत मालिकेत बसणारा झाला नाही तरीही त्याच्या नैतिक आचरणाला नैतिक ज्ञानाचे साहाय्य होतेच.

नीतिशास्त्राचा केवळ काथ्याकूट करीत बसू नये. नैतिक दृष्टी ही आचरणात शुद्धता व उच्चता आणण्याकरिता असते, नीतितत्त्वांची शाब्दिक चर्चा करण्याकरता नव्हे. सद्विचार कोणता याचा सूक्ष्म उहापोह करण्याच्या नादात सद्वर्तन करण्याचे राहून जाते. नीतिविचाराचे परिणाम अपवादात्मक आहेत. नीतिचर्चा कर्मप्रवृत्तीला विघातक नाही. नीतिशास्त्राच्या अध्ययनाला सद्वासना, सत्संगती, सुशिक्षण यांची जोड मिळणे आवश्यक आहे.

वा.म.जोशी यांचे नीतिशास्त्राच्या अध्ययनासंबंधीचे विचार व्यावहारिक आहेत. नीती ही आचरणासाठी असते, चर्चा करण्यासाठी नाही. हे त्यांच्या विचाराचे सार आहे. शिक्षणाच्या अनेक उद्दिष्टांपैकी नैतिक विकास हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट मानले जाते. शिक्षणाच्या तत्त्वज्ञानातही आचारप्रधान नैतिकतेलाच महत्त्व देण्यात येते. वा.म.जोशी यांचेही विचार तसेच आहेत.

**अलफ्रेड ॲडलर**

अलफ्रेड ॲडलर या प्रख्यात पाश्चात्य मानसशास्त्रज्ञासंबंधी एक लेख वा.म.जोशी यांनी लिहिला आहे. सुरुवातीलाच त्याचा चरित्रविषयक भाग कथन करून नंतर त्याच्या मानसशास्त्रीय सिद्धांतांचा परिचय वा. म. जोशी यांनी करून दिला आहे. सिग्मंड फ्रॉइड या मानसशास्त्रज्ञाच्या विचारांना शैक्षणिक मानसशास्त्रात स्थान दिलेले आहे. ॲडलर फ्रॉइडचा शिष्य. पुढे दोघांत भिन्नता निर्माण झाली.

या लेखातील विचारांचा सारांश असा –

फ्रॉइड याने इतर सर्व वासनांपेक्षा कामवासनेवर भर देऊन आपल्या मताचे विवरण केले. फ्रॉइडचा पट्टशिष्य ॲडलर याने कामप्रेरणेपेक्षा अहंभावावर अधिक भर दिला आहे. जाणीव व नेणीव मूलत: भिन्न नाहीत. त्यात भेद आहे. पण तो सापेक्ष आहे. जाणिवेत नेणिवेचा अंश असतो, नेणिवेत जाणिवेचा भाग असतो. कामप्रेरणेपेक्षा अहंविकासाची दुर्दम्य प्रेरणाच मानवजातीत प्रभावी आहे. कामवासनामूलक दिसणारे प्रकार हे अहंवैशिष्ट्य स्थापनेचे विकृत प्रकार आहेत. बरेचसे मानसिक व शारीरिक विकार सुप्त व गुप्त कामवासनेमुळे नव्हे तर अहंवैशिष्ट्याला न्यूनगंडामुळे बाध येतो म्हणून उत्पन्न होतात.

ॲडलरने आपल्या पंथाला व्यक्तिविशिष्ट मानसशास्त्र असे नाव दिले. व्यक्तिमात्रात काही ना काही न्यून असते. त्याविरूद्ध खूपच गुण आपल्यात आहेत असे दाखविणारी वृत्ती माणसात उत्पन्न होते. "अधिक ते सरते व न्यून ते पुरते" करून घ्यावे असे आपण म्हणतो. प्रत्येक व्यक्ती न्यून पुरते करून घेण्याच्या उद्योगातच असते. उदा. काही स्त्रिया आपण मुळीच अबला नाही असे ठासून सांगतात. दोन समाजांची, दोन जातींची एकमेकांविरूद्ध ओरड कित्येकवेळा न्यूनगंडातून निर्माण होते. आपले न्यून मनुष्य इतरांपासून नव्हे तर स्वत:पासूनही लपवतो. असे करताना अनेक युक्त्यांचा व हिकमतींचा वापर करतो. मुद्दाम आजारी पडून लोकांचे लक्ष वेधतो.

ॲडलरचे मनोगाहनतत्त्व ओळखले तर ते हिताचेच होईल. व्यक्तीने आत्मनिरीक्षण करून आपले न्यून ओळखावे. स्वत:चा दोष स्वत:च दुरूस्त करावा. स्वत:ची फसवणूक करून मोठेपणा किंवा वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न करू नये. शिक्षणशास्त्रातही ॲडलरच्या तत्त्वांचे विशेष महत्त्व आहे. मुलांचा कल कोणीकडे, त्यांच्यातील उणीवा कोणत्या हे ओळखून त्यांना शिक्षण द्यावे. पालक व शिक्षक यांनी बारकाईने याचा शोध घ्यावा. समाजशास्त्रज्ञांनीही हे तत्त्व ओळखले तर अनेक संघर्ष कमी होतील.

ॲडलरच्या या परिचयलेखात वा. म. जोशी यांनी ॲडलरचे मानसशास्त्रीय सिद्धांत, फ्रॉइडचे सिद्धांत आणि ॲडलरच्या सिद्धांताचे शैक्षणिक व समाजशास्त्रीय भूमिकेवरून उपयोजन याविषयी विचार मांडले आहेत.

ॲडलरच्या मानसशास्त्रीय सिद्धांतांचा बराचसा भाग न्यूनगंडावर आधारलेला आहे.

कोणत्याही प्रकारचा गंड असेल तर शैक्षणिक विचाराच्या दृष्टीने त्या गंडाबद्दल असे म्हणता येते –

"गंडामुळे व्यक्ती परिस्थितीशी नीट समायोजन साधू शकत नाही. तिचे

मानसिक आरोग्य नष्ट होते. मुलाच्या मनात न्यूनगंड निर्माण झाला असेल तर त्याला जमेल असे काम देऊन त्याचा आत्मविश्वास वाढविला पाहिजे. उच्चत्व गंड असणाऱ्या मुलाला वस्तुस्थितीची जाणीव करून दिली पाहिजे.''

ॲडलरच्या मानसशास्त्रीय सिद्धांतात यापुढची पायरी आहे. अहंगंडाची पूर्ती होत नसल्याबद्दल न्यूनगंड निर्माण होतो असे ॲडलरचे म्हणणे आहे. वा. म. जोशी यांनी सोदाहरण या गोष्टीची चर्चा केली आहे.

मुले अनेक वेळा खोटी कारणे सांगतात, आजारी पडतात, लक्ष वेधून घेतात. या लक्ष वेधण्याच्या क्रियेमागे ॲडलरचा सिद्धांत आहे. शिक्षणकाळात अशा मुलांना समजून घेऊन त्यांचेबाबत निर्णय घेणे हे अत्यंत आवश्यक आहे. जोशी यांनी ॲडलरच्या सिद्धांताचा करून दिलेला हा परिचय शैक्षणिक समाजशास्त्रीयदृष्ट्या मोलाचा आहे.

### फ्राइड आणि कामवासना

ॲडलरप्रमाणे फ्राइड या मानसशास्त्रज्ञाच्या कामवासनाविषयक सिद्धांताची चर्चा करणारा निबंध वा. म. जोशी यांनी लिहिला आहे. फ्राइड हा ॲडलरचा गुरू. साहित्यक्षेत्रात, साहित्यनिर्मितीबाबत साहित्यसमीक्षकांनी फ्राइडच्या कामवासना सिद्धांताची बरीच चर्चा केली. त्यानिमित्त जोशी यांनी हा लेख लिहिला. या लेखातील सारांशरूप मुद्दे असे –

फ्राइड हा नीतिनियमांचे उल्लंघन करा असे सांगत नाही. काही शारीरिक व मानसिक रोग कसे उत्पन्न होतात ते सांगतो. नीतिनियम झुगारून देणे हा मानसिक रोगनिवारणाचा मार्ग नव्हे. उलट तो मार्ग मानसशास्त्राच्या दृष्टीने चुकीचा व घातुक ठरेल. सुसंस्कृत समाजात, मानवी मनात सुखलालसा व औचित्यविचार यांमध्ये पुष्कळ वेळा लढा उत्पन्न होतो. सुखलालसा दडवली तरी ती वेगवेगळी रूपे घेऊन पुन्हा केव्हा तरी वर उफाळते. कामवासना कित्येक वेळा अगदी धार्मिक सोवळी वस्त्रेंही परिधान करते. पण ते सोंग असते. साहित्यनिर्मिती, कलानिर्मिती, अशा रूपानेही ही कामवासना वाट मिळवते. दडपून टाकलेल्या कामवासनेमुळे फिटस् येणे, विद्वेष निर्माण होणे, वेड लागणे इ. विकृती निर्माण होऊ शकतात.

### चुकीचे अनुमान

या सर्व गोष्टींवरून असे चुकीचे अनुमान काढण्यात येते की कामवासना तृप्त करण्याच्या आड येणारी समाजरचना, विवाहपद्धती, नीतिनियम या गोष्टी वरील रोगांना कारणीभूत होतात. पण... सर्व रोगांचे पाप कामवासनेच्या माथी मारण्यात काही अर्थ नाही. शिवाय, कामवासनेला वाव मिळाला नाही म्हणून रोग झाला असे गृहीत धरले तरी तिची तृप्ती हा खरा उपाय ठरत नाही. मानसिक रोगाचे

कारण शोधून काढण्यानेच निम्मे रोग बव्हंशी बरे होतात. दडपलेली कामेच्छा माणूस इतरांपासूच नव्हे तर स्वत:पासूनही लपवून ठेवतो. ती नेणिवेत बसते. अनीतीचे, अनुचित विचार त्या माणसालाही असह्य होतात व रोग होतो. या अनुचित कामप्रवण विचारांना उजेडात आणण्याचे काम करावे लागते. अनुचित विचारांना मनुष्य जागतेपणी थारा देत नाही म्हणून ते नेणिवेत लपतात. कित्येक वेळा स्वप्नांमध्ये या अनुचित विचारांचा थांगपत्ता लागू शकतो. **रोग्याच्या स्वप्नांची मीमांसा करावी.** रोग्याला मनमोकळे बोलू द्यावे. अप्रतिबंध विचारांची साहचर्यमीमांसा असे याला म्हणता येते. याशिवाय चिकित्सक-नियमित-साहचर्य मीमांसा (फ्री असोसिएशन, कंट्रोल्ड असोसिएशन) या मार्गानेही रोगबीज सापडते. याप्रमाणे गुप्त-सुप्त रोगबीजाचे ज्ञान झाले म्हणजे तेच रोगनाश करते.

संभाषण - चिकित्सा हा मानसशास्त्रातला एक रोगचिकित्सा प्रकार आहे. त्यातील बीज हेच आहे. आत्मवंचनेने रोग होतो, आत्मज्ञानाने रोगनाश होतो. ज्ञानान्मोक्ष, हे वेदांतातील तत्त्व याबाबत खरे आहे. ख्रिस्त्री धर्मोपदेशक पापे कबूल करावयास लावतात, "पश्चात ज्ञानेन शुध्यति" असेच त्याचे रूप आहे. मानसिक विकृती घालविण्याचा आणखी एक चांगला मार्ग म्हणजे अतृप्त वासनांचे उदात्तीकरण होय. मूल न होणारी स्त्री दुसऱ्याचे मूल संभाळून अपत्यवात्सल्य भावनेचे उदात्तीकरण करू शकते. त्याप्रमाणे कामवासनेचे उदात्तीकरण खालील गोष्टींवरून करता येईल –

प्रणयकाव्य लिहिणे, प्रणयप्रधान काव्याचा आस्वाद घेणे, स्त्रीदाक्षिण्य, राधाकृष्णादि कथांचे कथन व श्रवण, अबलोन्नतीकारक समाजसेवा. कामवासनेला सध्याच्या समाज घटनेमुळे आणि नीतिनियमांमुळे अनिर्बंध वाव मिळत नाही. म्हणून ही घटना आणि ही नियमनेच झुगारून द्यावीत याला फ्रॉइडच्या मानसशास्त्रात आधार नाही. उलट ही नियमने टाकून दिल्यास पुन: विकृती होण्याचा संभव असतो असे फ्रॉइडचे म्हणणे आहे.

फ्रॉइडच्या मानसशास्त्रीय सिद्धांताबाबत वा. म. जोशी यांचे विचार वरीलप्रमाणे आहेत.

## मुलांची हसरी सृष्टी

मुलांच्या समोर वा. म. जोशी यांनी दिलेल्या एका व्याख्यानाचे हे लेख स्वरूप आहे. या व्याख्यानात मुले, शिक्षक, शाळा, क्रीडांगण, खेळ, भविष्यकाळ, ज्ञानाची साधने इ. अनेक विषय भाषणाच्या ओघात येऊन गेले आहेत. त्या लेखाचा सारांश असा –

**शाळा** –पूर्वीच्यापेक्षा शाळा खूप चांगल्या आहेत. विशाल क्रीडांगणे आहेत. शिक्षणाची अनेक साधने आहेत. निरनिराळ्या शिक्षणपद्धती आहेत. शालागृहे सुंदर व हवेशीर आहेत. (तळेगावला वा. म. जोशी शिकवीत असत. तेथील आठवण

त्यांनी दिली. पत्र्याच्या झोपड्या असायच्या, त्या पावसाळ्यात गळत)

**शिक्षा** – पूर्वी शाळेत छडीचा खुराक असे. (वामनराव जोशी स्वत: मानेवर खडा ठेवून लिहायला शिकले.) मानेवरचा खडा पडला की छडी बसे. (त्यांना एकदा वर्गातील पेटीत कोंडून ठेवले होते.) काही शाळांतून घोडीवर चढवून मिरच्याची धुरी देत. आता नव्या काळात हे शिक्षेचे प्रकार गेले.

**व्यवस्थितपणा** – शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या दृष्टीने पोषाखाच्या बाबतीत व्यवस्थितपणा आला आहे. विशिष्ट पोषाख घालून ड्रिल करणे, बॉय-स्काऊटचा गणवेश इ. गोष्टी व्यवस्थितपणाच्या निदर्शक आहेत.

**भविष्यकाळ कठीण पण उज्ज्वल** – नोकरी व्यवसायाच्या दृष्टीने मुलांचा भविष्यकाळ कठीण आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर बी. ए. च्या वर्गात असतानाच त्यांना फर्स्ट असिस्टंटची नोकरी मिळाली. पण आता कित्येक मुले बेकार आहेत. बी. ए. आहेत पण नोकरी नाही. या दृष्टीने मुलांचे भविष्य कठीण असले तरी ज्ञानाच्या दृष्टीने ते उज्ज्वलच आहे.

**ज्ञानासाठी एकाग्रतेने वाचन** – ज्ञान मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने वाचन केले पाहिजे. आवडतील ती पुस्तके वाचावीत. जे आवडते ते वाचावे. कारण जे आवडते ते समजते. आनंदाने वाचावे. एकाग्रतेने वाचावे. म्हणजे ज्ञान मिळते.

**ज्ञानासाठी प्रश्न विचारा** – प्रश्न विचारणे हे ज्ञानाचे उत्तम साधन आहे. मुलांनी प्रश्न विचारलेच पाहिजेत. मुलींनीही न लाजता प्रश्न विचारले पाहिजेत. खऱ्या शिक्षकाला प्रश्नांचा कंटाळा येत नाही. प्रश्न विचारा, उत्तरे मिळवा, आपले अज्ञान प्रकट होईल म्हणून गप्प बसू नका. शिक्षकांनीही जागृत जिज्ञासेला ज्ञान द्यावे. श्रीकृष्णांनीही गीतेत "परिप्रश्नेन सेवया" असे ज्ञान मिळविण्याचे मार्ग सांगितले. अर्जुनाने प्रश्न विचारून श्रीकृष्णाचा पिच्छा पुरविला. पण श्रीकृष्ण रागावला नाही. अर्जुनाच्या सर्व शंका दूर केल्या. या प्रश्नपद्धतीमुळेच अर्जुनाला ज्ञान झाले.

शिकविणे म्हणजे व्याख्यानबाजी नव्हे. आईला प्रश्न विचारून विचारून मुले ज्ञान मिळवितात. तीच पद्धत एरवीही असली पाहिजे.

**दुसऱ्याचे ऐकावे, स्वत:च्या विचाराप्रमाणे वागावे** – मुलांचे आणि वडील मंडळींचे मतभेद होतील. ते होणारच. आपले मत सोडा असे म्हणता येणार नाही. पण कोणताही निर्णय घेण्यापूर्वी दुसरे काय म्हणतात याचा विचार करूनच निर्णय घ्यावा. एका लेखकाने म्हटले आहे. "जो फक्त इंग्लंड जाणतो त्याला इंग्लंड समजले नाही. इंग्लंड समजायला हवे असेल तर आधी जग समजून घे." या दृष्टीने, विरूद्ध बाजूची मते ऐकावी, सभांना जावे, नाना ग्रंथ वाचावे, आणि मग हळुहळू आपली मते निश्चित करावीत.

**शिक्षकांनी स्वत:ला कमी लेखू नये** – शिक्षकांनी, त्यांना समाजात मान

असो वा नसो, स्वत:तरी स्वत:स मान द्यावा. आपण स्वत:लाच कमी लेखले तर जग कमी लेखणार, नाही का? शिक्षकांनी अनाठायी नम्रता व विनय ठेवू नये. "मला पगार कमी असला तरी मी तुच्छ नाही" अशी भावना शिक्षकांची असली पाहिजे.

वा.म. जोशी यांनी हे विविध विचार मुलांसमोर बोलताना प्रकट केले. हे एक प्रकारचे प्रकट चिंतन होते. त्याला नंतर लेखाचे स्वरूप देण्यात आले. या लेखात मुलांचे मानसशास्त्र, शाळा, ज्ञानासाठी कष्ट हे विषय तर आलेच आहेत. पण शिक्षकांनी स्वाभिमानी असावे. व त्यांनी स्वत:ला कमी समजू नये हा एक विशेष विचार या लेखात प्रकट झाला आहे. याशिवाय अलीकडे "जनरेशन गॅप" ही कल्पना बहुचर्चित आहे. त्यासंदर्भात नव्या पिढीला वा.म. जोशी यांनी दिलेला सबुरीचा सल्ला लक्षात घेण्यासारखा आहे.

**ज्ञानमहती** – पुणे येथील सारस्वत मंडळ व मुंबईचे एल्फिन्स्टन कॉलेज या ठिकाणी वा.म. जोशी यांनी व्याख्याने दिली. विषय होता "ज्ञान हे विष की अमृत" या विषयाचा पूर्वपक्ष व उत्तरपक्ष अशा दोन्ही बाजूंचा विचार करून नंतर त्यावर एक निबंध तयार करण्यात आला.

"ज्ञान नेमके काय करते? याबद्दल पूर्वपक्षात वा.म. जोशी यांनी जे आक्षेप उपस्थित केले आहेत ते असे

ज्ञानामुळे जीवनातील काव्याची व रम्यत्वाची हानी होते.

ज्ञानामुळे नीतिमत्तेचा व धार्मिकतेचा आधार अस्थिर होतो.

ज्ञानामुळे सत्य अधिक अस्पष्ट, अनिश्चित व अस्थिर केले जाते.

यानंतर वा. म. जोशी यांनी एकेक मुद्दा घेऊन ज्ञानाची महती किती आहे हे सिध्द केले आहे.

"विद्वत्त्वाच्या वाढीबरोबर कविताशक्ती आणि कविताभिरुची हीनबळ होते असे मेकॉले वगैरेचे जे म्हणणे आहे ते अनुभवाच्या व युक्तिवादाच्या विरुध्द आहे. ज्ञानदेव ज्ञाते झाले म्हणून त्यांची स्फूर्ती किंवा रसिकता कमी झाली नाही."आधिभौतिक शास्त्रांच्या अभ्यासाने सृष्टीची काही गूढे उकलतात हे खरे आहे. पण सृष्टीचे गूढ या शास्त्रांनी अधिक गंभीर व व्यापक अर्थाने प्रतीत होऊ लागते.

**मनोव्यापार** – ज्ञानामुळे मनाचे व्यापार अधिक अद्‌भुतरम्य व अभिप्रायपूर्ण दिसतात. मन ही किती गहनगूढ, साश्चर्यपूर्ण व कुतूहलोत्तेजक उदात्तरमणीय वस्तू आहे याची माणसाला प्रतीती येते.

"स्मरणशक्ती, अवधान (अटेन्शन), साहचर्य (असोसिएशन), इच्छाशक्ती (विल्), इ. साध्या दिसणाऱ्या गोष्टीतही किती चित्ताकर्षक प्रश्न विचारी माणसाला लपलेले दिसतात हे पाहणे मनोरंजक आहे." यावरून असे दिसते की जसजसे

ज्ञान वाढत जाते तसतशी काही प्रश्नांची उत्तरे जरी मिळत असली तरी त्याहून अधिक निराळे प्रश्न उत्पन्न झाल्यामुळे एकंदरीने जग आधिकाधिक 'प्रश्नांकित' दिसू लागते. हे प्रश्न जाचक असतात असे मानण्याचे कारण नाही.

**नवनिर्माण शक्ती** – आधिभौतिक शास्त्रे वृध्दिंगत झाली आणि कितीतरी यंत्रे व सुखसोयीची साधने माणसाने निर्माण केली. हे सर्व निर्माण केले ते ज्ञानामुळे. ज्ञान नसते तर नवनिर्मिती झाली नसती.

मानसशास्त्रासंबंधी विचार केला तर असे दिसते की त्या शास्त्राच्या प्रगतीमुळे मुलामुलींचे शिक्षण, गुन्हेगार व मनोविकारग्रस्त रोगी यांना वागविण्यासंबंधी नव्या नव्या कल्पना, या प्रचलित होत आहेत. ही नवनिर्मीतीच आहे. प्लेटोने "लोकहितार्थ राज्य"(रिपब्लिक) हा ग्रंथ नुसत्या कल्पनेच्या जोरावर लिहिला. आपल्या मताप्रमाणे समाजाची सुंदर घडी कशी बसविता येईल हे सांगितले. ही नवनिर्मिती आहे. प्लेटोच्या प्रतिभेची आपण स्तुती करतो. यावरून असे दिसते की प्रतिभा ही ललितकलांच्या विलासात दृग्गोचर होत असली तरी ज्ञानामुळे प्रतिभा हीनबल होत नाही.

**ज्ञान आणि नीती व धर्म** – ज्ञान हे धर्माला व नीतीला पोषकच आहे असा निर्वाळा वा.म. जोशी यांनी दिला आहे. ज्ञानामध्ये प्रगती होत गेली तसतशी धर्मावरील श्रध्दा कमी होत गेली असे सकृद्दर्शनी वाटते यात शंका नाही. आपल्याकडे इंग्रजी शिक्षणाचा फैलाव झाल्यावरही धर्मकल्पना कमी झाल्या, धर्मभावना कमी होत गेली असे वाटते, पण बाहयत: दिसणाऱ्या या गोष्टींमुळे खऱ्या धर्माची हानी झाली आहे असे मानण्यास मुळीच आधार नाही. धर्माबाबत एवढेच घडले आहे की आधुनिक काळातल्या विचारवंत लोकांनी हल्लीच्या ज्ञानाला, अनुभवाला व परिस्थितीला धरून धार्मिक चालीरीतीत बंदल केले आहेत. असे असेल तर त्यांना धर्मशून्य म्हणता येणार नाही. उदा. आधुनिक काळात भूतदया हाच धर्म असे मानले गेले तर त्यात गैर काय आहे ?

**खरा देशाभिमान** – खऱ्या देशाभिमानाला शास्त्रे पोषक नाहीत असे जे कोणी म्हणतात त्यांच्यासाठी वा. म. जोशी यांचेजवळ उत्तर आहे.

आपलाच देश सर्वश्रेष्ठ ही भावना विविध शास्त्रांच्या अध्ययनाने बाधित होईल ही गोष्ट खरी आहे. पण खरा देशाभिमान अशा भावनेत नाही. "कोणत्याही देशातला सज्जन माणूस मला प्रिय असला पाहिजे व माझ्या देशातला दुर्जन माझा असला तरी अप्रिय झाला पाहिजे ही भावना खरी."

**मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे होणारे लाभ** – मुलांचे आपण जेवढे कौतुक करतो तेवढी कौतुकपात्र मुले नसतात व त्यांना जे आपण निष्णात समजतो तशी ती नसतात. मुलांचे कौतुक हे प्रेममोहमूलक असते. हे आपल्याला मानसशास्त्रावरून कळून येईल. पण मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे प्रेमाचेच निर्मूलन

होईल किंवा मुलांविषयीच्या सर्व कोमल भावना ज्ञानाग्नीत होरपळून जातील असे होणार नाही.

उलट "मानसशास्त्राच्या अध्ययनाने बालमनाच्या विकासाची दिशा, तद्विषयक नियम, विकृतीची कारणे, सवयीचे महत्त्व, चांगल्या उदाहरणांची आवश्यकता, शिस्त केव्हा; कोणी व कशी लावावी याविषयीच्या यथार्थ कल्पना, या सर्व गोष्टी कळून मुलांबद्दल आपण आधिक दक्षतेने वागू."

या दक्षतेबरोबरच रुक्षता येणार नाही का असा प्रश्न उपस्थित होतो. जोशी म्हणतात की रुक्षता येणार नाही. उलट बालसंगोपनाच्या व शिक्षणाच्या बाबतीत शास्त्राध्ययनाने आधिक जिज्ञासाविषय, अधिक आस्था-विषय, अधिक कौतुक-विषय उत्पन्न होतील.

"मूल हे स्वर्गातून ईश्वराच्या घरून आले आहे." ही वर्डस्वर्थची कल्पना नष्ट झाली तरी तिच्याऐवजी मुलांचा भविष्याकाळ उज्ज्वल करणे, त्यामुळे ईश्वरी गुण उत्पन्न करणे, हे आपल्याच हातात आहे ही भावना निर्माण होईल.

**ज्ञान व अज्ञान** – ज्ञानामुळे मुनष्य कठोर सत्याकडे धैर्याने पाहू शकतो. सत्य हे बाहयत: कितीही कुरूप असेल, पण ते सत्य असते. ते ज्ञानामुळे उमगते. अशावेळी आपण सत्य हे कठोर आहे यास्तव अज्ञानाचा पुरस्कार करणार नाही. जगात कुरुपता अधिक आहे म्हणून आपली दृष्टीच जावी असे कोणाला वाटणार नाही. उलट प्रत्येक विचारी माणूस डोळ्यांचा चांगला उपयोग करून कुरूपतेच्या जागी सुरूपता आणण्याचा प्रयत्न करील. ज्ञानापासून होणाऱ्या सात्त्विक आनंदाची योग्यता फार मोठी आहे. अज्ञान नाहीसे होणे हाच एक मोठा आनंद असतो. ज्ञान हे मुळातच आनंददायक आहे. त्यापासून क्षुद्र सुखे मिळणार नाहीत, अर्थलाभ होणार नाही. प्रथम ज्ञान मिळविताना असमाधान वाटेल. पण ज्ञानाच्या उच्च सात्त्विक आनंदाकरता हे मूल्य दिलेच पाहिजे.

**गांधींच्या सत्याग्रहाश्रमातील शिक्षणपध्दती** – वा. म. जोशी यांनी गांधींच्या सत्याग्रहाश्रमाला भेट दिली आणि अहमदाबादजवळचे हे एक वेगळेच शैक्षणिक स्थान आहे असे त्यांना वाटले. हा सत्याग्रहाश्रम गांधींनी नुकताच सुरू केला होता. वा. म. जोशी यांनी तेथील वातावरणातच स्वत: राहून अभ्यास केला आणि गांधीजींशी चर्चा करून आपली मते पक्की करून घेतली.

वा. म. जोशी यांच्या मनात या आश्रमासंबंधी काही प्रश्न निर्माण झाले होते. सत्याग्रहाश्रमाचे ध्येय काय? मुलांना येथे काय शिकविण्यात येते, शिक्षण झाल्यावर या मुलांनी काय करावे अशी गांधींची अपेक्षा आहे? आश्रमातील मुलांमध्ये व इतर मुलांमध्ये कोणता फरक दृष्टीस पडेल, आश्रमातील मुलांनी ब्रह्मचर्य स्वीकारावे, संसारात पडू नये असे म्हणतात ते खरे आहे काय? गांधींच्या आश्रमात धार्मिक

शिक्षण कोणत्या प्रकारचे दिले जाते? गांधींच्या आश्रमात जातिभेद मानला जातो काय?

वरील प्रश्नांची उत्तरे स्वत: जोशी यांनी आश्रमात राहून व गांधी आणि अन्य लोक यांच्याशी संभाषण करून मिळविली.

या प्रश्नांची उत्तरे म्हणजेच सत्याग्रहाश्रमातील शिक्षणपध्दती होय. हे विचार नंतर या निबंधाच्या रुपाने शब्दबध्द करण्यात आले. त्यांचा सारांश असा–

गांधींच्या आश्रमात त्यावेळी पंचवीस मुले होती. ती निरनिराळ्या वर्गातील होती. बौध्दिक शिक्षण बेताचेच होते. विणकाम शिक्षणाची चांगली सोय होती. शेतीशिक्षणाचीही लवकरच सोय होणार होती. "मोठे झाल्यावर पोट कसे भरू अशी भीती कधीही वाटू नये असे सामर्थ्य यावे अशा प्रकारचे शिक्षण बाल्यावस्थेपासून मुलांना दिले जाईल." असे आश्रमाच्या नियमावलीत लिहिले होते. मुलांना संस्कृत, इंग्रजी, स्वभाषा, गणित इ. विषय शिकविण्यात येत होते. शक्य तो विवाह करावयाचा नाही. साधी राहणी, गरजा कमी असे वर्तन ठेवण्याचे शिक्षण मुलांना दिले जात होते. आश्रमातील सर्व विद्यार्थी एकाच वेळी एकत्र भोजनास बसत. तेथे जातिभेद नव्हता. आश्रमातील मुलांनी व इतरांनीही शक्यतो स्वभाषेतच बोलावे, अन्य व्यवहार करावे ही अपेक्षा होती. मुलांना सर्व शिक्षण स्वभाषेतून देण्यात येत होते.

वा. म. जोशी यांनी चिकित्सक पध्दतीने अवलोकन करून व चर्चा करून आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळवली व शेवटी

"गांधींचा आश्रम राष्ट्रकार्याच्या दृष्टीने क्षुल्लक गणणे यथार्थ नव्हे." असा निष्कर्ष काढला.

गांधीजींची मूलोद्योग शिक्षण पध्दती ही देशाला मिळालेली एक देणगीच आहे. या पध्दतीच्या रुपाने गांधीजीनी शिक्षणाला एक नवा अर्थ दिला.

आपला शिक्षणविषयक दृष्टिकोण स्पष्ट करताना गांधीजी म्हणतात-- "माझ्या मते शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक अशा सर्व शक्तींचा सर्वांगीण विकास होय. केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. म्हणून बालकांच्या शिक्षणकार्यांची सुरुवात त्याला उत्पादन कार्याचे बाळकडू पाजूनच मी करेन."

वा. म. जोशी यांनी याच गोष्टी टिपल्या आणि हा लेख लिहिला. याशिवाय या लेखात अन्य अनेक विषयांचा संदर्भ येऊन जातो. विशेषत: सत्याग्रहाश्रमात दिले जाणारे धार्मिक शिक्षण कशा प्रकारचे होते यासंबंधी वा. म. जोशी म्हणतात,

"गांधी स्वत: कट्टे हिंदू असून धर्मावर त्यांची श्रध्दा आहे. पुनर्जन्म ते मानतात. देहधर्म टाकता येत नाही म्हणून खाणेपिणे करायचे असे त्यांचे मत आहे. ब्रह्मचर्य पाळणे, जिव्हालौल्य न चालविणे, शक्य तेवढ्या गरजा कमी करणे, स्वदेशी व्रत पाळणे, कोणालाही न भिणे, होता होईल तो स्वभाषा बोलणे ही तेथील शिक्षणाची

अंगे; याशिवाय प्रत्यक्ष धार्मिक शिक्षण म्हणजे रोज सकाळी व संध्याकाळी जे देण्यात येते तेच. गीतापाठ, श्लोक व प्रार्थना यांचा या शिक्षणात अंतभार्व आहे.''

प्रार्थनेत औपचारिकपणा कमीच होता अशीही नोंद जोशी यांनी केली आहे. शिक्षा करण्याचे गांधींचे प्रकार अभिनव होते. ते स्वत:लाच शिक्षा करून घेत व अशा तऱ्हेने मुलांना सुधारल्याची उदाहरणे वा.म. जोशी यांनी दिली आहेत.

सत्याग्रहाश्रमातील वातावरण, शैक्षणिक चळवळ, गांधीजींचा शैक्षणिक दृष्टिकोन यासंबंधीचा वा. म. जोशी यांचा हा लेख लक्षणीय आहे.

**उपसंहार –** वा.म. जोशी यांचा शिक्षणविचार कोणता याचा विचार आतापर्यंतच्या सर्व मुद्दांमध्ये येऊन गेला.

वा. म. जोशी हे स्वत: शिक्षक, प्राध्यापक, लेखक, संपादक होते. आयुष्यभर त्यांनी हाच व्यवसाय केला. या साऱ्यांचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात व त्यातील विचारात पडलेले होते. ते कादंबरीकार तर होतेच पण मोठे तत्त्वचिंतक होते. त्यांच्या चिंतनशील व्यक्तित्त्वाची साक्ष त्यांची खालील विधाने देतात.

लौकिक व्यवहारात रममाण होण्याची व तो उत्साहाने आणि निपुणतेने करण्याची पात्रता ध्येयवादित्त्वामुळे येते. मन:स्थैर्य येण्यास ध्येयनिष्ठेशिवाय मार्ग नाही. मनोधैर्यही ध्येयनिष्ठेशिवाय शक्य नाही. चिकित्सकवृत्ती ही कल्पनाशक्तीला थोडीतरी बाधक होते.

चिंतनशीलता, विचारप्रवर्तकता, कुठल्याही गोष्टीची दुसरी बाजू आपलेपणाने पाहण्याची सवय, पराकाष्ठेचा प्रामाणिकपणा वगैरे वैचारिक गुणांबरोबरच अवडंबर न माजविता कुठलीही गोष्ट सांगण्याची शैली, मार्मिक उपमेने किंवा दृष्टान्ताने विषय विशद करण्याची कला ही वामनरावांची वैशिष्टये त्यांच्या लेखात आपल्याला जाणवतील.

इतका चिंतनशील लेखक काही ठिकाणी मात्र गोंधळल्यासारखा वाटतो. अर्थातच अशी ठिकाणे अपवादात्मक आहेत.

'विद्यार्थी व राजकारण' या लेखात वामनरावांचा नेहमीचा समतोलपणा कमी आढळतो. हा लेख अपुरा तर वाटतोच पण त्यात व्यक्त झालेल्या विचारसरणीत वामनरावांच्या दोन्ही बाजू पाहणाऱ्या मनाचे पूर्ण प्रतिबिंब पडले आहे असे वाटत नाही.

शैक्षणिकदृष्टया विचार केला तर वामनरावांच्या या लेखांतून विविध असे शैक्षणिक विषय चर्चिले गेले. मानसशास्त्र, नीतिशास्त्र, गांधीजीची शिक्षण पध्दती इ. विषय वामनरावांनी विशेष आस्थेने हाताळलेले दिसतात. त्या मानाने स्त्री शिक्षणा विषयीचे त्यांचे विचार अजून हवे होते असे वाटते. त्यांचे स्त्रीशिक्षणक्षेत्रातले कार्य लक्षात घेता या क्षेत्राचा विचार वामनरावांनी आपल्या निबंधात कमी प्रमाणावर केल्याचे जाणवते.

■ ■

## प्रकरण : ८

# समालोचन

### सात निबंधकार : शिक्षक व संपादक

"१९५० पूर्व मराठीतील वैचारिक वाङ्मयात आलेल्या शिक्षण विचाराचा चिकित्सक अभ्यास" या विषयाचे संशोधन करताना "मराठीतील प्रमुख सात निबंधकारांचे निबंध वाङ् मय" अभ्यासासाठी निवडले. हे निबंधकार असे–

| | | |
|---|---|---|
| १ | विष्णुशास्त्री कृष्णशास्त्री चिपळूणकर | १८५०–१८८२ |
| २ | गोपाळ गणेश आगरकर | १८५६–१८९५ |
| ३ | बाळ गंगाधर टिळक | १८५६–१९२० |
| ४ | शिवराम महादेव परांपजे | १८६४–१९२९ |
| ५ | नरसिंह चिंतामण केळकर | १८७२–१९४७ |
| ६ | अच्युत बळवंत कोल्हटकर | १८७९–१९३१ |
| ७ | वामन मल्हार जोशी | १८८२–१९४३ |

या निबंधकारांची थोडक्यात चरित्रे त्या त्या प्रकरणाच्या सुरुवातीला दिली आहेतच. त्यावरून आणखी एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात येते ती अशी की हे सातही निबंधकार नुसते लेखक नव्हते तर ते पत्रकार व शिक्षक होते. चिपळूणकर, टिळक, आगरकर हे तर-"न्यू इंग्लिश स्कूल" चे संस्थापक होते. परांजपे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक होते. केळकरांचा अनेक शिक्षण संस्थांशी संबंध होता. ते स्वत: पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयात व्याख्याने देत असत. कोल्हटकरांनी सातारा येथे दोन वर्ष शिक्षकांचे काम केले. तर वा.म. जोशी हे आयुष्यभर शिक्षकच होते.

सातही निबंधकार संपादक व पत्रकार होते. "केसरी" कार चिपळूणकर, टिळक, आगरकर, केळकर, "काळ"कर्ते परांजपे, "संदेश"कार कोल्हटकर आणि "विश्ववृत्त"कार वा.म. जोशी यांचे संपादक म्हणूनही स्थान लक्षात घेण्यासारखे आहे.

केळकर हे मुंबई विद्यापीठाचे पीएच. डी. पदवीसाठी मार्गदर्शक होते.

शिक्षक या नात्याने या सर्व निबंधकारांचा शिक्षण क्षेत्राशी जवळून सबंध आला. आणि पत्रकार व संपादक या नात्याने समाजाशी संबंध आला. समाजमनाचे विविध अंगांनी निरीक्षण-परीक्षण करणे हे काम संपादकाला व पत्रकाराला करावेच लागते. साहित्यिकाचाही समाजजीवनाशी, समाजमनाशी निकटचा संबंध असतो. या दृष्टीने या निबंधकारांच्या निबंधात शिक्षण-विचार प्रकर्षाने प्रकट होणे ही एक स्वाभाविक प्रक्रिया होती, असे दिसून येते.

**वाङ्मय, जीवन आणि शिक्षण-परस्पर संबंध –** निबंध हा एक सकस वाङ् मयप्रकार आहे. वाङ् मयाचा संबंध जीवनाशी असतोच. विविध जीवनानुभव, परिस्थिती, संकटे, विजय, दारिद्र्य, दैन्य, आकांक्षा, भावभावना, समाजजीवनातील चढउतार यांचे चित्रण वाङ् मयात असते. प्रस्तुत निबंधकारांच्या निबंधात जो शिक्षण विचार आला तो त्या त्या परिस्थितीनुरुप आलेला आहे.

"विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट समाजात जे वाङ् मय असते त्याला एक कारण नसून अनेक कारणे असतात. त्या समाजाचा पूर्वेतिहास, तत्कालीन धर्म, चालीरीती, सांस्कृतिक दर्जा, इतर लोकांशी असलेला संबंध, नैतिक आचार-विचार, धार्मिक भावना, आर्थिक आकांक्षांना मिळत असलेला वाव, किंवा त्याचा अभाव, तत्कालीन समाजात युगप्रवर्तक किंवा अलौकिक व्यक्तींचे अस्तित्व, किंवा त्यांचा अभाव, त्याचप्रमाणे त्या त्या वाङ्मयसेवकाच्या मनाची ठेवण, त्याचे शिक्षण, त्याचा सामाजिक दर्जा, त्याच्या इच्छा-आकांक्षा, त्याची तृप्ती-अतृप्ती, त्याच्या सुप्त किंवा नेणिवेत दडलेल्या इच्छा आकांक्षा, त्याच्या सहजप्रेरणांचे सापेक्ष बलाबल, त्याच्या जाणीवयुक्त भावभावना, इ.अनेकविध कारणांवर त्या त्या वाङ्मयसेवकाचे वाङ्मय अवलंबून असते." (साहित्यातील विवेक : डॉ. अ. ना. देशपांडे)

याचाच अर्थ असा की व्यक्तिगत, सामाजिक व राष्ट्रीय जीवनात ज्या ज्या घडामोडी घडत असतील त्यांचे प्रतिबिंब त्या त्या वाङ्मयसेवकाच्या प्रकृतीस व प्रवृत्तीस अनुसरून त्याच्या वाङ्मयात पडत असते.

जीवनाचा आणि शिक्षणाचाही असाच निकटचा संबंध आहे. शिक्षण व्यक्तिजीवनाला व पर्यायाने समाजजीवनाला आणि राष्ट्रजीवनाला आकार देऊ शकते. विनोबा भावे म्हणतात,

"शिक्षणात जीवनाला प्राधान्य हवे. शिक्षण जीवनासाठीच असते. शिक्षण जीवनाचे व जीवनासाठी असल्याने ते जीवन जगत असतानाच व जीवनाच्या क्षेत्रातच दिले गेले पाहिजे. जीवनाभिमुखता हे तर शिक्षणाचे वैशिष्टय." (शिक्षण-विचार)

यावरून असे म्हणता येते की वाङ्मयाचा आणि जीवनाचा, जीवनाचा आणि शिक्षणाचा, अविभाज्य संबंध आहे. अर्थातच वाङ्मयाचा आणि शिक्षणाचाही अविभाज्य संबंध आहे.

चिपळूणकर, आगरकर, टिळक, केळकर, वा.म. जोशी यांच्या निबंधात शिक्षणविचाराची अनेक अंगे समर्थपणे प्रकट झालेली दिसतात. कोल्हटकर व परांजपे यांच्याही निबंधातून शिक्षण विचार सूक्ष्मपणे येतो. याचे कारणच असे की हे सर्वजण संवेदनाक्षम साहित्यिक होते. त्याच वेळी त्यांच्या संवेदनाक्षम मनाने टिपलेले समाजजीवन त्यांच्या लेखणीतून आविष्कृत झाले. स्वत:चे जीवन, स्वत:ची जडणघडण, कार्यक्षेत्र आणि तत्कालीन राजकीय सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थिती यांचे पडसाद त्यांच्या वाङ्मयात उमटले.

चिपळूणकरांपासून सुरुवात झालेल्या या निबंधपरंपरेत शिक्षणविचार विविध अंगांनी प्रकट झाला आहे. त्याचे महत्त्वाचे कारण असे की तत्कालीन महाराष्ट्रात विविध क्षेत्रात परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली होती. हे परिवर्तन केवळ "बदल" या स्वरुपाचे नव्हते तर ते एक "जागरण"होते. राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक... असे अन्यान्य क्षेत्रातील "जागरण"होऊन समाजजीवन ढवळून निघाले होते.

**शैक्षणिक जागरण –** महाराष्ट्रात घडलेले हे नवजागरण सर्वांगीण होते. याला कोणी महाराष्ट्रातील 'रिनेसान्स' असेही म्हणतात. (मराठी वाङ्मयाचा इतिहास)

"आमच्या देशातील स्थिती" या प्रदीर्घ निबंधात राजकीय नवजागरणाचे पडसाद दिसतात. पुढे "केसरी"ने ही भूमिका उचलून धरली. सुधारकातील लेखात आगरकरांनी "स्त्रियांच्या परवशते" च्या रूपाने सामाजिक जागरणाची बाजू उचलून धरली.

या नवजागरणाचे प्रमुख श्रेय आपल्याला पाश्चात्य शिक्षणालाच द्यावे लागेल. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वत्रयीचा साक्षात्कार आपल्याला पाश्चात्य शिक्षण व आपल्या मनाविरुध्द ते देणारे राज्यकर्ते यांनाच द्यावे लागेल.

राजकीय असो अथवा सामाजिक असो, सर्वच जागरणांचे मूळ म्हणून शिक्षणाचा प्रसार व्हावयास हवा ही भावना सर्वच विचारवंतांची होती.

१८७४ ते १९२० पर्यंतच्या कालखंडाचा विचार केल्यास असे दिसते की या कालखंडात आरंभापासून अखेरपर्यंत अनेक शिक्षण मंडळांची स्थापना होऊन

शैक्षणिक कार्य होत होते. या मंडळ्या अशा—

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी (१८७४), कॅम्प एज्युकेशन सोसायटी (१८८२), डेक्कन एज्युकेशन सोसायटी (१८८४), शिक्षण प्रसारक मंडळी (१८८८) या संस्था पुण्यात स्थापित झाल्या.

पुण्याबाहेर अहमदनगर एज्युकेशन सोसायटी (१८८४), शिक्षण प्रसारक मंडळ, राजापूर (१८९०), आर्यन एज्युकेशन सोसायटी मुंबई (१८९७) गोखले एज्युकेशन सोसायटी, मुंबई (१९१८), खानदेश शिक्षण मंडळ (१९१४) कोकण एज्युकेशन सोसायटी (१९१७).

स्त्री शिक्षणासाठी विशेष कार्य करण्याऱ्या संस्था – महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी (१८८४), सेवासदन (१९०९), अनाथ बालिकाश्रम (१८९६), महिला विद्यापीठ (१९१६).

याचवेळी या सर्व संस्था खरे राष्ट्रीय शिक्षण देऊ शकणार नाहीत या भावनेने १९०५ मध्ये वि. गो. विजापूरकर यांनी कोल्हापूर येथे समर्थ विद्यालय सुरू केले. नंतर ते तळेगाव येथे आणले.

शैक्षणिक कार्याबरोबरच ज्ञानप्रसाराला उपयुक्त अशाही काही अन्य संस्था या कालखंडात निघाल्या.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय १८९८ मध्ये मुंबई येथे सुरू झाले. १९१६ मध्ये नागपूर येथे ज्ञानकोशाच्या कार्याला आरंभ झाला होता. १९१७ मध्ये पुण्यात भांडारकर प्राच्य विद्यामंदिर सुरू झाले. या सर्व संस्था १९५० पर्यंत चांगल्या नावारुपाला आल्या.

प्रस्तुत अभ्यासक्षेत्रातील बहुसंख्य निबंध ज्या काळात प्रथम लिहिले गेले त्याच काळातील ही शैक्षणिक जागरणाची वाटचाल आहे.

यावरून हे सहज दिसते की प्रस्तुत कालखंडात जीवनाचा आणि वाङ्मयाचा संबंध आधीच्या कोणत्याही कालखंडापेक्षा अधिक आणि जिव्हाळ्याचा झाला. या कालखंडातील नवजागरणाचे चित्रण या काळातील वाङ्मयात येणे अपरिहार्य होते. निबंध वाङ्मयात ते प्रत्यक्षपणे आले आहे.

म्हणजेच वाङ्मयनिर्मिती, त्यामधील शिक्षणविचार आणि शैक्षणिक चळवळी यांचा परस्परसंबंध असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

या नवजागरणाने विचारवंतांच्या वैचारिक भूमिकेची बैठक तयार होण्यास मदत केली तर काही वेळा या वैचारिक भूमिकेच्या प्रसाराचा परिणाम शैक्षणिक चळवळ सुदृढ होण्यास झाला असणे अगदी स्वाभाविक आहे.

प्रत्येक निबंधकाराच्या निबंधात दिसून येणाऱ्या शिक्षणविचाराचे विश्लेषण

त्या त्या प्रकरणात स्वतंत्रपणे केलेलेच आहे. आता शिक्षणशास्त्रदृष्टया या शिक्षण विचाराचे एकत्रित समालोचन करावयाचे आहे. या समालोचनात्मक विवेचनात खालील मुद्दे अंतर्भूत केले आहेत.

शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक मानसशास्त्र, शैक्षणिक समाजशास्त्र, स्फुट विचार (शैक्षणिक व्यवस्थापन, संस्था संचालन इ.).

**शैक्षणिक तत्त्वज्ञान** – "तत्त्वज्ञान म्हणजे सत्यस्वरुपाचे ज्ञान असा अर्थ होतो. तत्त्वज्ञान मनुष्याला जीवनाचा अर्थ काय, जीवनाचे प्रयोजन काय हे समजून घेण्यास मदत करते. तत्त्वज्ञानाच्या आधारे मनुष्याला जीवनाचा अर्थ समजतो. जीवनाचे ध्येय काय, माणसामाणसांचे परस्परसंबंध कसे असावेत. जीवनातील खरी नीतिमूल्ये कोणती याचा बोध तत्त्वज्ञानाच्या आधारे होतो." (म. बा. कुंडले)

शैक्षणिक तत्त्वज्ञान हेही शिक्षणाची दिशा दाखविते. शिक्षणाचे ध्येय कोणते. सार-असार काय याचा बोध करते.

"The philosohy of education is the determined effort to find out what education should consistently do in the face of contradictory demands coming to it from the diverse. deeply rooted interests of life." (W. H. Kilpatrick)

यावरून शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे विचारक्षेत्र कोणते हे स्पष्ट होते.

इंग्रजी राज्यापासून झालेल्या लाभांचे स्वागत चिपळूणकरांनी केले आहे. पण त्याचवेळी इंग्रजी राज्यापासून झालेले जे तोटे आहेत त्याचीही चर्चा त्यानी आपल्यां लेखनात केली आहे. शिक्षणातही "स्वतंत्र बाणा" ठेवण्याची चिपळूणकरांची प्रतिज्ञा त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची साक्ष देते. पाश्चात्य राष्ट्रांनी विद्या व कला या प्रांतात केलेली प्रगती चिपळूणकर स्वीकारतात. पण ते तिकडे आश्चर्याने थक्क होऊन पाहत नाहीत. आपल्या राष्ट्रानेही अशीच प्रगती करून स्वातंत्र्य मिळविले पाहिजे व अबाधित राखले पाहिजे असे चिपळूणकरांना प्रकर्षाने वाटत होते. न्यू इंग्लिश स्कूल स्थापन करण्यातील प्रमुख उद्दिष्टे त्यावेळी संस्थापकांसमोर (चिपळूणकर, टिळक, आगरकर, नामजोशी) होती ती अशी –

राष्ट्रीय बाणा, विपर्यस्त इतिहासाचा अभ्यास सोडून देऊन निर्विकार मनाने इतिहासाच्या अभ्यासास प्रोत्साहन देणे, नव्या शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांत स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा व साहसवृत्ती निर्माण करणे, देशी भाषात वाङ्मयनिर्मिती करण्याचा प्रयत्न करणे, राष्ट्रीय शिक्षण सुलभ व स्वस्त करणे.

हीच शिक्षणाची उद्दिष्टे टिळक, आगरकर, चिपळूणकर, परांजपे यांच्या लेखनात दिसून येतात. टिळकांनी तर राष्ट्रीय शिक्षणाची सुटसुटीत व्याख्याच सांगून

राष्ट्रीय शिक्षण म्हणजे नेमके काय हे स्पष्ट केले. केळकरांनी त्यांच्याच या विचारांचा विस्तार केला. राष्ट्राच्या प्रगतीसाठी खाजगी शिक्षणाचा प्रसार हीच एकमेव संजीवनी आहे याबद्दल या निबंधकारांचे एकमत होते.

टिळकांनी इंग्रज सरकारच्या प्रतिगामी शैक्षणिक धोरणावर कडक टीका केली आणि हे धोरण पुरोगामी कसे होईल याबाबत सामाजिक दृष्टिकोणातून आगरकारांनी आपले विचार मांडले.

टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणात तौलनिक दृष्टीचा नेहमीच आग्रह धरला. अध्यापन क्षेत्रात स्वातंत्र्याला महत्त्व असल्याची जाणीव टिळकांना होती. त्यामुळे त्यांनी त्याचा आपल्या लेखानातून पुरस्कार केला.

राजकीय स्वातंत्र्याच्या बरोबरीने सामाजिक स्वातंत्र्य आवश्यक असल्याचे मत आगरकरांनी सतत मांडले व त्याचा पुरस्कार केला. सामाजिक स्वातंत्र्यासाठीही 'शिक्षण प्रसार' हाच रामबाण उपाय आहे असे आगरकरांना वाटत होते. शिक्षण प्रसाराचे कार्य हे समाजसुधारणेचेच एक अंग आहे असा आगरकरांचा विचार होता.

परांजपे यांच्या निबंधात स्वधर्म, स्वदेश आणि स्वेतिहास या गोष्टी आदर्शभूत मानून त्यांनी सर्व विवेचन केले आहे.

सात निबंधकारांच्या निबंधात आलेल्या शिक्षणविचारात शैक्षणिक तत्त्वज्ञान या दृष्टिकोनातून खालील मुद्यांची चर्चा झाली आहे.

शिक्षणाची संकल्पना, शिक्षणाची ध्येये, शिक्षण, गुरूशिष्य सबंध, शिस्त आणि स्वातंत्र्य, राष्ट्रीय शिक्षण, धर्म आणि शिक्षण, अभ्यासक्रम, शिक्षणाचे नैतिक व तात्त्विक अधिष्ठान.

शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जे विविध 'वाद'आहेत त्यांची नावे या चर्चेत येत नाहीत. उदा. अध्यात्मवाद, आदर्शवाद, निसर्गवाद, कार्यवाद, वास्तववाद यांचा उल्लेख या नावाने येत नसला तरी या शैक्षणिक तत्त्वज्ञानांची चर्चा पर्यायाने या निबंधकारांच्य लेखनातून आलेली आहे.

उदा. धंदेशिक्षणाबद्दल किंवा कृषिशिक्षणाबद्दल व हस्तकला शिक्षणाबद्दल जेव्हा टिळक किंवा केळकर लिहितात तेव्हा ते कार्यवाद या तत्त्वज्ञानाचाच पुरस्कार करीत असतात. परांजपे यांनी उपहासगर्भ शैलीत धंदेशिक्षणाविषयी लिहिताना 'सुखशांतीचा उच्छेद करणारे भूत' म्हणून त्याचा उपहास केला असला तरी त्यांनी त्यावर विचार केला आहे हे विशेष आहे.

सातही निबंधकारांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा संकलित विचार केल्यावर असे दिसते की सर्वांच्याच निबंधात शिक्षणाद्वारा जागृती आणि नंतर स्वराज्यप्राप्ती हे सूत्र महत्त्वाचे आहे.

टिळक, चिपळूणकर, परांजपे, केळकर यांनी तर हा विचार लिहिलाच आहे पण संदेशकार कोल्हटकरांनीही "स्वराज्याची साधने" या आपल्या लेखात हेच सूत्र सांगितले आहे.

या सर्व निबंधकारांचे हे शैक्षणिक तत्त्वज्ञान कालसंगत व परिस्थितीतून निर्माण झालेले असे आहे. या शैक्षणिक तत्त्वज्ञानाला भक्कम विचारांची बैठक आहे. टिळकांचे पांडित्य, केळकरांचे बहुश्रुत लालित्य अथवा चिपळूणकरांचे स्वदेशप्रेम यांचे पडसाद या शैक्षणिक तत्त्वज्ञानात यथार्थतेने पडलेले दिसतात. वा. म. जोशी एक ध्येयवादी शिक्षक व तत्त्वज्ञ होते. त्यांच्याही निबंधांतून या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे दर्शन सुस्पष्टपणे होते. प्रस्तुत शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे तपशीलवार विवेचन त्या त्या निबंधकारांच्या विचारांचे विश्लेषण केले तेव्हा त्या त्या प्रकरणात यथाक्रम आलेलेच आहे.

**शैक्षणिक समाजशास्त्र** – शिक्षण ही संपूर्णतया सामाजिक वस्तू आहे. शिक्षणसंस्था ही समाजनिर्मित संस्था आहे. शाळा हाही एक छोटा समाज असतो. समाज म्हटला की त्यात कुटुंब, धर्म, राज्य, इ. विविध संस्था आल्याच. समाजातील विविध स्तर, जाती, वर्ग हेही आलेच. विशिष्ट समाजाची संस्कृती आणि शिक्षण यांचा सबंध येतोच. संस्कृतीच्या संगोपन संवर्धनासाठी शिक्षण हे साधन म्हणून योजले जाते. अशा तऱ्हेने शिक्षणाला समाजशास्त्रीय अधिष्ठान असते. शिक्षणाचे हे समाजशास्त्रीय अधिष्ठान म्हणजेच शैक्षणिक समाजशास्त्र.

समाजशास्त्र म्हणजे समाजाचा वैज्ञानिक पध्दतीने, म्हणजेच सांगोपांग व पध्दतशीरपणे अभ्यास करणारे शास्त्र. शिक्षणाला या शास्त्राची बैठक असतेच. कारण शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या वर्तनात घडून येणारा बदल किंवा विकास. व्यक्तीच्या नैसर्गिक प्रवृत्तीबरोबर सामाजिक वातावरणातही व्यक्तीच्या विकासाला अवसर मिळतो, त्या वातावरणाचा विकासप्रक्रियेवर परिणाम होतो.

शैक्षणिक समाजशास्त्र हे व्यक्तिविकास कसा होतो याचा विचार करते. त्याचवेळी सामाजिक पर्यावरण कोणत्या प्रकारचे याचाही विचार करते. परस्पर सबंधित व परस्परपूरक अशा स्वरुपात त्याचा विचार केला जातो.

शैक्षणिक समाजशास्त्राचे प्रमुख प्रवर्तक जार्ज पेन यांचे नाव शैक्षणिक समाजशास्त्राच्या विचारात अग्रभागी घेतले जाते. जार्ज पेन म्हणतात,

"व्यक्तीला अनुभवसमृध्द करणाऱ्या व तिच्या अनुभवांना सुसंघटित करणाऱ्या सामाजिक सबंधांचे व हे सामाजिक सबंध घडवून आणणाऱ्या संस्था, समाजसमूह व सामाजिक प्रक्रियांचे वर्णन, विवेचन करणारे शास्त्र म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र."

ब्राउन यानीही शैक्षणिक समाजशास्त्राची व्याख्या अशी केली आहे–

"व्यक्ती व अन्य व्यक्ती, समाजसमूह व विविध प्रकारच्या वर्तनवैशिष्टयांनी युक्त अशा सास्कृंतिक वातावरणातील आंतरक्रियांचा अभ्यास म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र होय."

शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती किती आहे, या समाजशास्त्राच्या अभ्यासक्षेत्रात कोणकोणते विषय येतात याची यावरून कल्पना येते. आता प्रस्तुत सात निबंधकारांच्या निबंधांत शैक्षणिक समाजशास्त्रातील कोणकोणते घटक आले आहेत याचा विचार करावयाचा आहे.

शैक्षणिक समाजशास्त्राचा विचार करताना खालील घटकांचा त्यात अतंर्भाव केला जातो.

समाजशास्त्र व शिक्षण, समाजीकरण आंतरक्रिया, समाज व सामाजिक संस्था, शिक्षणसंस्था, कुटुंबसंस्था, जातिसंस्था, भाषा, समाजाची आर्थिक परिस्थिती, समूहसंपर्क साधने...
राज्यसंस्था, लोकसमुदाय, सामाजिक परिवतर्न व शिक्षण, लोकशाही समाजवाद व शिक्षण, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सामंजस्य, राष्ट्रीय एकात्मता.

वरीलपैकी बहुसंख्य घटकांचा विचार प्रस्तुत निबंधकारांनी केला आहे असे त्यांच्या निबंधातील शिक्षणविचाराच्या अभ्यासावरून दिसून येते.

समाजातील अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, समज, रीतिरिवाज या संदर्भात सर्वच निबंधकारांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

"लोकभ्रम" या विषयावर लिहितांना चिपळूणकरांनी, त्याना "खूळ" असेच संबोधले आहे. लोकभ्रमाची अनेक उदाहरणे देत देत हा भ्रम समाजातून काढून टाकला पाहिजे यासंबंधीचे विवेचन चिपळूणकर करतात. तर परांजपे यांनी "श्रध्दा" या संकल्पनेचे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून परीक्षण केले आहे.

"तर्कशुद्ध व प्रखर अशी सामाजिक टीका हाच आगरकरांच्या निबंधाचा आत्मा आहे."

आपले जीवन आंधळेपणाने जुन्या चाकोरीतून चालविण्याचा अट्टाहास करणे अत्यंत आत्मघातकीपणाचे आहे हे आगरकरांनी जाणले होते. स्त्रीला चूल आणि मूल यापलीकडे दुसरे काहीही कर्तव्य नाही असे समजणाऱ्या आणि साध्या अक्षर ओळखीला तिला पारखे करणाऱ्या समाजावर आगरकरांनी टीका केली व स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. आगरकरांनी पुरस्कारिलेल्या बुध्दिवादी तत्त्वज्ञानामुळे त्यांनी अनेकांच्या अंधश्रध्देला छेद दिला. या डोळसपणातूनच त्यांच्या शिक्षणविषयक विचारांनी निर्मिती झाली आहे.

आगरकरांनी हर्बर्ट स्पेन्सर यांचा उत्क्रांतीचा सिध्दांत स्वीकारला होता. त्यांनी

निबंधसंग्रह भाग १ मधील एका निबंधात हे उत्क्रांतीतत्त्व अगदी सारस्वरुपात सांगितले आहे. राज्य, धर्म आणि कुटुंब या सामाजिक जीवनाच्या तीन प्रमुख शाखांपैकी प्रत्येक शाखेच्या विकासक्रमाचा त्यांनी ऐतिहासिक मागोवा घेतला आहे. दुष्ट आचारांचे निर्मूलन, सदाचाराचा पुरस्कार, ज्ञानवृध्दी, ज्ञानसंशोधन, भूतदयेचा विचार इ. मनुष्याच्या सुखाच्या गोष्टी विचार-कलहाखेरीज होणार नाहीत असे आगरकर म्हणतात.

समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत या सर्व गोष्टी अपेक्षितच असतात. आगरकरांची परिवर्तनवादी सामाजिक दृष्टी ही परिवर्तनवादी आहेच, पण 'मूळ प्रकृती' म्हणजेच भारतीय आर्यत्व न सांडता हे परिवर्तन घडले पाहिजे असे आगरकर म्हणतात. नवीन शिक्षणाचा व कल्पनांचा योग्य रीतीने आपण अंगीकार केला पाहिजे अशी त्यांच्या शिक्षणविचाराची बैठक आहे.

लोकशिक्षण हा सामाजिक सुधारणेचा महत्त्वाचा मार्ग आहे यावर आगरकरांचा विश्वास आहे. सामाजिक सुधारणेसाठी शास्त्रप्रामाण्याचा मार्ग सोडावा लागला तरी चालेल, बुद्धिप्रामाण्याचा मार्ग सोडता येणार नाही असे आगरकरांचे सांगणे आहे.

टिळकांनी आपल्या लेखांतून समाजविचार व्यक्त केला असला तरी समाजपरिवर्तनाबाबत टिळकांची मते आगरकरांइतकी प्रखर नव्हती. समाजाची चौकट लगेच मोडून समाजपरिवर्तन करण्याची वा दिखाऊ बदल करण्याची घाई करू नये असे टिळकांचे मत होते. आधी राजकीय स्वातंत्र्य मिळवले की सामाजिक सुधारणा आपोआपच घडून येतील अशी टिळकांची विचारसरणी असे.

पुराणमतवादित्व, अडाणी समजुती, विचारांचा अभाव हे आपल्या समाजाला लागलेले जुने रोग आहेत. पण नवा रोग म्हणजे पारतंत्र्य. ते आधी हटवूया म्हणजे हे जुने रोग केव्हाही बरे करता येतील असे टिळकांचे मत होते.

समाजातील अन्यान्य वर्गांचे शिक्षण उत्तम रीतीने झाले तरच सर्व समाज एकसंध राहू शकेल याबाबत परांजपे यांना खात्री होती. म्हणून 'गरिबांचे शिक्षण' यासारखा निबंध त्यांनी लिहिला. कोल्हटकरांनी ब्राह्मण-अब्राह्मण या निबंधात जातिव्यवस्थेचा विचार करून खरे ब्राह्मण्य कोणते याचा निकष सांगितला. तर केळकरांनी ग्रामशिक्षण, हीनवर्गीयांचे शिक्षण याबाबत आपले विचार व्यक्त केले. तळागाळातील समाजाला शिक्षण मिळाल्याशिवाय या समाजाचे चित्र पालटणार नाही याबद्दल सर्वच निबंधकारांची खात्री होती. असे या विचारांवरून निश्चित म्हणता येते.

वृत्तपत्रांची लोकशिक्षणाची कामगिरी या निबंधात व्यक्त झालेल्या विचारांवरून अधिक स्पष्ट होते. लोकरंजन करण्यापेक्षा लोकजागृती करण्याकडेच वृत्तपत्रांचा ओढा असावा याबद्दल या निबंधांमध्ये आग्रहाने मते मांडण्यात आली आहेत.

'समूह संपर्क साधने' ही आधुनिक काळाची गरज आहे. समूहसंपर्क साधनांचा समाजमनावर मोठा प्रभाव असतो. प्रबोधन व प्रसार याबाबत वृत्तपत्रांनी स्वातंत्र्यपूर्व काळात खूप कार्य केले आहे. आजही वृत्तपत्रांची तीच भूमिका आहे. परांजपे यांनी "वृत्तपत्र वाचनाचे अड्डे निर्माण झाले पाहिजेत" असा विचार मांडला तर आगरकरांनी "सुधारक काढण्याचा हेतू" कोणता हे स्पष्ट करताना आपली समाज प्रबोधनाची भूमिका विशद केली.

शैक्षणिक समाजशास्त्रांतर्गत अनेक घटकांचा विचार या निबंधकारांनी आपल्या निबंधाद्वारे केला आहे. शाळा कशी असावी, अनौपचारिक शिक्षण, सहशिक्षण, स्त्रियांचे शिक्षण या सर्व प्रश्नांवर या निबंधात चर्चा केली गेली आहे. स्त्रीशिक्षण, महात्मा गांधीच्या सत्याग्रहाश्रमातील शिक्षण, यासंबंधी वा. म. जोशी यांनी व्यक्त केलेले विचार लक्षणीय आहेत. विचारशीलता हा वा. म. जोशी यांचा स्थायीभाव असल्यामुळे त्यांच्या निबंधांत शैक्षणिक विचारमंथन येणे स्वाभाविक आहे.

शैक्षणिक समाजशास्त्रात सध्या लोकसंख्या शिक्षण हा विषय नव्याने अंतर्भूत केला गेला आहे. वाढत्या लोकसंख्येच्या विस्फोटामुळे निर्माण होणारे प्रश्न समाजजीवनावर मोठा परिणाम घडवून आणत आहेत. या दृष्टीने या सात निबंधकारांच्या निबंधांत काही विचार आला आहे किंवा काय याचे आता समालोचन करावयाचे आहे.

## लोकसंख्या शिक्षण

जगाची लोकसंख्या १६५० साली साधारणपणे ५० कोटी होती. १९६० पर्यंत ही लोकसंख्या ३०० कोटीपर्यंत पोचली. १९८२ पर्यंत जगाची लोकसंख्या ४५० कोटी झाली. येत्या काही वर्षात जगाची लोकसंख्या ८०० कोटीचा उच्चांक गाठेल असा अंदाज आहे.

लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्यांचा शास्त्रशुद्ध रीतीने विचार करण्यास अठराव्या शतकापासून सुरूवात झाली.

लोकसंख्येच्या प्रमाणाचा व रचनेचा सम्यक विचार करून उत्तम जीवनमानाकडे वाटचाल करण्यासाठी आवश्यक असे शिक्षण म्हणजे लोकसंख्याशिक्षण होय.

लोकसंख्या समूहाचे जीवनमान ठरविण्यात खालील घटक प्रामुख्याने जबाबदार असतात –

लोकसंख्येचे परिमाण व स्थिती (रचना), साधनसंपत्ती, प्रगतीची प्रक्रिया, राहणीमान, सामाजिक व सांस्कृतिक स्थिती.

वरील मुद्यांच्या संदर्भात लोकसंख्याशिक्षणाची व्याप्ती फारच मोठी आहे असे ध्यानात येते. कुटुंबनियोजन, कुटुंबकल्याण यासारखे घटक तर त्यात येतातच,

पण आर्थिक व सांस्कृतिक स्थिती, निसर्गसंतुलन, पर्यावरण रक्षण यांचाही विचार लोकसंख्या शिक्षणाच्या क्षेत्रात केला जातो.

प्रस्तुत ग्रंथात ज्या निबंधकारांच्या निबंधाचा विचार केला आहे त्यांच्या निबंधात लोकसंख्या शिक्षणविषयक कोणते घटक आले आहेत याचा विचार करणे युक्त ठरेल.

लोकभ्रम या निबंधात चिपळूणकरांनी विविध अपसमजांवर टीका केली आहे. विवाहाचे वय खूप कमी असणे, मुलगाच हवा (मुलगी नको) अशी समजूत असणे, मुलाच्या जन्मवेळी घडलेल्या घटनांवरून पायगुण ठरविणे या समजुती घातक आहेत. विधवांना अपशकुनी समजणे, मुलीचा जन्म झाला की नाराजी असणे, कारण वंशाला दिवा हवा, हे समज आपल्या समाजात दृढ आहेत. या समजांमुळे लोकसंख्या वाढ किंवा लोकसंख्या दुर्बल होणे हे परिणाम होतात. समाजाच्या प्रगतीला हे समज खीळ घालतात हे विष्णुशास्त्र्यांनी 'लोकभ्रम' या निबंधात दाखवून दिले आहे.

टिळकांच्या निबंधांत या संदर्भात फारसा विचार आलेला नाही. संमतीवयाचे बिल पास करण्याबाबत त्या काळात जो गदारोळ उठला त्याबाबत टिळकांनी समन्वयाची भूमिका घेतली होती. संमतीवयाचा कायदा पास करून, वरून लादलेले तत्त्व समाजपरिवर्तनात फारसे उपयोगी ठरू शकत नाही असे टिळकांचे म्हणणे होते.

आगरकरांनी मात्र पति-पत्नी संबंधाबाबत वय वाढविण्याच्या बाजूनेच रोखठोक भूमिका घेतली होती. वय जितक्या प्रमाणात वाढेल तितक्या प्रमाणात प्रजननाची शक्यता तेवढ्या काळापुरती बंद होते. आपोआपच लोकसंख्या नियंत्रणाला मदत होते. लोकसंख्याशिक्षणशास्त्राचाच हा एक भाग आहे.

अंधश्रद्धा व रूढी-परंपरा यांमुळे समाजजीवन विस्कळित होते व समाजाच्या गुणवत्तेवर त्याचा परिणाम होतो याबाबत सर्वच निबंधकारांनी आपल्या निबंधांत विचार व्यक्त केले आहेत. मागासवर्गीयांच्या शिक्षणाबाबत विचार करताना केळकरांनी गुणवत्तेवर भर दिला आहे. मागासवर्गीयांची गुणवत्ता विशेष प्रयत्नांनी वाढविली पाहिजे असे त्यांनी सांगितले आहे.

साधनसंपत्ती व तिचा विनियोग याबाबत फार मोठ्या प्रमाणावर विवेचन उपलब्ध नसले तरी धंदेशिक्षण, औद्योगिक शिक्षण याबाबत ज्या ज्या निबंधांतून विचार झाला तेथे उत्पादन वाढीबाबतचे विवेचन केले गेले आहे.

परांजपे यांनी 'दुष्काळाला कारण कोण'' या नावाचा एक निबंध लिहिला. लोकसंख्या वाढली की साधन संपत्तीची कमतरता भासते हे तत्त्व परांजपे यांनी आपल्या निबंधात व्यक्त केले आहे याचा उल्लेख आलाच आहे. 'दगडी कोळसा'

या सारख्या विषयावरही परांजपे यांनी निबंध लिहिला. त्यात दगडी कोळशाचा साठा, त्याचे वितरण, त्याचा वापर, याविषयी विवेचन केले आहे. नव्या काळात नवी उर्जासाधने शोधून, विकसित करून त्यांचा वापर करावा आणि भूगर्भ-साधनांचा वापर काटकसरीने करावा असे लोकसंख्याशिक्षणशास्त्र सांगते. परांजपे यांनी हीच गोष्ट सूचित केली आहे.

लोकसंख्येची गुणवत्ता वाढविणे हे लोकसंख्याशिक्षणाचे उद्दिष्ट आहे. व्यक्ती, कुटुंब व समाज यांचे संबंध ज्या प्रमाणात परस्परपूरक असतील त्या प्रमाणात लोकसंख्येची गुणवत्ता वाढत असते.

केळकरांनी कुटुंबसंस्थेवर लेखांक लिहून कुटुंबाच्या गुणवत्ता वाढीबाबत व्यक्त केलेले विचार हे लोकसंख्याशिक्षणविषयक विचारच आहेत. कुटुंब व्यवस्थेत स्त्रीचे स्थान, स्त्रियांचे हक्क, मुलगा व मुलगी यासंबंधीच्या समजुती, विवाहासंबंधीचे प्रश्न, जातिबंधने, शिक्षण व संस्कृती, या सर्व घटकांच्या संदर्भात केळकरांनी सविस्तर चर्चा केली आहे. ही चर्चा लोकसंख्या शिक्षणाच्या अभ्यासाला पूरक अशी आहे.

साकल्याने विचार करता असा निष्कर्ष काढता येतो की ' लोकसंख्या शिक्षण ' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी त्याला पूरक अशा प्रकारचे विचार प्रस्तुत निबंधकारांच्या निबंधांत आहेत.

**शैक्षणिक मानसशास्त्र**

मानसशास्त्र हे जगातील अन्य सर्व शास्त्रांच्या तुलनेने नवागत शास्त्र आहे. मानसशास्त्राचा इतिहास सामान्यपणे शंभर वर्षांचाच आहे. प्राचीन काळी मानसशास्त्र हा तत्त्वज्ञानाचाच एक भाग आहे असे समजण्यात येत होते. त्याचा संबंध आत्म्याशी असे. पण नंतर मानसशास्त्र म्हणजे 'मनाचे शास्त्र' अशी व्याख्या केली गेली आणि मानसशास्त्राचे स्वरूप बदलले.

मानसशास्त्राच्या काही व्याख्या खालीलप्रमाणे –

"मानसशास्त्र म्हणजे वर्तनाचे शास्त्र" – वॉटसन

"परिस्थितीच्या अनुषंगाने व्यक्तीच्या ज्या क्रिया घडतात त्यांचे शास्त्र" – वुडवर्थ

"सामान्य मानवी प्राण्याच्या वर्तनाचे नियमन आणि पूर्वकथन करण्याच्या दृष्टीने वर्तनाचे केलेले वर्णन व विवेचन" अशी मानसशास्त्राची संकलित व्याख्या करता येईल. थोडक्यात, "मानवी प्राण्याच्या परिवर्तनक्षम समग्र वर्तनाच्या दृश्य वैशिष्ट्यांचा अभ्यास" हा मानसशास्त्राचा विषय आहे.

शैक्षणिक मानसशास्त्राच्या क्षेत्रात सामान्यपणे खालील घटक अंतर्भूत असतात –

मानसशास्त्राचे स्वरूप, अभ्यासपद्धती, विकासाच्या अवस्था, वर्तनाचे प्रेरण, संवेदना व अवबोध, संपादित वर्तन, अध्ययन प्रक्रिया, अध्ययनावर परिणाम करणारे घटक, स्मरण आणि विस्मरण, प्रतिभा कल्पना व विचार, व्यक्तिभेद, व्यक्तिमत्त्व, बुद्धिमापन कसोट्या, मानसिक आरोग्य, समूह मानसशास्त्र, शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन.

चिपळूणकर टिळक आगरकर इ, सात निबंधकारांच्या निबंधांत वरीलपैकी कोणंत्या घटकांचा विचार कोणत्या पद्धतीने केला आहे याचा विचार करता असे दिसते की एकूणच निबंधांमध्ये शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र यांच्या तुलनेने शैक्षणिक मानसशास्त्राच्या क्षेत्रातील घटकांचा विचार फारच अल्प प्रमाणात झालेला आहे. सात निबंधकारांच्यापैकी ज्यांनी यावर अधिक विचार केला ते वा. म. जोशी यांचेच नाव प्रामुख्याने याबाबत नोंदविता येईल. वा. म. जोशी यांनी ॲडलर व फ्रॉइड यांचे मानसशास्त्रीय सिद्धांत कोणते याचा परिचय करून देणारे लेख लिहिले, तर मुलांची हसरी सृष्टी यासारख्या निबंधात मुलांचे मानसशास्त्र, वर्तन, त्यांच्या सहजप्रवृत्ती या संदर्भात त्यांनी विवेचन केले आहे.

परांजपे यांनी मनाची मीमांसा व श्रद्धा या निबंधात तर चिपळूणकर यांनी लोकभ्रम या निबंधात मनोव्यापारांचे दर्शन घडविणारे विवेचन केले आहे. पण त्यात विशेष असे शास्त्रीय विवरण नाही. ''मनाची मीमांसा' यामधील विचार प्रकरण ४ मध्ये आहे.

'बुद्धीचा ऱ्हास' या निबंधात टिळकांनी बुद्धी म्हणजे काय याचा विचार करताना त्रोटक मानसशास्त्रीय विचार केला आहे. पण बुद्धिमापन अथवा बुद्धिवर्धन याबाबत सखोल व सशास्त्र विवेचन केलेले नाही.

या व्यतिरिक्त प्रस्तुत निबंधकारांच्या निबंधात शैक्षणिक मानसशास्त्र यासंबंधी महत्त्वाचे काहीही लिहिले गेले नाही.

चिपळूणकरादि निबंधकार इतका सर्वांगीण विचार करत असताना वा. म. जोशी यांचा अपवाद वगळल्यास अन्य निबंधकारांच्या निबंधात मानसशास्त्रीय चिकित्सा का आली नसावी याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

व्यक्तीवादी मानसशास्त्राचा परिचय, ज्या काळात हे निबंधलेखन केले गेले त्या काळात नव्यानेच होत होता. भारतीय दर्शनातून आत्मिक विकासासंबंधी जेवढे मानसशास्त्र सांगितले गेले तेवढेच भारताला परिचित होते. मनोविश्लेषण शास्त्रादि उपघटकांचा परिचय नव्यानेच होत होता.

प्रस्तुत निबंधकारांची दृष्टी सामाजिक व राजकीय होती. व्यक्तिकेंद्रित विचारापेक्षा समाजकेंद्रित विचाराला त्यांनी अधिक महत्त्व दिले होते. स्वातंत्र्यसंपादन

ही त्या काळाची एक राष्ट्रीय आकांक्षा होती. या आकांक्षापूर्तीच्या मार्गातील एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे सामाजिक सुधारणा, सामाजिक सुधारणेच्या अनुषंगाने सांस्कृतिक, धार्मिक विचार आला. पण मानसशास्त्रीय विचारांची बैठक पूर्णपणे व्यक्तिमनकेंद्रित असल्याने व तशा प्रकारची भूमिका या निबंधकारांची नसल्याने मानसशास्त्र वा शैक्षणिक मानसशास्त्र याबाबत त्यांच्या निबंधातून विचार मिळत नाहीत. (मात्र समूह मानसशास्त्राच्या क्षेत्रातील काही संदर्भ सापडतात.)

## स्फुट विचार

आतापर्यंत ज्या मुद्यांची चर्चा केली त्या व्यतिरिक्त प्रस्तुत निबंधकारांच्या निबंधात कोणकोणते विचार आले आहेत याचा आढावा घेणे युक्त ठरेल.

शैक्षणिक अभ्यासक्रमात अभ्यासाबरोबरच अभ्यासेतर चळवळींना महत्त्वाचे स्थान दिलेले असते. यामध्ये वक्तृत्त्व, वाचन, ग्रंथालयाचा उपयोग, अभिनय, क्रीडा, यांचा समावेश होतो.

**अभ्यासेतर उपक्रमांचे** शैक्षणिक महत्त्व मोठे आहे. आधुनिक शिक्षण पद्धतीत तर या उपक्रमांना अभ्यासाच्या बरोबरीने स्थान दिलेले असते.

अभ्यासेत्तर उपक्रमांची उद्दिष्टे खालीलप्रमाणे –

To capitalize, for educational profit; important fundamental drives, to prepare the student for active life in a democracy; to make the student increasingly self-directive; to teach social co-operation, to increase the interest of the student in the school, to develop schoolmorals; to foster sentiments of law and order; to discover and develop special qualities and abilities. (H. C. Mckown)

वक्तृत्व या निबंधात चिपळूणकर यांनी वक्तृत्वकलेसंबंधी सखोल विवेचन केले आहे. वक्तृत्वाचा उत्कर्ष होण्याची साधने कोणती ते विशद करून वक्तृत्वकला आत्मसात कशी करावी, ती केल्याने कोणते सुपरिणाम घडून येतात याचे मौलिक विवेचन केले आहे.

त्याचप्रमाणे 'वाचन' या विषयासंबंधी चिपळूणकर यांचे विचार अभ्यसनीय आहेत. वाचन कोणत्या दृष्टीने हितावह असते, वाचनाबाबत आपल्याकडे परिस्थिती काय आहे याविषयी चर्चा केली आहे. विद्यार्थ्यांना वाचनाच्या सवयी लावण्याच्या दृष्टीने या निबंधातले विचार मोलाचे आहेत. कीर्तन संस्थेसंबंधी टिळकांचा लेख 'कीर्तन' विषयाच्या अभ्यासास उपकारक आहे. अभ्यासपूरक सांस्कृतिक कार्यक्रमात कीर्तनाचा समावेश असतो. 'कीर्तन' या कलाप्रकारात गायन, नृत्य, अभिनय,

वक्तृत्व या सर्वच कलांचा संयोग असतो. या दृष्टीने विद्यार्थ्यांना कीर्तनप्रवृत्त करावयाचे असेल तर शिक्षकांनी हा निबंध वाचण्यासारखा आहे.

केळकरांनी 'ज्ञानाची सदावर्ते' या निबंधात ग्रंथसंग्रहालयांचे महत्त्व व त्यांची स्थिती यांचे विवरण केले आहे. ग्रंथालये ही ज्ञानाची सदावर्ते आहेत, त्यांच्या रूपाने सतत ज्ञानाचे अन्नछत्र सुरू असते असे केळकर सांगतात. अभ्यासपूरक उपक्रमात ग्रंथालयांचा समावेश करून घेणे, अभ्यासेतर पुस्तके वाचणे या उपक्रमाला विशेष महत्त्व आहे. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात परांजपे यांनी 'शक्ती आणि शिक्षण' हा विचार मांडला आहे. तो ग्रंथसंग्रहांसंबंधीच आहे. लष्करी शिक्षण, शारीरिक शिक्षण यासंबंधी टिळक, कोल्हटकर यांनी मांडलेले विचारही लक्षणीय आहेत.

अन्य स्फुट विचारांमध्ये भाषाविचार, पाठ्यपुस्तके, यासारखे विचार चर्चिले आहेत.

काही चरित्रात्मक निबंधांच्या द्वारा स्फुट असा शिक्षणविचार प्रकट झाला आहे. धीरोदात्तता, व्यासंग, चारित्र्य, शील, परोपकार, राष्ट्रनिष्ठा, इ. विविध गुण विविध चरित्रात्मक निबंधात प्रकर्षाने दिसून येतात. त्या त्या व्यक्तीच्या ठायी हे गुण कसे विकसित झाले, त्यांचा समाजाला काय उपयोग झाला, त्यांची जडणघडण कोणत्या प्रकारे झाली याचा बोध होऊन ती तत्त्वे पुढील पिढीला मार्गदर्शक ठरावीत अशा प्रकारे व्यक्त करण्यात आली. उदा. चिपळूणकरकृत डॉ. जॉन्सन यांच्यावरील निबंध. या प्रदीर्घ निबंधात डॉ. जॉन्सन यांची ज्ञानलालसा, त्यांचा व्यासंग, त्यांचे ठायी असलेले विशेष गुण - निश्चय, अभिमान, सदयत्व, धैर्य - या सर्व गुणांचा परिचय होतो.

परांजपे यांनी लिहिलेल्या 'दासबोध' या निबंधात रामदासांनी केलेल्या प्रबोधन कार्याचा परिचय करून दिला आहे. दासांनी केलेला बोध वा दासांना बोध अशी या सामासिक शब्दाची फोड त्यांना अभिप्रेत आहे.

'ज्ञानमहती' या विषयावर सर्वच निबंधकारांनी स्वतंत्रपणे वा अन्य विषयांच्या संदर्भात लेखन केले आहे. ज्ञान म्हणजे काय, ज्ञानाचे महत्त्व, ज्ञान मिळविण्याची साधने, ज्ञान आणि अज्ञान या संदर्भात सर्व निबंधकारांच्या निबंधात विचार व्यक्त झाले आहेत. ज्ञानाच्या बरोबरीने बुद्धीचा विचार केला आहे. आगरकरांनी 'तरूण सुशिक्षितांस' विज्ञापना करून नवे आवाहन केले तर 'सुशिक्षितांची कर्तव्ये' याबाबत टिळक, केळकर यांनीही जाणीव करून दिली आहे.

विविध विषयांवर केल्या गेलेल्या या लेखनाचे शैक्षणिक मूल्य व त्यातील शैक्षणिक आशय लक्षात घेण्यासारखा आहे.

## तुलनात्मक चिकित्सा

चिपळूणकर, आगरकर, टिळक, परांजपे, केळकर, कोल्हटकर, जोशी या सात निबंधकारांच्या शिक्षणविचारांचे समालोचन आतापर्यंत केले. आता या सातही निबंधकारांच्या शिक्षणविषयक विचाराची तौलनिक चिकित्सा करावयाची आहे.

निबंध हा एक साहित्यप्रकार आहे. आणि साहित्यात साहित्यिकाच्या प्रवृत्तीचे, प्रकृतीचे, त्याच्या व्यक्तित्वाचे प्रतिबिंब अपरिहार्यपणे उमटतेच. या दृष्टीने पाहता या निबंधांचा विचार करावयाचा तर निबंधकारांचाही विचार करावा लागेल.

चिपळूणकरांनी डॉ. जॉन्सन यांना आदर्श ग्रंथकार मानले होते. 'जॉन्सनचे अकुतोभय आणि आव्हानप्रद व्यक्तित्व, त्याची राष्ट्राभिमानाने रसरसलेली आणि राष्ट्रवादाच्या कवचात अवगुंठीत होऊन बसलेली अस्मिता चिपळूणकरांना आदर्शभूत आणि अनुकरणीय वाटत होती.''

स्वाभाविकपणेच चिपळूणकरांच्या निबंधात त्यांचे हे सर्व आदर्श उतरले आहेत. शिक्षणविचारातही चिपळूणकरांचा राष्ट्रवाद प्रकर्षाने दिसून येतो.

बुद्धीची तीक्ष्णता आणि मनाची निर्भयता यांचा प्रत्यय टिळकांच्या वाक्यातून येतो. टिळकांनी ज्या विषयावर लेखन केले ते विषयही विविध स्वरूपाचे आहेत. त्यात टिळकांची विद्वत्ता व त्यांची तर्कशक्तीही दिसून येते. ज्ञानार्जन हे गतिमान व जिवंत असावे असा टिळकांचा आग्रह त्यांच्या लेखनातून प्रतीत होतो. आपले राष्ट्रीय शिक्षणही अद्ययावत ठेवले पाहिजे असे विचार टिळकांनी व्यक्त केले आहेत. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय शिक्षणात स्वावलंबन असले पाहिजे असा टिळकांचा आग्रह होता. आपल्या सडेतोड व भरीव टीकेमुळे त्यांनी शिक्षण संस्थांना योग्य ते मार्गदर्शन तर केलेच पण एक वैचारिक बैठक मिळवून दिली.

आगरकरांचे लेखन विवेकनिष्ठेवर आधारलेले होते. बुद्धिप्रामाण्याचा निरपवादपणे अंगीकार केल्यामुळे विवेकी माणसाने बुद्धीच्या निकषावर घासून जे ग्राह्य तेच पत्करले पाहिजे, इतर साऱ्या मूर्ख व वेडगळ कल्पना कोळिष्टकांप्रमाणे झटकून टाकल्या पाहिजेत असे आगरकरांना वाटत होते. त्यामुळे आगरकरांच्या शैक्षणिक विचारांना समाजसुधारणेची बैठक होती.

केळकर हे व्यवसायाने पत्रकार असले तरी वृत्तीने मार्मिक बहुश्रुत व अभिजात रसिक होते. जिज्ञासू वृत्तीमुळे अनेक क्षेत्रांतील बहुमोल ज्ञानाचा संचय त्यांच्याजवळ नेहमीच असे. त्याचाच प्रत्यय त्यांच्या शैक्षणिक विचारांबाबत येतो.

परांजपे वृत्तीनेच कवी होते. त्यामुळे त्यांच्या लेखनात भावनोद्रेक जास्त दिसतो. काव्यात्म मनोवृत्तीमुळे ते तरलतेकडे वळतात. त्यामुळे 'मनाची मीमांसा' सारखा मानसशास्त्रीय लेख लिहितानाही ते काव्यात्म होतात.

कोल्हटकरांची वृत्तीही तशीच होती. त्यात खेळकरपणा अधिक होता. अर्थातच देशाभिमान हाच कोल्हटकरांच्या लेखणीचा स्थायीभाव होता. शिवाजी, रामदास, व टिळक ही तीन दैवते त्यांना पूज्य होती.

वा. म. जोशी हे तर स्वत: राष्ट्रीय शिक्षक होते. विजापूरकरांच्या राष्ट्रीय शाळेत व नंतर कर्वे यांच्या अनाथबालिकाश्रमात त्यांनी विविध पदांवर कामे केली. जोशी यांच्या कादंबऱ्यांतही वैचारिकता हाच प्रमुख भाव आहे. 'ज्ञानाच्या उच्च आनंदात' स्वत: वामनराव सदैव रममाण झाले व त्यांनी तशा प्रकारचेच लेखन केले.

या निबंधकारांच्या सर्व वैशिष्ट्यांचा परिणाम त्यांच्या लेखनावर आशय व आविष्कार यांबाबतही झाला.

कोणत्या निबंधकाराच्या निबंधात शिक्षण विचार कोणत्या पद्धतीने व किती आला आहे याचा विचार करताना खालील मुद्दे लक्षात घ्यावे लागतील –

विषयांची विविधता, विवेचनातील सखोलपणा, शिक्षण विषयाशीच संबंध असलेले तपशील, व्यापकदृष्टी, विचारातील आधुनिकता.

वरील मुद्दे विचारात घेऊन सर्व निबंधकारांच्या शिक्षण विचारांचा तौलनिक अभ्यास केला तर खालील गोष्टी ध्यानात येतात. –

- टिळक व केळकर यांच्या निबंधांत अन्य सर्व निबंधकारांच्या शिक्षण विचारापेक्षा विषयांची विविधता अधिक आहे. त्यातही बहुश्रुतपणाचा प्रत्यय केळकरांच्या लेखनात येतो तर पांडित्याचा प्रत्यय टिळकांच्या लेखनात येतो.
- विवेचनातील सखोलपणा आगरकर टिळक चिपळूणकर यांच्या निबंधात अधिक आहे. त्याखालोखाल वा. म. जोशी यांच्या निबंधात सखोल विचार आहेत.
- परांजपे यांच्या निबंधात आवेश, काव्यात्मता यांचा प्रत्यय येतो.
- कोल्हटकरांचे लेख हे बहुजनसमाजाचे शिक्षण या नात्याने लिहिले गेले आहेत. सर्वसामान्य लोकांना त्यांचे विचार आकर्षित करतात.
- शिक्षण-विचारातील आधुनिकतेच्या दृष्टिकोनातून विचार करता आगरकरांच्या निबंधांचा प्रथम विचार करावा लागतो. केळकरांच्या निबंधांतही आधुनिकता प्रत्ययास येते. त्या मानाने अन्य निबंधकारांच्या शिक्षण विचारात (मानस चिकित्सेव्यतिरिक्त) निर्णयात्मक आधुनिकता तुलनेने कमी दिसते. स्त्रियांना संसार करा की शिक्षण घ्या असे सांगताना वामनरावांच्या समतोल लेखणीचा काटा संसाराकडेच झुकतो. त्यात चिकित्सक दृष्टी आहे, मात्र त्यात आधुनिकता नाही, असे ठोस विधान करता येणार नाही.
- चरित्र विषयात चिपळूणकर जेवढे रममाण होतात तेवढा अन्य कोणताही निबंधकार

होत नाही. डॉ. जॉन्सन यांच्यावरील निबंध हा एक प्रदीर्घ शैक्षणिक निबंध आहे असे म्हणता येईल. या निबंधाच्या अभ्यासाने ज्ञानाच्या क्षेत्रातील अनेक विषयांचा उत्तम परिचय व व्यासंग, राष्ट्रनिष्ठा या तत्त्वांचा परिचय होतो.

❖ आगरकरांच्या शिक्षण विचारांची बैठक त्यांच्या अन्य लेखनाप्रमाणेच बुद्धिवाद व समाजसुधारणा हीच आहे. विवेकनिष्ठेला पर्याय नाही असे आगरकरांचे मत होते. हाच विचार त्यांच्या शिक्षणविचारातही सतत प्रत्ययास येतो. आगरकरांइतकी विवेकनिष्ठ दृष्टी इतक्या मोठ्या प्रमाणावर अन्य कोणत्याही निबंधकाराच्या निबंधात प्रत्ययास येत नाही.

❖ केळकरांच्या शिक्षण विषयक निबंधात भरपूर माहिती मिळते. आकडेवारी, तपशील, घटना, नावे, वर्षे, नोंदी यांचा विचार करता केळकरांचे निबंध समृद्ध आहेत. त्यांची समतोल दृष्टीही त्यांच्या निबंधात प्रत्ययास येते.

सातही निबंधकारांच्या निबंधातील शिक्षण विषयक विचारांची तौलनिक चिकित्सा वरीलप्रमाणे आहे. मात्र त्यात क्रमवारी लावणे युक्त होणार नाही.

**बोधकथा**

प्रस्तुत निबंधकारांनी आपल्या निबंधांत विविध विषयांचे विवरण करताना निरनिराळ्या गोष्टी, बोधकथा, यांचा उपयोग केला आहे. दृष्टांत स्वरूप असलेल्या या कथांचे शैक्षणिक महत्त्व लक्षणीय आहे. अशा सर्व कथा एकत्र करून त्या प्रत्येक कथेचा विषय, तीपासून घ्यावयाचा बोध अशा प्रकारचे एखादे वाचनपुस्तक (रीडर) तयार करता येईल.

उदा. 'वक्तृत्त्व' निबंधात वकृत्त्वाची तयारी यासंबंधी चिपळूणकरांनी डिमोस्थिनिसची गोष्ट उद्धृत केली आहे.

वाचन विचारासंबंधी पेट्रार्कची गोष्ट सांगितली आहे.

उच्चनीच भाव नाहीसा व्हावा या संदर्भात वा. म. जोशी यांनी म. गांधींची गोष्ट सांगितली आहे.

ही केवळ वानगीबद्दल काही उदाहरणे दिली आहेत.

याशिवाय गौतम बुद्ध, म. गांधी, ख्रिस्त, कृष्ण, राम इ. महापुरूषांच्या जीवनातील अनेक प्रसंग या निबंधकारांनी वेळोवेळी दाखले म्हणून वापरलेले आहेत.

या सर्व गोष्टी नुसत्या बोधकथा नाहीत तर त्यांचे शैक्षणिक मूल्य महत्त्वाचे आहे.

उदा. चिपळूणकरांनी जी पेट्रार्कची गोष्ट सांगितली आहे ती अशी – पेट्रार्कला वाचनाचे खूप वेड होते. वाचून वाचून तो आजारी पडला. वैद्यांनी त्याला वाचू नका असा सल्ला दिला. पेट्रार्कचे वाचन बंद झाले. वैद्यांनी हरतऱ्हेचे उपचार केले.

पण तरीही पेट्रार्कची प्रकृती सुधारेना. वैद्यांची मती कुंठित झाली. शेवटी पेट्रार्कने सांगितले.

"मला पुस्तके द्या. तेच माझे औषध."

पेट्रार्कला पुस्तके दिली गेली आणि वाचनास सुरूवात केल्यावर पेट्रार्कची प्रकृती सुधारली.

या कथेचा आशय वाचनविचाराच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

डिमॉस्थिनिसची कथा प्रयत्न, जिद्द, चिकाटी व हरतऱ्हेचे परिश्रम करून एखादे कौशल्य (पूर्वी जे अशक्यप्राय वाटत होते ते) प्राप्त करून घेता येते याविषयी स्फूर्ती देणारे आहे. या कथांचे विश्लेषण हा एक स्वतंत्र विषय होईल. या समालोचनात फक्त त्यांचा निर्देश केला आहे.

## शिक्षण विचारांचे वर्तमानकालीन प्रयोजन

१९५० पूर्वी, प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील मराठी निबंधकारांच्या निबंधात व्यक्त झालेल्या शिक्षण विचाराचे वर्तमानकालीन प्रयोजन काय याचा विचार करणे आवश्यक ठरते.

सातही निबंधकारांच्या शैक्षणिक विचारांचा संकलित अभ्यास केला तर असे दिसून येते की शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र या क्षेत्रातील त्यांचे अनेक विचार आजही ताजे व आधुनिक असेच वाटतील. त्यांतील चर्चा आजही मार्गदर्शक ठरेल.

उदा. स्त्री शिक्षण, समाजसुधारणा यांबाबत आगरकरांनी व्यक्त केलेल्या विचारांचे प्रयोजन आजही संपलेले नाही.

"जिच्यावर आपण अपत्य संगोपनाची जबाबदारी सोपवतो तिला अक्षरशत्रू राहू देणे योग्य नाही." असे आगरकर म्हणतात तेव्हा स्त्री शिक्षणाचे महत्त्व किती मोठे आहे हे आपल्याला मान्यच करावे लागते. आजही भारतात अक्षरशत्रू स्त्रिया कमी नाहीत. प्रौढ शिक्षणावरील प्रचंड खर्च, विविध पातळ्यांवरील प्रयत्न होऊनही स्त्री शिक्षणाची वाटचाल यशस्वी झाली आहे असे म्हणता येत नाही.

टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या संदर्भात जी व्याख्या केली ती अशी –

"देशातील तरूण पिढी देशाचे राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास व वाढविण्यास समर्थ होईल अशा प्रकारे त्यांस शिक्षण देणे हे देशातील विद्या खात्याचे कर्तव्य आहे आणि त्यासच राष्ट्रीय शिक्षण असे म्हणतात."

ही व्याख्या आजही विद्या खात्याला, शिक्षण क्षेत्रातील विचारवंतांना मार्गदर्शन करणारी आहे.

विद्यापीठे, विद्यापीठांचा कारभार याबाबत टिळक, केळकर यांनी केलेल्या

लेखनात आजही मार्गदर्शक तत्त्वे सापडतात.

सक्तीचे शिक्षण किंवा सार्वत्रिक शिक्षण याबद्दल टिळक, आगरकर, केळकर या सर्वांनीच आस्थेने लेखन केले आहे. स्पार्टन व अथेनियन लोकांना लोकशिक्षणाची महती चांगली कळली होती या इतिहासापासून तो लोक शिक्षणाच्या स्वरूपाबद्दल चर्चा आगरकरांनी केली आहे. आजही हे प्रश्न ज्वलंत आहेत. देशातील शिक्षण प्रसाराच्या चळवळींना चांगले स्वरूप आल्यासारखे आज वाटत असले तरी सार्वत्रिक शिक्षणाची समस्या संपलेली नाही. उलट या समस्येचे परिणाम आज अधिक जाणवत आहेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे, सार्वत्रिक असावे आणि मोफत असावे या सूत्राचा उपदेश या देशात आगरकरांनी प्रथम केला. (मा. दा. आळतेकर)

**गुरूशिष्य संबंध;** शिक्षक, शिक्षकाची प्रतिमा, शिक्षकांची कर्तव्ये याबाबत टिळक, आगरकर, चिपळूणकर यांची मते पक्की होती.

"हे आमचे गुरूच नव्हेत" या निबंधात स्वदेशी चळवळीच्या निमित्ताने 'गुरू' विषयी केलेली चर्चा आजही उद्‌बोधक स्वरूपाची वाटेल. गुरू ज्ञानसंपन्न, निस्पृह व निगर्वी असला पाहिजे, तो सत्तेचा अंकित किंवा लोभाने बांधलेला असता कामा नये याबाबत टिळकांनी आग्रहाने प्रतिपादन केले आहे.

"शिक्षक हा मित्र मार्गदर्शक व तत्त्वज्ञ असतो" असे शैक्षणिक तत्त्वज्ञानात प्रतिपादलेले असते. पण त्याची अनुभूती व्यवहारात येणे आवश्यक असते.

भारतासारख्या विकसनशील देशात शिक्षकावर फार मोठी जबाबदारी आहे. खरा भारत हा ग्रामीण भारत आहे. विद्यार्थ्यांच्या विकासाबरोबरच समाजाच्या विकासाचाही विचार शिक्षकाने करायला हवा. ग्रामीण शाळा ही समाजाच्या सुखदु:खांपासून वेगळी राहू शकत नाही हे शिक्षकाने पूर्णपणे ध्यानात ठेवले पाहिजे. शिक्षकांची ही जबाबदारी शिक्षकांनी ओळखली पाहिजे. "गरीब शाळा मास्तराची कैफियत" या निबंधात केळकरांनी शिक्षकांच्या हलाखीचे विदारक चित्र रंगवले आहे. आज शिक्षकांची आर्थिक स्थिती थोडीफार सुधारल्यासारखे वाटले तरी अन्य क्षेत्रांच्या तुलनेने ही स्थिती चिंतनीय आहे.

"शाळा मास्तरांनी संप केला म्हणून सरकारचे कोणतेच काम अडणार नाही हे आम्हास माहित आहे." असे केळकर स्वच्छ सांगतात. आजही शिक्षकांना संप करावा लागतो तेव्हा शासनाची वृत्ती हीच असते. पण शिक्षकांना संप करावाच लागू नये असे शासनाचे धोरण असावे ही केळकरांची सूचना आधुनिक काळातही स्वीकार्यच आहे.

शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या शीलाचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो हे वा. म. जोशी यांनी नुसते तत्त्वविवेचनापुरते सांगितले नाही तर त्यांनी प्रत्यक्ष अनुभवावरून

हे अनुमान काढले आहे. "दुय्यम शाळांतील धर्मशिक्षण आणि नीतीशिक्षण" या निबंधात त्यांनी हे विचार प्रकट केले आहेत.

**भाषा शिक्षणाचा** प्रश्न हा आजही शैक्षणिक क्षेत्रात चर्चेचा विषय आहे. त्रिभाषासूत्र स्वीकारूनही मातृभाषेच्याबाबत योग्य तितकी प्रगती आज झाली आहे असे समजता येत नाही. "देशी भाषांचा विकास हा राष्ट्राच्या विकासास पोषक होतो" असे विचार चिपळूणकर, टिळक, आगरकर, परांजपे, केळकर यांनी प्रत्यक्ष वा पर्यायाने मांडले आहे. सर्वांनीच मातृभाषा शिक्षणाची व मातृभाषेतून शिक्षण देण्याची शिफारस केली. आज तसे शिक्षण दिले जाते, पण इंग्रजी माध्यमाची अनावर हौस समाजात वाढत आहे ही या पार्श्वभूमीवर चिंतेची बाब समजली पाहिजे. अशा स्थितीत या सर्व वैचारिकांचे मातृभाषेबाबचे विचार मार्गदर्शक ठरतील यात शंका नाही.

**राष्ट्रीय एकात्मता** हा आजचा आणखी एक गंभीर प्रश्न आहे. पंधरा भाषा, त्यापैकी एक हिंदी राष्ट्रभाषा, आणि शिवाय इंग्रजीचा वाढता प्रभाव यांमुळे भारतीय जीवनात एकसंधता निर्माण होण्याची, नव्हे ती मुद्दाम निर्माण करण्याची गरज उत्पन्न झाली आहे. या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या भाषाभगिनींचा परिचय आपल्याला एकमेकांना जवळ आणेल.

कोल्हटकरांनी 'तमिळ भाषेवर' लिहिलेला एक निबंध तमिळ भाषा व तमिळ भाषिक यांच्या सांस्कृतिक महत्त्वाचे दर्शन घडवितो. 'संस्कृत विद्येचे पुनरूज्जीवन' या केळकरांच्या निबंधात समान भारतीय सूत्र सापडते व त्यातून राष्ट्रीय एकात्मेच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी स्फूर्ती मिळते. कोल्हटकरांनी लिहिलेले ब्राह्मण-अब्राह्मण हे लेख किंवा आगरकरांचे अनेक लेख समाजपरिवर्तनाच्या मार्गावर मार्गदर्शन करणारे आहेत. त्यांच्या अभ्यासाने राष्ट्रीय एकात्मतेला प्रोत्साहक गोष्टी घडू शकतील. जात, धर्म, भाषा, पंथ यांचे भेद कायम ठेवूनही अभिनिवेश सोडता येतो आणि आपणाला एकमेकांच्या जवळ जाता येते, मने सांधता येतात हे यासंबंधीच्या लेखांवरून प्रत्ययास येते.

आपल्या सामाजिक जीवनात **कुटुंबसंस्थेला** विशेष महत्त्व आहे. पण नव्या काळात ही कुटुंबव्यवस्था नवी नवी रूपे धारण करीत आहे. एकत्र कुटुंबपद्धती मोडकळीस आली. विभक्त पद्धतीचे फायदे तसेच तोटेही भोगावे लागले. एकत्र कुटुंबात मिळणारे अनौपचारिक शिक्षण, जबाबदारीची जाणीव, सुरक्षितता या गोष्टी आता नाहीत. ते अपरिहार्यच होते. पण बदलत्या समाजजीवनात व्यक्तीचा विकास कोणत्या माध्यमातून व्हावा हे प्रश्न निर्माण झाले. याची सविस्तर चर्चा केळकरांच्या कुटुंबसंस्थेविषयीच्या निबंधात केली आहे. वा. म. जोशी यांनी संसारी स्त्रियांच्या

कर्तव्याविषयी व शिक्षणाविषयी व्यक्त केलेले विचार आजही मार्गदर्शक ठरू शकतील.

**समाजप्रबोधन** किंवा **लोकशिक्षण** ही काळाची गरज आहे. अफाट लोकसंख्या व विस्तार असलेल्या या देशात केवळ शाळा महाविद्यालयातून दिले जाणारे शिक्षण पुरे पडणार नाही. त्यासाठी वृत्तपत्रे हवीत. वृत्तपत्रांच्या कार्याविषयी त्यांच्या प्रबोधक भूमिकेविषयी कोल्हटकर, केळकर, टिळक, परांजपे यांनी व्यक्त केलेले विचार अनुकरणीय आहेत. "सुधारक काढण्याचा हेतू" सांगताना आगरकरांनी 'समाजप्रबोधन' हाच हेतू डोळ्यासमोर ठेवलेला होता. आज जनसंपर्क माध्यमांचा विलक्षण प्रभाव समाजमनावर आहे. लोकरंजन करता करता लोकशिक्षण करण्याची भूमिका या माध्यमांनी बजावली पाहिजे ही या निबंधकारांची विचारसरणी आजही अभ्यसनीय वाटते.

कीर्तनकार हा तर मूर्तिमंत लोकशिक्षक; कीर्तनकाराच्या भूमिकेविषयी परांजपे यांनी आपल्या निबंधात विवेचन केले आहे. "तात्यापंतोजीपेक्षा हा लोकशिक्षक प्रभावी" असल्याचे त्यांनी सांगितले आहे. "कीर्तनकाराचे मुख्य कर्तव्य समाजशिक्षण" हेच असल्याचे टिळकांनी आपल्या निबंधात सांगितले आहे. पदवीधरांचे कीर्तनसंस्थेकडे लक्ष गेले तर इष्ट त्या सुधारणा लवकर घडून येतील असे टिळकांनी त्यावेळी लिहिले ते आजही खरे आहे.

शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शाळेत वा कॉलेजमध्ये यावे लागते. पण कीर्तनकार हा शिक्षक स्वत: लोकांपर्यंत जातो. 'रंजनाद्वारा अंजन' हे कीर्तनकाराचे ब्रीद असते. आजच्या काळात कीर्तनकाराची भूमिका विशेष महत्त्वाची आहे. आजच्या यंत्रयुगात, धावपळीच्या जीवनात व आर्थिक स्पर्धेच्या दिवसात माणसाला अंतर्मुख व्हायला लावेल तर तो कीर्तनकारच होय.

भारतीय घटनेतील अभिप्रेत समाजजीवन, मूल्यसरणी आणि उद्दिष्टे साकार व्हायची असतील तर मनोजागृती आवश्यक आहे. शिक्षण उपरे ठरत नसून जाणीव व जागृतीचे साधन आहे, ते अनौपचारिक आहे. ते खेड्यात डोंगरदऱ्यात, वाड्यात, कारखान्यात, आद्योगिक वस्तीत पोचायला हवे.

हे शिक्षण समाजापर्यंत पोचवणारा कीर्तनकार हा लोकशिक्षक आहे. या दृष्टीने कीर्तनकाराविषयीचे हे विचार मोलाचे आहेत.

याशिवाय व्यक्तिविकास, विद्यावृत्ती, शिक्षणाचा इतिहास, राष्ट्राभिमान, भारतीय परंपरा, इंग्रजीतील ज्ञानभांडार या व अशा विविध विषयांवर जे विचार या निबंधकारांनी व्यक्त केले आहेत ते आजच्या काळात अत्यंत उपयुक्त असेच वाटतील. विचारांची सार्वकालिकता हे या निबंधांचे वैशिष्ट्य असल्याने त्यातील बरेच विचार सर्वकाळी महत्त्वाचे वाटतील.

## नवे शैक्षणिक धोरण आणि प्रस्तुत प्रबंधातील शिक्षणविचार

भारताचे पंतप्रधान कै. राजीव गांधी यांनी १२ नोव्हेंबर १९८४ रोजी आकाशवाणी व दूरदर्शनवरून राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात खालील विचार व्यक्त केले—

" राष्ट्रीय विकास व एकात्मता यांची प्रेरणाशक्ती ठरण्याच्या दृष्टीने शिक्षण पद्धतीची फेररचना होणे आवश्यक आहे. या पद्धतीचे सर्वसमावेशक पुनर्निरीक्षण करून सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय जागृती निर्माण करण्याचा माझा विचार आहे."

या धोरणाला अनुलक्षून नवे शैक्षणिक धोरण ठरविण्यात आले, त्याचा मसुदा ठरविण्यात आला. जानेवारी १९८५ मध्ये याबाबत केंद्र शासनाच्या वतीने प्रथम घोषणा करण्यात आली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय विकासाला गती देणे हे शिक्षणाचे ध्येय साध्य झाले नाही हे या धोरणविषयक मसुद्याच्या प्रास्ताविकात नमूद करण्यात आले.

" शिक्षणाचे सार आणि भूमिका " विशद करताना या मसुद्यात म्हटले आहे –

" शिक्षणाची एक विशिष्ट संवेदनशील भूमिका आहे. ह्यामुळे राष्ट्रीय एकात्मता, विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन आणि विचारांचे व आत्म्याचे स्वातंत्र्य यांचा लाभ होतो. परिणामत: आपल्या संविधानात प्रामुख्याने प्रतिपादिलेली समाजवाद, सर्वधर्मसमभाव आणि लोकशाही ही उद्दिष्टे गाठता येतात."

वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे हे नव्या शैक्षणिक धोरणाचे ध्येय आहे. मराठी निबंधकारांच्या निबंधातही याप्रकारचे विचार व्यक्त झाले आहेत. चिपळूणकर यांनी भुताखेतांसंबंधी 'लोकभ्रम' या निबंधात विवेचन करताना विज्ञानवादी व बुद्धिवादी दृष्टीकोनाचा पुरस्कार केला आहे.

मनाला शास्त्रीय वळण लावण्याच्या दृष्टीने या निबंधाचा शिक्षणक्रमात समावेश झाला पाहिजे.

विज्ञानामुळे जगाचा संपर्क वाढला आहे आणि जग सुखी होणार आहे असे चिपळूणकर म्हणतात.

विवेकनिष्ठा आणि बुद्धिवाद ही तर आगरकरांच्या निबंधाची वैशिष्ट्ये. त्यात वैज्ञानिक दृष्टीकोन सर्वत्र दिसतो.

टिळकांनी आपल्या राजकीय तत्त्वज्ञानात बहिष्कार योगाचा पुरस्कार केला म्हणजे वैज्ञानिकतेचाच पुरस्कार केला.

तत्त्वचिकित्सक वा. म. जोशी यांनी आपल्या निबंधांतून वैज्ञानिकतेचा पुरस्कार करताना नवमतवाद म्हणजे काय हे स्पष्ट केले. व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व वा. म. जोशी यांनी प्रतिपादिले आहे. तो वैज्ञानिक दृष्टीकोनच होय. फ्राइड व ॲडलर

यांच्या मानसशास्त्रावर लिहिताना वा. म. जोशी हे मनोव्यापारांचा शास्त्रीय दृष्टीनेच विचार करतात.

याच मसुद्यातील भाग ४ मध्ये 'समानतेसाठी शिक्षण' या सदरात स्त्रियांना समानता मिळवून देण्यासाठी शिक्षण, वर्गीकृत जातींसाठी शिक्षण यांबाबत काही मुद्दे स्पष्ट केले आहेत.

आगरकरांचे स्त्री शिक्षण विषयक विचार, केळकरांचे हीनजातींचे शिक्षण या निबंधातील विचार, वा. म. जोशी यांचे विचार-लहरीतील विचार या दृष्टीने अभ्यसनीय आहेत.

तांत्रिक शिक्षण, शिक्षणाचे व्यवस्थापन यासंबंधीही या निबंधकारांचे काही विचार नव्या शैक्षणिक धोरणास अनुकूल आहेत.

भाग १२ मध्ये 'भवितव्य' या शीर्षकाखाली खालील मजकूर आहे –

"हे शतक संपताना देशाची लोकसंख्या सुमारे १०० कोटी असेल. या शैक्षणिक संरचनेचा पाया बळकट करणे हे आमचे प्रमुख कर्तव्य आहे. या संरचनेच्या शिरोभागी असलेले लोक जगातील उत्तममोत्तमांपैकी असतील. याची खात्री करून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. भूतकाळात आपल्या संस्कृति-निर्झरांनी पाया व शिखर या दोहोंची नीट काळजी घेतली होती. आता मानव साधन सामुग्री विकासासाठी शिक्षण आपली बहुमुखी भूमिका पार पाडेल यात शंका नाही."

यावरून हे ध्यानात येते की शिक्षणाला मानवसाधनसामुग्रीच्या विकासाचे साधन मानण्यात येते. हे साधन बहुमुखी आहे.

"डेक्कन कॉलेजला पाहून केशवरावांच्या मनात आलेले विचार" या निबंधात परांजपे यांनी या भविष्यकालीन आशेसारखेच विचार व्यक्त केले आहेत. शिक्षणाने खरा विकास होतो का? झाला का? केशवरावांना तर वाटले आपले ज्ञान हे पंगु आहे.

ज्ञान समर्थ असले पाहिजे असे चिपळूणकर म्हणतात. ज्ञानाने माणूस निर्भय बनावा असे कोल्हटकर, परांजपे यांनी प्रतिपादन केले आहे.

मानव साधनसामुग्रीच्या विकासासाठी जे शिक्षण द्यायचे त्याची दिशा ठरविताना व त्याची कार्यवाही करताना प्रस्तुत निबंधकारांच्या निबंधातील शिक्षणविचाराचा उपयोग करता येण्यासारखा आहे.

अल्पसंख्य व मागासवर्गीय यांच्या शिक्षणाबाबत केळकरांनी व्यक्त केलेल्या विचारांचा मागोवा घेतला तर असे दिसते की निम्न स्तरावरील व्यक्तींना उच्चस्तरावर नेण्यासाठी शिक्षण हे एकमेव साधन आहे. नवे शैक्षणिक धोरण याच तत्त्वाचा पाठपुरावा करून आपली उद्दिष्टे साध्य करणार आहे.

अशा तऱ्हेने प्रस्तुतप्रबंध विषयातील शिक्षण विचार नवे शैक्षणिक धोरण राबविताना उपयुक्त ठरणारे वाटतील.

एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करताना एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी व विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत जो शिक्षण विचार मांडण्यात आला तो भविष्य काळासाठी काही वैचारिक बैठक प्राप्त करून देईल.

नवीन शैक्षणिक धोरणाच्या दृष्टीने वरील विचारात केवळ एकच त्रुटी दिसून येते की आंतरराष्ट्रीय सहकार्य व सामंजस्य याबाबत मराठी निबंधकारांच्या निबंधात फारसे विचार आलेले नाहीत. अपवाद फक्त वा. म. जोशी यांचा. त्यांनी आंतरराष्ट्रीय मानवाभिमान ही संकल्पना मांडली. (पृ. ४०२)

"Our place in the Third World is based on a philosophy of mutual respect, non-interference and active co-operation, while this policy has promoted intenational peace and co-operation, it has given a place of honour in the comity of nations."

ज्या कालखंडात हे निबंध लिहिले गेले तो कालखंड पारतंत्र्याचा होता. यां कालखंडात वैचारिकांची सर्वसामान्य प्रमुख आकांक्षा स्वातंत्र्य संपादनाची होती. समाज सुधारणेची होती. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत विचार करण्याची आवश्यकता त्यांना त्या काळात वाटली नसावी, म्हणून याप्रकारचा विषय त्यांच्या निबंधात आला नाही. अर्थातच या त्रुटीला त्रुटी म्हणता येणार नाही. हा अपवाद सोडल्यास, नव्या शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यातील बरेचसे विचार या निबंधकारांच्या निबंधात या ना त्या स्वरूपात आले आहेत असेच म्हणावे लागेल.

### निष्कर्ष

- मराठीतील सात प्रमुख निबंधकारांच्या निबंधातील शिक्षण विचाराने शिक्षण क्षेत्रातील वैचारिक प्रक्रियेत मोलाची भर टाकली आहे.
- या निंबधकारांपैकी सर्वच निबंधकार शिक्षण क्षेत्रात काम करणारे, संस्था संचालक, अध्यापक इ. होते तर तिघेजण शिक्षण क्षेत्राशी संस्था संस्थापक या स्वरूपाने निगडित होते.
- सातही निबंधकारांनी लेखनाबरोबर वृत्तपत्राच्या माध्यमातून लोक शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांची 'लोकशिक्षक' ही भूमिका शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांना मार्गदर्शक ठरते.
- निबंध हा एक महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. साहित्य आणि जीवन यांचे परस्परसंबंध निकटचे. किंबहुना 'जीवन' ही साहित्याची सामग्री असल्याने जीवनातून साहित्याची निर्मिती होते. शिक्षणाचा जीवनाच्या घडणीशी फार जवळचा संबंध

असतो. परिणामकारक शिक्षण जीवनाला आकार देऊ शकते. म्हणजेच साहित्यालाही आकार देऊ शकते. अशा तऱ्हेने साहित्य, जीवन व शिक्षण यांचा अन्योन्य संबंध आहे.

❖ शिक्षण हे व्यक्तिविकासाचे एक महत्त्वाचे साधन आहे. समाजाची व राष्ट्राची जडण-घडण शिक्षणामुळे होते. व्यक्ती, समाज व राष्ट्र यांचे परस्पर संबंध शिक्षणाने सुधारतात किंवा शिक्षण नसल्याने बिघडतात.

❖ स्वातंत्र्य आणि शिक्षण यांचाही संबंध फार जवळचा आहे. राजकीय पारतंत्र्य हे त्या राष्ट्रातील लोकांच्या अज्ञानामुळे किंवा मागासलेपणामुळे येते. सुबुद्ध व सुशिक्षित समाज स्वातंत्र्य लवकर प्राप्त करून घेतो.

❖ शिक्षण म्हणजे जसे व्यक्तिविकास, समाजविकास किंवा राष्ट्रविकास तसेच शिक्षण म्हणजे दास्यमुक्ती. हे दास्य विविध प्रकारचे असते. सामाजिक, राजकीय, आर्थिक, मानसिक, सांस्कृतिक, शैक्षणिक. दास्यमुक्तीवरील एकमेव उपाय म्हणजे शिक्षण.

❖ शिक्षणशास्त्रदृष्ट्या विविध शैक्षणिक मूल्यांची चर्चा मराठीतील प्रमुख निबंधकारांच्या निबंधांतून आलेली आहे. शैक्षणिक समाजशास्त्र, शैक्षणिक तत्त्वज्ञान, शैक्षणिक मानसशास्त्र इ. शिक्षणशास्त्रविषयक घटकांतील काही घटकांची चर्चा व त्याबाबत स्वतंत्र मतप्रदर्शन या निबंधांतून व्यक्त केले गेले आहे.

❖ काही अत्याधुनिक शैक्षणिक विषयांची चर्चा या निबंधांतून केली गेली आहे. उदा. लोकसंख्या शिक्षण (पॉप्युलेशन एज्युकेशन) या शिक्षण शाखेची आवश्यकता सध्या फारच भासू लागली असून जगभर लोकसंख्येच्या विस्फोटामुळे निर्माण होणाऱ्या विविध सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक दुष्परिणामांची कल्पना देणारे शिक्षण आज देण्यात येते. या घटकात पर्यावरण, निसर्गसंतुलन, लोकसंख्या नियंत्रण आणि लोकसंख्येची गुणवत्ता वाढविण्याचे शिक्षण या घटकांचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधन क्षेत्रातील निबंधांतून याविषयी चर्चा त्या काळीच केली गेली आहे. संमतीवयाचा कायदा, बालविवाह इ. सामाजिक प्रश्नांच्या चर्चेच्या अनुरोधाने ही चर्चा निबंध वाङ्मयात केली गेली आहे.

❖ स्वातंत्र्य संपादन व समाजसुधारणा ही शिक्षणाद्वारे साधावयाची दोन मोठी उद्दिष्टे कशा तऱ्हेने साधता येतील याचे दिग्दर्शन या निबंधांत केले गेले आहे.

❖ स्त्री शिक्षणाबाबत महाराष्ट्रात प्रत्यक्ष चळवळीला सुरुवात प्रथमत: म. फुले यांनी केली. धोंडो केशव कर्वे यांनी ही चळवळ आकारास आणली. पण तरीही सामाजिक बंध, रूढी, अंधश्रद्धा व स्त्री विषयक दृष्टिकोन यामुळे स्त्री शिक्षणाची

हवी तशी प्रगती झाली नाही. प्रस्तुत निबंधकारांच्या निबंधांत, विशेषत: आगरकर व काही प्रमाणात वा. म. जोशी यांच्या निबंधात स्त्री शिक्षण विषयक मौलिक विचारदर्शन आहे.

- अनौपचारिक शिक्षणही आता काळाची गरज आहे. यासंबंधीचे काही विचार या निबंधकारांच्या निबंधात व्यक्त झाले आहेत व ते आधुनिक काळात मार्गदर्शक ठरणारे आहेत.
- शेती शिक्षण व औद्योगिक शिक्षण, श्रमप्रतिष्ठा शिक्षण, विद्यापीठे, स्त्री शिक्षण, वाचन, ग्रंथालयांची उपयुक्तता, शासन आणि शिक्षक, पालकांची कर्तव्ये, विद्यार्थी आणि राजकारण, मातृभाषा हाच स्वराज्याचा पाया, संस्कृत भाषेचे पुनरुज्जीवन, राष्ट्रीय शिक्षण, इ. अनेक घटकांची सविस्तर चर्चा या निबंधांतून केली गेली आहे.
- सध्याचा ज्वलंत प्रश्न मागासवर्गीयांच्या उन्नतीचा. या प्रश्नाबाबत त्या काळातही केळकरांनी केलेली चर्चा आज उपयुक्त ठरणारी आहे. मागासवर्गीयांचे प्रश्न शिक्षणानेच सुटतील हे त्यांचे प्रतिपादन आहे.
- नवे शैक्षणिक धोरण १९८७-८८ या वर्षापासून राबविले जात आहे. नव्या शैक्षणिक धोरणातील काही विचारांचे मंथन प्रस्तुत संशोधन क्षेत्रातील साहित्यात आले आहे व ते आधुनिक काळातही, विशेषत: नवे शैक्षणिक धोरण राबविताना मार्गदर्शक ठरणारे आहे.

## पुढील अभ्यासाच्या दिशा

- या ग्रंथात केवळ निबंध वाङ्मयाचाच विचार केला आहे. तोही स्वातंत्र्यपूर्व काळातील निबंध वाङ्मयाचा शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास करता येणे शक्य आहे. या सात निबंधकारांव्यतिरिक्त उर्वरित निबंधकारांचा विचार व्हावा.
- मराठीत प्रसिद्ध झालेल्या चरित्र-अत्माचरित्र ग्रंथांचा अभ्यास करून त्यात आलेला शिक्षण विचार अभ्यासण्यासारखा आहे. मराठीत काही चांगली चरित्रे, आत्मचरित्रे प्रसिद्ध झाली आहेत. विशेषत: शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींची आत्मचरित्रे अभ्यासून त्यातील शिक्षण विचाराचा चिकित्सक अभ्यास करणे युक्त होईल. उदा. धोंडो केशव कर्वे, ना. म. पटवर्धन, दादासाहेब रेगे यांची आत्मचरित्रे.
- मराठीतील ललितवाङ्मयाचा, याच कालखंडातील अथवा कोणताही विशिष्ट कालखंड निवडून, अभ्यास करून त्यातील शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाच्या मूल्यांचा विचार करता येणे शक्य आहे. उदा. बिनभिंतीची शाळा इथली लाखो इथले गुरू झाडे-वेली, पशू पाखरे यांशी गोष्टी करू... ही ग. दि. माडगूळकर यांची

कविता अनौपचारिक शिक्षणाचा पाठ देते.

❖ शैक्षणिक नियतकालिकांतून येणाऱ्या शिक्षण विचाराचा अभ्यास करणे. यासाठी विशिष्ट कालखंड व विशिष्ट अभ्यासक्षेत्र निवडावे. महाराष्ट्रात अशी अनेक शैक्षणिक नियतकालिके प्रसिद्ध होतात. उदा. जीवनशिक्षण, शिक्षणसंक्रमण, भारतीय शिक्षण.

## उपसंहार

"शिक्षण हे खूप पैसे, मोठे अधिकार मिळविण्याचे साधन आहे असे लोक मानतात. पैशाच्या आणि अधिकाराच्या लोभामुळे त्यांना गुलामगिरी आवडू लागते. 'सा विद्या या विमुक्तये' म्हणजे जी मुक्त करते ती विद्या असे संस्कृत वचन आहे. विद्या म्हणजे केवळ अध्यात्मिक ज्ञान नव्हे. मुक्ती म्हणजे फक्त सुटका इतकाच अर्थ नाही. विद्या म्हणजे लोकांना उपयोगी असणारे सर्व प्रकारचे ज्ञान आणि मुक्ती म्हणजे जीवनातल्या सगळ्या तऱ्हेच्या गुलामगिरीतून सुटका होणे. गुलामगिरी म्हणजे कोणाच्या तरी स्वाधीन असणे किंवा आपणच निर्माण केलेल्या खोट्या गरजांच्या आहारी जाणे. या गुलामगिरीतून सुटका करील ते खरे शिक्षण."

महात्मा गांधी यांच्या या वचनातील सघन आशय कालातीत महत्त्वाचा आहे. सगळ्या तऱ्हेच्या गुलामगिरीतून सुटका, दास्यमुक्ती हेच शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील सात निबंधकारांनी आपल्या निबंधांत या दास्यमुक्तीचाच पाठपुरावा केला. टिळकांना अभिप्रेत होती राजकीय दास्यमुक्ती, आगरकरांना अभिप्रेत होती, सामाजिक दास्यमुक्ती. हा फरक वरवरचा आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक या सर्वच क्षेत्रातील गुलामगिरी नष्ट होऊन भारत स्वतंत्र व्हावा हीच निबंधकारांमधील तीव्र आकांक्षा निबंधमालाकारांच्या निबंधापासून उद्गम पावली आणि या विचारप्रवाहाचे स्रोत अन्य निबंधकारांच्या निबंधांतही समर्थपणे दिसून आले.

प्रखर राष्ट्रवादी चिपळूणकर टिळक काय, प्रखर समाजसुधारणावादी आगरकर काय, काव्यात्म वृत्तीचे परांजपे काय किंवा गिरगावच्या बहुजनांसाठी लिहिणारे कोल्हटकर काय, बहुश्रुत पंडित केळकर काय किंवा तत्त्वचिकित्सक वा. म. जोशी काय, सर्वच निबंधकारांची वैचारिक बैठक 'दास्यमुक्ती' हीच होती. आज राजकीय स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली असली तरी या प्रश्नांचे महत्त्व संपलेले नाही. दास्य आहेच आणि म्हणूनच या प्रखर चिंतनशील वैचारिकांचे विचार अभ्यसनीय आहेत.

■ ■

# संदर्भ साहित्य सूची

## मराठी

### निबंध (लेख) संग्रह

**आगरकर गोपाळ गणेश**

१) आळतेकर मा. दा. (संपादक) : **संपूर्ण आगरकर – भाग १,** आगरकर प्रकाशन मंडळ, पुणे २, १९३७.
२) आळतेकर मा. दा. (संपादक) : **संपूर्ण आगरकर - भाग २,** मॉडर्न बुक डेपो, पुणे २, १९४७.
३) आळतेकर मा. दा. (संपादक) : **संपूर्ण आगरकर - भाग ३,** आगरकर प्रकाशन मंडळ, पुणे २, १९४०.

**केळकर नरसिंह चिंतामण**

४) केळकर न. चिं. : **समग्र केळकर वाङ्मय - खंड ११,** संस्कृति खंड, म. म. केळकर, पुणे ३०, १९३८.

**कोल्हटकर अच्युत बळवंत**

५) गद्रे अ. ह. (संपादक) : **अच्युतराव कोल्हटकर स्मारक ग्रंथ - भाग १,** अ. ह. गद्रे, मुंबई ४, १९३३.
६) तत्रैव : **तत्रैव** भाग २, तत्रैव, १९३४.
७) तत्रैव : **तत्रैव** भाग ३, तत्रैव, १९३५.

**चिपळूणकर विष्णुशास्त्री कृष्णशास्त्री**

८) चिपळूणकर विष्णुशास्त्री : **निबंधमाला,** चित्रशाळा प्रकाशन, पुणे २, ति. आ. १९२६.
९) चिपळूणकर विष्णुशास्त्री : **आमच्या देशाची स्थिती,** चित्रशाळा प्रकाशन, पुणे ३०, १९४८.

**जोशी वामन मल्हार**

१०) जोशी वामन मल्हार : **विचार-लहरी,** देशमुख आणि कंपनी, पुणे २, १९४३.
११) जोशी वामन मल्हार : **विचार-विहार,** देशमुख आणि कंपनी, पुणे २, (प्रथमावृत्ती १९४४), द्वितीय आवृत्ती १९५४.
१२) जोशी वामन मल्हार : **विचार-विलास,** मॉडर्न बुक डेपो, पुणे २, दुसरी आवृत्ती.
१३) जोशी वामन मल्हार : **विचार सौंदर्य,** व्हीनस प्रकाशन, पुणे ३०, पुनर्मुद्रण १९७८, (प्रथमावृत्ती १९४०).
१४) देशपांडे अ. ना., जोशी ग. वा. (संपादक) : **साहित्यातील विवेक (वा. म. जोशी),** विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे २, प्र. आ. १९६२.

**टिळक बाळ गंगाधर**

१५) टिळक बाळ गंगाधर : **समग्र लोकमान्य टिळक खंड ३** (राजकीय), केसरी प्रकाशन, पुणे ३०, १९७६.

१६) टिळक बाळ गंगाधर : **समग्र लोकमान्य टिळक खंड ५** (समाज व संस्कृती), केसरी प्रकाशन, पुणे ३०, १९७६.

**परांजपे शिवराम महादेव**

१७) परांजपे शिवराम महादेव : **काळातील निवडक निबंध - भाग १,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, पुनर्मुद्रण, १९४६.

१८) परांजपे शिवराम महादेव : **काळातील निवडक निबंध - भाग २,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, पुनर्मुद्रण, १९४६.

१९) परांजपे शिवराम महादेव : **काळातील निवडक निबंध - भाग ३,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, पुनर्मुद्रण, १९४६.

२०) परांजपे शिवराम महादेव : **काळातील निवडक निबंध - भाग ४,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, पुनर्मुद्रण, १९४६.

२१) परांजपे शिवराम महादेव : **काळातील निवडक निबंध - भाग ५,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, पुनर्मुद्रण, १९४६.

२२) परांजपे शिवराम महादेव : **काळातील निवडक निबंध - भाग ६,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, पुनर्मुद्रण, १९४६.

२३) परांजपे शिवराम महादेव : **काळातील निवडक निबंध - भाग ७,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, पुनर्मुद्रण, १९४६.

२४) परांजपे शिवराम महादेव : **काळातील निवडक निबंध - भाग ८,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, पुनर्मुद्रण, १९४६.

२५) परांजपे शिवराम महादेव : **काळातील निवडक निबंध - भाग ९,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, पुनर्मुद्रण, १९४६.

२६) परांजपे शिवराम महादेव : **काळातील निवडक निबंध - भाग १०,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, पुनर्मुद्रण, १९४६.

२७) परांजपे शिवराम महादेव : **साहित्य-संग्रह - भाग १,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, द्वितीय आवृत्ती १९३७.

२८) परांजपे शिवराम महादेव : **साहित्य-संग्रह - भाग २,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, द्वितीय आवृत्ती १९३७.

२९) परांजपे शिवराम महादेव : **साहित्य-संग्रह - भाग ३,** य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, द्वितीय आवृत्ती १९४६.

**वाङ्मयाचा इतिहास**

३०) जोग रा. श्री. (संपादक) : **मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड ५, भाग १,** महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ३०, १९७३.

३१) देशपांडे अ. ना. (संपादक, लेखक) : **आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास -**

**भाग १,** व्हीनस प्रकाशन, पुणे ३०, पुनर्मुद्रण, १९६७.
३२) देशपांडे अ. ना. (संपादक, लेखक) : **आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग २,** व्हीनस प्रकाशन, पुणे ३०, पुनर्मुद्रण, १९७०.

**साहित्यसमीक्षा व साहित्यविचार**

३३) करंदीकर गो. वि. : **ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र,** मौज प्रकाशन, मुंबई ४, १९५७.
३४) करंदीकर गो. वि. : **परंपरा आणि नवता,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४, १९६७.
३५) खांडेकर वि. स. : **आगरकर व्यक्ति आणि विचार,** देशमुख आणि कंपनी, पुणे २, द्वि. आ. १९४९.
३६) जोग रा. श्री. आणि इतर : **प्रदक्षिणा,** कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०, पाचवी आवृत्ती, १९७२.
३७) जोशी वसंत स. (संपादक) : **भाषा व साहित्यसंशोधन,** महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ३०, १९८१.
३८) प्रियोळकर अ. का. (संपादक) : लोकहितवादीकृत निबंधसंग्रह, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ३०, १९८१
३८) प्रियोळकर अ. का. (संपादक) **लोकहितवादीकृत निबंधसंग्रह,** द्वि.आ. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४, १९६७.
३९) फडके य. दि. **शोध बाळगोपाळांचा,** श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०, १९७७
४०) बेडेकर दि. के. **साहित्य विचार,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४, १९६४
४१) माडखोलकर ग. त्र्यं. **चिपळूणकर काल आणि कर्तृत्व,** ठाकूर आणि कंपनी लि., अमरावती, चतुर्थ संस्करण, १९५७
४२) माडखोलकर ग. त्र्यं. **विष्णु कृष्ण चिपळूणकर,** देशमुख आणि कं. पुणे २, चतुर्थ संस्करण, १९५७
४३) शिखरे दा. न. **निबंधकार पुस्तक १ व २,** दी टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाऊस लि. पुणे २, १९५२
४४) सरदार गं. बा. **अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठीका,** मॉर्डन बुक डेपो प्रकाशन पुणे ३०, ति. आ. १९७१
४५) सरदार गं. बा. **आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार,** व्हीनस प्रकाशन, पुणे ३०, १९७५
४६) क्षीरसागर श्री. के. (संपादक) **समाज - विकास,** कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे २, १९५१

**समाज व संस्कृती**

४७) जावडेकर मुरलीधर **महाराष्ट्रातील वैज्ञानिक क्रांती,** मु. म. जावडेकर, मालवण ४१६ ६०६, १९८२
४८) जावडेकर शं. द. **लोकशाही,** कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे २, द्वि.आ. १९४९
४९) पाध्ये प्रभाकर, टिकेकर श्री. रा. **आजकालचा महाराष्ट्र,** भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई २, १९३५

५०) मुणगेकर श्री. ग. (संपादक) **परिवर्तनाचे प्रवाह : महाराष्ट्र १९३२ ते १९८१**, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे ३०, १९८२
५१) शेणोलीकर ह. श्री. देशपांडे प्र. न. **महाराष्ट्र संस्कृती, घडण व विकास,** मोघे प्रकाशन, कोल्हापूर व पुणे, १९७२
५२) सरदार गं. बा. (संपादक) **महाराष्ट्र जीवन, परंपरा, प्रगती आणि समस्या,** जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे २, १९६०
५३) सहस्रबुद्धे पु. ग. **महाराष्ट्र संस्कृती,** कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे ३०, १९७९

**चरित्र**

५४) अब्दुल हमीद (संपादक) **विष्णुशास्त्री चिपळूणकर,** राष्ट्रीय चरित्रमाला संच १, पुणे २, द्वि. आ. १९७७
५५) गोखले पु. पां. **आगकरांची ओळख,** द. र. कोपर्डेकर, पुणे २, १९६९
५६) तळवलकर गोविंद, **बाळ गंगाधर टिळक,** मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४, १९७७
५७) देसाई ह. त्र्यं. **गुणसागर टिळक,** पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे ३०, १९७७
५८) पर्वते त्र्यं. वि. **नरसिंह चिंतामण : एक महनीय व्यक्तित्त्व,** मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, पुणे ३०, १९७२
५९) परांपजे वा. कृ. **काळकर्ते शिवरामपंत परांपजे,** र. श्री. देशपांडे, पुणे, १९४५
६०) वैद्य वि. उ. **"नरसिंह" केळकर,** मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, पुणे २, १९४५

**कोश**

६१) वाडेकर देविदास दत्तात्रय (संपादक) **मराठी तत्त्वज्ञान महाकोश, तृतीय खंड,** मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे ३०, १९७४

**शिक्षण**

६२) अकोलकर ग. वि. पाटणकर ना. वि. **मराठीचे अध्यापन,** व्हीनस प्रकाशन, पुणे ३०, सातवी आवृत्ती, १९७०
६३) अकोलकर ग. वि. **महाराष्ट्रातील शैक्षणिक परिवर्तन,** शारदा प्रकाशन, पुणे २, १९७१
६४) अकोलकर ग. वि. **शैक्षणिक समाजशास्त्राची रुपरेषा,** श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०, १९७३
६५) आचार्य श्री. रा. **आधुनिक भारतातील शैक्षणिक प्रबोधन,** पुष्पक प्रकाशन, पुणे ३०, १९७९
६६) आपटे पां. श्री. **महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास** टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २, १९५८
६७) कर्णिक वा. ब.,गोखले मधुसूदन **ग्रामीण पुनर्रचना व शिक्षण,** ग.ल.ठोकळ, पुणे२, १९६३
६८) कर्णिक वा.ब., गोखले मधुसूदन. **प्राथमिक शिक्षणाच्या समस्या,** ठोकळ प्रकाशन, पुणे २, १९६२
६९) कानिटकर तारा, कुलकर्णी सुमती. **लोकसंख्याशास्त्र,** श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०, १९७९

७०) काळे दि. वि. **राष्ट्रीय शिक्षणाचा ध्यास,** वोरा आणि कं., मुंबई २, १९५९
७१) कुंडले म. बा. **शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र** श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०, सहावी आवृत्ती, १९८६
७२) कुलकर्णी के. वि. **शैक्षणिक मानसशास्त्र,** श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०, तृ. आ. १९८५
७३) खरात आ. पां. **प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र,** श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०, १९७४
७४) डांगे चंद्रकुमार, इंदापूरकर चंद्रकांत **भारतीय ग्रामशिक्षण,** नीलकंठ प्रकाशन, पुणे ९, १९६७
७५) ढमढेरे वा. रा., नातू मो. ना., टिळक ज. श्री. (संपादक) **काही शैक्षणिक समस्या, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे २, १९६३**
**७६) तवकर ना. गो. प्राचीन भारतीयांची ज्ञानसाधना,** तवकर प्रकाशन, मुंबई २०, १९७३
७७) पाटील लीला **मातृभाषेचे अध्यापन,** व्हीनस प्रकाशन, पुणे ३०, १९६४
७८) पाटील लीला **माध्यमिक शाळा, संचालन व संवर्धन,** श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०, १९८०
७९) पानसे वेणूबाई, **प्रगतिपथावर :** (हुजुरपागा सुवर्णमहोत्सव स्मारक ग्रंथ), हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स, पुणे, १९३४
८०) बापट शकुंतला, बोकील का. द. **शिक्षणाचे शिल्पकार,** चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे ३०, १९७०
८१) बाबर सरोजिनी आणि इतर, **भारतीय स्त्री** (संपादित ग्रंथ), हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे, १९६९
८२) बाबर सरोजिनी **स्त्रीशिक्षणाची वाटचाल,** महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय, पुणे १, १९६८
८३) मराठे रा. म. **शिक्षणाची मूलतत्त्वे,** मोघे प्रकाशन, कोल्हापूर, पुणे, सुधारलेली आवृत्ती चौथी, १९७२
८४) शेवाळकर राम (संपादक) **शिक्षणविचार (विनोबा),** रणजित देसाई, परंधाम प्रकाशन पवनार, वर्धा, सुधारून वाढविलेली नवसंपादित आवृत्ती, १९७७

**संकीर्ण**

८५) कोरगावकर भाल (संपादक) **प्रा. ना. वि. कुलकर्णी गौरवांक,** प्रा. ना. वि. कुलकर्णी गौरव समिती, पुणे ४, १९८७
८६) जोगळेकर गं. ना. (संपादक) **शतक स्मृती,** न्यू इंग्लिश स्कूल, पुणे, १९८०
८७) जोगळेकर गं. ना. (संपादक) **शताब्दी विशेषांक,** न्यू इंग्लिश स्कूल, पुणे, १९८०
८८) पंडित के. गो. अनुवादक, स. गं. मालशे **दि डेक्कन एज्युकेशन सोसायटी,** १८८५–१९६० वि. वि. आपटे, सेक्रेटरी डे. ए. सोसायटी, पुणे, १९६०
८९) **लोकसंख्याशिक्षण :** शिक्षणशास्त्र संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ३०, १९८२
९०) **प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, डिसेंबर १९८५** निर्मिती – राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली ११०

०१६ अनुवाद – महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०, प्रकाशन व. रा. नागपुरे, म. रा. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ३०, जून १९८६

९१) बोकील श्री. र. (संपादक व प्रकाशक) **शिक्षण संक्रमण, ऑगस्ट १९८६,** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ०१०

## ENGLISH

92) Aggarwal J. C. **Thoughts on Education,** Arya Book Depot, New Delhi 5, 1967

93) Bokil V. p. **Foundation of Education,** S.V.Bokil, Pune 30, 1970

94) Boyd William **The History of Western Education,** Adam and Charles Black, London, W I : 1952

95) Broudy H.S. **Building a Philosophy of Education,** Prentice–Hall of India (Pr.) Ltd., New Delhi, Second Edition, 1995.

96) Brubacher John S. **A History of the problems of Education,** McGraw Hill Book Company, Inc. New York, 1947

97) Brubacher John S. **Modern Philosophies of Education,** McGraw Hill Book Company Inc. New york, 1950

98) John Dewey **Democracy and Education,** The Macmillan Company, New York, 28th printing, 1955

99) Kilpatric W. H. **Source Book in the philosophy of** Education, The Macmillan Company New York, Revised Edition, 1938

100) Mckown H.C. **Extracurricular Activities :** The Macmillan Company, New York, Third Edition, 1956

101) Paranjpe M. R. **A Source Book of Modern Indian Education 1797 to 1902,** Macmillan and Company, Bombay, 1938


102) Russell Bertrand **Education and The Social Order,** George Allen and Unwin Ltd., London, 1956, (Fifth Impression)

103) Saraf R. S. **Teaching English in India** Shri Vidya Prakashan, Pune 30, 1987

104) **A Review of Education in Bombay State 1855–1955** Director, Government Printing, Publications and Stationery, Bombay State, Bombay : 1958.

105) **CHALLENGE OF EDUCATION : A policy perspective** Ministry of Education, Government of India, New Delhi, August 1985.

■



शिक्षण संस्था म्हणजे व्यक्ती,समाज,राष्ट्र व मानवता यांच्या जडणघडणीच्या कार्यशाळा. या कार्यशाळांची कार्यशैली समाजशास्त्र व मानसशास्त्र यांच्या आधाराने शैक्षणिक तत्त्वज्ञान ठरविते. आणि ही कार्यशैली अंमलात आणणारा प्रतिभावंत म्हणजे शिक्षक.शिक्षणविचारात अशा अनेक घटकांचा समावेश असतो.जगाचा इतिहास असं सांगतो की शिक्षक हा क्रांतीचा अग्रदूत असतो.स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात थोर शिक्षकांनीच स्वातंत्र्याची मशाल हाती घेऊन जनजागृती केली. प्रस्तुत ग्रंथात सात शिक्षक,लेखक व पत्रकार असलेल्या विचारवंतांचा शिक्षणविचार ग्रथित केला आहे,१९५० पूर्व मराठी निबंधवाङ्मयातील शिक्षणविचाराचा चिकित्सक अभ्यास या विषयावर डॉ. न. म. जोशी यांनी संशोधन केले आणि पुणे विद्यापीठाने त्यांना पीएच.डी.पदवी प्रदान केली. प्रस्तुत ग्रंथ या अभ्यासावर आधारित आहे.

या ग्रंथातील शिक्षणविचार आजही उपयुक्त, संदर्भमूल्य असलेला, ताजा वाटेल. शिक्षणतज्ज्ञ,शिक्षणसंस्था,महाविद्यालये,विविध ग्रंथालये या ग्रंथाचे स्वागत करतील अशी खात्री वाटते.

सुविद्या प्रकाशन,पुणे ३०